# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

# व्यावसायिक पर्यावरण

(शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून)

**बी. कॉम. भाग-३**
**सत्र-५ व ६**

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)

**प्रथमावृत्ती :** २०१५

**द्वितीय आवृत्ती :** २०१७

**तृतीय आवृत्ती :** २०१९

बी. कॉम. (व्यावसायिक पर्यावरण) भाग - ३ करिता

सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती :** ५००

■

**प्रकाशक :**

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**

कुलसचिव,

शिवाजी विद्यापीठ,

कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**

**श्री. बी. पी. पाटील**

अधीक्षक,

शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,

कोल्हापूर-४१६ ००४.

■

ISBN- 978-81-8486-218-8

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

★ दूर शिक्षण विभाग-विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या विकसन अनुदानातून या साहित्याची निर्मिती केली आहे.

# दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ सल्लागार समिती ■


**प्रा. (डॉ.) डी. बी. शिंदे**
मा. कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) ए. एम. गुरव**
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) भारती पाटील**
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. डी. राऊत**
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. जी. आर. पळसे**
I/c संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. व्ही. टी. पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. ए. अनुसे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


## ■ व्यावसायिक पर्यावरण : समन्वय समिती ■


अध्यक्ष - **डॉ. डी. के. मोरे**
रिंग रोड, न्यू बाहे नाका, महादेव नगर, इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली.

- **श्रीमती डॉ. ए. व्ही. पाठक**
  कमला कॉलेज, राजारामपुरी,
  कोल्हापूर
- **डॉ. एस. बी. महाडीक**
  संख्याशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

| दूरशिक्षण केंद्र,<br>शिवाजी विद्यापीठ,<br>कोल्हापूर | **व्यावसायिक पर्यावरण**<br>**बी. कॉम. भाग-३** |
|---|---|

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखन सहभाग | घटक क्र. | |
|---|---|---|
| | सत्र-५ | सत्र-६ |
| **डॉ. दत्तात्रय ग. चौगुले**<br>न्यू कॉलेज, कोल्हापूर | १, ३ | १ |
| **श्री. एस. जे. देसाई**<br>यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर | २ | - |
| **डॉ. डी. के. मोरे**<br>के. आर. पी. कन्या महाविद्यालय, इस्लामपूर | २ | १ |
| **श्री. वाय. के. मुलाणी**<br>एस. एम. डॉ. बी. एस. कॉलेज, मिरज | ४ | - |
| **डॉ. अनिस सत्रे**<br>एम. पी. पी. महाविद्यालय, बोरगाव | ३, ४ | - |
| **डॉ. बी. के. माने**<br>आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा | - | २ |
| **श्री. जी. डी. जाधव**<br>बळवंत कॉलेज, विटा, जि. सांगली | - | ३ |
| **श्री. एल. बी. कचरे**<br>पी. व्ही. पी. कॉलेज, कवठेमहांकाळ | - | ४ |

■ संपादक ■

**डॉ. डी. के. मोरे**
के. आर. पी. कन्या महाविद्यालय, इस्लामपूर

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्रामार्फत बी.कॉम. तृतीय वर्षासाठी ''व्यावसायिक पर्यावरण'' या विषयासाठी स्वयम् अध्ययन म्हणून (SIM) हे पुस्तक वाचकांना उपलब्ध करून देताना आम्हास खूप आनंद होत आहे.

वाणिज्य व व्यवस्थापन अभ्यासक्रमात ''व्यावसायिक पर्यावरण'' हा महत्त्वाचा व पायाभूत अभ्यास विषय आहे. या पुस्तकात व्यावसायिक पर्यावरणाची संकल्पना, घटक व महत्त्व, कृषी विकास, कृषी अरिष्ट, भारताचा विदेशी व्यापार औद्योगिक विकास, भारतीय अर्थव्यवस्थेच्या समस्या, खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण, आर्थिक नियोजन, आंतरराष्ट्रीय पर्यावरण, आंतरराष्ट्रीय संस्था यासारख्या महत्त्वाच्या घटकांवर व्यावसायिक निर्णयाच्या संदर्भात प्राथमिक शास्त्रीय माहिती मांडली आहे.

संकल्पनात्मक स्पष्टता, सोपेपणा, व्यावहारिक उपयोग, सैद्धांतिक संकल्पनांचे स्पष्टीकरण, आवश्यक तेथे सांख्यिकी व कोष्टके यांचा पर्याप्त वापर केलेला आहे. सर्वच घटक लेखकांनी लेखनाचा दर्जा उत्तम ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. प्रत्येक घटकाच्या शेवटी स्वयम् अध्ययन व प्रमुख पारिभाषिक शब्द अर्थासह दिले आहेत. लेखनासाठी वापरलेल्या व अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तकांची यादी दिली आहे.

हे पुस्तक वाचकांना स्वयम् अध्ययनासाठी उपयुक्त ठरेल अशी आशा वाटते. आवश्यक त्या सुधारणासाठी वाचकांनी पुस्तकाचा नेमका संदर्भ देवून ''संचालक, दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर'' यांच्या कार्यालयाशी अवश्य संपर्क साधावा.

या साहित्याच्या प्रकाशनात सहभागी झालेल्या सर्व लेखकांचे व दूरशिक्षण केंद्रातील सर्व अधिकारी व कर्मचारी तसेच विद्यापीठ मुद्रणालयातील सर्व कर्मचाऱ्यांचे मनःपूर्वक आभार.

कोल्हापूर

**डॉ. डी. के. मोरे**
संपादक

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | **सत्र–५** | |
| १ | भारतीय व्यावसायिक पर्यावरण : संकल्पना, घटक व महत्त्व | १ |
| २ | शेतीचा विकास | १४ |
| ३ | औद्योगिक विकास | ६७ |
| ४ | भारतीय अर्थव्यवस्थेच्या समस्या | ९० |
| | **सत्र–६** | |
| १ | खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण | १३७ |
| २ | आर्थिक नियोजन आणि सेवा क्षेत्र | १६४ |
| ३ | विदेशी भांडवल आणि बहुराष्ट्रीय कंपन्या | १७७ |
| ४ | आंतरराष्ट्रीय संस्था | १९६ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१५-१६ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

## सत्र ५ : घटक १

# भारतीय व्यावसायिक पर्यावरण : संकल्पना, घटक व महत्त्व

**(Indian Business Environment : Concept, Components and Importance)**

### अनुक्रमणिका


१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रस्तावना

१.२ व्यावसायिक पर्यावरण

१.३ व्यावसायिक निर्णय

१.४ व्यावसायिक पर्यावरण घटक

१.४.अ अंतर्गत घटक

१.४.अ.१ मुल्य पध्दती

१.४.अ.२ उद्दिष्टये व कामगिरी

१.४.अ.३ व्यवस्थापन रचना आणि स्वरूप

१.४.अ.४ अंतर्गत क्षमता / शक्ती

१.४.अ.५ मानवी संसाधने

१.४.अ.६ कंपनीचा नावलौकीक

१.४.अ.७ इतर घटक

१.४.ब बाह्य घटक

१.४.ब.१ सुक्ष्म घटक

१.४.ब.१.१ पुरवठादार

१.४.ब.१.२ ग्राहक

१.४.ब.१.३ स्पर्धक

१.४.ब.१.४ बाजारातील मध्यस्थ

१.४.ब.१.५ वित्तपुरवठादार

१.४.ब.१.६ जनता

१.४.ब.२ स्थूल / समग्रलक्षी घटक

१.४.ब.२.१ आर्थिक घटक

१.४.ब.२.२ सांस्कृतिक घटक

१.४.ब.२.३ लोकसंख्या विषयक घटक

१.४.ब.२.४ राजकीय व सरकारी घटक

१.४.ब.२.५ नैसर्गिक घटक

१.४.ब.२.६ तंत्रज्ञान विषयक घटक

१.४.ब.२.७ वैश्विक घटक

१.५ महत्त्व

१.६ सारांश

१.७ पारिभाषिक शब्द

१.८ स्वयंअध्ययन

१.९ सरावासाठी प्रश्न

१.१०अधिक वाचनासाठी पुस्तके

## १.० उद्दिष्ट्ये :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला -

- व्यावसायिक पर्यावरण म्हणजे काय हे समजेल.
- व्यावसायिक निर्णयाची माहिती कळेल.
- व्यावसायिक पर्यावरणाचे घटक अभ्यासता येतील.
- मानवी संसाधने म्हणजे काय हे समजेल.
- व्यावसायिक पर्यावरणाचे सूक्ष्म घटक व स्थूल घटक यातील फरक कळेल.
- भारतीय व्यावसायिक पर्यावरणाची माहिती मिळेल.
- व्यावसायिक पर्यावरणाचे महत्त्व समजेल.

## १.१ प्रस्तावना (Introduction)

कोणत्याही राष्ट्राच्या आर्थिक विकासाच्या आधारात विकासाला पोषक (अनुकूल) वातावरण हा महत्त्वाचा घटक असतो. भारतासारखा विकासनशील राष्ट्रामध्ये विकासाला पोषक असे वातावरण (परिस्थिती) निर्माण करण्यात अनेक अडथळे येतात. म्हणून विकासाला पोषक असे वातावरण निर्माण करण्याची गरज असते. यादृष्टीने सरकार पावले उचलत आहे विकासाला अनूकूल अशा वातावरणामध्ये (परिस्थिती) नैसर्गिक, आर्थिक, सामाजिक व राजकीय अशा विविध घटकांचे सहकार्य आवश्यक असते. किंबहूना या सार्व घटकांच्या क्रियाशील सहभागाशिवाय आर्थिक विकास होत नाही. म्हणून या विविध घटकांचा अभ्यास करणे गरजेचे आहे. या सर्व घटकांचा समावेश 'विकासाला पोषक वातावरण' या संकल्पनेत केला जातो. यादृष्टीने ही संकल्पना अभ्यासावी लागते.

## १.२ व्यावसायिक पर्यावरण (Business Environment)

व्यावसायिक पर्यावरण म्हणजे व्यवसायविषयक परिस्थिती होय. यामध्ये व्यवसाय या संकल्पनेशी संबंधित सर्व घटकांचा समावेश होतो. 'Environ' हा मूळ फ्रेंच शब्द आहे. त्यापासून इंग्रजीत Environment हा शब्द प्रचलित झाला. याचा अर्थ एखाद्याच्या वर्तणुकीवर आणि विकासावर परिणाम करणारी परिस्थिती (वातावरण) होय. म्हणजेच एखाद्या घटकाच्या अस्तित्वाला कारणीभूत ठरणारी भौतिक परिस्थिती (Physical Conditions) होय. म्हणजे भोवती असणाऱ्या वस्तु, देखावा, माणसे इ. मिळून झालेली परिस्थिती होय.


भारत सरकारने विकासाला आवश्यक असणाऱ्या परिस्थितीत (Environment) बदल करण्याच्या दृष्टीने १९९१ पासून आपल्या आर्थिक धोरणात मूलभूत बदल करण्यास सुरवात केली आहे. त्यादृष्टीने आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या सल्याने भारताने 'स्थिरीकरणाची नीती' (Stabilisation Policy) राबविल्याचा निर्णय घेतला. तसेच जागतिक बँकेच्या सल्याने ''संरचनात्मक समायोजन कार्यक्रमाची नीती'' (Structural Adjustment Programme) राबविण्याचे भारताने ठरविले संरचनात्मक समायोजन कार्यक्रमात विदेशी विनिमय दर, व्यापार, औद्योगिक धोरण, राजकोषीय धोरण, वित्तीय बाजार इ. मध्ये सुधारणा करण्याचा समावेश आहे. भारताने आर्थिक सुधारणा कार्यक्रमांतर्गत ''अंतर्मुखी'' आर्थिक डावपेचाऐवजी उदारमतवादी आणि बाह्यमुखी आर्थिक डावपेच स्वीकारला. यामध्ये आर्थिक उदारीकरण, विनियंत्रण आणि परवानामुक्त आर्थिक धोरण राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. म्हणजेच विकासाला आवश्यक ती व्यावसायिक परिस्थिती निर्माण करण्याचे धोरण स्वीकारले.

## १.३ व्यावसायिक निर्णय (Business Decisions)

व्यावसायिक निर्णय किंवा व्यूहरचना यांनी मिळून व्यावसायिक परिस्थितीचा (Business Environment) ढांचा (रचना) तयार होतो. यामध्ये आर्थिक, राजकिय, नियमनात्मक, सामाजिक, लोकसंख्याविषयक, तांत्रिक आणि नैसर्गिक घटक इ. बाह्य घटकांचा समावेश होतो. हे घटक विकासासाठी योग्य संधी उपलब्ध करून देतात. तसेच संसाधने, क्षमता आणि व्यवसाय संस्थेचा नावलौकिक, अंतर्गत शक्ती व सहसंबंध या अंतर्गत घटकांवर परिणाम करतात की ज्यामुळे व्यवसाय संस्थेला सामर्थ्य मिळते आणि काही दोष ही निर्माण होतात. म्हणून या सर्व घटकांचा सर्वांगिण अभ्यास करणे व्यूहरचनात्मक निर्णयासाठी आवश्यक असते. भारतीय अर्थव्यवस्थेबाबत (१) आर्थिक परिस्थिती (२) राजकिय व सरकारी (शासकीय) परिस्थिती (३) नैसर्गिक व तांत्रिक परिस्थिती आणि (४) लोकसंख्याविषयक परिस्थिती इ. घटकांचा व्यावसायिक परिस्थितीत (Business Environment) समावेश होतो. त्याचा आपल्याला अभ्यास करावयाचा आहे.

## १.४ व्यावसायिक पर्यावरणाचे घटक (Components of Business Environment)

व्यावसायिक परिस्थितीचे वेगवेगळे घटक आहेत. परंतु विश्लेषणाच्या दृष्टीने त्याची दोन भागात विभागणी केली जाते. (१) अंतर्गत घटक व (२) बाह्य घटक. हे घटक पुढील तक्ता क्र. १ मध्ये दाखविले आहेत. त्यांचा आपण सविस्तर अभ्यास करू.




### १.४.अ अंतर्गत घटक (Internal Environment)

अंतर्गत घटकामध्ये पुढील विविध उपघटकांचा समावेश होतो.

### १.४.अ.१ मुल्य पध्दती (Value System)

व्यवसाय संस्थेच्या स्थापनेच्या वेळी संस्थापकाने कोणत्या ध्येयाने (उद्दिष्टे) प्रेरित होऊन संस्था स्थापन केली आहे. व्यवसाय संघटन कशाप्रकारचे असेल आणि प्रत्यक्षात व्यावसायिक धोरणे कशी राबविली जातील याबाबत निश्चित अशी कार्यपध्दती याला मुल्यपध्दतीत महत्त्वाचे स्थान आहे. या मुल्यपध्दतीवरच त्या व्यवसाय संघटनेचे यशापयश अवलंबुन असते. याबाबत टाटांच्या लोखंड व पोलाद उद्योगाचे (TISCO) उदाहरण बोलके आहे. जे. आर. डी. टाटा यांनी या उद्योगाची स्थापना करून सामाजिक व नैतिक जबाबदारी पार पाडली आहे. ग्राहक कर्मचारी वर्ग, भागधारक, नागरिक आणि संपूर्ण समाज यांच्या प्रति ही सामाजिक व नैतिक जबाबदारी दिसून येते.

इन्फोसिस (Infosys) या माहिती आणि तंत्रज्ञान (IT) क्षेत्रातील नामांकित कंपनीने प्रामाणिकपणा, पारदर्शकता, सुंदरता आणि ग्राहक, कर्मचारी, विक्रेते व समाज यांच्या बाबतीतील दायित्व (जबाबदारी) ही आमची उद्दिष्ट्ये असल्याचे स्पष्ट केले आहे. एवढेच नव्हे तर ही कंपनी जागतिक स्तरावर आपला नावलौकिक मिळवून आघाडीवर आहे. या कंपनीला १९९९ चे नॅशनल कार्पोरेट गव्हर्नन्स अवॉर्ड मिळाले आहे. अमेरिकन बाजारामध्ये प्रवेश करणारी पहिली कंपनी म्हणून या कंपनीने स्थान पटकावले आहे. याचे श्रेय या कंपनीच्या मुल्यपध्दतीला जाते.

### १.४.अ.२ उद्दिष्ट्ये व कामगिरी (Objectives and Mission)

कोणत्याही कंपनीच्या किंवा व्यवसाय संस्थेच्या उद्दिष्ट्ये व कामगिरीवरून त्या कंपनीचा प्राध्यान्यक्रम, विकासाची दिशा, व्यावसायिक तत्वे (धोरणे) याची कल्पना येते. अरविंद मिलच्या कामगिरीवरून त्या कंपनीने जागतिक बाजारात कसे वर्चस्व (प्रभाव) प्रस्थापित केले आहे याची कल्पना येते. या कंपनीने तांत्रिक नवप्रवर्तन (Technical Innovation) ग्राहकभिमुख दृष्टीकोन आणि उत्पादन खर्च निमंत्रित ठेवून आपला माल स्पर्धात्मक बाजारपेठेत पाठविला. त्यामुळे या कंपनीच्या मालाला जागतिक बाजारपेठ काबीज करता आली.

### १.४.अ.३ व्यवस्थापन रचना आणि स्वरूप (Management Structure and Nature)

संघटनात्मक रचना, संचालक मंडळाची रचना, व्यवस्थापनाचे व्यावसायिकरण हे घटक व्यावसायिक निर्णय घेताना महत्त्वाचे ठरतात. कांही व्यवस्थापकीय रचनांमुळे व्यावसायिक निर्णय त्वरित घेता येतात तर कांही व्यावसायिक रचनामुळे व्यावसायिक निर्णयांना विलंब होतो. कंपनीच्या विकासासाठी व्यवसाय संघटनेला योग्य ती दिशा देण्यासाठी संचालक मंडळ ही सर्वोच्च निर्णयक्षमता असलेली संघटना (संस्था) असते. त्यादृष्टीने संचालक मंडळाची गुणवत्ता व दर्जा हा महत्त्वाचा घटक असतो. भारतातील खाजगी क्षेत्रातील कांही उद्योगामध्ये हे चित्र पहायला मिळते. तथापि कांही उद्योगामध्ये उच्च दर्जाचे/गुणवत्तेचे संचालक मंडळ हे जबाबदारीने कामकाज पाहते तर काही उद्योगांत या गुणवत्तेचा अभाव दिसून येतो. तसेच महत्त्वाचा व्यवस्थापकीय निर्णयाच्या दृष्टीने भागधारकांची रचनाही महत्त्वाची असते. विप्रो सारख्या काही मोठ्या कंपन्यामध्ये प्रवर्तकांनी कंपनीचे समभाग घेतले आहेत तर टाटा उद्योग समूहामध्ये याउलट परिस्थिती आहे. भारतातील कांही वित्तीय संस्थामध्ये मोठ्या प्रमाणात भागधारक आहेत तर कांही वित्तीय संस्थामध्ये भागधारकाच्या प्रतिनिधींची भूमिका निर्णायक असते.

### १.४.अ.४ अंतर्घत क्षमता/शक्ती (Internal Power Relationship)

कंपनीतील कर्मचारी वर्ग, भागधारक आणि संचालक मंडळ यांच्या पाठबळावर (समर्थन) व्यवस्थापकीय संघटनेची निर्णय क्षमता आणि तिची अंमलबजावणी अवलंबून असते. संचालक मंडळ आणि मुख्यकार्यकारी अधिकारी यांच्यातील संबंध हा घटकही महत्त्वाची भूमिका पार पाडतो.

### १.४.अ.५ मानवी संसाधने (Human Resources)

मानवी संसाधने हा व्यवसायसंघटनेच्या यशस्वी कार्यपध्दतीसाठी महत्त्वाचा घटक आहे. कुशलता, गुणवत्ता, नैतिकता, दायित्व दृष्टीकोण व अभिव्यक्ती इ. स्वरूपातील मानवी संसाधनांचे योगदान हे निर्णायक स्वरूपाचे असते. कांही व्यवसाय संघटनांमद्ये मानवी संसाधनांची पूनर्रचना व आधुनिकीकरण करणे अत्यंत सुलभ जाते तर कांहीमध्ये कर्मचारी संघटनांच्या विरोधामुळे ते शक्य होत नाही. लोकांचा सहभाग, पुढाकार हा प्रत्येक कंपनीनुसार बदलत जातो. संघटनात्मक परिस्थिती आणि सांस्कृतिक रचना हे घटकही महत्त्वाचे ठरतात. जपानच्या कंपन्यामध्ये ३०,००० कर्मचारी हे ३०,००० प्रकारचे कार्यपध्दतीत सुधारणा करतात. पाश्चिमात्य राष्ट्रातही अशीच स्थिती आहे. भारतात मात्र कर्मचाऱ्यांमध्ये नवनिर्माण क्षमतेचा अभाव दिसून येतो.

### १.४.अ.६ कंपनीचा नावलौकीक (छाप) (Company Image)

एखाद्या कंपनीचा नावलौकिक किंवा समाजातील स्थान हे त्या कंपनीला निधी उभारताना, संयुक्त प्रकल्प राबविताना, बाजारविषयक निर्णय घेताना आणि नवीन माल बाजारपेठेत आणतांना उपयुक्त ठरते. तसेच विशिष्ट नावाचा ब्रँड हा त्या कंपनीला विविध स्पर्धात्मक परिस्थितीत उपयुक्त ठरतो.

### १.४.अ.७ इतर घटक (Other Factors)

एखाद्या कंपनीच्या व्यावसायिक यशापयशासाठी अनेक अंतर्गत घटक कारणीभूत ठरतात. या घटकांमुळे त्यांची निर्णय प्रक्रियेवरही परिणाम होतो. हे घटक पुढीलप्रमाणे.

१. उत्पादनक्षमता, कार्यक्षमता, तंत्रज्ञान, वितरण व्यवस्था इ. मूलभूत भौतिक घटक व्यवसाय संस्थेच्या स्पर्धाक्षमतेवर परिणाम करतात.

२. संशोधन व विकास आणि तांत्रिक क्षमता हे घटक कंपनीची नवनिर्माण क्षमता आणि स्पर्धाक्षमता ठरविण्यास युक्त ठरतात.

३. बाजारसंघटन विक्रेत्याची गुणवत्ता, नावलौकीक आणि वितरण व्यवस्था हे बाजार यंत्रणेतील महत्त्वाचे घटक आहेत.

४. वित्तीय धोरण वित्तव्यवस्था व भांडवल रचना हे व्यावसायिक धोरण व रचना ठरविण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे वित्तीय घटक आहेत.

### १.४.ब बाह्य घटक (External Environment)

व्यावसायिक परिस्थितीच्या बाह्य घटकामध्ये सुक्ष्म घटक व स्थूल घटक या दोन प्रकारच्या घटकांचा समावेश होतो.

### १.४.ब.१ सुक्ष्म (अंशलक्षी) घटक (Micro Environment)

उत्पादनसंस्थेच्या प्रत्यक्ष कामगिरीशी संबंधित असल्याने यांना कृतीशील घटक आणि कार्यक्रमाभिमुख घटक असेही म्हणतात. कंपनीच्या किंवा उत्पादन संस्थेच्या कामगिरीशी प्रत्यक्ष आणि तात्कालिक संबंधित असल्याने या घटकांचा कंपनीच्या कामकाजावर परिणाम होतो. यामध्ये पुरवठादार, बाजारातील मध्यस्थ, स्पर्धक, ग्राहक आणि नागरिक इ. घटकांचा समावेश होतो. सुक्ष्म घटक हे स्थूल घटकांपेक्षा परिस्थितीबाबत जास्त संवेदनशील व जवळचे असतात. म्हणूनच ते प्रभावी असतात.

### १.४.ब.१.१ पुरवठादार (Suppliers)

पुरवठादार हा अंशलक्षी घटकांतील एक महत्त्वाचा शक्तीमान घटक आहे. यामध्ये कच्चा माल पुरविणारे घटक आणि कंपनीच्या इतर घटकांचा समावेश होतो. कंपनीच्या बिनशर्त व कार्यक्षम कार्य पध्दतीसाठी विश्वासार्ह पुरवठादार हा घटक महत्त्वाची भूमिका पार पाडतो. पुरवठ्याबाबत अनिश्चितता असल्यास कंपनीला कच्चा मालाचा साठा व्यवस्थेवर खूप खर्च करावा लागतो. भारतातील कारखान्यांमध्ये कच्चा मालाचा देशांतर्गत साठा ३-४ महिन्यासाठी ठेवावा लागतो. तर आयात मालाचा साठा ९ महिन्यासाठी ठेवावा लागतो. जपानमध्ये यासाठी जास्तीत जास्त दोन आठवड्याचा कालावधी लागतो. अर्थात भारतातील उदारीकरणाच्या धोरणामुळे या परिस्थितीत बदल होत आहेत.

पुरवठा या घटकाच्या संवेदनशीलतेमुळे देशातील अनेक कंपन्यांनी लहान लहान विक्रेत्यांच्या विकासासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. एकाच पुरवठादारावर अवलंबून राहणे हे कंपनीच्या दृष्टीने धोक्याचे

असते. कारण संप, टाळेबंदी किंवा उत्पादनातील कोणताही अडथळा कंपनीच्या एकूण कामकाजावर अनिष्ट परिणाम करतो. तसेच पुरवठादाराच्या दृष्टीकोणातील किंवा वर्तणुकीतील बदल कंपनीवर परिणाम करतात. म्हणून पुरवठ्याचे विविध मार्ग कंपनीने स्वीकारावेत. कारण त्यामुळे धोक्याचे प्रमाण कमी होते. पुरवठ्याच्या व्यवस्थापनामध्ये दुर्मिळता हा घटकही महत्त्वाचा ठरतो. म्हणून खरेदी विभाग हा बाजारव्यवस्थेबाबत तत्पर व कार्यशील असला पाहिजे. म्हणूनच अलीकडे सर्व कंपन्या बाजारातील संबंध सुधारण्यासाठी प्रयत्नशील असतात. यादृष्टीने भागीदारी (Partnering) या संकल्पनेला आंतरराष्ट्रीय पातळीवर महत्त्व प्राप्त झाले आहे आणि भारतीय पुरवठादार आंतरराष्ट्रीय बाजारातील (व्यापार) महत्त्वाचे घटक बनत आहेत.

### १.४.ब.१.२ ग्राहक (Customers)

प्रत्येक व्यवसायासमोर (संस्था) आपले ग्राहक वाढविणे आणि त्यांना टिकवून ठेवणे हे मोठे आव्हान असते. ग्राहकांमुळेच व्यवसायाचे अस्तित्व टिकून असते. म्हणून ग्राहकांची संवेदनशीलता कशी जपली (सांभाळणे) जाते यावर व्यवसायाचे यश अवलंबून असते. व्यक्ति, कुटुंब, उद्योग आणि व्यापार तसेच सरकार आणि इतर संस्था इ. विविध प्रकारचे ग्राहक हे कंपनीशी संबंधित असतात. उदा. टायर कंपनीचे ग्राहक हे (१) स्वंयचलित वाहनधारक (मालक) (२) स्वयंचलित वाहनाची निर्मिती करणारी कंपनी (उत्पादक) (३) सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आणि (४) इतर वाहतूक व्यावसायिक इ. प्रकारचे असतात. कंपनीला या सर्व प्रकारच्या ग्राहकांच्या हिताची जपवणूक करावी लागते. कारण केवळ एकाच प्रकारच्या ग्राहकाचा विचार केल्यास इतर ग्राहक दुसऱ्या कंपनीकडे जाण्याची भिती असते. ग्राहक वर्गाची निवड करताना लाभ (नफा), अवलंबित्व, मागणीतील स्थैर्य, वृध्दी विषयक अपेक्षा आणि स्पर्धेची तीव्रता या विविध घटकांचा कंपनीला विचार करावा लागतो.

जागतिकीकरणाबरोबर ग्राहकाबाबतच्या परिस्थितीचेही जागतिकीकरण होत आहे. जगातील इतर राष्ट्रांच्या बाजारपेठा खुल्या होत आहेतच. पण याबरोबरच भारतीय बाजार ही जागतिकीकरणाच्या स्पर्धेत उतरत आहे आणि भारतीय ग्राहक हा आता वैश्विक (Global) बनत चालला आहे. म्हणूनच ग्राहक हा घटक म्हणजे महत्त्वाचा अंशलक्षी घटक होय.

### १.४.ब.१.३ स्पर्धक (Competitors)

एखाद्या उत्पादन संस्थेची स्पर्धक म्हणजे केवळ त्याच प्रकारच्या मालाचे उत्पादन करणारी संस्था नव्हे तर ग्राहकाच्या उत्पन्नाशी भेदात्मक स्पर्धा करणाऱ्या सर्व प्रकारच्या संस्था होत. उदा. एखाद्या टी.व्ही. उत्पादक कंपनीची स्पर्धा ही केवळ दुसऱ्या एखाद्या टी.व्ही. उत्पादक कंपनीबरोबरच नसते तर त्याबरोबरच दुचाकी वाहने रेफ्रिजरेटर्स, स्टेरिओ सेटस यांचे उत्पादन करणाऱ्या संस्था तसेच बचत व गुंतवणुकीला चालना देणाऱ्या बँका, युनिट ट्रस्ट आणि इतर कंपन्याबरोबर असते. यालाच कंपन्यांमधील अपेक्षित स्पर्धा असे म्हणतात. ही स्पर्धा मर्यादित विनियोग्य उत्पन्न असणाऱ्या राष्ट्रांमध्ये जास्त असते.

ग्राहकाने आपले उत्पन्न हे प्रामुख्याने पुनर्निर्माण किंवा शिक्षणावर खर्च करायचे ठरविले तरी त्याच्या समोर अनेक पर्याय असतात. उदा. टी.व्ही., स्टेरिओ, टू इन वन इ. याला सर्वसाधारण स्पर्धा असे म्हणतात. ग्राहकाने यापैकी टी.व्हीची खरेदी करावयाची हा निर्णय घेतला तर त्याच्यापुढे पुन्हा पुढील प्रश्न निर्माण होतो की कोणता टी.व्ही. खरेदी करावयाचा ? ब्लॅक अॅण्ड व्हाईट की रंगीत (रिमोट कंट्रोलसह किंवा रिमोट कंट्रोल शिवाय). यालाच उत्पादन रचना स्पर्धा म्हणतात. आणि अंतिमत: ग्राहक विविध कंपन्यांच्या विविध ब्रँडच्या टी.व्ही. मधून आपल्याला योग्य वाटणाऱ्या टी.व्हीची निवड करतो. म्हणजे एकाच प्रकारच्या वस्तूंच्या निवडीबाबतही उत्पादनसंस्थामध्ये स्पर्धा असते. यातून एक अन्वयार्थ दिसून येतो तो म्हणजे या विविध कंपन्यांच्या मालामधून प्राथमिक आणि निवडक मागणी याबाबत स्पर्धा निर्माण होतो.

भारतामध्ये अनेक कंपन्यानी उदारीकरणाच्या माध्यमातून मूलभूत व रचनात्मक बदल केला आहे. अनेक कंपन्यानी आपले व्यवसायविषयक धोरण व व्यूहरचना बदलली आहे. अनेक उद्योगांमध्ये विक्रेत्यांच्या बाजाराबरोबर खरेदीदारांचा, ग्राहकांचा बाजार सुरू करण्यात आला आहे.

### १.४.ब.१.४ बाजारातील मध्यस्थ (Marketing Intermediaries)

कंपनीच्या विक्री व्यवहारांवर आणि एकूणच व्यावसायिक उलाढालीवर परिणाम करणारे महत्त्वाचे घटक म्हणजे बाजारातील विविध प्रकारचे मध्यस्थ होत. हे घटक कंपनीला आपल्या वस्तूंचे वाटप (वितरण) अंतिम ग्राहकापर्यंत पोहोचविण्यासाठी उत्तेजन देतात. यामध्ये मध्यस्थ, व्यापारी, बाजारातील संशोधन संस्था, प्रसारमाध्यमे, सल्लागार संस्था तसेच वित्तीय सेवा पुरविणाऱ्या मध्यस्थ संस्था याबाबत कार्यरत राहून कंपनीचा व्यावसायिक धोका कमी करण्यास मदत करतात.

बाजारपेठेतील मध्यस्थ संस्था या कंपनी आणि अंतिमग्राहक यांच्यामध्ये योग्य तो समन्वय साधण्यासाठी सतत प्रयत्नशील असतात. या समन्वयामध्ये अडथळे निर्माण झाल्यास कंपनीचा एकूण खर्च वाढतो. उदा. किरकोळ औषध विक्रेते व एजंटनी औषध कंपन्यांच्या मालाची विक्री करण्यावर बहिष्कार टाकल्यास अशा कंपन्यांचे मोठे नुकसान होण्याची भिती असते. केरळमध्ये व्यापाऱ्यांनी आपली व्यापारी सूट (Trade Margin) वाढविण्यासाठी सामुदायिक बहिष्कार टाकल्यामुळे तेथे हिंदुस्थान लिव्हर या नामांकित कंपनीला मोठ्या संकटाला सामोरे जावे लागल होते.

### १.४.ब.१.५ वित्त पुरवठादार (Financier)

कंपनीला वित्तपुरवठा करणारा घटक हा कंपनीच्या अंशीलक्षी परिस्थितीतील महत्त्वाचा घटक आहे. त्यांचे धोरण व व्यूहरचना, दृष्टीकोन तसेच बिगर वित्तीय पुरवठा हे घटक महत्त्वाचे आहेत.

### १.४.ब.१.६ जनता (Publics)

कंपनीचा प्रत्यक्ष ज्या घटकाशी संबंध येतो तो घटक म्हणजे जनता होय. येथे जनता म्हणजे ज्या लोकसमुहाचा कंपनीच्या कार्यामध्ये अथवा उत्पादनामध्ये संबंध आहे असा समूह होय. उदा. प्रसारमाध्यमांशी संबंधित जनता, कृतीशील नागरिक आणि स्थानिक जनता/नागरिक.

कांही कंपन्यावर जनतेचा फार मोठा प्रभाव असतो. अनेक कंपन्यावर स्थानिक जनतेचा/लोकांचा प्रभाव असतो. प्रामुख्याने पर्यावरणाचे प्रदुषण हा स्थानिक जनतेच्या दृष्टीने महत्त्वाचा प्रश्न असतो. या प्रश्नावरील (समस्या) लोकांच्या क्रिया प्रतिक्रियामुळे त्या कंपनीला आपले उत्पादन बंद करावे लागले आहे. किंवा प्रदूषणाविरोधी उपाय योजावे लागले आहेत. याचे उत्तम उदाहरण म्हणजे सन २००५ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ तालुक्यातील चिपरी या गावच्या ग्रामस्थांनी (नागरीक) घोडावत उद्योग समूहाच्या 'स्टार ओक्झोकॉम' या प्रकल्पाविरोधात केलेले तीव्र आंदोलन होय. या आंदोलनामुळे हा प्रकल्प कंपनीला बंद करावा लागला. विकसित राष्ट्रातील बिनसरकारी संघटनानी (NGOs) बालमजूराबाबत, कष्टकऱ्याबाबत व वन्यप्राण्यांच्या जीवताबाबत वेळोवेळी विविध आंदोलने केली आहेत. ग्राहक म्हणून आपल्या हक्काबाबत जनतेत झालेली जाणिव ही कंपनीच्या व्यावसायिक परिस्थितीवर परिणाम करते. अर्थात जनतेच्या कांही कृतीमुळे व्यवसायावर विपरित परिणाम होण्याची शक्यता असते. याचा अर्थ सर्वच आंदोलने (कृती) ही व्यवसाया विरोधात नसतात. कांही आंदोलनामुळे तर व्यवसायाच्या विकासाला संधी मिळते. 'चंगळवाद' (Consumerism) हे याचे उत्तम उदाहरण आहे. कंपनी आणि स्थानिक जनता यांच्यामध्ये योग्य सहकार्य आणि समन्वय असल्यास कंपनी आणि स्थानिक समुदाय या दोघांच्याही परस्पर लाभासाठी योग्य निर्णय घेता येतात.

### १.४.ब.२ स्थूल (समग्रलक्षी) घटक (Macro Environment)

बाह्य परिस्थितीविषयक घटकामधील अंशलक्षी घटकाबरोबरच समग्रलक्षी आर्थिक घटकही प्रभावी ठरतात. हे घटक वेगवेगळ्या संधी निर्माण करून कंपनीवर प्रभाव पाडतात. समग्रलक्षी घटकांना (परिस्थिती) सर्वसाधारण घटक किंवा दूरचे (Remote) घटक असेही म्हणतात. समग्रलक्षी घटकांवर तुलनेने नियंत्रण ठेवता येत नाही. त्यामुळे हे घटक कंपनीला कितपत सुसह्य होतात यावर त्या कंपनीचे यश अवलंबून असते. उदा. देशांतर्गत चलनाचे अवमुल्यन केल्यामुळे आयात घटकांवरील खर्च (किंमत) वाढला तर देशांतर्गत उत्पादकांनाच त्याप्रमाणे उत्पादनाविषयक निर्णय घ्यावे लागतात. महत्त्वाच्या समग्रलक्षी घटकांमध्ये आर्थिक राजकीय, नियमनात्मक सामाजिक व सांस्कृतिक, लोकसंख्याविषयक, तंत्रज्ञानविषयक, नैसर्गिक आणि वैश्विक (जागतिक) इ. घटकांना समावेश होतो. या सर्व घटकांचे विश्लेषण पुढील प्रमाणे.

#### १.४.ब.२.१ आर्थिक घटक (Economic Environment)

आर्थिक वैशिष्ट्ये आणि आर्थिक धोरणे यांचा व्यावसायिक धोरणावर मोठा परिणाम होतो. आर्थिक घटकामध्ये (परिस्थिती) अर्थव्यवस्थेची रचना व स्वरूप, आर्थिक विकासाची अवस्था (टप्पा), आर्थिक साधने, उत्पन्नाची पातळी, उत्पन्नाचे वाटप (वितरण) तसेच संपत्तीचे वाटप, जागतिक आर्थिक घटकांशी समन्वय आणि आर्थिक धोरणे या सर्व घटकांचा समावेश होतो.

#### १.४.ब.२.२ सामाजिक/सांस्कृतिक घटक (Social/Cultural Environment)

सामाजिक रचना आणि समाजाची संस्कृती या घटकांचा प्रभाव (१) बाजारात येणाऱ्या उत्पादनाचा प्रकार (२) त्याचे मुल्य (३) व्यवसाय संघटन व त्याचे नियमन इ. वर होतो. तर व्यावसायिक कार्याचा सामाजिक पध्दतीवर परिणाम होतो. व्यवसाय संघटना, तिची व्यावसायिक कार्ये, नवनिर्माण क्षमता, माहिती आणि नव्या कल्पनांची प्रचार व प्रसार इ. चा समाजावर परिणाम होतो. अर्थात यापैकी कांही घटकांवर अल्पकाळात परिणाम होणे अवघड असते. विशेषत: अल्पकाळात ते अशक्य असते. म्हणून व्यवसाय संस्थेला किंवा कंपनीला या नियंत्रण बाह्य घटकांचा स्वीकार करावा लागतो.

#### १.४.ब.२.३ लोकसंख्याविषयक घटक (Demographic Environment)

व्यवस्थापनामध्ये व्यक्ति (माणूस) आणि बाजारपेठेमध्ये लोक (जनता) समाविष्ट असल्याने व्यवसाय किंवा कंपनी यांच्या कार्यपध्दतीत लोकसंख्याविषयक घटक महत्त्वाचा असतो. सामान्यपणे व्यवस्थापन Management यामध्ये चार M चा समावेश असतो. उदा. (१) माणूस (Men), (२) साधने (Material), (३) यंत्रे (Machinery), (४) पैसा (Money) इ. या बरोबरच गुणवत्ता, संभाव्य शक्ती (सामर्थ्य) चैतन्य/प्रेरणा आणि जबाबदारी/दायित्व या आवश्यक गुणांचा वापर व्यक्तिशिवाय होऊ शकत नाही.

बाजारपेठ म्हणजे लोक किंवा जनता. याचा अर्थ बाजारातील मागणी ही लोकसंख्या आणि लोकांच्या वैशिष्ट्यावर अवलंबून असते. उदा. लोकसंख्येचे आकारमान, उत्पन्नाची पातळी, लोकांचा प्राध्यान्यक्रम व चव, श्रध्दा, दृष्टीकोन, अभिव्यक्ति आणि संवेदनशीलता या सर्व घटकांचा लोकसंख्येच्या वैशिष्ट्यामध्ये समावेश होतो. म्हणून बाजाररचनेमध्ये लोकसंख्या या घटकाला फार महत्त्व आहे. लोकसंख्येच्या रचनेमध्ये पुढील घटकांचा समावेश होतो. (१) वयानुसार रचना (विभागणी), (२) लिंग, (३) उत्पन्नाचे वाटप, (४) कुटुंबाचा आकार व रचना (५) व्यवसाय (६) शिक्षण, (७) सामाजिक दर्जा (८) धर्म (९) जात (१०) राष्ट्रीयत्व इ. लोकसंख्याविषयक घटकांमध्ये राष्ट्राराष्ट्रानुसार भिन्नता (फरक) असतो. लोकसंख्येचा आकार लोकसंख्या वाढीचा दर, वयानुसार विभागणी, नैतिक अधिष्ठान, लोकसंख्येचा आकार, लोकसंख्या वाढीचा

दर, वयानुसार कुटंबाचे आकारमान, कुटुंबाचे स्वरूप आणि उत्पन्न आणि उत्पन्न पातळी इ. घटकांचा व्यवसायांवर फार मोठा प्रभाव असतो.

### १.४.ब.२.४ राजकीय व सरकारी घटक (Political and Governmental Environment)

आर्थिक आणि व्यावसायिक धोरणे ही राजकीय किंवा सरकारी घटकांमार्फत निश्चित केली जातात. त्यामुळे व्यवसायाच्या प्रगतीच्या दृष्टीने राजकीय घटक हा महत्त्वाचा आहे. डीमॉक या विचारवंताच्या मते, 'समाजामध्ये दोन सामर्थ्यवान संस्था (घटक) आहेत. पहिला व्यवसाय आणि दुसरा सरकार (शासन). कारण ते समान उद्दिष्टाने कार्यरत असतात. आणि राष्ट्रहितासाठी ते अंतर्गत व परकिय (बाह्य) सार्वजनिक नीती (धोरण) निश्चित करतात. राजकीय घटकांमध्ये राजकीय पदाच्या धोरणांची वैशिष्ट्ये आणि धोरणे राज्यघटनेचे आणि सरकारचे स्वरूप यांचा समावेश होतो. तर सरकारी घटकांमध्ये आर्थिक धोरणे आणि नियमांचा समावेश होतो. राष्ट्रांराष्ट्रांनुसार व प्रांताप्रांतानुसार या घटकात भिन्नता असते. मुख्य आर्थिक धोरणे ही राजकी धोरणाशी संबंधित असतात. किंबहुना राजकीय धोरणांचा प्रभावच आर्थिक व सरकारी धोरणांवर असतो. भारतात १९५१ ते १९९५ अखेर कॉंग्रेस पक्षाचे सरकार कार्यरत असल्याने समाजवादी समाजरचना व सामाजिक आर्थिक तत्त्वज्ञान यांचा प्रयोग करण्यात आला. फक्त १९७७-१९८० हा जनता सरकारचा अपवाद होता. आजचा समानकिमान कार्यक्रम (Common Minimum Programme CMP) हा संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारचा कार्यक्रम आहे. १९८० नंतर सोव्हीयत युनियनच्या (रशिया) धोरणातील बदल अशाप्रकारचाच आहे. त्यामुळे भारतात १९९१ नंतर आर्थिक सुधारणा कार्यक्रम राबवून आर्थिक धोरणात क्रांतीकारक बदल करण्यात आले.

### १.४.ब.२.५ नैसर्गिक घटक (Natural Environment)

विविध व्यवसायामध्ये ज्या ज्या साधनांचा वापर केला जातो त्या सर्वांचे उगमस्थान (स्त्रोत) आणि सामर्थ्य हे नैसर्गिक घटकामध्ये असते. उदा. कच्चा माल, विविध उर्जा साधने इ. मानवी जीवनाच्या प्रत्येक कृतीशी नैसर्गिक घटक संबंधित असतात. आपण काय करायला हवे आणि संस्था किंवा कंपन्यांनी कोणते कार्य केले पाहिजे हे नैसर्गिक घटकावर (परिस्थिती) अवलंबून असते. संसाधनाची उपलब्धता ही समाजातील व्यवसायाच्या विकासासाठी आवश्यक असणारा मूलभूत घटक होय.

नैसर्गिक साधनांची देणगी, हवामान, वातावरणाची स्थिती विशिष्ट प्रदेशाची स्वाभाविक रचना, जागतिक वातावरणाबाबतचा स्थानिक संदर्भ, बंदर इ. भौगोलिक व पर्यावरणविषयक घटक व्यवसायाशी संबंधित असतात. भौगोलिक आणि पर्यावरणाविषयक घटक उद्योगाच्या स्थानावर (ठिकाण) प्रभाव पाडतात. म्हणजे जेथे कच्च्या मालाचा विपूल व स्वस्त पुरवठा आहे त्या परिसरात उद्योगांची वाढ होते. गुजरातमधील २००१ मधील भूकंप हा तेथील उंच इमारतींवर व एकूणच बांधकाम व्यवसायावर परिणाम करणारा ठरला. उंची इमारतीत व फ्लॅटमध्ये राहण्यास लोक तयार नसल्याने त्यांची मागणी कमी झाली आहे. विशिष्ट प्रकारच्या उद्योगांवर हवामानाचा व वातावरणाचा परिणाम होतो विशिष्ट ठिकाणाच्या स्वाभाविक रचनेनुसार तेथील मागणी ठरते. उदा. थंड हवेच्या ठिकाणी व डोंगरीभागात कारपेक्षा जीपला जास्त मागणी असते. कारण अशा भागात कारपेक्षा जीप जास्त परिणामकारक व उपयुक्त ठरते.

हवामान व वातावरण विषयक घटक विशिष्ट उत्पादनाच्या मागणीवरही परिणाम करतात. ज्या भागात तापमान जास्त असते अशा ठिकाणी कूलर, फ्रिज, पंखे इ. उपकरणांना (माल) जास्त मागणी असते. पण ही उपकरणे देशाच्या कांही भागात मुळीच वापरली जात नाहीत. ज्या भागात हिवाळ्यात अत्यंत थंडी व उन्हाळ्यात कमालीचा उष्णता असते अशा ठिकाणी हिटर आणि एअर कंडीशनर्स (वातानुकूलीत यंत्र) या उपकरणाची जास्त मागणी असते. हवामान व तापमान विषयक घटकांमुळे (नैसर्गिक घटक) कपडे, बांधकाम

साहित्य, अन्नधान्य आणि औषधे यांच्या मागणीवर परिणाम होतो. अलिकडच्या काळात पर्यावरण विषयक घटकही महत्त्वाचा ठरला आहे. नैसर्गिक साधनांचा अवास्तव आणि असमतोल वापर, पर्यावरणाचे प्रदूषण यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडला आहे. म्हणूनच सरकारला पर्यावरणाचा समतोल प्रस्थापित करण्यासाठी विविध प्रतिबंधात्मक उपाय योजावे लागत आहेत. व्यवसायातील (उत्पादन) खर्च वाढत आहे. म्हणून व्यावसायिकांनाही आज या गोष्टींची दखल घ्यावी लागत आहे.

### १.४.ब.२.६ तंत्रज्ञानविषयक घटक (Technological Environment)

उत्पादनसंस्थेच्या आणि देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासातील महत्त्वाचा घटक म्हणजे तंत्रज्ञान होय. तंत्रज्ञानामध्ये यंत्रे, आणि नवीन विचारसरणीचा समावेश असतो. समाजातील प्रश्नांचे (समस्या) निराकरण करण्यासाठी आणि आर्थिक प्रगतीला चालना देण्यासाठी तंत्रज्ञान उपयुक्त ठरते. ''तंत्रज्ञाना म्हणजे वस्तू (माल) उत्पादनाचे पध्दतशीर (शास्त्रीय) ज्ञान होय की ज्याचा उत्पादन प्रक्रियेमध्ये योग्य वापर केला जातो.''

तंत्रज्ञानाचे केवळ वस्तूनिर्मिती आणि वितरणाबाबतचे ज्ञान अथवा पध्दती यांचा समावेश होत नाही तर उद्योजकता व व्यावसायिक ज्ञानाचाही त्यामध्ये समावेश होतो. या नंतरच्या दोन घटकांमुळे तंत्रज्ञानाची माहिती असणाऱ्यांना स्पर्धेच्या युगात खूपच लाभ होतो. बहुराष्ट्रीय कंपन्यांनी (MNCs) याचा लाभ उठवला आहे. व्यवसायाच्या दृष्टीने तंत्रज्ञानाचे प्रकार, तंत्रज्ञान-विषयक विकासाची पातळी, नवे तंत्रज्ञान अवगत करण्याची गती, प्रसार आणि प्रचार हे महत्त्वाचे घटक असतात. १९९९ मध्ये जागतिक आर्थिक मंडळाने (World Economic Forum) प्रत्येक राष्ट्राच्या जागतिक स्पर्धाक्षमतेच्या आठ घटकापैकी एक महत्त्वाचा घटक म्हणून तंत्रज्ञानाला प्राधान्य दिले आहे. माहिती तंत्रज्ञान हे स्पर्धा क्षमतेचे नवीन स्त्रोत आहे. यामध्ये इ-मेल, इंटरनेट, इ-कॉमर्स या तीन घटकांना आज महत्त्व प्राप्त झाले आहे. दूरसंचार क्षेत्रातील क्रांती हे आजच्या तंत्रज्ञानविषयक क्षेत्राचे महत्त्वाचे उदाहरण आहे.

### १.४.ब.२.७ वैश्विक घटक (Global Environment)

उदारीकरणाच्या प्रसारामुळे व्यवसाच्या दृष्टीने जगाच्या भौगोलिक सीमा पुसल्यागेल्या म्हणजे आजचे जग (विश्व) हे सीमारहित जग आहे. २०व्या शतकाच्या उत्तरार्धात मोठ्या प्रमाणात राजकीय व आर्थिक बदल झाले मार्गारेट थॅचर या ब्रिटनच्या तत्कालीन पंतप्रधानानी १९८५ मध्ये खाजगीकरणाच्या धोरणाची सुरूवात केली. १९७८ नंतर चीन सारख्या साम्यवादी राष्ट्रानेही आपल्या आर्थिक धोरणात क्रांतीकारण बदल केले. तर जगातील दुसरी महासत्ता असणाऱ्या सोव्हिएत युनियनची (USSR) शकले पडली. या पार्श्वभूमीवर १९८० नंतर व्यवसायाचा सीमारहित विस्तार होऊ लागला. भारतासारख्या विकसनशील राष्ट्रांनीही खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण या मार्गाचा स्वीकार करून आपल्या आर्थिक सुधारणाना सुरूवात केली.

जागतिक व्यवसायाच्या (Global Business) विकासासाठी जागतिक व्यापार संघटना (WTO) अस्तित्वात आली. या संघटनेमुळे विश्वव्यापाराला चालना मिळत आहे. त्यामुळे सीमारहित व्यापार वाढू लागला आहे. जागतिक गुंतवणुक वाढत आहे. आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या (MNCs) विस्तार होत आहे. आंतरराष्ट्रीय व्यापार वाढीस लागला आहे. म्हणजे वैश्विक घटकही आता परिणामकारक ठरत आहे.

## १.५ महत्त्व (Importance)

भारताने १९९१ पासून आर्थिक सुधारणा कार्यक्रम राबवायला सुरूवात केली आहे. आर्थिक सुधारणा कार्यक्रमाने आता एक तप पूर्ण केले आहे. भारत सरकारने संरचनात्मक समायोजन कार्यक्रम राबवून विदेशी

विनिमय दर, व्यापार धोरण, औद्योगिक धोरण, राजकोषीय धोरण, वित्तीय बाजार या घटकामध्ये जागतिक बदलत्या वातावरणानुसार बदल केले आहेत. आर्थिक सुधारणा कार्यक्रमामध्ये उदारमतवादी व बाह्यमुखी आर्थिक डावपेच (Strategy) स्वीकारले आहेत. दिर्घकालीन आर्थिक धोरण राबविताना परवानाराज संपुष्टात आणले आहे. म्हणजे विकासाला पोषक अशी परिस्थिती निर्माण करण्याचे धोरण स्वीकारर्लीन व्यावसायिक निर्णय घेतले जात आहेत. व्यावसायकि परिस्थितीचे वर स्पष्ट केलेले अंतर्गत घटक व बाह्य घटक यांचे महत्त्व जाणून त्यांच्या उपयोजितेसाठी धोरणात्मक निर्णय घेतला जात आहे. मानवी भांडवलाला महत्त्व दिले जात आहे. सुक्ष्मलक्षी व समग्रलक्षी घटकही विचारात घेतले जात आहेत. आर्थिक, सामाजिक, राजकीय, संस्कृतिक, नैसर्गिक, लोकसंख्याविषयक, पर्यावरणाविषयक बाजारपेठेविषयक, तंत्रज्ञानविषयक अशा विविध प्रकारच्या घटकांचा सातत्याने अभ्यास करून निर्णय घेतले जात आहेत. सारांश, व्यावसायिक दृष्ट्या महत्त्वाच्या परिस्थितीचा (Environment) अभ्यास करून भारतीय व्यवसायाची उन्नती होण्यासाठी हे सर्व घटक आवश्यक व महत्त्वाचे आहेत.

## १.६ सारांश :

कोणलाही राष्ट्राच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत 'विकासाला पोषक वातावरण' हा महत्त्वाचा घटक असतो. व्यावसायिक परिस्थितीलाच 'व्यावसायिक पर्यावरण म्हणतात. भारत सरकारने विकासाला पोषक असणाऱ्या परिस्थितीत बदल करण्याच्या हेतूने १९९१ पासून आपल्या आर्थिक धोरणात सुधारणा करण्यास सुरूवात केली आहे. व्यावसायिक पर्यावरणाचे (१) अंतर्गत घटक व (२) बाह्य असे दोन घटक आहेत. भारत सरकारने संरचनात्मक समायोजन कार्यक्रम राबवून विदेशी विनिमय दर, व्यापार धोरण, औद्योगिक धोरण, राजकोषीय धोरण, वित्तीय बाजार या घटकामध्ये जागतिक बदलत्या वातावरणानुसार बदल केले आहेत. आर्थिक सुधारणा कार्यक्रमामध्ये उदारमतवादी व बाह्यमुखी आर्थिक धोरणे स्वीकारली आहेत. मानवी भांडवलाला महत्त्व दिले जात आहे. थोडक्यात व्यावसायिक दृष्ट्या महत्त्वाच्या पर्यावरणाचा अभ्यास करून भारतीय व्यवसायाची उन्नती होण्यासाठी पर्यावरणाविषयक सर्व घटक आवश्यक व महत्त्वाचे आहेत.

## १.७ पारिभाषिक शब्द :

- **व्यावसायिक पर्यावरण** : व्यावसायिक पर्यावरण म्हणजे व्यावसायिक परिस्थिती होय.
- **व्यावसायिक निर्णय :** व्यवसायासंदर्भात आर्थिक, राजकीय, सामाजिक, तांत्रिक आणि नैसर्गिक घटक इ. बाबत घेतलेले निर्णय.
- **अंतर्गत घटक :** व्यवसायावर प्रभाव पाडणारे अंतर्गत परिस्थिती विषयक घटक.
- **बाह्य घटक :** व्यवसायावर परिणाम करणारे बाह्य परिस्थितीविषयक घटक.
- **सुक्ष्म घटक :** उत्पादन संस्थेच्या कामगिरीशी प्रत्यक्ष आणि तात्कालिक संबंधित घटक.
- **स्थूल घटक :** समग्रलक्षी घटक किंवा सर्वसाधारण घटक किंवा दूरचे घटक.
- **वैश्विक घटक :** जागतिक घटक

## १.८ स्वयंअध्ययन :

**अ) गाळलेले शब्द भरा.**

१. व्यावसायिक पर्यावरण म्हणजे व्यावसायिक .................. होय.

२. व्यावसायिक निर्णय घेण्यासाठी व्यावसायिक............... आवश्यक असते.

३. ........ हा व्यवसाय संघटनेच्या यशस्वी कार्यपध्दतीसाठी महत्त्वाचा घटक आहे.

४. एखाद्या कंपनीचा .........हा बाजारविषयक निर्णय घेण्यासाठी उपयुक्त ठरतो.

५. कंपनीचा प्रत्यक्ष ज्या घटकांशी संबंध येतो तो घटक म्हणजे ......... होय.

**उत्तरे :** (१) परिस्थिती, (२) पर्यावरण, (३) मानवी संसाधने, (४) नावलौकीक, (५) जनता

**ब) चूक की बरोबर ते सांगा.**

१. व्यावसायिक पर्यावरणाचा 'अंतर्गत घटक' हा एकच घटक आहे.

२. बाह्य घटकामध्ये सूक्ष्मघटक व स्थूल घटक यांचा समावेश होतो.

३. प्रत्येक व्यवसायासमोर आपले ग्राहक वाढविणे हे मोठे आव्हान असते.

४. तंत्रज्ञानामध्ये यंत्रे आणि नवीन विचारसरणीचा समावेश होतो.

५. भारत सरकारने १९९१ पासून आर्थिक सुधारणा कार्यक्रम राबविण्यास सुरूवात केली.

**उत्तरे :** (१) चूक, (२) बरोबर, (३) बरोबर, (४) बरोबर, (५) बरोबर.

## १.९ सरावासाठी विद्यापीठीय स्वरूपाचे प्रश्न.

१. भारतीय व्यावसायिक पर्यावरणाचे विविध घटक सांगा.

२. व्यावसायिक पर्यावरण विविध घटक सांगून त्यांचे महत्त्व विशद करा.

३. टिपा लिहा :

   १) अंतर्गत घटक

   २) बाह्य घटक

   ३) व्यावसायिक पर्यावरणाचे महत्त्व

## १.१० अधिक वाचनासाठी पुस्तके :

1. Francis Cherunilam : Business Environment.
2. Adhikary Chand : Economic Environment of Business.
3. Datt R. and Sundaram K.P.M. : Indian Economy.
4. Agrawal A.N. : Indian Economy.
5. Economic Times, Financial Express, World Development Report, 2002-03 इ. चे विविध अंक.

❑❑❑

## सत्र ५ : घटक २

# शेतीचा विकास

## (Agricultural Development)

**अनुक्रमणिका**


२.० प्रकरणाची ओळख

२.१ उद्दिष्ट्ये

२.२ भारतीय शेतीचा विकास

२.३ भारतीय शेतीची सध्यस्थिती आणि कृषी आरिष्ठ

२.४ शेतमालाची बाजारपेठ

- २.४.१ शेतमालाची बाजारपेठ म्हणजे काय
- २.४.२ शेतमाल विक्रीव्यवस्थेची स्थिती
- २.४.३ शेतमाल विक्री व्यवस्थेतील दोष
- २.४.४ शेतमाल विक्री व्यवस्थेत सुधारणा

२.५ शेतमाल किंमत धोरण

- २.५.१ प्रस्तावना
- २.५.२ शेतमाल किंमत धोरणाची गरज
- २.५.३ शेतमालाच्या किंमतीत चढउतार होण्याची कारणे
- २.५.४ शेतमालाच्या किंमतीतील चढउताराचे परिणाम
- २.५.५ शेतमाल किंमतीचे स्थिरीकरण म्हणजे काय
- २.५.६ शेतमाल किंमत स्थिरीकरण धोरणाची उद्दिष्ट्ये
- २.५.७ शेतमाल किंमत निश्चितीसाठी उपाययोजना
- २.५.८ शेतीविषयक नवे राष्ट्रीय धोरण

२.६ भारतातील अन्न सुरक्षा

- २.६.१ अन्नसुरक्षा व्याख्या
- २.६.२ अन्नधान्याची उपलब्धता
- २.६.३ नववी योजना व अन्न सुरक्षा
- २.६.४ दहावी योजना व अन्न सुरक्षा

२.७ राष्ट्रीय शेतकरी आयोग

२.८ शेतीसाठी पाणी व्यवस्थापनाची गरज

२.८.१ व्याख्या

२.८.२ पाणी व्यवस्थापनाची गरज

२.८.३ योग्य पाणी व्यवस्थापनासाठी उपाय योजना

२.९ शेतमजूर

२.९.१ व्याख्या

२.९.२ शेतमजूरांचे प्रकार

२.९.३ भारतातील शेतमजुरांची संख्या

२.९.४ शेतमजुरांच्या समस्या

२.९.५ शेतमजुरांची परिस्थिती सुधारण्यासाठी उपाय

२.९.६ सारांश

## २.० प्रस्तावना :

पहिल्या प्रकरणामध्ये आपण व्यावसायिक पर्यावरणाविषयी माहिती घेतली. भारतीय अर्थव्यवस्थेत, आपल्यावार, आपल्या व्यवसायावर परिणाम करणारे अनेक घटक आहेत त्यामध्ये शेती, उद्योग, व्यापार हे घटक आहेत. या प्रकरणामध्ये भारतीय शेतीबद्दलची माहिती घेणार आहोत. आर्थिक विकासाचा सुरवातीच्या अवस्थेत देशातील लोकांना शेती व्यवसाय व शेती आधारित व्यवसायावरच अवलंबून रहावे लागते. देशाला स्वातंत्र्य मिळेपर्यंतच्या काळात भारतीय अर्थव्यवस्था मागासलेल्या अवस्थेतच होती. स्वातंत्र्यानंतर शेती विकासाच्या दृष्टीने सरकारने आणि विविध संस्था व शेतकरी यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले आहेत. त्याचा परिणाम म्हणून शेती व्यवसायाचा विकास घडून आला आहे. शेती व्यवसायाचा रिकास हा अनेक बाजूंनी/अंगानी घडून आला आहे. त्यापैकी आपण शेतमालाची बाजारपेठ, शेतमालाच्या किंमतीचे धोरण, शेतीसाठीचे पाणी व्यवस्थापन व शेतमजूर या संदर्भात कसे बदल घडून आहे आहेत याची सविस्तर चर्चा करू या.

## २.१ उद्दिष्ट्ये :

- स्वातंत्र्योत्तर काळात भारतातील शेतीविकास कसा झाला आहे हे जाणून घेणे.
- भारतातील शेतकऱ्यांना शेतमालाची विक्री करताना कोणत्या अडचणींना तोंड द्यावे लागते हे समजावून घेणे.
- शेतमालाच्या विक्रीव्यवस्थेत कोणत्या सुधारणा करण्यात आल्या ते जाणून घेणे.
- शेतमालाच्या किंमत धोरणाचे महत्त्व जाणून घेणे.
- शेतमालाच्या किंमतीतील चढउताराची कारणे समजावून घेणे.
- शेतमालाच्या किंमतीचे स्थिरीकरण म्हणजे काय हे जाणून घेणे.

- शेतमालाच्या किंमतीच्या निश्चितीसाठी योजण्यात आलेले उपाय समजावून घेणे.
- अन्नधान्य सुरक्षितता म्हणजे काय हे समजावून घेणे.
- भारतामध्ये अन्नसुरक्षिततेसाठी योजण्यात आलेले उपाय जाणून घेणे.
- पाणी व्यवस्थापनाची गरज व भारतातील पाणी व्यवस्थापनासाठी योजण्यात आलेले उपाय समजावून घेणे.
- भारतीय शेतमजूरांच्या मुख्य समस्या व त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी योजण्यात आलेले उपाय जाणून घेणे.

## २.२ भारतीय शेती विकास (Agricultural Development in India) :

स्वातंत्र्या वेळचा भारतातील शेती व्यवसाय व इ.स. २००१ नंतरचा शेती व्यवसाय यात मोठ्या प्रमाणात बदल घडून आला आहे. १९६० ते २००० या कालखंडात भारतातील शेती व्यवसायात जे बदलघडून आले त्याला कृषी क्रांती, हरितक्रांती असे म्हणतात. कृषी क्रांती घडून येण्यासाठी भारतातील शेतकरी, शेतमजूर, केंद्र व राज्य सरकार, कृषी संशोधक कृषी उद्योग सुरू करणारे उद्योजक, ग्रामीण भागातील सर्वप्रकारच्या संस्था, आंतरराष्ट्रीय स्थिती कारणीभूत आहे. कृषी क्रांतीची कारणे पुढील प्रमाणे - अ) संस्थात्मक सुधारणा - शेती करणारा शेतकरी व जमीनीची मालकी व सरकार यांच्या संबंधात सुधारणा घडवून आणणारे बदल. उदा. (१) कसेल त्याची जमीन (२) कुळ कायदे (३) भूधारणेवर कमाल मर्यादा (४) शेतजमीनीचे एकत्रीकरण कायदा इ. - या बदलाना जमीनसुधारणा कायदे असे म्हणतात. ब) तांत्रीक सुधारणा - शेतकरी शेती कसताना ज्या सुधारणा घडवून आणतो, सरकार व अन्यसंस्था जे बदल घडवून आणतात त्या सुधारणा उदा. (१) शेतकऱ्याच्या शेती कसण्याच्या पध्दतीत सुधारणा (२) पाणी पुरवठासोई (३) शेतीमाल विक्री व्यवस्थेत सुधारणा (४) शेती संशोधन (शेतकरी, शास्त्रज्ञ, कृषी विद्यापीठे) व त्याचा शेतीत प्रत्यक्ष वापर (५) शेत जमीन व पाणी याचा कार्यक्षमतेने वापर (६) कृषी पतपुरवठा (७) शेतमालाच्या किंमतीविषयीचे योग्य धोरण (८) सुधारित बियाणे, खते, औषधे याचा वापर (९) जमीनीची धूप थांबवून शेतजमीनीचा कस वाढविणे,(१०) शेतमालावर प्रक्रिया करून शेतमाल विकणे (११) शेतमाल साठवणूकीच्या सोई, वाहतूकीच्या सोई सुविधेत वाढ व सुधारणा (१२) शेतमजुरांच्या समस्या सोडवून त्यांची आर्थिक स्थिती सुधारणे, त्याची उत्पादकता वाढविणे (१३) शेतमालाची निर्यात करणे (१४) शेतीविषयक सुधारणांची माहिती शेतकरी, शेतमजूर, ग्राहक यांना करून देणे (१५) शेतीच्या चिरंजीवी विकासासाठी/पर्यावरण संरक्षणाविषयी उपाय योजने - इत्यादी या उपायांचा समावेश तांत्रीक सुधारणेमध्ये केला जातो. भारतामध्ये संस्थात्मक सुधारणा व तांत्रिक सुधारणा घडवून आणल्याने शेती क्रांती घडून आली आहे. शेतीक्रांतीचे कांही अनुकूल व काही प्रतिकूल परिणाम घडून आले आहेत. प्रतिकूल परिणामांची तिव्रता कमी करण्यासाठी उपाय योजले जात आहेत.

शेती विकासातातील कांही मोजके बदल कसे झाले आहेत याची या प्रकरणामध्ये माहिती करून घेणार आहोत.

## २.३ भारतीय शेतीची सध्यस्थिती आणि कृषी आरिष्ठ/पेचप्रसंग

भारतीय अर्थव्यवस्थेत शेती व्यवसाय अतिशय महत्त्वाचा आहे. देशाच्या राष्ट्रीय उत्पादन, भांडवलनिर्मिती, रोजगार, अंतर्गत आणि विदेशी व्यापार, औद्योगिक विकास, ग्रामीण विकास, यांच्यासह इतर सर्व घटकांमध्ये शेतीचा प्रभाव खूप मोठा आहे. सर्वच क्षेत्रांच्या विकासामध्ये शेतीचे

योगदान मोठे असल्यामुळे शेतीला भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असे म्हणतात. १९९१ नंतर भारतात आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम सुरू झाला, यामधून खाजगीकरण, उदारीकरण, आणि जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. यामुळे शेतीक्षेत्रावर दूरगामी परिणाम झाले आहेत. शेती व्यवसाय अनेक बाजूनी अडचणीत आलेला आहे. एका सर्व्हेक्षणात असे आढळून आले आहे की नियमित उत्पन्ननाची हमी देणारा एखादा व्यवसाय उपलब्ध झाला तर शेती सोडण्यास ४०.१ टक्के शेतकरी तयार आहेत. शेतीमध्ये वाढता खर्च, शेतमालाच्या किंमतीतील अस्थिरता, शेतमजुरांची टंचाई, कर्जाचा सापळा अशा अनेक समस्यांमध्ये शेतकरी सापडलेला आहे. या पार्श्वभूमीवर शेती क्षेत्राची असणारी सध्यस्थिती अभ्यासणे आवश्यक आहे. विविध घटक आणि मापदंडाच्या माध्यमातून शेतीची सध्यस्थिती अभ्यासता येते.

### १) राष्ट्रीय उत्पन्न, रोजगार आणि निर्यातीमधील हिस्सा

देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नामध्ये शेतीक्षेत्राचा हिस्सा सातत्याने जास्त राहिला आहे. १९५०-५१ मध्ये राष्ट्रीय उत्पन्नात शेतीक्षेत्राचा हिस्सा ५४ टक्के होता. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेनंतर हा हिस्सा कमी होत गेला. सेवाक्षेत्राचे वाढते महत्त्व, औद्योगिकरणाचा वाढता विस्तार यामुळे द्वितीय आणि तृतीय क्षेत्राचा हिस्सा वाढला. त्यामुळे शेतीक्षेत्राचा हिस्सा कमी झाला, अर्थात शेतीक्षेत्राचे महत्त्व मात्र कायम टिकून राहिले. १९९०-९१ मध्ये शेतीक्षेत्राचा हिस्सा २९.५३ टक्के झाला, २०११-१२ मध्ये १४.५९ टक्के तर २०१३-१४ मध्ये १३.९४ टक्के हिस्सा राष्ट्रीय उत्पन्नात आहे.

शेती क्षेत्राने देशातील रोजगारात मोठे योगदान दिलेले आहे. १९५०-५१ मध्ये एकूण रोजगारापैकी ७० टक्के रोजगार शेतीक्षेत्रातून उपलब्ध झाला. २००१-०२ मध्ये ५८ टक्के, २०१२-१३ मध्ये ५७.८ टक्के रोजगार शेतीक्षेत्रातून उपलब्ध झाला. याचा अर्थ वाढत्या लोकसंख्येला शेतीक्षेत्राने सामावून घेतलेले आहे.

कृषीमाल निर्यातीमधून देशाला परकीय चलन मिळते. २००१-०२ मध्ये शेतीमाल निर्यातीमधून २८,५८२ कोटी रुपये मिळाले, तर २०१०-११ मध्ये १,११,३९४, २०१३-१४ मध्ये १,५८,८८० कोटी रुपये परकीय चलन मिळालेले आहे. २००९-१० मध्ये एकूण निर्यातीमध्ये शेतीचा हिस्सा १०.५९ टक्के होता. २०१२-१३ मध्ये २१.१ टक्के इतका होता.

### २) अन्नधान्य उत्पादन आणि उत्पादकता

सध्या भारत हा अन्नधान्य उत्पादनाबाबतीत स्वयंपूर्ण असणारा देश आहे. १९५०-५१ मध्ये देशात ५५ दशलक्ष टन इतके अन्नधान्य उत्पादित झाले होते, २०००-०१ मध्ये हे उत्पादन १९६ दशलक्ष टन आणि २०१२-१३ मध्ये २५७.९ दशलक्ष अन्नधान्य उत्पादन झाले. १९५०-५१ मध्ये दरदिवशी प्रतिव्यक्तिला ३९४ ग्रॅम इतके अन्नधान्य हे प्रमाण सध्या ४८४ ग्रॅम इतके झाले. लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढूनसुद्धा वाढत्या अन्नधान्य उत्पादनामुळे प्रत्येक नागरिकाला दरदिवशी जादा अन्नधान्य मिळवून देण्यामध्ये कृषी उत्पादकतेचे योगदान आहे. गहू, तांदूळ, ज्वारी, बाजरी यांच्या उत्पादकतेमध्येही वाढ झाली आहे.

### ३) प्रमुख पिकांची उत्पादकता

भारतात हरित क्रांतीच्या माध्यमातून जैविक आणि तंत्रवैज्ञानिक बदल झाले. नवीन बियाणांचा, संकरीत बियाणांचा वापर वाढत आहे. सिंचनाचे क्षेत्र वाढत असून सिंचन सुविधा वाढत आहेत. हंगामी शेतीबरोबर बारमाही उत्पादनाला चालना मिळाली. अन्नधान्य, कडधान्ये, फळे, भाजीपाला यांच्या एकरी आणि हेक्टरी उत्पादनात वाढ झाली आहे. गव्हाची दरहेक्टरी उत्पादकता ३०.७५ क्विंटल तांदूळ २४.२० क्विंटल, ज्वारी ९.२५ क्विंटल इतकी आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर तुलना करता ही उत्पादकता कमी असली तरी अंतर्गत पातळीवर उत्पादकता वाढविण्यात यश मिळाले.

### ४) कृषी क्षेत्राचा विकासदर :

जागतिकीकरणाचा भारताच्या शेती व्यवसायावर परिणाम झाला आहे. २००७-०८ मध्ये कृषीविकासदर प्रतिवर्षी ५.८% होता, २००८-०९ मध्ये ४.९ टक्के, २०११-१२ मध्ये २.४ टक्के इतका होता. बाराव्या योजनेत कृषीविकास ४ टक्के टिकविण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

### ५) नगदी पिकांचे उत्पादन

अन्नधान्य उत्पादनात वाढ झाली आहे त्याचप्रमाणे नगदी पिकांच्या उत्पादनात वाढ झाली. चहा, कॉफी, ऊस, कापूस, ताग यांना नगदी पिके म्हणतात. २०११-१२ मध्ये ऊसाचे उत्पादन ३६.१० कोटी टन तर २०१२-१३ मध्ये ३३.४५ कोटी टन झाले. २०११-१२ मध्ये कापूस उत्पादन ३३८ लाख गाठी, ताग ११७ लाख टन गाठी इतके झाले. एकूण जागतिक चहा उत्पादनापैकी २७ टक्के चहा भारतात उत्पादित होता. चहाचा १३ टक्के जागतिक व्यापार भारताच्या ताब्यात आहे. २०१०-११ मध्ये १ दशलक्ष टन चहा उत्पादित झाला. नारळाच्या उत्पादनात भारताचा प्रथम क्रमांक आहे. रबर उत्पादनात भारताचा जगात चौथा क्रमांक आहे. सर्वाधिक रबर उत्पदन केरळमध्ये होते. भारतातील एकूण रबर उत्पादनापैकी ९० टक्के उत्पादन एकट्या केरळमध्ये होते.

### ६) दूध-अंडी आणि माशांचे उत्पादन

शेतीव्यवसायाशी संलग्न असणारे व्यवसाय म्हणजे पशूपालन, कुक्कूटपालन आणि मासेमारी हे आहेत. १९९०-९१ मध्ये देशात ५३.९, २०००-०१ मध्ये देशात २६६३२ दशलक्ष तर २०१३-१४ मध्ये ७३८९० दशलक्ष इतके अंड्यांचे उत्पादन झाले. १९९०-९१ मध्ये माशांचे उत्पादन ७५२ दशलक्ष टन तर २०१२-१३ मध्ये ९०४० दशलक्ष टन उत्पादन झाले.

### ७) शेती क्षेत्रातील गुंतवणूक

२००४-०५ च्या किंमतीनुसार विचार करता भारतात शेतीक्षेत्रात २०१०-११ मध्ये १३१२२४ कोटी तर २०११-१२ मध्ये १४६५७८ कोटी रुपये इतकी गुंतवणूक झाली. साधारणपणे ८०.८५ टक्के गुंतवणूक खाजगी क्षेत्रातून होत असते.

### ८) भांडवलनिर्मिती :

अर्थव्यवस्थेत बचतीचे प्रमाण वाढत जाणे आणि वाढणारी बचत गुंतवली जाण्याची प्रक्रिया म्हणजे भांडवल निर्मिती होय. भारतीय शेतीक्षेत्रात भांडवलनिर्मितीचा वेग फारसा समाधानकारक नाही. २०१०-११, २०११-१२ या दोन्ही वर्षात भांडवलनिर्मिती प्रमाण अनुक्रमे ८ टक्के व ८.५ टक्के इतके माफक आढळते. यामुळे शेतीविकासाचा दर अपेक्षेप्रमाणे चार टक्के प्रतिवर्षी असा टिकविणे कठिण झाले आहे. शेतीक्षेत्रात उत्पादन घटकांचा खर्च वाढत असल्यामुळे शेतकऱ्यांना बाजारी अधिक्य मिळत नाही. त्यामुळे भांडवलनिर्मिती अपेक्षेप्रमाणे किंवा समाधानकरक पातळीवर होत नाही.

### ९) लागवडीखालील क्षेत्र :

२०१३-१४ मध्ये अन्नधान्य उत्पादनाखाली १२६ तर कडधान्याखाली १००.८ दशलक्ष हेक्टर क्षेत्र लागवडीखाली होते. अन्नधान्यामध्ये तांदूळ आणि गहू या पिकांखालील एकत्रित क्षेत्र जास्त असल्याचे आढळते.

भारतीय शेतीची सध्यस्थिती

| अ.नं. | घटक | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ |
|---|---|---|---|---|
| १ | अन्नधान्य (दशलक्ष टन) | २५९.३ | २५७.१ | २६४.८ |
| २ | डाळी (दशलक्ष टन) | १७.१ | १८.३ | १९.३ |
| ३ | तेलबिया (दशलक्ष टन) | २९.८ | ३०.९ | ३२.९ |
| ४ | राष्ट्रीय उत्पादनात हिस्सा | १४.१२ | १४.१ | १३.९४ |
| ५ | रोजगारात हिस्सा | ५८.१ | ५७.८ | ५७.४ |
| ६ | निर्यातीमध्ये हिस्सा | - | २१.९१ | २१.६८ |
| ७ | कृषी विकासाचा वार्षिक दर | २.४ | २.६ | - |
| ८ | अंडी (दशलक्ष) | ६६४५० | ६९७३० | ७३८९० |
| ९ | दूध (दशलक्ष टन) | १२७.९ | १३२.४ | १३७.७ |
| १० | मासे (हजार टन) | ८७०० | ९०४० | ९५७९ |

इकॉनॉमिक सर्व्हे ऑफ इंडिया

**समारोप :**

भारतीय शेतीचे आर्थिक विकासात मोठे योगदान आहे. राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा, रोजगारनिर्माण, निर्यात यासारख्या इतर घटकांच्या दृष्टीने शेती महत्त्वाची आहे. अन्नधान्य, कडधान्ये, तेलबिया नगदी पिके यांच्या उत्पादनात वाढ झाली आहे.

**भारतातील शेतीमधील पेचप्रसंग किंवा कृषी आरिष्ठ**

भारत हा शेतीप्रधान देश आहे. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. राष्ट्रीय उत्पन्न, रोजगार, भांडवलनिर्मिती या विविध घटकांच्या अनुषंगाने विचार करता अर्थव्यवस्थेत शेतीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. अर्थात असे असले तरी जागतिकीकरणाच्या प्रक्रियेनंतर भारतीय शेती अडचणीत आलेली आहे. शेतमालाच्या अनिश्चित किंमती, खते-बियाणे यांच्या वाढत्या किंमती, मजुरांची वाढती टंचाई, वाढता उत्पादन खर्च, पतपुरवठ्यातील अडचणी, शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या अशा अनेक बाजूनी शेती आणि शेतकरी अडचणीत आल्याचे दिसून येते.

**कृषी आरिष्ठ-पेचप्रसंग म्हणजे काय?**

देशातील शेतीक्षेत्र विविध घटकांच्या दृष्टीकोनातून अडचणीत येण्याची अवस्था म्हणजे कृषी आरिष्ठ होय. उत्पादन, उत्पादकता, उत्पाादनाचा खर्च, किंमतीतील अस्थिरता, शेतीमाल बाजारात वाढत्या अडचणी निर्माण होणे, शेतीव्यवसाय न परवडणे, नेहमी तोटा होणे, कर्जाचा सापळा तयार होणे, शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या यासारख्या परिस्थितीला शेतीमधील पेचप्रसंग किंवा आरिष्ठ असे म्हणतात. पुढील मुद्याच्या सहाय्याने या पेचप्रसंगाचे स्वरूप लक्षात येते.

**१) वाढता उत्पादन खर्च**

शेती व्यवसायामध्ये सर्वच पिकांच्या उत्पादनाचा खर्च वाढत आहे. प्रामुख्याने बियानांच्या आणि खतांच्या किंमती वाढलेल्या आहेत. पेरणीदरम्यान बियाणे उपलब्ध होत नाहीत बियाणांमध्ये मोठी भेसळ केली जाते. रासायनिक खतांच्या किंमती सामान्य शेतकऱ्यांच्या आवाक्याबाहेर गेलेल्या आहेत. नांगरणी, पेरणी, अंतर्गत मशागत, कापणी, मळणी, वाहतूक या सर्व घटकांचे दर वाढले आहेत. यामुळे उत्पादनाचा खर्च वाढला आहे. शेतमजूरांचे दर खूप वाढले आहेत. अल्पभूधारक आणि सिमांत शेतकरी यांच्यासाठी जर शेतीचा उत्पादनखर्च खूप कठिण झालेला आहे.

**२) शेतमालाच्या किंमतीचा प्रश्न**

कृषी आरिष्ठामधील हा घटक अतिशय महत्त्वाचा ठरला आहे. शेतमालाच्या किंमतीमध्ये कमालीची अस्थिरता आणि अनिश्चितता आहे. प्रमुख पिकांच्या किंमती सरकार किमान पातळीवर ठरवून देते. परंतु बाजारात त्याला अनुसरून किंमती मिळत नाहीत. ऊसदरावरून तर महाराष्ट्रात दर वर्षी संघर्ष निर्माण होत आहे. विदर्भात कापसाच्या दरासंदर्भात आंदोलने होत आहेत. देशपातळीवर शेतकऱ्यांच्या संघटना आणि सरकार यांच्यात संघर्ष निर्माण होत आहेत. भाजीपाला, विविध फळे यांच्या किंमती शेतकऱ्यांना अपेक्षेप्रमाणे मिळत नाहीत. शेतमालाला किंमत कमी मिळाल्यामुळे शेतकऱ्यांना उत्पन्न कमी मिळते. कमी उत्पन्न आणि वाढता खर्च अशा कात्रीमध्ये शेतीक्षेत्र अडकलेले आहे.

**३) शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा व पतपुरवठ्याचा प्रश्न :**

शेतीक्षेत्रातील वाढता उत्पादनखर्च आणि अपुरे उत्पन्न यामुळे शेतकरीवर्ग कर्जाच्या सापळ्यात अडकत आहे. अल्पभूधारक आणि सीमांत शेतकऱ्यांपैकी ८५ टक्के शेतकरी कर्जामध्ये आहेत. कृषी पतपुरवठा यंत्रणेतून शेतकऱ्यांना वेळेवर गरजेइतके कर्ज मिळत नाही. जिल्हा बँका, स्थानिक संस्था

यांच्यातील राजकारणाचा शेतकऱ्यांना फटका बसतो. नागरी सहकारी बँका आणि व्यापारी बँका यांच्याकडून शेतकऱ्यांना अल्प आणि मध्यम मुदतीची कर्जे मिळण्याबाबत अनेक समस्या व अडथळे आहेत.

### ४) शेतकऱ्यांच्या आत्महत्या

भारतीय शेतीमध्ये अलिकडे निर्माण झालेला हा सर्वात मोठा प्रश्न आहे. सधन असणाऱ्या शेती विभागात म्हणजे पंजाब-हरियाना, पश्चिम महाराष्ट्र या ठिकाणीही शेतकरी आत्महत्त्या करीत आहेत ही खूप गंभीर समस्या आहे. १९९५-९६ नंतर सुरू झालेले शेतकऱ्यांच्या आत्महत्त्येचे सत्र आजअखेर सुरू आहे. १९९५ ते २००३ या दरम्यान १,३८,३२१ शेतकऱ्यांनी आत्महत्त्या केल्या. २००४ ते २०१३ दरम्यान १,४६,३७३ शेतकऱ्यांनी आत्महत्त्या केल्या. वाढता कृषीउत्पादन खर्च, किंमतीतील अनिश्चितता यामुळे शेतकऱ्यांच्या कर्जामध्ये वाढ झाली. शेती करणे आणि कुटूंब चालविणे कठीण झाल्याने शेतकऱ्यांच्या आत्महत्त्येचे प्रमाण वाढले.

### ५) जलसिंचन आणि वीज

अपुरे जलसिंचन आणि वीजटंचाई - लोडशेडिंग यामुळे शेती खूप अडचणीत आली आहे. मध्यम-अल्पभूधारक आणि सीमांत शेतकरी यांना विहिर-कालवे, कूपनलिका, उपसाजलसिंचन याद्वारे वेळेवर पाणी उपलब्ध होत नाही. पाणी उपलब्ध झाले तर लोडशेडिंगमुळे पाणी शेतापर्यंत घेऊन जाता येत नाही. पाण्यासाठी रात्री-अपरात्री शेतकऱ्यांना जीव धोक्यात घालावा लागत आहे.

### ६) शेतमजूरांची टंचाई

शेती क्षेत्रात निर्माण झालेला हा नवीन पेचप्रसंग आहे. गावात सध्या पदवीधर, शिक्षित भरपूर आहेत, प्रत्येकाला शेती वगळता इतर क्षेत्रात काम पाहिजे असल्याने शेतकऱ्यांना शेतात मजूर उपलब्ध होत नाहीत. मजुरांचे मजूरीचे दर खूप वाढलेले आहेत, शिवाय मजुरीदराच्या प्रमाणात मजूर काम करीत नाहीत त्यामुळे शेतकऱ्यांचा उत्पादनखर्च वाढत आहे. एका बाजूला मजुरांची टंचाई आणि दुसरीकडे वाढते मजूरीचे दर अशा कात्रीत शेतकरी अडकलेला आहे.

### ७) भूमी अधिग्रहण-हस्तांतरण

सरकार अलिकडील काळात विविध छुप्या मार्गांनी शेतकऱ्यांच्या जमीनी काढून घेत आहे. नागरीकरण, महामार्ग, राज्यमार्ग यांच्या विस्तारीकरण, सेझ, आय.टी.पार्क, मोठ्या कंपन्यांना जमिनी देणे, शहरांचा विस्तार यासारख्या अनेक कारणांच्या निमित्ताने शेतकऱ्यांच्या जमिनी हडपल्या जात आहेत. करार शेतीच्या नावाखाली गरीब शेतकऱ्यांना शेतीतून बाहेर ढकलले जात आहे. महानगरे, मोठी शहरी यांच्या शेजारी असणाऱ्या गावातील शेतकऱ्यांच्या जमिनी गेल्यामुळे शेतकरी भूमिहिन झाला आहे.

### ८) उत्पादकतेमध्ये होणारी घट

शेतीक्षेत्रातून विविध पिकांचे उत्पादन आणि उत्पादकता यामध्ये वाढ झाल्याचे आपण पाहातो. परंतु या वाढीला आता मर्यादा येऊ लागल्या आहेत. पंजाब, हरियाना, उत्तरप्रदेश याठिकाणी गव्हाची उत्पादकता घटत चालली आहे. पश्चिम महाराष्ट्रात ऊसाची प्रतिहेक्टर उत्पादकता कमी होत आहे.

डाळी, कापूस, तेलबिया यांच्यासंदर्भातही हीच अवस्था दिसून येते. रासायनिक खतांचा वापर तसेच पाण्याचा अतिरिक्त वापर यामुळे जमिनीचा पोत कमी होत चालला आहे. त्यामुळे उत्पादकतेत घट होत आहे.

### ९) विकासदर कमी, अपुरी भांडवलनिर्मिती

शेतीक्षेत्रातील विकासदरामध्ये २०००-०१ पासून फारशी वाढ झालेली नाही. कृषी विकासदर दोन टक्क्यांपर्यंत खाली आलेला आहे. बाराव्या योजनेत कृषीविकासदर चार टक्के इतका साध्य करण्याचे उद्दिष्ट आहे. शेतीक्षेत्रात बाजारी अधिक्य अपेक्षेप्रमाणे निर्माण होत नाही त्यामुळे भांडवलाची निर्मिती कमी प्रमाणात होते. शेतीतून निव्वळ भांडवलनिर्मिती कठीण होत आहे. शेतीत नफ्याची शक्यता कमी असल्यामुळे या क्षेत्राकडे भांडवलाचा ओघ निर्माण होऊ शकत नाही.

### १०) शेतीविषयक धोरण आणि अनुदान

शेती हा विषय सामाईक सूचीमध्ये समाविष्ठ आहे. केंद्र-आणि राज्यसरकार यांच्या यादीत शेतीचा समावेश आहे. शेतीविषयक निश्चित आणि व्यापक अशा दीर्घकालीन धोरणाचा अभाव असल्यामुळे शेती व्यवसाय अडचणीत आलेला आहे. केंद्रासह सर्वच राज्यांनी अंदाजपत्रकात शेतीवरील खर्चाचे प्रमाण कमी केले आहे. कृषी क्षेत्रातील अनेक घटकांवरील अनुदान कमी होत आहे. शेती महत्त्वाची आहे. पण सरकार पातळीवर त्यासाठी निश्चित निर्णय होत नाही. शेतकऱ्यांना बाजाराची यंत्रणा सुधारून हवी आहे. त्यांना कांहीही मोफत नको आहे परंतु शेतकऱ्यांच्या नावावर राजकारण केले जात आहे. त्यामुळे व्यापक कृषी धोरणाच्या अंमलबजावणीच्या अभावामुळे शेती क्षेत्रात पेचप्रसंग निर्माण झालेला आहे.

## २.४ शेतमालाची बाजारपेठ (Agricultural Marketing) :

शेतीतून उत्पादन तयार करून त्याची विक्री करणे व शेतमाल खरेदी करणारे लोक यांची मिळून शेतमालाची बाजारपेठ ही संकल्पना तयार होते. शेतमालाची निर्मिती करणारे व त्याची विक्री करणारे व शेतमालाची खरेदी करणारे लोक तसेच खरेदी विक्रीसाठी उपयोगी ठरणाऱ्या प्रक्रिया यांचा शेतमालाची बाजारपेठ या संकल्पनेशी संबंध आहे. शेतमालाची निर्मिती शेतकऱ्याकडून केली जाते. तो स्वत: ग्राहकांना शेतमाल विकेल किंवा एखादा मध्यस्त त्याच्या शेतमाल खरेदी करून तो आपल्या मार्फत ग्राहकांना विकेल. हे मध्यस्त अडते, दलाल, कमिशन एजंट, व्यापारी या स्वरूपात पहायला मिळतात. शेतमालाची खरेदी ही उपभोकत्याकडून केली जाते किंवा शेतमाल खरेदी करून त्याच्यावर प्रक्रिया करून कांही लोक/संस्था विशिष्ठ नांवाने तो ग्राहकांना विकतात. त्यामुळे शेतमालाची निर्मिती करणारे व त्याची खरेदी करून विकणारे, त्यावर प्रक्रिया करणारे व उपभोगासाठी खरेदी करणारे लोक हे सर्व शेतमालाची बाजारपेठ या संकल्पनेमध्ये सहभागी होणारे घटक आहेत.

### २.४.१ शेतमालाची बाजारपेठ/विपणन म्हणजे काय ?

''शेतमालाची निर्मिती करून त्याची विक्री करणारे लोक वा संस्था व त्याची पुर्नविक्रीसाठी खरेदी करणारे, त्याच्यावर प्रक्रिया करून विक्री करणारे लोक वा संस्था तसेच शेतमालाची साठवणूक, वाहतूक व खरेदी करणारे लोक वा संस्था मिळून जी संकल्पना तयार होते, त्याला शेतमालाची बाजारपेठ किंवा शेतमालाचे विपणन असे म्हणतात.''

शेतमालाची बाजारपेठ ही विस्तृत संकल्पना असून त्यामध्ये शेतमालाची निर्मिती करणारे, त्याची साठवणूक करणारे, वाहतूक करणारे, त्यावर प्रक्रिया करणारे, त्याची विक्री करणारे, या प्रक्रियेला कर्ज पुरवठा करणारे, विमा उतरविणारे व शेतमाल खरेदी करणारे, त्याचा वापर करणारे लोक वा संस्था या सर्वांचा शेतमालाची बाजारपेठ या संकल्पनेत समावेश होतो.

**शेतमालाची निर्मिती :**

शेतकरी शेतीतून विविध पिकांचे उत्पादन घेतो, कुंटुंबियांच्या गरजा भागविण्यासाठी उत्पादन शिल्लक ठेवून, बियाणांची तरतूद करून शिल्लक उत्पादन तो विकतो. कांही वेळा पूर्ण उत्पादन विक्रीसाठीच तयार करतो. शेतकऱ्याबरोबरच उत्पादन संस्था, सरकार, सहकारी संस्था देखील उत्पादन तयार करून त्याची विक्री करतात. पण कच्चा माल या स्वरूपात विक्री करण्याऐवजी त्यावर प्रक्रिया करून त्याची विक्री करतात.

**शेतमालाची मागणी : शेतमालाची मागणी करणारे / शेतमाल खरेदी करणारे घटक :**

**अ) उपभोक्ते :** शेतमालाचा प्रत्यक्ष उपभोग घेणारे लोक शेतमाल खरेदी करतात. उदा. अन्नधान्य, डाळी, फळे, भाजीपाला विकत घेवून त्याचा वापर करणारे लोक शेतमालाची खरेदी करतात.

**ब) प्रक्रिया करण्यासाठी :** ऊस, कापूस, ताग, चहा-कॉफी, रबर, मसाल्याचे पदार्थ, गहू, भात, फुले इ. खरेदी करून त्यावर प्रक्रिया करून त्याची विक्री करण्यासाठी उत्पादन संस्था, व्यापारी शेतमालाची खरेदी करतात.

**क) पुर्नविक्रीसाठी :** शेतमाल खरेदी करून तो दुसऱ्या ठिकाणी विकणे, साठवणूक करून नंतरच्या काळात त्याची विक्री करणे, परदेशात त्याची विक्री करणे यासाठी शेतमालाची व्यापारी खरेदी करतात. सहकारी संस्था, सरकार कडूनही शेतमालाची खरेदी केली जाते.

वरील प्रमाणे शेतमालाची निर्मिती करणारे व त्याची खरेदी करणारे घटक हे शेतमालाच्या बाजारपेठेचे अविभाज्य घटक आहेत. पण या मुख्य घटकाबरोबरच पुढील अनेक अवस्थांचाही/बाबींचाही समावेश शेतमालाच्या बाजारपेठेत समावेश होतो. शेतमालाची खरेदी विक्री ही सतत सुरू असणारी प्रक्रिया आहे. ती पुढील अनेक अवस्थेमधून जाते. त्यांचा शेतमालाची बाजारपेठ या संकल्पनेत समावेश होतो.

**१) शेतमालाची वाहतूक :** शेतमाल शेतात तयार होतो तो बाजारपेठेपर्यंत, उत्पादन केंद्रापर्यंत, उपभोग केंद्रापर्यंत वाहून आणावा लागतो. प्रक्रियानंतर तो बाजारपेठेत वाहून न्यावा लागतो. त्यामुळे शेतमालाची वाहतूक साधने, वाहतूक संस्था, वाहतूक माध्यमे, त्यांची दुरूस्ती करणारे लोक यांचा व वाहतूक दाराचा संबंध शेतमाल बाजारपेठेशी येतो.

**२) शेतमालाचे एकत्रीकरण :** अनेक शेतकरी शेतमालाचे उत्पादन करतात पण कांही शेतकरी अल्पभूधारक आहेत ते कमी उत्पादन विक्रीसाठी उपलब्ध करतात. तर कांही शेतकऱ्यांच्या उत्पादनातील अडचणीमुळे त्यांचे उत्पादन कमी प्रमाणात तयार होते. अशावेळी शेतमालाचे एकत्रीकरण करून पुरेसा शेतमाल विक्रीसाठी उपलब्ध करून द्यावा लागतो. फिरते व्यापारी, अडते, दलाल असा शेतमाल एकत्र करत असतात.

**३) शेतमालाचे वर्गीकरण :** शेतमालाची निर्मिती शेतात होते. पण नैसर्गिक भिन्नतेमुळे सर्व शेतमाल सारख्या दर्जाचा नसतो. शेतमालाची प्रतवारी करावी लागते. चांगल्या दर्जाच्या शेतमालास 'अ' दर्जा, मध्यम प्रकिला 'ब' व कनिष्ठ प्रतिला 'क' दर्जाचा शेतमाल असे वर्गिकरण करून त्याला वेगवेगळा दर मिळत असतो. शेतमालाची पुर्नविक्रीकरताना ही प्रतवारीकरून त्याची विक्री केली जाते.

४) **मालाची साठवणूक :** शेतमालाचे दर बदलत असतात. जर भविष्यकाळात दर वाढणार असतील असा अंदाज असेल तर, वर्तमान काळात शेतमालाची साठवणूक करून ठेवली जाते. विशिष्ठ हंगामात शेती उत्पादन तयार झाल्याने त्याचा पुरवठा वाढून विक्री किंमत कमी मिळते व बिगर हंगामात दर वाढतो. म्हणून शेतकरी, व्यापारी, मध्यस्त शेतमालाची साठवणूक करतात. साठवणूक सोई, साठवणूकीचा खर्च, साठवणूकीवर कर्ज मिळविण्याची शक्यता इ. गोष्टींचाही साठवणूकदार विचार करत असतात.

५) **शेतमालावर प्रक्रिया :** शेतातील उत्पादन जसेच्या तसेच विकले तर किंमत कमी मिळते. त्यावर प्रक्रिया केली तर जास्त किंमत मिळू शकते उदा. भात विकला तर किंमत कमी, पण त्याचे तांदूळ करून विकले तर किंमत जास्त मिळते. ऊस विकण्यापेक्षा त्याचा गुळ, साखर तयारकरून विकले तर किंमत जास्त.... म्हणून शेती उत्पादन कच्या स्वरूपात न विकता ते प्रक्रिया करून विकले जाते. शेतकरी स्वत: प्रक्रिया करेल किंवा सहकारी संस्था  इतर संस्था यामध्ये सहभागी होतात.

६) **शेतमालाचा विमा :** शेतमालाची वाहतूक करताना, साठवणूकीच्या वेळी त्याचा विमा उतरविला जातो. विम्याच्या सोईमुळे शेतमाल हाताळणीतील धोका कमी करता येतो.

७) **शेतमालाची विक्री :** शेतमालाची विक्री ही शेवटची अवस्था. जास्तीत जास्त किंमतीला शेतमाल विकण्याचा प्रयत्न केला जातो. त्यासाठी विक्रीखर्च ही करावा लागतो. विक्रेत्याची धारणक्षमता कमी असेल तर त्याला कमी किंमतीला माल विकावा लागतो. शेतकऱ्याची धारणक्षमता कमी असल्याने त्याला कमी किंमतीला शेतमाल विकावा लागतो.

### २.४.२ भारतातील शेतमाल विक्री व्यवस्थेची स्थिती :

आपल्या देशात शेती व्यवसाय प्रामुख्याने खाजगी पध्दतीने केला जातो. सुमारे ७ कोटी शेतकरी शेती कसतात. पण त्यांच्याकडे असणारी शेतजमीन भिन्न भिन्न आकारमानाची आहे. कुटुंबियांच्या उदरनिर्वाहासाठी अनेक शेतकरी शेती कसतात. फारच थोडे शेतकरी 'व्यवसाय' म्हणून शेती कसत असतात. भारतीय शेतकरी शेतमालाची विक्री कश्या पध्दतीने करतो हे पहावे लागेल. विक्री व्यवस्था त्याच्यादृष्टीने अनुकूल असेल तर त्याच्या व्यवसायात त्याला उत्पन्न मिळविता येईल. तो शेतीत गुंतवणूक वाढवून शेतीविकास करू शकेल. पण त्याला अडचणीच सहन कराव्या लागल्या तर शेती  चांगल्या प्रकारे कसली जाणार नाही.

भारतीय शेतकरी पुढील मार्गांनी शेतमालाची विक्री करत असतात.

१) **खेड्यातील बाजारपेठ :** भारतातील सुमारे ७ लक्ष खेड्यात शेतकरी राहतात. तेथेच आपल्याकडील विक्रेय वाढावा विक्रीसाठी उपलब्ध करून देतात. त्यांचा विक्रीयोग्य माल कमी असल्याने गावातील बाजारपेठेत प्रस्थापित किंमतीला शेतमाल विकतात. प्रत्यक्ष ग्राहकाला माल विकतात, ग्राहक नसतील तर मध्यस्थांना सावकार, अडते, दलाल, फिरते व्यापारी यांना शेतमाल विकतात. साहजिकच त्यांना विक्री किंमत कमी मिळते. गावामध्ये शेतमालाचे ग्राहक कमी पण विक्रेते जास्त त्यामुळे कमी दरात शेतमाल विकावा लागतो.

खेड्यातील बाजाराचा विशिष्ठ दिवस असतो त्या वेळी शेतकरी शेतमाल विकायला आणतात. मध्यस्थ त्याची खरेदी करतात. वाहतूक सोईचा अभाव, धारणक्षमता कमी, कर्जबाजारीपणा यामुळे शेतकरी आपले उत्पादन स्थानिक बाजारपेठेतच विकत असतात.

२) **यात्रांमधून होणारी विक्री :** खेड्यामध्ये सुगीचे दिवस सुरू झाले तर विविध देवी देवतांच्या यात्रा साजऱ्या केल्या जातात. यात्रेमध्ये अनेक शेतकऱ्यांना आपला शेतमाल विकण्याची संधी मिळते. पण जी

स्थिती स्थानिक बाजारपेठेची तीच स्थिती यात्रामध्येही असते. त्यामुळे शेतकऱ्याला योग्य किंमतीत शेतमाल विकण्याची संधी मिळत नाही.

**३) शहरामध्ये होणारी विक्री :** शहरी भागात उद्योग, व्यवसायात असणारे लोक शेतमालाचे खरेदीदार असतात. खेड्यातील बाजारपेठेपेक्षा शहरी बाजारपेठेत ग्रांकांची व विक्रेत्यांची संख्या जास्त असते. तेथे तुलनात्मकरित्या शेतमालाला जास्त दर मिळतो. प्रक्रिया संस्था, उद्योग संस्था, व्यापारी संस्था, सरकार यांच्याकडून शेतमालाची खरेदी केली जाते. पण तेथे शेतमाल आणण्यासाठी शेतमालाला वाहतूक लागते, विक्रीसाठी वेळ काढावा लागतो. हमाली, तोलाई व विक्री होईपर्यंत मालाची सुरक्षितता, स्वत:च्या राहण्याची व्यवस्था करावी लागते. मध्यस्थांनाच विक्री करण्याचा प्रसंग येतो. त्यामुळे या अडचणीवर मात करू शकणारे शेतकरीच शहरात शेतमाल विकायला आणू शकतात. लहान शेतकरी आपला अल्प शेतमाल शहरात विक्रीसाठी आणू शकत नाही. शहरात शेतमालाची खरेदी करणारे मध्यस्थ-अडते, दलाल, कमीशन एजंट यास्वरूपात काम करतात, ते शेतकऱ्याला सहाय्य करण्याऐवजी शेतमालाची खरेदीकरणाऱ्यांनाच सहाय्य करतात. ओघानेच शेतकऱ्याची शहरी बाजारपेठेत पिळवणूक फसवणूक होते.

**४) उत्पादन संस्था, सहकारी संस्था :** शेतमालावर प्रक्रिया करणाऱ्या संस्था, सहकारी खरेदी विक्री संस्था यांनाही शेतकरी शेतमाल विकतात. भारताच्या स्वातंत्र्यासमयी वरील संस्थाची संख्या खूपच कमी होती पण भारताच्या विकासाबरोबर, औद्योगिकरणाबरोबर अशा संस्थांची संख्या वाढत आहे.

**५) सरकारकडून खरेदी :** सरकार विविध कारणासाठी शेतकऱ्याकडून शेतमालाची खरेदी करते, पूर्वीच्या काळी कमी दरातच शेतकऱ्याकडून शेतमालाची खरेदी करत असे, पण अलिकडील काळात शेतकऱ्यांना योग्य दर मिळवा म्हणून, कापूस एकाधिकार योजना, ज्यूट महामंडळ, अन्नमहामंडळ यांच्याकडून खरेदी करत असे.

१९६०-७० पर्यंतच्या काळात भारतीय शेतकऱ्यांना पहिल्या तीन मार्गांनीच शेतमाल विक्री करावी लागत होती, कि जी त्यांच्या दृष्टीने प्रतिकूल होती. परिणामी शेती उत्पादन वाढविण्यात अपयश येत होते.

### २.४.३ भारतातील शेतमाल : खरेदी-विक्री व्यवस्थेतील दोष/अडचणी/समस्या.

अन्य उद्योगाप्रमाणे शेती व्यवसाय हा देखील एक उद्योग आहे. शेती व्यवसायात गुंतवणूक व्हावी, शेतीचा विकास घडून यावा असे वाटत असेल तर शेतकऱ्यालाही उत्पादन खर्च भरून निघेल अशी शेतमालाची किंमत मिळायला हवी. भारताच्या स्वातंत्र्य वेळी तर शेतकऱ्यांना शेतमाल विक्रीमध्ये असंख्य अडचणीना तोंड द्यावे लागत होते. स्वातंत्र्योत्तर काळात त्यातील दोष/अडचणी कमी करण्याचा प्रयत्न झाला आहे पण अजूनही या अडचणी/दोषांचे पुर्णत: निर्मूलन झालेले नाही. पुढील दोष/अडचणी बहुसंख्य शेतकऱ्याना सहन कराव्या लागत आहेत.

**१) दोषपूर्ण विक्री व्यवस्था :** भारतातील ५४% शेतकऱ्यांची शेतजमीन एक एकर पेक्षा कमी आकाराची आहे. अल्प जमीनधारणेमुळे निर्माण होणारे उत्पादन कमी असते. त्यातीलच कांही भाग कुटुंबीयांच्या उपजिविकेसाठी ठेवून विक्रीसाठी उपलब्ध शेतमाल कमी असतो, त्यामुळे तो नाईलाजाने गावातीलच बाजारपेठेत अगर फिरत्या व्यापाऱ्यांना विकावा लागतो. परिणामी शेतमालाला कमी किंमत मिळते.

बहुसंख्य शेतकरी अल्पभूधारत आहेत त्यांना विविध कारणासाठी कर्ज काढावे लागते. असे कर्ज गावातील सावकार, अडते, दलाल यांच्याकडून घ्यावे लागते. कर्ज घेतानाच त्यांना आपला शेतमाल कमी

दराने विकत देण्याचे मान्य करावे लागते. साहजीकच सुगीच्या दिवसात कमी दराने त्यांनाच शेतमाल विकावा लागतो. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना शेतमालाची योग्य किंमत मिळत नाही.

२) **मध्यस्थामार्फत शेतमालाची विक्री :** सर्व शेतकरी आपला शेतमाल प्रत्यक्ष ग्राहकांना विकू शकत नाहीत. साहजिकच मध्यस्थांना शेतमाल विकावा लागतो. गावातील फिरता व्यापारी, कमीशन एजंट, अडते, दलाल, असे अनेक मध्यस्थामार्फत हा माल प्रत्यक्ष ग्राहकांना विकला जातो. कांही वेळा शेतकरी व ग्राहक यांच्यामध्ये १० ते १२ मध्यस्थांच्या साखळीमधून तो शतमाल जातो. प्रत्येक मध्यस्थ आपला नफा मिळविण्याचा प्रयत्न करतो. भारतीय नियोजन मंडळ म्हणते ''मध्यस्थांची ही साखळी भारतीय शेतकऱ्यांच्या दारिद्र्याला कारणीभूत आहे.'' वर्षानुवर्षे शेती कसणार शेतकरी साधे घर बांधू शकत नाही पण शेतमालाचा व्यापार करणारा मध्यस्थ एक-दोन वर्षात उंच माडे (बंगले) निर्माण करतात. श्री. डी. एस. सिध्द यांनी केलेल्या पाहणीनुसार ग्राहक तांदळाला जी किंमत देतो त्यापैकी शेतकऱ्याला ५३% विक्रीखर्च १६% तर ३९% हिस्सा मध्यस्थांना मिळतो. त्याचप्रमाणे भाजीपाल्याच्या विक्री किंमतीपैकी २९.५%, फळांच्या संदर्भात ४६.५% इतका भाग मध्यस्थ मिळवित असतात. यामध्ये केवळ शेतकरीच नव्हे तर ग्राहकही लुबाडले जातात.

३) **शेतमाल साठविण्याच्या सोईचा अभाव :** वरती नमुद केल्याप्रमाणे बहुसंख्य शेतकरी अल्पभूधारक आहेत. त्यांना राहण्यासाठी स्वत:ची घरे नाहीत. घरे असलीतर ती अपूरी व गैर सोईची असतात. अशावेळी घरामध्येच जो शेतमाल साठविता येईल उदा. अन्नधान्य, डाळी, वगैरे पोत्यामध्ये, कणगीमध्ये, डब्यामध्ये साठवूण ठेवले जाते. खेड्यातील शेतकऱ्यांकडे शेतमाल साठविण्याच्या समाधानकारक सोई नाहीत. उंदिर, घुशी, किडे यामार्गाने साठविलेल्या शेतमालाचे नुकसान होते. देशातील शेतमालापैकी, शेतकऱ्यांच्या या साठवणूकीमुळे १०% ते २०% शेतमालाचे नुकसान होते.

सहकारी संस्था, प्रक्रिया संस्था, बँका, गोदामे बांधत आहेत पण त्याचा फायदा फारच थोड्या शेतकऱ्यांना मिळतो. साठवणूकीतील दोषामुळे शेतकरी सुगीच्या दिवसात किंवा जेंव्हा शेतमालाचा पुरवठा जास्त व मागणी कमी असते त्या वेळी म्हणजे अयोग्य वेळी, अयोग्य किंमतीला व अयोग्य ठिकाणी आपला शेतमाल विकतात, त्यामुळे त्यांना तोटा सहन करावा लागतो.

४) **वाहतूक व दळणवळणाच्या अपुऱ्या सोई :** भारत हा खेड्यात वसलेला देश आहे. खेड्यांना बारमाही रस्त्याने जोडलेले नाही. पावसाळ्यामध्ये अनेक रस्ते वाहतुकीस अयोग्य ठरतात. कच्चा रस्त्यामुळे वाहतूक साधने उपलब्ध होत नाहीत. अरूंद रस्ते, खाच खळग्यानी, दगड गोट्यानी भरलेले रस्ते यामुळे जेथे माणसांना चांगले चालता येत नाही तेथे शेतमालाची वाहतूक सोय होणार कशी. अशा वेळी बैल, घोडे, रेडे यांच्या सहाय्याने शेतमालाची ने आण केली जाते. त्यामुळे मालाची नासाडी होते, माल वाहून नेण्यास वेळ लागतो. शेतकऱ्यांची गैरसोय होते. जलमार्ग व रेल्वेमार्ग यांच्या सहाय्याने शेतकऱ्याला आपला शेतमाल नेण्याची व्यवस्था करता येत नाही. ट्रॅक्टर, मेटॅडोर, ट्रॅक्स, रिक्शा याद्वारे माल वाहतूक करणे शेतकऱ्याला परवडणारे नसते. कारण एक तर ही साधने बाळगणे त्याला शक्य होत नाही किंवा दर परवडणारे नसतात. अजुनही वाहतुक सोई साधने ग्रामीण भागात पुरेस्या प्रमाणात उपलब्ध नसल्याने बाजारातील आकर्षक किंमतीला ग्रामीण भागातील शेतकरी आपला शेतमाल उपलब्ध करून देवू शकत नाही. स्वस्त, सोईस्कर व कार्यक्षम तसेच स्पर्धात्मक किंमतीला वाहतूक सोई सुविधा उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांना ग्रामीण भागातच मध्यस्थांना शेतमाल विकावा लागतो व त्यामुळे त्यांचा तोटा होतो. याउलट मध्यस्थ याचा फायदा उठवितात व शेतकऱ्यांचा माल कमी किंमतीला खरेदी करून स्वत: वाहतुकीची सोय करून जास्त फायदा मिळवितात.

वाहतुकीच्या अकार्यक्षम सोईमुळे कांही ठिकाणी शेतमाल जास्त उपलब्ध होवून तेथे दर घसरतात व दुसऱ्या ठिकाणी त्याची टंचाई जाणवून त्याच्या किंमती वाढतात. किंमत अस्थैर्यामुळेही तोटा होतो.

५) **शेतमालाच्या बाजारपेठेतील गैरसोई :** शेतमाल वाहतुकीस जड आहे, नाशवंत आहे, कांही शेतमाल आकारमानाने मोठा असतो, असा शेतमाल बाजारपेठेत नेल्यानंतर तेथे तो विक्रीसाठी मांडून ठेवणे, साठवून ठेवणे शेतकऱ्याला शक्य होत नाही. विक्रीकरत बसायला सवड नसते, बैलगाडी सोडायला जागा नसते, स्वत:च्या राहण्याची सोय नसते. या गैरसोईमुळे बहुसंख्य शेतकरी बाजारातील मध्यस्थांनाच शेतमाल विकून टाकतात. कांही वेळा अडते, दलाल, कमीशन एजंटवाले शेकऱ्याचा मालचा लिलाव करतात कि ज्यामध्ये शेतकरी स्वत:च्या मालाची स्वत: किंमत ठरवू शकत नाही. मग ती उत्पादन खर्चानुसार आहे की नाही, शेतकऱ्याला परवडणारी आहे की नाही याचा विचार होत नाही. कांही वेळा खरेदीदार व मध्यस्थ सांकेतिक भाषेत शेतमालाची किंमत ठरवितात व ती शेतकऱ्याला मान्य करण्यावाचून पर्याय नसतो. शेतकरी वर्षा-सहामहिन्याला बाजारात येतो पण मध्यस्थ व शेतमाल खरेदी करणारे व्यापारी, उद्योजक दररोज भेटणारे असतात. ते एक होतात व शेतकऱ्याची पिळवणूक करतात. शेतकऱ्यावरच शेतमाल विकत असताना, दलाली, तोलाई, हमाली, सफाई खर्च, धर्मादाय, देणग्या, कर, जागाभाडे, बाराबंदी, टपालखर्च इ. नांवाने झिझीयाकर सहन करावा लागतो. इतकेच नव्हे तर बाजारपेठेतील शिपाई, कारकून, मापाडी यांनाही खूष करावे लागते. कांही वेळा वजनामध्ये फसवणूक किंवा खोटी वजन मापे वापरली जातात. हिशोबामध्ये घोळ घातला जातो, अडाणी, निरक्षर शेतकऱ्याला असाह्य करून सोडले जाते.

६) **बाजारातील माहितीचा अभाव :** अनेक शेतकरी खेडेगावात राहणारे आहेत. त्यांना कोणत्या शहरातील बाजारपेठेत कोणता शेतमाल, कोणत्या दराने विकला जात आहे, आवक-जावक किती, बाजारपेठेची स्थिती कशी आहे याची माहिती मिळत नाही किंवा अडानी, निरक्षर शेतकऱ्याला ते जाणून घेण्याची गरजही वाटत नाही. रेडिओ, वर्तमानपत्रे, दूरदर्शनवरून ही माहिती तो मिळवू शकतो पण तिकडे त्याचे लक्ष जात नाही. मुळात त्याच्याकडे शेतीमालाचा विक्री योग्य हिसा अपुरा असल्याने तो भाग निवासाच्या ठिकाणीच विकण्याचा प्रयत्न करतो. ज्या शेतकऱ्याकडे शेतमालाचा विक्रेय वाढावा जास्त असतो त्याला इतर ठिकाणच्या बाजारपेठेची योग्य माहिती उपयुक्त ठरू शकते. पण स्वत:ची वाहतूक सोय नसणे, दुसऱ्या ठिकाणच्या बाजारपेठेची अचूक माहिती नसणे यामुळे तो आपला माल इतरत्र विकण्याचे धाडस करू शकत नाही.

७) **प्रतवारी व प्रमाणीकरणाचा अभाव :** शेतीउत्पादनाची तीन गटात प्रतवारी केली जाते अ, ब, क दर्जाचा माल ठरविला जातो. पण यापैकी आपला शेतमाल कोणत्या दर्जाचा आहे हे शेतकऱ्याला माहित नसते किंवा तो ती माहिती मिळविण्याचा प्रयत्नही करत नाही. नैसर्गिकरित्या शेतामधून जो माल पिकतो तो सरसकट विक्रीसाठी उपलब्ध करून देतो. त्याच्यावर प्रक्रिया करण्याचेही काम तो करू शकत नाही. त्यामुळे मध्यस्थ कमी दराने त्याचा शेतमाल खरेदीकरून स्वत:जवळ जमलेल्या शेतमालाचे वर्गिकरण करून ते ग्राहकांना विकतात. कांही वेळा व्यापारी शेतकऱ्याच्या उच्च प्रतिच्या शेतमालात कमी प्रतिचा शेतमाल मिसळून त्याची विक्री करतात.

८) **शेतकऱ्याचा कर्जबाजारीपणा :** अल्पजमीन धारणा, विभाजन व तुकडी करणाची जमीन, पाणीपुरवठ्याच्या सोईचा अभाव, वारंवार पडणारा दु:ष्काळ, पिकावरील रोगराई, अज्ञान, निरक्षरता यामुळे नाकासमोर चालणारा शेतकरी आपल्या शेती उत्पादनावरच योग्य गुजराण करू शकत नाही. परिणामी त्याला अडअडचणीला कर्ज काढावे लागते. अपुऱ्या उत्पन्नामुळे कर्जफेड वेळेत होत नाही. हे कर्ज गावातील सावकार, व्यापारी, अडते, दलाल यांच्याकडून घेतले जाते. शेतातील उभ्या पिकाच्या तारणावर कर्ज काढावे

लागते. पिक तयार झाल्यावर कर्जफेडीसाठी सावकारालाच मिळेल त्या दरात शेतमाल विकावा लागतो; प्रसंगी कर्जकाढतानाच अमुक दराने माल विकण्याचे शेतकऱ्याला मान्य करावे लागते.

**९) शेतमालाच्या तारणावर कर्ज देणाऱ्या संस्थांची उपलब्धता कमी :** शेतकऱ्यांनी शेतमाल गोडावूनमध्ये ठेवला आहे व त्याच्या तारणावर त्याला संस्थात्मक मार्गाने कर्ज मिळाले आहे अशी स्थिती ग्रामीण भागात दिसत नाही. त्यामुळे शेतकऱ्याला आपल्या शेतमालाच्या तारणावर योग्य व्याजदराने पुरेस्या प्रमाणात कर्ज मिळत नाही त्यामुळे त्याची धारणक्षमता कमी राहते. कर्जासाठी त्याला सावकार, अडते, दलाल यांच्यावर अवलंबून रहावे लागते व पिक तयार झाल्यावर त्यानाच विकून कर्ज फेडावे लागते.

**१०) प्रक्रियेचा अभाव :** शेतमालावर प्रक्रिया करून विकल्यास तुलनात्मक दृष्ट्या जास्त दर मिळविता येतो पण बहुसंख्य शेतकरी अल्प उत्पादन करणारे, विशिष्ठ सावकारावर अवलंबून असणारे, गरीब व अज्ञांनी आहेत. ते प्रक्रिया यंत्रणा उभारू शकत नाहीत, किंवा प्रक्रिया करून विकण्यासाठी जो वेळ लागतो तितके थांबायला ते तयार नसतात. त्यामुळे सुमारे ७०% शेतकरी अन्नधान्य, कडधान्ये कच्चा स्वरूपातच मध्यस्थांना, प्रक्रिया संस्थेला विकत असतात. त्यामुळे त्यांना योग्य किंमत मिळत नाही.

**११) संस्थात्मक खरेदी-विक्रीचा अभाव :** शेतकरी वर्ग ग्रामीण भागात विखुरलेला आहे. तो स्वतंत्रपणे विशिष्ट पिकाचे उत्पादन घेतो व विकतो. सामुदायिकरित्या अनेक शेतकरी एकत्र येवून कोणत्या पिकाचे उत्पादन घ्यावे, त्यावर प्रक्रिया करून तो माल कोठे विकावा, स्वत:ची साठवणूक व वाहतूक यंत्रणा उभी करावी यादृष्टीने प्रयत्न करताना दिसून येत नाही. त्यामुळे त्याला संस्थात्मक खरेदी-विक्रीचे फायदे मिळत नाहीत. याउलट व्यापारी, अडते, दलाल त्याचा माल खरेदीकरून फायदा मिळवितात.

**१२) शेतकरी विक्रेय कलेचा अवलंब करत नाहीत :** शेतकऱ्या समोरच्या अडचणीमुळे तो शेतमाल तयार झाल्याबरोबर नजीकच्या बाजारपेठेत आपला शेतमाल विकतो. नाशवंत माल तर त्याला बऱ्याचवेळा बाजारातील मागणीच्या स्थितीनुसार विकावा लागतो. उत्पादन खर्चापेक्षा कमी किंमतीला माल विकणारा विक्रेता हा शेतकरी या स्वरूपातच पहायला मिळतो.

वरील प्रकारच्या अडचणींना बहुसंख्य शेतकऱ्यांना तोंड द्यावे लागते. अलीकडील सुधारणामुळे यातील कांही अडचणी कमी होत असताना दिसून येतात.

### २.२.४ शेतमालाच्या विक्री व्यवस्तेत सुधारणा / उपाययोजना :

भारतीय शेतकऱ्यांना शेतमाल विक्री करताना अनेक अडचणी ना तोंड द्यावे लागते त्यामुळे त्यांना त्यांच्या उत्पादनखर्चापेक्षा कमी किंमतीला शेतमाल विकावा लागतो किंवा ग्राहक जी किंमत देतात ती किंमत त्यांना मिळत नाही, तर शेतमालाची किंमत वाढली तर नफा वाढतो म्हणून उत्पादन वाढविले पाहिजे अशी प्रेरणा शेतकऱ्यांना मिळत नाही. शेतीचा विकास व्हावयाचा असेल, शेतीतील गुंतवणूक वाढावयाची असेल, शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारावयाची असेल तर शेतमाल विक्रीतील दोष दूर झाले पाहिजेत. शेतीप्रधान अर्थव्यवस्थेत शेतीचा विकास प्राधान्याने घडून यायला हवा, शेतमालाच्या किंमतीत अस्थैर्य असल्याने शेतीतील गुंतवणूक, शेतीआधारित उद्योगातील गुंतवणूक, शेतकऱ्यांच्या औद्योगिक मालाच्या मागणीची अस्थिरता निर्माण होते. अर्थव्यवस्थेच्या विकासावर त्याचा प्रतिकूल परिणाम होतो.

शेतमालाच्या विक्रीव्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी स्वातंत्र्योत्तर काळात सरकारने जाणीवपूर्वक प्रयत्न केले आहेत. ते पुढील प्रमाणे -

**१) नियंत्रीत बाजारपेठांची स्थापना (Establishment of regulated markets)** शेतमाल विक्रीव्यवस्थेतील अनेक अडचणी दूर करण्यासाठी योजलेला हा प्रभावी उपाय आहे. ज्या ठिकाणी विशिष्ठ

प्रमाणात शेतमाल विक्रीसाठी येतो तेथे त्याचे योग्य नियंत्रण करण्यासाठी सरकारने नियंत्रीत बाजारपेठ स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. शेतमालाच्या बाजारव्यवस्थेवर नियंत्रण ठेवण्यासाठी एक समिती स्थापन केली जाते. त्यामध्ये (१) शेतकऱ्यांचे प्रतिनिधी (२) व्यापाऱ्यांचे प्रतिनिधी (३) राज्य सरकारचा प्रतिनिधी (४) बँकांचा प्रतिनिधी (५) सहकारी संस्थांचा प्रतिनिधी नेमण्याची तरतुद आहे. या समितीने बाजाराच्या आवारात घडणाऱ्या घटनावर नियंत्रण ठेवावयाचे आहे उदा. शेतमाल विकण्यासाठी जागा उपलब्ध करून देणे, गोडावून बांधणे, पाणी-वीज, रस्ते इ. सोय करणे, गाडीतळ, वाहनतळ, निवास व्यवस्था, जनावरांची खरेदीविक्री व्यवस्था, शेतकरी निवास, व्यापारांना गाळे देणे, खरेदी विक्रीत सहभागी होणाऱ्या व्यापाऱ्यांना, दलालांना परवाने देणे, हमाली, तोलाई दर ठरविणे, प्रमाणीत वजनमापे वापरली जातात की नाही पाहणे, स्वच्छता राखणे, शेतकऱ्यांना माल विक्रीचे पैसे योग्य प्रकारे मिळतात की नाही हे पाहणे, शेतकरी, व्यापारी वा आवारात निर्माण होणारे तंटे सोडविणे इ. कामे ही समिती करते. १९५१ मध्ये देशात २०० नियंत्रीत बाजारपेठा होत्या तर २००४ च्या अखेरीस त्यांची संख्या ७५०० इतकी होती.

निंयत्रीत बाजार पेठांच्या निर्मितीमुळे शेतमाल विक्रीव्यवस्थेतील अनेक अडचणी दूर व्हायला मदत झाली आहे. पण या समित्या कार्यक्षमतेने काम करताना दिसत नाहीत. राजकारणातील दोष तेथे निर्माण होत आहेत, त्यांची कार्यक्षमता घटत आहे.

केंद्र सरकारला नियंत्रीत बाजार समितीद्वारे शेतमाल विक्रीव्यवस्थेतील दोष दूर करून शेती व्यवसायाचा, शेतकऱ्यांचा व पर्यायाने देशाचा विकास घडवून आणावयाचा आहे. त्यादृष्टीने २००३ मध्ये 'आदर्श नमुण्याच्या समित्या' निर्मितीसाठी कायदा केला आहे. त्यानुसार (१) शेतमालाच्या बाजाराची स्पर्धात्मकता वाढविण्यास मदत (२) सध्याच्या नियंत्रीत बाजारातील निर्बंध रद्द केले जातील. (३) बाजार आवारातील सुविधा पुरविण्यासाठी, वाढविण्यासाठी खाजगी गुंतवणूकदारांचे सहाय्य घेणे - शक्य होणार आहे. या २००३ मधील कायद्याची मुख्य वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे -

१) स्थानिक व्यक्ती, शेतकरी व इतरांना कोणत्याही विभागात बाजार समिती व बाजारपेठ उभारणीस परवानगी दिली जाईल.

२) शेतकऱ्यांना, उपभोक्त्यांना प्रत्यक्ष शेतमाल खरेदी विक्रीची नवीन केंद्रे उभारता येतील.

३) शेतकऱ्यांना सध्याच्या नियंत्रीत बाजारपेठेतच माल विकण्याचे बंधन असणार नाही.

४) नियंत्रीत बाजारपेठेवर खाजगी व्यक्ती, संस्था व सरकार यांच्या एकत्रीत व्यवस्थापनाचे नियंत्रण राहील व बाजारपेठेचा विकास घडवून आणला जाईल.

५) नाशवंत शेतमालासाठी (भाजीपाला, फुले, फळे, कांदा इ.) विशेष बाजारांची स्थापना केली जाईल.

६) वायदा बाजार सुरू करून शेतमालाच्या किंमतीतील चढउतार कमी केले जाईल.

७) देशात कंत्राटी शेतीपध्दतीला उत्तेजन दिले जाईल.

८) संगणकीय शेतीची क्षमता प्रत्यक्षात आणता येईल. शेतीत स्पर्धात्मक वाढविण्यासाठी, विज्ञान, तंत्रज्ञान याचा वापर वाढविला जाईल.

वरीलप्रमाणे शेतमाल विक्रीव्यवस्थेतील दोष दूर करण्यासाठी नियंत्रीत बाजारपेठ हा उत्तम मार्ग आहे. त्याची चांगल्याप्रकारे अंमलबजावणी झाली पाहिजे.

**२) शेतमाल प्रतवारी व प्रमाणीकरण :** स्वातंत्र्यपूर्व काळात १९३७ मध्ये शेतमाल प्रतवारी व प्रमाणीकरण [The Agricultural Produce (Grading and Marketing) Act] कायदा केला होता.

त्याची फारशी दखल घेण्यात आली नव्हती. स्वातंत्र्योत्तर काळात याकायद्यानुसार देशातील प्रमुख शहरात शेतमालाची चाचणी घेवून त्याचा दर्जा ठरवून देण्यासाठी प्रयोगशाळा सुरू केल्या आहे. नागपूर या ठिकाणी मध्यवर्ती प्रयोगशाळा सुरू केली आहे व देशभर १८ ठिकाणी शेतमालाची चाचणी घेवून तिची प्रतवारी ठरविण्यासाठी प्रयोगशाळा सुरू झाल्या आहेत. प्रमाणित दर्जेदार शेतमालाच्या वेस्टनावर ॲगमार्क (AGMARK) शिक्का मारायला परवानगी दिली जाते व हा शिक्का मिळाल्याशिवाय शेतमालाची निर्यात करायला परवानगी नाही. वेगवेगळ्या १६२ प्रकारच्या शेतमालाची प्रतवारी प्रयोगशाळेतून करून दिली जाते. शक्यतो शेतमालाच्या उत्पादन क्षेत्रातच तिची तपासणीकरून दर्जा निश्चीतीचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे शेतकऱ्यांना दर्जेदार मालासाठी चांगला दर मिळतो. व्यापाऱ्यांना भेसळीला वाव मिळत नाही. ग्राहकांना उत्तम दर्जेदार माल मिळतो.

**३) प्रमाणित वजनमापे :** शेतमालाची खरेदी विक्री करताना प्रमाणित वजन-मापे वापरली तर उत्पादक व ग्राहकांचा फायदा होईल. मध्यस्थ लुबाडणूक व फसवणूक करण्यासाठी खोटी वजनमापे वापरतात. हे टाळण्यासाठी १९३९ मध्ये कायदा केला होता पण त्याची अंमलबजावणी होत नव्हती. त्यातील त्रुटी दूर करून केंद्र सरकारने १९५८ मध्ये वजनमापाच मेट्रीक परिणामाचा दशमान पध्दतीवर आधारीत वजन-मापाचा कायदा केला. १९६२ पासून त्याचा वापर सक्तिचा केला आहे. द्रवपदार्थ लिटर घनपदार्थ-किलोग्रॅम, लांबी-रूंदी-मीटर परिमाणात सुरू केला आहे. इलेक्ट्रॉनीक पध्दतीचा वापर सुरू केला आहे. ही परिमाणे दरवर्षी तपासून त्याचा वापर करावयाचा आहे. त्यामुळे उत्पादक वा ग्राहक यांची फसवणूक टाळली जाणार आहे.

**४) शेतमाल साठवणुकीच्या सोई :** भारतातील बहुसंख्या शेतकरी अल्पभूधारक, जीराईत शेती असणारे, आर्थिकदृष्ट्या गरीब असणारे आहेत. त्यांना स्वत: राहण्यासाठी पुरेशी घरे नाहीत. त्यामुळे शेतमाल साठवणूकीची सोय त्यांच्याकडे नाही. म्हणून शेतमाल साठवणूकीसाठी सरकारने विविध माध्यमातून प्रयत्न करून शेतमाल साठवणूकीच्या सोई वाढविल्या आहेत. उदा. (अ) राष्ट्रीय पातळीवर केंद्रीय वखार महामंडळ (Central Ware Housing Corporation) व भारतीय अन्न महामंडळ (Food Corporation of India) यांच्या माध्यमातून देशभर अन्नधान्या साठवणूकीसाठी गुदामे बांधण्यात आली आहेत. (ब) राज्य पातळीवर- १६ घटक राज्यात राज्य वखार महामंडळानी गोडावून बांधले आहेत. जिल्हा स्थरावर व तालुका स्थरावरही राज्य वखार महामंडळांनी (State Ware-Housing Corporations) गुदामे बांधली आहेत. सार्वजनीक क्षेत्रातील वखार महामंडळानी सुमारे ३५ दशलक्ष टन अन्नधान्य साठवून ठेवण्याची क्षमता निर्माण केली आहे. (क) सहकारी संस्थांची गुदामे - विविध कार्यकारी सहकारी संस्था, पतसंस्था, राष्ट्रीय सहकार विकास मंडळ, शेतमाल खरेदी विक्री सहकारी संस्था यांनीही आपापल्या कार्यक्षेत्रात शेतमाल साठवणूकीसाठी गोडावून बांधली आहेत. सहकारी संस्थांच्या गोडावूनमधून शेतमालाची कमी खर्चात योग्य साठवणूक केली जाते व त्या साठवणूकीवर शेतकऱ्याला वित्तीय संस्थेकडून कर्जही मिळण्याची सोय होते. त्यामुळे शेतकऱ्यांचा व संस्थाचा फायदा होतो. सहकारी संस्थांच्या माध्यमातून सुमारे १४ दशलक्ष टन अन्नधान्य साठवणूकीची क्षमता निर्माण झाली आहे. (ड)खाजगी गुदामे - शेतकऱ्यांना, प्रक्रिया संस्थांना, खाजगी संस्थांनी देखील शेतमाल साठवणूकीसाठी गोडावून बांधली आहेत. तेथे ८.२ दशलक्ष टन साठवणूक क्षमता उपलब्ध आहे. (इ) बँका - राष्ट्रीयीकृत बँकांनी देखील शेतकऱ्यांच्यासाठी शेतमाल साठवणूकीची सोय केली आहे. त्याच्या तारणावर त्यांना कर्जेही मिळतात. (फ) कोल्ड स्टोअरेज - नाशवंत शेतमाल साठविण्यासाठी शितगृहे बांधली आहेत. २००६ पर्यंत ३८८६ कोल्ड स्टोअर्स बांधले होते व १५० बांधली जात होती.

साठवणूक क्षमता वाढविली जात असल्याने त्याचा फायदा शेतकरी, उपभोक्ते, सरकार, उत्पादनसंस्था यानांही होत आहे. अती उत्पादनाच्या काळात शेतमाल खरेदीकरून तो गोडावूनमध्ये साठवून ठेवला जातो व टंचाईच्याकाळात सार्वजनीक वितरण व्यवस्थेमार्फत योग्य ठिकाणी योग्य किंमतीत शेतमाल वितरीत केला जातो.

**५) शेतमालाच्या बाजारपेठेची माहिती प्रसिध्द करणे :** ठिकठिकाणी नियंत्रीत बाजारपेठा स्थापन केल्या आहेत. त्य ाबाजारपेठेतील आवक, विक्री, दर इ. बदलची माहिती संबंधीत बाजार समितीने प्रसिध्द केली पाहिजे असे बंधन आहे. ही माहिती वर्तमानपत्रे, आकाशवाणी, दूरदर्शन यावरून प्रसिध्द केली जाते. सरकारकडूनही शेतमालाच्या संदर्भात बाजार सर्व्हेक्षण केले जाते. त्याचीही माहिती प्रसिध्द केली जाते. ही माहिती शेतकऱ्यांनाही उपयुक्त ठरते. कोणत्या बाजारपेठेत कोणत्या शेतमालाला दर आहे. मागणी किती व पुरवठा किती आहे हे लक्षात घेवून धोरण ठरविण्यासाठी त्याचा उपयोग होतो. मध्यस्थांकडून होणारी पिळवणूक थांबविण्यास याचा उपयोग होतो.

**६) शेतमाल विपणन व तपासणी मंत्रालय :** केंद्र सरकारणे हे मंत्रालय सुरू केले आहे. या मंत्रालयाचे मुख्य कार्य शेतमालाच्या खरेदी विक्री प्रक्रियेतील अडथळे दूर करणे व देशभरातील शेतमाल खरेदी-विक्री कार्यात सुलभता व सुसंगती निर्माण करणे. त्यादृष्टीने हे मंत्रालय पुढील कार्ये करत आहे - (अ) केंद्र व राज्य सरकारांना शेतमाल विक्री व्यवस्थेत सुधारणा करण्यास मदत करणे. (ब) शेतमालाची प्रतवारी करून शेतमालाचा दर्जा सुधारणेस मदत करणे. (क) शेतमालाची विक्री केल्या जाणाऱ्या बाजारपेठा व तेथील शेतमाल विक्री व्यवस्था यावर नियंत्रण ठेवणे (ड) देशातील नियंत्रीत बाजारपेठा व शेतमाल विक्री व्यवस्था यासंदर्भात संबंधीताना विक्री व्यवस्थेसंबंधी प्रशिक्षण देणे (इ) शेतमाल वस्तूच्या बाजारपेठांचा विस्तार घडवून आणण्यास मदत करणे (फ) देशातील शेतमाल विक्री संबंधी संशोधन करणे, सर्व्हेक्षण करणे, नियोजन करणे व त्याची अंमलबजावणी करणे (ह) शेतमाल निर्यातीचा दर्जा ठरविणे.

सदर मंत्रालयाने शेती उत्पादनापैकी ४० उत्पादनांचा दर्जा ठरविला आहे व दर्जाप्राप्त वस्तूंची विक्री करताना त्यावस्तूच्या वेस्टनावर AGMARK हा शिक्का मारायला परवानगी देते. कापूस, खाद्या तेल, तूप, दुधाची क्रिम, अंडी, तांदूळ, गहू, आटा, गुळ, बटाटा वगैरे सारख्या वस्तूंचा दर्जा निश्चित केला आहे. नागपूर येथील दर्जा नियंत्रण केंद्र व अन्य १८ केंद्राची मदत घेतली जाते.

**७) राष्ट्रीय कृषी उत्पादन विक्री संस्था (National Institute of Agricultural Marketing**) ही केंद्र सरकारने स्थापन केलेली संस्था असून देशातील शेतमालाच्या बाजारपेठांचा विकास घडून यावा यासाठी प्रयत्न करणारी संस्था आहे. ती पुढील कार्ये करत आहे. (अ) शेतमाल खरेदी-विक्री संदर्भात प्रशिक्षण देणे, संशोधन करणे व सल्ला देण्याची व्यवस्था करणे, (ब) शेतमाल खरेदी-विक्री व्यवस्थेत सहभागी झालेल्या कर्मचाऱ्यांना उपयुक्त ठरेल असे प्रशिक्षण कोर्सेस सुरू करणे, त्याचे व्यवस्थापन करणे (क) शेतमाल खरेदी विक्री व्यवस्थेत उत्तम व्यवस्थापन तंत्र विकशीत करणे (ड) सदर कार्यात गुंतवणूक करणाऱ्या प्रकल्पांना मार्गदर्शन, सल्ला देण्याची व्यवस्था करणे, (इ) शेतमाल विक्री व्यवस्थेविषयी शिक्षण देणाऱ्या योजना प्रसृत करणे.

**८) शेतमाल वस्तू मंडळे व विकास समित्यांची निर्मिती :** भारतामध्ये शेतीतून ज्यां वस्तूंची मोठ्या प्रमाणात निर्मिती होते उदा. चहा, कॉफी, रबर, तंबाखू, नारळ, काथ्या इ. वस्तूसाठी 'शेतमाल वस्तू मंडळे' केंद्र सरकारने स्थापन केली आहेत. प्रत्येक वस्तूसाठी एक मंडळ आहे. सदर मंडळाचे कार्य पुढील प्रमाणे - सदर शेतमाल बाजारपेठेत विक्रीला आल्यावर शेतकऱ्याकडून तो खरेदी करणे, त्यावर प्रक्रिया करणे, त्याचा साठा करून ठेवणे, त्याची ठिकठिकाणी विक्री केंद्रे स्थापून त्याद्वारे विक्री करणे, त्या वस्तूच्या

उपयोगाविषयी संशोधन करणे, त्या वस्तूची लोकांनी खरेदी करावी म्हणून जाहिरात करणे, परदेशात निर्यात करणे, परेदशात विक्री केंद्रे सुरू करणे, तेथे प्रदर्शन भरविणे- निर्यात वाढविणे वगैरे. त्यामुळे विशिष्ठ वस्तूला विस्तृत बाजारपेठ मिळून चांगली किंमत मिळते त्यामुळे शेतकऱ्यांचा फायदा होतो.

**शेतमाल विकास समित्या :** परदेशामधून ज्या भारतीय वस्तूंना मागणी आहे अशा शेतीजन्य वस्तू भारतात तयार व्हाव्यात किंवा परदेशात ज्या शेतीजन्य वस्तूंना मागणी आहे त्या वस्तू भारताच्या कोणत्या विभागात तयार होवू शकतात त्याचा शोध घेवून त्या वस्तूची तेथील शेतकऱ्यांनी निर्मिती करावी यासाठी या समित्या प्रयत्न करत आहेत. उदा. काजू निर्यात प्रोत्साहन मंडळ, ॲग्रिकलचरल ॲण्ड प्रोसेसड फूड एक्स्पोर्ट डेव्हलपमेंट ऑथॉरिटी इ. या संस्थामुळे निर्यातीला चालनामिळते. परदेशात मागणी असणाऱ्या शेतमालाची निर्मिती झाल्याने परकिय चलन मिळते, शेतकऱ्यांचा फायदा होतो.

**९) शेतमालाचा वायदा बाजार :** नजीकच्या भविष्यकाळात कोणत्या दराने शेतमाल खरेदी केला जाईल किंवा विकला जाईल या बद्दलचे आर्थिक व्यवहार सुरू झाल्याने शेतकऱ्यांना विशिष्ठ पिकासाठी विशिष्ठ दर मिळण्याची खात्री वाटते व तो दर आर्थिक दृष्ट्या परवडणारा असेल तर शेतकरी त्याचे उत्पादन घेवू शकतो. साहजिकच त्याशेतमालाचे भविष्यकालीन दर कमी असतील त्याचे उत्पादन टाळता येते. विशिष्ठ दराने शेतमाल खरेदी विक्रीचे वायदे बाजार सुरू झाल्याने किंमत स्थिरता निर्माण व्हायला मदत होते, गुंतवणूकीस संधी मिळते, शेतीतील रोजगार वाढतो. उत्पादन, व्यापार यामध्ये वाढ होण्यास मदत होते. सन १९९७-९८ मध्ये भारत सरकारने कॉफी, कापूस, एरंड तेल, ज्यूट वायदे बाजाराला मान्यात दिली व १९९८-९९ मध्ये तेलबिया व खाद्यातेल यांच्या वायदे बाजारात संम्मती दिली. अलिकडील काळात गुळ, बटाटे, हळद, चहा, कॉफी, तागवस्तू, कागद वायदे बाजारा सुरूझाला आहे.

**१०) सहकारी खरेदी विक्री व्यवस्था :** उत्पादक शेतकऱ्यांनी एकत्र येवून सहकारी शेती संस्था अगर शेतमाल सहकारी खरेदी-विक्री संस्था सुरू केली तर शेतकऱ्यांचे विक्रीतील वैयक्तीक प्रश्न मिटू शकतात व सहकारी विक्रीचे पुढील फायदे मिळू शकतात - (अ) शेतमाल साठविण्याची सोय (ब) विक्रीसाठी स्वत:ची वाहतूक साधने (क) प्रत्यक्ष विक्री केंद्रे सुरू करून ग्राहकाशी संबंध (ड) सरकारी अनुदाने, मदत मिळविणे (इ) कर्जाची सोय (फ) संशोधनाची सोय व त्याचा फयादा (ह) प्रक्रिया करून शेतमाल विकणे वगैरे. जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सहकारी विक्री व्यवस्था स्विकारावी म्हणून सरकार शेतकऱ्यांना मदत करत आहे, प्रोत्साहन देत आहे. शेतकऱ्यांनी सुरू केलेल्या सहकारी संस्था या प्राथमिक संस्था व एकाराज्यातील राज्य सहकारी शेतमाल खरेदी-विक्री संस्था आणि The National Agricultural Co-operative Marketing Federation - NAFED ही देश स्थरावरील संस्था शेतमालाची सहकारी पध्दतीने विक्री वाढविण्याचा प्रयत्न करत आहेत. १९६५ मध्ये स्थापन झालेली National Co-operative Development Corporation ही संस्था शेती उत्पादन साठवणूकीची सोय, प्रक्रिया करणे, व सहकारी पध्दतीने विक्री करणे या साठी कार्य करत आहे. तसेच ती सहकारी पध्दतीने खरेदी विक्री करणाऱ्या संस्थानाही मदत करत आहे. याचा देशातील उत्पादक सहकारी संस्थांना फायदा मिळत आहे.

**११) शेतमालाची किमान किंमत/आधारभूत किंमत ठरविणे व शेतमालाची खरेदी करणे :** शेती व्यवसाय हा नैसर्गिक घटकांच्या अनुकूलतेवर अवलंबून आहे. अपुरा पाऊस, अती पाऊस, पीकावरील रोगराई, किड, हवामानातील बदल, यामुळे शेती खर्च वाढतो पण उत्पादन कमी येते. त्यामुळे शेतमालाच्या किंमती स्थिर राहिल्या, घटल्यातर शेतकऱ्यांचा तोटा होतो. शेतमालाला किमान किंमत निश्चित केली व बाजारात शेतमालाची किंमत घटली तरी किमान किंमतीला सहकार शेतमाल खरेदी करण्याचे शेतकऱ्यांना आश्वासन देते, कांही वेळा किमान किंमतीपेक्षा थोडी जादा किंमत ठरवून त्या हिंमतीला शेतमाल विकत

घेण्याचे सरकार ठरविते त्याला आधारभूत किंमत असे म्हणतात. त्या किंमतीमुळे शेतकऱ्यांना थोडाफार फयादा मिळतो. भारत सरकारने नेमलेल्या शेतमाल उत्पादनखर्च व किंमत आयोगाकडून Commission for Agricultural Cost and Prices = CACP दरवर्षी विविध शेतमालाच्या किमान किंती व आधारभूत किंमती जाहीर केल्या जातात त्याचा शेतकऱ्यांना फायदा होत आहे.

**१२) शेतमाल निर्यातीस प्रोत्साहन :** ज्या भारतीय शेतमालाला, शेतीजन्य वस्तूला परदेशात मागणी आहे त्याची निर्यात व्हावी, निर्यात शेतमालाला जास्तीत जास्त दर मिळावा, भारतीय वस्तूंची परदेशात प्रदर्शन भरवून व विक्री केंद्रे स्थापून, तीची जाहीरात करून निर्यात वाढविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. जागतिक बाजार पेठेची सतत माहिती घेवून ती भारतीय शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. त्यासाठी निर्यात प्रोत्साहन मंडळ, विविध वस्तू मंडळे, विकास समित्या, भारतीय अन्न धान्य मंडळ, भारतीय दूतावास, राष्ट्रीयीकृत बँकांच्या विदेशातील शाखा प्रयत्नशील आहेत. त्यामुळे शेतमालाची निर्यात वाढत आहे. भारताच्या एकूण निर्यातीस शेतमालाच्या निर्यातीचा हिस्सा १५% ते १८% इतका आहे.

**१३) ग्रामीणभागात मूलभूत सुविधांची निर्मिती :** वाहतुक व दळणवळणाच्या सोई, संपर्क, साधनामध्ये वाढ, शिक्षण, आरोग्य सोई, विज व पाणी पुरवठा, विविध सेवांची उपलब्धता या सर्वप्रकारच्या विकासाला पोषक व पुरक बाबी आहेत. या सुविधा वाढविल्या जात असल्याने शेतमाल विक्री व्यवस्थेत सुधारणा होण्यास, शेतकऱ्यांना फायदेशीर होण्यास मदत होत आहे.

**१४) शेतकऱ्यांच्या संघटना :** भारतातील शेतकरी वर्ग असंघटीत होता व आजही कांही प्रमाणात तो विखुरलेला आहे. राजकिय पक्ष आपल्या हितासाठी शेतकऱ्यांच्या संघटना स्थापन करतात पण स्वेच्छेने शेतकऱ्यांनी, आपल्या हितरक्षणासाठी स्वत: संघटीत झाले पाहिजे. सुदैवाने कांही व्यक्तिच्या प्रयत्नामुळे अशा संघटना निर्माण होत आहेत त्यामुळे त्यांची सौदाशक्ती वाढत आहे. ऊस, कापूस, दूध इत्यादीसाठी शेतकरी संघटना दर वाढवून घेण्यात कांही अंशी यशस्वी होत आहेत. शेतकरी संघटनामध्ये समन्वय व सहकार्य हवे व व्यापकहित लक्षात घेवून त्यांच्या संघटना निर्माण व्हायला हव्यात.

वरील विविध उपाययोजनेमुळे स्वातंत्र्योत्तरच्या ५०/६० वर्षाच्या कालखंडात बराच अनुकूल परिणाम दिसून येवू लागला आहे. अनेक शेतकऱ्यांना वरील योजनेचा परिणाम म्हणून योग्य किंमतीला विकण्याची संधी मिळत आहे. तरिही कांही हंगामात विशिष्ठ शेतमालाचे उत्पादन वाढून, नाशवंत शेत मालाच्या किंमती घटतात व शेतकऱ्यांचे कंबरडे मोडते. शेतकरी कर्जबाजारी होतो. दुष्काळ, जिराईत शेती, अज्ञानीपणा, कुटुंबातील अपत्यांची संख्या जास्त, व्यसनाधिनता, सावकारी कर्ज यामुळे शेतकरी कर्जबाजारी होतो, निराश होतो व आत्महत्या करण्याकडे वळतो. २००७-०८ मध्ये महाराश्ट्रात शेतकरी आत्महत्तेचे प्रमाण चिंता करण्या इतके वाढले. शेतमालाला योग्य दर मिळाला, औद्योगिक उत्पादन व शेती उत्पादनाच्या किंमतीच्या निर्देशांक किती असावा व त्यातील व्यापारशर्ती कशा असाव्यात याबद्दल विचार होवून एक राष्ट्रीय धोरण ठरविले तर त्याचाही शेतकऱ्यांना फायदा मिळेल.

## २.५ शेतमाल किंमत धोरण

### २.५.१ प्रस्तावना:

अर्थशास्त्रीय नियमानुसार विशिष्ट वस्तूची किंमत तिचा पुरवठा व तिची मागणी यांच्या समतोलानुसार ठरते व त्याला बाजार पेठेतील किंमत असे म्हणतात वस्तूची बाजारपेठेतील किंमत ही उत्पादक व ग्राहक यांना स्पर्धेच्या परिस्थितीत मान्य करावी लागते. शेतमालाची किंमत देखील याच पद्धतीने ठरली पाहिजे असा

युक्तिवाद मांडला जातो याच पद्धतीने शेतमालाची किंमत ठरली तर शेतकऱ्यांच्या हिताची आहे का? शेतीव्यवसायाच्या विकासाच्या दृष्टीने योग्य आह का ? अर्थव्यवस्थेच्या समतोल विकासाच्या दृष्टीने योग्य आहे का? याचा विचार करावा लागेल. स्वातंत्र्यपूर्व काळात शेती व्यवसायाचा विकास का होवू शकला नाही, याचे कारण शेतमालाची बाजारपेठेत ठरणारी किंमत बहुसंख्य शेतकऱ्यांच्या दृष्टीने हितावह नव्हती. स्वातंत्र्योत्तर काळात सरकारने हस्तक्षेप करून शेतमालाची किंमत किती असावी व व भविष्यकाळात शेतमालाचा किंमती कशा ठरतील याविषयी वेळोवेळी आपले धोरण जाहीर केले आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेत किंमत ठरविण्याच्या प्रक्रियेत हस्तक्षेप करून सरकारने शेतमालाच्या किंमती किती असाव्यात हे ठरवून विशिष्ट मर्यादेपेक्षा किंमत कमी होवू नये व विशिष्ट मर्यादेपेक्षा किंमत वाढू नये यासाठी जे उपाय योजते त्याला शेतमालाचे किंमत धोरण असे म्हणतात.अर्थात शेतमालाच्या किंमती विषयीचे धोरण व सर्वसाधारण किंमत धोरण यात संबंध आहे. म्हणजेच राष्ट्रातील सर्वसाधारण किंमत धोरणानुसारच शेतमालाच्या किंमतीचे धोरण ठरवावे लागते.

**२.५.२ शेतमालाच्या किंमतीविषयक धोरणाची गरज / आवश्यकता / किंवा महत्त्व.**

**१) भारतातील शेती व्यवसाय हा मान्सुनच्या पावसावरील जुगार आहे :** ७२% शेतजमीन जिराईत आहे, पावसावर अवलंबून आहे. पण मान्सून बेभरवश्याचा त्यामुळे त्या शेतीतील उत्पादन देखिल अनिश्चित शेतकऱ्यांने कष्ट करावयाचे, खर्चकरावयाचा पण अपुरा पाऊसकिंवा अतीपाऊस, अनियमित पाऊस यामुळे त्याचे उत्पादन कमी होणार व त्यामुळे योग्य किंमत मिळाली नाही तर त्याला शेती व्यवसाय करणे शक्य होणार नाही. म्हणून शेतमालाची किंमत किती असावी हे सरकारने ठरविले पाहिजे.

**२) शेतीचा विकास होण्यासाठी:** शेती व्यवसाय हा भारतीय अर्थ व्यवस्थेचा कण आहे. राष्ट्रीय उत्पन्नाचा शेती क्षेत्रातून २२% उत्पन्न हिस्सा मिळतो. एकूण श्रमींकापैकी शेतीक्षेत्रात ६० % श्रमीक रोजगार शोधतात. अनेक दृष्टीने शेतीक्षेत्र हे अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्राला सहाय्यभूत म्हणून कार्य करत आहे.म्हणून कार्य करत आहे. देशातील सर्व लोकसंख्येचे शेतीक्षेत्रानेच पोषण करायला हवे. या साठी भारतीय शेती व्यवसायाचा विकास झाला पाहिजे. पण शेती उत्पादनाची किंमत उत्पादनखर्चावर आधारित हवी, नफा मिळवून देणारी हवी तरच शेतीत गुंतवणूक होईल गुंतवणूक वाढलीतरच शेतीचा विकास होईल.यादृष्टीने शेतमालाची किंमत किंती असावी हे ठरवावे लागते.

**३) देशातील किंमत पातळीच्या स्थैर्यासाठी:** देशातील वस्तू निर्मितीमध्ये शेती क्षेत्राचा हिस्सा मोठा आहे. सुमारे ६०% वस्तु या शेती उत्पादक वा शेतीजन्य स्वरूपाच्या आहेत त्यांच्या किंमतीतील बदलामुळे सर्वसाधारण किंमत पातळीत बदल घडून येतो. जर शेतमालाच्या किंमत स्थिर राहतील असे धोरण स्विकारले तर सर्वसाधारण किंमतपातळीही स्थिर राहण्यास मदत होईल. सर्वसाधारण किंमत पातळी ठरविताना शेतमालाच्या वस्तुना १५% भार दिला जातो.

**४) राहणीमानाचा निर्देशांक स्थिर ठेवण्यासाठी :** कामगार वर्गाचे राहणीमान टिकवून ठेवण्यासाठी राहणीमानाचा निर्देशांक विशिष्ट अंकानी वाढला तर त्यांना महागाई भत्ता वाढवून दिला जातो. अर्थव्यवस्थेत कामगार वर्ग संख्येने मोठा असतो व इतरांशी तुलना करता त्या वर्गाचे उत्पन्नही कमी असते. त्यांना आपल्या उत्पन्नाचा मोठा हिस्सा अन्यधान्य, भाजीपाली, दुध, फळे यासाठी खर्च करावा लागतो. शेतमालाची टंचाई झाली तर त्याच्या किंमतीवाढून कामगारांच्या राहणीमानाचा निर्देशांक वाढतो व वेतनवाढ करावी लागते. वेतनवाढीमुळे औद्योगिक उत्पादन खर्च वाढतो. जर शेतमालाच्या किंमती विशिष्ठ पातळीला स्थिर ठेवल्यातर शेती विकास व औद्योगिक विकास होण्यास अनुकूल परिस्थिती निर्माण होईल त्यादृष्टीने शेतमालाच्या किंमती बाबत विशिष्ट धोरण स्विकारावे लागते.

५) **शेतकऱ्यांना उत्पादनाला योग्य किंमत मिळवून देण्यासाठीः** भारतातील शेती व्यवसाय खाजगी स्वरूपाचा आहे. सुमारे ७ कोटी शेतकरी आहेत. त्यापैकी ७५% शेतकऱ्यांची जमीन ५ एकरापेक्षाकमी आकाराची आहे. भारतातील या शेतकऱ्यांना शेतमालाची योग्य किंमत, उत्पादन खर्च भरून निघेल अशी शेतमालाची किंमत मिळायला हवी. शेतमालाला कमी किंमत मिळाली तर कोटयावधी शेतकरी आर्थिकदृष्टया पिचले जातील, कर्जबाजारी होतील, त्यांचे उत्पन्न घटल्याने त्याची औद्योगिक वस्तू खरेदी करण्याची शक्ती कमी होईल. औद्योगिकरणाचा वेग कमी होईल. हे टाळण्यासाठी शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य किंमत मिळवून द्यायला हवी.

६) **शेती उत्पादन वाढवायला प्रेरणा द्यायला हवीः** शेती व्यवसाय आर्थिकदृष्टीकोनातून फायदेशीर ठरावयाचा असेल तर शेतमालाला विक्री किंमत इतकी मिळायला हवी की, जी उत्पादन खर्च भरून निघेल व नफ्याचे प्रमाण पण आकर्षक हवे. म्हणून शेतमालाची किंमत बरोबर किमान उत्पादन खर्च अधिक नफ्याचे विशिष्ट प्रमाण (५% ते १०%) शेती व्यवसायात उत्पादन खर्च वजा जाता थोडाफार नफा मिळतो अशी शेतमालाची किंमत ठरविली तर शेतकरी शेतीत गुंतवणूक करेल, उत्पादन वाढवेल व त्यामुळे देशातील वाढत जाणाऱ्या लोकसंख्येला अन्नधान्याचा पुरवठा होत राहील. अर्थात देशातील सर्वांना अन्नधान्य मिळायला हवे असेल तर शेतीउत्पादन वाढविण्याखेरीज मार्ग नाही. अन्नधान्याच्या बाबतीत देश स्वावलंबी व्हायलाहवा.

७) **विशिष्ट प्रमाणात शेतमालाचे उत्पादन होण्यासाठीः** अन्नधान्य, कडधान्ये, गळताची धान्ये तसेच पैशाची पिके उदा. ऊस, कापूस, ताग, मसाल्याचे पदार्थ इ. मागणी जितकी आहे तितके त्याचे उत्पादन तयार झाले पाहिजे त्यासाठी विविध पिकांच्या किंमती विविध पातळीवर ठरविल्या गेल्या पाहिजेत. एकाद्या पिकाची किंमत वाढली तर तिच्या उत्पादनात जास्त नफा मिळाला तर इतर पिकांचे उत्पादन कमी करून शेतकरी त्या पिकाकडे वळतील म्हणजेच इतर पिकांची टंचाई भासेल. कापसाला जास्त किंमत मिळाली तर ऊसाखालील क्षेत्र घटवून कापसाचे उत्पादन वाढविले जाईल पण ऊसाचे उत्पादन घटल्याने गुळ, साखर निर्मितीवर परीणाम होईल. थोडक्यात शेतीतील विविध पिकांची मागणी व त्यांचा पुरवठा यात मेळ बसण्याच्या दृष्टीकोनातून त्यांच्या किंमती ठरविण्याचे धोरण स्विकारावे लागेल.

८) **शेतीव्यवसायातील भांडवलनिर्मिती वाढविण्यासाठीः** भारतातील शेतीव्यवसायात भांडवली गुंतवणूक कमी असल्याने शेतीचा विकास होवू शकला नाही.शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले तरच ते शेतीव्यवसायात पाणी पुरवठयाची सोय, यांत्रीकिकरण, खतांचा वापर, शेताला ताली व बांध घालणे,शेती अवजारे, औषधे फवारणी यंत्रणा इ. स्वरूपातील गुंतवणूक वाढवतील शेतीक्षेत्रातील भांडवली साठा वाढण्याशिवाय शेतीक्षेत्राचा विकास होणार नाही. व त्यादृष्टीने शेतमालाची विशिष्ट किंमत ठरवावी लागेल.

९) **देश अन्न धान्याच्या बाबतीत स्वावलंबी होण्यासाठीः** स्वातंत्र्यापूर्वीपासून (दुसऱ्या महायुद्ध) देशात अन्नधान्याची टंचाई भासत होती. भारताच्या स्वातंत्र्यावेळी फाळणीमुळे भारतात लोकसंख्या जास्त व अन्नधान्य पिकविणारा प्रदेश कमी वाट्याला आला, अन्नधान्य टंचाई निर्माण झाली. १९८६-६७ नंतरच्या हरित क्रांतीच्या यंशानंतर अन्नधान्य उत्पादन वाढीचा वेग वाढला पण जन्म-मृत्यू दरातील वाढत्या तफावतीमुळे लोकसंख्या वाढीचा वेगही वाढला आहे. देशातील सर्वांना पुरेसे अन्नधान्य उपलब्ध करून देण्यासाठी शेतमालाचे उत्पादन वाढवायला हवे त्यादृष्टीने शेतमालाची किंमत ठरवावी लागेल.

१०) **उत्पन्नातील विषमता कमी करण्यासाठी** : शेतमालाच्या किंमती निश्चित केल्यास प्राथमिकक्षेत्र व बिगरप्राथमिक क्षेत्रातील उत्पन्नातील विषमता कमी होण्यास मदत होईल. देशातील उद्योग व सेवाक्षेत्राचे ग्राहक म्हणजे हे कोटयावधी शेतीक्षेत्रातील लोकच आहेत. त्यांचे उत्पन्न वाढले तर औद्योगिकरणासही गती मिळणार आहे, सेवा क्षेत्राचा विकास होणार आहे. सामान्यपणे अर्थ व्यवस्थेत जेंव्हा सरकारचा हस्तक्षेप

नव्हता त्यावेळी शेतकऱ्यांना प्रतिकूल व्यापारशर्तीला तोंड दयावे लागत होते. औद्योगिक मालाशी तुलना करता शेतमालाचे दर योग्य पातळीत स्थिर रहावेत असे धोरण स्विकारावे लागेल.

वरील विविध कारणामुळे शेतमालाच्या किंमती विषयीचे धोरण कसे असावे हे ठरविण्याची गरज निर्माण होते.

**२.५.३ शेतमालाच्या किंमतीत चढउतार होण्याची कारणेः**

भारतातील शेती व्यवसाय हा विस्तृत क्षेत्रात व व्यापक प्रमाणात पसरला आहे. जगात विविध भागात ज्या प्रकारचे हवामान दिसून येते तसे हवामान भारतातील कोणत्या ना कोणत्यातरी भागात दिसून येते. हवामानातील विविध तेमुळे भारतातील शेतीव्यवसायातून विविध प्रकारची पिके, भाजीपाला, फळे घेतली जातात. शेतमालाची मागणी व त्याचा पुरवठा यामध्ये समानता नसल्याने शेतमालाच्या किंमतीत चढउतार होतात. शेतमालाच्या मागणी व पुरवठयावर पुढील घटक परिणाम करतात.

१) **मान्सूनच्या पावसावरील शेती व्यवसायः** नैऋत्य मोसमी पावसामुळे साधारणपणे जून ते ऑगस्ट दरम्यान पाऊस, पाऊस असेल तेंव्हा शेतीत पिके घेतली जातात. बिगर पावसाचा काळ मोठा. त्यामुळे शेतीउत्पादन घटते.

२) **अनिश्चित मान्सूनः** मान्सूनचा पाऊस देशात सर्वत्र सारखाच पडत नाही. जेथे जास्त पाऊस तेथे पूर, पाऊस कमी पाण टंचाई, दुष्काळ शेती उत्पादनावर परिणाम होतो.

३) **जिराईत शेतीचे प्रमाण जास्तः** स्वातंत्र्यावेळी एकूण लागवडीखाली शेतजमिनीपैकी १० ते १२% क्षेत्र ओलीताखाली व आजही हे प्रमाण देश पातळीवर सुमारे ३९% आहे. म्हणजे सुमारे ६१% लागवडीखालील शेती जिराईत आहे. त्या शेतीमध्ये बिगर मोसमात उत्पादन घेता येत नाही.

४) **ग्रामीण भागातील वाहतुकीच्या गैरसोईः** कच्चे रस्ते, अपुरे रस्ते, पावसाळयात बंद होणारे मार्ग, बैलगाडीतून होणारी शेतमालाची वाहतूक, वाहतूक सोई कमी, वाहतुकीचे दर जास्त इ. अडचणीमुळे शेतकरी आपले उत्पादन बाजारपेठेपर्यंत विशिष्ठ वेळेत पाठवू शकत नाही.

५) **शेतकऱ्याची प्रतीक्षाक्षमता कमीः** शेतमाल तयार झाल्यावर ते विकून कर्ज परत करण्याच्या अटीवर अनेक शेतकरी कर्ज घेतात त्यामुळे सुगीच्या दिवसात मिळेल त्या दरात तो शेतमाल विकतो. शेतमालाचा पुरवठा वाढतो, दर घसरतो. इतर काळात उलटस्थिती निर्माण होवून दर वाढतो.

६) **मध्यस्थांची संख्या जास्तः** शेतमालविक्री व्यवस्थेतील अडथळयामुळे ग्राहकांना ज्या वेळी शेतमाल खरेदी करावयाचा असतो तो त्यावेळी उपलब्ध होवू शकत नाही. म्हणून मध्यस्थ तो पुरवठा जास्त असताना खरेदी करून साठवतात किंवा त्यावर प्रक्रिया करतात किंवा जेथे तो उपलब्ध आहे तेथून तो मिळवतात व मागणी करणाऱ्यांना पुरवितात.

७) **नैसर्गिक घटकांचे प्राबल्यः** वेळी अवेळी पडणारा पाऊस, तपमानातील बदल, किड व रोगराईचाप्रभाव, या घटकामुळे शेतकऱ्याला हमखास उत्पादन निर्माण करता येत नाही. शेतजमीनाच्या गुणभिन्नतेमुळेही उत्पादनात अनिश्चितता निर्माण होते.

८) **अनुकरण प्रवृत्तीः** एखाद्या शेतकऱ्याने एखादेपीक घेवून जास्त उत्पन्न मिळविले तर इतर अनेक शेतकरी त्या प्रकारचे पिक घेतात, मागणी पेक्षापुरवठा जास्त निर्माण होवून किंमत घटते. यावर्षी दर कमी म्हणून विशिष्ठ पिकांचे उत्पादन टाळले जाते. अनेकांची तिच कृती यामुळे उलट परिणाम घडून येतो.

९) **साठेबाजी, सट्टेबाजी** : मोठे शेतकरी, शेतमालाचा व्यापार करणारे मध्यस्थ, ज्या शेतमालाचे उत्पादन कमी आहे अशा शेतमालाची साठेबाजी करतात. कृत्रीम टंचाई निर्माण करतात. त्यांच्या किंमती वाढल्या की मग साठा विक्रीला काढतात. त्यामुळे किंमतीत चढउतार दिसून येतात.

१०) **पैशांच्या पिकांचे उत्पादनः** कापूस, ऊस,हळद, द्राक्षे यासारख्या पिकांच्या उत्पादनामुळे शेतकऱ्यांच्या हातात विक्री केल्याबरोबर पैसे मिळतात म्हणून या पिकांना पैशाची पिके असे म्हणतात.प्रक्रिया संस्थांच्या विकासामुळे नगदी पिकांच्या शेतकऱ्याला फायदा वाटू लागला पण त्या पिकांच्या उत्पादनवाढीबरोबर अन्नधान्याच्या पिकाखालील जमीन घटू लागली. अन्नधान्याची टंचाई भासून त्यांच्या किंमतीत वाढ होते.

**२.५.४ शेतमालाच्या किंमतीतील चढ–उताराचे परिणामः**

शेतमालाच्या किंमती कधी जास्त तर कधी कमी किंवा काही शेतमालाच्या किंमती कमी तर कांही शेतमालाच्या किं मती जास्त अशा स्थितीमुळे पुढील परिणाम घडून येतात.

१) **शेतकऱ्यांचा (उत्पादकांचा) तोटा :** भारतातील सर्वसामान्य शेतकरी हा अल्पभूधारक आहे.त्याला माहित आहे की सुगीच्या दिवसात शेतमाल कमी किंमतीला विकला जातो व इतर कालखंडात त्याला दर मिळतो. पण तो आपला शेतमाल साठवून, प्रक्रिया करून विकू शकत नाही. कारण त्याची धारण क्षमता कमी आहे. सुगीच्या दिवसात विक्रेताअसणारा शेतकरी बिगरसुगीच्या काळात खरेदीदार बनलेला असतो. या विश्लेषणावरून हे लक्षात येईल की शेतमालाच्या चढउताराचा फायदा व्यापारी, मध्यस्थ घेतात पण शेतकऱ्याची आर्थिक स्थिती खालावते.

२) **शेतीतील गुंतवणुकीवर प्रतिकूल परिणाम** : शेती उत्पादनाच्या किंमती कमी झाल्याने शेतकऱ्यांना तोटा सहन करावा लागतो. उदरनिर्वाहापुरतेच उत्पादन घेवून विक्रीसाठी तो उत्पादन कमी करतो. शेतीतील गुंतवणूक कमी करतो. शेतीक्षेत्रातील गुंतवणूक कमी झाल्याने ग्रामीण अर्ध बेकारी, छुपी बेकारी वाढते.

३) **शेतकऱ्यांची उत्पान वाढीची प्रेरणा नष्ट होतेः** खाजगी शेती व्यवसायात उत्पादकाला नफा मिळत नसेल तर तो उत्पादन वाढवू शकत नाही. त्यामुळे १९५० ते १९७० च्या काळात ‘अधिक धान्य पिकवा’ ही मोहीम हवेतच विरून गेली. कारण अन्नधान्याच्या किंमती जास्त असूनही शेती उत्पादनात वाढ होत नव्हती.

४) **देशाच्या आर्थिक विकासावर प्रतिकूल परिणामः** देशाचा आर्थिक विकास होण्यासाठी औद्योगिक व शेती उत्पादना वाढ व्हायला हवी. राष्ट्रीय उत्पादनात शेती क्षेत्राचा हिस्सा मोठा असल्याने शेती उत्पादन वाढल्याखेरीज राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होत नाही. अनिश्चित किंमतीमुळे शेती उत्पादन वाढत नाही; परिणाम देशाच्या आर्थिक विकासावर प्रतिकूल परिणाम होतो.

५) **शेतकऱ्यांमध्ये दैववादी प्रवृत्तीः** ‘नशिबात आहे त्या पेक्षा जास्त मिळणार नाही’ व ‘मिळावयाचे आहे त्याच्या आधी काही मिळणार नाही’ तुमचा नशिबात जे मिळवायचे आहे ते कोणी हिरावून घेणार नाही; ठेविले अनंते तैशेची रहावे अशा पंक्ती खऱ्या आहेत असे शेतकऱ्यांना वाटू लागते कारण शेतमालाचा दर वाढला तरी मध्यस्थांचा फायदा होतो. पण उत्पादक शेतकऱ्यांना काही मिळत नाही. दर कोसळला तर शेतकरी कर्जबाजारी होतो. त्यामुळे श्रम निष्ठेऐवजी इश्वर निष्ठेची प्रवृत्ती वाढीस लागते.

६) **शेतमजुरांची दैन्यावस्थाः** ग्रामीण भागातील लोकसंख्येपैकी २५% लोक भमीहीन शेतमजूर आहेत. शेतीव्यवसायात रोजगार मिळवून त्यांना जीवनजगावे लागते. शेतीव्यवसायातील अनिश्चित

गुंतवणुकीचा जास्त फटका शेतमजुरांना सहन करावा लागतो. शेतमालाचे दर कमी होतात तेंव्हा त्यांची रोजगारी कमी होते, दैन्यावस्थेत वाढ होते.

**७) आर्थिक विषमतेत वाढः** ग्रामीण भागातील मोठे शेतकरी, व्यापारी, शेतमाल खरेदी-विक्रीतील मध्यस्थ यांच्या उत्पन्नात वाढ होते पण शेतकरी, शेतमजूर, ग्राहक यांचा तोटा होतो. एका वर्गाचे उत्पन्न वाढते तर दुसरा वर्ग आर्थिक दृष्ट्या गरीब होतो.

**८) ग्राहकांचे नुकसानः** साधारणपणे जेंव्हा शेतमालाच्या किंमती कमी होतात तो काळ सुगीचा असतो. व हा काळ अल्प असतो. त्यावेळी सर्वसाधारण ग्राहक वर्षभर लागणारे धान्य साठवून ठेवू शकत नाही. पण व्यापारी, अडते, दलाल, मात्र धान्याची साठवण करून ठेवतात. पण बिगर सुगीच्या काळात शेतमालाचा दर वाढतो त्यावेळी, शेतकऱ्यासह इतर लोकदेखील अन्नधान्याचे ग्राहक बनतात त्यांना जादा दराने धान्य विकत घ्यावे लागल्याने तोटा होतो. कामगारवर्गाला जास्त दराने अन्नधान्य खरेदी करावे लागल्याने त्यांच्या अनेक वस्तूंचा उपभोग टाळावा लागतो. राहणीमान खालावते.

**९) राहणीमानाचा निर्देशांकः** शेतमालाच्या किंमतीतील चढउतारामुळे, विशेषतः किंमत वाढीच्या काळात औद्योगिक कामगारांच्या निर्देशांक वाढल्याने त्यांच्या वेतन दरात वाढ करावी लागते. उत्पादनसंस्थांचा उत्पादन खर्च वाढतो, वस्तूंचा किंमती वाढतात किंमतवाढीमुळे पुन्हा वेतन वाढ करावी लागते.

**१०) शेतकऱ्यांच्या दृष्टीने प्रतिकूल व्यापारशर्तीः** शेतमालाच्या किंमती घटल्यातरी औद्योगिक मालाच्या किंमती घटत नाहीत किंवा त्याचप्रमाणात घटत नाहीत. याउलट शेतमालाच्या किंमती वाढल्या तर औद्योगिक उत्पादनाच्या किंमती त्यापेक्षा जास्त प्रमाणात वाढतात यांचा परिणाम असा होतो की शेतमालाच्या किंमतीचा व औद्योगिक उत्पादनाच्या किंमत निर्देशांकातील तफावत वाढत जावून शेतकऱ्यांच्या दृष्टीने प्रतिकूल व्यापारशर्ती निर्माण होतात.

**११) काळाबाजार, स्मगलिंगः** ज्या शेतमालाची किंमत वाढते, टंचाई भासते त्याचा साठा केला जातो. त्याची कृत्रीम टंचाई वाढते. कमी किंमतीला ती वस्तू मिळत नाही पण वाढीव किंमतीला ती विकत मिळू शकते. अवैध व्यवहारांना उत्तेजन मिळते.

### २.५.५ शेतमाल किंमतीचे स्थिरीकरण :

शेतमालाच्या किंमतीत मोठ्या प्रमाणात चढउतार झाल्याने अनेक दुःष्परिणामांना तोंड द्यावे लागते म्हणून शेतमालाच्या किंमती विशिष्ठ पातळीवर स्थिर टिकवून ठेवण्याची गरज निर्माण होते. याचा अर्थ विशिष्ठ शेतमालाची विशिष्ठ किंमत ताढरतेने स्थिर ठेवणे, त्यात थोडाफार ही बदल नाही असा होत नाही. तर शेतकऱ्यांना स्थिर उत्पन्न मिळवून देण्याच्या दृष्टीने किंमतीतील विस्तृत स्वरूपाच्या आणि खंडीत स्वरूपाचे चढउतार शक्य तितके कमी करणे होय.

**भारतीय नियोजन मंडळाची व्याख्या:**

''वैधानिक व प्रशासकीय पद्धतीचा अवलंब करून, शेतकऱ्यांचे नुकसान होणार नाही अशा पद्धतीने शेतमालाच्या किंमती योग्य पातळीवर स्थिर ठेवण्याचे धोरण म्हणजे किंमत स्थिरीकरण होय.''

**अन्नधान्य चौकशी समितीचे व्याख्या :**

''विकसनशील अर्थव्यवस्थेमध्ये शेतमालाच्या किंमतीतील चढउतारामुळे (विषमतेमुळे) अनेक प्रकारच्या अडचणी निर्माण होतात तेंव्हा शेतमालाच्या किंमती विशिष्ठ मर्यादेच्या आत रहाव्यात यासाठीचे धोरण म्हणजे किंमत स्थिरीकरण होय.

### २.५.६ शेतमाल किंमत स्थिरीकरण धोरणाची उद्दिष्टे :

देशातील सरकारकडून विशिष्ट शेतमालाची किंमत ठरवित असताना पुढील उद्दिष्टे स्विकारली जातात.

**अ) शेतकऱ्यांना प्रेरणा देणे :**

उत्पादकाला उत्पादन खर्चावर आधारित किंमत मिळाली तर त्याला सर्वसाधारण नफा मिळेल व विशिष्ठ उद्योग सोडून उत्पादक जाण्यास तयार होणार नाही. पण नवीन उद्योजकही उद्योगात प्रवेश करणार नाही.सर्वसाधारण नफ्या पेक्षा जास्त नफा मिळत असेलतर उत्पादन निर्मितीला प्रेरणा मिळेल. अस्तित्वातील उत्पादनसंस्था आपला विस्तार करतील नव्या उत्पानसंस्थांचा उद्योगात प्रवेश होईल. याप्रमाणे शेतकऱ्याला किमान उत्पानखर्च भरून निघेल अशा किंमतीपेक्षा जास्त नफा मिळेल अशी शेतमालाची किंमत ठरविली तर त्याला शेती व्यवसायातून नफा मिळेल. शेती उत्पादन वाढवायला प्रेरणा मिळेल.

**ब) उपभोक्त्यांना व खरेदीदारांना लाभ :**

शेतमालाची खरेदी करणारे ग्राहक म्हणजे उपभोक्ते आहेत. कामगारांची संख्या ही इतर उत्पादक घटकापेक्षा जास्त असते. कामगारांना अन्नधान्य, भाजीपाला, फळे इ. विकत घेता येणे शक्य व्हावे या दृष्टीने शेतमालाच्या किंमती या जास्त पातळीला ठेवून चालणार नाही. शेतमालाच्या किंमती जास्त असतील तर राहणीमानाचा खर्च वाढवून कामगारांच्या वेतनात वाढ करावी लागेल.

शेतीतील उत्पादन कच्चा माल म्हणून प्रक्रिया उत्पादसंस्था वापरतात. उदा. सूतगिरण्या, कापडगिरण्या कापसाची, साखर कारखाने ऊसाची, ताग गिरण्या कच्च्या तागाची खरेदी करतात. कच्या मालासाठी जास्त किंमत मोजावी लागली तर त्यांचा उत्पादन खर्च वाढेल व पर्यायाने पक्या मालाची किंमत वाढेल. म्हणून शेतमालाची किंमत ठरविताना खरेदीदारांची गैरसोय होवू नये याकडे लक्ष दिले पाहिजे.

**क) मागणी–पुरवठा समतोल :**

शेतीतून असंख्य पिकांचे उत्पादन केले जाते. विशिष्ठ पिकांच्या किंमतीची पातळी ठरविताना ज्या पातळीला त्या पिकाची मागणी व त्याचा पुरवठा यात समानता निर्माण व्हावी. म्हणजे किंमतीद्वारे गरजेनुसार शेती उत्पादन तयार केले जाईल.

### २.५.७ शेतमालाची किंमत निश्चितीसाठीची उपाय योजना किंवा भारतातील शेतमाल किंमत धोरणाची वैशिष्ट्ये :

विविध शेतमालाच्या किंमती विशिष्ठ पातळीपेक्षा कमी होवू नयेत किंवा वाढू नयेत यासाठी सरकारने योजलेले उपाय पुढील प्रमाणेः

**१) शेतमालाची किमान आधारभूत किंमत ठरविणेः (Minimum Support Price)** विशिष्ठ शेतमालाची अशी किंमत ठरविली जाते की ज्या किंमतीमुळे शेतकऱ्याला शेती कसण्यासाठी किमान जो खर्च येतो तो भरून निघेलच शिवाय थोडा फार नफाही मिळू शकेल.याचा अर्थ विशिष्ठ पिकाच्या किमान किंमतीपेक्षा, किमान आधारभूत किंमत ही जास्त असते. शेतकऱ्याला शेती उत्पादन करायला प्रेरणा मिळेल अशी आधारभूत किंमत असते. सरकारकडून विशिष्ठ पिकासाठी किती आधारभूत किंमत असेल हे जाहिर केले जाते व त्यावर्षी बाजारपेठेत तो शेतमाल कितीही प्रमाणात आला तर त्या किंमतीला तो शेतमाल सरकारकडून खरेदी केला जातो. त्यामुळे बाजारपेठेत किमान आधारभूत किंमतीपेक्षा दर कमी होणार नाही याची जणू सरकार खात्री देते. त्यामुळे त्या दराला उत्पादन विकणे ज्यांना शक्य आहे असे शेतकरी त्या पिकाचे उत्पादन घेतात.

भारतसरकारने १९६५ मध्ये शेतमाल किंमत आयोग स्थापन केला व त्या आयोगाकडून विशिष्ठ शेती उत्पादनाची किमान आधारभूत किंमत जाहीर केली जाते.१९८५ मध्ये या आयोगाचे नामांतर झाले व त्याला Commission For Agricultural Costs and Price शेती उत्पादनखर्च व किंमत आयोग असे संबोधले जाते. हा आयोग दरवर्षी विविध घटक राज्यातील विविध पिकासाठी किमान आधारभूत किंमीत जाहीर करतो.ही किंमत ठरविताना संबंधीत शेतमालाची बाजारपेठेतील किंमत, स्पर्धात्मक पिकाची किंमत व उत्पादनाचा खर्च याचा विचार केला जातो. गहू, तांदूळ,ज्वारी, बाजरी, मका, ऊस, कापूस, ताग, तंबाखू इ. अनेक पिकांची किमान आधारभूत किंमत जाहीर केली जाते. राज्यसरकार त्या किंमतीत बाजारपेठेत शेतकऱ्यांनी शेतमाल विकायला आणला तर खरेदी करण्याची व्यवस्था करते व त्याचा साठा करून ठेवते.

खुल्या बाजारातील शेतमालाच्या किंमती किमान आधारभूत किंमतीपेक्षा कमी होणार नसल्याने शेतकऱ्यांचा तोटा होणार नाही याची त्यांना खात्री वाटते व शेतकरी शेती कसायला तयार होतात. पण शेतकरी शेतीव्यवसायात आधुनिक साधने वापरतील, सुधारित पद्धत स्विकारतील व शेतीतील गुंतवणूक वाढवतील याची खात्री नाही.

**२) अन्नधान्याचे नियंत्रित व अल्प किंमतीत वाटप** : कमी उत्पन्न गटातील लोकांना कमी दरात अन्नधान्य उपलब्ध करून देवून त्यांनाही गरजे इतके अन्नसेवन करता यावे यादृष्टीने दुसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून 'सार्वजनिक वितरण व्यवस्था' सरकारने सुरू केली आहे. देशभरामध्ये २००६ पर्यंत सुमारे ४.६२ लक्ष स्वस्त धान्य दुकानातून कमी उत्पन्न गटातील लोकांना बाजारभावापेक्षा कमी दरात गहू, तांदूळ, खाद्यतेल, साखर या वस्तू उपलब्ध करून दिल्या जात आहेत. त्यामुळे गरीबांनाही अन्नधान्य विकत घेता येते.

१९९७ पासून सरकारने विशिष्ठ उत्पन्नापेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या लोकानांच या वितरण व्यवस्थेतून स्वस्तदराचे अन्नधान्य वाटपसुरू केले आहे त्याला New Targeted Public Distribution System (TPDS) असे म्हणतात.थोडक्यात ज्यांना खुल्या बाजारातील जास्त दराचे अन्नधान्य विकत घेणे शक्यनाही त्यांना कमी किंमतीमध्ये विशिष्ठ अन्नधान्य पुरवून त्यांचे जीवन जगने सरकाने सुसह्य केले आहे.

**३) अन्नधान्याचा शिल्लकी साठा** : शेतमालाच्या किंमतीतील चढउतार कमी करण्याचा उत्तम मार्ग म्हणजे अन्नधान्याचा शिल्लकी साठा होय. जेंव्हा अन्नधान्य विपूल प्रमाणात (सुगीच्या दिवसात)उपलब्ध असते तेंव्हा त्याचा दर कमी असतो त्यावेळी सरकारमार्फत भारतीय अन्न महामंडळ, अन्नधान्याची खरेदी करते व गोडावूनमध्ये सुरक्षीत साठवून ठेवते. स्वस्त धान्य दूकानातून ते उपलब्ध करून दिले जाते. अन्नधान्याच्या किंमती खुल्या बाजारात वाढू लागल्या तर अन्नधान्य महामंडळ अल्प किंमतीत अन्नधान्य पुरवठा वाढविते त्यामुळे अन्नधान्याच्या किंमतीत वाढ होत नाही. सरकारने २००६ पर्यंत ३५ द.लक्ष टन अन्नधान्य ठेवण्याची क्षमता निर्माण केली आहे.अन्नधान्याचे दर कमी असताना त्याची खरेदी करणे व अन्नधान्याचे दर वाढतात त्यावेळी शिल्लक साठ्याची विक्री करण्याच्या धोरणामुळे किंमतीतील चढउतार कमी झाला आहे.

**४) राज्य व्यापार महामंडळ : (State Trading Corporation)** सरकारने सार्वजनीक क्षेत्रात शेतमालाची बाजारपेठेतून खरेदी करण्यासाठी व विक्री करण्यासाठी राज्य व्यापार महामंडळ नियुक्त केले आहे. देशातील वा परदेशातील विविध बाजारपेठेतून शेतमालाची खरेदी करणे व खुल्या बाजारात शेतमालाचे दर वाढू लागले तर साठे विक्रीला काढणे व दर वाढीवर नियंत्रण ठेवणे, एका राज्यातून/ विभागातून दुसऱ्या राज्यात/ विभागात अन्नधान्य, शेतमाल यांची खरेदी विक्री करणे, स्वस्त धान्य दूकानातून विक्रीसाठी

अन्नधान्य उपलब्ध करून देणे, भारतीय शेतमालाची परदेशात विक्री करणे, गरज असेल तर परदेशातून शेतमाल खरेदी करून तो भारतात उपलब्ध करून देणे इ. कार्ये हे महामंडळ करते.

५) **परदेशातून अन्नधान्य व इतर शेतमाल खरेदीकरून देशातील बाजारपेठेत विक्री करणे**: ज्या वेळी देशातील बाजारपेठेत अन्नधान्य व इतर शेतमालाची (उदा.कापूस, ताग, इ.)टंचाई भासते त्या वेळी परदेशातील बाजारपेठेत (जेथे दर कमी असेल) खरेदी करून तो भारतातील विक्रीसाठी उपलब्ध करून दिला जातो. उदा. अमेरिके बरोबर करार करून तेथून PL ४८० नुसार अन्नधान्याची खरेदी करून ते भारतामध्ये उपलब्ध करून देण्यात आले. १९९५ नंतरच्या काळात देशांतर्गत शेती उत्पादन वाढल्याने अन्नधान्याच्या आयातीची गरज भासत नाही.

६) **योग्य प्रशासकीय किंमतीची निश्चिती: भारतसरकार विशिष्ठ कालखंडासाठी विशिष्ठ प्रदेशातील शेतमालाची प्रशासकीय किंमत (Appropriate Administred Price)** जाहीर करते की ज्या किंमतीला त्याकालखंडामध्ये, त्या प्रदेशामध्ये, सरकार वा सरकारी यंत्रणा त्या किंमतीला त्या शेतमालाची खरेदी वा विक्री करतात. ही किंमत जाहीर करताना -अ) कृषीआधारित उद्योगांची कच्यामालाची गरज, ब) उपभोक्त्यांची खरेदीशक्ती, क) आंतरराष्ट्रीय स्थरावरील किंमती, ड) विशिष्ठ पिकाच्या उत्पादनासाठी शेती क्षेत्रात केल्या जाणाऱ्या सुधारणा, इ) विशिष्ठ ठिकाणच्या उपलब्ध नैसर्गिक साधनांचा पर्याप्त वापर व्हावा, फ) संबंधीत उत्पादनाच्या उत्पादन खर्चाचा व उत्पादनातील जोखिम यांचा इ. विचार केला जातो.

केंद्रसरकारने स्थापन केलेल्या शेतमाल खर्च व किंमत आयोगाकडून शेतमालासाठी प्रशासकीय किंमत जाहिर केली जाते. त्या किंमती शिवाय याचा आयोगाकडून पुढील प्रकारच्या किंमती जाहिर केल्या जातात.

**अ) कायदेशीर किमान आधारभूत किंमत : (Statutory Minimum Support Price)** कांही महत्त्वाच्या शेतीतील उत्पादनसंदर्भात उदा.ऊस, कापूस,कच्चा ताग इ. सरकार कायदेशीर किंमत जाहीर करते. त्या किंमतीपेक्षा कमी किंमतीला प्रक्रिया संस्था अथवा खरेदी संस्थांनी; शेतमालाची खरेदी केली तर त्याविरूद्ध शेतकरी न्यायसंस्थेकडे दाद मागू शकतो.

**ब) अधिप्राप्ती किंमत (Procurement Price)** सरकार ज्या किंमतीला विशिष्ठ प्रकारचा शेतमाल खरेदी करते त्याला अधिप्राप्ती किंमत असे म्हणतात.ही खरेदी सरकारच्या वतीने अन्नधान्य महामंडळ, राज्य व्यापार महामंडळ यांच्या कडून केली जाते. अधिप्राप्ती किंमतही किमान आधारभूत किंमतीपेक्षा जास्त पण कदाचित बाजारभावापेक्षा कमी असते.

**क) वाटप किंमत (Issue Price)** कमी उत्पन्न गटातील लोकांना, शेतमालाच्या वाढत्या किंमतीची झळ पोहचू नये, त्यांचे राहणीमान खालावू नये यासाठी स्वस्त धान्य दुकानातून करून देते त्या किंमतीला वाटप किंमत असे म्हणतात.

७) **शेतमाल साठविण्यसाठी गोडावूनची सोय**: योग्य दर मिळेपर्यंत शेतमाल साठवूण ठेवण्याची सोय शेतकऱ्यांना उपलब्ध व्हावी म्हणून सरकारने देशातील शेतमाल साठवणूकीच्या सोई वाढविल्या आहेत. खाजगी गुदामे बांधणे, सहकारी संस्थामार्फत गुदामे, बँकांकडून गुदामे बांधणे, राज्य व केंद्रीय वखार महामंडळ इ. कडून गुदामे बांधली आहेत. साठवणूक सोय व तेथील शेतमालाच्या तारणावर कर्जाची सोय यामुळे शेतमालाचा दर कमी असताना तेथे माल साठवून ठेवणे व दर वाढू लागल्यावर त्याची विक्री करणे यामुळे किंमतीत चढ-उतार कमी होण्यास मदत झाली आहे.

८) **नियंत्रीत बाजारपेठा**: शेतमाल विक्रीव्यवस्थेतील दोष दूर करण्यसाठी योजण्यात आलेल्या या उपायामुळे उपभोक्त शेतमालाला जी किंमत देवू करेल ती उत्पादक शेतकऱ्याला मिळणार आहे.त्यामुळे

किंमत वाढत असेल तर उत्पादकाला उत्पादन वाढीची प्रेरणा मिळून पुरवठा वाढेल त्यामुळे मागणी पुरवठयाचा मेळ बसून किंमतीतील चढउतार कमी होण्यास मदत होते.

९) **विविध महामंडळेः** प्रमुख शेती उत्पादनाच्या खरेदी विक्रीसाठी भारतसरकारने विविध महामंडळे नेमली आहेत उदा. चहा, कॉफी, रबर, तंबाखू, नारळ, काथ्या, कापूस, ताग इ. ही महामंडळे खुल्या बाजारपेठेतून शेतमालाची खरेदी करणे, साठवणूक करणे, इतरत्र वाहतूक करणे, शोरूम्समार्फत विक्री, प्रदर्शनात भाग घेणे, परदेशात विक्री केंद्रे स्थापन करणे वगैरे गोष्टी करतात. त्यामुळे त्या त्या वस्तूंच्या किंमती स्थिर राहण्यास मदत झाली आहे. शिवाय भारतीय अन्नधान्य महामंडळ, राज्य व्यापार महामंडळ यांच्याकडून किंमत स्थैर्यासाठी मदत होते.

**१०) कृषी संशोधन व शेती सेवा विस्तार योजना :** भारतसरकारच्या शेती मंत्रालयाच्या नियंत्रणाखाली शेती संशोधन व शिक्षण खाते काम करत आहे. शेती व्यवसाय, पशुपैदास, मच्छीमारी क्षेत्रात संशोधन करून त्याचा विस्तार करणे की ज्या योगे उत्पादन वाढ घडून यायला मदत होईल. या खात्यामार्फत ४९ मध्यवर्ती संस्था, ५ राष्ट्रीय व्यूरॅक्स ३२ राष्ट्रीय संशोधन केंद्रे, ९ प्रकल्प व्यवस्थापन संस्था, ८० आखिल भारतीय संशोधन संस्था कार्य करत आहेत. खाजगी व्यक्ती व संस्था, सहकारी संस्था यांच्या बरोबरच कृषी विद्यापीठे व कृषी संशोधन व शिक्षण मंत्रालय (Department of Agricultural Research and Education) यांच्या प्रयत्नामुळे शेती संशोधनाची कार्य वाढण्यास मदत झाली. ते कार्य शेतकऱ्यांपर्यंत पोहचून उत्पादन वाढण्यास व पर्यायाने मागणी पुरवठयातील कमी होवून शेतमालाच्या किंमतीत स्थैर्य निर्माण होण्यास मदत झाली आहे.

**धोरणाचे मूल्यमापनः**

भारतामध्ये शेतमालाच्या किंमतीतील चढउतार कमी करण्यासाठी/ शेतमाल किंमत स्थैर्यासाठी वरील प्रकारजे` जे अनेक उपाय योजण्यात आले. त्याचे काही चांगले परिणाम व काही तोटे/ दोष निर्माण झाल्याचे दिसते.

**अनुकूल परिणामः**

१) **शेती विकासाला मदतः** १९५० ते १९७० पर्यंतच्या काळात शेतमालाच्या किंमतीतील चढउतारापेक्षा १९९५ नंतरच्या काळातील चढउतार खूपच कमी झाले आहेत. शेतमालाला ग्राहकाने दिलेली किंमत उत्पादकाला मिळू लागल्याने शेती उत्पादन वाढीला प्रेरणामिळाली. १९५० मधील अन्नधान्य उत्पादन ५१ द.लक्षटन होते तर २००७-०८ मध्ये २३.७० कोटीटन अन्नधान्य निर्मिती झाली. अर्थात उत्पादन वाढीला अनेक कारणे जबाबदार आहेत.

२) **शेतकऱ्यांचा फायदाः** शेतमालाच्या किंमती विषयी स्विकारण्यात आलेल्या धोरणामुळे असे दिसते की १९६५ नंतरच्या काळात शेतमालाच्या किंमतीत वाढ होण्याची प्रवृत्ती अनुभवास आली.१९६५-६६ ते १९७४-७५ या काळात शेतमालाच्या किंमती ९.५४% वाढल्या, १९८० नंतरच्या काळातही किंमत वाढीची ही प्रवृत्ती सुरूच होती. याचा परिणाम शेतकऱ्यांना उत्पादनासाठी जास्त किंमत मिळाल्याने त्यांचा फायदा झाला. त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत झाली.

३) **शेतमालाच्या विक्रे य वाढाव्यात वाढः** स्वातंत्र्योत्तर काळात शेतमालाच्या किंमतीविषयी जे धोरणस्विकारले त्यामुळे 'उदरनिर्वाहाची शेती पद्धत' बंद होवून शेतकरी शेतीतून विक्रीसाठी उत्पादन तयार करू लागले. शेती व्यवसायात व्यापारी दृष्टीकोन स्विकारण्यात आला. अन्नधान्य, भाजीपाला, फळे, दूध

पैशाची पिके इ. बाबतीत शेतकऱ्यांचा विक्रेय वाढावा वाढला आहे. शेतमालाच्या किंमती वाढल्याने विक्रेय वाढावा वाढण्यास मदत झाली आहे.

४) **शेतमालाच्या किंमतीत वाढः** एखाद्या हंगामातील किंवा वर्षाच्या काळातील शेतमालाच्या किंमतीतील चढउतार कमी झाले पण गेल्या ५० वर्षाच्या काळात शेतमालाच्या किंमतीत वाढ झाली आहे. किंमतवाढीच्या फायदा शेतकऱ्यांना मिळाला पण कमी उत्पन्न गटातील लोकांचा तोटा होवू नये म्हणून सरकारने जे उपाय योजले त्यामुळे उदा.सार्वजनिक वितरण व्यवस्था, कामासाठी धान्य योजना, रोजगार हमी योजनेसाठी धान्य इ.) त्यांना किंमतवाढीचे फारसे वाईट परिणाम सहन करावे लागले नाहीत.

५) **व्यापारशर्तीचा मिश्र अनुभवः** शेतमाला व बिगर शेतमालाच्या किंमतीतील बदल मिश्र स्वरूपाचे दिसतात उदा. १९६५ च्या काळात व्यापरशर्ती शेतमालाच्या बाबतीत अनुकूल होत्या, त्याकाळात शेतमाल किंमत आयोग स्थापन झाला व शेतमालाला किमान किंमत मिळू लागल्याने शेतमालाच्या किंमती वाढल्या, त्यांच्या व्यापार शर्ती जास्तचअनुकूल झाल्या. पण१९७० च्या दरम्यान बिगर शेतमालाच्या किंमती वाढल्या. म्हणजेच शेतमालाच्या किंमतीपेक्षा बिगरशेतमालाच्या किंमतीत जास्त वाढ झाली.

६) **ग्राहकांच्या हिताचे रक्षणः** अन्नधान्य, भाजीपाला, फळे यांचे सर्वजन उपाभोक्ते आहेत. शेतमालाच्या किंमतीत वाढ होण्याच्या प्रवृत्तीचा उत्पादकांना फायदा मिळाला पण ग्राहकांचे हित जपण्यालाही सरकारने प्राधान्य दिले. कमी उत्पन्न गटातील लोकांना पुरेसे व कमी किंमतीत जीवनावश्यक वस्तू मिळाव्यात म्हणून स्वस्त धान्य दुकानातून त्यांची उपलब्धता करून दिली. केंद्र सरकारने कामासाठी धान्य योजना, रोजगार हमी योजना, पंतप्रधान रोजगार कार्यक्रम राबविताना श्रमिकांना पुरेसे धान्य मिळावे याकडे लक्ष पुरविले, शिक्षण व्यवस्थेत लहानमुलांना पोषण आहार मिहावा यासाठी तरतूद केली.

### २.५.८ शेती विषयक नवे राष्ट्रीय धोरणः इ.स. २००० चे धोरण

केंद्र सरकारने इ.स. २००० पासून शेतीसाठी नवे धोरण स्विकारले. २००४ मध्ये त्या धोरणात मा. शरद पोवार यांनी सुधारणा सुचविल्या.

**उद्दिष्टे :**

१) **दिर्घ कालीन धोरणः** पुढील २० वर्षात कृषी क्षेत्राचा वार्षिक वृद्धी दर ४% इतका ठेवला जाईल.

२) **नैसर्गिक साधनांचा कार्यक्षम वापरः** पाणी, जमीन, जैव विविधता यांचा कार्यक्षमतेने वापर केला जाईल.

३) **शेती विकासातून समताः** शेती विकासाचा लाभ शेतकऱ्यांना , शेती आधारित लोकांना मिळेल.

४) **शेतीची स्पर्धात्मकता वाढविणेः** खुला व्यापार, जागतीकीकरणाच्या परिस्थितीत भारतीय शेती, शेतकरी टिकूण राहीले पाहीजेत यासाठी शेतीची स्पर्धात्मकता वाढविणे.

५) **चिरंजीवी विकास साधणेः** आर्थिक, पर्यावरणीय आणि तंत्रज्ञानाच्या दृष्टीने स्वातंत्र्यपूर्ण विकासाची स्थिती निर्माण करणे. टिकावू विकास साधणे.

शेतीविषयक नव्या धोरणाची उद्दिष्ट्ये लक्षात घेतली तर २००० पासून भारतीय शेतकऱ्याला आंतरराष्ट्रीय बाजारपेठेला तोंड द्यावे लागणार आहे. सरकार शेतीला, शेतकऱ्यांना, ग्राहकांना संरक्षण देणार नाही. देशातील शेती उत्पादनाची स्थिती आंतरराष्ट्रीय शेती व्यवसायापेक्षा अकार्यक्षम, मागासलेली असेल, शेतकरी अज्ञानी, निरक्षर असेल तर तो स्पर्धात्मक बाजारपेठेत टिकू शकणार नाही. त्यामुळे भारतीय

शेतकऱ्याला आपला शेतीव्यवसाय कार्यक्षमतेने करावा लागणार आहे. म्हणूनच शेतकऱ्याने आता सरकारच्या किंमत स्थिरतेच्या धोरणाचा विचार सोडून बाजारपेठेतील मागणीपुरवठयाच्या संघर्षातून ठरणार किंमत स्विकारण्यासाठी स्वतःची सिद्धता वाढविली पाहिजे. जमीन, पाणी, उपलब्ध घटक यांचा कार्यक्षमतेने वापर केला पाहिजे. तंत्रज्ञान, पर्यावरण व आर्थिक दृष्टीकोनातून विचार करून सातत्यपूर्ण विकसाची स्थिती निर्माण करण्याकडे लक्ष दिले पाहिजे.

**शेती विषयक नव्या धोरणातील महत्त्वाचे घटकः**

१) **खाजगी क्षेत्राचा सहभागः** शेती ही खाजगीरित्या शेतकऱ्यांकडून केली जाते पण उत्पादन संस्थांची खाजगी शेती सुरू होईल. बहुराष्ट्रीय खाजगी कंपन्यांचा शेतीत प्रवेश होईल. कुशल प्रशिक्षित तरूण श्रमीकांचा शेतीत समावेश होइल.

२) **जागतिकी करणः** भारतीय शेतमाल जगाच्या बाजारपेठेत जाईल किंवा जगातील शेतमाल भारताच्या खेडयापाडयात येईल. शेतकऱ्यांना कार्यक्षम होवून शेती व्यवसाय करावा लागेल. त्यासाठी शिक्षण, तंत्रज्ञान, आधुनिकशेती पद्धत, संशोधन याबाबतीत स्वावलंबी झाला पाहिजे.

३) **कर सुधारणाः** सरकार करात सुधारणा घडवूण आणेल, शेती आदानावरील अबकारी कराची पुःनर्रचना करेल.

४) **अंतर्गत व्यापारातरील बंधणे रद्दः** विविध देशादेशामधील व्यापार खुला होणार असल्यामुळे अंतर्गत, राज्याराज्यातील व्यापारावरील नियंत्रणे काढून टाकली जातील. तात्पुरत्या काळासाठी बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या स्पर्धेपासून शेतकऱ्यांचे संरक्षण व्हावे म्हणून उपाय योजले आहेत.

५) **पायाभूत सोईत वाढः** पाणी, वीज, रस्ते यासारख्या मूलभूत सोई वाढविण्यावर भर दिला जाईल.

६) **विमा योजनाः** शेती व्यवसाय, शेतीपूरक उद्योग, शेतकरी यांना विमा योजनेत सहभागी करून नैसर्गिक आपत्ती,  व अन्न संभाव्य धोक्यापासून संरक्षण

७) **गतीमान शेतीः** पारंपारिक शेती कडून प्रगत शेतीकडे, कमी उत्पादकतेकडून जास्त उत्पादकतेकडे,स्थितीशिलतेततून गतीशिल अवस्थेकडे वाटचाल करण्यावर भर दिला जाईल.

८) **प्रक्रिया उद्योगः** शेतमाल नैसर्गिक स्वरूपात विकण्याऐवजी प्रक्रियाकरून विकण्यावर भर दिला जाईल त्यादृष्टीने शेती मालावर प्रक्रिया करणारे उद्योग वाढविले जातील.

९) **कर्ज पुरवठाः** शेती व्यवसायातील गुंतवणूक वाढणार, प्रक्रिया संस्थांना कर्ज, पायाभूत सुविधा निर्माण करणे, शेती संशोधन, शेतकऱ्यांना शिक्षण, प्रशिक्षण इ. मुळे कृषी कर्जाची गरज वाढेल. शेतीकर्ज पुरवठा वाढविणे गरजेचे आहे.

वरील विविध घटकांकडे लक्ष पुरवून भविष्यकाळात संरक्षित किंमत धोरण रद्द होवून मुक्त स्पर्धा सुरू होईल.

## २.६ भारतातील अन्न सुरक्षा (Food Security in India)

### २.६.० प्रस्तावना :

अन्न ही मानवाची प्राथमिक (मूलभूत) गरज आहे. ते पुरेशा प्रमाणात दर्जेदार स्वरूपात उपलब्ध होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. अन्न सुरक्षीतता म्हणजे लोकांना अन्नधान्याचा पुरेसा संख्यात्मक पुरवठा उपलब्ध

होण्याबरोबरच गुणात्मक आहार वेळेवर उपलब्ध होईल याची हमी मिळणे आवश्यक आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भारतात अन्नधान्य उत्पादन वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न केलेले दिसून येतात. याशिवाय अन्नधान्य वितरणावरती देखील लक्ष केंद्रित केले आहे. तथापि भारतामध्ये वाढती लोकसंख्या विचारात घेता अजूनही पुरेशा प्रमाणात अन्नधान्य तसेच डाळींचा पुरवठा होत नाही त्यामुळे भारतातील अन्न सुरक्षिततेबद्दल प्रश्न निर्माण होतो.

**२.६.१ अन्न सुरक्षितता – व्याख्या :**

**१) जागतिक विकास अहवाल (१९८६) :**

सर्व लोकांना, सर्व वेळी कार्यक्षमता टिकविण्यासाठी आणि आरोग्यदायी जीवन प्राप्त होईल इतके पुरेशे अन्नधान्य उपलब्ध होईल अशी स्थिती म्हणजे अन्न सुरक्षीतता होय.

**२) अन्न आणि कृषी संघटना :**

सर्व लोकांना सर्व काळी भौतिक व आर्थिक दृष्टीकोनातून आवश्यक असलेले महत्त्वाचे अन्न उपलब्ध होण्याविषयीची हमी म्हणजे अन्न सुरक्षितता होय.

**३) स्ताट्झ (Staatz) :**

देशातील अन्नधान्य व्यवस्थेकडून एकूण लोकसंख्येला प्रोटीनयुक्त सकस अन्नधान्याचा वेळेवर व विश्वासनीयरित्या पुरेसा पुरवठा करण्याच्या क्षमतेची हमी देणे म्हणजे अन्न सुरक्षितता होय.

थोडक्यात अन्न सुरक्षिततेत देशातील एकूण लोकसंख्येला आवश्यक असणाऱ्या अन्नधान्याच्या प्रत्यक्ष पुरवठ्याची उपलब्धता अपेक्षित असते. आरोग्यदायी जीवनासाठी आवश्यक प्रथिनांनी युक्त अन्नधान्य संख्यात्मक दृष्ट्या आणि गुणात्मक दृष्ट्या उपलब्ध असते. अन्नधान्य सुरक्षिततेमध्ये खाद्यान्न, डाळी, दूध आणि दुग्धजन्य पदार्थ, भाजीपाला आणि फळे, मांस, अंडी इत्यादीचा पुरेसा पुरवठा अपेक्षीत आहे. निरोगीपणासाठी सर्व जीवनसत्वे, खनिजे आहारातून मिळायला हवीत. 'समतोल आहार/चौरस आहार' ही आरोग्याची गुरूकिल्ली आहे.

लोकशाहीमध्ये प्रत्येकव्यक्ती महत्त्वाची आहे, प्रत्येकव्यक्तीला विविध स्वातंत्रे उपभोगायला मिळतात. प्रत्येक नागरिकाला आपणाला आवश्यक आहे तितके अन्नधान्य योग्य किंमतीत विकत घेवून उपभोगता आले पाहिजे. त्यादृष्टीने प्रत्येकाची अन्नधान्याची गरज पूर्ण होईल इतके अन्नधान्य त्याला मिळेल अशी व्यवस्था निर्माण करणे म्हणजे अन्नधान्य सुरक्षितता होय.

भारतात हरितक्रांती झाली आहे. त्यामुळे अन्नधान्याचे उत्पादन १९५०-५१ मध्ये ५ कोटी टन होते व ते २००६-०७ मध्ये २३.७० कोटी टन इतके वाडले आहे. देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी झाला आहे असे सांगितले जात आहे पण दुसऱ्या बाजबला ४०% लोक अजूनही दारिद्र्यरेषेखाली आहेत. कमी उत्पन्नामुळे हे लोक बाजारातील किंमतीला अन्नधान्य विकत घेवून पोटाची भूक भागवू शकत नाहीत. देशात अन्नधान्य असूनही ते गरजू गरीब लोकापर्यंत पोहचू शकत नाही. म्हणजेच देशात पुरेसे अन्नधान्य निर्माण झाले म्हणजे देशात अन्नधान्य सुरक्षितता निर्माण झाली असे नव्हे तर गरीबातील गरीब व्यक्तिलाही त्याच्या गरजे इतके अन्नधान्य विकत घेवून उपभोगण्यासाठी त्याला पुरेसे उत्पन्न मिळवून देण्याची व्यवस्था निर्माण झाली पाहिजे. शेवटची व्यक्तीही आपल्या भूकेची गरज भागवू शकली पाहिजे अशी व्यवस्था निर्माण करणे म्हणजे अन्न सुरक्षितता निर्माण करणे होय.

**२.६.२ खाद्यान्न आणि डाळीची निव्वळ उपलब्धता किंवा अन्नधान्याची उपलब्धता :**

अन्न सुरक्षिततेची मुलभूत अट म्हणजे देशातील उपलब्ध अन्नधान्य व डाळी यांचे एकूण लोकसंख्येशी असणारे विशिष्ट प्रमाण हे होय. भारतात हरित क्रांतीच्या माध्यमातून अन्नधान्याबाबत स्वयंमपूर्ण झालेला आहे. १९७६ नंतर भारतातील अन्नधान्य तसेच डाळीची आयात नगण्य आहे. याउलट १९९५-९६ पासून भारतातून अन्नधान्याची निर्यात होवू लागली आहे. सन २००३-२००४ मध्ये भारत सरकारने १०.३ द.ल. टन अन्नधान्याची निर्यात केली आहे.

भारतातील खाद्यान्न आणि डाळींची उपलब्धता खालील तक्त्यामध्ये दर्शविली आहे.

**अन्नधान्य व डाळींची निव्वळ उपलब्धता**

| वर्ष | अन्नधान्य (द.ल. टन) | | | डाळी (द.ल. टन) |
|---|---|---|---|---|
| | निव्वळ उत्पादन | आयात | एकूण उपलब्धता | |
| १९५१-१९५६ | ४६.३ | २.३ | ४८.७ | ८.९ |
| १९५६-१९६१ | ५३.४ | ३.४ | ५६.५ | १०.३ |
| १९६१-१९६६ | ६२.४ | ५.१ | ६७.६ | १०.२ |
| १९६६-१९७१ | ६६.९ | ६.४ | ७२.६ | ९.२ |
| १९७१-१९७६ | ८०.९ | ३.६ | ८३.९ | ९.३ |
| १९७६-१९८१ | ९५.० | -०.२ | ९४.२ | १०.१ |
| १९८१-१९८६ | ११०.५ | १.६ | ११२.१ | १०.३ |
| १९८६-१९९१ | १२४.७ | ०.५ | १२५.६ | ११.७ |
| १९९१-१९९६ | १४५.९ | ०.४ | १४४.२ | १२.१ |
| १९९६-२००० | १६०.५ | -२.० | १५५.१ | १२.२ |
| २००१ | १६२.१ | -४.५ | १४५.१ | ११.० |
| २००२ | N.A. | N.A. | १७५.४ | १३.४ |
| २००३ | N.A. | N.A. | १५९.८ | ११.० |
| २००६-०७ | N.A. | N.A. | २३.७० | N.A. |

वरील पत्रकावरून १९५१-५६ या काळात वार्षिक सरासरी अन्नधान्य उत्पादन ४६.३ द.ल. टन होते. त्यामध्ये वाढ होवून ते १९९६-२००० या काळात वार्षिक सरासरी १६०-५ द.ल. टनापर्यंत वाढले तर याच काळात उत्पादन ८.९ द.ल. टनावरून १२.२ द.ल. टनापर्यंत वाढले आहे.

सन १९५१ ते २००१ या काळात अन्नधान्य आणि डाळी यांची प्रतिदिन दरडोई उपलब्धता ४१९ ग्रॅम वरून ४५१ ग्रॅमपर्यंत वाढली म्हणजे गेल्या पन्नास वर्षात अन्नधान्याची दरडोई उपलब्धता प्रतिवर्षी १५% नी वाढली. या काळात एकूण अन्नधान्य उपलब्धतेमध्ये वाढ झाली आहे परंतु या काळातील कडधान्याची

प्रतिदिन दरडोई उपलब्धता ६५ ग्रॅम वरून २९ ग्रॅम पर्यंत घटली. नवव्या योजनेत डाळी व कडधान्याच्या उपलब्धतेतील प्रतिदिनी दरडोई घटीमुळे प्रथिनांचे प्रमाण कमी होवून व्यक्तीच्या कार्यक्षमतेवर त्याचा प्रतिकूल परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे. भारतातील अन्न सुरक्षेचा विचार करता भारत खाद्यान्नाच्या बाबतीत यशस्वी झाला आहे. परंतु कडधान्ये व डाळींचे उत्पादन वाढविण्याच्या बाबतीत अपयश आले आहे.

**खाद्यान्नाचा उपभोग आणि अन्न सुरक्षितता :**

दररोजच्या आहारातून किती कॅलरीज उष्मांक मिळतो यावरून दारिद्र्य रेषा निश्चित केली जाते. भारतामध्ये साधारणत: ८५% कॅलरीज या अन्नधान्याच्या माध्यमातून मिळतात त्यामुळे खाद्यान्न हे अन्न सुरक्षेचा महत्त्वाचा घटक आहे आहे. इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च या संस्थेच्या मते भारतातील सामान्य व्यक्तीला किमान निर्वाहासाठी महिन्याला ११.५८ किलोग्रॅम खाद्यान्नाची गरज आहे. मात्र प्रत्यक्षात १०.०३ कि.ग्रॅ. उपलब्ध आहे. म्हणजेच अन्न सुरक्षितता प्राप्त होण्यासाठी आणखीन अन्नधान्याची गरज आहे.

**सार्वजनिक वितरण व्यवस्था (Public Distribution System (PDS)) आणि अन्न सुरक्षितता :**

अन्न सुरक्षिततेमधील दुसरा महत्त्वपूर्ण घटक म्हणजे लोकांना आवश्यक अन्नधान्याचा पुरेसा पुरवठा होणे याकरिता भारतामध्ये भारतीय अन्नधान्य महामंडळाच्या माध्यमातून १९६५ मध्ये सार्वजनिक वितरण व्यवस्था सुरू केली. या योजनेचे मुलभूत उद्दिष्ट म्हणजे समाजातील गरीब लोकांना सवलतीच्या दराने अन्नधान्याचा पुरवठा करणे. यामध्ये तांदुळ, गहू, साखर, रॉकेल, खाद्यतेल इत्यादीचा समावेश होतो.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेवर अन्नधान्याचे कार्यक्षमपणे वाटप करून गरीबांना त्याचा कितपत लाभ होतो याचा आढावा घेण्यासाठी १९८६-८७ मध्ये राष्ट्रीय नमुना पाहणी समितीने वास्तव विश्लेषण केले आहे. त्यांच्या मते गरीबासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्थेची अन्नधान्य वाटपाची स्थिती अतिशय निराशजनक आहे. बिहारसारख्या मागासलेल्या राज्यात सार्वजनिक वितरण व्यवस्था पूर्णपणे अपयशी ठरली आहे. फक्त केरळ या राज्यात ही व्यवस्था कार्यक्षमपणे कार्य करत आहे. या योजनेचा लाभ सर्वसाधारणपणे गरीब नसणाऱ्या लोकांनीच जास्त घेतला आहे. राष्ट्रीय नमुना पाहणीच्या मते ही योजना खर्चिक ठरली असून लक्ष्य गटासाठी ती फारशी लाभदायक ठरली नाही. गरीबासाठी अन्न सुरक्षितता प्रस्तापित करण्याच्या दृष्टीने ही योजना यशस्वी झालेली नाही.

इ.स. २००४ पर्यंत सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत देशभर ४.६२ लक्ष स्वस्थ धान्य दुकानातून कमी उत्पन्न गटातील लोकांना बाजारभावापेक्षा कमी दरात जीवनावश्यक वस्तू उपलब्ध करून दिल्या जात होत्या. वार्षिक ३०,००० को. रू. किंमतीच्या जीवनावश्यक वस्तूंचे गरीब १.६० कोटी लोकांना वाटप करण्यात आले.

**दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्या आणि अन्न सुरक्षितता :**

सरकारने सार्वजनिक वितरण व्यवस्थेद्वारे जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करताना दारिद्र्य रेषेखालील BPL (Below Poverty Line) आणि दारिद्र्य रेषेच्यावरील APL (Above Poverty Line) लोकसंख्या असे वर्गीकरण केले आहे. ही रेषा निश्चित करताना ग्रामीण भागातील कुटुंबांचे दरमहा उत्पन्न १५००/- रूपये आणि शहरी भागात ते २०००/- रूपये यापेक्षा कमी असेल अशा कुटुंबांना दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे असे संबोधण्यात आले. सरकारी अनुदान देवून या लोकांना स्वस्त दराने अन्नधान्य उपलब्ध

करून द्यावे अशी अपेक्षा आहे. मात्र यामध्ये शासनाला अनेक अडचणी येत आहेत. याशिवाय भारतात मोठ्या प्रमाणावर असंघटित क्षेत्राचे अस्तित्व असल्यामुळे दारिद्रय रेषा निश्चित करण कठीण बाब आहे.

**सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील दोष/टिका :**

१) दारिद्रय रेषेखालील लोकांना सेवा पुरविण्यात ही व्यवस्था अयशस्वी ठरली आहे.

२) शहरी भागावर लक्ष केंद्रीत करून ही योजना राबविली आहे.

३) गरीबीचे प्रमाण कमी असणाऱ्या राज्यातील ग्रामीण गरीबांकडे या योजनेने पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे.

४) अन्नधान्य महामंडळाकडून धान्यांची खरेदी, साठवण व रास्त धान्य दुकानातून वितरण करताना निष्कृष्ट दर्जाचे धान्य पुरविण्यात आले.

अशा प्रकारची टीका या योजनेवर होत असताना सरकारने अन्न सुरक्षिततेसाठी केलेला हा प्रयत्न महत्त्वपूर्ण आहे. २००१ पासून अंत्योदय योजने अंतर्गत दारिद्रय रेषेखालील प्रत्येक कुटुंबाला महिना २५ किलो धान्य पुरविले जाते. यामध्ये गहू आणि तांदूळ याचा समावेस आहे. २ रूपये किलो गहू व ३ रूपये किलो तांदूळ या योजनेत दिला जातो. गरीबांना अत्यंत स्वस्त दराने अन्नधान्य पुरविण्यात ही योजना यशस्वी ठरली आहे.

**२.६.३ नववी योजना आणि अन्न सुरक्षितता :**

नवव्या योजनेत राष्ट्रीय पातळीवर आणि कौटुंबिक पातळीवर अन्न सुरक्षितता या प्रश्नाला महत्त्व देण्यात आले. योजना आयोगाच्या मते राष्ट्रीय पातळीवरील अन्न सुरक्षितता ही प्रामुख्याने देशाअंतर्गत उपभोगासाठी आवश्यक असणाऱ्या अन्नधान्याच्या उत्पादनावर तसेच शिलकी साठ्यावर अवलंबून असते. हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी पाणी, खते, बि-बियाणे यामध्ये सुधारणा व स्वयंमपूर्णता निर्माण करणे आवश्यक आहे. भारताने अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्णता निर्माण केली आहे. मात्र डाळी व कडधान्ये, भाजीपाला, फळे यांचे उत्पादन व उपभोग गरजेच्या मानाने अतिशय कमी आहे याकडे या योजनेत लक्ष देण्यात आले.

कौटुंबिक पातळीवर अन्न सुरक्षेचा विचार करता प्रत्यक्षात सर्वांना मुबलक प्रमाणात दर्जेदार अन्नधान्य रास्त किंमतीला उपलब्ध होणे अपेक्षित आहे. मात्र लोकांची क्रयशक्ती कमी असल्याने अन्नधान्याचा पुरेसा पुरवठा होत नाही. यावरती उपाय म्हणून या योजना काळात गरीबांना साह्य करण्यासाठी सरकारने सार्वजनिक वितरण व्यवस्थेद्वारा दुहेरी किंमत धोरणाचा अवलंब केला आहे. गरीबांना आवश्यक ते सकस अन्नधान्य खरेदी करता यावे यासाठी सरकारने खाद्यान्नाचा बाजार किंमतीपेक्षा रेशनवरील किंमती खूपच कमी ठेवल्या आहेत. मात्र या योजनेचा लाभ गरीबांना फारसा मिळालेला नाही.

कौटुंबिक पातळीवर अन्न सुरक्षा मिळण्यासाठी पुढील उपाय योजने गरजेचे आहे.

१) विकासाची व्यूहरचना आणि समग्र आर्थिक धोरणे अशा रीतीने आखली पाहिजेत की त्यामधून समनव्याने वृध्दी घटून आली पाहिजे.

२) शेती क्षेत्राचा विकास एका तत्त्वानुसार असा गतिमान झाला पाहिजे की त्यामधून लोकांना मुबलक अन्नधान्य उपलब्ध झाले पाहिजे.

३) गरीबांना केंद्रस्थानी मानून ग्रामीण विकास कार्यक्रमांची आखणी व अंमलबजावणी झाली पाहिजे.

४) गरीब कुटुंबांना कमी व्याज दराने कर्ज उपलब्ध झाले पाहिजे.

५) अन्नधान्याचा साठा आणि त्यांच्या किंमती यामध्ये स्थैर्य प्रस्थापित झाले पाहिजे.

### २.६.४ दहावी योजना आणि अन्न सुरक्षा :

या योजनेत हरितक्रांती नंतरच्या काळातील लोकांच्या उपभोग संरचनेतील होणारा बदल लक्षात घेतला आहे. प्रामुख्याने कडधान्ये, डाळी तसेच भाजीपाला फळे, दुग्धजन्य पदार्थ यांचा उपभोग घटला आहे. त्यामुळे या योजना काळात सार्वजनिक वितरण व्यवस्थेत काही विशेष बदल करण्याची आवश्यकता आहे असे या नियोजन आयोगाने सुचविले. त्यातील काही प्रमुख शिफारशी पुढीलप्रमाणे –

१) सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत पुरविल्या जाणाऱ्या अन्नधान्यापैकी फक्त गहू व तांदूळ यांनाच शासनाने अनुदान द्यावे कारण याच वस्तूंचा उपभोग गरीब कुटुंबे घेतात.

२) सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत साखरेचा पुरवठा करू नये.

३) रॉकेलवरील अनुदान बंद करावे. कारण याचा उपभोग गरीब व्यक्ती घेत नाहीत.

४) P.D.S. मधील गैरकारभार टाळण्यासाठी अन्नधान्य कुपण ही पध्दत सुरू करावी.

५) P.D.S. योजना केंद्राकडून राज्याकडे सोपविण्यात यावी.

वरील मुलभूत शिफारशी सार्वजनिक वितरण व्यवस्थेविषयी या योजना आयोगाने केल्या आहेत की ज्यामुळे PDS योजना कार्यक्षम होवून गरीब लोकांना जास्तीत जास्त अन्न सुरक्षितता उपलब्ध होईल.

## २.७ राष्ट्रीय शेतकरी आयोग (The National Commission on Farmers - NCF )

भारतीय शेती व शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारण्यासाठी भारतीय शेतीमधील आर्थिक संकटे दूर करण्यासाठी भारत सरकारने सन २००४ मध्ये डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय शेतकरी आयोगाची स्थापना केली. आयोगाने शेतकऱ्यांची विस्तृत अशी नवीन व्याख्या केली गेली. त्यामध्ये शेती क्षेत्रातील श्रमिक, लहान सीमांत व मोठे शेतकरी मच्छीमारी, दुग्धव्यवसाय, शेळी व मेंढीपालन, शेतीमध्ये काम करणारी आदिवासी कुटुंबे, तसेच ग्रामीण व भटके शेतकरी, शेतीशी संबंधित व्यवसाय करणारे सर्व स्त्री पुरूष यांचा समावेश या शेतकरी संज्ञेत केला गेला या सर्व घटकांचा विकास किंवा उन्नती घडून यावी यासाठी आवश्यक असणाऱ्या उपाययोजना सुचविण्याची जबाबदारी या आयोगावरती देण्यात आली. या आयोगामध्ये डॉ. राम बदनसिंह व वाय. सी. नंदा हे दोन पूर्ण वेळ सदस्य तर डॉ. आर. एल. पिटले, श्री. जगदीश प्रधान, श्री. चंदा निबकर व अतुलकुमार अंजन हे अर्धवेळ सदस्य होते तर सचिव म्हणून श्री. अतुल सिन्हा हे काम पाहत होते.

या आयोगाने शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी व्युहरचना निर्माण केली. आयोगाने शिफारशी करताना शेतीची उत्पादकता व लाभता कायम स्वरूपी वाढवण्यासाठी व ज्याचे परिणाम वातावरणावरती प्रतिकुल होणार नाहीत अशा तंत्राचा वापर करण्यात यावा ज्यामुळे सध्या भारतीय शेतीत जी संकटे निर्माण झाली आहेत ती थांबली जातील. तसेच शेती क्षेत्राची प्रगती जलद गतीने होईल यासाठी नवीन पद्धत अवलंबावी. नवीन तंत्रज्ञान, कृषी सेवा, सरकारी धोरणे नव्याने कार्यान्वित होण्याची आवश्यकता आहे हे लक्षात घेवून कृषी नुतनीकरणासाठी कृती आराखडा तयार केला तो पुढीलप्रमाणे–

**१) अन्न व पोषण सुरक्षीतता** (Food and Nutrition Security): अन्न व पोषण सुरक्षीतता साध्य करण्यासाठी सर्वसमावेशक असे मध्यम मुदत धोरण तयार करणे व त्या माध्यमातून देशाची वाटचाल वैश्वीक अन्नसुरक्षीततेच्या दिशेने करणे.

२) **नफा, स्थिरता, शाश्वतता व उत्पादकतेमध्ये वाढ करणे** (Enhancing the productivity, profitability, stability and sustainability)**:** कृषी पर्यावरणीय व कृषी वातावरणीय पध्दतीच्या आधारावर भारतीय अर्थव्यवस्थेमधील शेतीक्षेत्रामधील नफ्यामध्ये वाढ करणे, कृषी उत्पादनामध्ये व उत्पादकतेमध्ये वाढ करणे, स्थिरता प्रस्तापीत करणे. तसेच कृषी विकास, उत्पादकता वाढविण्याची व टिकवून ठेवण्याची शाश्वती देणे.

३) **ग्रामीण भागात उत्पन्न वृध्दी व रोजगार संधी निर्माण करणे** (Employment potential in rural areas): भारतीय अर्थव्यवस्थेमधील तंत्रज्ञान व शासकिय धोरणामध्ये योग्य समन्वय साध्य करून ग्रामीण भागात उत्पन्न वृध्दी व नविन रोजगार संधी निर्माण करण्याच्या दृष्टिने उपाय योजना सुचवीणे.

४) **योग्य तंत्रज्ञानाचा वापर** (Application of appropriate technology): शेतीक्षेत्राच्या विकासासाठी आवश्यक असणारी बाजार माहिती, हवामान विषयक, पतविषयक सुविधा, बाजार सुधारणांबाबत अचुक माहिती उपलब्ध व्हावी योग्य तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर भर देण्यात यावा.

५) **सुशिक्षीत तरूणांना शेतीक्षेत्रामध्ये आकर्षीत करणे** (Attract and retain educated youth in farming): भारतीय अर्थव्यवस्थेमधील शेतीक्षेत्राच्या विकासासाठी सुशिक्षीत तरूणांनी स्वेच्छेने शेतीमध्ये काम करण्याची आवश्यकता आहे. कृषीक्षेत्राच्या नूतनीकरणाच्या कृती आराखड्यामध्ये सुशिक्षीत तरूण शेतीक्षेत्रामध्ये यावेत याबाबत उपाय सुचविण्याची जबाबदारी सोपविण्यात आली.

६) **कृषी संशोधन गुंतवणूक वाढीस प्रोत्साहन** (Enhance investment in agri-research): भारतीय शेतीक्षेत्राच्या विकासासाठी कृषीक्षेत्रातील संशोधन गुंतवणूक वाढीस प्रोत्साहन मिळावे याबाबतचे उपाय सुचविण्याची जबाबदारी कृषीक्षेत्राच्या नूतनीकरणाच्या कृती आराखडा तयार करीत असताना आयोगावर सोपविण्यात आली.

७) **कोरडवाहू शेती विकासासाठी विशेष कार्यक्रम** (Formulate special programmes for dry land farming for farmers): कोरडवाहू शेतीचा विकास घडून यावा, कोरडवाहू शेती विकासामधील समस्यांचे समूळ उच्चाटन व्हावे यासाठी कोरडवाहू शेती विकासासाठी विशेष कार्यक्रमाचा पोषक स्वरूपाचा आराखडा तयार करण्याची जबाबदारी या आयोगावर सोपविण्यात आली.

८) **पत आधारीत विमा योजना** (Credit-linked insurance schemes): अल्प उत्पन्न गटातील शेतकरी कुटूंबाना संरक्षण देण्यासाठी पत आधारीत विमा योजनेच्यादृष्टीने योग्य ती कार्यवाही करण्याची जबाबदारी या आयोगावर सोपविण्यात आली.

९) **कृषी उत्पादनाचा दर्जा उंचावण्यासाठी उपाय सुचविणे** (Suggest measures for enhancing the quality)**:** भारतीय शेतीक्षेत्रातील उत्पादनाची जागतीक बाजारपठेतील स्पर्धाशक्ती वाढावी या करीता कृषी उत्पादनाचा दर्जा उंचावण्याची गरज विचारात घेता त्यादृष्टीने योग्य ते उपाय सुचविण्याची जबाबदारी या आयोगावर सोपविण्यात आली.

१०) **कृषी उत्पादनाचा उत्पादन खर्च कमी करण्याचे उपाय सुचविणे** (Suggest measures for Reducing cost) : शेती उत्पादनाची जागतीक स्पर्धाशक्ती वाढावी या करीता कृषी उत्पादनाचा दर्जा उंचावण्याबरोबरच कृषी उत्पादनाचा उत्पादन खर्च कमी करण्याचे उपाय सुचविण्याची जबाबदारीदेखील याच आयोगावर सोपविण्यात आली.

**राष्ट्रीय शेतकरी आयोगाच्या शिफारसी:**

१) शेतजमीनीची सुपिकता व उत्पादकता वाढविण्यासाठी शेतजमिनीची सुपिकता वाढविण्यासाठी देशात कृषी विद्यापिठे, संशोधन संस्था मध्ये गुंतवणूक वाढवावी.

२) संशोधन संस्थांनी जमीनीत भौतिक घटक व सूक्ष्म जीव घटकांमध्ये वाढ करणारी खते शोधून ती शेतकऱ्यांना पुरवावीत.

३) शेतीच्या सिंचनात वाढ करणे व समान पाण्याचे वाटप करण्यासाठी ग्रामीण भागात पाणी पंचायती स्थापन कराव्यात.

४) कोरडवाहू शेतीच्या विकासाकडे अधिक लक्ष देण्यात यावे.

५) शेतकऱ्यांमध्ये शेती विम्याबाबत जागृती निर्माण करावी.

६) शेतीच्या विकासासाठी सरकारने ४% व्याजदराने पीक कर्ज शेतकऱ्यांना द्यावे.

७) केंद्र सरकार व राज्य सरकारांनी नैसर्गिक आपत्तीपासून शेतीला संरक्षण देण्यासाठी कृषी धोके निधीची स्थापन करावा.

८) शेती संशोधन संस्थानी शेती विषयक तंत्रज्ञानाचा विकास करून शेतकऱ्यांच्या दर हेक्टरी उत्पादनात वाढ घडवून आणण्याचा प्रयत्न करावा.

९) शेतमाल बाजार व्यवस्थेत सुधारणा करून शेतकऱ्यांच्या शेतमालास योग्य किंमती मिळावी यासाठी प्रयत्न करावेत.

१०) पीक विमा व जीवन योजना राबविणे.

वरील अनेक विषयांबाबत शिफारशी करण्याबरोबरच सन २००६-०७ हे वर्ष कृषी नूतनीकरण वर्ष म्हणून घोषीत करण्यात आले.

**प्रश्न १. रिकाम्या जागा भरा.**

१) भारत सरकारने राष्ट्रीय शेतकरी आयोगाची स्थापना . . . . या वर्षी केली.

अ) २००२ ब) २००३ क) २००४ ड) २००५

२) भारत सरकारने स्थापन केलेल्या राष्ट्रीय शेतकरी आयोगाचे अध्यक्ष . . . . हे होते.

अ) डॉ. राम बदन सिंग ब) एम. एस स्वामिनाथन

क) डॉ. आर. एल पिटले ड) श्री. चंदा निंबकर

**उत्तरे :** १) २००४ २) एम. एन. स्वामिनाथन

**प्रश्न २. टीपा लिहा**

१) राष्ट्रीय शेतकरी आयोग

**प्रश्न ३. पुढील प्रश्नाची सविस्तर चर्चा करा.**

१) राष्ट्रीय शेतकरी आयोगावर सोपविलेल्या जबाबदाऱ्या स्पष्ट करा.

२) राष्ट्रीय शेतकरी आयोगाच्या प्रमुख शिफारसी स्पष्ट करा.

## २.८ शेतीसाठी पाणी व्यवस्थापनाची गरज (Need of Water Management in Agriculture)

### २.८.० प्रस्तावना

शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा मुलभूत आधार आहे. शेतीमध्ये जी विविध आदाने वापरली जातात त्यामध्ये पाणी हे प्रमुख आदान आहे. शेतीची उत्पादकता ही पाण्यावर अवलंबून असते. पाणी हे प्रमुख नैसर्गिक साधन आहे. पाणी  ही मानवाची मुलभूत गरज आहे. म्हणूनच जलस्त्रोतांचा महत्त्व विकास आणि कार्यक्षम वापर याला महत्त्वाचे स्थान आहे. कमीत कमी पयत्नात जास्तीत जास्त परिणाम प्राप्त करण्याचे शास्त्र म्हणजे व्यवस्थापन होय. पाणी या नैसर्गिक साधनाचा वापर करून उत्पादन कमाल पातळीवर नेण्यासाठी पाणी व्यवस्थापनाची गरज भासते.

### २.८.१ व्याख्या :

''उपलब्ध साधनांचा महत्तम वापर करून मागणी पुरवठा यामध्ये मेळ घालण्याची कला म्हणजे व्यवस्थापन होय.''

**जे.एफ.मी. (J.F. Mee)**

''कामगार आणि मालक या दोघांनाही किमान प्रयत्नात कमाल परिणाम प्राप्त करून त्यांना सुबत्ता व सौख्य मिळवून देणारी व्यवस्थापन ही एक कला असून त्याद्वारे लोकांना शक्य तेवढी सर्वोत्तम सेवा उपलब्ध करून दिली जाते.''

पाणी ही मर्यादित साधन संपत्ती असल्याने तीचे योग्य व्यवस्थापन महत्त्वाचे आहे. पृथ्वीवरील १००% पाण्यातील ९७.५% पाणी खारे असल्याने त्याचा शेतीसाठी उपयोग होत नाही. उरलेल्या २.५% पाण्यापैकी २/३ पाणी बर्फामध्ये गोठविलेल्या अवस्थेत असते तर १/३ पाणी ओढे, नाले, नद्या, कॅनॉल या स्वरूपात सामावलेले असते. पृथ्वीवर वर्षभरात पाऊस व बर्फ या स्वरूपात ११३००० क्यूबिक पाण्याचे बाष्पात रूपांतर होते. प्रतिवर्षी ४१००० क्यू.कि.मी. एवढेच पाणी भूगर्भात आणि पृष्ठभागावर उपलब्ध होते.

भारतात पाण्याच्या उपलब्धतेची क्षमता १८६९ बिलियन क्यूबिक मीटर असून एकूण वापरातील पाणी ११२२ बिलियन क्यूबिक मीटर एवढे आहे. भारताची सातत्याने वाढत जाणारी लोकसंख्या व शेतीचे आधुनिकीकरण यामुळे पाण्याचा सातत्याने वापर वाढत आहे. पाण्याची वाढत जाणारी दुर्मिळता व त्याचे बहुविध उपयोग याचा मेळ कसा घालावयाचा हा पाणी व्यवस्थापना समोरील महत्त्वाचा प्रश्न आहे.

### २.८.२ पाणी व्यवस्थापनाची गरज :

'पाणी' म्हणजे जीवन आहे (सलिलं मा इद्म सर्वंम् !) पण पाण्याची सर्वत्र उपलब्धता सारख्याच प्रमाणात नाही. जे पाणी उपलब्ध आहे त्याचा वापर (१) पिण्यासाठी करायला हवा. प्रत्येक व्यक्तिला शुध्द व स्वच्छ पाणी पुरेशा प्रमाणात मिळाले पाहिजे. (२) शेतीसाठी वापर झाला पाहिजे. पाण्या बरोबरच प्रत्येकाला आहार मिळायला हवा. त्यासाठी शेतीतून पुरेसे अन्नधान्य निर्माण व्हायला हवे. उपलब्ध पाण्याच्या सहाय्याने शेती उत्पादन वाढविता येते. (३) उद्योगासाठी पाणी हवे, पाणी, अन्न, याप्रमाणेच औद्योगिवस्तूची गरज आहे. उद्योगासाठीही पाण्याचा वापर करायला हवा. आपण उद्योग या संकल्पनेमध्ये केवळ औद्योगिक क्षेत्र विचारात न घेता, दवाखाने, शाळा, सेवा उद्योग यांचाही त्यात समावेश करूया - वरील तीनपैकी प्रथम प्राधान्य कोणाला द्यावयाचे असा प्रश्न निर्माण होतो पण तीनही घटक महत्त्वाचे आहेत

व त्यादृष्टीने उपलब्ध पाणी वरील तीनही घटकांना किती प्रमाणात उपलब्ध करून द्यावयाचे याचे धोरण ठरविणे म्हणजे पाणी व्यवस्थापन करणे होय.

**१) पाणी वापरासाठी अग्रक्रम ठरविणे :**

पाण्यात विविध कारणासाठी वापर केला जातो. महत्तम वापराच्या दृष्टीने सर्वाधिक प्राधान्य पिण्याच्या पाण्याला द्यावे लागते. वाढत्या शहरीकरणामुळे पाण्याचा अतिरेक वापर होत आहे. त्यावरती निर्बंध घालणे महत्त्वाचे आहे. भारतीय अर्थव्यवस्था ही कृषी प्रधान असल्याने दुसरा पसंतीक्रम कृषी क्षेत्राला द्यावा लागतो. कृषी क्षेत्रात पाण्याचा महत्तम वापर होण्याकरिता पारंपारिक पाणी देण्याच्या पध्दती ऐवजी ठिबक सिंचन तसेच तुषार सिंचन व्यवस्थेचा आग्रह धरला पाहिजे. तसेच त्यानंतर उद्योगांना अग्रक्रम दिला पाहिजे. कारखान्यांनी वापरलेल्या पाण्यावर प्रक्रिया करून ते पुर्नवापरासाठी उपयोगात आणले पाहिजे. थोडक्यात पाण्याचा पर्याप्त वापर होण्यासाठी पाणी वापरासाठी अग्रक्रम ठरविणे आवश्यक आहे.

**२) पाण्याच्या पुनर्वापरासाठी नियोजन करणे :**

पावसाचे वाहून जाणारे पाणी आडवून ते जागच्या जागी मुरविणे किंवा घराच्या छपरावरील पाणी जवळच्या शोषखड्ड्यात मुरविण्यासाठी सक्ती करणे, पाण्याचे बाष्पीभवन कमी होईल अशा योजना आखणे यासाठी योग्य व्यवस्थापनाची गरज असते.

**३) पाणी प्रदुषण रोखणे :**

कारखान्यात वापरल्या जाणाऱ्या रासायनिक द्रव्यांमुळे होणारे पाणी प्रदुषण किंवा अतिपाणी वापरामुळे होणारे पाणी प्रदूषण रासायनिक खते, कीटकनाशके यांच्या वापरामुळे होणारे प्रदुषण कमी करण्यासाठी उपाययोजना सुचविणे, अतिपाणी वापरावर निर्बंध लादणे, पर्यावरण संतुलन टीकवून ठेवण्याच्या दृष्टीने पाणी वापराचे व्यवस्थापन करणे गरजेचे आहे.

**४) समृध्दासाठी सक्षम पाणी वापर :**

खते, कीटकनाशके व इतर रसायनांच्या वापरामुळे भूजल तसेच भूपृष्ठीय पाणी मोठ्या प्रमाणात दुषित होत आहे. निचरा न होणाऱ्या जमिनीत क्षारांचे प्रमाण वाढून जमिन नापीक होत आहे. गोड्या पाण्यातील मत्स्योत्पादन धोक्यात येत आहे. क्षारपड जमिनीचा प्रश्न निर्माण होत आहे. जमिनीची गुणवत्ता कमी होत आहे हे टाळण्यासाठी पाणी व्यवस्थापनाची गरज आहे.

**५) नद्या जोड प्रकल्प :**

मध्यम-मोठी धरणे ही एकमेकांना पूरक अथवा पर्याय नाहीत. ठराविक काळात पाऊस जास्त पडल्याने ते पाणी जाऊन समुद्रात मिळते व इतर काळात पाण्याची टंचाई असते. म्हणून नद्या जोड प्रकल्प उभारण्यावर सर्वप्रथम डॉ. के.एल. राव यांनी १९७२ मध्ये गंगा कावेरी लिंक प्रकल्प सादर केला. सध्या देशात या दृष्टीने विशेष प्रयत्न होत असताना दिसून येत आहेत. अशा योजनांची आखणी व कार्यक्षमरित्या अंमलबजावणी करण्यासाठी पाणी व्यवस्थापनाची आवश्यकता आहे.

**६) आंतरराज्य वाद मिटविणे :**

देशात अनेक नद्या एकापेक्षा जास्त राज्यातून वाहतात. अशा नद्यातील पाणी वाटपावरून वाद आहेत, हे वाद निर्माण होऊ नयेत म्हणून पाणी व्यवस्थापनाची गरज आहे. त्यादृष्टीने सरकारने अनेक मंडळांची

स्थापना केली आहे. उदा. नॅशनल वॉटर डेव्हलपमेंट एजन्सी, ब्रम्हपुत्रा बोर्ड, बेटवा रिव्हर बोर्ड, तुंगभद्रा बोर्ड, नर्मदा कंट्रोल अॅथॉरिटी इत्यादी निर्माण करून त्यादृष्टीने प्रयत्न चालू आहेत.

**७) वॉटर ग्रीडिंग :**

जनहिताला प्राधान्य देवून वॉटर ग्रीडिंग केल्यास अतिरिक्त वाया जाणारे पाणी टंचाईग्रस्त भागाला वळविता येईल व उपलब्ध पाण्याची कार्यक्षमरित्या वापर करता येईल.

**८) पाण्याचे दर ठरविणे :**

शेती, उद्योग व्यवसाय, पिण्याचे पाणी इत्यादीसाठी वेगवेगळे दर ठरविण्यासाठी पाणी व्यवस्थापनाची गरज आहे. भारतात दरडोई पाण्याची उपलब्धता फारच कमी असल्यामुळे पाण्याचा पर्याप्त वापर होण्यासाठी तसेच पाण्याचा अतिरेक वापर टाळण्यासाठी पाणी दर ठरविणे आवश्यक आहे. सध्या पाण्यापासून मिळणारा महसूल कमी असल्याने पाटबंधारे प्रकल्पाचा देखभाल खर्च, दुरूस्तीचा खर्च, आस्थापनाचा खर्च इत्यादी वसूल होत नाहीत. म्हणून शास्त्रशुध्दरित्या पाणी दरात वाढ करण्यासाठी आणि मिळालेल्या महसूलाचे योग्य नियोजन करण्यासाठी पाणी व्यवस्थापनाची गरज आहे.

**९) बारमाही पिके घेणे :**

शेतीला पाणी पुरवण्याची सोय करून पीक आकृतिबंध निश्चित करून वेगवेगळ्या पिकासाठी पाण्याचे वेगवेगळे दर ठरवून शेतीत बारमाही पिके घेता येतात. शिवाय शेती व्यवसायात आधुनिक तंत्राचा, खतांचा व औषधांच्या मात्रा देता येतात. त्यामुळे कृषी उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढण्यास मदत होते. याकरिता पाणी व्यवस्थापन आवश्यक ठरते.

**१०) सरकारी महसूलात वाढ :**

पाणी पुरवठ्याच्या सोई असणाऱ्या जमिनीसाठी अधिक जमिन महसूल आकारता येतो. पाणीपट्टी आकारता येते, कृषी उत्पन्नावर कर आकारणी करून राज्य सरकारच्या महसुलात वाढ घडवून आणता येते. म्हणून पाणी व्यवस्थापन गरजेचे ठरते.

**११) अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्णता :**

अन्नधान्याच्या बाबतीत देश स्वयंपूर्ण बनविण्यासाठी शेती विकास घडवून आणणे आवश्यक असते. आणि शेती विकासासाठी पाणी व्यवस्थापन महत्त्वाचे असते. त्यामुळे पडीक व पानथळ जमिनी लागवडी खाली आणता येतात. शेती उत्पादनात वाढ होते.

**१२) पूर नियंत्रण व भूमी संरक्षण :**

जलसिंचनाच्या मोठ्या प्रकल्पामुळे पुरांचे नियंत्रण करणे शक्य झाले आहे. शिवाय पुरांमुळे जमिनीची होणारी धूप थोपविली जाते व शेतीची उत्पादकता वाढते म्हणून पाणी व्यवस्थापन आवश्यक ठरते.

**१३) औद्योगिक विकेंद्रीकरण :**

शेती पाणी पुरवठ्याच्या योजनांमुळे विविध उद्योग ग्रामीण भागात उभारता येतात. त्यामुळे उद्योगांच्या केंद्रीकरणामुळे होणारे तोटे टाळता येतात.

**१४) जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न :**

शेतीला पाण्याची सोय उपलब्ध झाल्यास शेतीत विविध पिके घेता येतात. जनावरांना खाद्यान्न उपलब्ध होवून कायमस्वरूपी ओला चारा उपलब्ध होतो. शिवाय शेतीला पुरक दुग्ध व्यवसायाचा विकास होवू शकतो. त्यासाठी पाणी व्यवस्थापनाला महत्त्वाचे स्थान आहे.

**१५) नवीन कृषितंत्राचा वापर :**

प्रकर्षित शेती पध्दतीत आधुनिक खते, बी-बीयाणे, लागवडीच्या नवीन पध्दती, किटकनाशके, इलेक्ट्रिक पंप इत्यादी अवलंब करून शेती उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न केला जातो. ठिबक सिंचन, तुषार सिंचन याचा वापर करून शेती क्षेत्रातील गुंतवणूक आणि शेतकऱ्यांची समृध्दी वाढविता येते. त्यासाठी योग्य पाणी व्यवस्थापनाची गरज भासते.

**१६) इतर घटक :**

उपलब्ध पाण्याचे व्यवस्थापन करताना पुढील घटकाकडेही लक्ष द्यावयास हवे (अ) पूर वा दुःष्काळ यावर नियंत्रण ठेवण्यासाठी अती पावसामुळे जेथे पूर येतो तेथील पाणी त्याकालखंडात दुःष्काळग्रस्त भागाकडे वळविता येईल का ? वाहून जाणारे पाणी दुर्भिक्ष आहे तेथे पोहचविता येईल का हे पाहिले पाहिजे. (ब) अतिपाण्यामुळे जमीन क्षारफुटी होते तर पाण्याचे अजिर्ण टाळण्यासाठी उपाय योजले पाहिजेत. (क) सर्व शेतकऱ्यांना न्याय देणे - केवळ श्रीमंत शेतकऱ्यालाच स्वतंत्रपणे योजना आखून शेताला पाणी देता येते, अल्पभूधारक, सीमांतशेतकरी, जीराईतशेतकरी या सर्वांना योग्य प्रमाणात पाणी देणे शक्य व्हावे याचे व्यवस्थापन व्हायला हवे.

**२.८.३ योग्य पाणी व्यवस्थापनासाठी उपाययोजना :**

भारतात भूपृष्ठावरील पाणी व भूगर्भातील पाण्याची मुबलक उपलब्धता आहे मात्र योग्य नियोजना अभावी पिण्यास तसेच शेतीला आवश्यकतेनुसार पाणी पुरवठा होत नाही. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत पाणी व्यवस्थापन हा महत्त्वाचा प्रश्न बनला आहे. सुयोग्य पाण्याच्या व्यवस्थापनाकरिता काही महत्त्वाचे उपाय पुढीलप्रमाणे सुचविता येतील.

१) जमिनीचे माती परिक्षण करून आवश्यक तेवढेच पाणी जमिनीला देणे व पाण्याचे योग्य नियोजन करणे.

२) उद्योगांना आवश्यकतेनुसार पाणी देवून एकदा वापरलेले पाणी पुन्हा शुध्द करून वापरले पाहिजे. यासाठी त्यांच्यावर सक्ती करणे.

३) पाणलोट क्षेत्र विकासाचा कार्यक्रम देशभर कार्यक्षमपणे राबविणे.

४) शेती क्षेत्रासाठी ठिबक सिंचन वापराची सक्ती करणे व त्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान देणे.

५) प्रत्येक पाणलोट क्षेत्रात सोसायटी स्थापन करून न्याय्य व नियमाने पाणी वाटप करण्याचे त्यांच्यावर बंधन घालणे.

६) फ्लो-कॅनॉल पाणी वाटपावर निर्बंध टाकून इस्त्रायलप्रमाणे नियोजनबध्द बंद नलिकेद्वारे आवश्यक क्षेत्रास न्याय्य पाणी वाटपाचा विचार व्हावा.

७) पाणी वाहून नेणाऱ्या नदी जलस्त्रोताचे संरक्षण व संवर्धन करणे. त्यासाठी नदी पात्रातील वाळू उपशावर नदी पात्राची वळणे बदलण्यावर निर्बंध घालणे.

८) शेतीतील पाणी साठवणे, टाक्या बंधारे इत्यादींच्या उभारणीसाठी लोकजागृती हवी. त्यासाठी ठोस कार्यक्रमांची अंमलबजावणी केली पाहिजे.

९) गावोगावी पाण्याचे ज्ञान माहिती, प्रगत तंत्रज्ञान, जलसाक्षरता यासारखी अभियाने राबविली जावीत.

१०) जलसंपत्तीचे जतन, संरक्षण, वापर यासाठी योग्य जलनीती आखून जबाबदार सामाजिक संस्थांचे सहकार्याने जलसाक्षरतेसाठी व्यासपीठ उभारण्यात यावे.

११) भूजलाचा वैज्ञानिक कच्चेपणा दूर करून भूजलाची उपलब्धता, वापर याचे अज्ञान दूर करून जलसाक्षरतेचे अभियान गावोगावी पोहचवावे.

१२) पाण्याचा वापर व उपलब्धतेविषयी समतोल दृष्टिकोन असावा.

१३) आधुनिकीकरण, औद्योगिकरण व नागरिकीकरण यांचा विचार करून दीर्घकाळासाठी जलनिती आखली जावी.

१४) पाण्याचा खर्च भरून निघेल असा पाण्याचा दर ठरवावा. कोणलाही मोफत पाणी देवू नये. पाणी बिल वसुलीची यंत्रणा कार्यक्षम करावी.

१५) प्रदुषण विरहीत विकास साधण्यासाठी वनस्पती आणि प्राणी मात्रांच्या जैवविविधतेचा नाश होणार नाही,मत्स्य प्रजातीची हानी होणार नाही, हवा, पाणी, जमीन यांचे प्रदुषण वाढणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे.

१६) गंगा-कावेरी प्रकल्प पूर्ण करणे, हिमालयातून वाहणाऱ्या नद्यांना बारमाही पाणी असते. नदीतील ९०% पाणी समुद्राला जाऊन मिळते. अनिश्चित मानसूनच्या परिस्थितीमुळे ७५% शेतजमीन जिरायत आहे. दक्षिण भारतातील कावेरी नदीपर्यंतचा प्रदेश विविध नद्या जोड प्रकल्पातून जोडला गेला तर उपलब्ध पाण्याचा कार्यक्षमतेने वापर करण्याची संधी उपलब्ध होईल. सिंचीत क्षेत्रात लक्षणीय वाढ होईल. भारत अन्नधान्य निर्मितीचे कोठार बनेल.

पाणी हा एक गंभीर प्रश्न आहे. त्याचा गांभीर्याने विचार झाला पाहिजे. भविष्यकाळात युध्दे ही पाण्यावरून होतील असे अनेक विचारवंत भाकित करत आहेत. त्यामुळे आपले सामर्थ्य वाढविण्यासाठी पाणी व्यवस्थापनाची गरज आहे. दिर्घकाळात चिरस्थाई विकास करण्यासाठी पाणी व्यवस्थापन ही बाब अत्यंत महत्त्वाची आहे.

## २.९ शेतमजूर (Agricultural Labour) :

ज्या श्रमिकाला शेतीकामासाठी आपली श्रमशक्ती उपलब्ध करून देवून मिळणाच्या मोबदल्यात जीवन जगावे लागते त्याला शेतमजूर असे म्हणतात. शेती व्यवसायात विविध प्रकराची कामे करून मिळणाऱ्या मजुरीवर जगणारा श्रमीक म्हणजे शेतमजूर होय.

### २.९.१ व्याख्या :

प्रथम शेतमजूर चौकशी समिती (१९५०-५१) : ज्या श्रमीकाला आपल्याला मिळणाऱ्या उत्पन्नातील ५०% किंवा त्यापेक्षा जास्त उत्पन्न दुसऱ्यांच्या मालकीच्या शेतावर काम करून मिळवावे लागते त्याला शेतमजूर असे म्हणतात. द्वितीय शेतमजूर चौकशी समिती (१९५६-५७): श्रमिकाला जे उत्पन्न मिळते त्यापैकी निम्यापेक्षा जास्त उत्पन्न दुसऱ्यांच्या शेतावर किंवा शेतीआधारित व्यवसायात काम करून मिळवावे लागते. उदा. पशुपालन, दुग्ध व्यवसाय, कुकुटपालन इ. त्या श्रमिकाला शेतमजूर असे म्हणतात.

राष्ट्रीय श्रमिक आयोग (National Labour Commission) शेतीकामासाठी आपली श्रमशक्ती विकून किंवा शेती आधारित व्यवसायात मोबदला मिळविण्याच्या हेतूने काम करून आपल्या उत्पन्नाचा मोठा हिस्सा मिळविणारा श्रमिक म्हणजे शेतमजूर होय. असे श्रमीक अकुशल व असंघटीत असतात.

जनगणना समिती : (१९६१) जो कामगार दुसऱ्यांच्या मालकीच्या शेतीवर काम करून पैशाच्या वा वस्तूच्या रूपात मोबदला मिळवितो त्याला शेतमजूर असे म्हणतात.

वरील व्याख्येवरून शेतमजूर म्हमजे अशी व्यक्ति कि जी श्रमशक्ती विकून मिळणाऱ्या उत्पन्नातून जीवन जगते. ती आपली श्रमशक्ती शेतीकामासाठी उपलब्ध करून देते. शेती व्यवसायातील विविध कामासाठी ती तयार असते. दुसऱ्यांच्या शेतावर काम करायला जावून मिळणाऱ्या रोजगारीवर त्याला अवलंबून रहावे लागते. त्याला एका वर्षाच्या काळात जे उत्पन्न मिळेल त्यातील ५०% पेक्षा जास्त उत्पन्न शेती कामाच्या मजुरीच्या रूपाने मिळवावा लागतो. शेतीबरोबरच तो शेती आधारित उद्योगात काम करूनही रोजगार मिळवेल, तसेच बीगर शेती कामातूनही उत्पन्न मिळवेल पण असे उत्पन्न हे फार कमी असेल. थोडक्यात शेती वा शेती आधारित व्यवसायातून काम मिळवून होणाऱ्या प्राप्तीवर जीवन जगणाऱ्या श्रमिकाला शेतमजूर असे म्हणतात.

**२.९.२ शेतमजुरींचे प्रकार :**

सर्वच शेतमजूर एकाच गटात वा वर्गात मोडणारे नसतात. कांहीची आर्थिक स्थिती चांगली तर कांहीची स्थिती वाईट तर कांहीची स्थिती दयनिय असते.

**अ) किफायतशील स्थिती असणारे शेतमजूर :** ज्या शेतकऱ्याकडे शेतजमीन आहे व त्यांच्याकडे असणाऱ्या शेतजमिनीतून शेती खर्च वजा जातो जे उत्पन्न शिल्लक राहते त्या उत्पन्नातून त्यांना किमान जीवन जगता येते. पण त्यांच्याकडे जी शेतजमीन आहे त्यामध्ये कुटुंबातील सर्व श्रमिकांना रोजगार मिळत नाही. (म्हणजे कुटुंबातील उपलब्ध श्रमशक्ती स्वत:च्या शेतीकामासाठी पूर्णपणे वापरता येत नाही) स्वत:च्या शेतात जेंव्हा काम उपलब्ध होत नाही त्यावेळी ते दुसऱ्यांच्या शेतावर काम करायला जातात. म्हणजे असे कामगार नैमित्तीक शेतमजूर बनतात, प्रसंगानुसार शेत मजूर बनतात. भारतात अशा शेतमजूरांची संख्या खूप कमी आहे व असे शेतमजूर आर्थिक दृष्ट्या चांगल्या स्थितीत असणारे आहेत.

**ब) अल्पभूधारक शेतमजूर :** ज्यांच्याकडे स्वत:ची थोडीफार शेती आहे पण ती शेती कमी प्रमाणात असल्यामुळे त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नात शेतकरी व त्याच्या कुटुंबातील सदस्यांना किमान जीवन जगणे शक्य होत नाही. त्यामुळे जीवन जगण्यासाठी अशा अल्पभूधारकांना, दुसऱ्यांच्या शेतावर जावून काम करून उत्पन्न मिळविले तरच जीवन जगता येते. भारतामध्ये सुमारे ५५% शेतकरी एक एकरपेक्षा कमी जमीन असणारे शेतकरी आहेत. त्यांना जीवन जगण्यासाठी स्वत:च्या शेतीवर अवलंबून राहून चालत नाही. दुसऱ्यांच्या शेतावर कामगार म्हणून काम करून उदरनिर्वाह करावा लागतो. म्हणजे या गटातील शेतमजूरांची संख्याही मोठी आहे.

**क) भूमीहीन शेतमजूर :** ज्याच्याकडे स्वत:च्या मालकीची थोडीही शेतजमीन नाही पण शेतात काम करूनच मिळणाऱ्या मोबदल्यामध्ये जीवन जगावे लागते अशा व्यक्तिला, त्याच्या कुटुंबाला भूमीहीन शेतमजूर असे म्हणतात. भारतातील ग्रामीण लोकसंख्येपैकी सुमारे २५% लोकसंख्या ही भूमीहीन शेतमजूरांची आहे. शेतीवर, शेतीआधारित व्यवसायावर काम करून जी मजूरी मिळेल त्यावर उदरनिर्वाह करावा लागतो. काम मिळाले नाही तर उत्पन्न नाही म्हणून उपासपोटी, अर्धपोटी, दयनिय अवस्थेत रहावे लागते.

**ड) वेठबिगार :** जमीन मालकांच्या बंधनात राहून, त्यांच्या इच्छेप्रमाणे ज्या लोकांना काम करावे लागते, जमीन मालक देईल ती मजूरी, देईल ते काम करावे लागते. अशा श्रमिकांना वेठबिगार असे म्हणतात. स्वातंत्र्यपूर्व काळात अशी वेठबिगारी होती. स्वतंत्र्यानंतर कायद्याने वेठबिगारी रद्द केली आहे. पण

अठराविश्वे दारिद्र्यामुळे कांही लोकांना जमीन मालकाकडून कोणत्याना कोणत्या तरी कारणामुळे कर्ज काढावे लागते व त्यापोटी जमीन मालकाच्या मर्जीप्रमाणे, तो देईल ते काम, सांगेल त्यावेळी काम व देईल त्या मोबदल्यात काम करावे लागते. या वेठबिगारीतील श्रमिकाना जमीन मालकाच्या गुलामाप्रमाणे वागावे लागते. मोठे जमीन मालक छुप्या पध्दतीने अशी वेठबिगारीतील लोकांची नेमणूक करत असतात.

वेठबिगारी कायद्याने रद्द केल्यामुळे जमीनमालक श्रमीकांना वेठबिगार म्हणून नेमत नाही पण कांही बंधने लादून कामगाराकडून काम करवून घेतात त्यांना 'गडी' असेही म्हणतात. कांही लोक स्वत:च्या मर्जीनुसार शेतकऱ्याचे गडी म्हणून काम करत असतात – अशा लोकांचीही संख्या कमी असते पण त्यांची स्थिती गुलामाप्रमाणे असते.

**२.९.३ भारतातील शेतमजुरांची संख्या :**

शेतमजुर चौकशी आयोग, भारतीय जनगणना समिती, सर्व्हेक्षण यावरून भारतातील शेतमजुरांची संख्या किती आहे हे कळते. एकूण लोकसंख्यपैकी शेतमजूरांचे प्रमाणही लक्षात येते.

| **वर्ष** | **१९५१** | **१९६१** | **१९७१** | **१९८१** | **१९९१** | **२००१** |
|---|---|---|---|---|---|---|
| शेतमजूरांची संख्या कोटी | २.७५ | ३.१५ | ४.७५ | ५.५४ | ७.४६ | ९.६० |
| लोकसंख्येमध्ये शेकडा प्रमाण | -- | -- | २६.९% | २५.१% | २६.५% | २६% |

वरील तक्त्यावरून असे लक्षात येते की, शेतमजूरांची संख्या प्रचंड आहे व ती वाढत आहे. देशातील चार मजूरापैकी एक शेतमजूर असे त्यांचे प्रमाण आहे.

**२.९.४ शेतमजूरांच्या समस्या :**

भांडवलशाही अर्तव्यवस्थेत आर्थिक विषमता असते. कांही लोकांचे उत्पन्न जास्त, उत्पन्न मिळविण्याची साधने जास्त तर कांही लोकांच्याकडे उत्पन्न मिळविण्याची साधने नसतात व श्रमशक्ती विकून मिळणारे उत्पन्न इतके कमी असते की त्यामध्ये किमान जीवनही जगता येत नाही. त्यांच्या समोर आर्थिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक अशा अनेक समस्या असतात. भारतातील शेतमजूराचा वर्ग हा अन्य कोणत्याही प्रकारच्या कामगार वर्गापेक्षा (उदा. औद्योगिक कामगारांचा वर्ग, सेवाक्षेत्रातील कामगारांचा वर्ग, माथाडी कामगारांचा वर्ग इ.) मोठा आहे. त्यांच्या समोर पुढील अनेक अडचणींचा ढीग आहे, डोंगर आहे.

**१) मजूरीचे दर अल्प :** शेतीकामासाठी, शेती आधारित व्यवसायातील कामासाठी शेतमजूराला फार कमी मजुरी मिळते. अर्थात त्यांना अकुशल स्वरूपाचे काम करावे लागते, कामाचे स्वरूप साधे असते पण मजूरीच्या रूपात मिळणारा मोबदला इतका अल्प असतो की त्या मोबदल्यात मजूराचा, मजूराच्या कुटुंबियांचा उदरनिर्वाह चालविणे शक्य होत नाही. इतर कोणत्याही वर्गाच्या कामगारापेक्षा शेतमजूरांचे वेतन हे १/३ ते १/१० इतके कमी आढळून येईल. शेतमजूर असंघटीत असल्याने शेतमालक देईल तितकी मजूरी त्यांना स्विकारावी लागते. शेतमजूरांची सौदाशक्ती कमी असल्याने अल्प वेतनात काम करावे लागते. अल्प वेतनामुळे त्यांना आपल्या सर्व गरजा पूर्ण करता येत नाहीत. पुरेसा आहारही घेता येत नाही, कपडे, घर, शिक्षण, आरोग्य सेवा मिळविता येत नाही.

**२) वर्षभर रोजगार (काम) मिळत नाही :** भारतात नैऋत्य मोसमी वाऱ्यापासून, हंगामी स्वरूपाचा पाऊस पडतो. शेतात पीक असे पर्यंत शेतमजूरांना रोजगार मिळतो. अजूनही ७६% शेतजमीन जीराइत आहे

त्यामुळे कोट्यावधी शेतमजूरांना शेतीत हंगामी काम मिळते. अनेक दिवस बेरोजगारात रहावे लागल्याने व त्यातच मजूरी दरही कमी असल्याने त्यांना मोठ्या प्रमाणात दारिद्र्यात रहावे लागते.

३) **रोजगार विषयक अटी प्रतिकूल :** ग्रामीण भागात शेतमजूरांची संख्या जास्त पण त्यांची शेतीकामासाठी मागणी कमी त्यामुळे सर्वच शेतमजूरांना रोजगार मिळत नाही. जे बेकार असतात ते प्रचलित वेतनदरापेक्षा कमी मोबदल्यात काम करायला तयार असतात. शिवाय शेतमजूर असंघटीत असल्यामुळे त्यांची सौदाशक्ती कमी असते. दररोज काम करून वेतन मिळवावे लागते. आहे त्या स्थितीत काम करावे लागते. त्यामुळे रजा, सुट्टी, पेन्शन, ग्रॅच्युईटी वा इतर भत्ते याची सोय नाही. कामाची शाश्वती नाही.

४) **निरक्षरता व अज्ञानीपणा :** शेतमजूरांची कामाची शाश्वती नाही, मजूरीदर कमी त्यामुळे ते दारिद्र्यात राहतात, शिक्षणाची संधी मिळत नाही. निरक्षरतेमुळे अकुशल स्वरूपाचे काम करावे लागते. त्यामुळे मजूरीवर कमी स्विकारावा लागतो. कोणत्याही स्वरूपाचे शिक्षण नसल्याने अज्ञानीपणा व धर्माचा, परंपरागत विचारसरणीचा पगडा, भुत्ते-खेते, धार्मिक समजुती, बुवाबाजी याचा प्रभाव असतो. मुलांना शिक्षण देता येत नाही म्हणून मुलेही निरक्षर.

५) **शेती व शेतीआधारित रोजगाराशिवाय पर्याय नाही :** ग्रामीण भागात उद्योग धंदे फार कमी आहेत, सेवा व्यवसायाचा फारसा विकास नाही. शेतमजुरांना शेतीव्यवसायात व अन्यशेती आधारित व्यवसायातच रोजगार शोधावा लागतो. वाढत्या लोकसंख्येमुळे श्रमाचा पुरवठा वाढतोपण उद्योग व्यवसायात रोजगार संधी फारसी नसल्याने बहुसंख्य श्रमिकांची शेतीक्षेत्रात गर्दी होते. परिणामी उघड बेकारी, अर्ध बेकारी आणि लपलेली बेकारी शेती व्यवसायात दिसून येते.

६) **कर्जबाजारीपणा :** शेतीत काम करायला तयार असणाऱ्या श्रमिकांची संख्या जास्त, पण मागणी कमी, परिणामी मजुरी दर अल्प त्यातच हंगामी रोजगार यामुळे निर्माण होणारे दारिद्र्य जीवन जगण्यासाठी कर्जावर अवलंबून रहावे लागते. कर्ज सावकार, शेतकरी, भिशी यातून घ्यावे लागते. रोजगार अनिश्चित. त्यामुळे घेतलेले कर्ज परत करता येत नाही. सावकारी व्याज भरूनच शेतमजूर दमतो, मुद्दल फिटत नाही. बहुसंख्य शेतमजुरांच्या डोक्यावर कर्ज आहे. ५५ ते ६०% शेतमजूर कर्जबाजारी आहेत. मिळणाऱ्या उत्पन्नातून व्याजापोटी रक्कम जाते. उपभोगासाठी उत्पन्न शिल्लक रहात नाही. भारतीय शेतमजूर कर्जात जन्मतो, कर्जात वाढतो व कर्जामध्येच मरण पावतो.

७) **हिन सामाजिक दर्जा :** भारतीय समाजात पिढ्यानपिढ्या ज्यांना हिन म्हणून ओळखले गेले, ज्यांचा सामाजिक दर्जा कमी होता असे उपेक्षीत लोक, शेमजूर म्हणून काम करतात. त्यांना आपला हक्क प्रस्थापित करता आला नाही. त्यामुळे कमी दर्जाचे राहणीमान जगावे लागते.

८) **वाढती महागाई :** भारताच्या स्वातंत्र्यानंतरच्या काळात विकास प्रक्रिया गतीमान करण्यांमुळे भाववाढीची परिस्थिती उद्‌भवली. वाढती लोकसंख्या, तुटीचा अर्थभरणा, शेतीचा मागासलेपणा यामुळे वेगाने भाववाढ झाली. भाववाढीच्या कालात शेतमजूरांचे वेतन, भाववाढीच्या प्रमाणात वाढले नाही त्यामुळे त्यांचे वास्तव राहणीमान खालावले. समाजातील हा शेतमजूरांचा वर्ग महागाईमुळे आनखीन गरीब झाला.

९) **ग्रामीण भागातील लघु व कुटीरोद्यागाचा ऱ्हास :** इंग्रज येण्यापूर्वी खेडी स्वावलंबी होती. पण ब्रिटीश भारतात आले व त्यांनी इंग्लंडमधल्या औद्योगिक वस्तू भारतात विकण्यासाठी हक्काची बाजारपेठ निर्माण केली. परिणामी भारतातील लघु व कुटीरोद्यागांचा ऱ्हास झाला. स्वातंत्र्यानंतर औद्योगिक विकास साधण्यासाठी केलेल्या प्रयत्नामुळे औद्योगिक वस्तूंची बाजारपेठ वाढली. पण लघु व कुटीरोद्योगांच्या वस्तूंची मागणी घटली. कमी मागणी, वस्तूंचा दर्जा कमी, किंमती जास्त यामुळे हळू हळू लघू कुटीरोद्योग

बंद पडले. शेतमजूरांचा शेती पर्यायी रोजगार बुडाला. त्यांचे दुय्यम उत्पन्न घटले. आर्थिक परिस्थिती खालावली.

१०) **व्यसनाधिनता :** कुटुंबातील दारिद्रय, निरक्षरता, अज्ञानीपणा, उत्पन्न कमी उपासपोटी, अर्धपोटी रहावे लागते. आरोग्याच्या सोई मिळविता येत नाहीत. त्यातच बेकारी यामुळे बहुसंख्य शेतमजूर परस्पर संगतीने कोणत्याना कोणत्यातरी व्यवसनाच्या आहारी जातात. विड्या ओढणे, तंबाखू खाणे, दारू पिणे, अफू, चरस, गांज्या इ. सवयीच्या आहारी जातात. दु:ख, अपमान, नैराश्य, उणेपणा विसरण्यासाठी व्यसनात गुंतून पडतात. अपुरी मिळकत व्यसनासाठी खर्च करतात. त्यामुळे दारिद्रयाच्या खोल गर्तेत ते रूतून बसतात.

११) **दारिद्रय :** शेतमजूरांच्या दृष्टीने जी सामाजिक व राजकीय परिस्थिती आहे ती प्रतिकूल असते. दारिद्रयामुळे उपासपोठी, अर्धपोटी रहावे लागते. शरीर प्रकृत्ती चांगली राखता येत नाही. आजारी पडल्यास वैद्यकिय सोई मिळविता येत नाहीत. मुला बाळांना शिक्षण देता येत नाही.

शिक्षणाअभावी व्यावसायईक कौशल्ये मिळविता येत नाहीत. व्यसनीपणामुळे उत्पन्नाचा दुरूपयोग, शरीर प्रकृत्ती खालावते, भांडवला अभावी स्वत:चा उद्योग व्यवसाय सुरू करता येत नाही. धार्मिक गैर समजुती, बुवाबाजी यामुळे शेतमजूरी करणारे लोक दारिद्रयात खितपत पडतात. दारिद्रय हेच त्यांच्या प्रगतीतील अडथळा ठरतो.

१२) **समाज व सरकारची उदाशिनता :** समाजातील सधन वर्गाला कमी उत्पन्न मिळवून देणारी कामे, शारिरिक कष्ठाची कामे स्वत:ला करता येत नाहीत व ती कामे करणारा वर्ग कमी मोबदल्यात मिळतो अशी परिस्थिती टिकून रहावी असे वाटते. त्यामुळे शेतमजूरांचा आर्थिक विकास व्हावा यासाठी ते प्रयत्न करत नाहीत. सरकारही राजकिय स्वार्थासाठी, एक गठ्ठा मतासाठी निवडणूकीपुरताच शेतमजूरांचा वापर करते. त्यांच्या आर्थिक परिस्थितीत अमुलाग्र सुधारणा व्हावी यासाठी ठोस उपाय योजत नाही.

१३) **कुटुंबातील जन्मदर जास्त :** कुटुंबाचे दारिद्रय, निरक्षरता, अज्ञान, परंपरागतवृत्ती त्यामुळे लहान वयात होणारे विवाह, अपत्य संख्या वाढते. कमी उत्पन्नामुळे कुटुंब नियोजन साधनांचा वापर नाही. करमणूक सोईचा अभाव परिणामी कुटुंबातील अपत्यांची संख्या वाढत राहते. अपत्यांचे योग्य संगोपण संवर्धन होत नाही. बालमृत्युचे प्रमाण जास्त स्त्रियांच्या आरोग्यावर दु:ष्परिणाम होतात.

१४) **असंघटीत :** शेतमजूर सर्व देशभर पसरले आहेत. त्यांची संख्या मोठी आहे. ते अल्पशिक्षीत, अशिक्षीत आहेत. त्यांच्या गरीबीमुळे संघटनेची फी देवू शकत नाहीत. परिणामी त्यांच्या संघटना नाहीत. असंघटीतपणामुळे वेतनवाढ, आर्थिकपरिस्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न होत नाही.

वरील प्रकारे शेतमजूरांच्या समोर अनेक समस्या आहेत. अडचणी आहेत. त्यामुळे भारतातील संख्येने मोठा असणारा वर्ग गरीबीत दिवस कंठत आहे. उपेक्षीत जीवन जगत आहे. शेतमजूरांचे दारिद्रय, त्यांचा मागासलेपणा हा भारतीय अर्थव्यवस्थेला लागलेला कलंक आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून ६० वर्षे उलटून गेल्यावरही या वर्गाला बेकारी, दारिद्रय, उपासपोटी, अर्धपोटी, बेघरपणाचे जीवन जगावे लागत आहे.

### २.९.५ शेतमजूरांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी उपाय योजना/सूचना

भारतीय शेतमजूरांची दयनिय अवस्था, त्यांच्या विविध आर्थिक समस्यांची कल्पना सरकारला आहे. त्यांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी सरकारने विविध उपाय योजले आहेत पण शेतमजूरांची संख्या जास्त, असल्यामुळे योजलेले उपाय अपुरे पडतात.

१) **वेठबिगारीची पध्दत बंद केली :** १९५० मध्ये कायदा केला. कोणत्याही प्रकारच्या गुलामगिरीस कायद्याने बंदी केली आहे.

२) **विविध समित्या नेमून शेतमजूरांची स्थिती जाणून घेतली :** १९५०-५१ मध्ये पहिली शेतमजूर चौकशी, १९५६-५७ मध्ये दुसरी शेतमजूर चौकशी समिती, १९६३-६४ मध्ये राष्ट्रीय नमुणा पाहणी, १९७५ मधील ग्रामीण मजूर चौकशी समिती, १९७७-७८, १९८३, १९९१ या वर्षी पुन्हा समित्या नेमल्या. समस्या जानून त्यांच्या शिफारशीवर विचार केला.

३) **जमीन :** सुधारणा कायदे - शेती कसणाऱ्याला जमीनीची मालकी मिळावी, खंड निश्चिती, कूळ कायदे यासारखे शेती संस्थात्मक सुधारणा कायदे केले त्याचा कुळे व शेमजूर यांचा फायदा झाला.

४) **शेतजमीनीची फेरवाटणी :** भूधारणेवर कमाल मर्यादा घालून उपलब्ध झालेली जमीन अल्पभूधारकांना, शेतमजूरांना उपलब्ध करून देण्यात आली. आचार्य विनोबा भावे यांनी 'भूदान चळवळ' सुरू करून मिळालेली सुमारे ४४ लक्ष एकर जमीन भूमीहीन शेतमजूरांना देण्यात आली.

५) **बेघरांना घरे :** ग्रामीण भागातील स्वत:ची घरे नसणाऱ्या लोकांना इंदिरा आवास योजनेतून वीस कलमी कार्यक्रमातून, राज्यसरकारी योजनेतून त्यांच्या मालकीची घरे बांधून देण्यात आली.

६) **किमान वेतन कायद्याची अंमलबजावणी :** शेतमजूरांना कोणत्या कामासाठी दररोजचे किमान वेतन किती असावे हे ठरवून तितकी मजूरी त्यांना दिली जाते की नाही याची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य सरकारांनी तरतूद केली आहे.

७) **सहकारी शेतीचा अवलंब :** अल्पभूधारक, सीमांत जमीनधारकांनी एकत्र येवून सहकारी शेती संस्था सुरू केली तर त्यांना अनेक फायदे मिळतात. सरकारकडून सवलती मिळतात. त्यामुळे सभासदांचा फायदा होतो. शेतीत रोजगार निर्मिती होवून शेतमजूरांचा फायदा होतो.

८) **शेती विकासाचे कार्यक्रम :** देशात हरीत क्रांती घडवून आणली आहे. सरकार, शेतकरी, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, यंत्रज्ञ, कृषी विद्यापीठे, सरकारी यंत्रणा, शेती सुधारक या सर्वांच्या प्रयत्नाने हरीत क्रांती घडून येवू शकली. त्यामुळे शेतीव्यवसायातील सर्व घटकांचा फायदा झाला आहे. शेतमजूरांच्या रोजगारीत वाढ होण्यास मजूरी दर वाढण्यास मदत झाली.

९) **ओलीताखालील क्षेत्रात वाढ :** गेल्या ५० वर्षात भारतात लहानमोठी सुमारे ४,००० धरणे बांधली आहेत व त्यावर २,५०,००० कोटी खर्च झाले आहेत. लागवडीखालील जमीनीपैकी ३९% जमीन ओलीताखाली आनल्याने शेतीव्यवसायात रोजगारी वाढविता आली.

१०) **ग्रामीण उद्योगांची स्थापन:** वेगवेगळ्या ७०० वस्तूची निर्मिती लघू व कुटीरोद्यागातून व्हावी अशी तरतूद करून ते उद्योग त्यांच्यासाठी राखून ठेवले त्यामुळे त्यांची निर्मिती करायला संधी मिळून लघू व कुटीरोद्योग वाढायला मदत झाली आहे. त्यामुळे शेतीपर्यायी रोजगार निर्माण होवून त्याचा फायदा शेतमजूरांना मिळणार आहे.

११) **शिक्षण प्रसार :** भारतात शिक्षण प्रसाराकरीता जे प्रयत्न झाले आहेत त्यामुळे लाखो लोकांना शिक्षण देण्याची व्यवस्था निर्माण झाली आहे. शिक्षणामुळे अज्ञानपणा कमी व्हायला मदत झाली आहे. विविध कौशल्ये आत्मसात करून उत्पादन कार्यात शिक्षीत श्रमीक सहभागी होत आहेत. शिक्षणाचा फायदा शेतमजूर वर्गातही होत आहे.

१२) **सार्वजनीक कामे :** केंद्र व राज्य सरकारांनी सार्वजनीक कल्याणासाठी विविध कार्ये केली आहेत. उदा. गावात सार्वजनीक वापराच्या इमारती बांधणे, सरकारी कार्यालये, शिक्षण व आरोग्य संस्थाच्या इमारती, रस्ते, पूल, धरणे, पिण्याची सोय, सांडपाण्याची सोय, वनसंवर्धन, स्वच्छतागृहे, वाचनालये, व्यायामशाळा, सांस्कृतिक मंदिरे वगैरे यामुळे ग्रामीण रोजगारात वाढ होवून शेतमजूरांना रोजगारी मिळाली.

१३) **देशाचे जलद औद्योगिकरण घडवून आणणे :** आर्थिक विकासाचा वेग वाढविण्यासाठी जलद औद्योगिकरणावर भर त्यानुसार औद्योगिक धोरणात अनुकूल बदल करणे, विकास बँकांची स्थापना, बँकांचे राष्ट्रीयीकरण, सार्वजनीक संस्थांची निर्मिती, वाहतूक सोई-साधनात वाढ, भांडवली वस्तू निर्मितीत वाढ, शिक्षण सुविधेत वाढ, कामगार मालक संबंध सुधारणा केल्या. औद्योगिकरणामुळे उद्योगात रोजगाराची संधी मिळाली. ग्रामीणभागातील लोकांना नवे क्षेत्र उपलब्ध झाले.

१४) **शेती आधारित उद्योगांची स्थापना व विकास :** साखर कारखाने, सूतगिरण्या, यंत्रमाग, कापड गिरण्या, दुध प्रक्रिया केंद्र, ताग गिरण्या, खाद्यतेल निर्मिती, बेकरी, पिठाच्या चक्या, फळ प्रक्रिया उद्योग, इत्यादी उद्योगांच्या निर्मितीमुळे ग्रामीण रोजगारात वाढ व्हायला मदत झाली आहे. शेतीला पर्यायी रोजगार निर्माण होवून शेतीतील श्रमीकांना फायदा मिळाला.

१५) **शेतमजूरांच्या संघटना :** शेतमजूर संघटीत व्हावेत, त्यांची सौदाशक्ती वाढावी यासाठी समाज सेवकांनी त्यांच्या संघटना निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. राजकिय पक्षानीही प्रयत्न करून त्यांच्या संघटना निर्माण केल्या आहेत.

१६) **एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम :** खेड्याच्या सर्वांगिण विकासासाठी, शेतमजुरांच्या रोजगारात वाढ करण्यासाठी ही योजना सुरू केली आहे. लहानशेतकरी विकास प्राधिकरण, सीमांत शेतकरी व शेतमजूर विकास प्राधिकरण, दु:ष्काळ प्रवणक्षेत्र विकास कार्यक्रम, लाभक्षेत्र विकास कार्यक्रमांचे एकत्रीकरण करून ही योजना राबविली जात आहे. याचा फायदा इतराप्रमाणे शेतमजूरांना होत आहे.

१७) **इतर योजना :** राज्यसरकार व केंद्रसरकारांनी अनेक कल्याणकारी योजना राबविल्या आहेत. त्याचा फायदा शेतमजूरांना देखिल होतो. उदा. अंत्योदय योजना, रोजगार हमी योजना, कोरडवाहू शेती विकास कार्यक्रम, डोंगराळभाग विकास कार्यक्रम, ग्रामीण भूमीहीन मजूरासाठी रोजगार हमी कार्यक्रम, पंतप्रधान सडक योजना, जवाहर रोजगार योजना, कामासाठी अन्नधान्य योजना, भारतनिर्माण योजना, ट्रायसेम योजना वगैरे या विविध योजनांचा शेतकरी, शेतमजूर व अन्य लाभार्थी यांना त्याचा फायदा होत आहे.

## २.९.६ सारांश :

आपल्या सभोवती उपलब्ध असलेली परिस्थिती म्हणजे पर्यावरण, भारतीय अर्थव्यवस्थेतील शेतीक्षेत्र कसे आहे याचा अभ्यास या प्रकरणात करावयाचा आहे. स्वातंत्र्या वेळी शेती व्यवसाय व सद्यस्थितीतील शेती व्यवसाय यातील बदल समजावून घेतले पाहिजेत. शेती व्यवसायात बदल घडवून आणण्यासाठी जाणीवपूर्वक व योजनाबध्द प्रयत्न करण्यात आले आहेत. कृषीक्षेत्रात क्रांती घडवून आणण्यासाठी (अ) संस्थात्मक बदल (ब) तांत्रिक सुधारणा घडवून आणल्या. तांत्रिक सुधारणेचा भाग म्हणून शेतमाल विक्री व्यवस्थेत सुधारणा घडवून आणल्या. शेतमालाच्या किंमतीतील मोठ्याप्रमाणातील वाढ-घट रोखण्यासाठी उपाय योजले. शेतकरी, प्रक्रियासंस्था व उपभोक्ते यांच्या हिताचा विचार करून शेतमालाची किंमत ठरवून ती स्थिर ठेरण्याचा सरकारने प्रयत्न केला. सार्वभौम असणारा उपभोक्ता आपल्या गरजेइतके अन्नधान्य आपल्या उत्पन्नातून विकत घेवू शकेल अशी व्यवस्था करण्याचा सरकारने प्रयत्न केला आहे. देशातील वाढत्या लोकसंख्येला पुरेसे व सकस अन्नधान्य मिळावे म्हणून सिंचित क्षेत्रामध्ये वाढ करण्याचा प्रयत्न केला

आहे. त्यादृष्टिने शेतजमीन व पाणी याचा कार्यक्षमतेने वापर करण्यासाठी पाणी व्यवस्थापन धोरण स्विकारले आहे. शेतीशी संबंधीत पण उपेक्षीत घटक म्हणजे शेतमजूर. शेतमजूरांचीआर्थिक स्थिती सुधारल्याशिवाय शेतीचा विकास होणार नाही. म्हणून शेतमजुरांची स्थिती सुधारण्यासाठी विविध उपाय योजण्यात आले आहेत. वरीलप्रकारे कृषीक्षेत्रात कोणते बदल घडून आले आहेत याची माहिती या प्रकरणातून करून घ्यावयाची आहे.

### स्वयं अध्ययनासाठी प्रश्न (Check Your Progress)

**अ) चूक की बरोबर ते सांगा.**

१. भारतातील जमिनसुधारणा विषयक कायद्यांना संस्थात्मक सुधारणा असे म्हणतात.

२. शेतकरी शेतीव्यवसायात ज्या सुधारणा घडवून आणतो त्याला तांत्रिक सुधारणा असे म्हणतात.

३. निसर्गत:च शेतमालाची प्रत एकसारखी असते.

४. शेतमालाला योग्य किंमत मिळेपर्यंत शेतमाल साठवूण ठेवण्याची शेतकऱ्याची क्षमता म्हणजे 'धारण क्षमता' होय.

५. शेतमालाच्या उत्पादन खर्चापेक्षा, शेतमाल विकून जास्त किंमत मिळाली पाहिजे या धोरणाला 'व्यापारी धोरण' असे म्हणतात.

६. शेतमाल विक्रीमध्ये, मध्यस्थांची लांबलचक साखळी भारतीय शेतकऱ्यांच्या दारिद्र्याला कारणीभूत आहे.

७. सर्वसामान्य शेतकऱ्यांना अयोग्य वेळी, अयोग्य किंमतीला, अयोग्य ठिकाणी शेतमाल विकावा लागल्याने तोटा सहन करावा लागतो.

८. प्रक्रियायुक्त शेतमाल नेसर्गिक शेतमालापेक्षा कमी किंमतीला विकला जातो.

९. नियंत्रीत बाजारपेठेवर शेतमाल खरेदी-विक्री व्यवस्थेतील मध्यस्थांचा जास्त प्रभाव असतो.

१०. शेतमालाची प्रतवारी तपासण्यासाठी कानपूर या ठिकाणी मध्यवर्ती प्रयोगशाळा आहे.

११. शेतमालाच्या बाजारपेठेत शेतकऱ्यांनी शेतमाल विकायला आनला तर त्याच्या वेस्टनावर AGMARK हा शिक्का मारायला परवानगी दिली जाते.

१२. राज्य वखार महामंडळ देशातील महत्त्वाच्या शहरात गुदामे बांधते.

१३. केंद्र सरकारने शेतमाल विपणन व तपासणी मंत्रालय स्थापन केले आहे.

१४. महाराष्ट्र सरकारने NAFED ही संस्था उभी केली आहे.

१५. राज्य सरकार, ज्या किंमतीला बाजारात आलेला शेतमाल पूर्णपणे खरेदी करण्याचे आश्वासन देते त्याला 'किमान आधारभूत किंमत' असे म्हणतात.

१६. भारतात १९६२ पासून मेट्रीक परिमाणे वापराचा कायदा सक्तिचा केला आहे.

१७. गरिबातील गरीब व्यक्ती आपल्या भूकेची गरज भागवू शकेल अशी परिस्थिती निर्माण करणे म्हणजे अन्नसुरक्षा होय.

१८. उपलब्ध पाण्याचा काटकसरीने व पर्याप्त वापर करणे म्हणजे पाणी व्यवस्थापन होय.

१९. आपल्या वार्षिक उत्पन्नाच्या निम्याहून अधिक उत्पन्न दुसऱ्यांच्या शेतावर काम करून मिळवत असेल त्याला शेतमजूर असे म्हणतात.

२०. भारतीय शेतमजूरांची दैन्यवस्ता म्हणजे अर्थव्यवस्थेला लागलेला कलंक आहे.

२१. औद्योगिक उत्पादनाच्या किंमतीपेक्षा शेतमालाच्या किंमतीत जास्त चढउतार होतात.

२२. शेतमालाच्या विक्रीव्यवस्थेतील मध्यस्थांची संख्या कमी केली तर ग्राहक व उत्पादक या दोघांचा फायदा आहे.

२३. नियंत्रीत बाजारपेठेमध्ये औद्योगिक वस्तूंची नियंत्रीत दराने विक्री केली जाते.

२४. ज्या किंमतीपेक्षा, कमी किंमतीला शेतमाल खरेदी करणे कायद्याच्या दृष्टीने गुन्हा आहे. त्याला कायदेशीर किमान आधारभूत किंमत असे म्हणतात.

२५. जागतिकीकरण व खुल्या व्यापाराचे धोरण स्विकारल्याने शेतमालाच्या किंमत निश्चिततेचे धोरण रद्द होवून स्पर्धात्मक किंमत स्विकारावी लागेल.

**उत्तरे :**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) बरोबर | २) बरोबर | ३) चूक | ४) बरोबर | ५) बरोबर |
| ६) बरोबर | ७) बरोबर | ८) चूक | ९) चूक | १०) चूक |
| ११) चूक | १२) चूक | १३) बरोबर | १४) चूक | १५) बरोबर |
| १६) बरोबर | १७) बरोबर | १८) बरोबर | १९) बरोबर | २०) बरोबर |
| २१) बरोबर | २२) बरोबर | २३) चूक | २४) बरोबर | २५) बरोबर |

## सारावासाठी स्वाध्याय :

### अ) दिर्घोत्तरी प्रश्न.

१. स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय शेतीचा विकास कसा घडून आला आहे ते स्पष्ट करा.

२. भारतीय शेतकऱ्यांना शेतमाल विक्री करताना कोणत्या अडचणींना तोंड द्यावे लागते ते विशद करा.

३. शेतमाल विक्रीव्यवस्थेतील दोष दूर करण्यासाठी योजण्यात आलेले उपाय विशद करा.

४. भारतात शेतमालाच्या किंमतीविषयक धोरणाची आवश्यकता का आहे ?

५. शेतमालाच्या किंमतीत चढउतार होण्याची कारणे कोणती ?

६. शेतमालाच्या किंमतीचे स्थिरीकरण म्हणजे काय ? त्यासाठी भारतात कोणते उपाय योजण्यात आले
आहेत ?

७. अन्नसुरक्षितता म्हणजे काय ? अन्न सुरक्षितेच्या दृष्टिने भारतात योजलेले उपाय विशद करा.

८. पाणी व्यवस्थापन म्हणजे काय ? त्याची गरज का आहे ?

९. योग्य पाणी व्यवस्थापनासाठी तुम्ही कोणते उपाय सुचवाल ?

१०. शेतमजूर कोणाला म्हणावे ? भारतीय शेतमजूरांच्या समस्या कोणत्या ?

११. भारतीय शेतमजूरांच्या अडचणी सोडविण्यासाठी कोणते उपाय योजण्यात आले आहेत ?

**ब) लघुउत्तरी प्रश्न.**

१. शेतमालाच्या बाजारपेठ संकल्पनेत कोणत्या घटकांचा समावेश होतो.

२. शेतमालाची विक्री करण्याचे शेतकऱ्यासमोरील मार्ग कोणते ?

३. शेतमालाची नियंत्रीत बाजारपेठ व सहकारी शेतमाल खरेदी-विक्री संस्था शेतकऱ्यांना कश्या फायदेशीर आहेत ते विशद करा.

४. शेतमाल किंमत धोरणाची गरज का आहे.

५. पाणी व्यवस्थापनाची गरज का आहे ?

६. शेतमजूरांच्या दैन्यावस्थेची प्रमुख कारणे कोणती.

७. शेतमजूरांची दैन्यावस्था दूर करण्यासाठी उपाय सूचवा.

८. भारतातील अन्नसुरक्षिततेचा आढावा घ्या.

९. शेतमालाच्या किंमतीतील चढउताराचे परिणाम.

**क) टीपा लिहा.**

१. शेतमालाची नियंत्रीत बाजारपेठ.

२. शेतमाल किंमत स्थिरीकरणाची उद्दिष्ट्ये

३. शेतीसाठी नवे राष्ट्रीय धोरण.

४. नववी पंचवार्षिक योजना व अन्न सुरक्षितता

५. दहावी पंचवार्षिक योजना व अन्न सुरक्षितता

६. शेत मजुरांचे प्रकार

७. भारतातील शेतमजूर

८. सार्वजनिक वितरण व्यवस्था

९. कृषी माल खर्च किंमत आयोग

१०. पाणी व्यवस्थापन

**ड) अधिक वाचनासाठी पुस्तके :**


१. Indian Economy : Dutt R. and Sundharam K.P.M.

२. Indian Economy, Agrawal A.N.

३. Business Environment : Dr. J.F. Patil, Dr. P.K. Deshmukh, Dr. V.B. Kakade, Shri. R.A. Waingade, Phadke Prakashan.

४. व्यावयायिक पर्यावरण : प्रा. भोसले के.एम. व प्रा. काटे के.बी. फडके प्रकाशन, कोल्हापूर.

५. शेतीचे अर्थशास्त्र, डॉ. गंगाधर कायंदे-पाटील, चैतन्य पब्लिकेशन, नाशिक.

६. Business Environment - Francis Cherunilam - Himalaya Publishing House, Bombay.


❑❑❑

**सत्र ५ : घटक ३**

# औद्योगिक विकास

**(Industrial Development)**

**अनुक्रमणिका :**


३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रस्तावना

३.२ औद्योगिक वृद्धी

३.३ औद्योगिक विकासाची व्यूहरचना

३.a लघुउद्योग

- ३.a.१ प्रस्तावना
- ३.a.२ अर्थ व व्याख्या
- ३.a.३ अर्थव्यवस्थेतील भूमिका
- ३.a.४ निर्यात
- ३.a.५ समस्या
- ३.a.६ उपाययोजना

३.b. १९९१ नंतरचे औद्योगिक धोरण.

- ३.b.१ प्रस्तावना
- ३.b.२ वैशिष्ट्ये आणि अन्वयार्थ
- ३.b.३ उद्दिष्ट्ये व उपाययोजना
- ३.b.४ नव्या औद्योगिक धोरणाचे मुल्यमापन

३.c. आर्थिक सुधारणा कालखंडातील औद्योगिक क्षेत्राची प्रगती

३.d. कामगार संघटना चळवळ

- ३.d.१ प्रस्तावना
- ३.d.२ विकास
- ३.d.३ स्वातंत्र्योत्तर काळातील कामगारसंघटना चळवळीची प्रगती.
- ३.d.४ कार्ये
- ३.d.५ सामाजिक जबाबदारी

३.d.६ समस्या

३.d.७ उपाययोजना/ सूचना

३.४ सारांश

३.५ पारिभाषिक शब्द

३.६ स्वयंअध्ययन

३.७ सरावासाठी प्रश्न

३.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ३.० उद्दिष्ट्येः

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला,

- औद्योगिक विकासाची माहिती मिळेल.
- लघुउद्योगाची भूमिका व समस्या यांची कल्पना येईल.
- भारतीय उद्योगातील आजारपणाची माहिती मिळेल.
- १९९१ नंतरचे औद्योगिक धोरण समजेल.
- कामगार संघटना चळवळीची सद्यःस्थिती समजेल.

## ३.१ प्रस्तावनाः

१९५१ पासूनच्या गेल्या ५८ वर्षातील भारताच्या औद्योगिकीकरणाची प्रगती हे देशाच्या आर्थिक विकासाचे महत्त्वाचे लक्षण (वैशिष्ट्य) आहे. १९५६ च्या औद्योगिक धोरणाच्या आधारे पंचवार्षिक योजना काळात औद्योगिकरणाची प्रक्रिया राबविण्यात आली. औद्योगिकीरणासाठी मोठी गुंतवणूक करण्यात आली. गेल्या ५० वर्षात औद्योगिक उत्पादन पाच पटीने वाढले. त्यामुळे भारत जगातील दहा औद्योगिक राष्ट्रापैकी एक राष्ट्र बनले, भारताच्या औद्योगिक रचनेत व्यापक बदल होऊन ग्राहक, मध्यस्थ व भांडवली वस्तू या सर्वांना सामावून घेण्यात आले.

## ३.२ औद्यौगिक वृद्धीः

भारताने औद्योगिक क्षेत्रात केलेल्या प्रगतीमुळे भारतीय औद्योगिक रचना बदलली आणि आयातीमध्ये उत्पादने केलेल्या वस्तूंचे प्रमाण घटले आणि निर्यात वस्तूमध्ये अभियांत्रिकी वस्तूंचे प्रमाण (हिस्सा) वाढले. जलद औद्योगिकीकरणाबरोबर तांत्रिक आणि व्यवस्थापकीय कौशल्य वाढल्यामुळे औद्योगिक विस्तार होऊ लागला. औद्योगिक क्षेत्रातील महत्त्वाचे यश म्हणजे भारताच्या क्षमतेचे वैविधीकरण होय. कांही निवडक वस्तूंच्या बाबतीत औद्योगिक उत्पादन कसे वाढत गेले हे पुढील कोष्टकातून स्पष्ट होते.

**कोष्टक क्र. ३.१**

| | वस्तू | युनिट | १९५०-५१ | १९७०-७१ | २०००-०१ |
|---|---|---|---|---|---|
| १. | कापड | द.ल मीटर | ४२१५ | ७६०२ | १९७१८ |
| २. | खते | ०००टन | ९ | ८३० | ११०२५ |
| ३. | सिमेंट | द.ल.टन | २.७ | १४.३ | ९९.५ |
| ४. | तयार पोलाद | द.ल.टन | १.० | ४.६ | २९.३ |
| ५. | वीज | अब्ज कि.बॅ. (Billion Kwh) | ५.१ | ५५.८ | ४९९.४ |
| ६. | ॲल्युमिनियम | ०००टनस् | ४.० | १६८.८ | ६२०.४ |
| ७. | कागद | ०००टन् | ११६.० | ७५५.० | ३०९०.० |
| ८. | व्यापारी वाहने | ००० मध्ये | ८.६ | ४१.२ | १५२.० |

Source- Economic Survey - 2001-02

वरील आकडेवारी वरून हे स्पष्ट होते की, कांही महत्त्वाच्या वस्तूंच्या उत्पादनामध्ये, लक्षणीय वाढ झाली आहे. भारताने सर्व उपभोग्य वस्तूंच्या बाबतीत स्वयं-पूर्णता(स्वावलंबन)प्राप्त केली आहे. भांडवली वस्तूच्या उत्पादनातही उल्लेखनीय वाढ घडवून आणली आहे. खाणव्यवसाय, धातुविद्याशास्त्र, रासायनिक, पेट्रोकेमिकल,उद्योग, खत उद्योग, भांडवली वस्तू उद्योग, हलक्या व जड अभियांत्रिकी वस्तू उद्योग, उर्जा व वाहतूक उद्योग, बांधकाम उद्योग इ. उद्योगामध्ये भारताने उल्लेखनीय औद्योगिक क्षमता प्राप्त केली आहे. भारताने आपल्या औद्योगिक क्षेत्राची भावी वाढ देशांतर्गत प्रयत्नातून करण्यास पोषक असे वातावरण निर्माण केले आहे संशोधन व विकास, सल्लामसलत, अभियांत्रिकी सेवा, प्रकल्प व्यवस्थापन सेवा, नव्या तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यासाठी नवप्रवर्तन इ. पायाभूत सुविधांचा विकास होत आहे.

१९५१ पासून भारताची झालेली औद्योगिक वृद्धी ही एकसंघ नाही.१९५१ ते १९६५ या पहिल्या १४ वर्षात औद्योगिक वृद्धीचा (वाढ) दर ८ टक्के एवढा होता. त्यानंतर या वृद्धीदरात चढउतार झाले. १९६६-६८ या काळात वृद्धी दर स्थिर होता तर १९७६-७७ मध्ये व ९.५ टक्के एवढा सर्वोच्य होता. १९७९-८० मध्ये तो १.४ इतका झाला. १९६१-७० या दशकामध्ये औद्योगिक वृद्धीचा सरासरी दर ५.५ टक्के तर १९७१-८० च्या दशकांत सरासरी वृद्धी दर वार्षिक ४ टक्के एवढा होता. १९८०-८५ या पाच वर्षात औद्योगिक उत्पादनाचा वृद्धी दर वार्षिक ५.५ टक्के एवढा होता. महत्त्वाची बाब म्हणजे औद्योगिक वृद्धी दर हा कमी होत होता. १९८५-९० (सातवी योजना)या काळात हा वृद्धीदर वार्षिक ८ टक्के दरापर्यंत वाढला आणि आठव्या योजनेत (१९९२-९७) तो ७.३ टक्क्यापर्यंत कमी झाला. सध्या तो त्याच पातळीवर आहे.

## ३.३ औद्योगिक विकासाची व्यूहरचना – Strategy of Industrial Development

गतीशील औद्योगिकरणासाठी अवजड उद्योगाच्या पायावर औद्योगिक विकास घडवून आणणे ही विकासाची व्यूवहरचना आखण्यात आली होती. या व्यूवरचनेसाठी मजबूत पायाभूत सुविधा, पुरोगामी दृष्टीकोण आणि उत्पादनाची आवश्यक ती साधने याच्या सहाय्याने अभियांत्रिकी उद्योगाला चालना देणे गरजेचे होते. नियोजनाच्या सुरवातीला यंत्रयामग्रीची उभारणी करून अभियांत्रिकी उद्योगाचा विकास करणे महत्त्वाचे होते. केवळ अभियांत्रिकी उद्योग हा औद्योगिकीकरणासाठी आधार ठरू शकतो. कारण सक्षम, गतीमान व वृद्धीयुक्त अभियांत्रिकी उद्योग व्यापक अशा औद्योगिक रचनेसाठी आवश्यक ठरतो. त्याबरोबरच

अभियांत्रिकी उद्योगामुळे एतद्देशिय कुशलता आणि ज्ञान-विज्ञान यांचा विकास होतो आणि आयात तंत्रज्ञानावरचे अवलंबित्त्व कमी होते. भारतीय नियोजनकारांना तांत्रिक कौशल्य व विशिष्ट क्षेत्रातील तज्ज्ञ हे उच्च उत्पादकता पातळी निर्माण करून उत्पन्नात वाढ घडवून आणतील असा विश्वास होता. म्हणूनच त्यांनी 'सर्वांगिण आर्थिक विकास' घडवून आणण्यासाठी अभियांत्रिकी उद्योगाला चालना दिली.

भारतीय नियोजनकारांनी औद्योगिक व्यूहरचनेसाठी आणखी एक दृष्टीकोण स्वीकारला तो म्हणजे आयात वस्तूंची मागणी कमी करणारे आणि विदेशी चलनाच्या प्राप्तीला चालना देणाऱ्या उद्योगांचा विस्तार करणे. कारण नियोजनाच्या प्रारंभी विदेशी चलनाची तीव्र टंचाई होती. पहिल्या दशकात प्राथमिक वस्तूंच्या निर्यातीसाठी प्रयत्न झाले पण त्यांच्या किंमतीचा विस्तारित मागणी व विदेशी चलन यामधील पोकळी (Gap)भरून काढण्यासाठी फारसा उपयोग झाला नाही. पुढे नियोजकारांनी आयात पर्यायीकरणाच्या धोरणाला चालना देऊन विदेश चलनसाठा वाढविण्याचा प्रयत्न केला. आयात पर्यायी करणाच्या धोरणाला यश मिळाले त्यामुळे नियोजनकारांची व्यूव्हरचना यशस्वी झाली.

## ३.a लघुउद्योग (Small Scale Industries)

### ३.a.१ प्रस्तावनाः

स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय अर्थव्यवस्थेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे लघु-उद्योग क्षेत्राचा जलद विकास होय. भारताच्या १९४८ च्या आणि १९५६ च्या औद्योगिक धोरणामध्ये लघु-उद्योगक्षेत्रावर अल्पभांडवल गुंतवणुकीत जादा रोजगार निर्मितीसाठी विशेष भूमिका पार पाडण्याची कामगिरी सोपवली. १९७७ मध्ये त्यात कांही आवश्यक बदल करण्यात आले. रोजगार वाढीच्या दृष्टीने लघुउद्योगांना आज महत्त्वाची भूमिका पार पाडावी लागते.

### ३.a.२ अर्थ व व्याख्याः

१९५० मध्ये सरकारने लघुउद्योगाचे दोन गटात वर्गीकरण केले.

१. उर्जेचा (Power) वापर करणारे पण ५० पेक्षा कमी कामगार असणारे लघुउद्योग व

२. उर्जेचा वापर न करणारे परंतु, १०० पेक्षा कमी कामगार असणारे उद्योग

सर्वच लघुउद्योगामध्ये भांडवली गुंतवणूक ५ लाख रू.पेक्षा कमी होती. लघुउद्योगाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचे संघटनात्मक व व्यवस्थापन विषयक कार्य व्यक्तिगत स्वरूपाचे असते. लघुउद्योगामध्ये व्यवस्थापन व संघटन हे मुख्यतः व्यक्तीगत मालकी किंवा भागिदारी या स्वरूपाचे असते.

**१९६६ मध्ये केलेली व्याख्या-**

ज्या उद्योगात स्थिर भांडवल गुंतवणूक ७.५ लाख रू.पेक्षा कमी आहे. त्यांना लघुउद्योग म्हणतात. तर ज्यामध्ये स्थिर भांडवल गुंतवणूक १० लाख रू. पेक्षाकमी आहे त्यांना पूरक उद्योग म्हणतात. गुंतवणूक म्हणजे प्रकल्प  यंत्रसामग्री यामध्ये केली जाणारी स्थिर/ कायम स्वरूपाची गुंतवणूक होय.

१९७५ मध्ये ही मर्यादा लघुउद्योगासाठी १० लाख रू. पर्यंतची स्थिर भांडवल गुंतवणूक व पूरक उद्योगासाठी २० लाख रू. ची स्थिर भांडवल गुंतवणूक अशी मर्यादा वाढविली. तर १९८० च्या औद्योगिक धोरणामध्ये ही मर्यादा अनुक्रमे २० लाख रू. (लघुउद्योग) व २५ लाख रू. ( पूरक उद्योग) करण्यात आली. त्याचबरोबर अतिलहान उद्योगाची भांडवल गुंतवणूक मर्यादा १ लाख रू. वरून २ लाख रू. वाढवली. मार्च १९८५ मध्ये सरकारने लघुउद्योगातील गुंतवणूक मर्यादा ३५ लाख रू. तर पुरक उद्योगासाठी ४५ लाख रू.

पर्यंत वाढवली. मे १९९० मध्ये ही मर्यादा लघुउद्योगासाठी ३५ लाख रू. वरून ६० लाख रू. पर्यंत वाढवली तर पूरक उद्योगासाठी ४५ लाख रूपयावरून ७५ लाख रू . पर्यंत वाढवली. १९९७ मध्ये अबीद हुसेन समितीच्या शिफारशीनुसार लघुउद्योग व पूरक उद्योगासाठी ही मर्यादा ६०/ ७५ लाख रू.वरून ३ कोटी रू. पर्यंत वाढवली. अतिलहान उद्योगासाठी ती ५ लाख रू. वरून २५ लाख रू. पर्यंत वाढवली. अर्थात सन २००० मध्ये लघुउद्योग व पूरक उद्योगासाठी प्रकल्प व यंत्रसामग्रीची गुंतवणूक मर्यादा ३ कोटी वरून १ कोटी रू. पर्यंत कमी केली.पण अतिलहान उद्योगाची गुंतवणूक मर्यादा २५ लाख रू. व कायम ठेवली.

### ३.a.३ अर्थव्यवस्थेतील भूमिका– Role in Economy

स्वातंत्र्योत्तर काळापासून लघुउद्योग क्षेत्राने भारतीय अर्थव्यवस्थेत महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे. रोजगार वृद्धी आणि आर्थिक वृद्धी याबाबतीत मोठ्या उद्योगक्षेत्राशी स्पर्धा न करता उच्च वृद्धीदर साध्य केला आहे. १९५० मध्ये नोंद केलेल्या (Registered) लघुउद्योग युनिटची संख्या १६०००एवढी होती ती १९६१ मध्ये ३६००० पर्यंत वाढली तर २०००–०१ मध्ये ३३.७ लाख एवढी झाली. गेल्या दशकात लघुउद्योगक्षेत्रांने साध्या उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनापासून ते आधुनिक कृत्रिम उत्पादनापर्यंत प्रगती केली आहे. उदा. इलेक्ट्रॉनिक कंट्रोल पद्धती, माईकोव्हेव घटक, टी.व्ही. इ.

सरकार लघुउद्योग क्षेत्रासाठी कांही विशिष्ट राखीव वस्तूंचे धोरण अवलंबत आहे. १९७२ मध्ये अशा १७७ वस्तू लघुउद्योगासाठी राखीव होत्या. १९८३ मध्ये या राखीव वस्तूंची संख्या ८३७ इतकी झाली. लघुउद्योगामार्फत ७५०० वस्तूंची निर्मिती केली जाते. लघुउद्योगामध्ये मालकी हक्काने चालविल्या जाणाऱ्या युनिटची संख्या जास्त आहे. किंबहुना त्यांचाच प्रभाव आहे. तर भागिदारीत चालविल्या जाणाऱ्या युनिटसचे प्रमाण अत्यल्प आहे.

**कोष्टक क्र.३.२**

**लघुउद्योगातील उत्पादन, रोजगार आणि निर्यात**

| वर्ष | एकूण युनिट (लाख) | उत्पादन (चालू किंमतीनुसार) (को.रु.) | रोजगार (लाख) | निर्यात (को.रु.चालू किंमतीनुसार) |
|---|---|---|---|---|
| १९९४–९५ | ७९.६० | १२२,२१० | १९१.४० | २९०६८ |
| १९९५–९६ | ८२.८४ | १,४८,२९० | १९७.९३ | ३६,४७० |
| १९९६–९७ | ८६.२१ | १,६८,४१३ | २०५.८६ | ३९,२४८ |
| १९९७–९८ | ८९.७१ | १८९,१७८ | २१३.१६ | ४४,४४२ |
| १९९८–९९ | ९३.३६ | २१२,९०१ | २२०.५० | ४८,९७९ |
| १९९९–०० | ९७.१५ | २३४,२५५ | २२९.१० | ५४,२०० |
| २०००–०१ | १०१.१० | १६१,२८९ | २३९.०९ | ६९,७९७ |
| २००१–०२ | १०५.२१ | २८२,२७० | २४९.०९ | ७१,२४४ |
| २००२–०३ | ११०.१० | ३११,९९३ | २६१.३८ | ८६,०१३ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Averege Annual Growth Rate (1994-95-2002-03) | ४.१ | १२.४ | ४.० | १४.५ |

Source - Economic Survey (2002-03) p.150

वरील कोष्टकामध्ये (३.२) लघुउद्योग मंत्रालयाने लघुउद्योग क्षेत्राबाबत सुधारित आकडेवारी (माहिती) दिली आहे. यासाठी लघुउद्योगाच्या तिसऱ्या गणनेचा (Third ) आधार घेतला आहे. वरील कोष्टककातून असे दिसून येते की, १९९४-९५ मध्ये लघुउद्योग क्षेत्रातील युनिटची संख्या ७९.६० लाख होती ती २००२-०३ मध्ये ११०.१० लाखापर्यंत वाढली. हा वार्षिक सरासरी वृद्धीदर ४.१ टक्के एवढा होता. याच कालावधीत रोजगार १९१.४० लाखावरून २६१.३८ लाखापर्यंत वाढला. वार्षिक सरासरी वाढ ४ टक्के एवढी झाली. याच कालावधीत निर्यात वाढ २९०६८ कोटी.वरून ८६, ०१३ कोटी रू. पर्यंत म्हणजे वार्षिक सरासरी १४.५ टक्क्यांनी वाढली. १९९४-९५ ते २००२-०३ या कालखंडात लघुउद्योग क्षेत्राने उत्पादनामध्ये वार्षिक सरासरी वाढ १२.४ टक्के, रोजगारात ४ टक्के आणि निर्यातीत १४.५ टक्के एवढी घडवून आणली. लघुउद्योग क्षेत्राची ही कामगिरी उल्लेखनीय आहे.

उत्पादन आणि रोजगार या बाबतीत लघुउद्योग क्षेत्राने वेगाने प्रगती केली आहे. दुसऱ्या भाषेत या क्षेत्राचे उत्पादन -रोजगार प्रमाण १:१.४ एवढे आहे. भारताच्या राष्ट्रीय आर्थिक धोरणामध्ये लघुउद्योग क्षेत्राला महत्त्वाचे स्थान आहे. लघुउद्योग क्षेत्राने देशातील बहुसंख्य जनतेची मागणी असणाऱ्या बिगर-टिकाऊ वस्तूंचे उत्पादन वाढविले आहे. त्यामुळे चलनवाढ विरोधी शक्ती म्हणून या क्षेत्राचा उल्लेख केला जातो. सरकारने या क्षेत्राला मोठी चालना (मोठा धक्का) दिली तर भारतासारख्या भांडवलाची टंचाई असणाऱ्या राष्ट्रामध्ये उच्च उत्पादन-भांडवल प्रमाण (दर) आणि उच्च रोजगार भांडवल प्रमाण प्रस्थापित होऊन स्थिरता निर्माण होईल.

लघुउद्योग तुलनेने अल्प प्रमाणात क्षमतेचा वापर करतात. लघुउद्योगाच्या क्षमता वापराचे हे प्रमाण ५३ टक्के एवढे आहे. अर्थात कांही युनिटमध्ये ही क्षमता ६० ते ८० टक्के इतकी जास्त प्रमाणात (कातडी उद्योग) वापरली जाते तर कांही उद्योगात(प्लास्टिक उद्योग) २९ टक्के एवढी कमी क्षमता वापरली जाते.

### ३.a.४ निर्यात

लघु उद्योगाने निर्माण केलेल्या तयार कपडे, डबाबंद व प्रक्रियायुक्त मासे, कातडी, सँडल व चप्पल, अन्नपदार्थ, सागरी व्यापारी इ. निर्यातीत भरीव वाढ झाली आहे. १९८०-८१ मध्ये या उद्योगाने १६४३ कोटी रू.ची निर्यात केली. २०००-०१ मध्ये ही निर्यात ६९७९७ कोटी.रू. एवढी प्रचंड प्रमाणात वाढली. या निर्यातीचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे अपारंपारिक निर्यातीतील या क्षेत्राचा हिस्सा होय. २०००-०१ मध्ये एकूण निर्यातीत लघुउद्योग क्षेत्राचा हिस्सा ३९ टक्के एवढा होता. लघु उद्योगातील अराखीव वस्तू पेक्षा राखीव वस्तूंच्या उत्पादनाचे प्रमाण जास्त आहे. म्हणजे राखीव 'वस्तूंच्या धोरणामुळे' या क्षेत्राच्या वाढीला चालना मिळाली.

भारत सरकारने १९९७-९८ च्या अंदाज पत्रकात लघुउद्योगासाठी राखीव असणाऱ्या वस्तूंच्या संख्या १४ ने कमी करून त्यांचा अराखीव वस्तूत समावेश केला, यामध्ये आईस्क्रीम, बिस्कीटे, स्वयंचलित वाहनांचे विविध सुटे भाग, कुक्कूट पालन खाद्य, भात-गिरणी इ. वस्तूंचा समावेश केला. या १४ वस्तू म्हणजे लघुउद्योगाच्या यशस्वी उत्पादनक्षेत्रातील वस्तू आहेत. २९ जून २००१ मध्ये कातडी उद्योगांशी संबंधित पुन्हा १४ वस्तू राखीव यादीतून वगळल्या त्याचा लघुउद्योग क्षेत्रावर प्रतिकूल परिणाम झाला.

### ३.a.५ समस्याः Problems

लघुउद्योगाच्या प्रगतीबरोबरच त्यांना कांही समस्यानांही सामोरे जावे लागते. या समस्या पुढील प्रमाणे

### १. अकार्यक्षमताः Inefficiency

लघुउद्योगात विविध प्रकारची अकार्यक्षमता दिसून येते. लघुउद्योगाची ४५ ते ६० टक्के क्षमता वापरली जात नाही. अनेक उद्योगात व्यवस्थापन अकार्यक्षम असते. त्यांच्या कार्यपद्धतीत व्यापारी प्रवृत्तीचा अभाव असतो. अनेक कारखाने (युनिटस्) सक्षम नसतात. कारण त्यादृष्टीने तेथे संशोधन केले जात नाही. विशेषतः ठिकाण, वित्तीय क्षमता, बाजारपेठेचे अस्तित्त्व, भविष्यकालीन दृष्टीकोण या महत्त्वाच्या बाबींचा साकल्याने विचार केला जात नाही. त्यामुळे अनेक कारखाण्यात उत्पादनखर्च जास्त आहे शिवाय या क्षेत्रामध्ये उत्पादन केल्या जाणाऱ्या वस्तूंची संख्या कमी झाली आहे. या विविध कारणासाठी हे उद्योग अकार्यक्षम झाले आहे.

### २. आजारी कारखाने : Sick Units

आजारी कारखाने ही लघुउद्योग क्षेत्राची दुसरी समस्याआहे. आजारी कारखान्यांची संख्या हजारोने आहे व थोड्या फार बदलाने त्यात सतत वाढ होत आहे. १९८० मध्ये आजारी कारखान्यांची (Units) संख्या २३००० इतकी होती. वर्षानुवर्षे ती वाढत जाऊन २००१ मध्ये ती २.५ लाख एवढी झाली.यामुळे या कारखान्यात गुंतलेले हे प्रचंड भांडवल व्यर्थ ठरले आहे. १९८० मध्ये ३०० को.रू. एवढा बँकांनी पतपुरवठा केला होता. २००१ मध्ये हे प्रमाण ५५०० को.रू. पर्यंत वाढले. हे भांडवल निष्क्रियरित्या पडून राहिले आहे. यामुळे या कारखान्यांचे व लघुउद्योगक्षेत्राचे मोठे नुकसान होत आहे. विशेषतः अल्प उत्पादन, अल्प निर्यात आणि अल्प रोजगार अशी बिकट अवस्था निर्माण झाली आहे.

### ३. अपुरा वित्तपुरवठाः Inadequate Finance

या उद्योगांना अल्पकालित व दीर्घकालीन वित्तपुरवठा गरजेनुसार होत नाही. म्हणजे या उद्योगांना त्यांच्या गरजेप्रमाणे स्थिर व खेळते भांडवल उपलब्ध होत नाही. परिणामी मालाचा साठा, वाहतूक व वाटप करण्यात अनेक अडचणी येतात. शिवाय त्यांना मिळणारा पतपुरवठा हा वेळेत मिळत नाही. त्यामुळे कारखान्यांच्या आजारपणात भरच पडते. विशेषतः लहान व अतिलहान युनिटच्या बाबतीत ही स्थिती गंभीर असते. वित्तीय संस्था, व्यापारी व सहकारी बँका यांच्या पतपुरवठ्यात एकसूत्रीपणा व वेळेचा अभाव असतो व परिणामी या लहान युनिटना सावकारांच्या महाग कर्जावर अवलंबून रहावे लागते.

### ४. बाजारातील अडचणीः Difficulties of Marketing

लघुउद्योगांना आपल्या मालाला बाजारपेठ उपलब्ध करण्यातही अनेक अडचणी येतात. उत्पादनाचे प्रमाण लहान असल्याने उत्पादनाच्या प्रमाणीकरणाचा अभाव, बाजारसुज्ञपणाचा अभाव, तांत्रिकदृष्ट्या कार्यक्षम युनिटबरोबर स्पर्धा, अतिउत्पादन किंवा न्युन मागणीचा काळातील अपुरी धारणक्षमता इ. समस्या निर्माण होतात. बाजारपेठेचा व विपणन सुविधांचा अभाव असल्याने त्यांच्या मालाच्या विक्रीसाठी जास्त खर्च करावा लागतो. परिणामी सरकारला या उद्योगाच्या अंशदानावर (Subsidy) बराच खर्च करावा लागतो.

### ५. कच्चा मालाचा तुटवडा–Shortage of Raw material

लघुउद्योग क्षेत्राच्या दृष्टीने त्रासदायक समस्या म्हणजे कच्च्या मालाचा तुटवडा होय. कच्चा माल पुरेशा प्रमाणात किंवा योग्य त्या दर्जाचा मिळत नाही. लघुउद्योगाची कच्च्या मालाची खरेदी मोठ्या उद्योगाप्रमाणे

जास्त नसल्याने कच्या मालाचे उत्पादक पुरवठ्याची हमी देत नाहीत. त्यामुळे उपलब्ध असलेला कच्चामाल कोणत्याही दर्जाचा आणि जास्त किंमतीला घ्यावा लागतो. परिणामी लघु उद्योगाच्या उत्पादन, उत्पादनखर्च, गुणवत्ता (दर्जा) यावर विपरित परिणाम होतो. याबाबत लघु उद्योग विकासमंडळाचे कार्यही फारसे समाधानकारक नाही. लोखंड व पोलाद, कोळसा, वीज आणि पेट्रोकेमिकल्स या आदानांची स्थितीही समाधानकारक नाही. मोठ्या उद्योगांना जसे या दुर्मिळ आदानांचे वाटप केले जाते तसे लघुउद्योगांना केले जात नाही. त्यामुळे या समस्येचे स्वरूप गंभीर आहे.

### ६. तंत्रज्ञानाची निकृष्ट पातळी: Low Level of Technology

लघुउद्योग व अतिलहान उद्योगाची उत्पादन पद्धती जुनाट व अकार्यक्षम आहे. त्यामुळे अल्पउत्पादकता , निकृष्ट दर्जाचे उत्पादन आणि वाढता उत्पादनखर्च अशी परिस्थिती असते. प्रगत शब्दात जसे आधुनिक तंत्रज्ञान वापरले जाते तसे भारतासाख्या विकसनशील राष्ट्रात लहान उद्योगात वापरले जात नाही. शिवाय संशोधन व विकास याबाबतही या क्षेत्रात भरीव प्रगती नसते. नव्या तंत्रज्ञानामुळे ज्या भांडवलगुंतवणुकीत जे धोके असतात. त्याबाबत कोणतीही यंत्रणा(संस्था) पुढाकार घेत नाही. त्यामुळे लघुउद्योगांना पारंपारिक व कालबाह्य उत्पादनतंत्राचा वापर करावा लागतो आधुनिक काळातील लघुउद्योगाची ही महत्त्वाची समस्या आहे.

### ७. मोठ्या उद्योगाबरोबर स्पर्धा–Competition From Large Scale Industries

लघुउद्योगांची ही सुद्धा गंभीर समस्या आहे. मोठे उद्योग हे संघटित असल्याने, ते आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अनेक सुविधांचा लाभ घेतात. अलीकडच्या उदारीकरणाच्या काळात लघुउद्योगांची ती समस्या गंभीर बनली आहे. लघुउद्योगात जरी ८०० च्या वर वस्तूंचे उत्पादन राखीव असले तरी ज्या बाजारात त्यांना स्पर्धा आहे तेथे त्यांना आपल्या मालाची विक्री करण्यात अडचणी येतात. शिवाय पतपुरवठा, वीज, पाणी इ. आवश्यक आदाने मिळवताना त्यांना तीव्र स्पर्धेला तोंड द्यावे लागते विशेषतः या अडचणी अतिलहान उद्योगांना प्रकर्षाने जाणवतात या सर्व कारणांनी लघुउद्योग अडचणीच्या व धोक्याच्या स्थितीत असतात.

### ३.a.६ उपाययोजना:

लघुउद्योगांच्या वरील समस्यांचा विचार करता या समस्या सोडविण्यासाठी सरकारने कोणकोणते उपाय योजले आहेत ते अभ्यासणे गरजेचे आहे. ते पुढीलप्रमाणे

### १. पतपुरवठा:

नियोजनकाळात मोठ्या उद्योगांच्या तुलनेत लघुउद्योगांना केलेला पतपुरवठा अत्यल्प होता, म्हणून अलीकडच्या काळात सार्वजनिक क्षेत्रातील बँकानी त्यांना पतपुरवठा केला आहे.सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी लघुउद्योगांना केलेला पतपुरवठा १९९८ मध्ये ३८११० को.रू. होता तो मार्च २००२ पर्यंत ४९,७४३ को.रू. पर्यंत वाढविला. अर्थात एकूण पतपुरवठ्यांपैकी लघु उद्योगांना केलेल्या पतपुरवठ्याचे प्रमाण याच कालावधीत १५.६ टक्क्यावरून १२.५ टक्क्यापर्यंत कमी झालेले आहे. म्हणूनच वित्तसंस्थांचा लघुउद्योगांकडे बघण्याचा दृष्टीकोण सकारात्मक झाला पाहिजे. वित्तसंस्थांनी त्यांना रास्त व्याजदरात अल्पकालीन व दीर्घकालीन  कर्जपुरवठा केला पाहिजे. रिझर्व्ह बँकेने १९६० मध्ये लघुउद्योगांना पतपुरवठा करण्यासाठी पत हमी योजना सुरू केली. विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्या कारागिरांना व लघुउद्योजकांना पतसुविधा सुरवात केली. त्यामुळे कांही प्रमाणात का असेना त्यांचा पतपुरवठ्याचा प्रश्न सुटला.

## २. बाजारविषयक (विपणन) सहाय्य/मदतः

लघुउद्योगाचा माल प्रमाणीकृत नसल्याने शिवाय दर्जात वारंवार बदल होत असल्याने बाजारात अडचणी निर्माण होतात. त्यांचा माल कौशल्यपूर्ण असला तरी बाजारातील अपूर्णतेमुळे त्यांना योग्य भाव मिळत नाही. त्यांच्या स्पर्धेला विशिष्ट छापाच्या व जाहिराती केल्या जाणाऱ्या वस्तू असतात. त्यामुळे लघुउद्योगाच्या मालाचा उठाव होत नाही. म्हणून सरकारने लक्ष घालून लघुउद्योगाच्या मालांच्या विक्रीसाठी परिपूर्ण बाजारपेठ उपलब्ध करणे, उत्पादक व विक्रेते यांच्या समन्वय प्रस्थापित करणे आणि विक्रीची हमी देणे इ. मार्गांचा सरकारने अवलंब केला आहे. सरकार या मालाच्या विक्रीची हमी देण्यासाठी विक्रीला १५ टक्के प्राधान्य देते. राष्ट्रीय लघुद्योग महामंडळ लघुउद्योगाच्या सरकारी व संरक्षण क्षेत्रात मालाच्या खरेदीसाठी मदत करते. तथापि ते बाजारातील विपणनाची जबाबदारी घेत नाही. या महामंडळाच्या स्थापनेनंतर महामंडळाने २१,३८४ युनिट स्थापन करण्यासाठी मदत केली.

## ३. कच्च्या मालाचे व आयात साधनाचे वाटपः

दुसऱ्या आंतरराष्ट्रीय अभ्यासगटाने दुर्मिळ कच्च्या मालाचे आयात आदानाचे योग्य वाटप करण्याबाबत शिफारस केली. या शिफारशी नुसार सरकारने लघुउद्योगांना प्राधान्याने कच्च्या मालाचा पुरवठा करण्यास सुरवात केली. तथापि सातव्या  पंचवार्षिक योजनेत कच्च्या मालाच्या वाटपाबाबत असमाधान व्यक्त केले याबाबत राज्य लघुउद्योग महामंडळाचे फारसे समाधानकारक कार्य केलेले नाही.

## ४. तांत्रिक सहाय्यः

लघुउद्योगांच्या विकासात तांत्रिक अडचणीमुळे अडथळे येतात. म्हणून या उद्योगांना तांत्रिक सेवा पुरविण्यासाठी सरकार पुढाकार घेते. विशेषतः तांत्रिक मदतीमुळे लघुउद्योगांची कार्यक्षमता वाढते आणि उत्पादवाढीला चालना मिळते.

## ५. औद्योगिक वसाहतीः

औद्योगिक वसाहती म्हणजे जेथे उद्योगासाठी लागणाऱ्या मूलभूत सोयी-सुविधा रास्त दरात उपलब्ध करून दिल्या जातात असे ठिकाण होय. येथे योग्य भाड्याने गाळे उपलब्ध करून दिले जातात आणि राहण्याची उत्तम सोय होते. यामुळे लघुउद्योगांचा समूह तयार होतो आणि या उद्योगांना विविध प्रकारच्या सोई सुविधा दिल्या जातात. सहाव्या पंचवार्षिक योजनेमुसार (१९८०-८५) मार्च १९७९ मध्ये ६६२ औद्योगिक वसाहतीमध्ये १३,४६७ लहान युनिट कार्यरत होते. त्यांनी ६३६ को.रू.चे उत्पादन केले होते व २.२ लाख लोकांना रोजगार पुरविला होता.

लघुउद्योगांच्या समस्या सोडविण्यासाठी सरकारने विविध प्रकारच्या उपाययोजना केल्या असल्या तरी या उद्योगांने फारसे समाधानकारक यश मिळविले नाही. लघुउद्योगांचे महाराष्ट्र, तामिळनाडू, प.बंगाल, पंजाब आणि गुजरात या सहा राज्यातच केंद्रीकरण झाले आहे. राजस्थान, मध्यप्रदेश ओरिसा याबाबतीत खुपच मागे आहे. म्हणून या राज्यांनी आपल्या लघुउद्योगाच्या वाढीला चालना दिली पाहिजे. तरच समतोल प्रादेशिक विकास होईल. लघुउद्योगाचे राष्ट्रीय अर्थव्यवस्थेतील उत्पादन, निर्यात व रोजगार या दृष्टीने महत्त्व विचारात घेता त्यांना पतपुरवठ्याच्या सोयी उत्तमप्रकारे, वेळेत व रास्त व्याजदरात उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. तरच त्यांचा विकास वेगाने होईल.

### ३.b. **१९९१ नंतरचे औद्योगिक धोरण** (Industrial Policy after 1991)

### ३.b.१ **प्रस्तावना:**

१९९१ नंतरचे औद्योगिक धोरण म्हणजे नवीन औद्योगिक धोरण होय. राजकिय स्थित्यंतरानंतर आणि जागतिकीकरणाच्या वातावरणात भारताने स्वीकारलेले नवा आर्थिक कार्यक्रम या पार्श्वभूमीवर भारताने 'नवीन औद्योगिक धोरण' (New Industrial Policy-NIP -1991)स्वीकारले. हे धोरण म्हणजे जुन्या औद्योगिक धोरणाला दिलेली तिलांजली होय.एकूणच औद्योगिक चित्र (रचना) बदल्यामुळे संपूर्ण अर्थवस्थेला नवी दिशा देणे भाग पडले होते. म्हणून या औद्योगिक धोरणाचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

### ३.b.२ **वैशिष्ट्ये आणि अन्वयार्थ:**

नवीन धोरण दोन टप्प्यात जाहीर केले म्हणजेच त्याचे दोन भाग करण्यात आले पहिला भाग (टप्पा) २४ जुलै १९९१ मध्ये जाहीर केला. यामध्ये मोठ्या व मध्यम उद्योगांचा समावेश करण्यात आला. दुसरा भाग ६ ऑगस्ट १९९१ मध्ये जाहीर केला. यामध्ये लघुउद्योगांचा समावेश होता. या औद्योगिक धोरणापूर्वी अनेक धोरणे राबवून औद्योगिक क्षेत्राचे नियमन केले.१९४८ मध्ये पहिले औद्योगिक धोरण जाहीर केले होते. परंतु भारताच्या औद्योगिक विकासाचा खऱ्या अर्थाने पाया घातला तो १९५६ च्या औद्योगिक धोरणाने त्यानंतर या औद्योगिक धोरणात गरजेनुसार वेळोवेळी बदल करण्यात आले. म्हणजे जेंव्हा जेंव्हा समस्या निर्माण होतील तेंव्हा त्या सोडविण्यासाठी औद्योगिक धोरणात आवश्यक ते बदल केले असे धोरणात्मक बदल अनुक्रमे १९७३,१९७७,१९८०,१९८५,१९८६ या वर्षी करण्यात आले.या सर्व धोरणाद्वारे १९५६ च्या औद्योगिक धोरणात महत्त्वाच्या सुधारणा करण्यात आल्या. तथापि १९५६ चे औद्योगिक धोरण हा स्वातंत्र्योत्तर काळातील औद्योगिक प्रगतीचा व अर्थव्यवथेला औद्योगिक दिशा देण्याचा मूलभूत आधार होता.

### ३.b.३ **उद्दिष्ट्ये व उपाययोजना:**

नवीन आर्थिक धोरणाद्वारे अर्थव्यवस्थेत अनुकूल बदल घडवून आणण्यासाठी विविध उपाययोजनाही केल्या त्याचे विश्लेषण पुढीलप्रमाणे-

१) **प्रगतीशिल अर्थव्यवस्था:** Progressive Economy

या औद्योगिक धोरणांचे महत्त्वाचे ध्येय होते ते गतिमान औद्योगिक विकासाबरोबर देशातील जनतेला न्याय मिळवून देणे. म्हणून या धोरणामध्ये असे नमूद करण्यात आले की'आधुनिक, लोकशाही, समाजवादी आणि प्रगतीशील भारत निर्माण करण्यासाठी सामाजिक व आर्थिक न्याय्य प्रस्थापित करण्यासाठी आणि दारिद्र्य व बेरोजगारी नष्ट करण्यासाठी संघर्ष (लढा) करणे,' याबरोबरच भारत हा एकटा न राहता जागतिक अर्थव्यवस्थेचा एक भाग आहे अशी अर्थव्यवस्थेची बांधणी करणे.यासाठी उपलब्ध एतद्देशीय तंत्रज्ञानाचा विकास करणे, गुंतवणूक वाढविणे, कार्यक्षमता आणि उत्पादकता वाढविणे, एतद्देशीय तंत्रज्ञानाचा विकास करणे, गुंतवणूक वाढविणे, कार्यक्षमता आणि उत्पादकता वाढविणे, मक्तेदारी प्रवृत्तीवर निर्बंध लादणे, सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांना त्यांचे क्षेत्र वाटून देणे, कर्मचाऱ्यांना त्यांच्या कल्याणाची हमी देऊन त्यांचे कौशल्य वाढविणे व त्यांना तांत्रिक बदल आत्मसात करण्यास भाग पाडणे इ. मार्गाचा अवलंब केला जाईल हे स्पष्ट करण्यात आले. तसेच अर्थव्यवस्था आत्मनिर्भर बनविण्यासाठी आयातीचे मूल्य भागविता यावे एवढे विदेशी चलन मिळविणे ही महत्त्वाची उपाययोजनाही निश्चित करण्यात आली. म्हणूनच औद्योगिक उत्पादन वाढीचा व आर्थिक विकासाचा वेग वाढविण्यात सरकारला समाधानकारक यश मिळाले.

## २) **बाजाराधिष्ठित अर्थव्यवस्थाः** Market Oriented Economy

अर्थ व्यवस्थेतील विविध ध्येये गाठण्यासाठी बाजारयंत्रणेचा मोठा वापर करण्यावर भर दिला. यासाठी सर्व निर्बंध व नियम दूर करून औद्योगिक अर्थव्यवस्थेला नोकरशाहीच्या जोखडातून (बंधने) मुक्त करणे. म्हणून खाजगी उद्योजकांना सरकारी निर्णयावर अवलंबून न ठेवता त्यांनी व्यापारी दृष्टीकोनातून निर्णय घेण्यावर भर दिला. थोडक्यात,उद्योगातील उत्पादनसाधनांचे वाटप, हे उद्योगाचा प्रकार, उत्पादनाचे प्रमाण, उत्पादनाचे स्वरूप इ. बाजारातील किंमतीवरून निश्चित होईल. या स्वातंत्र्यमुळे उद्योजकांमध्ये स्पर्धा निर्माण होईल. बाजारयंत्रणेमुळे औद्योगिक विकासाला चालना मिळेल, तसेच भांडवल बाजाराचा विस्तार होऊन उद्योजकांना वित्तीय साधने उपलब्ध होतील. यामध्ये कर्जाच्या सोयी, समभाग, कर्जरोखे इ. चा समावेश होतो. या औद्योगिक धोरणामुळे विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूकही वाढेल आणि तंत्रज्ञानाची आयात होईल. भारताच्या निर्यात वाढीसाठी कांही विदेशी व्यापारी समूहानी करार केले आहेत. सार्वजनिक क्षेत्रही औद्योगिक विकासाचे एक महत्त्वाचे साधन म्हणून आपले कार्य करील. थोडक्यात बाजार यंत्रणा आणि खाजगी उद्योजक औद्योगिक विकासाबाबत निर्णय घेतील त्यामुळे नोकरशाहीचे महत्त्व कमी होईल. अर्थात यासाठी सार्वजनिक क्षेत्राचीही मदत घ्यावी लागेल.

## ३) **खाजगी क्षेत्राला बळकटीः** Strengthening Private Sector

औद्योगिक अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणात बाजारनिष्ठित करण्यासाठी परवानापद्धती रद्द करणे गरजेचे होते. यादृष्टीने नव्या औद्योगिक धोरणात पावले उचलण्यात आली. प्रस्थापित खाजगी क्षेत्रातील उद्योगाबरोबरच या क्षेत्राचा विस्तार करण्यासाठी या धोरणात कांही तरतूदी करण्यात आल्या . सार्वजनिक क्षेत्रावर निर्बंध लादून खाजगी क्षेत्राला चालना देण्यास सुरवात केली. सार्वजनिक क्षेत्रासाठी राखीव असणाऱ्या खास बाबी किंवा वस्तूंचे उत्पादन खाजगी क्षेत्रासाठी खुले केले. यामध्ये हवाई वाहतूक व उत्पादन, जहाजबांधणी, वितळू न शकणाऱ्या धातूंची प्रक्रिया, लोखंड व पोलाद, वीजनिर्मिती व वितरण, टेलिफोन(दूरध्वनी) व टेलिफोन केबल, तार व बिनतारी यंत्रणा, अवजड उद्योग इ. उत्पादनांचा समावेश होतो. याबरोबरच कांही नवीन उद्योग खाजगी क्षेत्रात येतील. विदेशी प्रत्यक्ष गुंतवणकीला चालना दिल्यामुळे खाजगी क्षेत्रातील उद्योगांची संख्या वाढत आहे. यामध्ये हॉटेल व पर्यटन उद्योग, अन्न-प्रक्रिया उद्योगांचा समावेश होतो.

खाजगी क्षेत्रावरील सरकारी निर्बंध दूर झाल्याने या क्षेत्राला बळकटी प्राप्त झाली आहे. विशिष्ट १५ गटातील प्रकल्पाशिवाय इतर कोणत्याही खाजगी उद्योगाला परवानगीची गरज नसल्याने या उद्योगाचा विस्तार होत आहे. तसेच विदेशी तंत्रज्ञान खाजगी क्षेत्राला वापरण्यास मुभा असल्याने या क्षेत्रातील उद्योगांची सक्षमता वाढली आहे. या सर्व बाजारयंत्रणेशी संबंधित घटकांचा खाजगी उद्योगाच्या विस्तारासाठी उपयोग होत आहे परिणामी आज या क्षेत्राला बळकटी प्राप्त होत आहे.

## ४) **उद्योगांचे विकेंद्रीकरणः** Decentralization of Industries

नवीन औद्योगिक धोरणाचे हे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. भौगोलिकदृष्ट्या उद्योगांचे विकेंद्रीकरण करण्यासाठी ग्रामीण व मागासलेल्या भागात उद्योगांच्या स्थापनेला चालना दिली आहे. उदा. १० लाख पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या प्रदेशात उद्योगस्थापनेसाठी परवानगीची गरज नाही. तसेच प्रदुषण निर्माण न करणाऱ्या उद्योगांना मोठ्या शहरामध्ये परवानगी घ्यावी लागणार नाही. उदा. कॉम्प्युटर सॉफ्टवेअर व प्रिटिंग,उद्योगाच्या ठिकाणाबाबत (स्थान) हे धोरण राबविताना पर्यावरणाचा विचार केला जाईल. विकेंद्रीकरणाला चालना देण्यासाठी स्वस्त जमीन, पतपुरवठा इ. सुविधा उपलब्ध करून दिल्या. त्यामुळे मोठ्या शहरातील उद्योगाचे केंद्रीकरण कमी होऊन ग्रामीण व मागासलेल्या भागात उद्योग निर्मिती

होऊ लागली. तसेच पायाभूत सुविधांच्या विकासासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न सुरू केले. कृषी उद्योगाच्या स्थापनेलाही चालना दिली. निमशहरी भागात व खेड्यात लघुउद्योग आणि ग्रामीण उद्योगाच्या विकासाचे धोरण स्वीकारले या सर्वांचा एकत्रित परिणाम होऊन उद्योगधंद्याच्या विकेंद्रीकरण सुरू झाले व समतोल विकासाला पोषक वातावरण निर्माण झाले.

**५. सार्वजनिक क्षेत्रात सुधारणाः**

सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगात अनेक समस्या होत्या. विशेषतः भांडवल गुंतवणूकीवर अत्यंत कमी परतावा (Return), उत्पादकतेत अपुरी वाढ, कमकुवत व्यवस्थापन या मूलभूत समस्यांनी सार्वजनिक क्षेत्र ग्रासले होते. नव्या औद्योगिक धोरणामुळे सार्वजनिक उद्योगांचे अर्थव्यवस्थेतील स्थान काय आहे याचा पुनर्विचार सुरू झाला. यादृष्टीने पुढील बदल करण्याचे ठरविण्यात आले. ज्या सार्वजनिक उद्योगात निकृष्ट तंत्रज्ञान, अल्पउत्पादकता, सामाजिक दृष्टीकोनाचा अभाव आहे आणि जेथे खाजगी क्षेत्र कार्यक्षमरित्या काम करत आहे तेथे सार्वजनिक क्षेत्राची भूमिका कमी करून खाजगी क्षेत्राला प्रोत्साहन देणे.

नव्या औद्योगिक धोरणामध्ये खऱ्या अर्थाने 'सार्वजनिक' वैशिष्ट्य असलेल्या क्षेत्रातच सार्वजनिक क्षेत्राला आपले कार्य करण्यास संधी देण्याचे ठरविण्यात आले. औद्योगिक अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी या उद्योगांनी कार्य करावे. आवश्यक पायाभूत वस्तू व सेवा, तेल आणि खनिज संपत्ती, तंत्रज्ञानाचा विकास व उत्पादकशक्तीची बांधणी इ.की जेथे खाजगी क्षेत्राची गुंतवणूक अपुरी ठरेल अशा क्षेत्रात सार्वजनिक उद्योगांनी गुंतवणूक करून या क्षेत्राचा विस्तार करावा. उदा. संरक्षण साहित्याची निर्मिती या दृष्टीने सार्वजनिक क्षेत्रात सहा उद्योगांचा समावेश करण्यात आला आहे. या मध्ये संरक्षण साहित्य, अणुउर्जा, कोळसा व मॅग्नाईट, खनिज तेल, रेल्वेवाहतूक आणि अणुउर्जेची संबंधित खनिज संपत्ती इ.चा उद्योगांत समावेश होतो. हे उद्योग केवळ सार्वजनिक क्षेत्रासाठीच राखीव ठेवण्यात आले आहेत. सार्वजनिक उद्योगांना व्यवस्थापनाचे स्वातंत्र्य देण्यात आले आणि त्यांना खाजगी क्षेत्राशी स्पर्धा करण्यास भाग पाडले. त्यामुळे त्यांची कार्यक्षमता सुधारण्यास सुरवात झाली.

**६) विदेशी गुंतवणूकः** Foreign Investment

नव्या औद्योगिक धोरणामध्ये विदेशी उद्योजकांनी गुंतवणूक, व्यापार व तंत्रज्ञान क्षेत्रात कार्य करावे यादृष्टीने उदारमतवादी दृष्टीकोन स्वीकारला. यासाठी विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूकीला चालना देण्यात आली. विदेशी उद्योजक व भारतीय उद्योग यांच्यात योग्य तो समन्वय साधण्याची संधी निर्माण केली. यासाठी विदेशी गुंतवणूकीत पारदर्शीपणा आणला. परिणामी विदेशी गुंतवणूकीचा (भांडवल) ओघ वाढला. विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूकीबरोबरच नव्या औद्योगिक धोरणाने निर्यातीसाठी विदेशी व्यापार कंपन्यांची मदत मिळवण्यात यश मिळविले. निर्यातीसाठी व्यावसायिक बाजार यंत्रणा क्रियाशील झाली. निर्यात वाढीसाठी सरकारने विदेशी व्यापार कंपन्यांना प्रोत्साहन देण्यास सुरवात केली. तसेच जगातील सर्वात मोठ्या उत्पादन आणि बाजारयंत्रणेशी संबंध प्रस्थापित करण्यासाठी सरकारने एका मंडळाची नेमणूक केली.

नव्या औद्योगिक धोरणामुळे विदेशी तंत्रज्ञानाची आयात करणे सोपे झाले.विशिष्ट प्राधान्यकृत उद्योगांना तंत्रज्ञानाविषयक करार करण्यास स्वायत्तता दिली. तसेच विदेशी तंत्रज्ञान भाड्याने घेणे किंवा त्याचा वापर करणे यासाठी पूर्व परवानगीची गरज नाही. भारतीय उद्योग व विदेशी उद्योग यांच्यात नव्या तंत्रज्ञानाच्या देवाणघेवाणीबाबत भारत सरकार कोणताही हस्तक्षेप करणार नाही. या पार्श्वभूमीवर भारतीय उद्योग नवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठी संशोधन व विकास या क्षेत्रात मोठी गुंतवणूक करतील अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

### ७) लघुउद्योगांना चालनाः

६ ऑगस्ट १९९१ मध्ये लघुउद्योगासाठी जाहीर केलेल्या नव्या औद्योगिक धोरणामध्ये, जुन्याधोरणात अनेक बदल केले. लघुउद्योगासाठी सक्षम व बलवान करण्यासाठी या धोरणात विविध तरतूदी करण्यात आल्या. लघुउद्योगांना वित्त पुरवठा करण्यासाठी चार कलमी योजना मांडली. ती पुढील प्रमाणे-

१. लघुउद्योगाच्या संपूर्ण वित्तीय गरजा भागविण्यासाठी सर्वसाधारण आधारावर (तत्त्वे) पुरेसे भांडवल उपलब्ध करून देणे. यासाठी लघुउद्योग विकास बँकेमार्फत (SIDBI) वित्तपुरवठा करण्याची तरतूद करण्यात आली.

२. नव्या औद्योगिक धोरणानुसार बिगर लघुउद्योगामार्फत लघुउद्योगासाठी सममुल्य भागीदारीला परवानगी देण्यात आली. एकूण समभागाच्या २४ टक्के एवढे हे प्रमाण वाढविले. आधुनिकीकरण, तांत्रिक प्रगती, पूरक उद्योग यासाठी बिगर-लघुउद्योगक्षेत्राची मदत घेण्यास सुरवात केली.

३. भांडवल गुंतवणूक वाढविण्याच्या दृष्टीने बिगर-लघुउद्योगांच्या मर्यादित भागीदारीला परवानगी देण्यात आली.

४. लघुउद्योगातील मालाची विक्री वाढविण्यासाठी विक्रीतून निर्माण झालेली देणी जलद देण्याची तरतूद करण्यात आली. अशा प्रकारची तरतूद खरेदीदार व इतर संस्थांच्या बाबतीत करण्यात आली. यामुळे मोठ्या कारखान्यांकडून देय असणारी प्रलंबित देणी देण्याची सुविधा उपलब्ध झाली. तसेच तत्पर देणी देण्याची व्यवस्था केली.

लघुउद्योगांना कच्चा मालाचा पुरवठा व विपणन सुविधा उपलब्ध करून देण्याची तरतूद करण्यात आली. देशांतर्गत आणि विदेशी बाजारातून (आयात) कच्चा माल उपलब्ध करण्यासाठी विविध उपाय योजण्यात आले. तसेच सहकारी संस्था, सार्वजनिक क्षेत्रातील संस्था, आणि इतर व्यावसायिक संस्थांमार्फत विपणन व्यवस्था करण्यासाठी चालना देण्यात आली. शिवाय राष्ट्रीय लघुउद्योग महामंडळाची (NSIC) मदत घेण्यात आली. त्यामुळे लघुउद्योग क्षेत्रातील उत्पादन वाढीला व निर्यात वाढीला चालना मिळाली. परिणामी उत्पादकता व स्पर्धाक्षमता वाढली आणि त्याचा लघुउद्योगांना लाभ झाला. नव्या औद्योगिक धोरणामध्ये हातमाग, हस्तकला, खादी आणि ग्रामोद्योगांनांही चालना देण्यात आली. यासाठी विविध योजना आखून त्यांची कार्यवाही सुरू केली हस्तकला उद्योगाच्या विकासासाठी 'कला विकास केंद्राची' स्थापना करण्यात आली.

### ३.b.४ नव्या औद्योगिक धोरणाचे मुल्यमापनः Evaluation

नव्या औद्योगिक धोरणाचे मुल्यमापन करताना पुढील महत्त्वाचे घटक विचारात घ्यावे लागतात.

१. नवे औद्योगिक धोरण हे जुन्या औद्योगिक धोरणापेक्षा पूर्णपणे वेगळे आहे.

२. नव्या धोरणात (NIP) सार्वजनिक क्षेत्राचे महत्त्व कमी करण्यात आले.

३. आर्थिक सत्तेच्या केंद्रीकरणावर जास्त भर देण्यात आला तर प्रादेशिक समतोला वर कमी भर दिला गेला.

४. या धोरणात बाजारयंत्रणेवर जास्त भर देण्यात आला. त्यामुळे सर्व निर्णय बाजारयंत्रणेनुसार घेतले जाऊ लागले व बाजारयंत्रणेला महत्त्व प्राप्त झाले.

५. अर्थव्यवस्थेच्या जागतिकीकरणास सुरवात झाली. बाजारयंत्रणा, स्पर्धात्मकता आणि बाजाराशी संबंधित प्रोत्साहन याला महत्त्व दिल्याने खाजगी क्षेत्राचा भूमिका विस्तारली.

६. आर्थिक वृद्धीला कार्यक्षमतेची जोड देण्यात आली त्याचा उत्पादकतेवर अनुकूल परिणाम झाला. भविष्यकालीन जलद विकासाची शक्यता निर्माण झाली.

७. विविध उत्पादन साधनांच्या निर्मितीवर भर देण्यात आला. परिणामी उत्पादन वाढ कमी झाली तसेच लघुउद्योगांच्या विकासालाही चालना देण्यात आली.

तथापि नवीन औद्योगिक धोरणामध्ये, रोजगार निर्मितीकडे दुर्लक्ष, श्रमीकांच्या समस्यांकडे दुर्लक्ष, प्रशासकीय अडथळे, संशोधन व विकासाबाबत अल्पप्रमाणात प्रयत्न आणि लघुउद्योगांच्या प्रगतीसाठी निश्चित अशा धोरणाचा अभाव इ. उणीवा दिसून येतात. परंतु अर्थव्यवस्थेला चालना देऊन गतिमान आर्थिक प्रगतीसाठी व स्पर्धाक्षमता वाढविण्यासाठी हे धोरण उपयुक्त ठरले म्हणून या धोरणाला महत्त्व प्राप्त झाले आहे.

**३.C आर्थिक सुधारणा कालखंडातील औद्योगिक क्षेत्राची प्रगती** (Progress of industrial sector in globalization era):

१९९० च्या दशकाने भारतीय अर्थव्यवस्थेला नवीन आर्थिक धोरणाची म्हणजेच उदारीकरण, जागतिकीकरण आणि खाजगीकरणाची देणगी दिलेली आहे. या दशकामध्ये पुढील महत्वपूर्ण घटना घडल्याने देशासमोर आर्थिक संकट निर्माण झाले.

१) सन १९८१-८२ मध्ये जी.डी.पी.च्या ५.१ टक्के असणारी वित्तीय तूट सन १९९०-९१ मध्ये ७.८ टक्क्यांपर्यत वाढली.

२) सन १९९०-९१ मध्ये केंद्र सरकारच्या एकूण उत्पन्नापैकी ३९.१ टक्के रक्कम व्याज देयतेवर खर्च होत होती.

३) भारताच्या जी.डी.पी.शी चालू खात्यामधील तूटीचे १९८०-८१ मध्ये असणारे १.३५ टक्के प्रमाण १९९०-९१ मध्ये ३.६९ टक्क्यांपर्यंत वाढले.

४) व्यवहारतोलामध्ये तूट वाढल्याने, जून १९९१ मध्ये परकीय चलनाचा तुटवडा निर्माण झाला. देशामध्ये १० दिवस पुरेल एवढे देखील परकीय चलन शिल्लक नव्हते.

५) १९८० मध्ये सरासरी ६.७ टक्के असणारी भाववाढ १९९०-९१ मध्ये १०.३ टक्यांपर्यंत वाढली. यालाच दोन अंकी किंमत वाढ असे म्हणतात.

वरील आर्थिक सकंटामधून अर्थव्यवस्थेला बाहेर काढण्यासाठी देशाचे पंतप्रधान पी.व्ही.नरसिंहराव व अर्थमंत्री मनमोहन सिंग यांनी 'नवीन आर्थिक धोरण' स्वीकारले. तसेच २४ जुलै, १९९१ रोजी पी. व्ही. नरसिंहराव यांनी औद्योगिक धोरण जाहीर केले. देशाच्या विकासासाठी नवीन आर्थिक धोरणाचा भाग म्हणून स्विकारलेल्या उदारीकरण, खाजगीकरण, आणि जागतिकीकरणाला अनुसरून आवश्यक बदल औद्योगिक धोरणामध्ये करण्याच्या दृष्टीने हे धोरण जाहीर करण्यात आले.

**१९९१ च्या औद्योगिक धोरण उद्दिष्टे :**

१) देशी उद्योगांची स्पर्धाशक्ती वाढवणे.

२) मक्तेदारी प्रतिबंधक कायद्यातून देशी उद्योग बाजूला करणे.

३) विदेशी गुंतवणूकीवरील मर्यादा काढून घेणे.

४) सरकारी क्षेत्र कमी करणे.

५) औद्योगिक परवाना पध्दती शिथिल किंवा सौम्य करणे.

नवीन आर्थिक धोरण तसेच औद्योगिक धोरणाचा भारतातील औद्योगीक विकासावर प्रभाव पडलेला असल्याने आर्थिक सुधारणा कालखंडातील औद्योगिक विकास कसा साध्य झालेला आहे याचा अभ्यास करताना ही दोन्ही धोरणे महत्वाची ठरतात.

**१) राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा (Share in National Income):**

अलिकडील कालखंडामध्ये औद्योगिक क्षेत्राचा देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा वाढल्याचे दिसून येते. सन १९५०-५१ मध्ये राष्ट्रीय उत्पन्नात १०.६% होता, तो २०१३-१४ मध्ये ३१.७% पर्यंत वाढल्याचे दिसून येते. म्हणजेच भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासामधील औद्योगिक क्षेत्राचे महत्व वाढत असल्याचे दिसून येते.

**२) रोजगार निर्मिती (Employment Generation):**

भारतीय अर्थव्यवस्थेमधील लोकसंख्या सातत्याने वाढत असल्याने वाढत्या लोकसंख्येला रोजगार पुरवठा करण्याचे कार्य औद्योगिक क्षेत्राने केलेले आहे. भारतात सन १९६१ मध्ये एकूण कामगारांपैकी ११.७% कामगार औद्योगीक क्षेत्रावर रोजगारासाठी अवलंबून होते. २०११ मध्ये हे प्रमाण २४.३ % पर्यंत वाढल्याचे दिसून येते; म्हणजेच औद्योगिक क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा वाढण्याबरोबरच रोजगार पुरवठ्याचे प्रमाण देखील वाढल्याचे स्पष्ट होते.

**३) परकीय चलन प्राप्ती:**

भारतीय अर्थव्यवस्थेमधील औद्योगिक क्षेत्रामधून अनेक उत्पादित वस्तूंची जगामधील विविध देशांना निर्यात केली जाते, व त्यापासून देशाच्या विकासाला आवश्यक बहुमूल्य असे परकीय चलन प्राप्त होते. सन १९९०-९१ मध्ये औद्योगीक क्षेत्रामधून होणाऱ्या निर्यातीमधून भारताला २३७३६ कोटी रूपयाचे परकीय चलन प्राप्त झालेले होते. त्यामध्ये सन २०१४-१५ वाढ होवून परकीय चलन प्राप्ती ८३७३४० कोटी रूपये झालेली आहे.

**४) निर्यातीमधील औद्योगिक उत्पादनाचा वाटा:**

देशाच्या निर्यातीमधील औद्योगिक उत्पादनाचा वाटा सन १९९५-९६ मध्ये ११.२९ % इतका होता तो २०१३-१४ या वर्षात ०.३५% पर्यंत घटलेला आहे. आर्थिक सुधारणा कालखंडात निर्यातीमधील सेवाक्षेत्राचा वाटा वाढल्याने औद्योगीक उत्पादनाचा वाटा घटल्याचे दिसून येते.

**५) सार्वजनिक उद्योगांच्या संख्येमध्ये वाढ :**

भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये सार्वजनिक क्षेत्रामध्ये कार्यरत असणाऱ्या उद्योगांच्या संख्येमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येते. सन १९५० मध्ये सार्वजनिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या उद्योगांची संख्या फक्त ५ होती सन २००९ अखेर २४६ पर्यंत वाढल्याचे दिसून येते.

**६) एकूण उद्योगांच्या संख्येमध्ये वाढ :**

भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये सार्वजनिक क्षेत्रामधील उद्योगांबरोबरच एकूण उद्योगांच्या संख्येमध्ये देखील वाढ झालेली आहे. सन १९९१-९२ मध्ये देशातील एकूण उद्योगांची संख्या १.१२ लक्ष होती त्यामध्ये वाढ होवून सन २०१२-१३ ती २.२२ लक्षपर्यंत वाढलेली आहे.

**७) कामगार संख्येमध्ये वाढ :**

उद्योगांच्या संख्येमधील वाढीबरोबरच एकूण उद्योगांमधील कामगार संख्येमध्येदेखील वाढ झालेली आहे. सन १९९१-९२ मध्ये देशातील एकूण कामगारांची संख्या ८१.९३ लक्ष होती त्यामध्ये वाढ होवून सन २०१२-१३ ती १.२९ कोटींपर्यंत वाढलेली आहे.

**८) नफ्यामध्ये वाढ :**

उद्योगांच्या संख्येमधील वाढीबरोबर एकूण उद्योगांच्या नफ्याचे प्रमाण सुध्दा वाढलेले आहे. सन १९९१-९२ मध्ये देशातील एकूण उद्योगांचा नफा ९,६३,५०७ लक्ष होता, त्यामध्ये वाढ होवून तो सन २०१२-१३ ती ४,४४,२६,२९२ लक्षपर्यंत वाढलेला आहे.

वरील विविध घटकांच्या आधारे भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये आर्थिक सुधारणा कालखंडामध्ये औद्योगिक क्षेत्राची प्रगती  कशा स्वरूपात झालेली आहे ते स्पष्ट होते.

**प्रश्न १. रिकाम्या जागा भरा.**

१) सन १९५०-५१ शी तुलना करता २०१३-१४ मध्ये राष्ट्रीय उत्पन्नातील उद्योगांचा वाटा . . . . . आहे.

अ) घटला ब) वाढला क) स्थिर ड) यापैकी नाही

२) पी. व्ही. नरसिंहराव यांनी . . . . . रोजी औद्योगिक धोरण जाहीर केले.?

अ) २२ जुलै, १९९१ ब) २४ जुलै, १९९१

क) २६ जुलै, १९९१ ड) २८ जुलै, १९९१

उत्तर : १) वाढला २) २४ जुलै, १९९१

**प्रश्न २. टीपा लिहा**

१) आर्थिक सुधारणा कालखंडातील औद्योगिक क्षेत्राची प्रगती

**प्रश्न ३. पुढील प्रश्नाची सविस्तर चर्चा करा.**

१) आर्थिक सुधारणा कालखंडातील औद्योगिक क्षेत्राच्या प्रगतीचा आढावा घ्या.

## ३.d कामगार संघटना चळवळः Trade Union Movement

### ३.d.१ प्रस्तावनाः

कामगारांच्या हितसंवर्धनासाठी व संरक्षणासाठी कामगारांनी स्वच्छेने स्थापन केलेली संघटना म्हणजे कामगारासंघटना होय. २० व्या शतकाच्या प्रारंभी कामगार संघटना चळवळ उदयास आली. एस.एस. बंगाली, एम.लोखंडे आणि इतर कांही कार्यकर्त्यांनी कामगारसंघटना स्थापना केली. कामगार वर्गाच्या हितासाठी संघटनेची गरज भासू लागली होती. तथापि पहिल्या महायुद्धापर्यंत भारतात कामगार संघटना स्थापन होऊ शकली नाही.

### ३.d.२ विकासः

उच्च वेतन, कामाच्या परिस्थितीत सुधारणा आणि विविध सवलती मिळविण्याच्या हेतूने १९२० मध्ये कामगारसंघटना स्थापन करण्यात आली. संप पुकारण्यात आले. या संपाना यश मिळाले. त्यामुळे कामगार संघटना स्थापन झाल्या. १९२० मध्ये 'अखिल भारतीय कामगार संघटना' (All India Trade Union Congress - AITUC) स्थापना केली. कामगारांचे हित जपणे आणि कामगारसंघटनांच्या इतर कार्यक्रमांना चालना देणे ही उद्दिष्टे ठरविण्यात आली. यामुळे संपूर्ण भारतभर कामगार संघटना चळवळ सक्रिय झाली. मोठ्या व लहानउद्योगांत कामगारांच्या संघटना सुरू झाल्या. त्यांची व सदस्यांची संख्या वाढू लागली.

१९२६ मध्ये कामगार संघटना कायदा पास करण्यात आला. हीच देशात कामगारसंघटनेच्या चळवळीच्या दृष्टीने महत्त्वाची घटना होती. त्यामुळे कामगार संघटनांना कायदेशीर दर्जा प्राप्त झाला. तसेच उद्योग व लोकांच्यामध्येही कामगारांचा एक विशिष्ट दर्जा निर्माण झाला. अर्थात कामगार संघटनांच्या नेत्यामध्ये तात्त्विक मतभेद निर्माण झाल्याने १९२० च्या शेवटी कामगार संघटनांचे विभाजन झाले. अखिल भारतीय कामगार संघटना (AITUC)साम्यवादी (Communists) नेत्यांनी ताब्यात घेतली. तर अखिल भारतीय कामगार संघटना संघ इतरांनी सुरू केला. नेत्यांमधील मतभेदामुळे कांही संप अपयशी ठरले. १९२९ मध्ये मुंबईतील कापड गिरण्यातील संप अपयशी ठरला.महामंदीच्या काळात अनेक कामगारांना आपल्या रोजगारास मुकावे लागले. त्यामुळे कामगार संघटनांचे पुन्हा विभाजन झाले परंतु दुसऱ्या महायुद्धापर्यंत पुन्हा कामगार संघटना एकसंघ झाली. दुसऱ्या महायुद्धाच्या दरम्यानही कामगारसंघटना चळवळीमध्ये दोन गट पडले. एक गट रशियन साम्यवादाचे अनुकरण करणारा या विचाराच्या होता की, ब्रिटीशांना नाझीच्या विरोधात लढण्यासाठी मदत केली पाहीजे तर दुसऱ्या गटातील राष्ट्रवादी नेत्यांनी 'ब्रिटीशांची राजवट संपुष्टात आणण्यासाठी राष्ट्रीय कामगार संघटना चळवळ बलवान करण्यावर भर दिला. त्यामुळे कामगारसंघटनेचे पुन्हा विभाजन झाले. महायुद्धाच्या काळात राहणीमानाचा खर्च वाढल्याने औद्योगिक क्षेत्राचे स्वास्थ बिघडले त्यामुळे कामगारवर्गाला संघटनेची नितांत गरज भासू लागली व संघटना बळकट होऊ लागली.

### ३.d.३ स्वातंत्र्योत्तर काळातील कामगारसंघटना चळवळीची प्रगतीः

**कोष्टक क्र.३.४**

| वर्ष | नोंदणी झालेल्या कामगार संघटना | सदस्य संख्या(लाखामध्ये) |
|---|---|---|
| १९५१-५२ | ४,६२३ | २० |
| १९६१-६२ | ११,६१४ | ४० |
| १९७१ | २२४८४ | ५५ |
| १९८१ | ३५५३९ | ५४ |
| १९८७ | ४९३२९ | ७९ |
| १९९० | ५२०१६ | ७० |
| १९९५ | ५७९५२ | ६५ |
| १९९९ | ६४८१७ | ६४ |

Source - Indian Labour yearbook -2002,03

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आणि फाळणीनंतर भारतात बेकारीचे प्रमाण वाढले. कामगारांच्या वाढीव वेतन, शेवाशर्ती व इतर सुविधांची उपलब्धता या मागण्यामुळे सरकारवरचा दबाव वाढला. कामगारांना आपल्या हक्कासाठी लढा उभारला पाहिजे याची जाणीव झाली. त्यामुळे अनेक संप सुरू झाले. मानवी श्रम व श्रमदिवस वाया गेले याच काळात कामगार संघटनांच्या क्रमवारीतील एकवाक्यतेचा अभाव यामुळे वेगवेगळ्या संघटनांची निर्मिती झाली. १९४७ मध्ये भारतीय राष्ट्रीय कामगार संघटना (I.N.T.U.C)स्थापन झाली. या संघटनेचे नियंत्रण व नेतृत्त्व कॉँग्रेसकडे गेले. १९४८ मध्ये स्थापन झालेल्या हिंद मजदूर सभेचे नियंत्रण प्रजा समाजवादी पार्टीकडे गेले आणि पुरोगामी विचारांच्या लोकांनी १९४९ मध्ये 'संघटित कामगार संघ' (U.T.U.C) स्थापन केला. या सर्व कामगार संघटना कामगाराच्या हितासाठी कार्य करत होत्या. परंतु त्यांच्यामध्ये एकी नव्हती किंवा त्यांनी समान तत्त्व किंवा धोरण स्वीकारले नाही.

वरील कोष्टक क्र.३.४ वरून भारतातील कामगार संघटनांच्या वाढीची व प्रगतीची कल्पना येते. कामगार संघटना चळवळीचा विस्तार झाला आणि ती संपूर्ण अर्थव्यवस्थेत रूजली गेली. कामगार संघटना या भक्कम पायावर व चांगल्या पद्धतीने संघटित झालेल्या संस्था आहेत. या पैकी भारतीय राष्ट्रीय कामगार संघटना (INTUC), अखिलभारतीय कामगार संघटना (AITUC), सीटू (Centre for trade Unions - (CITU), हिंद मजदूर सभा (HMS), भारतीय मजदूर संघ (BMS), युनायटेड ट्रेड युनियन कॉँग्रेस, (UTUC), नॅशनल फेडरेशन ऑफ इंडेपेंडट ट्रेड युनियनस् (NFITU)

मुख्य कामगार आयुक्तांच्या कार्यालयातील उपलब्ध आकडेवारीनुसार ऑगस्ट १९९४ मध्ये भारतीय जनता पार्टीप्रणित (भाजप) ही ३१.१७ लाख सदस्य संख्या असलेली सर्वात मोठी कामगार संघटना होती. त्यानंतर कॉँग्रेस प्रणित इंटक- २७.०६ लाख, सिटू- १७.९८ लाख आणि हिंद मजदूर सभा (HMS) - १४.७७ लाख यांचा क्रम लागतो.

पहिल्या महायुद्धानंतरच्या काळात कामगार संघटना चळवळीची प्रगती झाल्याचे दिसून येते. कामगारांमध्ये निर्माण झालेली अस्वस्थता ही अनेक कामगार संघटनांची निर्मिती होण्यास कारणीभूत ठरली आहे. १९२० मध्ये अखिल भारतीय कामगार संघटना (AITUC) स्थापन करण्यात आली. व्यक्तिगत पातळीवर कामगार संघटनांना मार्गदर्शन व त्यांच्या कार्यामध्ये समन्वय साधण्यासाठी या संघटनेने काम सुरू केले.दशाच्या विविध भागात लहान व मोठ्या उद्योगांत संघटनांची स्थापना करण्यात आली. कामगार संघटनांची कशी वाढ व प्रगती झाली हे आपण कोष्टक क्र.३.४ मध्ये पाहिले आहे.

### ३.d.४ कार्यः Functions

काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या हिताचे रक्षण करून त्यांचे कल्याण करणे यासाठी कामगारसंघटना प्रयत्नशील असतात. राष्ट्रीय कामगार आयोगाने (NCL)कामगार संघटनांची पुढील कार्ये सांगितली आहेत.

१. कामगारांना योग्य वेतन मिळवून देणे

२. कामगारांच्या सेवा शर्तींमध्ये सुधारणा करणे व त्यांच्या हितसंबधी सुरक्षिता निर्माण करणे.

३. बढतीच्या आणि प्रशिक्षणाच्या संधीत सुधारणा करणे.

४. कामकाजाच्या आणि राहण्याच्या परिस्थितीत सुधारणा करणे.

५. शैक्षणिक, सांस्कृतिक व पुनर्मितींच्या सुविधा निर्माण करणे.

६. तांत्रिक प्रगतशीलता सुविधा पुरविण्यासाठी कामगारांची परिस्थिती सुधारणे.

७.  कामगारवर्गाचे उद्योगातील संबंध सुधारणे.

८.  उत्पादन व उत्पादकतेची पातळी सुधारणे तसेच उत्पादनाची उच्च गुणवत्ता आणि शिस्त निर्माण करणे.

९.  व्यक्तिगत आणि सामुदायिक कल्याणाला चालना देणे.

**३.d.५ सामाजिक जबाबदारी** : Social Responsibility

कामगार संघटनांना कामगारांच्या कायदेशिर हक्कासाठी लढण्याचा हक्क(अधिकार) असला तरी सार्वजनिक हिताच्या दृष्टीने त्यांना आपल्या हक्काचा गैरवापर करता येणार नाही. कामगार संघटनांनी सामाजिक बदलाला अनुसरून सामाजिक जबाबदारी म्हणून पुढील कामे करणे आवश्यक आहे.

अ.  राष्ट्रीय एकात्मतेला चालना देणे

ब.  विविध स्तरावर सामाजिक आर्थिक धोरणाचा प्रभाव वाढविण्यासाठी सक्रिय सहभाग वाढविणे.

क.  आपल्या सभासदांना उद्योगांबाबत व समाजाबाबत जबाबदारीची जाणीव करून देणे.

थोडक्यात, देशात खऱ्या अर्थाने समाजवाद निर्माण करण्यासाठी औद्योगिक लोकशाही निर्माण करणे व त्यादृष्टीने शिस्तबद्ध वातावरण निर्माण करणे गरजेचे आहे.

**३.d.६ समस्या** : Problems

भारतातील कामगार संघटनांना विविध समस्यांना सामोरे जावे लागले. त्यामुळे त्यांची प्रगती सीमित(मर्यादित) झाली. त्या समस्या पुढील प्रमाणे–

**१.  मर्यादित प्रतिनिधित्त्वः**

कामगार संघटनांमध्ये एकूण कामगारशक्ती पैकी, अगदी थोडीच कामगारसंख्या सहभागी झाली आहे. विशेषतः असंघटित क्षेत्रात तर कामगारसंघटना चळवळीमध्ये अत्यंत अल्पप्रतिसाद आहे. प्रामुख्याने शेती क्षेत्रामध्ये (असंघटित) कामगारसंघटना चळवळ यशस्वी ठरलेली नाही. तथापि केरळ सारख्या राज्यात कांहीवेळा कामगारसंघटनांचा बेजबाबदापणा हा शेती क्षेत्राला शाप ठरला आहे.

**२.  लहान आकार आणि वाढती संख्याः**

कामगारसंघटनांची संख्या वाढली आहे. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे प्रस्थापित संघटनांचे दोन किंवा जादा संघटनांमध्ये विभाजन झाले आहे. शिवाय नवीन लहानलहान संघटना स्थापन होत आहेत. संघटनांच्या लहान आकारमानामुळे वित्तीय आणि प्रशासकीय स्थिती अशक्त व नाजूक बनली आहे. तसेच सामुदायिक सौदाशक्ती कमकुवत बनली आहे. संघटनांतर्गत स्पर्धेमुळे संघटना क्षीण होत आहेत. मालक व कामगार यांच्यात दुरावा निर्माण होत आहे.

**३.  संघटनांची बहुविधताः**

संघटनांची बहुविधता ही गंभीर समस्या बनली आहे. संघटनांची संख्या वाढल्यामुळे संघटनांचे सरासरी आकारमान कमी होत आहे. परिणामी एका लहान संघटनेला उद्योगातील बहुसंख्य कामगारांचा पाठींबा मिळत नाही. एका संघटनेने बहुमताचा दावा केला तरी इतर संघटना कांही गंभीर समस्या निर्माण करतात. अशाप्रकारे कामगारसंघटनांच्या बहुविधतेमुळे कामगारांची सामुदायिक सौदाशक्ती कमकुवत होते. तसेच मालक–कामगार यांच्यातील विविध वाटाघाटी आणि करारामध्ये अनेक अडचणी येतात. थोडक्यात 'एक उद्योग एक संघटना' हे आदर्श तत्त्व स्वप्नच ठरण्याची शक्यता आहे.

### ४. संघटनांतर्गत व संघटनासंघटना स्पर्धाः

कामगारसंघटनांच्या बहुविधतेमुळे संघटनाअंतर्गत व संघटनासंघटनामध्ये स्पर्धा निर्माण होते. एकसंघटना दुसऱ्या संघटनेच्या विरोधात कार्य करते. कामगारसंघटना विविध राजकीय तत्त्वज्ञानावर उभारलेल्या असल्याने त्या परस्परविरोधी भूमिका घेतात. त्यामुळे सामुदायिक सौदाशक्ती दुबळी बनते. आणि औद्योगिक अशांतता निर्माण होते. कांही गंभीर समस्या निर्माण होतात. व्यक्तिगत हेवे दावे, मतभेद यामुळे संघटनांच्या सदस्यामध्येच संघर्ष निर्माण होतो आणि संघटना-संघटनामध्ये अनावश्यक स्पर्धा सुरू होते.

### ५. राजकिय प्रवृत्तींचा शिरकावः

कामगारसंघटनांचे राजकीयीकरण हा गंभीर प्रश्न बनला आहे. इंटक, आयटक, सिटू इ. कामगारासंघटना ह्या राजकीय पक्षांनी प्रेरित अशा आहेत. त्यामुळे प्रत्येक राजकिय पक्ष आपली कामगार संघटना बळकट व प्रभावी बनविण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे त्यांच्यामध्ये अनावश्यक स्पर्धा सुरू होतात आणि या संघटना राजकिय पक्षाचे बाहुले बनतात.

### ६. बाह्यनेतृत्त्वः

कामगारसंघटनांच्या प्रगतीच्याकाळात बाह्य नेतृत्त्वाने प्रवेश केला आहे. हे नेतृत्त्व संघटनेच्या व सभासदांच्या कल्याणासाठी काम करण्यापेक्षा व्यक्तिगत स्पर्धांसाठी कार्यरत असते. त्यामुळे अनेक समस्या निर्माण होतात. सभासदांची दिशाभूल केली जाते. आणि कामगारसंघटना चळवळीचा दुरूपयोग केला जातो.

### ७. अपुरा निधीः

कामगारांचे अल्प उत्पन्न, कमी सदस्य संख्या, यामुळे संघटनांकडे अपुरा निधी असतो. त्यामुळे कामगारसंघटनांचे कामकाज व व्यवस्थापन सुरळीतपणे पार पाडता येत नाही. तसेच कामगारांच्या कल्याणाच्या योजना राबविता येत नाहीत.

### ८. अल्प उत्पन्नः

कामगारांचे उत्पन्न कमी असल्याने ते संघटनेची वर्गणी वेळेवर देत नाहीत. किंबहुना संघटनेचे सदस्यत्त्व स्वीकारण्यासच ते तयार होत नाहीत. त्यामुळे संघटना वाढत नाही.

### ९. निरक्षरताः

कर्मचाऱ्यांच्या निरक्षरतेमुळे व शिक्षणाच्या अभावामुळे कामगारसंघटना चळवळीची प्रगती होत नाही. कारण कामगार संघटनेबाबत उदासीन असतो.

### १०. मालकांचा/ उद्योजकांचा अयोग्य दृष्टीकोनः

आजही भारतातील अनेक उद्योजक कामगार संघटना वाईट असते या मताचे आहेत. त्यामुळे त्यांचा संघटनबाबत सकारात्मक दृष्टीकोन नसतो अनेक उद्योजक संघटना फोडण्यासाठी किंवा ती दुबळी बनविण्यासाठी प्रयत्नशिल असतात. म्हणूनच कामगार संघटना कमकुवत बनते.

### ३.d.७ उपाययोजना/ सूचनाः

कामगारसंघटना चळवळ बलवान करून तिचे सामर्थ्य व सौदाशक्ती वाढविण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. कामगार संघटनेने कामगारांचे हित जोपासले पाहिजे. कामगार संघटनेने कामगारांचे हितसंवर्धन केले तरच सामाजिक लोकशाही वृद्धींगत होऊन औद्योगिक उत्पादनात वाढ होईल. त्यामुळे सामाजिक

शांतता निर्माण होऊन विकासाला चालना मिळेल. कामगारसंघटना चळवळ बळकट/बलवान होण्याच्या दृष्टीने पुढील उपाय सुचविले जातात.

१. कामगारसंघटनेमध्ये एकता (Unity) असली पाहिजे. यासाठी कामगारांची केंद्रीय पातळीवर एकच संघटना असली पाहिजे. त्यामुळे कामगारांच्या हिताची जोपासना होईल.

२. कामगारसंघटनेवरील राजकिय दबाव टाळणे गरजेचे आहे. सद्या कामगार संघटना चळवळीचे नेतृत्त्व राजकीय पुढाऱ्यांच्या हाती आहे. त्यामुळे संघटनेमध्ये हेवेदावे निर्माण होऊन कामगारांचे नुकसान होते म्हणूनच कामगार संघटना ही राजकीय पक्षांच्या दबावापासून दूर असली पाहिजे.

३. कामगार संघटनांचे नेतृत्त्व कामगारांनीच केले पाहिजे. कारण कामगारांनाच त्यांच्या समस्यांची खरी जाणीव असते. त्यामुळे कामगारहितासाठी ते सदैव प्रयत्नशील राहतील.

४. कामगारांमध्ये जबाबदारीची जाणीव निर्माण केली पाहिजे. त्यामुळे ते संघटनेशी व व्यवस्थापनाशी एकनिष्ठ राहतील आणि संघर्ष टाळता येईल.

५. एका उद्योगात एकच संघटना असावी त्यामुळे संघटनांतर्गत जीवघेणी स्पर्धा कमी होईल व कामगारांची सामुदायिक सौदाशक्ती वाढेल.

याबरोबरच संपनिधीची तरतुद करणे, कामगारसंघटनांना सरकाने मदत करणे इ. महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत.

## ३.४ सारांशः

१९५१ नंतरच्या गेल्या ५८ वर्षातील भारताच्या औद्योगीकरणाची प्रगती हे देशाच्या आर्थिक विकासाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. भारताने औद्योगिक क्षेत्रात केलेल्या प्रगतीमुळे भारतीय औद्योगिक रचना बदलली. त्यामुळे आयातीमध्ये उत्पादन केलेल्या वस्तूंचे प्रमाण घटले तर निर्यात वस्तूमध्ये अभियांत्रिकी वस्तूंचे प्रमाण वाढले. भारतीय नियोजनकारांनी औद्योगिक व्युहरचनेसाठी महत्त्वाचा दृष्टीकोण स्वीकारला तो म्हणजे आयात वस्तूंची मागणी कमी करणोरआणि विदेशी चलनाच्या प्राप्तीला चालना देणाऱ्या उद्योगांचा विस्तार करणे.

स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय अर्थव्यवस्थेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे लघुउद्योग क्षेत्राचा जलद विकास होय. भारताच्या १९४८ च्या आणि १९५६ च्या औद्योगिक धोरणामध्ये लघुउद्योगावर अल्पभांडवल गुंतवणुकीत जादा रोजगार निर्मितीसाठी विशेष भूमिका पार पाडण्याची कामगिरी सोपवली. लघुउद्योगाने भारतीय अर्थव्यवस्थेत महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे. लघुउद्योगाचे राष्ट्रीय अर्थव्यवस्थेतील उत्पादन निर्यात व रोजगार या दृष्टीने महत्त्व विचारात घेता त्यांना पतपुरवठ्याच्या सोयी उत्तमप्रकारे, वेळेत व रास्त व्याज दरात उपलब्ध करून दिल्या तरच त्यांचा विकास वेगाने होईल.

गेल्या दशकापासून भारतातील उद्योगामध्ये आजारपण वाढत आहे. भारतीय उद्योगाचे आजारपण ही गंभीर समस्या बनली आहे. औद्योगिक आजारपणाला दोन घटक कारणीभूत ठरतात.१) सरकारचे उत्पादन, वाटप, किंमती याबाबत धोरण सदोष असल्याने औद्योगिक संबंधात अडथळे येतात. २) सरकारला राष्ट्रीय उत्पन्न आणि वेतनाबाबत योग्य धोरण आखण्यात आलेले अपयश. सरकारने स्पर्धाक्षमता व कार्यक्षमता वाढीसाठी आर्थिक सुधारणा करण्यास सुरवात केली आहे.

१९९१ नंतरचे औद्योगिक धोरण म्हणजे नवीन औद्योगिक धोरण होय. नवीन धोरणाचे दोन भाग करण्यात आले आहेत. १) पहिला भाग २४ जुलै १९९१ मध्ये जाहीर केला.यामध्ये मोठ्या व मध्यम

उद्योगांचा समावेश करण्यात आला. २) दुसरा भाग ६ ऑगस्ट १९९१ मध्ये जाहीर केला. यामध्ये लघुउद्योगांचा समावेश होता. नवीन औद्यागिक धोरणाद्वारे अर्थयवस्थेत अनुकूल बदल घडवून आणण्यासाठी विविध उपाय योजले. अर्थव्यवस्थेला चालना देऊन गतीमान आर्थिक प्रगतीसाठी व स्पर्धाक्षमता वाढविण्यासाठी हे धोरण उपयुक्त ठरले. म्हणून या धोरणाला महत्त्व प्राप्त झाले आहे.

कामगारांच्या हितसंवर्धनासाठी व संरक्षणासाठी कामगारांनी स्वच्छेने स्थापन केलेली संघटना म्हणजे कामगार संघटना होय. भारतातील कामगार संघटनांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागते. म्हणून कामगार संघटना चळवळ बलवान करून तिचे सामर्थ्य व सौदाशक्ती वाढविण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

## ३.५ पारिभाषिक शब्दः

- **औद्योगिक वृद्धीः** औद्योगिक उत्पादनात सतत होणारी वाढ.
- **औद्योगिक विकासाची व्यूहरचनाः** औद्योगिक विकासाबाबतचे धोरण.
- **नवे औद्योगिक धोरणः** उद्योगाच्याप्रगतीबाबत स्वीकारलेले आधुनिक धोरण.
- **कामगार संघटनाः** कामगारांच्या हितसंवर्धनासाठी व संरक्षणासाठी कामगारांनी स्वच्छेने स्थापन केलेली संघटना म्हणजे कामगार संघटना होय.
- **सामाजिक जबाबदारी** : कामगार संघटनानी सामाजिक बदलाला अनुसरून राष्ट्रीय एकात्मता वाढविणे.

## ३.६ स्वयंअध्ययनः

**अ) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

१. औद्योगिकरणाची प्रक्रिया ही.... च्या औद्योगिक धोरणाने राबविण्यात आली.

२. गतीशील औद्योगिकरणासाठी औद्योगिक विकासाची .... आखण्यात आली.

३. १९५० मध्ये सरकारने लघुउद्योगाचे ..... गटात वर्गीकरण केले.

४. लघुउद्योगात विविध प्रकारची .... दिसून येते.

५. भारताने... नंतर नवीन औद्योगिक धोरण स्वीकारले.

**उत्तरेः** १) १९५६ २) व्यूहरचना ३) दोन ४) अकार्यक्षमता ५) १९९१

**ब) चूक की बरोबर ते लिहा.**

१) भारताने १९४८ मध्ये पहिले औद्योगिक धोरण जाहीर केले.

२) लघुउद्योगाने भारतीय अर्थव्यवस्थेत महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे.

३) भारताने १९८१ नंतर नवीन औद्योगिक धोरण स्वीकारले.

४) कामगार संघटनांमुळे सामुदायिक सौदाशक्ती घटते.

**उत्तरेः** १) बरोबर २) बरोबर ३) चूक ४) चूक

### ३.७ सरावासाठी प्रश्नः

१) भारताच्या औद्योगिक विकासाबाबत सविस्तर लिहा.

२) लघुउद्योगाची आर्थिक विकासातील भूमिका स्पष्ट करा.

३) १९९१ नंतरचे औद्योगिक धोरण स्पष्ट करा.

४) भारतातील कामगार संघटनांचळवळीचा आढावा घ्या.

५) टीपा लिहा.

   १) औद्योगिक वृद्धी

   २) १९९१ नंतरचे औद्योगिक धोरण

   ३) कामगार संघटना चळवळ

## ३.८ अधिक वाचनासाठी पुस्तकेः


१. R. Datt, K.P.M. Sundharam: Indian Economy

२. Francis Cherunilum : Business Environment

३. डॉ. दत्तात्रय ग. चौगुले : व्यावसायिक पर्यावरण

४. अर्थसंवाद : विविध अंक

५. Economic Times, महाराष्ट्र टाईम्स व दै. सकाळचे विविध अंक


❑❑❑

## सत्र ५ : घटक ४

# भारतीय अर्थव्यवस्थेच्या समस्या

## (Problems of Indian Economy)

**अनुक्रमणिका :**


४.० उद्दिष्टेः

४.१ प्रास्ताविकः

४.२ विषय विवेचनः

४.३ भारतीय लोकसंख्येची वैशिष्ट्येः

४.३.अ भारतातील लोकसंख्या

४.३.ब भारतातील लोकसंख्या : आकार व वृद्धीदर

४.३.क भारतातील लोकसंख्या वाढीची कारणेः

४.३.ड मृत्यूदरात घट होण्याची कारणेः

४.३.इ भारतीय लोकसंख्येची वैशिष्ट्ये

४.४ भारतातील बेरोजगारी

४.४.अ बेरोजगारीचा अर्थः

४.४.ब बेरोजगारीचे स्वरूपः

४.४.क भारतातील बेरोजगारीचे प्रमाणः

४.४.ड भारतातील बेकारी वाढण्याची कारणेः

४.४.इ. बेकारी निर्मुलनासाठी उपाययोजनाः

४.५ भारतातील दारिद्र्यः

४.५.अ दारिद्र्याची संकल्पनाः

४.५.ब दारिद्र्यरेषा

४.५.क दारिद्र्याबाबतचे अंदाजः

४.५.इ दारिद्र्य निर्मूलनासाठी उपाययोजना :

४.६ उत्पन्न व संपत्तीतील विषमता

४.६.अ भारतातील उत्पन्नातील विषमतेची कारणे :

४.६.ब उत्पन्नातील विषमता कमी करण्यासाठी सरकारकडून करण्यात आलेल्या उपाययोजना

४.७ काळा पैसा – कारणे व उपाय

४.७.अ प्रास्ताविक :

४.७.ब काळा पैसा : अर्थ

४.७.क भारतातील काळा पैसा :

४.७.ड भारतातील काळ्या पैशाच्या निर्मितीची कारणे :

४.७.इ काळया पैशाच्या नियंत्रणासाठी उपाययोजना :

४.८ भारतीय अर्थव्यवस्थेतील ग्रामीण व शहरी समस्या

४.९ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

४.१०सरावासाठी स्वाध्याय

४.११ संदर्भ पुस्तके

## ४.० उद्दिष्टे:

- भारतीय अर्थव्यवस्थेपुढील कांही महत्त्वपूर्ण समस्यांची माहिती करून घेणे.
- भारतीय लोकसंख्येच्या वैशिष्ट्यांची माहिती करून घेणे.
- बेकारीचा अर्थ समजून घेणे.
- भारतातील बेरोजगारीचे स्वरूप, बेरोजगारीचे प्रमाण बेरोजगारीची कारणे व बेरोजगारी कमी करण्याचे उपाय याबाबत माहिती करून घेणे.
- दारिद्र्यांची संकल्पना (अर्थ), दारिद्र्यरेषेचा अर्थ, भारतातील दारिद्र्याबाबतचे अंदाज याबाबत माहिती करून घेणे.
- भारतीय दारिद्र्याची कारणे व भारतीय दारिद्र्य निर्मूलनासाठी केलेल्या उपाययोजना याबाबत माहिती करून घेणे.
- भारतातील उत्पन्न व संपत्तीतील विषमतेची कारणे व ती विषमता कमी करण्यासाठी सरकारने केलेल्या उपाययोजना याबाबत माहिती करून घेणे.
- काळ्या पैशाचा अर्थ, भारतातील काळ्या पैशाबाबतचे अंदाज, भारतात काळा पैसा वाढण्याची कारणे व त्याविरूद्ध उपाययोजना याबाबत माहिती करूण घेणे.

## ४.१ प्रास्ताविक:

घटक क्रमांक ३ मध्ये आपण भारतातील औद्योगिक विकासाबाबत कांही समस्यांचा अभ्यास केला.त्यात आपण प्रामुख्याने लघु उद्योगाची भूमिका, लघूउद्योगापुढील समस्या, त्याविरूद्ध उपाययोजना, भारतातील आजारी उद्योग त्याची कारणे व त्यावरील उपाय, सरकारचे औद्योगिक धोरण तसेच भारतातील कामगार चळवळ त्यापुढील समस्या व उपाय इत्यादीबाबतचा अभ्यास केला. याशिवाय भारतीय अर्थव्यवस्थेपुढे वाढत्या लोकसंख्येची समस्या, बेरोजगारी, दारिद्र्य उत्पन्नातील व संपत्तीतील विषमता व

काळा पैसा अशा अनेक समस्या आहेत. म्हणून आपण घटक क्रमांक ४ मध्ये या सर्व समस्यांचा अभ्यास करणार आहोत.

## ४.२ विषय विवेचन :

१. भारतीय अर्थव्यवस्थेपुढे ज्या प्रमुख समस्या आहेत त्यातील महत्त्वाची समस्या म्हणजे लोकसंख्येचा स्फोट होय. लोकसंख्या वाढ व आर्थिक विकास यामध्ये अत्यंत निकटचा संबंध आहे. बऱ्याच अर्थशास्त्रज्ञांच्या मते वाढती लोकसंख्या आर्थिक विकासातील अडसर आहे. वाढत्या लोकसंख्येसाठी सरकारला विविध सोई-सुविधांवरील खर्च वाढवावा लागल्याने विकासाचे नियोजित प्रकल्प पूर्ण करता येत नाहीत. म्हणून भारतातील लोकसंख्या वाढीची प्रमुख कारणे व भारतीय लोकसंख्येची वैशिष्ट्ये यासंदर्भात सविस्तर माहिती घेणार आहोत.

२. भारतीय अर्थव्यवस्थेपुढील दुसरी महत्त्वाची समस्या म्हणजे बेरोजगारी. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात बेरोजगारीच्या समस्येने गंभीर स्वरूप धारण केले आहे. दहा पंचवार्षिक योजना पूर्ण झाल्या तरी आणि सरकारने विविध कार्यक्रमांची अंमल बजावणी केली असताना सुद्धा बेकारीचा प्रश्न गंभीर बनला आहे. म्हणून आपण बेकारी म्हणजे काय ? भारतातील बेकारीचे स्वरूप कसे आहे? भारतात बेकारीचे प्रमाण किती आहे. भारतातील बेकारी वाढण्याची कारणे कोणती व त्याविरूद्ध करता येतील अशा व सरकारने केलेल्या उपाययोजना कोणत्या आहेत? या संदर्भात सविस्तर माहिती घेणार आहोत.

३. भारतीय अर्थव्यवस्थेपुढील तिसरी महत्त्वाची समस्या आहे. दारिद्र्य वाढत्या लोकसंख्येमुळे काम मागणाऱ्यांची संख्या वाढली परंतु त्याप्रमाणात रोजगारसंधी वाढली नाही. परिणामतः बेरोजगारी वाढून दारिद्र्याचा प्रयश्न गंभीर बनला आहे. नियोजनाची ५८ वर्षे पूर्ण होवून सुद्धा २६% लोक दारिद्र्यात आहेत. म्हणून दारिद्र्याचा व दारिद्र्यरेषेचा अर्थ, भारतातील दारिद्र्याबाबतचे अंदाज, भारतीय दारिद्र्याची कारणे व त्याविरूद्ध उपाय योजना या संदर्भात आपण सविस्तर माहिती घेणार आहोत.

४. उत्पन्नातील व संपत्तीतील विषमता ही भारतीय अर्थ व्यवस्थेपुढील चौथी महत्त्वपूर्ण समस्या आहे. अलिकडील वीस वर्षाच्या काळात उत्पन्नातील विषमतेत लक्षणीय वाढ झाली असून अल्प उत्पन्न गटाला आपल्या मूलभूत गरजा सुद्धा भागविणे कठीण झाले आहे. म्हणून भारतीय उत्पन्नातील विषमतेत वाढ होण्याची कारणे व त्यावरील उपाययोजना या संदर्भात आपण सविस्तर माहिती घेणार आहोत.

५. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काळ्या पैशात झालेली लक्षणीय वाढ ही भारतीय अर्थव्यवस्थेपुढील आणखी एक महत्त्वपूर्ण समस्या आहे. काळ्या पैशाचे आकारमान सातत्याने वाढत असल्याने भारतात समांतर अर्थव्यवस्था अस्तित्त्वात आली आहे. अशा परिस्थितीत सरकारी धोरणे अपयशी ठरतात. अशा बेकायदेशीर (काळ्या) पैशाचे प्रमाण किती आहे. त्यातील वाढीची कारणे व त्याविरूद्ध सरकारी उपाययोजना या संदर्भात आपण सविस्तर माहिती घेणार आहोत.

## ४.३ भारतीय लोकसंख्येची वैशिष्ट्येः (Features of Indian Population)

देशाच्या आर्थिक विकास हा त्या देशातील उपलब्ध नैसर्गिक साधनसामग्री व त्या देशातील लोकसंख्या या प्रमुख दोन घटकांवर अवलंबून असतो. देशातील उत्पादक लोकसंख्येकडून उपलब्ध साधनांचा जसजसा वापर वाढत जातो तसतसे त्या देशातील लोकांचे जीवनमान उंचावत जाते. देशाचा आर्थिक विकास व लोकसंख्या वाढ या दोहोत अत्यंत जवळचा संबंध आहे. म्हणून कोणत्याही अर्थव्यवस्थेपुढील आर्थिक समस्यांचा अभ्यास करताना लोकसंख्येच्या समस्येला महत्त्वाचे स्थान द्यावे लागते.

लोकसंख्या वाढ व आर्थिक विकास यामधील संबंधाबाबत अर्थशास्त्रज्ञांच्यामध्ये मतभेद आहेत. कोलीन क्लार्क व एव्हरेट हेगेन या अर्थशास्त्रज्ञांच्या मते वाढती लोकसंख्या आर्थिक विकासाला पोषक ठरते. परंतु बऱ्याच अर्थतज्ञांच्या मते वाढती लोकसंख्या आर्थिक विकासातील अडसर आहे. कारण वाढत्या लोकसंख्येमुळे विविध सुविधांची मागणी वाढते. त्यासाठी सरकारला प्रचंड खर्च करावा लागतो. त्यामुळे सरकारला विकासाचे नियोजित प्रकल्प पूर्ण करता येत नाहीत. वाढत्या लोकसंख्येमुळे अन्नधान्याची मागणी वाढते. वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी अन्नधान्याची इतर राष्ट्रातून आयात करावी लागते. त्यासाठी दुर्मिळ परकीय चलन खर्च करावे लागते. त्यामुळे नियोजित आर्थिक विकास साध्य करणे कठीण होते.तसेच वाढत्या लोकसंख्येमुळे काम मागणाऱ्यांची संख्या वाढत जाते त्यांना रोजगार संधी देता यावी यासाठी सरकार श्रमप्राधान्य(परंपरागत) उत्पादन तंत्राचा अवलंब करते. अर्थात आधुनिक उत्पादन तंत्र वापरणे कठीण झाल्यामुळे आर्थिक विकास साधणे कठीण होते. वाढत्या लोकसंख्येचा सर्वात वाईट परिणाम म्हणजे देशातील बचत व गुंतवणूक करण्याच्या क्षमतेत घट होते. परिणामतः आर्थिक विकासात अडथळा निर्माण होतो.

**४.३.अ भारतातील लोकसंख्या**

भारत हा जगातील अतिरिक्त लोकसंख्येचा देश म्हणून ओळखला जातो. लोकसंख्येच्या बाबतीत जगात चीनचा प्रथम क्रमांक तर भारताचा दुसरा क्रमांक लागतो. ११ मे २००० या दिवशी भारतीच लोकसंख्या १०० कोटीवर पोहोचली. जणगणनेनुसार मार्च २००१ मध्ये ही लोकसंख्या १०२.७ कोटी पर्यंत वाढली. जागतिक भूक्षेत्राच्या केवळ २.४ टक्के एवढेच भूक्षेत्र भारताच्या वाट्याला आले आहे. परंतु लोकसंख्येच्या बाबतीत विचार करता जगाच्या लोकसंख्येच्या १६ टक्के लोकसंख्या भारताची आहे.अर्थात जगाच्या लोकसंख्येचा सातवा हिस्सा भारतात आहे. म्हणजे जगातील सात माणसात एक भारतीय आहे.

**४.३. ब. भारतातील लोकसंख्या : आकार व वृद्धीदर**

सन १८८१ पासून भारतात शिरगणतीस सुरूवात झाली. तेंव्हापासून भारतात प्रति दहा वर्षांनी शिरगणती (जनगणना) घेण्यात येते. २००१ मधील शिरगणती ही एप्रील २००१ मध्ये पूर्ण झाली. १९९१ ते २००१ या दहा वर्षात भारतीय लोकसंख्येत झालेली प्रचंड वाढ हे या जणगणनेचे प्रकर्षाने जाणवणारे वैशिष्ट्य होय. १९८१ मध्ये भारताची लोकसंख्या ६८.३ कोटी इतकी होती. १९९१ मध्ये ती ८४.४ कोटी झाली. या दशकात भारताची लोकसंख्या १६.१ कोटीने वाढली. मार्च २००१ मध्ये भारताची लोकसंख्या १०२.७ कोटी इतकी झाली. २००९ मध्ये ही लोकसंख्या ११८ कोटी पर्यंत वाढली आहे.

पुढील तक्त्यावरून मागील १०० वर्षांच्या काळात भारताच्या लोकसंख्येत झालेली वाढ व लोकसंख्या वाढीचा दर याची कल्पना येते.

| वर्ष | एकूण लोकसंख्या (कोटीमध्ये) | लोकसंख्या वाढ द.सा.द.शे. |
|---|---|---|
| १९०१ | २३.६ | - |
| १९११ | २५.२ | +५.७ |
| १९२१ | २५.१ | -०.३ |
| १९३१ | २७.९ | +११.० |
| १९४१ | ३१.९ | +१४.२ |

| | | |
|---|---|---|
| १९५१ | ३६.१ | +१३.३ |
| १९६१ | ४३.९ | +२१.५ |
| १९७१ | ५४.८ | +२४.८ |
| १९८१ | ६८.३ | +२४.७ |
| १९९१ | ८४.४ | +२३.५ |
| २००१ | १०२.७ | +२१.३ |

वरील कोष्टकावरून १९२१ चा अपवाद वगळता भारताची लोकसंख्या सातत्याने वाढत आहे असे दिसून येते. १९९१ मध्ये भारताची लोकसंख्या ८४.४ कोटी होती ती २००१ मध्ये १०२.७१ कोटी पर्यंत वाढली. लोकसंख्या वृद्धीदराचा विचार करता १९८१ते १९९१ या कालखंडात तो २.११ टक्के होता तो वार्षिक वृद्धीदर १९९१ ते २००१ या दशकात १.९३ टक्के पर्यंत घटला आहे. ही घट काहीसे समाधान देणारी आहे. या सध्याच्या लोकसंख्या वृद्धीदराने भारत २०५० पर्यंत लोकसंख्येबाबत चीनला मागे टाकेल.

**४.३.क. भारतातील लोकसंख्या वाढीची कारणे:**

२० व्या शतकात भारतीय लोकसंख्येत जी प्रचंड वाढ झाली आहे त्याची तीन प्रमुख कारणे म्हणजे

अ) जननदर जास्त असणे ब) जन्मदराच्या मानाने मृत्यूदर कमी असणे आणि क) निर्वासितांचा लोंढा

सन १९११ ते १९२० या दशकात दरसाल दर हजारी जन्मदर ४९.२ इतका होता तो २००१ मध्ये २५.८ पर्यंत घटला आहे. जन्मदर घटला असला तरी त्या तुलनेत मृत्यूदरात वेगाने मोठी घट झाली आहे. १९११ ते १९२० या दशकात दर साल दरहजारी मृत्यूदर ४८.६ होता तो २००१ मध्ये ८.५ झाला आहे. अर्थात जन्मदर उच्च(२५.८) व घटलेला मृत्यूदर(८.५) यातील फरक मोठा राहिल्याने लोकसंख्या वाढीचा दर जास्त राहीला आहे.

**जन्मदर जास्त असण्याची कारणे**

१) विवाह करण्याची प्रवृत्ती, २) अविवाहित राहण्याची कमी प्रवृत्ती, ३) बालविवाह, ४) जननक्षम सहजीवनाचा प्रदीर्घ काळ, ५) निरक्षरता व अज्ञान, ६) दारिद्र्य, ७) उत्पन्नाचा आकार, ८)एकत्र कुटुंबपद्धती ९) निकृष्ठ राहणीमान, १०) सामाजिक प्रथा, ११) देशाचे हवामान, १२) सरकारचे प्रारंभीच्या काळातील दुर्लक्ष १३) कुटुंब नियोजन कार्यक्रमातील अपयश, १४) विधवा विवाहास मान्यता, १५)बहुपत्निकत्त्व, १६) करमणूक साधनांचा अभाव इ. प्रमुख कारणांमुळे भारतातील जन्मदर जास्त आहे.

**४.३.ड मृत्यूदरात घट होण्याची कारणे:**

१) आर्थिक विकासाबरोबर दुष्काळाचे प्रमाण कमी, २) आरोग्यविषयक सुविधांत वाढ, ३) प्रसुतीकरीता अद्ययावत सुविधा, ४) बाल मृत्यूदरातील घट, ५) प्राथमिक आरोग्य केंद्राची व्यवस्था, ६) सरासरी आयुर्मानातील वाढ, ७) पिण्याच्या पाण्याची उत्तम व्यवस्था ८) चौरस आहाराची उपलब्धता, ९) साथीच्या रोगांवरील पूर्ण नियंत्रण व १०) कुटुंबनियोजन कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी इ. कारणांमुळे मृत्यूदरात वेगाने घट झाली आहे.

अशा प्रकारे उच्च जन्मदर व घटलेला मृत्यूदर यातील अंतर वाढल्याने भारताची लोकसंख्या वेगाने वाढली आहे. अर्थात वरील जन्मदर जास्त असण्यास कारणीभूत असणारे घटक व घटलेल्या मृत्यूदरास कारणीभूत असणारे घटक ही भारतातील लोकसंख्या वाढीची कारणे आहेत.

**४.३.इ. भारतीय लोकसंख्येची वैशिष्ट्येः** (Features of Indian Population):

भारतीय लोकसंख्येची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

**१) भिन्न राज्यातील लोकसंख्याः**

भारताच्या लोकसंख्येत झालेली वाढ ही सर्व राज्यात सारखी झालेली नाही. भारताच्या लोकसंख्येपैकी सर्वात अधिक लोकसंख्या (१६ ते १७ टक्के) उत्तर प्रदेश या राज्याची आहे. त्या पाठोपाठ महाराष्ट्र राज्याचा क्रम असून ती एकूण लोकसंख्येच्या ९.४२ टक्के आहे. त्यानंतर तिसरा क्रमांक बिहारचा असून ती ८.०७ टक्के आहे. २००१ च्या शिरगणतीनुसार उत्तरप्रदेशाची लोकसंख्या १६.६ कोटी इतकी आहे. महाराष्ट्राची लोकसंख्या ९.४ कोटी तर बिहारची लोकसंख्या ८.३ कोटी इतकी आहे. १९९१ च्या शिरगणतीनुसार लोकसंख्येच्या बाबतीत उत्तरप्रदेश, बिहार व महाराष्ट्र असा क्रम होता तो आता बदलला असून महाराष्ट्र हे लोकसंख्येच्या बाबतीत सर्व राज्यांमध्ये दुसऱ्या क्रमांकावर आहे.

**२) लोकसंख्येची घनताः**

सरासरी दर चौरस किलो मीटर मध्ये किती लोकसंख्या रहाते. त्यावरून लोकसंख्येची घनता ठरविली जाते. दर चौ.कि.मी. मध्ये लोकसंख्येची घनता जपान-३३६, इंग्लंड-२४५, जर्मनी- २३५, इटली-१९६, पाकिस्तान-१७५, अमेरिका-३० तर भारत- ३३७ इतकी आहे. अर्थात तुलनेने भारतात लोकसंख्येची घनता जास्त आहे. भारतातील वेगवेगळ्या राज्यात लोकसंख्येची घनता भिन्न-भिन्न असल्याचे आढळते. ज्या राज्यात सुपिक जमीन, औद्योगिक विकास, मानवी उपभोग्य वस्तूंची उपलब्धता, चांगले हवामान आढळते त्या राज्यात लोकसंख्येची घनता अधिक असल्याचे दिसून येते. दर चौ.कि. मी. ला लोकसंख्येची घनता प.बंगालमध्ये ९०४, बीहारमध्ये ८८० महाराष्ट्र- २९६ असा फरक आढळतो. हे भारतीय लोकसंख्येचे एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य आहे.

**३) लोकसंख्येची लिंग-भेदानुसार रचनाः(स्त्री-पुरूष प्रमाण)**

दर हजारी पुरूषांमागे स्त्रियांचे असणारे प्रमाण म्हणजे स्त्री-पुरूष प्रमाण होय. देशातील लोकसंख्येच्या लिंगभेदानुसार रचनेचा अभ्यास आर्थिक व सामाजिक दृष्ट्या महत्त्वाचा ठरतो. भारतात १९०१ मध्ये दर हजार पुरूषांमागे स्त्रियांचे प्रमाण ९७२ होते. हे प्रमाण सातत्याने घटत जावून १९९१ मध्ये ९२७ इतके झाले. २००१ च्या शिरगणतीनुसार हे प्रमाण आता ९३३ झाले आहे. भारतात स्त्रियांचे पुरूषासी असणारे प्रमाण घटण्याची कारणे अनेक आहेत. पुरूषप्रधान कुटुंबपद्धतीत म्हातारपणाचा आधार म्हणून मुलाकडे दिले जाणारे अधिक लक्ष मुलींकडे दुर्लक्ष, प्रसुतीककाळातील स्त्रियांचे अधिक मृत्यूप्रमाण, भयानक दारिद्र्य, स्त्रियांना घ्यावा लागणारा निकृष्ट प्रतिचा आहार( खावे लागणारे शिळे-पाके अन्न), रोगांचा प्रार्दुभाव, बालविवाह, समाजात स्त्रियांना मिळणारे दुय्यम स्थान, स्त्रीबाबत पुर्वग्रह दुषित दृष्टीकोण इ. कारणांमुळे भारतात स्त्रियांचे प्रमाण घटले आहे.

२००१ च्या शिरगणतीनुसार १०२.७ कोटी एकूण लोकसंख्येपैकी पुरूषांची संख्या ५३.१३ कोटी एकूण लोकसंख्येपैकी पुरूषांची संख्या ५३.१३ कोटी असून स्त्रियांची संख्या ४९.५७ कोटी आहे. १९५१ ते २००१ या दशकात स्त्रियांचे प्रमाण ०.६ टक्क्यांनी वाढले आहे.अर्थात हे प्रमाण ९२७ वरून ९३३ झाले

आहे. परंतु ०-६ वर्षे वयोगटातील मुलींचे प्रमाण १९९१ मध्ये ९४५ होते ते प्रमाण २००१ मध्ये ९२७ पर्यंत कमी झाले आहे. ०-६ वर्षे वयोगटातील स्त्रियांचे प्रमाण घटत जाणे ही चिंतेची बाब आहे.

महाराष्ट्र स्त्री-पुरूष प्रमाण ९३८ इतके आहे. राज्यांचा विचार करता दर हजारी पुरूषामागे स्त्रियांची संख्या केरळमध्ये सर्वाधिक (१०५८) असून सर्वात कमी प्रमाण हरियाणामध्ये(८२१) आहे.

### ४) जन्म-मृत्यूदरः

जन्मदर व मृत्यूदर यातील फरकाने लोकसंख्या वाढ निश्‍चित होत असते. पुढील तक्त्यात जन्मदर व मृत्यूदर दिला आहे.

| कालखंड | जन्मदर (दर साल दर हजारी) | मृत्यूदर ( दर साल दर हजारी) |
|---|---|---|
| १९११-२० | ४९.२ | ४८.६ |
| १९४१-५० | ३९.९ | २७.४ |
| १९५१-६० | ४०.० | १८.० |
| १९७१-८० | ३७.२ | १५.० |
| १९८१-९० | ३१.१ | १०.० |
| १९९१ | २९.५ | ९.८ |
| २००१ | २५.८ | ८.५ |

इतर देशांच्या तुलनेत भारतातील जन्मदर व मृत्यूदर बरेच जास्त आहेत. अलिकडील काळात शिक्षणसुविधा व आरोग्य सुविधांमध्ये मोठी वाढ झाली आहे त्यामुळे मृत्यूदरात मोठी घट झाली आहे. १९११ ते २००१ या कालखंडात मृत्यूदरात ४८.६ वरून ८.५ पर्यंत घट झाली आहे. ही घट देशातील आर्थिक सुधारणांचा परिणाम आहे.तसेच जन्मप्रमाण सुद्धा १९११ ते २००१ या कालखंडात ४९.२ वरून २५.८ पर्यंत घटले आहे. तरी सुद्धा जन्मदर (२५.८) व मृत्यूदर (८.५) यातील फरक मोठा असल्याने लोकसंख्या वाढीचा दर जास्त आहे.

### ५) साक्षरताः

साक्षर व्यक्ती म्हणजे व्यक्तीला स्वतःच्या भाषेत समजून लिहिता, वाचता येणे होय. साक्षरतेमुळे लोक संख्येच्या वैशिष्ट्यांमध्ये देशपरत्त्वे भिन्नता आढळते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर साक्षरता प्रमाण ठरविताना भारतात १९५१, १९६१ व १९७१ या जनगणना वर्षी ५ वर्षावरील बालकांचा समावेश केला. परंतु १९८१ पासून ७ वर्षावरील बालकांचा साक्षरता ठरविण्यासाठी विचार करण्यात आला आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भारतातील साक्षरता प्रमाण  वाढले आहे हे पुढील कोष्टकावरून लक्षात येते.

| वर्ष | एकूण साक्षरता प्रमाण | पुरूष | स्त्रिया |
|---|---|---|---|
| १९५१ | १८.३३ | २७.१६ | ८.८६ |
| १९६१ | २८.३३ | ४०.४० | १५.३५ |
| १९७१ | ३४.४५ | ४५.९६ | २१.९७ |
| १९८१ | ४३.५७ | ५६.३८ | २९.७६ |
| १९९१ | ५२.२१ | ६४.१३ | ३९.२९ |
| २००१ | ६५.३८ | ७५.८५ | ५४.१६ |

Source : Census of India 2001

१९५१ साली भारतात साक्षरतेचे प्रमाण १८.३३ होते. पुरूषांचे साक्षरता प्रमाण २७.१६ तर स्त्रियांचे साक्षरता प्रमाण ८.८६ टक्के होते. स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी स्त्रियांकडे होणारे दुर्लक्ष, स्त्रीला दिलेले दुय्यम स्थान या कारणांमुळे स्त्री साक्षरता प्रमाण तुलनेने फारच कमी दिसते. परंतु १९५१ नंतर नियोजन काळात सरकारने जाणीवपूर्वक साक्षरता प्रसारावर भर दिल्याने साक्षरता प्रमाण वाढत गेले आहे. २००१ मध्ये एकूण साक्षरता प्रमाण ६५.३८टक्के इतके झाले असून त्यात पुरूष साक्षरता प्रमाण ७५.८५ टक्के आणि स्त्री साक्षरता प्रमाण ५४.१६ टक्के आहे. यावरून भारतात शिक्षण प्रसार वेगाने झाला असून स्त्री-शिक्षण प्रसार अधिक प्रमाणात झाल्याचे दिसते. अजूनही स्त्री शिक्षणावर लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता आहे. जपानमध्ये साक्षरण प्रमाण ९९.९ टक्के आहे.

२००१ मधील भारतात साक्षर पुरूष संख्या (३४०७०४६१७) ३४ कोटी ७ लाख ४ हजार ६१७ (७५.८५ टक्के) आणि साक्षर स्त्रियांची संख्या २२ कोटी ७२ लाख २९ हजार १९८ (५४.१६ टक्के) इतकी आहे.

भारतातील विविध राज्यांमधील साक्षरता प्रमाणामध्ये मोठी भिन्नता आहे. २००१ च्या शिरगणतीनुसार केरळमध्ये सर्वाधिक साक्षरता  प्रमाण असून ते ९०.९२ टक्के इतके आहे. सर्वात कमी साक्षरता प्रमाण बिहार राज्यात असून ते ४७.५३ टक्के आहे.भारतात विशेषतः बिहार, झारखंड जम्मू आणि काश्मिर, अरूणाचल प्रदेश, उत्तरप्रदेश,दादर आणि नगर हवेली बेटे येथील साक्षरता प्रमाण हे भारतातील सरासरी साक्षरता प्रमाणापेक्षा कमी आहे.

**६) सरासरी आयुर्मानः**

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय जनतेचे सरासरी आयुर्मान फारच कमी होते. १९२१ ते १९३१ या दशकात ते फक्त २६.९ वर्षे इतके होते. १९५१ मध्ये हे प्रमाण ४१.२ वर्षे पर्यंत वाढले. पुढे १९८१ च्या शिरगणतीनुसार भारतीय जनतेचे सरासरी आयुर्मान ५४ वर्षे झाले. १९९१ मध्ये ते ५९ वर्षापर्यंत वाढले आणि २००१ च्या शिरगणीतीनुसार भारतीय जनतेचे सरासरी आयुर्मान ६२ वर्षे झाले आहे. आयुर्मान हे मृत्यूदरावर अवलंबून असते. भारतातील सरासरी आयुर्मान वाढत असले तरी ते अद्याप विकसित राष्ट्रांच्या तुलनेत कमी आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे भारतात अजूनही बालमृत्यूप्रमाण जास्त आहे. या तुलनेत अमेरिका-६७ वर्षे, न्युझिलंड-६८ वर्षे व इंग्लड - ६५ वर्षे असे सरासरी आयुर्मान आहे.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतातील प्लेग, देवी, मलेरिया या सारख्या रोगांच्या निर्मुलनामुळे सरासरी आयुर्मान वाढले आहे. देशाचा आर्थिक विकास सकस आहार खाण्याकडे प्रवृत्ती रोगप्रतिबंधक उपाययोजना,

ग्रामीण भागातूनही रोग प्रतिबंधक लस टोचणी या महत्त्वपूर्ण कारणांमुळे भारतीय जनतेचे सरासरी आयुर्मान वाढत आहे.

**७) व्यावसायिक रचनाः** (Occupational Pattern):

कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेचे स्वरूप आणि विकासाची अवस्था समजण्यासाठी त्या देशातील काम करणाऱ्या लोकसंस्थेची विविध व्यवसाय क्षेत्रात कशाप्रकारे विभागणी झाली आहे याचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. भारतीय जनगणनेनुसार पुढील तीन प्रकारच्या व्यवसाय क्षेत्रात वर्गिकरण केले जाते.

प्राथमिक व्यवसाय क्षेत्रे : १) शेती २) शेत मजूरी ३) खनिज व्यवसाय, मच्छीमारी व पशुपालन

दुय्यम व्यवसाय क्षेत्रः १) घरगुती उद्योग २) कारखानी उद्योग व ३) बांधकाम

तृतीय व्यवसाय क्षेत्रः १) वाणिज्य व व्यापार २) वाहतुक, साठवणूक व दळणवळण व ३) इतर सेवा.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतातील काम करणाऱ्या लोकसंख्येची व्यवसायनुसार विभागणी पुढील तक्त्यामध्ये स्पष्ट केली आहे.

| व्यवसाय क्षेत्र | १९५१ | १९६१ | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ |
|---|---|---|---|---|---|---|
| प्राथमिक | ७२.१ | ७१.८ | ७२.१ | ६८.८ | ६६.८ | ५८.४ |
| द्वितीय | १०.७ | १२.२ | ११.२ | १३.५ | १२.७ | १६.२ |
| तृतीय | १७.२ | १६.० | १६.७ | १७.७ | २०.५ | २५.४ |

**प्राथमिक व्यवसाय क्षेत्रः**

भारतात १९७१ पर्यंत प्राथमिक व्यवसाय क्षेत्रात गुंतलेल्या लोकांचे प्रमाण साधारणपणे ७२ टक्के कायम राहिले.त्यानंतर मात्र हे प्रमाण घटू लागले आहे. प्राथमिक क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांचे प्रमाण १९८१ मध्ये ६८.८ टक्के पर्यंत कमी झाले. पुढे २००१ च्या शिरगणतीनुसार हे प्रमाण ५८.४ टक्के झाले आहे. प्राथमिक क्षेत्रात लोकसंख्येचे प्रमाण जास्त असणे हे देशाच्या अविकसितपणाचे लक्षण मानले जाते. प्राथमिक क्षेत्रातील गुंतलेला लोकसंख्येचे प्रमाण कमी होवून ते द्वितीय व तृतीय क्षेत्रात वाढत जाणे हे देशाच्या विकासाचे लक्षण मानले जाते.

**द्वितीय व्यवसाय क्षेत्रः**

सन१९५१ मध्ये द्वितीय क्षेत्रातील लोकसंख्येचे प्रमाण १०.७ टक्के होते. परंतु १९५१ पासून भारताने आर्थिक नियोजनाचा पुरस्कार करून पंचवार्षिक योजनांच्या सहाय्याने उद्योग विकासावर भर दिला. भारताने सार्वजनिक क्षेत्रात विविध उद्योग विकासामध्ये मोठी गुंतवणूक केली. तसेच सरकारने खाजगी क्षेत्रातील उद्योग विकासासाठी अनेक सवलती दिल्या याचा परिणाम म्हणून या क्षेत्रातील लोकसंख्येचे प्रमाण वाढत गेले असून २००१ मध्ये ते १६.२ टक्के झाले आहे.

**तृतीय व्यवसाय क्षेत्रः**

तृतीय व्यवसाय क्षेत्रात वहातूक दळण-वळण, वाणिज्य व व्यापार, शिक्षण अभियांत्रिकी, बँकींग व्यवसाय, माहिती तंत्रज्ञान या सेवांचा समावेश होतो. १९५१ मध्ये या क्षेत्रातील लोकसंख्येचे प्रमाण १७.२

टक्के होते. १९६१व  १९७१ मध्ये या प्रमाणात घट झाली. परंतु १९८१ पासून तृतीय क्षेत्रातील लोकसंख्येचे प्रमाण वेगाने वाढले आहे. २००१ मध्ये या क्षेत्रात २५.४ टक्के लोकांना रोजगार प्राप्त झाला आहे. १९९१ नंतर भारताने स्विकारलेले नवीन आर्थिक धोरण, बँकिंग क्षेत्रातील सुधारणा व माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील भारताची झालेली मोठी प्रगती यामुळे प्राथमिक क्षेत्रातील लोकसंख्या कमी होवून तृतीय क्षेत्रातील लोकसंख्या वाढत आहे हे भारताच्या आर्थिक विकासाचे द्योतक आहे.

वरील तीन व्यवसायक्षेत्रात होणाऱ्या उत्पादनाचा विचार करता १९५१ ते २००१ या कालखंडात प्राथमिक क्षेत्राचा स्थूल देशांतर्गत उत्पादनाातील हिस्सा ५९ टक्केवरून २३.९ टक्केपर्यंत कमी झाला आहे तर द्वितीय क्षेत्राचा हिस्सा १३.२ टक्केवरून २२ टक्केपर्यंत वाढला आहे. तसेच तृतीय क्षेत्राचा हिस्सा २७.८ टक्केवरून ५४.१ टक्के पर्यंत वाढला आहे.

**८) ग्रामीण व शहरी लोकसंख्याः** (Rural and Urban Population)

ग्रामीण व शहरी भागात लोकसंख्येची विभागणी हे भारतीय लोकसंख्येचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. १९५१ मध्ये एकूण ३६.१ टक्के कोटी लोकसंख्येपैकी २९.९ कोटी लोकसंख्या ग्रामीण भागात व ६.२ कोटी लोकसंख्या शहरी भागात राहात होती. म्हणजे १९५१ मध्ये एकूण लोकसंख्येच्या ८२.७ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात व बाकीची १७.३ टक्के लोकसंख्या शहरी भागात राहत होती. २००१ च्या शिरगणतीनुसार एकूण १०२.७ कोटी लोकसंख्येपैकी ७४.१७ कोटी लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. हे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या ७२.२२ टक्के आहे. तर शहरी भागात २८.५४ कोटी लोकसंख्या राहत असून ते प्रमाण एकूण लोकसंख्येच्या २७.७८ टक्के आहे. यावरून शहरी भागात राहणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण वाढत आहे हे स्पष्ट होते.

**९) ग्रामीण–शहरी स्थलांतराचा प्रश्नः**

भारतात ग्रामीण भागात शेतजमिनीचे वाटप अत्यंत विषम पद्धतीने झाले आहे. त्यामुळे लहान व सीमांत शेतकऱ्यांना आपल्या मालकीच्या शेतजमिनीतून पूरेसे उत्पन्न मिळत नसल्याने आपल्या शेतजमिनी विकण्याशिवाय मार्ग राहिला नाही. ग्रामीण भागात भूमीहीन मजूरांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. शेतीक्षेत्रात सध्या भांडवलप्रधान तंत्रज्ञान वाढू लागल्याने त्याचा फायदा श्रीमंत शेतकऱ्यांना झाला आहे. नवीन तंत्रज्ञान स्पर्धेत लहान शेतकऱ्यांना टिकणे अशक्य झाल्याने त्यांना शेतजमिनी विकणे भाग पडत आहे. अशा भूमीहीन मजूरांनी काम मिळविण्यासाठी शहरी भागाकडे धाव घेतली आहे. त्यांच्या स्थलांतरामुळे शहरी भागात विविध आवश्यक सोयी–सुविधा पुरविण्याचा प्रश्न बिकट बनला आहे. त्यांना रोजगार संधी उपलब्ध करून देणे कठीण झाले आहे. ग्रामीण भूमीहीन मजूरांच्या स्थलांतराचा प्रश्न सोडविण्यासाठी व त्यांना ग्रामीण भागातच रोजगार संधी मिळवून देण्यासाठी ग्रामीण श्रमिक राष्ट्रीय आयोगाने (NCRL) अनेक सिफारशी केल्या आहेत. या शिफारशींची अंमलबजावणी झाली असता ग्रामीण लोकांचा शहरी भागाकडे येणारा लोंढा कमी होईल.

भारतीय लोकसंख्येची वरील प्रमाणे प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.

## ४.४ भारतातील बेरोजगारी

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात बेरोजगारीच्या समस्येने गंभीर स्वरूप धारण केले आहे. लोकसंख्येचा स्फोट, भांडवल टंचाई, साधनसामग्रीची कमतरता, या प्रमुख कारणांमुळे भारतातील बेरोजगारी वाढली आहे. दहा पंचवार्षिक योजना पूर्ण झाल्या तरी बेकारीची समस्या दुर झाली नाही. उलट ती वाढली आहे. भारतातील

बेरोजगारीची व्याप्ती मोठी आहे. या बेरोजगारीच्या समस्येमुळे दारिद्र्य वाढले आहे; सामाजिक अस्थिरता वाढली आहे.

**४.४.अ. बेरोजगारीचा अर्थः**

बेकारी म्हणजे लोकांवर लादलेली विनारोजगारीची स्थिती होय. '' प्रचलित वेतनदरावर काम करण्याची इच्छा व कुवत असताना सुद्धा लोकांना काम करण्याची संधी मिळत नसेल तर त्या स्थितीला बेकारी असे म्हणतात.''

प्रा.जे.एम. केन्स यांनी बेरोजगारीची व्याख्या पुढील शब्दात मांडली आहे. व्यक्तिंची काम करण्याची इच्छा व पात्रता असूनही शिवाय दिले जाणारे रास्त वेतन स्विकारण्याची तयारी असूनही कामधंदा न मिळणे म्हणजे बेरोजगारी होय.

आंतरराष्ट्रीय कामगार संघटना (ILO) - काम करण्याची इच्छा व सामर्थ्य असूनही, प्रचलित वेतनदरावर कामाच्या शोधात असूनही ज्यांना काम मिळत नाही अशा सर्वांचा समावेश बेरोजगारीत केला जातो. केन्सच्या मते अनैच्छिक बेकारी (Involuntar Unemployment) हीच खरी (वास्तव) बेकारी आहे.

**४.४. ब. बेरोजगारीचे स्वरूपः**

भारतासारख्या विकसनशील देशातील बेरोजगारीची समस्या ही विकसित राष्ट्रातील बेरोजगारीच्या समस्येपेक्षा भिन्न असते. विकसित देशात परिणामकारक मागणीच्या अभावी अनैच्छिक बेकारी निर्माण होते. परिणामकारक मागणीत वाढ झाल्याशिवाय ही बेकारी दूर होत नाही. तसेच कच्च्या मालाचा तात्पुरता तुटवडा, यंत्रसामग्रीत निर्माण झालेला तात्पुरता बिघाड, उपलब्ध कामासंबंधीचे अज्ञान व उत्पादन साधनांची कमतरता इ. कारणामुळे विकसित राष्ट्रात जी बेकारी निर्माण होते. तिला घर्षणात्मक अथवा संघर्षात्मक बेकारी (Frictional Unemployment) असे म्हणतात. ही बेकारी अल्पकालीन असते. अशाप्रकारे विकसित राष्ट्रात विशेषतः अनैच्छिक बेकारी व संघर्षात्मक बेकारी ही दोन प्रकारची बेकारी आढळते.

याऊलट भारतासारख्या अल्पविकसित राष्ट्रातील बेकारी ही मुख्यतः संरचनात्मक बेकारी (Structural Unemployment) आहे. भारतात वाढत्या लोकसंख्येमुळे श्रमपुरवठा वाढत आहे. पण अर्थव्यवस्थेच्या अल्पविकसितपणामुळे सर्वांना रोजगार संधी मिळत नाही. त्यामुळे ही कायमस्वरूपी बेकारी निर्माण झाली आहे. भारतीय अर्थव्यवस्थेच्या संरचनेत बदल झाल्याशिवाय ही बेकारी दूर होत नाही. याशिवाय भारतातील शेती क्षेत्रामध्ये हंगामी बेकारी किंवा अर्धबेकारी तसेच अदृष्य बेकारी (Disguished Unemployment ) चे प्रमाण मोठे आहे. तसेच शहरी भागात सुशिक्षित लोकांमधील बेकारी ही गंभीर समस्या आहे.प्रा.केन्स च्या मते अल्पविकसित राष्ट्रातील बेकारी दूर करण्यासाठी भांडवली साधनांच्या पुरवठ्यात वाढ होणे आवश्यक आहे.

**४.४.क. भारतातील बेरोजगारीचे प्रमाणः**

भारतातील बेरोजगारीचे प्रमाण सातत्याने वाढत आहे. आजपर्यंत आर्थिक नियोजनाची ५८ वर्षे पूर्ण झाली आहेत. पूर्ण झालेल्या दहा पंचवार्षिक योजनेत प्रत्येक वेळी बेरोजगारी दूर करणे हे नियोजनाचे प्रमुख उद्दिष्ट ठेवण्यात आले. प्रत्येक योजनेने लाखो लोकांना रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली असताना सुद्धा योजनेच्या शेवटी लक्षावधी लोक बेकार राहिले. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या सुरवातीस भारतातील बेकारीची संख्या ३३ लक्ष इतकी होती. त्यात पाच वर्षात ९० लक्ष बेकारांची भर पडली. एकूण १२३ लक्ष

बेकारांपैकी ७० लक्ष बेकारांना पहिल्या योजनेत रोजगार संधी प्राप्त झाली व शेवटी ५३ लक्ष लोक बेरोजगार राहिले.

१९७१ मध्ये भारतात बेरोजगारांची संख्या १८७ लक्ष एवढी होती. पैकी १६१ लक्ष बेकार ग्रामीण भागात तर २६ लक्ष बेकार शहरी भागात होते. राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण (NSS) या पाहणीनुसार आठव्या योजनेच्या सुरवातीस बेकारांची संख्या २.८० कोटी होती. योजना काळात त्यामध्ये ३.७० कोटीची भर पडून एकूण बेकारी ६.५०कोटी इतकी झाली. नवव्या पंचवार्षिक योजना काळात या बेकारीमध्ये ४.१ कोटी बेकारांची भर पडली आणि एकूण बेरोजगारी १०.६० कोटी इतकी झाली. दहाव्या योजना काळात २००४ पर्यंत ही बेकारी ११.४ कोटी पर्यंत वाढली.

रोजगाराबाबत पाहणी करण्याकरिता डॉ. माँटेकसिंह आहलुवालिया यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या कार्यदिलाने (Task Force) आपला अहवाल १ जुलै २००१ मध्ये सादर केला. या विशेष कार्यदलाने राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणाच्या आकडेवारीच्या आधारे पुढील प्रमाणे अनुमान व्यक्त केले.

१) वर्तमान दैनिक स्थितीच्या आधारावर १९९९-२००० मध्ये भारतात २६५.८ लक्ष लोक बेकार होते. १९९३ मध्ये ही संख्या २०१.३ लक्ष एवढी होती.

२) १९९३-९४ ते १९९९-२००० या काळात बेरोजगारीचा वृद्धीदर हा सरासरी दरसालदरशेकडा ४.७४ टक्के होते. १९८३ मध्ये बेरोजगारीचा दर ८.३३ टक्के होता. तो पुढे घटून १९९३-९४ मध्ये ५.९९ टक्के झाला. परंतु त्यानंतर १९९९-२००० मध्ये त्या दरात वाढ होवून तो ७.३२ टक्के झाला.

**४.४.ड भारतातील बेकारी वाढण्याची कारणे:**

भारतातील बेकारीची प्रमुख कारणे पुढील प्रमाणे आहेतः

**१) रोजगार संधीचा अभाव :**

आर्थिक वाढ होत असताना रोजगारवाढ अपेक्षित असते. परंतु भारतात मात्र बहुतेकवेळा रोजगार संधीत अपेक्षित वाढ न होता आर्थिक वाढ झाली आहे. सन१९५० ते १९८० या तीस वर्षाच्या काळात सरासरी वार्षिक ३.६ टक्के दराने स्थूल राष्ट्रीय उत्पादनात वाढ झाली. परंतु या वृद्धीदराला अपेक्षित प्रमाणात रोजगार वाढ झाली नाही. १९८०-१९९० या दशकात स्थूल राष्ट्रीय उत्पादनात सरासरी प्रतिवर्षी ५.६ टक्के दराने वाढ झाली. १९९१ ते २००५ या काळात ही वाढ ६ टक्के दराने होवून सुद्धा हव्या त्या प्रमाणात रोजगार वाढ झाली नाही.

**२) श्रमपुरवठ्यात वाढः**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात मृत्यूदरामध्ये वेगाने घट झाली आहे. १९६० मध्ये लोकसंख्या वाढीचा दर २.२ टक्के असताना श्रमपुरवठ्यात सुद्धा प्रतिवर्षी १.९ टक्के दराने वाढ झाली. १९८३-८४ पर्यंत श्रमपुरवठ्यांच्या दरात आणखी वाढ झाली. त्यानंतर मात्र हा दर घटत गेला. १९९० मध्ये हा दर वार्षिक १.३१ टक्के राहिला. अर्थात काम मागणाऱ्यांची संख्या वाढली पण त्या प्रमाणात रोजगार संधी न मिळाल्याने बेकारी वाढली.

भारतात ज्या वेगाने मृत्यूदरात घट झाली त्या वेगाने जन्मदर घटला नाही. त्याचा परिणाम म्हणून लोकसंख्या वेगाने वाढली. १९५१ मध्ये ३६.१ कोटी असणारी लोकसंख्या २००१ मध्ये १०२.७ कोटी इतकी झाली आहे. लोकसंख्येतील प्रचंड वाढीमुळे काम मागणाऱ्यांची संख्या वेगाने वाढली आहे. परंतु सर्वांना रोजगार संधी देता येईल एवढी कुवत अर्थव्यवस्थेत नसल्याने बेकारी वाढली आहे.

### ३) शेतीचे हंगामी स्वरूपः

भारतात आर्थिक नियोजनाची ५८ वर्षे पूर्ण झाली आहेत. दहा पंचवार्षिक योजना पूर्ण होवून सूद्धा भारतातील बरीच शेती पावसावर अवलंबून आहे. जलसिंचन सुविधा हव्या त्या प्रमाणात न वाढल्याने शेतीत बारमाही पिके घेता येत नाहीत. त्यामुळे हंगामी बेकारी वाढली आहे. आणि ज्या ठिकाणी बारमाही पाणी पुरवठ्याच्या सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. त्या ठिकाणी यांत्रिकीकरण वाढू लागल्याने बेकारी वाढली आहे.

### ४) अयोग्य शिक्षण पद्धतः

भारतातील शिक्षणपद्धत दोषपूर्ण आहे. प्रा. गुन्नार मिर्दालच्या मते '' मानवी साधनसंपत्तीचा विकास साधणे हे भारतीय शैक्षणिक धोरणाचे उद्दिष्ट नाही. भारतीय शिक्षण फक्त सरकारी व खाजगी क्षेत्रासाठी कारकून आणि कनिष्ट पातळीतील कार्यकारी (कर्मचारी) निर्माण करणारे आहे. कला, वाणिज्य व विज्ञान शाखांतून दिले जाणारे पुस्तकी शिक्षण हे रोजगार भिमूख व फारसे उत्पादक नसल्याचे सुशिक्षितांना बेकार रहावे लागते. प्रा. मिर्दाल यांची भारतीय शिक्षणपद्धतीवरील ही टिका मान्य करावी लागते. बेरोजगार कमी करावयाचा असेल तर शैक्षणिक पद्धतीत अमुलाग्र बदल घडवून आणणे आवश्यक आहे.

### ५) अयोग्य उत्पादनतंत्राचा अवलंबः

भारतात श्रमाची विपुलता व भांडवलाची कमतरता असल्यामुळे उत्पादनक्षेत्रात श्रमप्रधान उत्पादन तंत्राचा वापर करणे अपरिहार्य आहे. परंतु प्रत्यक्षात मात्र असे दिसते की केवळ उद्योगक्षेत्रातील उत्पादकच नव्हे तर शेती क्षेत्रातील उत्पादक सुद्धा श्रमाला पर्याय म्हणून भांडवलाचा अधिक वापर करू लागले आहेत. पाश्च्यात राष्ट्रात श्रम कमी व भांडवल विपूल म्हणून त्यांना भांडवलप्रधान तंत्र अवलंबिले आहे. परंतु भारतात श्रमाची विपुलता असताना सुद्धा भांडवल प्रधान तंत्राचा वापर वाढल्याने बेकारी वाढली आहे.

### ६) लघू व कुटिरोद्योगांचा मंद विकासः

लघू व कुटिरोद्योग श्रमप्रधान आहेत. ते थोड्या भांडवलावर व अल्प कौशल्यावर सुरू करता येतात. स्वातंत्र्य प्राप्ती नंतर लघू व कुटिरोद्योग विकासाकडे ज्या प्रमाणात लक्ष देणे आवश्यक होते त्याप्रमाणात लक्ष दिले नाही. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत भांडवल प्रधान मूलभूत, अवजड व विशाल उद्योग उभारणीकडे लक्ष देण्यात आले. परिणामतः बेरोजगारी कमी झाली नाही. त्यानंतरच्या काळात मात्र सरकारने लघू व कुटिरोद्योग विकासासाठी अनेक सवलती दिल्या, संरक्षण दिले. परंतु १९९१ पासून स्विकारलेला नवीन आर्थिक धोरणाचा विपरित परिणाम या उद्योगावर झाला आहे. जागतिकीकरणाचा परिणाम म्हणून लघू व कुटिरोद्योग बंद पडत आहेत. त्यामुळे बेकारी वाढली आहे.

### ७) पंचवार्षिक योजनांचे अपयशः

भारतात आतापर्यंत दहा पंचवार्षिक योजना पूर्ण झाल्या आहेत. भारतात नियोजनाचे आराखडे उपलब्ध झाले त्या अयोग्य व अपूऱ्या माहितीमुळे चुकीचे ठरले परिणामी नियोजित प्रकल्प वेळेत पूर्ण करता आले नाहीत त्यामुळे बेकारी वाढली आहे. अर्थात पंचवार्षिक योजनांची अंमलबजावणी कार्यक्षमतेने झाली नाही. योग्य व्यवस्थापनाच्या अभावामुळे योजना पुरेसा रोजगार वाढविण्यात अपयशी ठरल्या. त्यामुळे भारतातील बेकारी वाढली आहे.

### ८) साधनसामग्रीचा अपूरा वापरः

भारतात नैसर्गिक साधनसामग्री विपूल प्रमाणात आहे. मुबलक खनिजसंपत्ती, जलसंपत्ती, वनसंपत्ती तसेच अनुकूल हवामान सुपिक जमीन, असताना सुद्धा केवळ भांडवल टंचाईमुळे त्यांचा पुरेकर वापर करता येत नाही. परिणामतः पुरेसी रोजगार संधी उपलब्ध न झाल्याने बेरोजगारी वाढली आहे.

**९) संयोजन कौशल्याचा अभावः**

भारतीय लोकांमध्ये संयोजन कौशल्य नाही. लोकांमध्ये उद्योजकता अभावानेच आढळते. त्यामुळे उद्योगधंद्यांची उभारणी मंद गतीने झाली आहे. परिणामी बेरोजगारीत भर पडली आहे.

**१०) गतिशीलतेचा अभावः**

श्रमिकांची गतिशीलता म्हणजे श्रमिकांची एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्याची तयारी किंवा इच्छा होय. विशेषतः ग्रामीण लोकांमध्ये भौगोलिक गतिशीलता कमी आहे. कौटुंबिक प्रेम, गावाबद्दलचा जिव्हाळा, भाषेची अडचण, शिक्षणाचा अभाव या कारणांमुळे ग्रामीण तरूण रोजगार मिळविण्यासाठी गावापासून दूर जाण्यास तयार होत नाहीत. त्यांना उपजिविकेसाठी शेती शिवाय अन्य व्यवसाय रहात नाही. परिणामी शेती व्यवसायात गरजेपेक्षा जास्त लोक झाल्याने अदृष्य बेकारी, न्यून बेकारी वाढली आहे.

**११) उद्योगांचा ऱ्हासः**

१९९०-९१ मध्ये निर्माण झालेला आर्थिक पेचप्रसंग सोडविण्यासाठी भारत सरकारने खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण व मूळ स्पर्धा या तत्त्वांचा अंतर्भाव असणाऱ्या नवीन आर्थिक धोरणाचा पुरस्कार जुलै १९९१ पासून केला आहे. परंतु जागतिक स्पर्धेत लहान उद्योगांना टिकणे अशक्य झाले आहे. त्यामुळे लहान-लहान उद्योग बंद पडू लागल्याने बेरोजगारी वाढली आहे.

**१२) आर्थिक मंदीचा परिणामः**

२००८ मध्ये अमेरिकेत सुरू झालेल्या आर्थिक मंदीने संपूर्ण जगाला ग्रासले आहे. भारत त्याला अपवाद नाही. भारतात साधारणपणे सप्टेंबर २००८ पासून मंदीची सुरूवात झाली असून आर्थिक विकासाचा दर २००८-०९ मध्ये मंदावलेला आहे. भारत सरकारच्या श्रम व रोजगार मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार आक्टोबर २००८ ते डिसेंबर २००८ या केवळ तीन महिन्यात खनिज उद्योग, वस्त्रोद्योग, मोटार उद्योग, जड-जवाहिर व्यवसाय बांधकाम व संगणक व्यवसाय या क्षेत्रातील ५ लाख कामगार बेकार झाले आहेत. या बेकारीत आणखी भर पडण्याची शक्यता आहे.

वरील विविध कारणांमुळे भारतात बेकारी वाढली आहे.

**४.४.इ. बेकारी निर्मुलनासाठी उपाययोजनाः**

भारतीय अर्थव्यवस्थेत बेकारीच्या समस्येने उग्र स्वरूप धारण केले आहे. त्यामुळे दारिद्र्य वाढले आहे. सामाजिक स्वास्थ्य बिघडले आहे. उत्पन्नातील विषमतेची तिव्रता वाढली आहे. या समस्या दुर करण्यासाठी बेकारी, निर्मुलनकरण आवश्यक आहे. त्या दृष्टीकोणातून पुढील उपाययोजनांची अंमलबजावणी आवश्यक आहे.

**१) वाढत्या लोकसंख्येचे नियंत्रणः**

लोकसंख्या वाढली असता बेरोजगार वाढतो. भारतातील बेरोजगार कमी करण्याचा प्रभावी उपाय म्हणजे जलद गतीने वाढणारी लोकसंख्या नियंत्रित करणे. जागतिक पातळीवर विचार करता भारतातील लोकसंख्या वाढीचा दर सर्वाधिक आहे. २००१ मध्ये हा दर १.९ टक्के होता. भारतसरकारने चौथ्या योजनेपासून कुटुंबनियोजन कार्यक्रमावर मोठा खर्च केला आहे. विवाह वयोमर्यादा वाढविणे, शिक्षणप्रसार व कुटुंबनियोजन कार्यक्रमाची योग्य अंमलबजावणी या मार्गांनी वाढती लोकसंख्या नियंत्रित करता येते.

**२) आर्थिक विकासाचा वेग वाढविणे:**

जलद औद्योगिकरण करून आर्थिक विकासाचा वेग वाढविता येतो. देशात विविध वस्तू व सेवांचे उत्पादन करणारे उद्योग वाढल्यास आणि त्याबरोबर बँका, दळण-वळण, वहातूक व व्यापार इ. क्षेत्रांचा विकास झाल्यास जास्तीतजास्त बेकारांना रोजगार संधी प्राप्त होईल.

**३) मुलभूत सोई-सुविधांचा विकास:**

देशात जलपुरवठा, विद्युतपुरवठा रस्तेबांधणी, धरणबांधणी, जलसिंचन, आरोग्य, शिवाय अशा मूलभूत सुविधांमधील गुंतवणूक वाढली असता अनेकांना रोजगार संधी प्राप्त होवून बेकारी कमी होईल.

**४) लघू व कुटिरोद्योगांचा विकास:**

लघू व कुटिरोद्योग श्रमप्रधान असतात. ते सुरू करण्यासाठी भांडवलाची कमी प्रमाणात आवश्यकता असते. परकीय यंत्रसामग्रीची गरज नसते. म्हणून सरकारने अशा उद्योगांना सवलती दिल्या, प्रोत्साहन दिले तर मोठ्या प्रमाणात बेकारी कमी होईल.

लघू व कुटिरोद्योग विकासासाठी भारत सरकारने औद्योगिक वसाहती निर्माण केल्या आहेत. त्याठिकाणी विविध आवश्यक सुविधा निर्माण केल्या आहेत. १९९०-९१ मध्ये लघू व कुटिरोद्योगांची संख्या १९.५० लक्ष होती. त्यामध्ये १२.५३ द.ल.लोकांना रोजगार प्राप्त झाला. २००१-०२ मध्ये या उद्योगांची संख्या ३४-५२ लक्ष झाली असून एकूण १९.२२ लक्ष लोकांना रोजगार संधी मिळाली आहे.

**५) शैक्षणिक पद्धतीत बदल:**

भारतातील पारंपारिक शिक्षण कालबाह्य ठरत आहे. शिक्षण पद्धतीत गरजेनुसार झपाट्याने बदल होत आहे. रोजगारा भिमुख व व्यवसायभिमुख शिक्षणदेणाऱ्या संस्थांची संख्या वाढत आहे. स्वंयरोजगार वाढावा यासाठी सरकार सुशिक्षित बेकारांना अर्थपुरवठा तांत्रिकज्ञान व बाजारपेठांची सुविधा उपलब्ध करून देत आहे. याचा परिणाम म्हणून रोजगार संधीत मोठी झाली असून बेकारी कमी झाली आहे.

**६) पुरक व्यवसायांना प्रोत्साहन:**

ग्रामीण बेकारी कमी करण्यासाठी शेतीला पुरक असणाऱ्या व्यवसाय विकासाला प्रोत्साहन दिले जाते. उदा. पशुपालन, दुग्ध-व्यवसाय, कुक्कटपालन, मधमाशापालन रेशीम किड्यांची पैदास इ. तसेच शहरी भागात मोठ्या उद्योगांना पुरक ठरतील असे व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. उदा. रेडिओ, टी.व्ही. व संगणक दुरूस्ती, मोबाईल दुरूस्ती, तांत्रिक साधनांची दुरूस्ती इ. अशा पुरक व्यवसायात वाढ झाली असता रोजगार संधीत वाढ होवून बेकारी कमी होते.

**७) योग्य उत्पादन तंत्राची निवड:**

देशात भांडवल व श्रम हे दोन घटक किती प्रमाणात उपलब्ध आहेत ते पाहूनच व्यवसायासाठी योग्य उत्पादन तंत्र निवडावे लागते. भारतात श्रमाची विपुलता असून भांडवलाची टंचाई आहे. म्हणून भारतासारख्या विपूल श्रमपुरवठा असणाऱ्या देशात श्रमप्रधान तंत्राचा अवलंब केला असता अनेक बेकारांना रोजगार संधी प्राप्त होवून बेकारी कमी होईल.

**८) सामाजिक रचनेत बदल:**

भारतीय लोक दैववादी व परंपरावादी आहेत. त्यांच्यावर अंधश्रद्धेचा पगडा आहे. देशातील लोक विविध जाती, धर्म व पंथ इ. विभागले आहेत. ही सामाजिक रचना बदलली तर लोकांच्या व्यावसायिक गतिशिलतेत वाढ होवून देशातील बेकारी कमी होईल.

**९) रोजगार विनिमय केंद्रात वाढ–**

उपलब्ध रोजगार संधी बाबत अज्ञान असेल तर नोकरीच्या शोधात असणाऱ्यांना काम करण्याची संधी मिळत नाही. म्हणून उपलब्ध रोजगार संधीबाबत माहिती करून देण्यासाठी देशात रोजगार विनिमय केंद्रे वाढणे आवश्यक आहे. भारतात ही रोजगार विनिमय केंद्रे वाढत असून ती आता जिल्हा पातळी, तालूका पातळी तसेच निवडक शहरांमध्ये स्थापन झाली आहेत. या केंद्रामार्फत अनेक गरजू बेकारांना रोजगार प्राप्ती झाली आहे.

**प्रत्यक्ष उपाय योजनाः**

स्वातत्र्यप्राप्तीनंतर भारत सरकारने जास्तीतजास्त रोजगारसंधी निर्माण करून बेकारी कमी करण्यासाठी पुढीलप्रमाणे उपाययोजना व कार्यक्रम राबविले आहेत.

**१०) ग्रामीण विकासाचा धडक कार्यक्रम** : (Crash Sceme For Rural Development)

ग्रामीण बेकारी कमी करण्याच्या उद्देश्याने सरकारने १९६१ मध्ये हा कार्यक्रम हाती घेतला या कार्यक्रमांतर्गत वनीकरण, पडिक जमिनीची लागवड, पूर-नियंत्रण, भूसंधारण, जलपुरवठा योजना, रस्तेबांधणी इ. कामे हाती घेवून कायमस्रूपी मालमत्ता निर्माण करण्यात आली. सरकारने चौथ्या पंचवार्षिक योजनेत या कार्यक्रमावर १७० कोटी रू.खर्च केले.

**११) लहान शेतकरी विकास संस्था** (SFDA):

लहान शेतकऱ्यांना वर्षभर काम मिळावे. त्यांनी सखोल शेती करावी. शेतीत अधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा या उद्देश्याने भारत सरकारने १९७१ मध्ये १८१८ गटात या संस्था स्थापन केल्या. या योजनांतर्गत व्यापारी बँकांनी व सहकारी बँकांनी लहान व सीमंत शेतकऱ्यांना अल्प व्याजदराने कर्ज पुरवठा केला. त्यांना १९८० पर्यंत २५३ कोटी रू.ची कर्जे या संस्थांमार्फत देण्यात आली.

**१२) सीमांत शेतकरी व शेतमजूर विकास कार्यक्रम** (MFAL)

हा कार्यक्रम सीमांत शेतकरी व शेतमजूरांना पूर्ण वेळ रोजगार उपलब्ध करून देवून त्यांचा विकास साधण्यासाठी १९७०-७१ मध्ये सुरू करण्यात आला. आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांना अर्थपुरवठा करणे, पशुपालन,दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, फळबागांची लागवड यासारखे शेतीस पुरक असणारे व्यवसाय सुरू करण्यासाठी अर्थसहाय्य देणे, पूर्णवेळ रोजगार उपलब्ध करून देवून ग्रामीण बेकारी कमी करणे इ. उद्देश्याने हा कार्यक्रम राबविण्यात आला.

**१३) वीस कलमी कार्यक्रमः**

भारत सरकारने प्रथमतः जुलै १९७५ मध्ये व नंतर १९८२ मध्ये हा वीस कलमी कार्यक्रम जाहीर केला. या कार्यक्रमांतर्गत ग्रामीण मजूरांना बारमाही रोजगार उपलब्ध करून देण्यात आला. त्यासाठी वीस कलमी कार्यक्रमांतर्गत सरकारने सामाजिक वनीकरण, शेतीसाठी जलसिंचन योजना, जलपुरवठा योजना, बेघर कुटुंबांसाठी घरकूल योजना, झोपडपट्टी वासीयांचे पुनर्वसन, ग्रामीण विद्यूतीकरण, सार्वजनिक शिक्षण, प्रौढ शिक्षण, हातमाग व्यवसाय, घरगुती व्यवसाय, बायोगॅस संच निर्मिती इ. कामे सुरू करून ग्रामीण बेकारांना रोजगार उपलब्ध करून दिला.

**१४) एकात्मिक कोरडवाहू जमीन विकास कार्यक्रमः** (Integrated Dry Land Agricultural Development)

या कार्यक्रमांतर्गत शेतजमिनीची धूप थांबविण्यासाठी मृदूसंधारण योजना, पाणी साठविण्यासाठी समजल जमीन कार्यक्रम असे श्रमप्रधान कार्यक्रम राबविण्यात आले. या कार्यक्रमात प्रत्येक १ कोटी रूपये खर्चातून १५००० श्रमिकांना काम मिळेल अशी योजना होती.

**१५) अवर्षण क्षेत्र कार्यक्रम** (DPAP)

रोजगार निर्मितीतून दारिद्र्य निर्मुलनाचा एक दीर्घकालीन उपाय म्हणून १९७३ पासून दुष्काळी भागासाठी हा कार्यक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमांतर्गत सामाजिक वनीकरण, पडीक जमिनीची लागवड, पशुधन विकास, दुग्धविकास पाणी व्यवस्थापन तसेच इतर दुय्यम व्यवसाय विकास अशा विविध योजना राबविण्यात आल्या. १९८५-८६ मध्ये १३ राज्यातील ९१ जिल्ह्यात हा कार्यक्रम राबविण्यात आला. सहाव्या पंचवार्षिक योजनेत या कार्यक्रमावर ३७७.४ कोटी रू. खर्च करण्यात आले. तसेच १९९०-९२ साठी १०२२.३ कोटी रू. खर्चाची तरतूद करण्यात आली. या अवर्षण क्षेत्र कार्यक्रमामुळे दुष्काळी भागातील अनेक गरजूंना रोजगार संधी प्राप्त झाली.

**१६) शेती सेवा केंद्रे** (Agro-Service Centres)

ही योजना बेकार पदवीधर, शेती पदवीधर, इलेक्ट्रीकल इंजिनियर्स इत्यादींना स्वयंरोजगार उपलब्ध व्हावा या उद्देश्याने सुरू करण्यात आली. वर्कशॉप सुरू करणे, शेती यंत्राचे उत्पादन करणे शेती यंत्रे शेतकऱ्यांना भाडेपट्टीने पुरविणे, यंत्रांची दुरूस्ती केंद्रे सुरू करणे इ. प्रकारच्या सुरू केलेल्या शेती सेवा केंद्रातून रोजगार संधी निर्माण व्हाव्यात ही अपेक्षा होती.

**१७) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम** (NREP)

ग्रामीण बेकारी दूर करण्याच्या हेतूने भारत सरकारने १९८० मध्ये हा कार्यक्रम सुरू केला. ग्रामीण साधन सामूग्रीचा पूर्ण कार्यक्षमतेने वापर करून रोजगारनिर्मिती करणे व कायमस्वरूपी मालमत्ता निर्माण करणे या उद्देश्याने हा कार्यक्रम सुरू करण्यात आला. विहीरी व कालव्यांचे खोदकाम, शाळा, आरोग्य, सामाजिक वनीकरण या सारखी कामे सुरू करून ग्रामीण रोजगारात वाढ करण्यात आली. सहाव्या व सातव्या योजनेत या कार्यक्रमावर अनुक्रमे १८३४ कोटी रू. व २४८७.४ कोटी रू.खर्च करण्यात आले आणि अनुक्रमे १७७५ द.ल. मनुष्य दिवस व १४७७ द.ल. मनुष्य दिवस रोजगाराची निर्मिती करण्यात आली.

**१८) एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम** (IRDP):

या कार्यक्रमाची सुरूवात १९७८-७९ मध्ये निवडक जिल्ह्यातील २३०० विकास गटात करण्यात आली. परंतु सहाव्या योजनेत २ ऑक्टोबर १९८० पासून संपूर्ण देशासाठी हा कार्यक्रम राबविण्यास प्रारंभ झाला. १९९८-९९ पर्यंत देशातील ५३.५० लाख कुटुंबांना या कार्यक्रमाखाली आणले गेले. त्यावर एकूण १३७०० कोटी रू. खर्च करण्यात आले.

**१९) ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी कार्यक्रम (**RLEGP)

हा कार्यक्रम ग्रामीण भागातील भूमिहीन शेतमजूरांना रोजगार देण्यासाठी १५ ऑगस्ट १९८३ रोजी सुरू करण्यात आला. हा कार्यक्रम राबविण्यासाठी केंद्र सरकार राज्य सरकारना १०० टक्के अनुदान देते. १९८५-८६ मध्ये या कार्यक्रमावर ४५३.२ कोटी रू. खर्च करून रोजगार निर्मिती करण्यात आली. १९८५-८६ ते १९८८-८९ या काळात सरकारने २४१२ कोटी रू. या योजनेवर खर्च केले आणि शेत मजूरांना ११५४.४ दशलक्ष मनुष्यदिवस रोजगार दिला गेला.

**२०) जवाहर रोजगार योजनाः** (JRY)

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम (JRY) आणि ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी कार्यक्रम (NREP) या दोन कार्यक्रमांचे एकत्रिकरण करून माजी पंतप्रधान राजीव गांधींनी एप्रील १९८९ मध्ये 'जवाहर रोजगार योजना' जाहीर केली. या योजनेचा मुख्य उद्देश्य ग्रामीण बेकार स्त्री–पुरूषांना रोजगार उपलब्ध करून देणे हा होता. ही योजना जिल्हा परिषदेच्या जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेद्वारा राबविण्यात आली. या योजनांतर्गत रस्त्याकडेने वृक्षारोपण कार्यक्रम, सामाजिक वनीकरण, 'पाणी अडवा पाणी जिरवा,' लहान जलसिंचन योजना, सामुदायिक विहरींचे बांधकाम, गावतळी, सार्वजनिक शौचालये, गरीबांसाठी घरबांधणी असे विविध कार्यक्रम हाती घेवून बेकारांना रोजगार उपलब्ध करून देण्यात आला. या रोजगारातून १९९९ अखेर १२ लक्ष विहीरी व ६८ लक्ष घरे बांधण्यात आली. दहा वर्षात ७३७३ दशलक्ष मनुष्यदिवस रोजगार देण्यात आला.

**२१) पंतप्रधान रोजगार हमी योजना** : (PMRY)

ही योजना देशातील लक्षावधी सुशिक्षित बेरोजगारांना स्वयंरोजगार पुरविण्याच्या उद्देश्याने आठव्या योजनेत १९९३ मध्ये कार्यान्वित करण्यात आली. आठव्या योजनेत स्वयंरोजगारासाठी ५.७६ लाख प्रकरणांना कर्जे देण्यात आली. तसेच नवव्या योजनेत पहिल्या तीन वर्षात ५ लाख स्वयंरोजगार प्रकरणांना कर्जे देवून त्यातून ७.४ लक्ष बेकारांना रोजगार देण्याचे कार्य या योजनेने केले.

**२२) जवाहर ग्राम समृद्धी योजना** (JGSY)

मार्च १९९९ पर्यंत जवाहर रोजगार योजनेने (JRY) १० वर्षे पूर्ण केली. त्यानंतर एप्रील १९९९ पासून जवाहर रोजगार योजनेचे नामकरण 'जवाहर ग्राम समृद्धी योजना' (JGSY) असे करण्यात आले. ग्रामीण पातळीवर दीर्घकालीन मालमत्तेची निर्मिती करताना जास्तीतजास्त बेकारांना रोजगार पुरवठा करणे हा या योजनेचा उद्देश होता. या योजनेने जास्तीतजास्त दारिद्र्य रेषेखालील लोकांना रोजगार संधी देण्यावर भर दिला.

**२३) आश्वासित रोजगार योजना** (Employment Assurance Scheme)

ही योजना महाराष्ट्र रोजगार हमी योजनेप्रमाणेच असून ती २ आक्टोबर १९९३ पासून कार्यन्वित करण्यात आली. रोजगार पुरवठा करण्याच्याबाबतीत ही योजना अत्यंत महत्त्वपूर्ण मानली गेली. देशातील २६१ जिल्ह्यात १७७८ गटात ही योजना सुरू झाली. या योजनेवरील खर्चाचा ८० टक्के हिस्सा केंद्रसरकार व २० टक्के हिस्सा राज्यसरकारने सहन करण्याचे ठरले. ग्रामीण अकुशल शारिरीक कष्टाची कामे करण्याऱ्या श्रमिकांना वर्षातून १०० दिवस काम देण्याचे आश्वासन या योजनेतून देण्यात आले. एप्रील १९९३ ते मार्च २००० अखेर सात वर्षात या योजनेवर १२६७४ कोटी रू. खर्च करण्यात आले आणि २१६१.२ दशलक्ष मनुष्य दिवस रोजगार निर्माण करण्यात आला.

**२४) स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना** (SJGSY)

ग्रामीण बेकारांना रोजगार देण्यासाठी ही योजना डिसेंबर १९९७ मध्ये सुरू करण्यात आली. या योजनेवरील खर्चाचा ७५ टक्के हिस्सा केंद्र सरकार व २५ टक्के हिस्सा राज्य सरकारने सहन करण्याचे ठरले.

**२५) स्वर्णजयंती शहरी रोजगार योजना** (SJSRY)

स्वयंरोजगार वाढविण्यासाठी ही योजना १ डिसेंबर १९९७ मध्ये कार्यान्वित करण्यात आली. यामध्ये मुख्यतः शहरी स्वयंरोजगार कार्यक्रम व शहरी वेतन रोजगार कार्यक्रम अशा दोन योजनांचा समावेश करण्यात

आला. यावरील खर्चाचा ७५ टक्के हिस्सा केंद्र सरकारने व २५ टक्के हिस्सा राज्य सरकारने उचलण्याचे ठरले. या योजनेतून १९९७ ते २००० या काळात ३५३ कोटी रू. खर्च करून २१.८ दशलक्ष मनुष्य दिवस रोजगार निर्मिती करण्यात आली.

**२६) संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना** (SGRY):

ग्रामीण बेरोजगारांना रोजगार देणे या प्रमुख उद्देश्याने ही योजना जवाहर ग्राम समृद्धी योजना (JGSY) व आश्वासित रोजगार योजना (EAS) या दोन्हींचे पूर्ण एकत्रिकरण करून सप्टेंबर २००१ मध्ये कार्यान्वित करण्यात आली.

**२७) जयप्रकाश रोजगार हमी योजना** (JPRGY )

सन २००२-०३ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात ही योजना जाहीर करण्यात आली. देशातील अति दरिद्री जिल्ह्यातील बेरोजगारांना रोजगार पुरविण्याची हमी या योजनेमार्फत देण्यात आली.

वरील प्रमाणे भारत सरकारने बेकारीची समस्या सोडविण्यासाठी विविध योजना कार्यान्वित केल्या आहेत. तरी सुद्धा बेकारीचा प्रश्न मोठा आहे. साधारणपणे सप्टेंबर २००८ पासून आपल्या देशात सुरू झालेली मंदी व त्यामुळे बेकारीत पडणारी भर यावर केंद्र सरकारने लक्ष दिले आहे. मे २००९ मध्ये पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या नेतृत्त्वाखालील सरकारने देशापुढील गंभीर प्रश्नांची तिव्रता कमी करण्यासाठी १०० दिवसाची योजना (100 Days Plan) कार्यान्वित करण्याचे ठरविले आहे.

## ४.५ भारतातील दारिद्र्यः

वाढत्या लोकसंख्येमुळे भारतात अनेक गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यापैकी दारिद्र्य ही एक महत्त्वपूर्ण समस्या होय. स्वातंत्र्योत्तर काळात भारतातील लोकसंख्या वेगाने वाढली त्याचबरोबर काम मागणाऱ्यांची संख्या वाढली परंतु त्या प्रमाणात रोजगार निर्मिती न झाल्याने दारिद्र्याची समस्या तीव्र बनली. विशेषतः मागासलेली शेती, पावसावर अवलंबून असणारी शेती, औद्योगिक क्षेत्राचा मंद विकास, भांडवलटंचाई, बाजारपेठेतील अपूर्णता, शिक्षणाचा व प्रशिक्षणाचा अभाव साधनसामग्रीचा अयोग्य व अपूरा वापर इ. कारणांमुळे भारतात पुरेशा प्रमाणात रोजगार संधी निर्माण झाल्या नाहीत. परिणामतः बेकारी वाढून दारिद्र्याची समस्या गंभीर बनली. दहाव्या योजना काळात भारतात २६ टक्के लोक दारिद्र्यात जीवन जगत असल्याचे मान्य झाले आहे. जागतिक दारिद्र्यापैकी २२ टक्के दारिद्र्य भारतात आहे. यावरून भारतातील दारिद्र्याची भयानकता लक्षात येते.

### ४.५.अ. दारिद्र्याची संकल्पनाः

जेंव्हा समाजाचा एक मोठा भाग किमान अन्न, वस्त्र, निवारा यासारख्या जीवनावश्यक वस्तूपासून बराच काळ वंचित रहातो. अर्थात तो भाग किमान निर्वाह पातळी खालील जीवन जगत असतो तेंव्हा समाजात मोठ्या प्रमाणात दारिद्र्य आहे असे म्हटले जाते. दारिद्र्य ही एक सापेक्ष संकल्पना आहे. त्यामुळे दारिद्र्याची काटेकोर व्याख्या देता येत नाही. दारिद्र्याच्या कांही व्याख्या पुढीलप्रमाणे देता येतात.

'ढोबळमानाने व्यक्तीला किंवा कुंटुंबाला किमान मूलभूत गरजा सुद्धा भागविता येत नाहीत अशी स्थिती म्हणजे दारिद्र्य होय.'

'व्यक्ती किंवा कुटुंबाकडे जीवनावश्यक गरजांची पुर्तता करण्याची क्षमता नसणे म्हणजे दारिद्र्य होय.'

'व्यक्ती किंवा कुटुंबाला दररोज किमान २२५० कॅलरील(उष्मांक) देणारा आहार सुद्धा मिळत नसेल तर त्या स्थितीला दारिद्र्य म्हणता येईल.'

थोडक्यात अन्न,वस्त्र व निवारा या सारख्या मुलभूत गरजा भागविण्याच्या व्यक्तीच्या किंवा कुटुंबाच्या असमर्थतेस दारिद्र्य असे म्हणतात.

**४.५.ब. दारिद्र्यरेषा** (Poverty Line)

निरपेक्ष दारिद्र्याची संकल्पना समजावी यासाठी आपणास दारिद्र्यरेषा ही संकल्पना माहित असणे आवश्यक आहे. किमान जीवन जगण्यासाठी मुलभूत प्राथमिक वस्तू व सेवांच्या (अन्न, वस्त्र, निवारा) उपभोग खर्चाची कमीत कमी पातळी ज्याने दर्शविली जाते तिला दारिद्र्यरेषा असे म्हणतात. प्रत्येक देशात दारिद्र्यरेषेची संकल्पना वेगवेगळी आहे. भारतात ज्या व्यक्तीस कमीत कमी दररोज २२५० कॅलरिज (उष्णांक) उर्जा देवू शकेल एवढे अन्न खाण्यास मिळाले नाही तर ती व्यक्ती दारिद्र्यरेषेखालील आहे असे मानले जाते.

**४.५.क. दारिद्र्याबाबतचे अंदाजः**

अनेक अर्थतज्ज्ञांनी भारतातील दारिद्र्याचा अभ्यास करून दारिद्र्याचे मोजमाप करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी उत्पन्नाची विशिष्ट मर्यादा, उत्पन्नाची निर्वाह पातळी, उष्मांक इ. निकष वापरले आहेत.

**श्री.पी.डी. ओझा.–**

व्यक्तीला दररोज किमान २२५० कॅलरिज मिळाले पाहिजेत असे श्री. ओझा यांनी दारिद्र्य-मापन करताना म्हले आहे. त्यांच्या मते १९६०-६१ मध्ये भारतातील १९ कोटी लोकसंख्या दारिद्र्यरेषेखालील जीवन जगत होती. त्यापैकी १८.४ कोटी लोक ग्रामीण भागात तर ६० लक्ष लोक शहरी भागात होते. १९६६-६७ मध्ये दारिद्र्यरेषेखलील लोकसंख्या २८.९ कोटी झाली.

**डॉ.वि.म. दांडेकर व डॉ. निळकंठ रथ–**

या दोन अर्थतज्ञांनी सुद्धा व्यक्तीला दररोज २२५० कॅलरीज ची आवश्यकता व्यक्त केली. त्यासाठी १९६०-६१ च्या किंमतीनुसार ग्रामीण व शहरी लोकांना वार्षिक दरडोई उत्पन्न अनुक्रमे १८० रूपये व २७० रूपये मिळणे आवश्यक ठरविले गेले. आणि १९६८-६९ च्या किंमतीनुसार हे उत्पन्न अनुक्रमे३२४ रू व ४८६ रू आवश्यक ठरविले गेले. त्यांच्या मते १९६०-६१ मध्ये दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्या १७.७ कोटी होती ती १९६८-६९ मध्ये २१.६ कोटीपर्यंत वाढली.

**नियोजन मंडळः**

नियोजन मंडळाने दारिद्र्याचे मोजमाप करताना १९७७-७८ च्या किंमतीनुसार मासिक दरडोई उत्पन्नाची मर्यादा ग्रामीण भागासाठी ६५ रूपये व शहरी भागासाठी ७५ रूपये निश्चित तर शहरी लोकांना २१०० कॅलरिज मिळाले पाहीजेत असे मत व्यक्त केले. १९७७-७८ मध्ये ४८ टक्के लोक दारिद्र्यरेषेखालील जीवन जगत होते.

**जागतिक बँकः**

जागतिक बँकेच्या मते भारतात १९७० मध्ये २८.७३ कोटी लोक दारिद्र्यरेषेखालील जीवन जगत होते. १९८८ मध्ये ही लोकसंख्या ३२.२३ कोटीपर्यंत वाढली त्यापैकी २५.२२ कोटी लोक ग्रामीण भागात व ७०.०१ कोटी लोक शहरी भागात होते.

डॉ. लकडवालाः यांच्या अध्यक्षतेखालील तज्ज्ञ गटाने दारिद्र्याचे मापन केले. त्यांच्या मते १९७३-७४ दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्या ३२.१६ कोटी होती ती १९८७-८८ मध्ये ३१.२७ कोटी पर्यंत कमी झाली परंतु १९९१-९२ मध्ये पुन्हा ती ३२.२८ कोटीपर्यंत वाढली.

श्री.गौरव दत्तः यांच्या अभ्यासानुसार भारतात १९५१-५२ मध्ये दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्या १९.१७ कोटी ती १९९१-९२ मध्ये ३२.८८ कोटी पर्यंत वाढली. पैकी २४.९५ कोटी लोक ग्रामीण तर ७.२३ कोटी लोक शहरी होते.

**योजना आयोगः**

योजना आयोगाच्या आकडेवारी प्रमाणे २००४-०५ मधील भारतात दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण २४.० कोटी इतके आहे. त्यापैकी १७ कोटी लोक ग्रामीण भागातील व ७ कोटी लोक शहरी भागातील आहेत.याचा अर्थ दारिद्र्यरेषेखालील एकूण लोकसंख्येपैकी ७० टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात असून ३० टक्के शहरी भागात आहे. या दृष्टिकोणातून पाहता दारिद्र्याचा प्रश्न म्हणजे मुख्यतः ग्रामीण भागातील दारिद्र्याचा प्रश्न आहे असे म्हणता येईल. तसेच शहरी भागातील दारिद्र्याचा प्रश्न हा बऱ्याच अंशी ग्रामीण भागातील गरीबांनी पोट भरण्यासाठी शहराकडे केलेल्या स्थलांतरामुळे निर्माण झाला आहे.

देशातील एकूण दारिद्र्याची विभागणी विविध आर्थिक व्यवसायांमध्ये कशी झाली आहे हे पहाणे उद्‌बोधक ठरेल. सरकारच्या इ.स. २००० सालच्या आकडेवारीवरून असा निष्कर्ष निघतो की, एकूण दारिद्र्यामध्ये १) भूमिहीन शेतमजूर ४३ टक्के २) अल्पभूधारक शेतकरी २८ टक्के ३) इतर स्वयंरोजगार ११ टक्के ४) इतर कामगार ९ टक्के आणि ५) इतर सर्व व्यवसाय ९ टक्के असे प्रमाण आहे. आज २००९ मध्ये सुद्धा परिस्थिती जवळपास तशीच असण्याची शक्यता जास्त दिसते. भूमिहीन शेतमजूर व अल्पभूधारक शेतकरी यांचा एकूण दारिद्र्यातील वाटा साधारणपणे ७१ टक्के आहे. हे दोन वर्ग आर्थिकदृष्ट्या सर्वात दुर्बल घटक आहेत. त्यांचे दारिद्र्य दूर करण्यासाठी प्राधान्य देणे आवश्यक आहे.

**४.५.ड भारतातील दारिद्र्याची कारणे**

भारतातील दारिद्र्य वाढण्यास प्रामुख्याने पुढील कारणे जबाबदार आहेत.

**१. वाढती लोकसंख्या :**

सन १९५१ मध्ये भारताची लोकसंख्या ३६.१ कोटी होती ती २००१ मध्ये १०२.७१ कोटी पर्यंत वाढली आहे. याचा अर्थ ५० वर्षात भारताची लोकसंख्या जवळजवळ तीनपट झाली आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे काम मागणाऱ्यांची संख्या वाढत गेली. परंतु त्याना पुरेल एवढा रोजगार देण्याची क्षमता भारतीय अर्थव्यवस्थेत नसल्याने बेरोजगार वाढून दारिद्र्य वाढले. वाढत्या लोकसंख्येमुळे दरडोई उत्पन्नात मोठी वाढ झाली नाही. राबणारे हात कमी पण खाणारी तोंडे जास्त यामुळे दारिद्र्य वाढत गेले.

**२. उत्पन्नातील विषमता :**

भारतात उत्पन्नातील विषमात तीव्र स्वरुपाची आहे. देशात एकूण लोकसंख्येच्या १० टक्के लोकांकडे सुमारे ९० टक्के संपत्तीचे केंद्रीकरण झाले आहे. बाकीच्या ९० टक्के सामान्य जनतेकडे केवळ १० टक्के संपत्ती आहे. भारतातील सर्वच क्षेत्रात मोठी विषमता आहे. १९९१ मध्ये ९.६ टक्के ग्रामीण कुटुंबाकडे ४८.८ टक्के मालमत्ता तर १४.२ टक्के शहरी कुटुंबाकडे ६५.८ टक्के मालमत्तेचे केंद्रीकरण झाले होते. शहरी भागात विशिष्ट औद्योगिक घराण्याकडे वित्तीय साधनाचे केंद्रीकरण मोठ्या प्रमाणात झाले आहे. डॉ. दांडेकर व डॉ. रथ यांच्या मते अर्थिक विकासाचा लाभ श्रीमंत वर्गाला अधिक प्रमाणात मिळाला असून सर्वसामान्य

गरीबांपर्यत अर्थिक विकासाची फळे पोहचली नाहीत. भारतातील या व्रीव स्वरुपाच्या उत्पन्नातील विषमतेमुळे मोठ्या लोकसंख्येला द्रारिद्रयाशी झगडावे लागत आहे.

**३. भारतीय शेतीची अल्प उत्पादकता :**

भारतातील सुमारे ६५ टक्के लोकसंख्येचा प्रमुख व्यवसाय शेती आहे. परंतु परंपरागत मागासलेल्या उत्पादनतंत्राचा वापर करुन शेती केली जाते हेच भारतीय दारिद्रयाचे प्रमुख कारण आहे. शेतीवरील लोकसंख्येचा वाढता भार, शेत जमिनीचे विभाजन व तुकडीकरण, शेतीचा लहान आकार, जलसिंचन सुविधांचा अभाव, भांडवलाचा अभाव, शेतकऱ्यांचे अज्ञान जुनाट उत्पादन तंत्र, निकृष्ठ प्रतिची बी – बीयाने इ. कारणांमुळे शेतीची उत्पादकता कमी आहे. परिणामता : ग्रामीण दारिद्रय वाढले आहे.

**४. शेत जमिनीची विषम वाटणी :**

स्वातंत्र्योत्तर काळात भारतात अनेक जमीन सुधारणा कायदे झाले. पण त्यांची काटेकोर अंमल बजावणी झाली नाही. त्यामुळे मुठभर श्रीमंत जमीनदाराकडे शेती मोठया प्रमाणात राहीली. बहुसंख्य शेतकरी अल्प भूधारक बनले. वारसा हक्क कायद्याने जमीनीचे विभाजन व तुकडीकरण होत गेले. आज भारतात ५० टक्के कुटुंबाकडे एक एकरपेक्षा कमी शेतजमीन आहे. शेतजमीनीच्या आशा विषम वाटणीमुळे ग्रामीण दारिद्रय वाढले आहे.

**५. अशिक्षीत पणा :**

भारतात शिक्षणाचे प्रमाण कमी आहे ३० टक्के लोक अध्यापी शिक्षणापासुन वंचित आहेत. शिक्षण प्रसार वाढला असला तरी विशेषता ग्रामीण भागात निरक्षरतेचे प्रमाण अधिक आहे. स्वातंत्र्यानंतरच्या सुरवातीच्या काळात व्यवसायिक शिक्षणाकडे दुर्लक्ष झाल्याने बेकारी व पर्यायाने दारिद्रयात वाढ होत गेली आहे.

**६. मंद औद्योगिक विकास**

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतात १९५१ पासून अर्थिक नियोजनाचा पुरस्कार करण्यात आला . परंतु औद्योगिक विकासाचा वेग मात्र कमी राहीला. त्यामुळे काम मागणाऱ्यांना रोजगारांची संधी मिळाली नाही. त्यांना उपजीवीके साठी शेत जमीनीचा आधार घ्यावा लागला. अर्थात मंद औद्योगिक विकासामुळे बेकारीव दारिद्रयात भर पडली.

**७. बेरोजगारी :**

रोजगार संधी उपलब्ध न होणे हे भारतीय दारिद्रयाचे महत्वाचे कारण मानले जाते. भारतातील लोकसंख्या वेगाने वाढली त्या मानाने अर्थिक विकासाची गती कमी राहीली. त्यामुळे भारतात बेकारी व अर्ध बेकारी अदृष्य बेकारी वाढत गेली. या बेकारीचा समावेश दारिद्रय रेषेखालील लोकसंख्येत झाला आहे. राष्ट्रीय नमुना पाहणी नुसार (NSS) भारतात २००४ पर्यत ११४ दशलक्ष एवढी बेकारी वाढली आहे. अशा अनुउत्पादक लोकसंख्याचा भार उत्पादक लोकसंख्येवर पडल्याने दारिद्रय वाढत गेले.

**८. भांडवल व नियोजन कौशल्याचा अभाव :**

वस्तु उत्पादनाच्या चार उत्पादन घटकापैकी भांडवल व संयोजन कौशल्य यांची प्रत व उपलब्धता यावर देशाचा अर्थिक विकासाचा वेग अवलंबून असतो. भारतात या दोन्ही घटकांची उपलब्धता कमी

असल्याने व त्याचा दर्जा निकृष्ट असल्याने अर्थिक विकासाचा दर कमी राहीला परिणामी दारिद्रयात भर पडली आहे.

**९. नैसर्गिक साधनाचा अपुरा वापर :**

देशाच्या अर्थिक विकासासाठी उपलब्ध नैसर्गिक साधन सामुग्री व मानवी बळाचा पूर्ण कार्यक्षमतेने वापर होणे आवश्यक आहे. उदा. जलसंपत्ती, खनिजसंपत्ती, सागरी किनारा, जंगले, जमीन व श्रम इत्यादी ही साधने भारतात विपुल असताना सुध्दा त्याचा पूर्ण कार्यक्षमतेने वापर होत नाही. बऱ्याच वेळा त्यांचा अयोग्य वापर करुन अपव्यय केला जातो. त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर कमी राहीला असून दारिद्रय वाढले आहे.

**१०. अकार्यक्षम श्रमीक वर्ग :**

भारतातील कामगारास सामान्यपणे २२५० कॉलरीज (उष्मांक) मिळतील असा आहार उपलब्ध होत नाही. त्यामुळे त्याची कार्यक्षमता कमी, उत्पादन कमी म्हणून मिळणारे उत्पन्न ही कमी राहते. पूर्ण कार्यक्षमतेने काम करण्यासाठी ज्या सुविधा आवश्यक असतात. त्या सुविधांचा अभाव असल्याने भारतीय श्रमीकांची कार्यक्षमता कमी होत. अपुरा व अपौष्टिक आहार, अयोग्य निवारा, अयोग्य सुविधांचा अभाव इ. कारणांमुळे ही कार्यक्षमता कमी आहे. तसेच भारतीय श्रमीकांची भौगोलिक व व्यावसायिक गतिशीलता सुध्दा कमी आहे. अर्थात कार्यक्षमता व गतिशीलता कमी असल्याने भारतीय श्रमीकाला मिळणारे उत्पन्न कमी राहते. त्यामुळे दारिद्रय वाढते.

**११. सामाजिक परिस्थिती :**

भारतीय लोक दैववादी व परंपरावादी आहेत. अंधश्रध्दा व सामाजिक चालीरितींवर विश्वास ठेवणारे आहेत. भारतीय लोकसंख्या अनेक जाती, धर्म, पंथ इ. त विभागलेली आहे. अनुत्पादक बाबींसाठी कर्जे काढून प्रचंड खर्च करण्याची प्रवृत्ती आहे. याचा परिणाम दारिद्रय वाढण्यात झाला आहे.

**१२. भाववाढ :**

भारतात १९७० नंतर प्रचंड भाववाढ झाली आहे. जेव्हा भाववाढ होते तेव्हा पैशाचे मूल्य कमी होवून समाजाच्या खरेदी शक्तीत ( मागणीत ) घट होते. गरीबांचे उत्पन्न मुळातच कमी असल्याने त्याना आहे त्या उत्पन्नात वाढत्या किंमतीने पूर्वी इतक्या आवश्यक वस्तू खरेदी करता येत नाहीत. त्यामुळे एकूण उपभोग घटून गरीबांचे राहणी मानात आणखी घट होते. आणि त्यांचे दारिद्रय वाढते. भारतात १९८१-८२ मुळ वर्ष गृहित धरुन निर्देशांक १०० मानला गेला. तो निर्देशांक १९९९-२००० मध्ये ३६६ झाला. याचा अर्थ १९८१-८२ या तुलनेत १९९९-२००० मधील सर्वसाधरण किंमतपातळीत ३.६६ पटीने वाढ झाली. परिणामी भारतीय लोकांचे दारिद्रय वाढले.

**१३. सार्वजनिक मालमत्तेचे खाजगीकरण :**

सार्वजनिक मालमत्तेवर सामाजाची सामुहीक मालकी असते. प्रत्येकाला त्या मालमत्तेचा वापर करता येतो. उदा. ग्राम पंचायतीची चरावू कुरणे, जंगले, तलाव, सार्वजनिक विहीरी, महसुल जमिनी, कालवे इ. प्रकारची सार्वजनिक मालमत्ता होती. वाढत्या खाजगी करणामुळे असी मालमत्ता खाजगी मालकीची बनली. सामायीक मालकी नाहीशी झाल्याने दारिद्रयात वाढ झाली.

**१४. हरितक्रांतीचा परिणाम :**

भारतात हरितक्रांतीमुळे ग्रामीण भागात दारिद्रिय रेषेखालील लोकसंख्येत वाढ झाली आहे. डॉ. व्ही. के. आर. व्ही. राव यांच्या मते हरितक्रांतीने देशाच्या अन्नधान्याच्या उत्पादनात भर घातली आहे. पण तीने ग्रामीण भागात उत्पन्नातील विषमता वाढवली आहे. हरितक्रांतीने लहान शेतकऱ्यांचे कुळ म्हणून हक्क नष्ट केले असून देशात सामाजीक अर्थिक तनावाची स्थिती निर्माण केली. हरितक्रांतीने वाढलेल्या उत्पन्नाचा फायदा गरिबांना मिळाला नाही. ठराविक शेतकरी श्रीमंत बनले शेतीचे तांत्रिकीकरण वाढले. शेतमजूरांची बेकारी वाढली त्यामुळे त्यांचे दारिद्रिय वाढले.

**१५. नैसर्गिक संकटे :**

भारतात अवर्षण ( दुष्काळ ), अतिवृष्टी, महापूर, भूकंप, यासारख्या नैसर्गिक संकटामुळे लोकांच्या उत्पन्नात स्थैर्य वाढत नाही. ही नैसर्गिक संकटे प्रचंड अर्थिक नुकसान देणारी ठरतात. त्यामुळे दारिद्र्यात वाढ होते. वरील विविध कारणांमुळे भारतात दारिद्र्यात वाढ झाली आहे.

**४.५.इ दारिद्र्य निर्मूलनासाठी उपाययोजना :**

शेतजमीनीचे पुनर्वाटप, ओसाड व पडीक जमीनीची लागवड, शेती व शेती आधारीत उद्योगामध्ये श्रमप्रधान उत्पादन तंत्राचा वापर, वाढत्या लोकसंख्येचे नियंत्रण, लघु व कुटीर उद्योगांना प्राधान्य, सामाजीक सुरक्षितता कार्यक्रम अशा विविध योजना राबविल्या असता दारिद्र्य कमी होण्यास मदत होते. म्हणून भारत सरकारने दारिद्र्य निर्मुलनासाठी वरील उपाय योजना राबविल्या आहेत. ग्रामीण विकास व ग्रामीण रोजगार कार्यक्रम याद्वदारे दारिद्र्य निर्मुलनाच्या प्रत्यक्ष उपाययोजनेचा अवलंब प्रथम १९७० च्या दरम्यान करण्यात आला. आणि ५ व्या योजनेपासून दारिद्र्य निर्मूलन करणे हे आर्थिक नियोजनाचे प्रमुख उद्दिष्ट म्हणून मान्य करण्यात आले. भारत सरकारने दारिद्र्य निर्मुलनासाठी हाती घेतलेल्या उपाय योजना पुढील प्रमाणे आहेत.

**१. ग्रामीण विकासाचा धडक कार्यक्रम (१९६१)**

(Crash scheme for rural development)

ग्रामीण भागातील दारिद्र्य कमी करण्याच्या उद्देशाने रोजगार वृध्दी व्हावी यासाठी भारत सरकारने ग्रामीण विकासाचा धडक कार्यक्रम हाती घेतला. या कार्यक्रमातून अनेकांना रोजगार संधी प्राप्त झाली . त्यांच्या श्रमातून कायम स्वरुपी मालमत्ता निर्माण करण्यात आली.

**२. लहान शेतकरी विकास संस्था** (SFDA )

चौथ्या पंचवार्षिक योजना काळात १९७१ मध्ये १८१८ विकास गटात लहान शेतकरी विकास संस्था स्थापन करण्यात आल्या. शेतकऱ्यांनी सखोल शेती करावी व अधुनिक तंत्रज्ञान वापरावे यासाठी या योजनेअंतर्गत व्यापारी बँका व सहकारी बँकानी सवलतीच्या दराने कर्जपुरवठा केला. १९८० पर्यत या संस्थांमार्फत २५३ कोटी रुपये कर्ज पुरवठा करण्यात आला. १९८० मध्ये हा कार्यक्रम एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमात (IRDP ) समाविष्ट करण्यात आला.

**३. सीमांत शेतकरी व शेतमजूर विकास कार्यक्रम** (MFAL )

सीमांत शेतकरी व शेतमजूर यांच्या विकासासाठी १९७०-७१ मध्ये हा कार्यक्रम सुरु करण्यात आला. आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांना अर्थिक मदत करणे अनुदान करणे पशुपालन दुग्धव्यवसाय, फळबाग लागवड यासारखे शेतीस पुरक असे व्यवसाय सुरु करण्यासाठी साहाय्य करणे, पूर्णवेळ रोजगार देणे इ. उद्देशाने हा

कार्यक्रम राबविण्यात आला. १९८० मध्ये ही योजना एकात्मीक ग्रामीण विकास कार्यक्रमात (IRDP) विलीन करण्यात आली.

**४. वीस कलमी कार्यक्रम :**

भारत सरकारने प्रथमत: जुलै १९७५ मध्ये वीस कलमी कार्यक्रम जाहीर करुन गरिबांना मदत करण्याचे अनेक उपाय घोषीत केले. १९८२ मध्ये हा पुन्हा कार्यक्रम जाहीर करण्यात आला. या कार्यक्रमांअतर्गत कोरड वाहू शेती, जल सिंचन योजना कार्यान्वीत करुन ग्रामीण मजुरांना बारमही रोजगार उपलब्ध क रुन देणे, भूधारणेवर कमाल मर्यादा घालून मिळणारी अतिरिक्त जमीन भूमीहीनांमध्ये वितरीत करणे. शेत मजुरांच्या किमान वेतनात सुधारणा करणे, त्यांचा कर्जबारीपणा संपवणे, वेठबिगारी पध्दत बंद करणे तसेच मजुरांचे पुनर्वसन, ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याची सुविधा, बेघरांसाठी घरकूल योजना, झोपडपट्टीवासींयाचे पुनवर्सन, ग्रामीण विद्युतीकरण, सामाजिक वनीकरण, शिक्षण, प्रौढ साक्षरता, हातमाग व्यवसाय व घरगुती व्यवसायांना प्रोत्साहन, रास्त दरात धान्य पुरवठा, बायोगॅास सयंत्र निर्मिती इ. कार्यक्रमाच्या माध्यमाने दारिद्रय हटविण्याचा प्रयत्न करण्यात आला.

**५. किमान गरजा कार्यक्रम** (Minimum Needs Programme )

पाचव्या योजनेत 'गरीबी हटावो' कार्यक्रमांतर्गत किमान गरजा कार्यक्रम राबविला गेला. दारिद्रय रेषेखालील जीवन जगणाऱ्यांची उपभोग पातळी व राहणीमान वाढविण्यावर भर देण्यात आला. त्यादृष्टिने त्याना प्राथमिक शिक्षण, आरोग्य, पिण्याचे पाणी, निवारा वीज, या सुविधा देण्यात आल्या. झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन, पोषक आहार यासाठी पाचव्या योजनेत १०३८ कोटी रु. खर्च करण्यात आले. १९७८ ते ८० या सरकत्या योजना काळात ११४७ कोटी रु. खर्च करण्यात आले. तर सहाव्या योजनेत ३०६४.९ कोटी रु. खर्च करण्यात आले. ७६८८ ग्रामीण आरोग्य केंद्रे सुरु करण्यात आली. ९९६५ खेड्यांत पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली. २४ लाख ग्रामीण लोकांना घरे देण्यात आली. पुढे १९८० ते १९८३ या तीन वर्षात ३.७७ दशलक्ष झोपडपट्टी वासींयाचे पुनर्वसन करण्यात आले.

**६. अवर्षण क्षेत्र कार्यक्रम** (DPAP) (Drought Prone Area Programme)

दारिद्रय निर्मुलनाचा एक दीर्घकालीन उपाय म्हणून चौथ्या योजनेच्या अखेरीस (१९७३ पासून) दुष्काळी भागासाठी हा कार्यक्रम राबविण्यात आला. या भागातील लोकांना अवर्षण संकटापासुन कायमचे मुक्त करणे, तेथील उपलब्ध साधनांचा पूर्ण कार्यक्षमतेने वापर करणे. पडिक जमीन लागवडीयोग्य बनविणे, दुष्काळी भाग विकसीत करण्यासाठी योग्य व पूरक तंत्रज्ञान विकसित करणे, त्याचबरोबर जल व्यवस्थापन, पीक रचनेत बदल, सामाजिक वनीकरण पशुधन विकास, दुग्ध विकास, दुय्यम व्यवसायांचा विकास असे विविध कार्यक्रम राबविण्यात आले. १९८५-८६ मध्ये १३ राज्यातील ९१ जिल्हयात हा कार्यक्रम राबविण्यात आला. ५.५ लाख हेक्टर जमिन ओलिताखाली आणली. ८.५ लक्ष हेक्टर क्षेत्रात वृक्षारोपन करण्यात आले. या कार्यक्रमावर ६ व्या योजनेत ३७७. ४ कोटी रु. खर्च करण्यात आले. तसेच १९९० ते ९२ या काळात १०२२.३ कोटी रु खर्चाची तरतूद करण्यात आली.

**७. वाळवंटी विकास कार्यक्रम** (DDP) (Desert Development Programme )

भारतीय शेती आयोगाच्या सिफारसीनुसार १०७७ मध्ये राजस्थान, हरियाना, गुजरात, जम्मू - काश्मीर व हिमाचल प्रदेश या पाच राज्यातील २१ जिल्ह्यात वाळवंटी भागाच्या विकासासाठी हा कार्यक्रम जाहीर करण्यात आला. त्यात पाण्याचे व्यवस्थापन, पशुचारा निर्मिती, पर्यावरण संतुलन इ. कार्यक्रमावर भर देण्यात

आला.  या कार्यक्रमावर सरकारने पाचव्या व सहाव्या योजनेत अनुक्रमे ७३.५५  कोटी रु. व १०० कोटी रु. खर्च केले.

**८. अंत्योदय योजना :–**

ग्रामीण भागातील अत्यंत गरीब असणाऱ्या लोकांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा व्हावी या उद्देशाने ही योजना १९७७ मध्ये कार्यान्वित करण्यात आली.  निवड केलेल्या ग्रामीण गरजू गरीबांसाठी सरकारने जमीन, रोजगार  व अन्न उपलब्ध करुन घ्यावयाचे, घर बांधणी साठी आर्थिक मदत करावयाची असी ही योजना होती.  हा कार्यक्रम राजस्थान, उत्तरप्रदेश बिहार, प. बंगाल व केरळ या राज्यांमध्ये राबविण्यात आला.

**९. भटक्या जनजाती विकास योजना :**

पाचव्या पंचवार्षिक योजनेत प्रथमत:च मागास जनजातीसाठी खास विकास कार्यक्रम कार्यान्वित करण्यात आले.  देशातील १६ राज्यात  व २ केंद्रशासित प्रदेशात ही योजना राबविली  गेली.  भटक्या जनजाती विकास कार्यक्रमाचे १८० उपविभाग करण्यात आले.  या कार्यक्रमांतर्गत भटक्या शेतकऱ्यांना जमिनीचे वाटप, लघु जलसिंचन मृदूसंधारण कामे,  वृक्षारोपण जलपुरवठा ग्रामीण विद्युतीकरण या योजना राबविण्यात आल्या.

**१०. एकात्मीक ग्रामीण विकास कार्यक्रम :–** (IRDP)

हा कार्यक्रम सुरुवातीस १९७८ – ७९ मध्ये  निवडक जिल्हयातील २३०० विकास गटात राबविण्यात आला.  परंतु २ ऑक्टोबर १९८० पासून संपूर्ण  देशासाठी हा कार्यक्रम कार्यान्वित करण्यात आला.  ग्रामीण दारिद्र्य व बेकारी कमी करण्यासाठी व्यापक पातळीवर  या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात आली. ग्रामीण दारिद्र्य निर्मुलन करणे, तेथील नैसर्गिक साधनांचा  पर्याप्त वापर करणे,  छोटे शेतकरी व भूमीहीन शेतमजूरांना साहाय्य करणे, दुर्बल घटकांचे राहणीमान उंचावणे, मागास भागाच्या विकासाची चालना देणे इ. उद्दीष्टांच्या पूर्ततेसाठी हा कार्यक्रम सुरु करण्यात आला.  या कार्यक्रमांतर्गत  रासायनिक खेते सुधारीत बी – बियाणे, जलपुरवठा शेती उपयुक्त साधने, इ. साठी अनुदान दिले जाते.  तसेच मत्सव्यवसाय, पशुपालन, कुकुट पालन, दुग्धव्यवसाय, रेशीम उत्पादन हे व्यवसाय, सुरु करण्यासाठी आर्थिक मदत दिली जाते. १९८० ते १९८५ या काळात या कार्यक्रमावर ४७६२ कोटी रु. खर्च करण्यात आले.  त्याचा लक्षावधी ग्रामीण कुटुंबाना फायदा झाला.  १९९८–९९ पर्यत यावरील खर्च १३७०० कोटी रु. होता.  याचा ५३.५० लाख ग्रामीण कुटुं बाना लाभ झाला.

**११. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम** (NREP ) (National Rural Employment Programme )

१९८० मध्ये हा कार्यक्रम सुरु करण्यात आला.  ग्रामीण भागातील साधन सामुग्रीचा पूर्ण कार्यक्षमतेने वापर करुन कायम स्वरुपी सामायीक मालमत्ता निर्माण करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होय.  या अतंर्गत विहीरी व कालव्यांचे खोदकाम, शाळा, आरोग्य केंद्रे, सामाजिक वनीकरण  यासारखी कामे हाती घेतली जातात.  या  कार्यक्रमामुळे ग्रामीण श्रमीकांना किमान वेतनाची शाश्वती मिळाली.  ग्रामीण रोजगारात वाढ झाली या कार्यक्रमावर सहाव्या व सातव्या योजनेत अनुक्रमे १८३४ कोटी व २४८७.२ कोटी रु. खर्च करण्यात आले.  १९८८–८९ मध्ये  ९०२ कोटी रु. खर्च करण्यात आले.  या कार्यक्रमामुळे ग्रामीण दारिद्र्य दूर होण्यास मदत झाली.

**१२. ग्रामीण भूमीहीन रोजगार हमी कार्यक्रम** (RLEGP) (Rural Landless Employment Guarantec Programme )

ग्रामीण भूमीहीन शेतमजूरांना रोजगार देण्यासाठी हा कार्यक्रम १५ ऑगस्ट १९८३ रोजी सुरु करण्यात आला. या कार्यक्रमातंर्गत शेतमजूरांना रोजगार देवून त्यांचे राहणीमान सुधारण्याकडे लक्ष दिले जाते. या कायक्रमावरील खर्चासाठी केंद्र सरकार १०० टक्के अनुदान देते. १९८५-८६ पर्यत या कार्यक्रमावर ४५३.२ कोटी रु. खर्च करण्यात आले. १९८८-८९ मध्ये ६६९. ६ कोटी रु. खर्च करण्यात आले.

**१३. जवाहर रोजगार योजना** (JRY)

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम (NREP) आणि ग्रामीण भूमीहीन रोजगार हमी कार्यक्रम (RLEGP) याचे एकत्रिकरण करुन एप्रील १९८९ मध्ये ''जवाहर रोजगार योजना'' सुरु करण्यात आली. ग्रामीण बेकार व अर्धबेकारांना रोजगार मिळून देणे, ग्रामीण गरिबांचा अर्थिक स्तर उंचावणे, शेतीस पूरक जोड उद्योगांचा विकास साधने, ग्रामीण दारिद्रय दूर करणे, ही उद्दिष्टे अत्यंत प्रभावी पणे राबविण्यासाठी जवाहर रोजगार योजना कार्यान्वीत करण्यात आली. या योजनेमध्ये अनुसूचित जाती जमाती मधील लोकांना व स्त्रीयांना विशेष प्राधान्य दिले जाते. या योजनेत उपलब्ध रोजगारातील ३० टक्के हिस्सा स्त्रियांसाठी राखीव ठेवला जातो. या योजनेतून सामाजिक वनीकरण, वनशेती, भूसंधारण, विहीरी व तलावे खोदकाम, रस्ते बांधणी, शाळा व दावाखाने इत्यादी साठी इमारत बांधणी इ. कामे पूर्ण केली जातात. १९८९-९० ते ९३-९४ या पाच वर्षात या योजनेवर सरकारने ११०७२ कोटी रु. खर्च केले. १९९९ अखेर या योजनेव्दारे १२ लाख विहीरी खोदण्यात आल्या. तसेच इंदिरा विकास योजनेअतंर्गत ६८ लाख घरे बांधण्यात आली. या योजनेत रोजगारातून दारिद्रय कमी करण्याचा प्रयत्न केला आहे.

**१४. पंतप्रधान रोजगार योजना**

ही योजना सुशिक्षित तरुणांना स्वयंरोजगारासाठी सहाय्य करण्याच्या उद्देशाने ऑक्टोबर १९९३ मध्ये सुरु करण्यात आली. या योजनेतून १९९३ ते ९५ या काळात २.२६ लाख तरुणांना स्वयंरोजगार सुरु केला. १९९५-९६ मध्ये ५.५ लाख तरुणांनी स्वयंरोजगार सुरु केला.

**१५. पंतप्रधान एकात्मिक शहरी दारिद्रय निर्मुलन कार्यक्रम** (PMIVPEP)

केंद्रसरकारी शहरी दारिद्रय दुर करण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम १९९५-९६ मध्ये जाहीर केला. आणि पुढील पाच वर्षासाठी ८०० कोटी रु. ची तरतुद केली.

**१६. स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना** (SGSY)

एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम (IRDP), ट्रायसेम (तरुणांच्या स्वयंरोजगारासाठी प्रशिक्षण) स्त्रिया व बालकांसाठी विकास योजना (DWCRA) आणि MWS या सर्व योजना एका छता खाली आणून 'स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना' १९९९ पासून आमलात आणली आहे.

**१७. संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना** (SGRY)

ही योजना केंद्र सरकारने सप्टेंबर २००१ मध्ये सुरु केली असून या योजनेत पूर्वीच्या जवाहर ग्राम समृध्दी योजना (JGSY) व आश्वासित रोजगार योजना (AES) या दोन योजनांचे एकत्रीकरण करण्यात आले आहे. ग्रामीण भागात अन्न सुरक्षा व वेतन रोजगार उपलब्ध करुन देणे हा प्रमुख उद्देश या योजनेचा आहे. ही योजना ग्रामीण अकुशल श्रमिकांना वर्षभरात किमान १०० दिवसाचा रोजगार उपलब्ध करुन देते.

**१८. मध्यान्हीचा जेवण कार्यक्रम** (Mid Day Meal Programme)

केंद्र सरकारने पहिली ते पाचवी पर्यतचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यासाठी दुपारचे मोफत जेवण देण्याची योजना सुरु केली आहे.

**१९. अंत्योदय अन्न योजना :**

केंद्रसरकारने २००२ पासून अत्यंत गरीब कुटुंबाना अन्न पुरवठा करण्याच्या हेतूने ही योजना सुरु केली आहे. या योजनेचा लाभ देण्यासाठी देशातील अत्यंत गरीब अशा ६० लाख कुटुंबाची निवड केली आहे. त्याना प्रति किलो २ रु. दराने गहु व ३ रु दराने तांदुळ उपलब्ध करुन दिला जातो.

वरील व्यापक कार्यक्रमाशिवाय दारिद्रय निर्मुलना साठी महिला समृध्दी योजना (ऑक्टोबर १९९३), वृदासाठी नॅशनल सोशल असिस्टंट प्रोग्रॅम (ऑक्टोबर १९९५) नवीन रोजगार निर्मिती योजना (सप्टेंबर १९९३ ) अन्न पूर्ण योजना याही योजना सुरु करण्यात आल्या आहेत. भारत सरकारने दारिद्रय निर्मुलनासाठी वरील विविध मार्गानी प्रयत्न करीत आहे. अद्यापही देशातील एकूण लोकसंख्येच्या २५ टक्के लोकसंख्या दारिद्रयेरेषेखाली आहे. अलिकडील काळात भारतातील ६ कोटी ५२ लाख कुटुंबे दारिद्रयरेषेखाली आहेत.

## ४.६ उत्पन्न व संपत्तीतील विषमता (Inequality of Income and Wealth)

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आणि विशेषत: अलिकडील वीस वर्षाचा काळात भारताच्या उत्पन्न व संपत्तीतील विषमतेत लक्षणीय वाढ झाली आहे. प्रा. कु झनेटस् यांच्या मते, आर्थिक विकासाच्या प्रारंभीच्या काळात उत्पन्नातील विषमता अधिक राहते. आर्थिक विकासाच्या वेगातील वाढीबरोबर उत्पन्नातील विषमता घटत जाते. आर्थिक विकासाचे लाभ गरीब वर्गातील लोकांपर्यत झिरपत जातात. प्रा. आर्थर लेविस यांच्या मते, विकासाच्या सुरवातीच्या अवस्थेत अधुनिक (उद्योग व सेवा) क्षेत्राची पारंपारिक (शेती) क्षेत्रापेक्षा वेगाने वाढ होते. आधुनिक क्षेत्राच्या राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्साही वाढतो. त्यामुळे उत्पन्नातील विषमता वाढते. पण दिर्घकाळात सर्वत्र रोजगारसंधी निर्माण होतात. पारंपारिक क्षेत्राचाही विकास होतो. उत्पन्नातील विषमता कमी होण्यास मदत होते.

भारतात ग्रामीण व शहरी भागात उत्पन्नातील विषमता अधिक आहे. १९९१ मध्ये ग्रामीण भागाचा विचार करता ५१ टक्के ग्रामीण कुटुंबाकडे केवळ १० टक्के मालमत्ता होती. तर उच्च स्तरातील ९.६ टक्के कुटुंबाकडे ४८.८ टक्के मालमत्तेचे केंद्रीकरण झाले होते. ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरी भागातील आर्थिक विषमतेचे चित्र आणखी गंभीर दिसते. १९९१ मध्ये भारतातील शहरी भागात ५०.७ टक्के कुटुंबाकडे केवळ ६.७ टक्के मालमत्ता होती तर उच्च स्तरातील १४.२ टक्के कुटुंबाकडे ६५.८ टक्के मालमत्तेचे केंद्रीकरण झाले होते. यावरुन शहरी भागातील आर्थिक विषमतेची भीषणता स्पष्ट होते.

**४.६ अ. भारतातील उत्पन्नातील विषमतेची कारणे :**

स्वातंत्र प्राप्तीनंतरच्या काळात भारतातील उत्पन्नातील विषमता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. लोकसंख्येच्या क्षमतेतील फरकामुळे ही विषमता वाढली आहे. हे वरवर बरोबर वाटत असले तरी नेमक्या त्याच कारणांमुळे ही विषमता वाढलेली नाही हे तितकेच खरे आहे. भारतातील उत्पन्नातील विषमतेस दोन मूलभूत कारणे जबाबदार ठरतात. ती म्हणजे खाजगी मालमत्तेच्या हक्क आणि वारसाहक्क कायदा उत्पन्नातील या तिव्र विषमतेमुळे बहुसंख्य गरीब जनतेला आपल्या मुलभुत गरजा सुध्दा भागविणे कठिण झाले आहे. भारतातील उत्पन्न व संपत्तीतील विषमतेस जबाबदार असणाऱ्या कारणांची पुढीलप्रमाणे चर्चा करता येईल.

**१. दारिद्रय :**

भारतासारख्या विकसनशील राष्ट्रात दारिद्रयाच्या दुष्टचक्रामुळे (Vicious Circle of Poverty ) उत्पन्नातील विषमता वाढली आहे. उत्पन्न कमी असल्यामुळे बहुसंख्य जनतेला अर्धपोटी राहावे लागते. उष्मांक कमी मिळाल्यामुळे त्याना कार्यक्षमतेने काम करता येत नाही. अर्थात गरीब बहुसंख्य जनतेची

कार्यक्षमता कमी राहील्याने मिळणारे उत्पन्न कमी, उपभोग कमी, परिणामी राहणीमान दर्जा निकृष्ठ प्रतिचा राहतो. दारिद्रयामुळे गरीब वर्गाला शिक्षण, प्रशिक्षण घेवून आपले कौशल्य वाढविता येत नाही. कार्यक्षमता वाढवता येत नाही. त्यामुळे गरीब जनता गरीबच राहिली असून उत्पन्नातील विषमता वाढली आहे.

**२. बेकारी :**

भारतातील लोकसंख्या वेगाने वाढली आहे. त्याबरोबर काम मागणाऱ्यांची संख्या सुध्दा वाढली परंतु मागासलेली शेती व मंद औद्योगिक विकास या प्रमुख दोन कारणांमुळे हव्या त्या प्रमाणात रोजगारसंधी वाढली नाही. त्यामुळे भारतात बेकारी, अर्धबेकारी, हंगामी बेकारी, सुप्त बेकारी, सुशिक्षितांतील बेकारी, औद्योगिक बेकारी वाढत गेली आहे. काम करुन उत्पन्न मिळविण्याची इच्छा व कुवत असताना सुध्दा रोजगार संधी न मिळाल्यामुळे हा वर्ग गरीबच राहिला आहे. परिणामी आर्थिक विषमता तिव्र बनली आहे.

**३. लोकसंख्या वाढ :**

स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय लोकसंख्येत झालेल्या प्रचंड वाढीमुळे उत्पन्नातील विषमता वाढली आहे. १९५१ साली ५४.१ कोटी असणारी लोकसंख्या २००१ च्या शिरगणतीनुसार १०२.७ कोटी झाली. ही लोकसंख्येची वाढ विशेषत: गरीब कुटुंबामध्येच झाली असल्याने गरीब कुटुंबाच्या दरडोई उत्पन्नात आणखी घट झाली आहे. याचा अर्थ वाढत्या लोकसंख्येमुळे गरीब वर्ग आणखी गरीब बनल्याने उत्पन्नातील विषमाता वाढली आहे.

**४. मंद आर्थिक विकास :**

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताने आर्थिक नियोजनाच्या सहाय्याने आर्थिक विकासाला प्रारंभ केला. पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून अनेक विकास प्रकल्प हाती घेण्यात आले. परंतु विकासाचा वेग फारसा वाढला नाही. १९९१ नंतर स्विकारलेल्या नवीन आर्थिक धोरणांमुळे विकासाचा वेग वाढला आहे. आणि स्थूल देशांतर्गत उत्पादन वाढीचा दर ६ ते ८ टक्केपर्यत वाढला आहे. असे असले तरी १९९० पर्यतच्या ४० वर्षाच्या नियोजन काळात स्थूल देशांतर्गत उत्पादन प्रतिवर्षी सरासरी ३.५ टक्के दराने वाढले आणि लोकसंख्या प्रतिवर्षी सरासरी २.१ टक्के दराने वाढली. परिणामी दरडोई उत्पन्नात अपेक्षित वाढ झाली नाही. दरिद्री वर्ग दरिद्रीच राहिल्याने श्रीमंत व गरीब वर्गातील आर्थिक दरी संदावत गेली.

**५. भाववाढ :**

पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस भारतात भाववाढीस प्रारंभ झाला. विशेषत: १९७० नंतर भारतात भाववाढीची गंभीर समस्या निर्माण झाली. सर्वसाधारण किंमतपातळी वाढल्यामुळे शेतमजूर व कामगार वर्गाचे वास्तव उत्पन घटले आहे. याउलट या भाववाढीमुळे मोठे शेतकरी, उत्पादक, व्यापारी, सट्टेबाजी वर्ग, दलाल इ. चा फायदा झाला असून त्यांच्या उत्पन्नात मोठी वाढ झाली आहे. अर्थात भाववाढी मुळे भारतात श्रीमंतवर्ग अधिक श्रीमंत बनला आहे तर गरीब वर्ग अधिक गरीब बनला आहे. त्यामुळे उत्पन्नातील विषमता वाढली आहे.

**६. कर्जपुरवठ्याच्या सवलतीत विषमता –**

संपत्ती वाटपातील विषमता व कर्ज पुरवठ्याच्या सवलतीतील विषमता यामुळे उत्पन्नातील विषमता आणखी तीव्र बनली आहे. व्यापारी व उत्पादक वर्गाची भांडवल बाजारात पत मोठी असल्याने त्याना अल्पदारत मोठे भांडवल उपलब्ध होते. त्या भांडवलाची गुंतवणूक करून हा वर्ग प्रचंड उत्पन्न मिळवितो.

याउलट गरीब वर्गाची पत नसल्यामुळे त्याना कर्जे मिळत नाहीत. कर्जे मिळाली तरी ती सावकार व सराफी पेढीवाल्यांकडून मिळतात. त्यांचा व्याजदर मोठा असल्याने गरीब वर्गाची आर्थिक पिळवणूक होते. गरीब वर्ग आणखी गरीब बनतो. भारतात अशा प्रकारच्या कर्ज पुरवठ्याच्या सवलती तील विषमतेमुळे उत्त्पन्नातील विषमता वाढली आहे.

**७. खाजगी गुंतवणुक शहराकडे :**

सन २००१ च्या शिरगणतीनुसार ७२.२२ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात तर २७.७८ टक्के लोकसंख्या शहरी भागात आहे. असे असताना सुध्दा भारतातील एकूण खाजगी गुंतवणूकीच्या ७० टक्के हिस्सा शहरी भागात गुंतविला जातो. ही गुंतवणूक भांडवलप्रधान असल्याने यांत्रिकीकरण झालेल्या उद्योगातील गुंतवणूक वाढत जाते. त्यातून जे निव्वळ उत्पन्न मिळते त्यात वेतनहिस्सा कमी व नफ्याच्या हिस्सा अधिक राहतो. परिणामी कामगार वर्गाचे उत्पन्न कमी राहते. उत्पादक वर्गाचे उत्पन्न वाढत जाऊन आर्थिक विषमता तीव्र बनते.

**८ सार्वजनिक गुंतवणूक :**

भारतात आर्थिक विकासाच्यादृष्टिने सरकारकडून सुध्दा मोठी गुंतवणूक केली जाते. परंतु या सरकारी गुंतवणूकीचा फायदा मुळात श्रीमंत असणाऱ्या खाजगी गुंतवणूक दारानाच मिळतो. सरकारी धोरणे सुध्दा श्रीमंत वर्गाच्या हिताची असतात. सरकार सामाजिक कल्याण साध्य करण्याच्या उद्देशाने शिक्षण, आरोग्य, सामाजिक सुरक्षितता, सार्वजनिक घरबांधणी यावर मोठा सार्वजनिक खर्च करते. याचाही फायदा गरीब वर्गाच्या तुलनेत श्रीमंत वर्गास अधिक मिळतो. त्यामुळे उत्पन्नातील विषमता आणखी तीव्र बनते.

**९. करचुकवेगिरी : –**

करचुकवेगिरी हे भारतातील उत्पन्न व संपत्तीतील विषमतेचे महत्वाचे कारण आहे. असे महालनोबिस समितीने म्हटले आहे. श्रीमंत वर्गाच्या उत्पन्नावर सरकार प्रत्यक्ष कर आकारते. प्राप्तीकर आकारते. परंतु श्रीमंत लोक पळवाटा शोधून चुकीचे उत्पन्न दाखवून कर चुकवितात. आणि जवळ काळा पैसा वाढवितात. याऊलट वेतन रुपाने उत्पन्न मिळविणाऱ्या श्रमिक वर्गास आपले उत्पन्न दडविता येत नाही. प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर चुकविता येत नाहीत. परिणामत: उत्पन्नातील विषमता आणखी वाढली आहे.

**१०. भांडवल प्रधान तंत्राचा वाढता वापर :**

जलद आर्थिक विकास साधण्यासाठी व उत्पादकता वाढविण्यासाठी भारतात खाजगी व सार्वजनिक क्षेत्रात अलिकडील काळात भांडवलप्रधान उत्पादन तंत्राचा वापर वाढला आहे. परंतु प्रचंड लोक संख्येमुळे श्रम पुरवठा मोठा आहे. काम मागणाऱ्यांची संख्या मोठी आहे. पण आंतरराष्ट्रीय स्पर्धेत टिकण्यासाठी व जलद आर्थिक विकासासाठी भांडवलप्रधान तंत्रावर अधिक भर दिला जात आहे. श्रमिकांची कामे यंत्रे करु लागली आहेत. त्यामुळे बेकारी वाढत आहे. काम मागणारा वर्ग गरीब बनत आहे तर दुसऱ्या बाजूस अधुनिक (भांडवलप्रधान) तंत्राचा वापर करणारा मात्र श्रीमंत बनत आहे. त्यामुळे उत्पन्नातील विषमता वाढली आहे.

**११. खाजगी मालमत्तेचा हक्क :**

भारतात संमिश्र अर्थव्यवस्था आहे. या अर्थव्यवस्थेत लोकांना खाजगी मालमत्तेचा हक्क आहे. खाजगी मालकी हक्का मुळे अर्थव्यवस्थेत दोन वर्ग निर्माण झाले आहेत. ते म्हणजे उत्पादन साधनांची मालकी असणारा भांडवलदार वर्ग आणि केवळ श्रमाची विक्री करणारा कामगार वर्ग. उत्पादन साधनांची मालकी

असणारा वर्ग त्या उत्पादन साधनांच्या जोरावर अति श्रीमंत बनला आहे. कामगार वर्ग मात्र गरीबच राहिला आहे. अशाप्रकारे भारतात खाजगी मालकी हक्कामूळे उत्पन्नातील विषमता वाढली आहे.

### १२. वारसा हक्क कायदा (Inheritance Law)

भारतातील वारसाहक्क कायद्यानुसार व्यक्तीची मालमत्ता ही त्या व्यक्तीच्या मुलांना मिळते. त्यामुळे मोठे उत्पादक, व्यापारी, मोठे शेतकरी अशा श्रीमंत लोकांची मालमत्ता वारसा हक्क ा नुसार त्यांच्या वारसदाराना मिळते. त्यामुळे मुळात श्रीमंत असणारा वर्ग श्रीमंतच राहतो. याऊलट गरीब लोकांच्या वारसदारांच्या पदरी वारसाहक्कानुसार दारिद्रयच येते. अशाप्रकारे भारतात वारसाहक्क कायद्यामुळे उत्पन्नातील विषमता वाढली आहे. आणि या विषमतेला कायदेशीर आधार सुध्दा मिळाला आहे.

वरील विविध कारणांमुळे भारतात उत्पन्न व संपत्तीतील विषमता वाढली आहे.

### ४.६ ब उत्पन्नातील विषमता कमी करण्यासाठी सरकारकडून करण्यात आलेल्या उपाययोजना :–

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सुरवातीच्या काळात देशाच्या विकासाबरोबर गरीब वर्गाचे उत्पन्न वाढेल त्यामुळे उत्पन्नातील विषमता वाढणार नाही असी सरकारची धारणा होती. त्यामुळे उत्पादन साधनांच्या वाटपावर सरकारने फारसे लक्ष दिले नाही. परिणामी उत्पन्नाचे केंद्रीकरण ठराविक लोकांकडे होवून उत्पन्नातील विषमता वाढली. म्हणून सरकारने उत्पन्नातील विषमता कमी करण्यासाठी पुढीलप्रमाणे धोरणात्मक उपायांची अंमलबजावणी केली आहे.

### ब. १ जमीन सुधारणा व शेतजमीनीचे फेर वाटप : –

भारतीय अर्थव्यवस्थेत ग्रामीण जनतेचे उत्पन्नाचे प्रमुख साधन म्हणजे शेती होय. स्वातंत्र्य पूर्व काळात जमिनदारी पध्दतीमुळे शेतजमिनीचे केंद्रीकरण ठराविक जमिनदारांच्या हाती झाले होते. त्यामुळे शेतीत प्रत्यक्ष राबणाऱ्यांना निर्वाहापुरते सुध्दा उत्पन्न मिळत नव्हते. म्हणून सरकारने कायद्याने जमिनदारी पध्दत नष्ट केली. आणि प्रत्येकाच्या मालकीची किती शेतजमीन असावी याबाबत कमाल जमिनधारणा कायदे करण्यात आले. परंतु त्या कायद्याची कडकपणे अमलबजावणी झाली नाही. त्याचा परिणाम म्हणूनच अध्यापही ग्रामीण भागात ५ टक्के कुटुंबाकडे ४० टक्के जमिनीची मालकी आहे. म्हणूनच केवळ शेतजमीनीचे पुनर्वाटप करुन दारिद्र्याचा व विषमतेचा प्रश्न सुटणार नाही. असे मत डॉ. दांडेकर व डॉ. रथ यांनी मांडले आहे. ग्रामीण भागातील उत्पन्नातील विषमतेचा प्रश्न सोडविण्यासाठी शेती आधारित ग्रामीण उद्योगांवर अधिक भर देणे आवश्यक आहे.

शेती सुधारणेचा एक भाग म्हणून भारत सरकारने २००८ पर्यत शेतकऱ्यांना बँकाकडून मिळालेली ७१००० कोटी रुपयांची कर्जे माफ केली आहेत. आणि शेती विकासामध्ये २५००० कोटी रुपयाची गुंतवणूक करण्याचे निश्चित केले आहे.

### २. मक्तेदारी व प्रतिबंधात्मक व्यापारी प्रवृत्तीवर नियंत्रण : (Control over Monopolies and Restrictive Trade Practices)

एखाद्या उद्योगात मक्तेदारी निर्माण झाली असता मक्तेदार प्रचंड प्रमाणात फायदा मिळवू शकतो. त्यामुळे औद्योगिक क्षेत्रातील विषमता वाढू शकते. याचा विचार करुन भारत सरकारने १९६९ मध्ये अशा मक्तेदारी व प्रतिबंधात्मक व्यापारी प्रवृत्ती व नियंत्रण ठेवणारा कायदा समंत केला. या कायद्यानुसार सरकारला मक्तेदारीवर नियंत्रण ठेवण्याचे व प्रतिबंधक व्यापारी प्रवृत्ती रोखण्याचे अधिकार प्राप्त झाले. परंतु प्रत्यक्षात दत्त कमिटीने स्पष्ट केल्याप्रमाणे या कायद्याची कार्यक्षमतेने अमलबजावणी झाली नाही. सरकारी उपाय

निष्प्रभ ठरले आहेत. परिणामी औद्योगिक क्षेत्रात औद्योगिक केंद्रीकरण वाढत गेले आहे. अलिकडेच १९९१ पासून स्विकारलेल्या उदारीकरण धोरणामुळे सुध्दा मक्तेदारी प्रवृत्ती वाढली असून उत्पन्नातील विषमता वाढली आहे. अर्थात या कायदयान्वये लघू व कुटिरोद्योंगना प्रोत्साहन देण्यात सरकारला अपेक्षित यश मिळाले नाही.

**३. रोजगार व वेतनविषयक धोरण :**

भारतात नियोजनकारांनी १९७० पर्यत रोजगाराविषयक निश्चित धोरण राबविले नाही. परंतु चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या सुरवातीपासूनच ग्रामीण रोजगार धडक योजना, दुष्काळी भागासाठी कार्यक्रम, अभियंत्यासाठी स्वयंरोजगार योजना, सुशिक्षितांसाठी रोजगार योजना, कामाच्या कार्यक्रमासाठी अन्न योजना (food for work programme) असे काही विशेष कार्यक्रम सुरु करण्यात आले. परंतु हे कार्यक्रम अल्पकाळ टिकले. सहाव्या योजना काळात सरकारकडून एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम (IRDP), राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम (NREP), ग्रामीण भूमिहीन रोजगार कार्यक्रम (RLEGP ) अशा विविध योजना कार्यान्वित करण्यात आल्या. १ एप्रील १९८९ रोजी एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम व ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी कार्यक्रम या योजनांचे एकत्रिकरण करुन जवाहर रोजगार येजना (JRY) सुरू करण्यात आली. या विविध योजना सुरु करण्यामागे ग्रामीण बेरोजगारी कमी व्हावी व त्यातून उत्पन्नातील विषमता कमी व्हावी हा मुख्य उद्देश्य होता. परंतु या योजनांची अंमलबजावणी योग्य पध्दतीने झाली नाही.

उत्पन्नातील विषमता कमी व्हावी यासाठी भारत सरकारने किमान वेतन कायदे पास केले. परंतु त्याची सीमा अत्यंत मर्यादीत आहे. कारण भारतात सध्या एकूण लोकसंस्थेच्या केवळ १० टक्के लोकच संधटित क्षेत्रात काम करतात. तेवढ्याच लोकांना या कायद्यांचा लाभ मिळतो. परंतु ग्रामीण शेतमजूरांचा असंघटितपणा त्यांची प्रचंड संख्या, विस्तृत भागातील आस्तित्व, नेतृत्वाचा अभाव, जमिन मालकांचा प्रभाव कायद्याबाबतचे अज्ञान यामुळे शेतमजुरांना किमान वेतन कायद्याचा लाभ मिळालेला नाही. केवळ संघटित क्षेत्रातील कामगारांनाच या कायद्याचा लाभ मिळाला आहे. त्यामुळे त्यांच्या उत्पन्नात अलिकडील काळात मोठी वाढ झाली आहे.

**४. सामाजिक सुरक्षिततेच्या उपायायोजना :**

भारतात सामाजिक सुरक्षिततेच्या ज्या योजना आहेत त्यांचा लाभ संघटित क्षेत्रातील कामगारांना मिळतो. उदा. कामगार नुकसान भरपाई कायदा, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कायदा, कामगार राज्य विमा कायदा इ. कामगार नुकसान भरपाई कायद्यानुसार औद्योगिक कामगारास कामावर असताना अपघात, अपंगत्व अथवा मृत्यू आल्यास त्याना अथवा त्यांच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई मिळते. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कायद्यानुसार त्याना भविष्य निधीचा लाभ मिळतो. तसेच कामगार राज्य विमा कायद्यानुसार विमाधारक कामगारांना औषधोपचार, आजारपणाच्या काळात आरोग्य सुविधा तसेच स्त्री कामगारांना बाळंतपणाचे फायदे मिळतात. सामाजिक सुरक्षितता योजनेचे हे उपाय अत्यंत लाभदायक आहेत. सामाजिक सुरक्षितता योजनांमुळे उत्पन्नातील विषमता कमी होण्यास मदत झाली आहे.

**५. किमान गरजा कार्यक्रम** (Minimum Needs Programme)

१९७० च्या सुरवातीपासूनच विकसनशील देशात किमान गरजा कार्यक्रम राबविण्याची मागणी काही विकास अर्थशास्त्रज्ञ करीत आहेत. त्यांच्या मते विकासाचे फायदे तळापर्यत झिरपत आले पाहिजेत. पण तसे होत नाही. तसेच मूलभूत गरजांची पूर्तता आणि आर्थिक वाढ ही दोन्ही उद्दिष्ये परस्पर पुरक आहेत. म्हणून सहाव्या पंचवार्षिक योजनेपासून भारतात किमान गरजा कार्यक्रम राबविला जात आहे. या कार्यक्रमामुळे

मानवी श्रम अधिक कार्यक्षम होतील अची अपेक्षा आहे. हा कार्यक्रम म्हणजे मानवी साधनसंपत्तीतील गुंतवणूक आहे. त्यामुळे श्रमाची उत्पादनक्षमता वाढणार आहे. म्हणूनच या कार्यक्रमातंर्गत आवश्यक उपभोग्य वस्तूंचे वाटप ग्रामीण व शहरी भागातील गरीब वर्गामध्ये केले जात आहे. परंतु १९९१ पासून स्विकारलेल्या उदारीकरण धोरणामुळे सरकारने या कार्यक्रमाचा फारसा पाठपुरावा केलेला नाही असे दिसते.

**६. ग्रामीण गरीबांच्या सुधारणासाठी कार्यक्रम :–**

भारतात मुख्यता ग्रामीण भागात प्रचंड दारिद्रय आहे. भूमिहीन शेतमजूर, लहान शेतकरी, श्रीमंत शेतकरी ग्रामीण कारागीर अनूसुचित जाती जमाती इ. कुटुंबामध्ये अति गरीब लोक आढळतात. या गरीब वर्गाच्या उत्पन्नात वाढ व्हावी यासाठी विशेषत: ग्रामीण गरीबांसाठी साधन संपत्ती व उत्पन्न विकासाचे कार्यक्रम, विशेष क्षेत्रीय विकास कार्यक्रम, पुरक रोजगार निर्मितीसाठी कामाचे कार्यक्रम इ. वर सरकारने भर दिला आहे. तसेच सहाव्या व सातव्या योजनेपासून आणखी काही कार्यक्रमांची भर त्यामध्ये पडली आहे. गरीबी दूर करण्यासाठी सुरु केलेल्या विविध कार्यक्रमामध्ये निर्माण होणाऱ्या समस्या दूर करण्याच्या दृष्टिने 'एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम (IRDP) ही योजना सहाव्या पंचवार्षिक योजनेपासून राबविली जात आहे. गरीब माणसांची विविध मार्गानी मदत हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. एप्रील १९८९ मध्ये राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम, ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी कार्यक्रम आणि जवाहर नेहरु रोजगार योजना या तीन योजनांचे जवाहर रोजगार योजनेत (JRY) विलीनीकरण करण्यात आहे. या योजनेचे एप्रील १९९९ पासून जवाहर ग्राम समृध्दी योजना (JGSY) असे पुनर्नामकरण करण्यात आले आहे. ग्रामीण गरीबांना हात देण्यासाठी काही विशेष कार्यक्रम सुरू करण्यात आले आहेत. त्यातील महत्वाचे कार्यक्रम म्हणजे स्वयंजयंती ग्राम स्वरोजगार योजना व संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना हे होत. तसेच २ फेब्रुवारी २००६ पासून राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (NREGS) जाहीर झाली आहे. या कार्यक्रमान्वये गरीबांवर्गाचे वास्तव उत्पन्न वाढवून उत्पन्नातील विषमता कमी करण्याचा प्रयत्न आहे.

**७. प्रगतशील कर व्यवस्था :**

स्वातंत्र्योत्तर काळातील कारणामधील कर रचना अत्यंत प्रगतशील मानली जाते. प्रत्यक्ष करांचे प्रमाण मोठे असल्याने संपत्तीचे केंद्रीकरण टाळणे शक्य झाले आहे. भारतात वाढत्या उत्पन्नावर वाढत्या दराने कर आकाराणी, संपत्तीवर मालमत्ता कर, खर्च कर, अशी कर आकारणी करुन श्रीमंत वर्गाचे उत्पन्न काढून घेतले जाते. चैनीच्या (अनावश्यक) वस्तूंवर मोठी कर आकारणी केली जाते. तर गरीब वर्गाच्या दृष्टिने आवश्यक वस्तूंवर अत्यंत कमी कर आकारले जातात. उत्पन्नातील विषमता कमी करण्याचा हा एक उत्तम उपाय आहे. परंतु जो पर्यंत श्रीमंत वर्गाचे खरे उत्पन्न शोधून काढण्याचे मार्ग उपलब्ध होत नाहीत. तोपर्यत कर व्यवस्थेच्या मार्गाने उत्पन्नातील विषमता करण्यावर मर्यादा राहणार आहेत.

**८. श्रमप्रधान तंत्राच्या वापरावर भर :**

श्री निळकंठ रथ यांच्यामते, भारतासारख्या भांडवलाची कमतरता असणाऱ्या देशात श्रमप्रधान उत्पादन तंत्रावर अधिक भर देणे आवश्यक आहे. त्यामुळे बेकारांना व गरीबांना आपले उत्पन्न वाढविण्याची संधी प्राप्त होते. म्हणूनच भारत सरकारने ग्रामीण विकासाच्या बहुतेक योजनांमध्ये श्रमप्रधान तंत्राला प्राधान्य दिले आहे. त्यामुळे गरीबांचे उत्पन्न वाढून उत्पन्नातील विषमता कमी होण्यास मदत झाली आहे.

**९. लघू व कुटीरोद्योगांना उत्तेजन :**

उत्पन्नाचे केंद्रीकरण रोखण्यासाठी भारत सरकारने लघू व कुटीरोद्यांगाना उत्तेजन देण्याचे धोरण स्विकारले आहे. मोठ्या उद्योगामुळे उत्पन्नाचे केंद्रीकरण वाढते. मात्र लघू व कुटीरोद्यांगांच्या विकासामुळे

उत्पन्नाचे विकेंद्रीकरण होत जाते. या दृष्टीकोणातून श्रम प्रधान तंत्राचा वापर करुन सरकारने ग्रामीण औद्योगिकरणावर भर दिला आहे. शेतमालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांना खास सवलती दिल्या आहेत. या सरकारी धोरणामुळे गरीबांना उत्पन्न मिळविण्याचे साधन प्राप्त झाले आहे.

**१०. समतोल प्रादेशिक व क्षेत्रीय विकासाला प्राधान्य :**

प्रादेशिक व क्षेत्रीय विकासातील असमतोल हे उत्पन्नातील विषमतेचे एक महत्वपूर्ण कारण आहे. म्हणून सरकारने समतोल प्रादेशिक विकासासाठी मागासलेल्या भागात रेल्वे, रस्ते, पाणी, विज, इ. या मुलभूत सुविधा पुरविण्यावर भर दिला आहे. अशा भागातील उद्योगांना कर सवलती व अर्थिक मदत देवू केली आहे. तसेच समतोल क्षेत्रीय विकासासाठी मागासलेले शेती क्षेत्र विकसित करण्यावर भर दिला आहे. त्यासाठी सरकार शेतकऱ्यांना सवलतीच्या दराने पतपुरवठा, पाणी वीज इ. सोई उपलब्ध करून देणे, रासायनिक खते बी-बियाणे जंतूनाशके अल्पदराने पुरविणे या मार्गानी प्रयत्न करीत आहे. अलिकडील काळात अनेक शेतकऱ्यांना कर्ज माफीही दिली आहे. शेतकऱ्यांना बँकाकडून मिळालेली ७१००० कोटी रुपयाची कर्जे सरकारने माफ केली आहेत. या प्रयत्नामुळे उत्पन्नातील विषमता कमी होण्यास मदत झाली आहे.

**११. वाढत्या लोकसंख्येवर नियंत्रण :**

भारतातील वेगाने वाढणाऱ्या लोकसंख्येने उत्पन्नातील विषमतेत भर टाकली आहे. गरीब कुटुंबामधील संदस्य संख्या मोठी असते. म्हणून कुटुंबाचा आकार मर्यादित ठेवण्यासाठी भारत सरकारने १९६१ पासून लोकसंख्या नियंत्रणासाठी विविध धोरण स्विकारले आहे. मोफत कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया, अशी शस्त्रक्रिया करुन घेणाऱ्या व्यक्तीस अर्थिक मदत, दोन पेक्षा जास्त मुलांना शैक्षणिक सवलत न देते या उपायांचा अवलंब केला जात आहे. लोकसंख्येचे नियंत्रण झाल्यास उत्पन्नातील विषमता कमी होण्यास मदत होईल.

**१२. सार्वजनिक व सहकारी क्षेत्राचा विस्तार –**

सार्वजनिक क्षेत्र सरकारच्या पर्यायाने समाजाच्या मालकीचे असते. भारतात आर्थिक नियोजन स्विकारल्यानंतर सार्वजनिक क्षेत्र वाढले आहे. १९५१ मध्ये सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांची संख्या केवळ ५ होती. २००२ मध्ये ती संख्या २४० झाली आहे. या उद्योगातून मिळणारे नफारुपी उत्पन्न सामान्य लोकांच्या हितासाठी खर्च केले जाते. त्यामुळे सामान्य जनतेच्या वास्तव उत्पन्नात वाढ झाली आहे. सरकारच्या मदतीने भारतात सहकारी क्षेत्रात सुध्दा अनेक उद्योग विकसित झाले आहेत. सहकारी संस्थाना मिळणारा नफा सभासंदामध्ये वाटला जातो. सहकारामुळे दुर्बल घटकांचे आर्थिक हितसंबंध सुरक्षित होतात. परिणामी आर्थिक विषमता कमी होण्यास मदत होते.

वरीलप्रमाणे विविध उपाययोजनांचा अवलंब करुन भारत सरकार उत्पन्नातील विषमता कमी करण्याचा प्रयत्न करीत आहे. उत्पन्नातील विषमतेची तिव्रता कमी करण्यासाठी आणखी प्रभावी वित्तीय व इतर उपायांचा अवलंब करणे अपरिहार्य आहे.

## ४.७ काळा पैसा – कारणे व उपाय

### ४.७ अ. प्रास्ताविक :

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात वाढती लोकसंख्या दारिद्र्य, बेरोजगार, उत्पन्नातील वाढती विषमता या समस्यांबरोबर आणखी एका समस्येचे उग्र स्वरुप धारण केले आहे. ती समस्या म्हणजे काळ्या पैशातील प्रचंड वाढ ही होय. या समस्येचे भारतीय अर्थव्यवस्थेवर अनेक अनिष्ट परिणाम होत आहेत. काळ्या पैशाने

भारताच्या आर्थिक विकासावर मर्यादा आणल्या आहेत. हा काळा पैसा अर्थव्यवस्थेच्या स्थैर्याला धोका देणारा आहे. काळ्या पैशाच्या विस्तारामुळे भारतात समांतर अर्थव्यवस्था निर्माण झाली आहे. समांतर अर्थव्यवस्था नियंत्रित झाली नाही तर खरी अर्थव्यवस्था खिळखिळी झाल्याशिवाय राहणार नाही.

काळ्या पैशाच्या विस्तारामुळे सरकारी महसूल घटला आहे. उत्पन्नातील विषमता वाढली आहे. वाढलेला काळा पैसा अनावश्यक वस्तू खरेदीवर खर्च होत असल्याने वास्तव आर्थिक वाढीवर त्याचा प्रतिकूल परिणाम झाला आहे. वाढलेला काळा पैसा पांढरा करण्यासाठी भारतातून परदेशात भांडवलाचे उड्डाण वाढले आहे. १९९३ ते १९९५ या तीन वर्षात भारतातून अमेरिकेकडे ५७००० कोटी रु. एवढ्या भांडवलांचे उड्डाण झाले. काळ्या पैशामुळे आपली राजकीय पध्दत भ्रष्ट झाली आहे. अशाप्रकारे काळ्या पैशातील वाढीमुळे भारतीय नियोजित अर्थव्यवस्थेला विकृत स्वरुप प्राप्त झाले आहे. काळा पैसा नियंत्रित करण्यात भारत सरकारला फारसे यश प्राप्त झालेले नाही.

**४.७.ब काळा पैसा : अर्थ**

स्वार्थ साधण्यासाठी सरकारी कायद्यांचे उल्लंघन करुन लोक जो पैसा हिशेबात आणत नाहीत. त्यास काळा पैसा म्हणतात.

राजा चलैय्या यांच्या मते, ''उत्पन्नाचे एकत्रिकरण जे करपात्र आहे, परंतु कर अधिकारी मंडळाला त्याबद्दल अहवाल दिला जात नाही, किंवा दर्शविले जात नाही. त्या उत्पन्नास काळे उत्पन्न किंवा काळा पैसा असे म्हणतात.''

काळ्या पैशाला अर्थव्यवस्थेस काळी अर्थव्यवस्था, बेहिशेबी अर्थव्यवस्था, बेकायदेशीर अर्थव्यवस्था किंवा समांतर अर्थव्यवस्था म्हणून ओळखले जाते.

**४.७. क. भारतातील काळा पैसा :**

दुसऱ्या महायुध्दांनतर भारतीय अर्थव्यवस्थेत काळा पैसा वाढला आहे. याचे महत्वाचे कारण म्हणजे आवश्यक वस्तुंची टंचाई हे होय. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताने संमिश्र अर्थव्यस्थेचा पुरस्कार करुन तिच्या विकासासाठी आर्थिक नियोजन या साधनाचा अवलंब केला व सार्वजनिक क्षेत्राचा विस्तार करण्यावर भर देण्यात आला. परंतु या क्षेत्रात आवश्यक उपभोग्य वस्तू उत्पादनाऐवजी मुलभूत व अवजड उद्योग विकासावर भर देण्यात आल्याने काळ्या पैशाची निर्मिती वाढत गेली. काहींनी भारतातील काळ्या पैशाबाबतचे पुढीलप्रमाणे अंदाज व्यक्त केले आहेत.

**काल्डोर समिती :** काल्डोर समितीच्या अहवालानुसार भारतात १९५३-५४ मध्ये काळ्या पैशाचे प्रमाण ६०० कोटी रुपये एव्हढे होते ते तत्कालीन स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाच्या ६ टक्के इतके होते.

**वांच्छू समिती :** प्रत्यक्ष कराबाबत नेमलेल्या वाछू समिती च्या अहवालानुसार भारतात १९६१-६२ मध्ये काळे उत्पन्न ७०० कोटी रुपये होते ते १९६८-६९ पर्यत १४०० कोटी रुपयापर्यत वाढले त्याचे स्थूल राष्ट्रीय उत्पन्नासी प्रमाण ४.२ टक्के होते.

**डॉ. डी .के रांगणेकर :** हे वांछू समितीचे सदस्य होते. त्यांच्या मते वांछू समितीने काळ्या पैशाबाबतचा अंदाज कमी दर्शविला आहे. डॉ. रांगणेकरांच्या मते भारतात १९६१-६२ मध्ये काळ्या पैशाचे प्रमाण ११५० कोटी रुपये होते. ते १९६९-७० मध्ये ३०८० कोटी रुपयापर्यत वाढले. ते तत्कालीन स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाच्या ८.४ टक्के होते.

**डॉ. राजा चैलय्या –** यांच्या मते १९८०–८१ मध्ये भारतात २०३६२ कोटी ते २३६७८ कोटी रुपये एव्हढा काळा पैसा होता. तो १९८३–८४ पर्यत ३१५८४ कोटी ते ३६७८४ कोटी रुपयापर्यत वाढला त्याचे तत्कालीन स्थूल राष्ट्रीय उत्पन्नातील प्रमाण १८ ते २१ टक्के होते.

**पार्लमेंट स्थायी समिती :** या समितीच्या मते १९८०– ८१ च्या आधार किमतीनुसार भारतात १९९४–९५ मध्ये ३ लाख कोटी रुपये एव्हढा काळा पैसा होता. चालू किंमती नुसार तो ११ लाख कोटी रुपये एव्हढा होता.

भारतातील काळ्या पैशाबाबतच्या वरील अंदाजाबाबत विचार केला असता हे स्पष्ट होते की भारतातील काळ्या पैशाचे प्रमाण वाढत आहे. तसेच त्याचे स्थूल राष्ट्रीय उत्त्पन्नासी असणारे प्रमाण सुध्दा वाढत आहे. १९७५–७६ पर्यत ते प्रमाण १० टक्के पेक्षा कमी होते परंतु आता जागतिक बँकेच्या अहवालानुसार भारतातील काळ्या पैशाचे स्थूल राष्ट्रीय उत्पन्नासी असणारे प्रमाण ५० टक्के पेक्षा अधिक झाले आहे. त्याचे गंभीर परिणाम भारतीय अधिकृत अर्थ व्यवस्थेवर होत आहेत.

### ४.७. ड. भारतातील काळ्या पैशाच्या निर्मितीची कारणे :

भारतातील काळ्या पैशाचा उगम व विस्तार याची योग्य माहिती घेण्यासाठी त्याची कारणे पहाणे आवश्यक आहे.

### १. कराचे उच्च दर :

कराचे उच्च दर हा घटक भारतातील काळ्या पैशाच्या निर्मितीस प्रामुख्याने कारणीभूत ठरला आहे. भारतात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कराचे दर फार मोठे आहेत. कर म्हणून भरावी लागणारी रक्कम फार मोठी असल्याने करदात्यांमध्ये कर चुकविण्याची प्रवृत्ती निर्माण होते. त्यासाठी ते आपले संपूर्ण कर पात्र उत्पन्न न दाखविता थोडे उत्पन्न दाखवितात. व त्या थोड्या उत्पन्नावरील कर भरतात. परिणामी काळ्या पैशाचा उगम व विस्तार होत जातो. डॉ. के एन. काब्रा यांच्या मते सन १९७१–७२ मध्ये भारतात चुकविलेल्या प्राप्ती कराची रक्कम १८९० कोटी रुपये होती त्यात १९७८–७९ पर्यत ५३०५ कोटी रुपयापर्यत वाढ झाली. अर्थात भारतात कराचे दर मोठे असल्याने कर चुकविण्याची प्रवृत्ती वाढून काळ्या पैशाचे प्रमाण वाढले आहे.

### २. करविषयक कायद्यांच्या काटेकोर अमलबजावणीचा अभाव :

करदात्यांना कर चुकविता येवू नये यासाठी भारतात करविषयक अनेक नियम व कायदे आहेत. त्याची योग्य अमलबजावणी झाली तर काळ्या पैशाची निर्मिती होणे कठीण आहे. परंतु भारतात कर – कायद्यांची काटकोर अमलबजावणी केली जात नाही. कर संबंधित सरकारी खात्यांमध्ये लाचलूचपत वाढली असल्याने श्रीमंत वर्गामध्ये कर चुकविण्याची प्रवृत्ती वाढली आहे. त्यामुळे काळा पैसा विस्तारत आहे.

### ३. परताव्याच्या अपेक्षित व अनुज्ञेय दरातील तफावत :

परताव्याच्या कायदेशीर अनुज्ञेय दरापेक्षा परताव्याचा दर अधिक असावा असी करदात्याची अपेक्षा असते. अर्थात दिलेल्या करापेक्षा मिळणारा मोबदला अधिक असावा असी अपेक्षा असते. पण प्रत्यक्षात भारतात मात्र या दोन दरात मोठी तफावत असल्याने कर चुकवेगिरी वाढली आहे. परिणामी काळा पैसा वाढला आहे. उदा भारतात प्राप्ती कराचा दर जगात सर्वाधिक म्हणजे ९७.५ टक्के इतका होता. इतके दर इतर कोणत्याही देशात नाहीत. परंतु नवीन आर्थिक धोरण स्विकारल्यानंतर हा दर टप्प्याटप्प्याने ३० टक्के

पर्यंत खाली आणला आहे.  याचा अनुकुल परिणाम झाला  असून प्राप्ती करापासुन सरकारी महसूल वाढला आहे.

**४. अवास्तव नियंत्रणे व परवाना पध्ती**

अवास्तव नियंत्रणे व परवाना पध्ती व त्यासाठी अवलंबली जाणारी कोटा पध्दत इ. चा परिणाम म्हणून भारतात लाचलूचपतीचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे काळ्या उत्पन्नात मोठी वाढ झाली आहे. भारत सरकारने उद्योग व व्यापाराबाबत जी नियंत्रणे वाढविली तसेच सरकारी यंत्रणेने आपल्या अधिकारांचा जो दुरुपयोग केला त्यातून काळ्या पैशाची निर्मिती झाली.

**५. सार्वजनिक क्षेत्रातील त्रुटी –**

भारतात  सार्वजनिक क्षेत्रातील विविध प्रकल्पांमध्ये प्रचंड गुंतवणूक केली जाते.  या गुंतवणूकीबाबतचे निर्णय घेताना ठेकेदार , सरकारी अधिकारी व राजकारणी यांच्यामध्ये  अयोग्य असे टेबलाखालील व्यवहार होतात.  त्या काळ्या व्यवहारांमध्ये प्रकल्पावरील प्रत्यक्ष नियोजित खर्चापेक्षा जादा खर्च दर्शविला  जातो. त्यामुळे अशा काळ्या व्यवहारातून मोठ्या प्रमाणात काळ्या उत्पन्नाची निर्मिती  होते.  सार्वजनिक क्षेत्रातील असे गैरप्रकार वेगाने होत असल्याने सार्वजनिक क्षेत्रातील वाढत्या गुंतवणूकीबरोबर काळ्या पैशात वेगाने वाढ होत आहे.

**६. राजकीय पक्षांना दिला जाणारा निधी :**

राजकीय पक्षांना निवडणूका लढविण्यासाठी मोठा खर्च करावा लागतो. हा खर्च भागावा म्हणून राजकीय पक्ष व्यापारी  उद्योगपती व व्यावसायिक यांच्याकडून मोठ्या देणग्या स्विकारतात. अशा देणग्या दिल्याने आपला काळा पैसा सुरक्षित होतो  म्हणून व्यापारी, उद्योगपती देणग्या देतात.  राजकीय  पक्षाकडून धोरणात्मक अमलबजावणीच्या मार्गाने मोठे अयोग्य लाभ प्राप्त व्हावेत  या उद्देशाने या देणग्या दिल्या जातात.  अर्थात  राजकीय पक्षाना देणग्या द्याव्या लागत असल्याने व्यापारी उद्योगपती व व्यावसायिक निर्धोकपणे काळा पैसा वाढवितात

**७. सार्वजनिक खर्चातील मोठी वाढ :**

अधुनिक काळात सरकारी कार्ये वाढली असल्याने सार्वजनिक खर्चात मोठी  वाढ झाली आहे. भारतात १९५०-५१ मध्ये केंद्र सरकारच्या सार्वजनिक खर्चाचे प्रमाण ५३० कोटी रुपये  होते आता ते प्रमाण २००३-०४ च्या अर्थसंकल्पानुसार ४, ३८,०० कोटी रुपया पर्यंत वाढले.  सार्वजनिक खर्चातील वाढीबरोबर  त्या पैशाचा गैरवापर करण्याची प्रवृत्ती सुध्दा वाढली. परिणामी नियोजनाची अपेक्षित  लक्ष्ये पूर्ण झाली नाहीत. त्यातून काळे उत्पन्न मात्र वाढत गेले.

**८. इतर कारणे :**

स्थावर मालमत्ता व्यवहारातील गैरप्रकार , कमिशन व्यवसायातील गैरप्रकार , खरे उत्पन्न लपविण्याची वाढती प्रवृत्ती,  वाढती लाचलूचपत, सरकारी  खात्यातील वाढता भ्रष्टाचार इ. कारणांमुळे भारतातील काळा पैसा वाढला आहे. भारतात अद्यापही शेती उत्पन्नावर कर आकारणी केली जात नाही. त्यामुळे  व्यावसायिक करपात्र व्यवसायातून मिळणारे उत्पन्न शेती व्यवसायातून मिळते असे दर्शवितात. आणि  करपात्र उत्पन्न कमी दर्शवून कर चुकवितात. या व्यवहारामुळे काळा पैसा वाढला आहे.

अशा प्रकारे कराचे उच्च दर, कर कायद्यांच्या काटेकोर अमलबजावणीचा अभाव, अवास्तव नियंत्रणे परवाना पध्दत, सार्वजनिक क्षेत्रातील त्रुटी राजकीय पक्षांना दिला जाणारा निधी, वाढता सार्वजनिक खर्च,

स्थावर मालमत्ता व्यवहारातील गैरप्रकार, वाढती लाचलूचपत व भ्रष्टाचार अशा विविध कारणांमुळे भारतातील काळ्या पैशाचा उगम व विस्तार झाला आहे.

### ४.७.इ. काळ्या पैशाच्या नियंत्रणासाठी उपाययोजना :

काळा पैसा नियंत्रित करण्यासाठी भारत सरकारने पुढीलप्रमाणे विविध उपाययोजना केल्या आहेत.

**१. करचुकवेगिरीवर नियंत्रण :**

करचुकवेगिरी हे काळ्या पैशाच्या उगम व विस्ताराचे एक महत्वाचे कारण आहे. म्हणून भारत सरकारने प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर चुकवेगिरी नियंत्रित करण्यासाठी अनेक का यदेशीर व प्रशासकीय उपाय योजले आहेत. त्यासाठी सरकारने वेळोवेळी कर समित्यांची नियुक्ती केली असून त्यानी सुचविलेल्या सुधारणांची व सिफारशींची अमलबजावणी केली आहे. या संदर्भात सरकारने सन १९५३, १९५६, १९५८, १९५९, १९७१, १९९१ मध्ये विविध समित्या व कमिशन नेमले. त्यानी सुचविलेल्या सिफारशींच्या अमलबजावणीमुळे काळा पैसा कमी झाला असून सरकारी महसूल वाढला आहे.

**२. विमुद्रीकरण** (Demonetization)

काळा पैसा नियंत्रित करण्यासाठी प्रस्थापित चलनी नोटा रद्द करणे म्हणजे विमुद्रीकरण होय. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सरकारने प्रथमत:च १६ जानेवारी १९७८ रोजी १००० रुपये, ५००० रुपये व १०,००० रुपये या उच्च मूल्य असणाऱ्या नोटा चलनातून काढून टाकल्याचे (रद्द केल्याचे) जाहीर केले. हे चलन एकूण १४६ कोटी रुपये किंमतीचे होते. सन १९८१ मध्ये विमुद्रिकरण चलनाचे मूल्य १२५ कोटी रुपये होते. परंतु हा उपाय लोकप्रिय नाही. सर्व व्यवहार रोखीने होत असतील तरच हा उपाय परिणामकारक ठरतो. अन्यथा विमुद्रीकरण मार्गाने काळ्या पैशाचे नियंत्रण कठीण ठरते.

**३. ऐच्छिक प्रकटीकरण योजना** (VDS)

काळा पैसा बाहेर काढण्यासाठी सरकारने वेळोवेळी ऐच्छिक प्रकटीकरण योजना अर्थात स्वेच्छा उत्पन्न घोषणा योजना मांडल्या. १९५१ मध्ये केलेल्या घोषणेनुसार प्रकटीकरण उत्पन्न ५० कोटी रुपये व कर महसूल ११ कोटी रुपये सरकारकडे जमा झाला. पुन्हा १९६५ मधील प्रकटीकरण योजनेनुसार घोषणा उत्पन्न १४६ कोटी रुपये व कर महसूल ६८ कोटी रुपये जमा झाला. अशाप्रकारे वेळोवेळी या योजनेची अमलबजावणी करुन सरकारने काळ्या पैशावर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न केला आहे. सन १९९७-९८ मध्ये पी. चिदंबरम यानी जाहीर केलेल्या या योजनेला उत्तम प्रतिसाद मिळाला ३३००० कोटी रुपये उत्पन्न जाहीर झाले. व सरकारकडे १०५०० कोटी रुपयाचा कर जमा झाला.

**४. विशेष धारक रोखा योजना :**

काळा पैसा प्रवाहात आणण्यासाठी सरकारने ही योजना १९८१ मध्ये सुरु केली. १० वर्षे मुदतीच्या या रोख्यांचे दर्शनी मूल्य १०,००० रुपये होते त्यावरील व्याजदर २ टक्के होता. १९८२-८३ मध्ये रोख्यांची विक्री करुन सरकारने ९६४ कोटी रुपये जमा केले. परंतु या योजनेस फारसे यश मिळाले नाही.

**५. प्राप्ती करदरात कपात :**

भारताने १९९१ पासून नवीन आर्थिक धोरणाचा पुरस्कार केला. तत्कालीन अर्थमंत्री मनमोहन सिंह यानी प्राप्ती करदरात अमुलाग्र बदल केले. प्राप्तीकराचे दर सर्वोच्च पातळीवरुन ४० टक्के पर्यंत खाली आणले. सन १९९७-९८ पासून तत्कालिन अर्थमंत्री पी. चिदबरम यानी हे दर ३० टक्केपर्यंत खाली

आणले. याचा अनुकूल परिणाम झाला असून प्राप्ती कराचे स्थूल राष्ट्रीय उत्पन्नासी असणारे प्रमाण वाढले आहे. काळ्या पैशाच्या नियंत्रणासाठी प्राप्ती कराबरोबर इतर करांचेही दर सरकारने कमी केले आहेत.

**६. अनावश्यक नियंत्रणे दूर करणे :**

भारत सरकारने नवीन आर्थिक धोरणानुसार १९९१ पासून उदारीकरणाच्या पुरस्कार करुन अनावश्यक नियंत्रणे कमी केली आहेत. त्याबरोबर सरकारने परिणामकारक प्रशासन केले तर काळ पैसा कमी होईल.

**७. राजकीय पक्षाना दिली जाणारी देणगी व निवडणूक सुधारणा :**

निवडणूकांवर करावा लागणारा प्रचंड खर्च भागावा म्हणून राजकीय पक्ष उद्योगपती व्यापारी व व्यावसायिक यांच्या कडून मोठ्या देणग्या स्विकारतात. हे लोक देणग्या देण्यासाठी काळ्या उत्पन्नाचा वापर करतात. म्हणून भारत सरकारने सन १९६८ मध्ये अशा देणगीवर बंदी घातली. तरी सुध्दा मागील दाराने राजकीय पक्ष देणग्या स्विकारतात. म्हणून प्रशासन यंत्रणेने प्रामाणिकपणे काम करुन अशा देणग्या बंद केल्या तर काळे उत्पन्न नियंत्रित होईल.

**८. सार्वजनिक क्षेत्राच्या कार्यक्षमतेत सुधारणा :**

काही अर्थशास्त्रज्ञांनी सुचविल्याप्रमाणे सरकारने काळ्या पैशाचे अनिष्ट परिणाम नियंत्रित करण्यासाठी त्याची भरपाई पतशक्ती म्हणून सार्वजनिक क्षेत्राच्या विस्तारावर भर दिला. वस्तूस्थितीत भरपाई पतशक्ती म्हणून सार्वजनिक क्षेत्राने आवश्यक व इतर अनेक उपयोग्य वस्तू उत्पादनावर भर देणे गरजेचे होते. परंतु प्रत्यक्षात अवजड व मूलभुत उद्योगांचा विस्तार सार्वजनिक क्षेत्रात करण्यात आला. त्यामुळे व्यावसायिकांच्या काळ्या पैशाच्या निर्मितीवर हवी तसी मर्यादा आणता आली नाही.

**९. इतर उपाय :**

वरील उपायांव्यतिरिक्त भारत सरकारने देशात काळ्या पैशाचा विस्तार होवू नये. यासाठी इतर काही उपयांचा वेळोवेळी वापर केला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने अनिवासी भारतीयांच्या विदेशी विनिमय व्यवहारावर लक्ष, अमेरिकन डॉलरमध्ये राष्ट्रीय विकास रोख्यांची निर्मिती, निवडणूक आयोगामार्फत उमेदवाराच्या निवडणूक खर्चाचे नियंत्रण व हिशेब मांडणी तसेच संशयास्पद व्यक्तिंच्या उत्पन्न व मालमत्तेच्या तपासणी साठी छापा टाकणे, कर चुकवेगिरीच्या पळवाटा बंद क रणे इ. मार्गाचा अवलंब सरकार करीत आहे.

काळ्या पैशाच्या उगम व विस्ताराचे नियंत्रण व्हावे यासाठी भारत सरकारने वरील उपाययोजना केल्या आहेत. सरकारी यंत्रणेमार्फत प्रामाणिक प्रयत्न झाले व सामान्य जनतेचे जीवनमान उंचावले तर काळ्या उत्पन्नाचा विस्तार नियंत्रित होईल.

## ४.८ भारतीय अर्थव्यवस्थेमधील ग्रामीण आणि शहरी समस्या (Problems of rural and urban economy):

भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये लोकसंख्या वाढीचा वेग जास्त आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे या देशात अनेक प्रश्न निर्माण होतात, आणि दारिद्र्य ही त्यापैकीच एक समस्या आहे. विकसनशील देशात औद्योगिक क्षेत्राची संथ गतीने होणारी प्रगती, नव्या तंत्रज्ञानाचा वाढता वापर, नैसर्गिक साधन संपत्तीचा अपुरा वापर, शेतीचे निसर्गावरील अवलंबित्व यासारख्या कारणांमुळे रोजगारात फारशी वाढ होत नाही, अनेक लोकांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळते व यातूनच दारिद्र्याची समस्या निर्माण होते.

**अर्थव्यवस्थेसमोरील समस्यांचे प्रकार :**

**ग्रामीण समस्या**

१) दारिद्र्य

२) लोकसंख्या वाढ

३) व्यसनाधीनता

४) बेकारी

५) शेतीवरील वाढता भार

६) पायाभूत सुविधांचा अभाव

७) रूढी व परंपरांचा पगडा

८) शेतीची अल्प उत्पादकता

९) शेतकऱ्यांच्या आत्महत्या

१०) शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा

११) निकृष्ट राहणीमान

१२) प्रादेशिक विषमता

१३) आर्थिक विषमता

**शहरी समस्या**

१) सुशिक्षित बेकार

२) पायाभूत सुविधांवरील वाढता भार

३) ग्रामीण-शहरी स्थलांतर

४) जमिनीच्या वाढत्या किंमती

५) प्रशासकीय खर्चात वाढ

६) वाहतूकीवरील वाढता भार

७) गलिच्छ झोपडपट्टीत वाढ

८) आरोग्याची समस्या

९) व्यसनाधीनता

१०) वाढती गुन्हेगारी

११) वाढते प्रदूषण

**अ) ग्रामीण समस्या**

**१) दारिद्र्य :**

दारिद्र्य ही समस्या ग्रामीण भागातील अत्यंत महत्वाची समस्या आहे. ग्रामीण भागातील लोक हे अंधश्रध्दा, रूढी-परंपराच्या बंधनात अडकलेले असतात, तसेच वाढत्या लोकसंख्येला शेतीवरील रोजगार अपुरा पडतो. त्यांच्यामध्ये स्थलांतर करण्याची वृत्ती देखील कमी असते परिणामी लोकांना रोजगार मिळू शकत नाही, त्यामुळे बेकारीत वाढ होऊन दारिद्र्य वाढीस लागते.

**२) लोकसंख्या वाढ :**

ग्रामीण भागातील लोक हे अंधश्रध्दाळू, देवावर विश्वास ठेवणारे असतात. वाढती निरक्षरता अपुरी साक्षरता यामुळे त्यांच्यामध्ये अडाणीपणा दिसून येतो. 'मुले म्हणजे परमेश्वराची कृपा' अशा समजूतीमुळे ते अधिक प्रमाणात मुलांना जन्म देतात, त्यामुळे लोकसंख्या वाढते यातूनच ग्रामीण समस्या निर्माण होतात.

**३) व्यसनाधीनता :**

ग्रामीण भागातील लोकसंख्यापैकी तरूणांची संख्या ही सर्वाधिक आहे. सुशिक्षित बेकारांची संख्या वाढल्यामुळे उपासमारीची वेळ येते आणि यातूनच तरुण मुले व्यसनाच्या आहारी जातात.

### ४) बेकारी :

प्रचलित वेतनदरावर काम करण्याची इच्छा आणि शारीरिक व बौध्दिक क्षमता असूनसुद्धा जर काम मिळत नसेल तर त्या स्थितीला बेकारी असे म्हणतात. वाढत्या लोकसंख्येमुळे लोकांना पुरेसा रोजगार मिळत नाही. यातूनच छुपी बेकारी, अर्धबेकारीचे प्रमाण वाढते आहे.

### ५) शेतीवरील वाढता भार :

भारत हा शेतीप्रधान देश मानला जातो ग्रामीण भागातील जास्तीत-जास्त लोकसंख्या शेतीवर आधारित आहे. ग्रामीण भागात लोकसंख्यावाढीचा वेग हा जास्त असतो. या वाढत्या लोकसंख्येमुळे सर्वांना रोजगार उपलब्ध होत नसल्यामुळे ते शेतीकडे वळतात. परिणामी शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकांचे प्रमाण वाढते.

### ६) पायाभूत सुविधांचा अभाव :

देशाच्या आर्थिक विकासामध्ये पायाभूत सुविधांना अत्यंत महत्वाचे स्थान आहे. असे असले तरी ग्रामीण भागात आजही मोठ्या प्रमाणात वीज, पाणी पुरवठा, वाहतूक इ. पायाभूत सेवा सुविधांचा अभाव ग्रामीण भागामध्ये असल्याचे दिसून येते.

### ७) रुढी व परंपरांचा समाजमनावर पगडा :

ग्रामीण भागातील लोकांच्यावर रुढी, परंपरा, अंधश्रध्दा आदींचा प्रभाव असतो. यामुळे ते परिवर्तनवादी विचार स्विकारण्यास तयार नसतात. प्राप्त परिस्थिती योग्य आहे व परमेश्वराची इच्छा असल्यास आपल्या परिस्थितीत सुधारणा होईल, त्यासाठी इतरत्र जाण्याची गरज नाही. अशा जुनाट विचारांचा पगडा या ग्रामीण भागातील लोकांवरती पडलेला असतो.

### ८) शेतीची अल्प उत्पादकता :

ग्रामीण भागातील लोकांचा मुख्य व्यवसाय हा शेती आहे. ग्रामीण भागातील लोक हे प्रामुख्याने परंपरागत पध्दतीचाच वापर करतात. आपल्या देशाच्या मानाने इतर देशात निरनिराळी तंत्र-यंत्र, सुधारीत खते, बी-बियाणे, अवजारे इ. चा वापर केल्याने परकीय विकसित देशांच्या मानाने विकसनशील देशातील शेतीचा अपुरा विकास होतो. त्यामुळे शेतीची उत्पादकता ही अल्पच असलेली दिसून येते.

### ९) शेतकऱ्यांच्या आत्महत्या :

भारतीय शेती ही प्रामुख्याने मान्सूनच्या लहरीपणावर अवलंबून आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना हंगामीस्वरुपात पीक घ्यावे लागते. त्यासाठी आवश्यक असणाऱ्या सुधारीत बी-बियाणे, खते, कीटकनाशके, अवजारे इ. खरेदीसाठी शेतकरी वित्तपुरवठा करणाऱ्या संस्थांचे, बँकांचे कर्जफेडीचा मार्ग शेतकऱ्यांना मिळत नाही. त्यामुळे शेतकरी मोठ्या प्रमाणात आत्महत्येकडे वळतात.

### १०) शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा :

ग्रामीण भागातील अनेक शेतकरी हे कर्जाच्या विळख्यात अडकलेले असल्याचे दिसून येते. शेतीच्या अल्प उत्पादनामुळे शेतीतील मालाला योग्य भाव मिळत नाही. त्यामूळे शेतकरी कर्जातच जन्मतो आणि कर्जातच मरतो, ही एक ग्रामीण समस्या आहे.

**११) निकृष्ट राहणीमान :**

ग्रामीण भागातील लोकांकडे कष्टाळूवृत्ती ही कमी असते तसेच लोकसंख्या ही सातत्याने वाढत असल्याने वाढत्या लोकसंख्येला निरनिराळ्या सोई-सुविधा अपुऱ्या पडतात. त्यामुळे त्यांना निकृष्ट दर्जाचे जीवन जगावे लागते.

**१२) प्रादेशीक विषमता :**

देशाचा आर्थिक विकास घडून येताना त्यांचे समान वाटप सर्व प्रदेशांमध्ये झाले पाहिजे जर विकसित अथवा पुढारलेल्या प्रदेशांमध्ये विकास प्रक्रियेचे केंद्रीकरण झाल्यास इतर प्रदेश आर्थिकदृष्ट्या मागे पडतात. यातूनच प्रादेशिक विषमता वाढीस लागते.

**१३) आर्थिक विषमता :**

ग्रामीण भागाचा जर विचार केला तर आज या भागात आर्थिक विषमता ही खूप वाढत चाललेली दिसून येते. गरीब व श्रीमंत यांच्यामधील दरी वाढत गेल्याने भारतामधील आर्थिक विषमता वाढत आहे.

वरील स्वरूपाच्या समस्या भारताच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेला भेडसावीत असल्याचे दिसून येते.

**ब) शहरी समस्या :**

भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये ग्रामीण समस्यांबरोबरच शहरी भागात देखील समस्या दिसून येतात. त्या समस्याचे स्पष्टीकरण पुढील प्रमाणे.

**१) सुशिक्षित बेकारी :**

वाढत्या लोकसंख्येमधून ग्रामीण भागातून शहराकडे लोकसंख्येचे स्थलांतर वाढलेले आहे. शहरी भागामध्ये पुरेशा रोजगार संधी उपलब्ध नसल्याने शहरी भागात सुशिक्षित बेकारांच्या संख्येच्या समस्येमधूनच दारीद्र, निकृष्ट दर्जाचे राहणीमान, वाढती गुन्हेगारी यासारख्या समस्या निर्माण होतात.

**२) पायाभूत सुविधांवर वाढता भार :**

ग्रामीण भागातून शहरी भागाकडे लोक रोजगारासाठी मोठ्या प्रमाणात आपले स्थलांतर करतात. त्यांचा परिणाम म्हणजे शहरी भागात मोठ्या प्रमाणात लोकसंख्या वाढते. या वाढत्या लोकसंख्येच्या गरजा भागविण्यासाठी उपलब्ध असणाऱ्या वीज, पाणी, वाहतूक यासारख्या पायाभूत सुविधांवर मोठ्याप्रमाणात भार निर्माण होतो.

**३) वाढते प्रदूषण :**

शहरी भागात प्रदूषण वाढीचा वेग हा झपाट्याने वाढतो. शहरात निरनिराळे उद्योगधंदे निर्माण होतात त्यामधून बाहेर पडणाऱ्या धुरामुळे हवा प्रदूषण होते. तसेच वाढत्या औद्योगीकरणामधून जमीन प्रदूषण, पाणी प्रदूषण, ध्वनीप्रदूषण यामध्ये मोठ्याप्रमाणत वाढ होत असल्याचे दिसून येते.

**४) ग्रामीण – शहरी स्थलांतर :**

ग्रामीण भागातील लोक रोजगाराच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात शहरी भागात स्थलांतर करतात. त्यामुळे शहरात लोकसंख्या प्रचंड प्रमाणात वाढते. या वाढत्या लोकसंख्येमुळे शहरी भागात उपलब्ध सुविधांवर भार निर्माण होतो.

**५) जमिनीच्या वाढत्या किंमती :**

ग्रामीण भागातील लोक रोजगारासाठी मोठ्या प्रमाणात शहरात जातात. विशेषत: उच्चवेतन मिळविणारे लोक आपले शहरी भागात स्थलांतर करतात. परंतू शहरी भागात इतर सुख-सोईबरोबरच जमिनीच्या किंमती देखील जास्त असतात. वाढत्या लोकसंख्येच्या वाढत्या स्थलांतरांबरोबरच जमिनीच्या किंमती या दिवसे-दिवस वाढत असल्याचे दिसून येते.

**६) प्रशासकीय खर्चात वाढ :**

वाढत्या लोकसंख्येमुळे शहरातील लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. तेथील प्रशासकीय व्यवस्था कार्यक्षमपणे कार्य करु शकत नाही ही व्यवस्था अपुरी पडते. त्यामुळे प्रशासकीय व्यवस्थेवर प्रचंड ताण येऊन प्रशासनाच्या खर्चात वाढ होते.

**७) वाहतूक व्यवस्थेवरील वाढता भार:**

ग्रामीण भागातील लोक रोजगाराच्या निमित्ताने शहरी भागात स्थलांतर करतात त्यामधून मोठी शहरे विस्तारत गेल्याने वाहतूक व्यवस्थेवरील भार वाढत गेल्याने वाहतूक व्यवस्थेची समस्या निर्माण होते.

**८) गलिच्छ झोपडपट्टीत वाढ :**

ग्रामीण भागातील लोक मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या निमित्ताने शहरी भागाकडे वळतात. ते निरक्षर असल्याने चांगली वेतनाची नोकरी मिळत नसल्याने त्यामुळे त्यांना शहरी भागात जमिनी खरेदी करुन घरे बांधने शक्य होत नाही. त्यामुळे गलिच्छ झोपडपट्टीत वाढ होत राहते.

**९) आरोग्याची समस्या :**

शहरी भागामध्ये औद्योगीकरणामधून जमिन प्रदूषण, पाणी प्रदूषण, ध्वनी प्रदूषण तसेच हवा प्रदूषण यामध्ये मोठ्याप्रमाणात वाढ होते. त्याबरोबरच वाढत्या धावपळीच्या शहरी जीवनामध्ये लोकांचे आरोग्याकडे दुर्लक्ष होते. त्यामुळे लोकांचे आरोग्य धोक्यात येते.

**१०) व्यसनाधीनता :**

शहरी भागात उच्च वेतनावर कामकरणाऱ्यांची संख्या ही प्रचंड असते. त्यामुळे हे लोक दारु, तंबाखू, सिगारेट इ. वरती प्रचंड प्रमाणात पैसा खर्च केला जातो. तसेच बेकारी, दारिद्र्य, निकृष्ट दर्जाचे राहणीमान, गुन्हेगारी या समस्यांमधून देखील शहरी भागामध्ये व्यसनाधीनतेचे प्रमाण वाढलेले आहे.

**११) गुन्हेगारी प्रवृत्तीत वाढ :**

लोकांना पुरेसा रोजगार मिळणे गरजेचे असते. त्यामुळे लोक आपल्या दैनंदिन गरजा भागविण्यास समर्थ ठरतात. याउलट जर लोकांना पुरेशा प्रमाणात रोजगार मिळाला नाही तर लोकांवर बेकारीची समस्या येते. त्यातून दारिद्र्य वाढत जाते आणि या वाढत्या दारिद्र्यमुळेच गुन्हेगारी प्रवृती वाढीस लागते.

वरील स्वरूपाच्या समस्या भारतीय अर्थव्यवस्थेच्या ग्रामीण आणि शहरी भागामध्ये निर्माण झालेल्या आहेत. देशातील सरकारने नियोजनाच्या माध्यमातून या समस्यांचे निराकरण करण्याचे अनेक प्रयत्न केले असले तरी त्यांचे समुळ उच्चाटन झालेले नाही.

**प्रश्न १. रिकाम्या जागा भरा.**

१) शेतीवरील वाढता भार ही. . . . . समस्या आहे?

अ) शहरी ब) ग्रामीण

क) शहरी व ग्रामीण ड) यापैकी नाही

२) गलिच्छ झोपडपट्टीत वाढ ही. . . . . समस्या आहे?

अ) शहरी ब) ग्रामीण

क) शहरी व ग्रामीण ड) यापैकी नाही

**प्रश्न २. टीपा लिहा**

१) भारतीय अर्थव्यवस्थेमधील ग्रामीण आणि शहरी समस्या

२) भारतीय अर्थव्यवस्थेमधील ग्रामीण समस्या

३) भारतीय अर्थव्यवस्थेमधील शहरी समस्या

**प्रश्न ३. पुढील प्रश्नाची सविस्तर चर्चा करा.**

१) भारतीय अर्थव्यवस्थेमधील ग्रामीण आणि शहरी समस्या स्पष्ट करा.

## ४.९ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

**अ) रिकाम्या जागा भरा**

१. सन २००१ च्या शिरगणतीनुसार भारताची एकूण लोकसंख्या ------ एव्हढी आहे.

अ) १०० कोटी ब) १०२.७ कोटी

क) १०५.६ कोटी ड) ९९.९ कोटी

२. भारतासारख्या विकसनशील राष्ट्रातील बेकारी ही मुख्यत: ----- बेकारी आहे.

अ) संरचनात्मक ब) हंगामी

क) चक्रीय ड) न्यून

३. भारतीय नियोजन मंडळाच्या मते, ग्रामीण लोकांना दररोजच्या आहारातून --- उष्णांक (कॅलरिज) मिळाले पाहिजेत.

अ) २१०० ब) २२००

क) १३०० ड) २४००

४. भारतात ----- पंचवार्षिक योजनेपासून किमान गरजा कार्यक्रम राबविला जात आहे.

अ) चौथ्या ब) पाचव्या

क) सहाव्या ड) सातव्या

५. जागतिक बँकेच्या मते भारतातील काळ्या पैशाचे स्थूल राष्ट्रीय उत्पन्नासी असणारे प्रमाण ----- टक्केपेक्षा जास्त आहे.

अ) ५०  ब) १०

क) ३०  ड) ७०

**ब) पुढील वाक्ये चूक की बरोबर ते सांगा .**

१. २००१ च्या शिरगणपतीनुसार भारतात दर हजारी पुरुषामागे स्त्रियांचे प्रमाण १०३४ झाले आहे.

२. बेकारी कमी करण्यासाठी एप्रील १९८९ मध्ये जवाहर रोजगार योजना जाहीर करण्यात आली

३. व्यक्ती किंवा कुटुंबाकडे जीवनावश्यक गरजांची पूर्तता करण्याची क्षमता नसणे म्हणजे दारिद्र्य होय.

४. कमाल जमिन धारणा कायद्याची भारत सरकारने काटेकोर अमलबजावणी केली आहे.

५. भारतात करचुकवेगिरी वाढल्यामुळे काळा पैसा वाढला आहे.

**क) स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :**

अ. १) ब  २) अ  ३) ड

४) क  ५) अ

ब १) चूक  २) बरोबर  ३) बरोबर

४) चूक  ५) बरोबर

## ४.१० सरावासाठी स्वाध्याय

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न**

१. भारतीय लोकसंस्थेची प्रमुख वैशिष्टये विशद करा.

२. बेकारी कमी करण्यासाठी भारत सरकारने केलेल्या उपाय योजनांची चर्चा करा.

३. भारतात दारिद्र्य वाढण्याची कारणे कोणती? दारिद्र्य निर्मूलनासाठी सरकारने केलेल्या उपाययोजनांची चर्चा करा.

४. उत्पन्नातील विषमता कमी करण्यासाठी सरकारने केलेल्या उपायांची चर्चा करा

५. भारतात काळा पैसा वाढण्याची कारणे कोणती? काळा पैसा कमी करण्यासाठी शासकीय उपाय योजनांची चर्चा करा.

**ब) टीपा द्या.**

१. भारतीय लोकसंस्थेची वैशिष्टये

२. भारतातील दारिद्र्याची कारणे

३. भारतात उत्पन्नातील विषमता वाढण्याची कारणे

४. बेकारी निर्मुलनासाठी उपाययोजना

५. भारतातील काळ्या पैशाच्या निर्मितीची कारणे

६. काळ्या पैशाचे नियंत्रण

## ४.१० संदर्भ पुस्तके


१. श्रीधर देशपांडे, विनायक देशपांडे : भारतीय अर्थव्यवस्था संक्रमण आणि विकास, हिमालया पब्लिशिंग हाऊस

२. डॉ. जी. एन. झांबरे : भारतीय अर्थव्यवस्था विकास व पर्यावरणात्मक अर्थशास्त्र पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.

३. डॉ. श्री. यु. देसाई, डॉ. सौ. निर्मल भालेराव : भारतीय अर्थव्यवस्था भाग-१, निराली प्रकाशन, पुणे

४. श्री. के एम. भोसले, श्री के. बी. काटे : व्यावसायिक पर्यावरण, फडके प्रकाशन, कोल्हापूर

५. डॉ. डी.जी. चौगुले : व्यावसायिक पर्यावरण, अजब पब्लिकेशन, कोल्हापूर

६. प्रा. डॉ. जे. एफ. पाटील (संपादक) : सार्वजनिक अर्थकारण, फडके प्रकाशन, कोल्हापूर

७. डॉ. अशोक शंकर पवार: लेख - राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, मासिक - योजना डिसेंबर - २००८

८. डॉ. अ. रा. पडोसी : लेख - आर्थिक मंदीची समस्या पर्याय आणि उपाय साप्ताहिक शोधन, मुंबई ८ ते १४ मे २००९

९. S. K. Mishra, V. K. Puri : Indian Economy, Himalaya Publishing House

१०. Prof (Dr) J. F. Patil, Dr. P. K. Deshmukh, Dr. V. B. Kakde, Shri R. A. Waingade : Business Environment, Phadke Prakashan, Kolhapur.


❑❑❑

## सत्र ६ : घटक १

# अ) खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण

# (Privatisation, Liberalisation and Globalisation)

**अनुक्रमणिका :**


**खाजगीकरणः**

१.१ उद्दिष्टे

१.२ प्रस्तावना

१.३ अर्थ व व्याख्या

१.४ विविध संकल्पना

१.५ खाजगीकरणाचे परिणाम/ प्रभाव

- १.५.१ इतर राष्ट्रातील खाजगीकरणाचा अनुभव
- १.५.२ जपानमधील अनुभव
- १.५.३ भारतातील खाजगीकरण

१.६ उदारीकरण

- १.६.१ प्रस्तावना
- १.६.२ व्याख्या
- १.६.३ भारतातील उदारीकरण
- १.६.४ उदारीकरणाचे परिणाम/ प्रभाव
  - १.६.४.१ कृषी क्षेत्र
  - १.६.४.२ उद्योगधंदे

१.७ जागतीकीकरण

- १.७.१ प्रस्तावना
- १.७.२ अर्थ आणि व्याख्या
- १.७.३ जागतिकीकरणाची अंमलबजावणी

१.७.४ जागतिकीकरणाचे गुणदोष

१.७.५ जागतिकीकरणाचे परिणाम/ प्रभाव

१.७.६ जागतिकीकरण आणि भारतीय अर्थव्यवस्था

ब) भारताचा विदेशी व्यापार

१.८ जागतिकीकरणाच्या काळातील भारताच्या विदेशी व्यापाराची रचना आणि दिशा

१.८.१ व्यापाराची रचना

१.८.२ व्यापाराची दिशा

१.९ सारांश

१.१०पारिभाषिक शब्दांचा अर्थ

१.११स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

१.१२सरावासाठी प्रश्न

१.१३अधिक वाचनासाठी पुस्तके

## १.१ उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला.....

- खाजगीकरण म्हणजे काय ते समजेल.
- उदारीकरणाची संकल्पना समजेल.
- जागतिकीकरणाची संकल्पना व तिचे महत्त्व समजेल.
- विदेशी व्यापाराची गरज व महत्त्व समजेल.
- खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाचा भारतीय अर्थव्यवस्थेवर काय परिणाम होईल याची माहिती मिळेल.

## १.२ प्रस्तावनाः

भारतासारख्या अनेक विकसनशील राष्ट्रांनी आर्थिक उदारीकरणाचे धोरण स्वीकारले आणि खाजगीकरणाचा मार्ग अवलंबला. नवीन अर्थिक धोरणाचा एक महत्त्वाचा घटक म्हणून खाजगीकरणाला महत्त्व आहे. म्हणूनच खाजगीकरण ही संकल्पना अभ्यासणे गरजेचे आहे. खाजगीकरण संकल्पना अंमलबजावणी आणि अर्थव्यवस्थे वरील परिणाम या बाबींचा भारतीय अर्थ व्यवस्थेच्या दृष्टीने अभ्यास करावयाचा आहे.

## १.३ अर्थ आणि व्याख्याः

खाजगीकरण ही संकल्पना संकुचित व व्यापक या दोन्हीं अर्थांनी वापरली जाते. संकुचित अर्थाने खाजगीकरण म्हणजे सरकारी क्षेत्रातील उद्योगांची मालकी खाजगी व्यक्ती किंवा संस्था किंवा कंपन्यांकडे हस्तांतरित करणे होय. याउलट खाजगीकरणाचा व्यापक अर्थ म्हणजे सार्वजनिक क्षेत्रातील उद्योजकांच्या मालकी हक्कात कोणताही बदल न करता फक्त व्यवस्थापन व नियंत्रण खाजगी व्यक्ती किंवा कंपन्यांकडे देणे होय. या दृष्टीने खाजगीकरणाच्या पुढील व्याख्या अभ्यासाव्या लागतात.

**१) द.रा.पेंडसेः**

'' राष्ट्रीय अर्थिक व्यवहारातील सरकारचा सहभाग कमी करणे म्हणजे खाजगीकरण होय.''

( Privatization is a process which reduces the involvement of the state or public sector in country's economic activity)

**२) डेव्हीड हेरॉल्डः**

''साधन सामग्रीच्या उपयोगासाठी किंवा वाटपासाठी 'बाजाराधिष्ठित' पद्धतीचा स्वीकार करण्याची प्रक्रिया म्हणजे खाजगीकरण होय.''

**३) जागतिक विकास अहवाल– १९८७**

''खाजगीकरण म्हणजे उत्पादक मत्तेचे किंवा साधन सामुग्रीचे सरकारी मालकीकडून खाजगीमालकीकडे हस्तांतर करण्याची प्रक्रिया होय.''

वरील सर्व व्याख्या वरून असे दिसून येते की, जर निर्णय स्वातंत्र्य सरकारी उद्योगांना दिले तर संकुचित अर्थाने खाजगीकरण होते. याउलट नियंत्रणे कमी केल्यास, निर्बंध उठविल्यास, बाजारपेठ खुली केल्यास, भाग-भांडवलाचे हस्तांतर केल्यास तसेच सरकारी उद्योगाची मत्ता खाजगी व्यक्ती किंवा संस्थेकडे हस्तांतरित केल्यास व्यापक अर्थाने खाजगीकरण आहे असे म्हणता येते. सरकारी मालकीच्या उद्योगांच्या खाजगीकरणाचा संकल्पना व्यापक आहे. म्हणजे सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचे खाजगीकरण विविध प्रकारे केले जाते.

## १.४ विविध संकल्पनाः

खाजगीकरण विविध प्रकारे केले जाते. त्यातील महत्त्वाच्या संकल्पना पुढील प्रमाणेः

**अ) मालक हक्कांचे खाजगीकरणः**

सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगाची मालकी सरकारकडून विविध पद्धतीने हस्तांतरित करता येते. उद्योगाचे संपूर्ण निराष्ट्रीयीकरण (Denationalisation) करणे म्हणजे सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांची मालकी पूर्णतः खाजगी क्षेत्राकडे हस्तांतरित करणे होय. याचा अर्थ उद्योगाची संपूर्ण मत्ता आणि दायित्व खाजगी उद्योगाकडे देणे होय. उद्योगाची मालकी ही संयुक्त असते म्हणजे सरकारी उद्योगात खाजगी क्षेत्राचा भांडवलामधील सहभाग कांही अंशी म्हणजे २५% -५०% किंवा त्यापेक्षा जास्त असू शकतो. अर्थात याबाबतचे सरकारी धोरण महत्त्वाचे असते.

संपूर्ण व्यवस्थापन खरेदी करणे हाही खाजगीकरणाचा एक प्रकार आहे. या पद्धतीत सरकारी उद्योगाचे भाग-भांडवल खाजगी व्यक्तीला किंवा कंपनीला न विकता त्याच उद्योगातील कामगारांना विकले जाते. म्हणजे उद्योगाचा मालकी हक्क आणि व्यवस्थापन कामगारांकडे हस्तांतरीत केले जाते. भाग-भांडवल खरेदी

करण्यासाठी कामगारांना कर्ज पुरवण्याची सोय उपलब्ध केली जाते. कामगारांना वेतन आणि लाभांश मिळत असल्याने कार्यक्षमता आणि उत्पादकता वाढते.

**ब) संघटनात्मक स्वरूपाचे खाजगीकरण:**

सरकारी उद्योगाच्या मालकी हक्कात बदल न करता केवळ संघटनात्मक स्वरूपाचे खाजगीकरणाचे लाभ मिळवून दिले जाते. उदा: सरकारचा दैनंदिन हस्तक्षेप कमी करणे त्यामुळे त्या उद्योगाला बाजारातील परिस्थितीनुसार निर्णय घेता येतो. प्रत्येक विभागाला व्यावसायिक गरजेनुसार कार्यक्षमता वाढविण्याचे स्वातंत्र्य मिळते या पद्धतीत उद्योगाची मालकी सरकारकडेच ठेवली जाते. परंतु विशिष्ट कालावधीत भाडे कराराप्रमाणे खाजगी उद्योजकाकडून सरकार घेते. असा प्रयोग चीन मध्ये यशस्वी झाला आहे. सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगाची पुर्नरचना ही सुद्धा एक खाजगीकरणाची पद्धती आहे.

**क) कार्यकारी उपाययोजनेद्वारे खाजगीकरण:**

कार्यकारी उपाययोजना ही उद्योगाची कार्यक्षमता आणि उत्पादकता वाढविण्यासाठी पुरेशी ठरते. कार्यकारी उपाययोजना म्हणजे सार्वजनिक उद्योगात व्यावसायिक दृष्टीकोन (वृत्ती) निर्माण करणे होय. कारण एकदा व्यावसायिक दृष्टीकोन निर्माण झाला की, त्या उद्योगाची कार्यक्षमता वाढवू शकते.कार्यकारी उपाययोजना पुढील  प्रकारे केली जाते.

१) सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांना निर्णय स्वातंत्र्य देणे.

२) सार्वजनिक क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना (कामगार व अधिकारी ) कार्यक्षमता वाढविण्यासाठी उत्तेजन देणे.

३) सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांना खुल्या बाजारातून आदाने (साधन-सामुग्री) खरेदी करण्याचे स्वातंत्र्य देणे.

४) सार्वजनिक उद्योग क्षेत्रांना खुल्या बाजारातून खेळते भांडवल उभारण्याचे स्वातंत्र्य देणे.

थोडक्यात या उपाययोजना द्वारे सरकारी मालकी कायम ठेवली असली तरी दैनंदिन व्यवहारात व्यावसायिक स्वातंत्र्य देऊन खाजगी करणाचे फायदे मिळविता येतात.

## १.५ खाजगीकरणाचे परिणाम( प्रभाव) : Impact on the economy

जगातील सर्व राष्ट्रांनी सार्वजनिक उद्योगांच्या  खाजगीकरणाची संकल्पना मान्य केली आहे. विकसित आणि अविकसनशील राष्ट्रांत सार्वजनिक उद्योगात खाजगीकरणाचे विचार चालू आहेत. भारतासारख्या विकसनशील राष्ट्रांनी आर्थिक गरजेपुरते आणि जागतिक बँके च्या अटीमुळे सरकारी उद्योगांच्या खाजगीकरणाचा निर्णय घेतला आहे. भारताने १९९१ मध्ये सुरू केलेल्या नवीन आर्थिक धोरणात खाजकीकरणाला प्राधान्य दिले आहे. भारतासारख्या विकसनशील राष्ट्रांत सार्वजनिक (सरकारी) उद्योग अकार्यक्षम आहेत. या उद्योगात सरकारी गुंतवणुकीवर योग्य त्या प्रमाणात परतावा ( Return) मिळत नाही. तसेच अनेक सरकारी उद्योग तोटयात चालतात. सरकारी उद्योगांचा तोटा भरून काढण्यासाठी व असे उद्योग चालविण्यासाठी सरकारला आपल्या अंदाजपत्रकात तरतूद करावी लागते. यासाठी सरकारला निधी उभारावा लागतो. सरकार करदात्याकडून महसूल (पैसा) जमा करते. याचा अर्थ करदात्यांवर  अनावश्यक भार वाढतो. सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगात कामगार संबध सलोख्याचे नसतात त्यामुळे त्यांच्या उत्पादन क्षमतेवर उत्पादकतेवर आणि नफ्यावर अनिष्ट परिणाम होतो शिवाय सार्वजनिक क्षेत्रात उत्पादित होणाऱ्या वस्तू आणि सेवा यांचा दर्जा (गुणवत्ता) उपभोक्त्याला पसंत पडत नाही. यांचा अर्थ या वस्तुंची गुणवत्ता उपभोक्त्यांच्या

दृष्टीने समाधानकारक नसते. तसेच ग्राहकांच्या तक्रारीकडे दुर्लक्ष केले जाते. खाजगी उद्योगात मात्र हे दोष राहत नाही. म्हणून सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचे खाजगीकरण करणे आवश्यक ठरते.

**१.५.१ इतर राष्ट्रातील खाजगीकरणाचा अनुभवः**

ब्रिटनच्या तत्कालीन पंतप्रधान मिसेस मागरिट थॅचेर यांनी ब्रिटन मधील सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचे खाजगीकरण यशस्वीरित्या पूर्ण केले आहे. ब्रिटन सरकारने सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचा नफा वाढविण्यासाठी खाजगीकरणाचा निर्णय घेतला. तेथील सार्वजनिक क्षेत्रातील ६ लाख कर्मचारी खाजगी क्षेत्राकडे पोहचविले. या खाजगीकरणाचा प्रयोग अत्यंत यशस्वी झाल्याचे मानले जाते. तसेच सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचे ८३% भागभांडवल कर्मचाऱ्यांना विकण्यात आले. त्यामुळे कंपन्यांची उत्पादकात ३०% वाढली. खाजगीकरणानंतर उद्योगांचा विस्तार वेगाने झाल्यामुळे भागधारकांच्या भागांचे मूल्य ४० पटीने वाढले विशेषतः ब्रिटीश टेलिकॉम, ब्रिटीश गॅस कार्पोरेशन आणि इतर सरकारी उद्योगांची खाजगीकरणा नंतर कार्यक्षमता, लाभता आणि भांडवलांची मूल्यवृद्धी झपाटयाने झाली. ब्रिटनचा अनुभव आणि नेत्रदिपक यश यामुळे फ्रान्सने १९८० दरम्यान ६५ सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचा खाजगीकरणाचा निर्णय घेतला या खाजगी करणातून फ्रान्स सरकारला ५० दशलक्ष डॉलर्सचे उत्पन्न मिळाले ऑस्ट्रेलियातही याच काळात १५० कोटी डॉलर्सचा संचित तोटा असलेल्या सार्वजनिक १९८ उद्योगांच्या खाजगीकरणाचा निर्णय घेतला. या खाजगीकरणातून फ्रान्स सरकारला ५० द.ल. डॉलर्सचे उत्पन्न मिळाले. ऑस्ट्रेलियातही याच काळात १५० कोटी डॉलर्सचा संचित तोटा असलेल्या १९८ सार्वजनिक उद्योगांच्या खाजगीकरणाचा निर्णय घेतला.

प्रगत राष्ट्रांना सार्वजनिक क्षेत्रात उद्योगांचा खाजगीकरणाचा आलेला उत्साहवर्धक अनुभव लक्षात घेऊन अनेक अल्प विकसित व विकसनशील राष्ट्रांनी सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांच्या खाजगीकरणाचा मार्गस्विकारला. जगातील ८० विकसनशील राष्ट्रांत सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांच्या खाजगीकरणाची प्रक्रिया चालू आहे. यामध्ये चीन, अल्जेरिया, टांझानिया यासारख्या सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचे प्राबल्य असणाऱ्या राष्ट्रांचा समावेश आहे. तसेच ब्राझील, मेक्सिको या राष्ट्रांनी आर्थिक संकटातून बाहेर पडण्यासाठी सार्वजनिक उद्योगांचे खाजगीकरण करण्याचे निर्णय घेतला आहे. पाकिस्तान मध्येही खाजगीकरणाची प्रक्रियासुरू झाली आहे. चीन सारख्या राष्ट्रांनी विमा, बँका आणि सार्वजनिक सेवा उपलब्ध करणाऱ्या सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचे खाजगीकरण सुरू केल्यामुळे त्याच्या कार्यक्षमतेवर व लाभतेवर अनुकूल परिणाम झाला आहे.

**१.५.२ जपानमधील अनुभवः**

- जपानमध्ये कोणत्याही सार्वजनिक उद्योगाचे खाजगीकरण करता येते.
- १८७४ ते ९६ या काळात जपान मध्ये २४ सार्वजनिक उद्योगांचे भांडवल विक्री करून खाजगीकरण केले होते. उदा. जहाज उद्योग, सिमेंट उद्योग, साखर उद्योग, काच उद्योग इ.
- दुसऱ्या महायुद्धानंतर वीज निर्मिती उद्योगाचे खाजगीकरण करण्यात आले.
- दुसऱ्या महायुद्धानंतर अनेक सरकारी बँकाचे खाजगीकरण करण्यात आले.
- १९८१ मध्ये प्रशासकीय सुधारणा समितीने २३ सार्वजनिक उद्योगांच्या खाजगीकरणाची आणि ७ सार्वजनिक उद्योग बंद करण्याची शिफारस केली.

### १.५.३ भारतातील खाजगीकरणः

भारताने स्वातंत्र्योत्तर काळात जलद आर्थिक विकास आणि समाजवादी समाज रचना प्रस्थापित करणे या दोन महत्त्वाच्या उद्दिष्टय पूर्तीसाठी सार्वजनिक क्षेत्रातील सार्वजनिक उद्योगांचा विस्तार करण्याचे धोरण स्वीकारले. परंतु सार्वजनिक क्षेत्रातील या उद्योगांचा तोटा वाढू लागला. त्यामुळे अर्थ तज्ञांनी सार्वजनिक उद्योगा विरूद्ध बाजू घेण्यास सुरूवात केली. १९९१ मधील नवीन औद्योगिक धोरणाने सार्वजनिक क्षेत्रात सुधारणा घडवून आणण्याचे सुचित करण्यात आले. १९९१-९२ पर्यंत भारतातील २४६ सार्वजनिक उद्योगातील एकूण गुंतवणूक जवळ-जवळ १००,००० कोटी रूपयांची होती. त्यातील काही मोजक्याच उद्योगांना नफा मिळविता आला. हा तोटा भरून काढण्यासाठी सरकारला दरवर्षी आपल्या अंदाज पत्रकात ७००० कोटी रूपयांची तरतूद करावी लागली त्यामुळेच या क्षेत्रातील सुधारणेबाबत चर्चाहोऊ लागली. तसेच जागतिक बँक आणि नाणेनिधी या आंतरराष्ट्रीय संस्थांच्या दबावामुळे भारताला आपली पारंपारिक भूमिका बदलावी लागली.

सार्वजनिक (सरकारी ) उद्योगांचा कारभार सुधारण्यासाठी सरकारला खाजगीकरणाकडे वळावे लागले. आर्थिक सुधारणांच्या पहिल्या टप्प्यात( १९९१-९२ ते २०००-०२) भारताने खाजगीकरणाच्या दिशेने महत्त्वाची पाऊले उचलली. तथापि सार्वजनिक उद्योगातील बळकट आणि सामर्थ्यवान कामगार संघटनांना खाजगीकरण म्हणजे निःराष्ट्रीयीकरण वाटत असल्याने त्यांचा खाजगीकरणाला प्रचंड विरोध होता. शिवाय खाजगीकरणामुळे कामगार कपात झाल्यामुळे नुकसान भरपाई म्हणून दयावी लागणारी रक्कम कामगारांना मान्य नव्हती. खाजगीकरण नफ्यात चालणाऱ्या उद्योगांचे करायचे की तोटयात चालणाऱ्या उद्योगांचे करायचे हा ही गंभीर प्रश्न निर्माण झाला.

भारत सरकारने जुलै १९९१ मध्ये नवीन औद्योगिक धोरण जाहीर करून सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगधंदयासाठी चार महत्त्वाचे निर्णय घेतले ते पुढील प्रमाणेः

१. सार्वजनिक क्षेत्रातील राखीव उद्योगांची संख्या १७ वरून ६ पर्यंत कमी करणे.

२. सार्वजनिक क्षेत्रातील निवडक उद्योगात अल्प गुंतवणूक करणे त्यामुळे साधनसामुग्री उभारणे शक्य होईल आणि या क्षेत्रातील उद्योगात मालकी हक्कात कामगार व सामान्य जनतेला अधिक सहभागी होता येईल.

३. आजारी उद्योगांसाठी सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातील उद्योगांसाठी समान धोरण राहील.

४. ''परस्परांच्या समजूतीचा करार'' (MOU) या माध्यमाने कार्यक्षमतेत सुधारणा करणे यामध्ये व्यवस्थापनात अधिक स्वायत्ता देणे पण ती विशेष परिणामाच्या जबाबदारीसह राहील.

याबरोबरच आजारी किंवा संभाव्य आजारी सरकारी उद्योगांच्या अंदाजपत्रकी मदतीत परिणाम कारक घट करणे. खाजगीकरणाच्या दृष्टीने पुढील महत्त्वाच्या निर्णयांची अंमलबजावणी करण्यात आली.

### अ. अराखीवः Dereservation

भारत सरकारने नियोजनाला सुरवात केल्यानंतर १९५६ मध्ये औद्योगिक धोरण जाहीर करून सार्वजनिक क्षेत्रासाठी ११ उद्योग राखीव ठेवले. १९९१ च्या नव्या औद्योगिक धोरणाने अणुउर्जा, कोळसा व लिग्नाईट, खनिज तेल, अशुद्ध लोखंड माती मॅगनीज क्रोमियम, माती, जिप्सम, सल्फर, सोने व हिरे यांच्या खाणी अणुऊर्जेसाठी लागणारे धातू, रेल्वे वाहतूक, दारू गोळा व शस्त्रे इत्यादी उद्योगच राखीव ठेऊन बाकीचे सर्व

अराखीव केले. १९९३ मध्ये राखीव उद्योगांची संख्या ८ वरून ६ पर्यंत कमी केली. म्हणजेच सरकारी उद्योगांच्या खाजगी करणाचे धोरण मोठ्या प्रमाणात स्वीकारण्यात आले.

**ब. आजारी उद्योगाबाबत धोरणः**

१९९१ च्या औद्योगिक धोरणाने सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगही औद्योगिक आणि वित्तीय पुर्नरचना (Board for Industrial and financial Reconstruction- BIFR) मंडळाच्या अधिकार कक्षेखाली आणले या मंडळाने आजारी सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांची परिणाम कारक पुनर्रचना करणे शक्य आहे किंवा ते बंद करायचे याविषयी निर्णय घ्यायचा आहे. १९९८ मध्ये केंद्र सरकारचे ८२ सार्वजनिक उद्योग आणि राज्य सरकारचे १४३ उद्योग अशी एकूण २२५ प्रकरणे या मंडळाकडे सोपविण्यात आली. यापैकी ३० प्रकरणे बंद केली ५० प्रकल्पांच्या पुनरूजीवन योजनांना मान्यता दिली आणि केंद्र सरकारची १० व राज्यांची १९ अशा २९ प्रकरणात ती गुंडाळण्याची म्हणजेच व्यवहार बंद ठेवण्याची शिफारस केली. या मंडळाने केंद्र सरकारचे २ आणि राज्य सरकारांचे ४ असे सार्वजनिक क्षेत्रातील ६ आजारी उद्योग पुनर्वसन योजना पूर्ण केल्याने त्यांना आजारी नाहीत असे जाहीर केले. प्रामुख्याने मोठया प्रमाणात कामगारांची कपात करावी लागेल म्हणून सार्वजनिक क्षेत्रातील आजारी उद्योग, शक्यतो बंद करण्याचे टाळले. ही परिस्थिती हाताळण्यासाठी सरकारने राष्ट्रीय नुतनीकरण निधीची (National Renowal Fund-NRF) स्थापना केली. कामगारांच्या प्रशिक्षणासाठी आणि स्थलांतरासाठी या निधीचा वापर करावयाचा होता. तसेच सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगातीलस्वेच्छा निवृत्ती घेणाऱ्या कामगारांना नुकसान भरपाई देण्यासाठी या निधीचा वापर करण्यात येणार होता.

**क. परस्पर समजुतीचा करारः**

भारतामध्ये १९८८ मध्ये संमजंस पत्राद्वारे ही संकल्पना सुरू केली. परस्पर समजुतीचा करार म्हणजे उद्योगावर नियंत्रणाची संख्या कमी करणे आणि जबाबदारीची गुणवत्ता वाढविणे. उद्योगांच्या दैनंदिन कामामध्ये हस्तक्षेप करण्यापेक्षा निश्चित केलेल्या बाबी मिळविण्यासाठी व मान्य केलेली उद्दिष्ट्ये साध्य करण्यावर जोर देणे. १९८७-८८ मध्ये समंजस करारांची संख्या ४ होती. ती १९९७-९८ मध्ये १०८ झाली. १९९७-९८ मध्ये संमंजस करावर सहया केलेल्या उद्योगावर ६६% सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचा दर्जा अतिशय चांगला व उत्कृष्ट होता.

**ड. नवरत्नाविषयीचे धोरणः**

सरकारने १९९७-९८ च्या अंदाज पत्रकात सार्वजनिक क्षेत्रातील ९ उत्कृष्ट कार्यक्षमता असणाऱ्या उद्योगांना नवरत्नांचा दर्जा दिला. या उद्योगांना पूर्ण वित्तीय आणि व्यवस्थापकीय स्वायत्ता दिली. त्यामुळे त्यांची कार्यक्षमता वाढवून जागतिक दर्जा प्राप्त होईल. सरकारी उद्योगांना मिळणाऱ्या एकूण नफ्यांच्या ७५% हे उद्योग मिळवत असे. या उद्योगामध्ये आणखी उद्योगांचा समावेश करण्यात आला. त्यामुळे त्यांची संख्या ११ इतकी झाली. ४ जुलै १९९७ मध्ये सरकारने या उद्योगांना 'स्वायत्ता योजना' जाहीर केली. त्यानुसार त्यांना पुढील प्रमाणे स्वातंत्र्य दिले.

१) कोणत्याही चलन विषयक मर्यादेशिवाय सर्व भांडवली खर्चाबाबत निर्णय घेणे.

२) देशातंर्गत व आंतरराष्ट्रीय बाजारातून कर्जे उभारणे.

३) संयुक्त प्रकल्पाद्वारे तंत्रज्ञान प्रवेश करणे आणि २०० कोटी रुपयापर्यंत पूर्ण मालकीच्या सहाय्यक उद्योगात समभाग गुंतवणे.

४) उच्च दर्जाच्या अर्थवेळ संचालकाच्या सहाय्याने मंडळाची पुर्नरचना करणे.

५) मनुष्यबळ व्यवस्थापन आणि कर्मचारी यांच्याशी संबंधित योजनेशी रचना करणे.

या बरोबरच आक्टोंबर १९९७ मध्ये सरकारने नफा मिळविणाऱ्या ९७ उद्योगांना मिनीरल संबोधले व त्यांच्यासाठी वित्तीय आणि कार्यात्मक स्वायत्ता जाहीर केली कार्यक्षमतेच्या आधारे त्यांचे २ गट केले आणि मनुष्यबळ विषयक धोरणाचे त्यांना स्वातंत्र्य दिले.

**इ. भागांची निर्गुंतवणूक : Disinvestment Shares**

खाजगीकरणाच्या माध्यमातून सार्वजनिक उद्योगांच्या सरकारी भागांच्या निर्गुंतवणूक करणे हे महत्त्वाचे उद्दिष्ट अंदाजपत्रकासाठी चलनवाढी व्यतिरिक्त वित्तीय उभारणी करायची होती. तसेच सरकारने १९९१-९२ मध्ये निर्गुंतवणुकीचा कार्यक्रम घोषित केला. १९९७-९८ पर्यंत निर्गुंतवणूकीच्या विविध फेऱ्यातून सरकारला १२०० कोटी रू. पर्यंत मिळण्याची अपेक्षा होती. १९९८-९९ पर्यंत सरकारने अपगुंतवणूकीद्वारा ५००० कोटी रू.चे लक्ष्य केले. अर्थात सरकारला निर्गुंतवणुकीपासुन अपेक्षित प्राप्ती झाली नाही. सरकारने अपगुंतवणुकीचा निर्णय अत्यंत घाईघाईने अनियोजित आणि अनिश्चित मार्गांने राबविला अशी टिका केली जाते. सर्वच उद्योग स्टॉक-एक्सेंजच्या यादीवर नव्हते तसेच पुरेसे प्रयत्नही झाले नाहीत आणि योग्य पद्धतीचा अभाव होता. त्यामुळे अपेक्षित यशमिळाले नाही.

**फ. निर्गुंतवणुक आयोगाची स्थापनाः Disinvestment Commission**

१९९३ मध्ये सी. रंगराजन यांच्या अध्यक्षतेखाली सरकारने निर्गुंतवणुकीबाबत व्युव्हरचना आयोग नेमला त्यानंतर १९९६ मध्ये सरकारने जी.व्ही. रामकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली ५ सदस्यांचा सार्वजनिक क्षेत्रासाठी निर्गुंतवणूक आयोग नेमला या आयोगाची मुख्य ४ उद्दिष्ट्ये होती.

१) सार्वजनिक उद्योगांना सबल बनविणे( बळकट)

२) कामगार हिताचे रक्षण करणे

३) विस्तृत पायावर आधारित मालकी प्रस्थापित करणे

४) सरकारच्या उत्पन्नात भर टाकणे.

या आयोगाने आज अखेर ८ अहवाल सादर केले. त्यात ४३ उद्योगांचा समावेश होता. २० उद्योगांची विक्री वाढविण्याविषयीची शिफारशी केल्या आहेत तर काही उद्योगात निर्गुंतवणूक करूनये अशी शिफारस केली आहे. जून २००० मध्ये १३०० कोटी रूपयांचा संचित तोटा असणाऱ्या एअर इंडियाच्या खाजगी करणाची घोषण केली.

निर्गुंतवणूक आयोगाने सार्वजनिक उद्योगांच्या पुर्नरचनेची शिफारस केली. भागांची किंमत आणि विक्री वाढविण्यासाठी वित्तीय आणि भांडवली तंत्रज्ञानाच्या विविध क्षेत्रात पुर्नरचना केली पाहिजे. आयोगाने प्रत्येक उद्योगाचा अभ्यास करून २ गटात उद्योगांचे वर्गीकरण केले आहे या दोन्ही विभागातील उद्योगांची पुर्नरचना करावी असे प्रतिपादन केले.

**खाजगीकरणाचे मूल्यमापनः**

जागतिकीकरणाचा विचार करता भारतातील खाजगीकरणाची प्रक्रिया सुरू करून एक दशक पूर्ण झाले आहे. भारतासारख्या मिश्र अर्थव्यवस्थेत सार्वजनिक उद्योगात प्रचंड गुंतवणूक झाली आहे. त्यांच्या अपयशाने सरकारने खाजगी करणाचा मार्ग स्वीकारला आहे. अर्थात भारतात खाजगीकरणाचा निर्णय हा

जागतिक बँक व नाणेनिधी या आंतरराष्ट्रीय वित्तसंस्थांच्या दबावामुळेच घेण्यात आला. भारताने विविध मार्गांनी खाजगीकरणाचे धोरण राबविण्यास सुरूवात केली. खाजगीकरण हा प्रयोग न राहता कार्यप्रणाली राहीली पाहिजे. खाजगीकरणाच्या प्रक्रियेत पुढील दोष दाखविले जातात.

१) भारतामध्ये सरकारी उद्योगातील निर्गुंतवणुकीसाठी योग्य नियोजन नव्हते. घाई गडबडीने निर्गुंतवणूक प्रक्रिया सुरू केली.

२) सार्वजनिक क्षेत्रातील आजारपणावर खाजगीकरण हे रामबाण औषध नाही. खाजगी क्षेत्रावरही योग्य नियंत्रण नसेल तर मक्तेदारीला प्रोत्साहन मिळेल आणि उपभोक्त्यांची पिळवणूक होते.

३) मालकी हक्क आणि कार्यक्षमता यामध्ये सकारात्मक संबंध असतो. म्हणून खाजगीकरणाने कार्यक्षमता सुधारेल असे म्हणता येईल. अर्थतज्ञांच्या मते, 'स्पर्धात्मक बाजार' ही कार्यक्षमता साध्य करण्याचे महत्त्वाचे साधन आहे.

४) १९७५-९० या काळात बांग्लादेशाने खाजगीकरणाच्या मार्गाने सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणूकीचे प्रमाण कमी केले. कौशिक बसू यांच्या मते, 'खाजगीकरणाचे यश यशस्वी नियोजनावर अवलंबून असते.

५) खाजगी क्षेत्रातील अनेक उद्योगही अकार्यक्षम आहेत त्यांचा संचित तोटा वाढत आहे. त्यामुळे खाजगीकरणाने सरकारी उद्योगांची कार्यक्षमता वाढेल यांची खात्री देता येत नाही.

६) खाजगीकरणाच्या धोरणाला उद्योजक, कामगार, भांडवलदार यांचा तीव्र विरोध सहन करावा लागतो.

**समारोपः**

सद्यपरिस्थितीचा विचार करता भारताला खाजगीकरणाच्या धोरणापासून माघार घेता येणार नाही. अर्थ व्यवस्थेच्या विविध क्षेत्रांची कामगिरी सुधारण्यासाठी खाजगीकरणाचा मार्ग स्वीकारताना भारताने इतर राष्ट्रांचा अनुभव विचारात घेतला पाहिजे. उपक्रमानुसार पद्धती ठरवाव्या लागतील. भारतासारख्या खंडप्राय आणि विविध अर्थिक समस्या असणाऱ्या तसेच प्रादेशिक विषमता असल्याने ही उपाययोजना आवश्यक त्या क्षेत्रातच करावी. सर्वांगीण परिस्थितीचा विचार करून कोणत्या व्यवसाय संस्थांचे खाजगीकरण करणे गरजेचे आहे ते निश्चित करावे. तरच खाजगीकरणाचा अर्थ व्यवस्थेवर अनुकूल परिणाम होईल.

## १.६ उदारीकरणः Liberalisation

### १.६.१ प्रस्तावनाः

भारताने १९९१ मध्ये नवीन अर्थिक कार्यक्रम सुरू केले. नवा अर्थिक कार्यक्रम नवा तसेच धाडसी मानला जातो. यामध्ये अर्थिक उदारीकरण या घटकाला महत्त्वाचे स्थान आहे. १९८० नंतर जगातील अनेक राष्ट्रांनी अर्थव्यवस्थेत शिथिलीकरण आणि जागतिकीकरण या संकल्पनांचा स्वीकार केला.

उदारीकरण म्हणजे आपल्या देशाचा जगातील इतर राष्ट्रांशी खुला व्यापार असणे आणि देशांतर्गत खाजगी क्षेत्रावर कोणतेही बंधन नसणे होय. सीमाशुल्क आणि वाटप पद्धती नष्ट करणे हा शिथिलीकरणा मागचा हेतू आहे. उदारीकरणाची संकल्पना ही बाजार यंत्रणा आणि खुला(मुक्त) बाजार आणि मुक्त स्पर्धा यांवर आधारित आहे. म्हणू न उदारीकरणाच्या धोरणाचा स्वीकार केला जातो. म्हणजे सरकार निष्क्रिय असावे असे समजले जाते. तथापि पैशाची निर्मिती आणि पुरवठा सरकारने केला पाहिजे बाजार मक्तेदारी निर्माण होणार नाही तसेच उपभोक्त्यांचे शोषण होणार नाही हे सरकारने पाहीले पाहिजे. थोडक्यात सरकारचे

कार्य देखरेख आणि संरक्षणांचे असावे तथापि उदारीकरणाच्या धोरणात अर्थव्यवस्थेच्या कोणत्याही क्षेत्रात सरकारचा अनावश्यक हस्तक्षेप नसावा.

**१.६.२ व्याख्या**

१) ''आर्थिक उदारीकरण म्हणजे आयात आणि उत्पादन गुंतवणुकीवरील अनिष्ट निर्बंध, नियंत्रणे आणि परवाने मोडित काढणे होय.''

२) डॉ.व्ही.एन.अत्रीः

''अर्थिक उदारीकरणाचा अर्थ अधिक विस्तृतपणे किंमत यंत्रणेचा वापर करणे होय. ज्यायोगे व्यापार पद्धतीची निर्यात विरोधी प्रवृत्ती कमी होईल. अर्थ व्यवस्थेतील कार्यक्षमता आणि स्पर्धा वाढविणे गरजेचे आहे.''

थोडक्यात सरकारने मुख्यतः आयात निर्यात, उत्पादन यांवर कोणत्याही प्रकारचा निर्बंध लादू नयेत. अनावश्यक नियंत्रणे दूर करावीत बाजारपेठेत किंमत यंत्रणेच्या माध्यमाने जसे व्यवहार होतील त्यावर निर्बंध आणू नयेत. अर्थव्यवस्थेत अधिक स्पर्धा आणि कार्यक्षमता असावी विदेशी विनिमय बाजार वित्तीय बाजार शेतमालाचा बाजार इत्यादी बाबतचे अडथळे दूर करणे म्हणजे आर्थिक उदारीकरण होय. आर्थिक उदारीकरण स्वीकारल्यास किंवा बाजाराधिष्ठित किंमत यंत्रणेतील अडथळे दूर केल्यास अर्थव्यवस्थेची स्पर्धा शक्ती, कार्यक्षमता आणि उत्पादकता वाढते. परिणामी राष्ट्रीय उत्पादन जलद गतीने वाढते. थोडक्यात आर्थिक उदारीकरणाद्वारे अर्थव्यवस्थेत निकोप स्पर्धा केली जाते. आर्थिक उदारीकरण म्हणजे सरकारी नियंत्रण आणि हस्तक्षेप कमीत-कमी असा अर्थ आहे.

**१.६.३ भारतातील उदारीकरणः**

स्वातंत्र्योत्तर काळात भारताने स्वीकारलेल्या औद्योगिक धोरणामुळे सरकारी नियंत्रण आणि सरकारी उद्योगांना प्राधान्य देण्याचे धोरण स्वीकारले होते. परंतु त्यामुळे अर्थव्यवस्थेत अनेक दोष निर्माण झाले परिणामी १९८० च्या औद्योगिक धोरणाने उदारीकरणाला मान्यता देण्यात आली. या धोरणानुसार मोठ्या उद्योगांच्या परवाना धोरणाबाबत शिथिलता आणि भारत सरकारने १९८६ मध्ये २३ उद्योगांना मक्तेदारी नियंत्रण, विदेशी विनिमय नियंत्रण कायद्यातून परवाना मुक्त केले. औद्योगिक परवान्याचे शिथिलीकरण करण्यात आले. जुलै १९९१ मध्ये नव्या औद्योगिक धोरणाने उदारीकरणाचे धोरण स्वीकारले. जागतिक अर्थव्यवस्थेशी आपली अर्थव्यवस्था एकरूप होण्यासाठी उदारीकरणाचे धोरण स्वीकारले तसेच प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीतील नियंत्रणे दूर केली. देशांतर्गत उद्योगांना मक्तेदारी नियंत्रण कायद्यातून मूक्त करण्यात आले. या औद्योगिक धोरणामुळे भारतात विविध आर्थिक सुधारणा सुरू झाल्या १९९३ मध्ये सरकारने सक्तीच्या परवाना पद्धतीमध्ये १८ राखीव उद्योगांपैकी अनेक राखीव उद्योग मुक्त केले.

भारताने नाणेनिधीच्या सल्याने '' स्थिरीकरणाचे धोरण या स्वरूपात उदारीकरणाच्या धोरणाचा स्वीकार केला १९९३-९४ पासून नवीन अर्थिक धोरण म्हणजे संरचनात्मक समायोजन कार्यक्रम सुरू केला. स्थिरीकरणाच्या धोरणामुळे देशार्तंगत चलनाचे अवमूलन राजकोषीय तुटीत कपात आणि विदेशी भांडवलाच्या मुक्त प्रवाहातील अडथळे दूर करणे असे उपाय योजण्यात आले. तसेच संरचनात्मक समायोजन कार्यक्रमात राजकोषीय क्षेत्रात विदेशी विनिमय दर, व्यापार, औद्योगिक धोरण, सार्वजनिक क्षेत्राचे धोरण, वित्तीय क्षेत्र आणि भांडवल बाजार इत्यादी मध्ये सुधारणा करणे या सर्व धोरणांना संयुक्तरित्या आर्थिक उदारीकरण असे म्हटले जाते.

## अ) उदारीकरणाची अंमलबजावणी:

भारताने १९९१ पासून खऱ्या अर्थाने आर्थिक सुधारणांच्या माध्यमातून आर्थिक उदारीकरणाची अंमलबजावणी सुरू केली असली तरी १९९१ पूर्वी उदारीकरणाच्या धोरणाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले नव्हते. भारताने या धोरणांचा पाठपुरावा १९७५ मध्ये सुरू केला आहे. त्याचे विश्लेषण पुढील प्रमाणे–

१) १९७५–१९८० या कालखंडात उदारीकरणाचे प्रयत्न झाले. ऑक्टोंबर १९७५ मध्ये भारताने २१ उद्योग परवाना मुक्त केले. या उद्योगांना विस्तार करण्याचे स्वातंत्र दिले आणि या उद्योगांनी आपले अतिरिक्त उत्पादन निर्यात करावे किंवा सरकारच्या सुचनेप्रमाणे विक्री करावे असे बंधन घालण्यात आले. १९७८ मध्ये परवाना पद्धती आखणी खुली करण्याचा निर्णय घेण्यात आला. १९७५–८० या दरम्यान विदेशी भांडवला संबंधी उदारधोरण स्वीकारले. भांडवली वस्तूंची आयात, कच्चा मालाची आयात आणि सुट्या भागांची आयात यावरील निर्बंध १९७९–८० मध्ये शिथिल केले.

२) १९८०–८५ या कालखंडात कोणत्याही उद्योगाला आपली उत्पादन क्षमता २५% पर्यंत वाढविण्यात परवानगी देण्यात आली. भारतीय उद्योगांची स्पर्धा वृत्ती वाढविणे व उत्पादनातील कार्यक्षमता सुधारणे यासाठी उदारीकरणाचा निर्णय घेण्यात आला. १९८२ मध्ये मक्तेदारी प्रतिबंधक कायद्याअंतर्गत (MRTP Act) कंपन्यांना मागास भागात उद्योग सुरू करण्यासाठी परवानगी देण्याचा निर्णय घेतला. विदेशी व्यापारी संबंधी उदारीकरणाचे धोरण स्वीकारले. विदेशी सहयोगातून व विदेशी भांडवलातून औद्योगिकीकरण्यासाठी उदारीकरणाचे धोरण स्वीकारले. त्यामुळे या कालखंडात उद्योगातील उत्पादन क्षमतेच्या वापरात ७३.२% पासून ७८.८% पर्यंत वाढ झाली. अर्थात, उदारीकरणामुंळे आयात वाढल्याने व्यवहार शेषात तूट निर्माण झाली.

३) १९८५–१९९१ च्या कालखंडात अर्थव्यवस्थेतील कार्यक्षमता सुधारण्यास योग्य वातावरण निर्माण करण्याचा आणि जागतिक अर्थव्यवस्थेशी समन्वय साधण्यासाठी संरचनात्मक बदल करण्याचे धोरण राबविण्यास सुरूवात झाली. उदारीकरणाच्या दृष्टीने काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. मागणी प्रमाणे उत्पादन करण्यासाठी उद्योगांना विविधीकरणाचे स्वातंत्र्य देण्यात आले. यामध्ये ऑटोमोबाईल उद्योग पेट्रोकेमिकल उद्योग, औषध उद्योग निर्मिती इ.चा समावेश होता. १९८६–८७ मध्ये २७ उद्योगांना मक्तेदारी प्रतिबंधक कायद्याच्या कसे बाहेर आणले तसेच मक्तेदारी प्रतिबंधक कायद्यांतर्गत कंपन्यांच्या मत्तांची (Assets) मर्यादा २० कोटी रूपयांवरून १०० कोटी रुपयांवर वाढविण्यात आले. इलेक्ट्रॉनिक उद्योगात तंत्रज्ञान आयातीला पूर्ण परवानगी देण्यात आले. म्हणजे १९९१ पर्यंत आर्थिक उदारीकरणाबाबत समाधानकारक प्रगती झाल्याचे दिसून येते.

## ब. १९९१ नंतरची अर्थिक उदारीकरणाची अमंलबजावणी:

भारतामध्ये खऱ्या अर्थाने आर्थिक उदारीकरणाच्या धोरणाला चालना मिळाली ती पी.व्ही. नरसिंहराव यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या धोरणामुळे. त्यांनी औद्योगिक धोरण, व्यापारी धोरण, विनिमयदराचे धोरण आणि १९९१–९२ चे अंदाजपत्रक या विविध धोरणात्मक निर्णयातून आर्थिक उदारी करणाची अंमलबजावणी सुरू केली उदारीकरणासंबंधी सरकारने पुढील महत्त्वाचे निर्णय घेऊन त्यांची अंमल बजावणी केली.

१) औद्योगिक परवाना पद्धती नष्ट केली. राष्ट्रीय संरक्षणाच्या दृष्टीने आवश्यक उद्योगाव्यतिरिक्त सर्व उद्योग परवाना मुक्त केले.

२) विदेशी गुंतवणूक आणि तंत्रज्ञानात मुक्त प्रवेश दिला. भारतातील औद्योगिक आणि व्यवसायिक कंपन्यांचा समभागात ५१% किंवा त्यापेक्षा जास्त विदेशी गुंतवणूक दारांना परवानगी देण्यात आली. विशेषतः अनिवासी भारतीयांना गुंतवणूक करण्यास प्रोत्साहन दिले.

३) मक्तेदारी व व्यापारी नियंत्रण कायदा, मर्यादा रद्द केली. १९८५ मध्ये या उद्योगांची मालमत्ता १०० कोटी रूपयांपेक्षा जास्त असेल तर ते उद्योग या कायदया खाली येतील असे जाहीर केले. तसेच उपभोक्त्यांना पुरेसे संरक्षण देण्याची तरतूद केली.

४) सार्वजनिक (सरकारी) क्षेत्र कमी केले. सरकारने १९५६ पासून सार्वजनिक क्षेत्रासाठी राखून ठेवलेल्या उद्योगांची संख्या कमी करून ती ५ वर आणली. तसेच प्रस्थापित उद्योगात नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यात आला. १९९७-९८ पर्यंत सरकारी क्षेत्रातील उद्योगांचे ११३६९ कोटी रू. एवढ्या किंमतीचे भागरोखे वित्त संस्थांना दिले. त्यामुळे खाजगी क्षेत्राचे महत्त्व वाढले.

५) पायाभूत क्षेत्र मुक्त करण्याचा निर्णय घेतला. पायाभूत क्षेत्रात म्हणजेच वीज, रस्ते, पूल, बंदर विकास या सारख्या मूलभूत सेवा क्षेत्रात विदेशी गुंतवणूक दारांना प्रवेश देण्याचा निर्णय घेण्यात आला.

६) विदेशी चलनाचे व्यवहार नियंत्रण मुक्त करण्यासाठी रूपया मुक्त करण्यात आला. म्हणजेच चालू खात्यावर रूपया परिवर्तनीय करण्यात आला.

७) 'फेरा' ऐवजी'फेमा' असा कायद्यात बदल केला. म्हणजे विदेशी चलन व्यवहार नियंत्रण (फेरा) कायदा या ऐवजी नव्या उदारीकरणाच्या धोरणास सुसंगत अशा विदेशी विनिमय व्यवस्थापन कायदा(फेमा) असा बदल केला.

८) वित्तीय क्षेत्रात उदारीकरणाचा निर्णय घेण्यात आला. श्री. नरसिंहम समितीच्या शिफारशी स्वीकारून सरकारी बँकांचे खाजगीकरण, बँकांना निर्णय स्वातंत्र्य आणि व्याज दरावरील निर्बंध उठविल्याने बाजारातील व्याजाचे दर बाजाराधिष्टीत आहेत.

९) भारतीय कर पद्धतीत सुधारणाकरून कर पद्धती साधी आणि सोपी करण्यात आली. याबाबत राजा चेलिया समितीच्या ८५% शिफारशी सरकारने स्वीकारल्या.

१०) भांडवल बाजार व नाणे बाजारात सुधारणा केल्या. त्यामध्ये विदेशी गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी विविध उपाय योजून पारदर्शकता आणली.

**१.६.४ उदारीकरणाचे परिणाम (प्रभाव)**

भारताने १९९१-९२ पासून स्वीकारलेल्या उदारीकरणाच्या धोरणाचे कृषी उद्योग व व्यापारी क्षेत्रावर झालेले परिणाम पुढील प्रमाणे-

**१.६.४.१ कृषी क्षेत्र/ शेती क्षेत्रः**

भारतीय कृषी क्षेत्राची दर हेक्टरी उत्पादकता खूपच कमी होती. शेतीवर आजही ७०% लोकसंख्या अवलंबून आहेत. औद्योगिक विकासाच्या मंद वेगाने आणि विस्तृत रोजगार संधीच्या अभावामुळे शेतीवरील ताण वाढतच होता. वारसाहक्कामुळे शेतीचे विभाजन आणि तुकडीकरण वाढत होते. या पार्श्वभूमीवर १९६० नंतरच्या दशकात शेतीबाबत स्वीकारलेल्या आधुनिक धोरणामुळे हरीत क्रांती घडून आली आणि अन्नधान्य उत्पादन प्रचंड प्रमाणात वाढले. या पार्श्वभूमीवर उदारीकरणाची शेतीवरील परिणामांची चर्चा करणे गरजेचे आहे. उदारीकरणाचा कृषी क्षेत्रावरही परिणाम झाला. उदारीकरणामुळेही भारतातून निर्यात होणाऱ्या अनेक कृषी उत्पादनावरील नियंत्रणे दूर झालीत.अन्नधान्याच्या स्वयंपूर्णतेने अन्नधान्याच्या निर्यातीला सरकारने

प्रोत्साहन दिले. रासायनिक खतावरील अनुदान कमी केले. सरकारने धान्यांच्या खरेदी–किंमतीत वाढ केली. शेती क्षेत्राला पुरेसा वित्तपुरवठा व्हावा असा प्रयत्न करण्यात आला. मात्र उदारीकरणानंतर शेतीतील गुंतवणूक घटल्याचे दिसून आले.

सरकारने उदारीकरणाच्या धोरणाने शेतीसाठी योग्य उपाय योजना केल्या. सरकारने दोन कारणांसाठी अन्नधान्यावरील अर्थसाह्य चालू ठेवले.

१) शेती उत्पादनाला प्रोत्साहन मिळवून किमती स्थिर राहतील आणि शेतकऱ्यांना किमान भावांची (दर) हमी मिळेल.

२) जनतेला अन्न धान्याचा पुरवठा सुरळीत होईल. खतावरील अर्थसाह्य १९८७.८८ मध्ये २१.६४ अब्ज रूपये होते. ते १९९६–९७ मध्ये ८३.८२ अब्ज रूपयांपर्यंत पोचले. भारतातील कृषी मालाची निर्यात वाढविण्यासाठी काही महत्त्वाच्या दक्षता घेण्यात आल्या. कृषी मालाच्या आयातीवर सीमाशुल्क १९९०–९१ ते १९९५–९६ च्या काळात १०६% वरून २६% पर्यंत कमी केले. तसेच कृषी मालावरील आयात निर्बंध उठविले.

थोडक्यात, अनेक अर्थशास्त्रज्ञांनी उदारीकरणाने भारतीय कृषी क्षेत्राला लाभ होण्याची शक्यता असल्याची प्रतिपादन केले. कृषी क्षेत्राचे नवे तंत्रज्ञान, सिंचन व्यवस्था, उच्च उत्पादन बियाणे, खते, किटक नाशके यांचा उपयोग केल्यामुळे भारताने अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबन प्राप्त केले.शेतीक्षेत्राशी पावसावरील अवलंबित्व कमी केले. १९९६–९७ मध्ये शेतीच्या राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा २६% इतका होता. आजही कृषी क्षेत्राचा अर्थव्यवस्थेवर प्रभाव आहे. १९९३ नंतर शेती उत्पादनात फळे, भाज्या यांची निर्यात करण्याचे धोरण स्विकारले. १९९६–९७ मध्ये शेतमालाची निर्यात २४२३९ कोटी रूपयापर्यंत वाढली. शेती क्षेत्राच्या प्रगतीला चालना मिळाली.

### १.६.४.२ उद्योगधंदे: (Industry)

१९९१ च्या उदारीकरणाच्या धोरणाने औद्योगिक क्षेत्रात अनेक मूलभूत बदल घडून आले. उदारीकरणाच्या धोरणाने परवाना मुक्त धोरण राबविण्यास सुरवात झाली. विशेषतः औद्योगिक परवाना पद्धत अत्यंत सुलभ केली. सार्वजनिक क्षेत्रातील राखीव उद्योगांची संख्या कमी करण्यात आली. खाजगी उद्योगांना प्रोत्साहन देण्यात आले. सरकारी क्षेत्रातील उद्योगांच्या समभागांची अपगुंतवणूक करण्यात आली त्यामुळे खाजगीगुंतवणूकीला चालना मिळाली. विदेशी गुंतवणूकी बाबतही उदार धोरण स्वीकारण्यात आले. विदेशी उद्योजकांना देशात उद्योग सुरू करण्यासाठी पोषक वातावरण निर्माण केले. १९९१ मध्ये कायदेशीर परवाना पद्धत नष्ट केली. रूपयाचे चालू खात्यावर अंशतः परिवर्तन केले. १९९३ नंतर उद्योगात १००% गुंतवणूकीस विदेशी गुंतवणूकदारांना परवानगी दिली. १९९१–९५ काळात ३५१ अब्ज रूपयांच्या विदेशी गुंतवणूकीस मान्यता देण्यात आले. सर्वात जास्त गुंतवणूक २८.४% इतकीउर्जा क्षेत्रात होती. १९९१ च्या नव्या औद्योगिक धोरणामुळे अनेक चांगले परिणाम झाले. नोंदणी पद्धत रद्द केली. विदेशी तंत्रज्ञान आणि ५१% विदेशी भागभांडवलाला मान्यता दिल्यामुळे गुंतवणुकीचे प्रमाण वाढले या धोरणामुळे उद्योगांची स्थापना, वाढ आणि विस्तार यावरील नियंत्रणे कमी केली. मक्तेदारी कायद्यात शिथिलता आणली. उद्योगांच्या आधुनिकरणासाठी कामगार कायद्यात बदल करण्यात आले. राष्ट्रीय नवाकरण निधी स्थापना करून १९९४–९५ मध्ये २५२ कोटी रूपये व १९९५–९६ मध्ये २१७ कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली. आज अखेर १ लाख कामगारांनी स्वखुशीने निवृत्ती स्वीकारली. (स्वेच्छानिवृत्ती) लघु उद्योगांच्या विकासासाठी विदेशी गुंतवणुकीवरील २४% गुंतवणूकीची मर्यादा काढून टाकली. लघुउद्योगांचे विकासातील महत्त्व विचारात घेऊन धोरण आखले.

थोडक्यात, नव्या उदारीकरणाच्या धोरणाने औद्योगिक प्रगतीचा सरासरी वार्षिक वेग जास्त राहील, १९९१-९२ मध्ये औद्योगिक उत्पादनात सतत वाढ होत राहीली. १९९५- ९६ मध्ये मूलभूत उद्योगातील वाढ ८.३% भांडवली उद्योग १७.९% एवढी होती. उदारीकरणाच्या धोरणाने औद्योगिक उत्पादन वाढीवर चांगला परिणाम झाला. खाजगी देशांतर्गत व विदेशी गुंतवणूकीत वाढ झाली. १९९१-९७ या काळात औद्योगिक उत्पादनाचा सरासरी वार्षिक वाढीचा दर ७.५% होता. उदारीकरणाच्या धोरणाची मुख्य उद्दीष्ट्ये म्हणजे मूलभूत सुविधा क्षेत्रात गाभा व अग्रक्रम क्षेत्र, निर्यातीअभिमुख उद्योग शेती प्रभावी उद्योग या विविध उद्योगात विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीला चालना मिळावी. हे उद्दिष्ट्य औद्योगिक क्षेत्रात बऱ्याच प्रमाणात साध्य झाले आहे.

## १.७ जागतिकीकरण (Globalization)

### १.७.१ प्रस्तावनाः

जगातील बहुसंख्य राष्ट्रांनी १९८५ नंतर खाजगीकरण, उदारीकरण, आणि जागतिकीकरण या संकल्पना महत्त्वाच्या मानून त्यादृष्टीने आपली अर्थव्यवस्था योग्य मार्गावर आणण्यास सुरूवात केली. खाजगीकरण आणि उदारीकरण यांचा अंतिम हेतू जागतिकीकरण हाच आहे. अर्थव्यवस्थेच्या जागतिकीकरणावरून 'बाजाराधिष्ठित' अर्थिक व्यवहारास चालना देण्याचा तसेच कार्यक्षमता वाढविण्याचा प्रयत्न होतो. दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक बँक, नाणेनिधी, गॅट, युनो सारख्या जागतिक संघटनांनी अंतरराष्ट्रीय सहकार्य निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले. जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरू व्हावी हा हेतू होता. जागतिकीकरणामुळे बहुसंख्य कंपन्यांचा विस्तार होऊन विदेशात त्यांची गुंतवणूक वाढत आहे. 'जागतिकीकरण' हा आज सर्वत्र परवलीचा शब्द झाला आहे.

### १.७.२ अर्थ आणि व्याख्याः

'जागतिकीकरण' म्हणजे देशाच्या राजकीय सीमेबाहेर आर्थिक व्यवहारांचा विस्तार करणे होय' यामध्ये विविध राष्ट्रांच्या अर्थव्यवस्थांचे एकत्रिकरण समाविष्ट आहे. यावरून विविध राष्ट्रांच्या अर्थव्यवस्थांचे परस्परावलंबन स्पष्ट होते. पुढील व्यांख्यांवरून जागतिकीकरणाचा अर्थ स्पष्ट होतो.

**१) जागतिक बँकः**

जागतिक बँकेच्यामते, जागतिकीकरण म्हणजे

१. उपभोग्य वस्तूसह सर्व वस्तूवरील आयात नियंत्रणे टप्प्या टप्प्याने रद्द करणे होय.

२. आयात कर कमीत-कमी पातळीवर ठेवणे.

३. सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांचे खाजगीकरण करणे होय.

जागतिकीकरण म्हणजे जागतिक अर्थव्यवस्था निर्माण करण्याची प्रक्रिया होय.

**२) प्रा. देवेंद्र अवस्थीः**

'' बाजाराधिष्ठित आर्थिक विकासाच्या डावपेचातून जागतिकीकरणाचे धोरण अस्तित्वात आले. आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मक वातावरणाशी राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचा समन्वय साधण्याचा यात प्रयत्न होतो.''

**३) प्रा.सी.टी. कुरियनः**

''जागतिक अर्थव्यवस्था म्हणजे विविधता असलेले अर्थव्यवस्थांचा समूह होय. ज्यामध्ये निरनिराळया कार्यक्रमामध्ये जे एकमेकांशी विविध मार्गांनी परस्परावर क्रिया करतात. अशा प्रकारे कालांतराने त्यांच्या वृत्तीत बदल करतात.''

४) **ऋषी मोदी:**

''जागतिकीकरण म्हणजे मुक्त स्पर्धा किंवा खुली स्पर्धा नवे तंत्रज्ञान यातून उत्पादकता आणि उत्पादन वाढविणे.''

५) **श्रावणकुमार सिंग:**

''जागतिकीकरण म्हणजे सर्व राष्ट्रांची एकच बाजारपेठ निर्माण करणे आणि त्या बाजार पेठेत जगातील साधनसामग्रीचे आणि भांडवलाचे सुलभ व्यवहार निर्माण करणे होय.''

वरील व्याख्यांवरून जागतिकीकरणाचा अर्थ व्यापक आहे हे स्पष्ट होते. राष्ट्रांतील उत्पादन क्षमता, कार्यक्षमता आणि उत्पादन यात जलद गतीने वाढ करण्यासाठी जागतिकीकरणाचा उपयोग होतो जागतिकीकरणाच्या संकल्पनेत अनेक घटकांचा समावेश होतो. उदा. आंतरराष्ट्रीय व्यापाराचा विस्तार, बहुराष्ट्रीय व्यवसायाचा विस्तार व वृद्धी इ.

**सारांश:**

अर्थ व्यवस्थेला बंदिस्ताकडून मुक्ततेकडे नेणाऱ्या आर्थिक धोरणाला जागतिकीकरण म्हणतात.

जागतिकीकरणाच्या संकल्पनेत पुढील विविध घटकांचा समावेश होतो.

१. मुक्त बाजाराधिष्ठित अर्थव्यवस्थेचा स्वीकार.

२. सरकारी नियंत्रणे कमी करणे.

३. सार्वजनिक उपक्रमांचे खाजगीकरण.

४. सरकारी खर्चात कपात करणे.

५. विदेशी बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या गुंतवणूकीला मुक्त प्रवेश देणे.

६. आयातीवरील बंधने दूर करणे.

७. निर्यातीला उत्तेजन देणे.

८. चलनाची किंमत बाजारातील किंमतीनुसार ठरविणे.

९. अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेशी जास्तीत जास्त जोडणे.

**१.७.३ जागतिकीकरणाची अंमलबजावणी :**

जागतिक व्यापार संघटना (WTO) आणि गॅट यांच्या धोरणानुसार जगात मुक्त व्यापार सुरू झाला. या मुक्त व्यापारामुळे भारताच्या आर्थिक विकासाला चालना मिळाली. भारताने आपल्याला कोणत्या उत्पादन क्षेत्रात फायदा आहे. याचा विचार करून त्यादृष्टीने विकासाचे डावपेच ठरविले आहेत. जकात करात कपात आणि व्यापारामध्ये उदारीकरण यामुळे जागतिक व्यापारामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होईल असा अंदाज व्यक्त केला जातो. जागतिक बाजारात आपले महत्त्व वाढविण्यासाठी भारताला प्रयत्न करावे लागणार आहेत. भारतात खाद्यतेल, भाज्या, फळे, आणि फुले यांची मोठी बाजारपेठ आहे. जागतिक बाजारपेठ मिळविण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. सर्वक्षेत्रात भारताची क्षमता मोठी आहे. परंतु भारतातील अकार्यक्षमतेमुळे जागतिकीकरणाचे हवेतसे लाभ उठविता येत नाहीत .कृषी क्षेत्रातील अनेक वस्तूंच्या बाबतीत भारताची निर्यात क्षमता मोठी आहे. इतकेच नव्हेतर कृषी वस्तूंची निर्यात करण्याची

भारताची क्षमता ५००% पर्यंत वाढू शकते. त्यासाठी निर्यातीवरील नियंत्रणे कमी करणे. मालाच्या साठयासाठी गोदाम व्यवस्था उपलब्ध करणे तसेच दर्जा आणि उत्पादकता यात वाढ करणे हे जागतिकीकरणाच्या दृष्टीने आवश्यक आहे.

इतर आशियाई राष्ट्रांच्या तुलनेत अल्प कालावधीत आर्थिक विकासाचा दर वाढविण्यासाठी भारताला जागतिकरणाच्या सहाय्याने प्रयत्न केले पाहिजे. जागतिकीकरणामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांचे राष्ट्रीयत्व कालबाह्य होत आहे. उदा. IBM या जपान कंपनीचे भागधारक अमेरिकेत आहेत. पण जपानमधील २०,००० कर्मचाऱ्यांना या कंपनीत रोजगार प्राप्त झाला आहे. या कंपनीकडून जपान सरकारला मोठ्या प्रमाणात कर महसूल मिळतो. सध्या माहिती-तंत्रज्ञान व दळणवळण क्षेत्रामध्ये क्रांतीकारक बदल होत आहेत. त्यामुळे जागतिक व्यापाराला एक वेगळे स्वरूप प्राप्त झाले आहे. भारतात ग्राहक उपयोगी वस्तूंच्या बाजारपेठेचा विस्तार वेगाने होत आहे. कारण, भारतातील ३० कोटी मध्यमवर्गीय किंवा उच्च मध्यमवर्गीय गटाची उपभोग्य वस्तूची असणारी मागणी वेगाने वाढत आहे. ग्रामीण भागातील ग्राहक उपयोगी वस्तूंची मागणी वेगाने वाढत आहे. भारत हे विविधता असलेले जगातील एक मोठे उद्योग केंद्र आहे. जगातील कोणत्याही प्रगत राष्ट्राप्रमाणे भारतात इंजिनिअरर्स, तंत्रज्ञ, संशोधक, व्यवस्थापक उपलब्ध आहेत. तसेच भारतात विपूल खनिज साठे उपलब्ध आहेत. कृषीक्षेत्र ही संपन्न आहे. भात, गहू, तेलबिया, कापूस, साखर, चहा, रबर, दूध, इ. उत्पादनासंदर्भात जगातील पाच मोठ्या उत्पादकात भारताचा समावेश केला जातो. भारताची मजबूत लोकशाही यंत्रणा देखील आर्थिक सुधारणा राबविण्यास पात्र आहे. थोडक्यात, भारतीय अर्थव्यवस्था जागतिकीकरणाचे आव्हान पेलण्याची क्षमता असलेली अर्थव्यवस्था आहे.

### १.७.४ जागतिकीकरणाचे गुण-दोषः

**जागतिकीकरणाचे गुण/फायदे:**

१) जागतिकीकरणामुळे आर्थिक विकासाला चालना मिळते.

२) जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने जगातील सर्व राष्ट्रे एकमेकांच्या जवळ येत आहेत.

३) जागतिकीकरणामुळे जगात बहुराष्ट्रीय कंपन्यांचा वेगाने विस्तार होत आहे व गुंतवणूकही वाढत आहे. १९९५ अखेर ४०,००० बहुराष्ट्रीय कंपन्यात २६०० अब्ज डॉलर्स एवढी गुंतवणूक झाली होती.

४) जागतिकीकरणामुळे व्यापार संघटनेच्या सहाय्याने सर्व राष्ट्रांना एकत्रित आणले आहे.

५) जागतिकीकरणाच्या धोरणाने विकसनशील राष्ट्रांनी आपली स्पर्धा शक्ती वाढवली आहे.

६) जागतिकीकरणामुळे देशाच्या आयात-निर्यातीत वाढ होऊन आंतरराष्ट्रीय व्यापार वाढतो.

७) जागतिकीकरणामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेचा उत्पादन क्षमतेचा पुरेपूर वापर होतो.

८) जागतिकीकरणामुळे लोकांच्या प्रवृत्तीत सकारात्मक बदल होऊन अर्थव्यवस्थेत सकारात्मक सामाजिक बदल घडवून आणला जातो.

९) जागतिकीकरणामुळे विदेशी चलनाचा साठ्यात वाढ होते.

**जागतिकीकरणाचे दोष/तोटे:**

१) जागतिकीकरणामुळे जगाचे नेतृत्त्व श्रीमंत राष्ट्रांकडे गेले आहे.

२) अविकसित व विकसनशील राष्ट्रांचा कर्जबाजारीपणा वाढला आहे.

२) अविकसित व विकसनशील राष्ट्रांचा कर्जबाजारीपणा वाढला आहे.

३) बहुराष्ट्रीय कंपन्यांची बँकींग, विमा, तंत्रज्ञान, दूरसंचार सेवा, कायदा, पर्यटन इ. क्षेत्रात मक्तेदारी निर्माण झाली आहे.

४) जागतिकीकरणामुळे विकसनशील राष्ट्रांचा तोटा होत आहे. कारण, बेकारी, प्रदूषण, यासारखे प्रश्न निर्माण होत आहेत.

५) जागतिकीकरणामुळे नैसर्गिक संपत्तीचा ऱ्हास होत आहे.

६) जागतिकीकरणाचा शेतीवर अनिष्ट परिणाम होत आहे. त्याचा विकसनशील राष्ट्रांना त्रास होत आहे.

७) जागतिकीकरणामुळे सांस्कृतिक विविधतेवर अनिष्ट परिणाम होत आहे.

८) जागतिकीकरण म्हणजे वसाहत वादाचा नवीन अवतार आहे. अशी टिका केली जाते.

९) जागतिकीकरणामुळे गळे कापू स्पर्धा निर्माण होऊन देशी उद्योग बंद पडल्याने बेकारी वाढत आहे.

### १.७.५ जागतिकीकरणाचा प्रभाव/परिणाम:(Impact of Globalization)

जागतिक अर्थव्यवस्थेचे आजचे महत्त्वाचे वैशिष्ट म्हणजे जलद गतीने होणारे जागतिकीकरण होय. 'माहिती-तंत्रज्ञान आणि दळणवळण' या क्षेत्रातील क्रांतीमुळे जागतिकीकरणाच्या प्रक्रियेस गती आली आहे. आज कोणत्याही प्रकारची माहिती किती ही प्रमाणात जगाच्या काना-कोपऱ्यात उत्यल्प वेळात पाठविता येते. त्यामुळे जगाची एक विस्तृत बाजारपेठ निर्माण होत आहे. भांडवली गुंतवणूक आणि उत्पादन केंद्र सुरू करताना सर्वाधिक नफा कोठे आहे याचा विचार प्रामुख्याने केला जातो. म्हणजेच अर्थशास्त्रीय परिभाषेत भांडवल आणि इतर साधनसामुग्री अत्यंत गतिशील (प्रवाही) आहे असे म्हणता येते. माहिती-तंत्रज्ञानातील क्रांती आणि दळणवळणाच्या विविध सुविधांमुळे जगातील ग्राहकांच्या आवडी-निवडी एकसारख्या होत आहेत. त्यामुळे सर्वत्र एकाच प्रकारच्या वस्तूंचे उत्पादन करण्याचे आणि विकण्याची प्रवृत्ती वाढत आहे.

उदाः संगणक, व्हिडीओ गेम, टी-शर्टस,

जागतिकीकरणामुळे भारतासारख्या विकसनशील राष्ट्रानी आर्थिक परिस्थिती सुधारत आहे. जागतिक बँकेच्या अहवालानुसार भविष्यातील ५-१० वर्षात जगाच्या स्थूल उत्पादनापैकी (World GDP) जवळजवळ ३५% योगदान विकसनशील राष्ट्रांकडून होण्याची शक्यता आहे. तर जगाच्या एकूण आयातीत या राष्ट्रांचा हिस्सा २०% इतका आहे. जागतिकीकरणाचा परिणाम जागतिक वित्तीय बाजारावर होत आहे. जगातील बचत विविध वित्तीय संस्थांमध्ये गुंतवली जात आहे. माहिती-तंत्रज्ञान व दळणवळण साधनांच्या क्रांतीमुळे आर्थिक व्यवहारातील धोके कमी करता येतात. त्यामुळे गुंतवणूक निधीचे हस्तांतरण करता येते. वित्तीय बाजारात मुक्त स्पर्धा निर्माण झाल्याने भांडवलाचा प्रवाह वाढला आहे. विदेशी चलनाची जागतिक पातळीवरील दररोज होणारी सरासरी उलाढाल आज ९०० बिलअन डॉलर इतकी आहे.

### १.७.६ जागतिकीकरण व भारतीय अर्थव्यवस्थाः

भारताने १९९१-९२ पासून आर्थिक सुधारणा कार्यक्रम राबविण्यास सुरुवात केली. आर्थिक सुधारणा कार्यक्रम सुरू केल्यानंतर त्याचे काही अनुकूल व काही प्रतिकूल असे दोन्ही परिणाम दिसून येतात. अरूण घोष या अर्थतज्ञाच्या मते भारतातील आर्थिक सुधारणांमुळे अर्थव्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम झाले आहेत. आर्थिक सुधारणांमुळे कोणत्याही क्षेत्रावर अनुकूल परिणाम झालेला नाही. याउलट किरीट-पारीख सारख्या

अर्थतज्ज्ञांच्यामते, आर्थिक सुधारणांमुळे भारतीय अर्थव्यवस्था प्रगतीच्या मार्गावर आहे. नजीकच्या काळात आर्थिक प्रगतीचा वेग वाढण्याची शक्यता आहे.

आर्थिक सुधारणा कार्यक्रमानंतर म्हणजे १९९१-९२ नंतर ते २०००-०१ पर्यंत भारताच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनाचा वाढीचा दर ६.१% एवढा झाला. आर्थिक सुधारणा पूर्वी तो ५.३ एवढा होता. आर्थिक सुधारणा नंतरच्या काळात भाववाढ नियंत्रित व्हावी अशी अपेक्षा होती. परंतु १९९६ पर्यंत भारतातील चलनवाढ नियंत्रणात नव्हती. यानंतर मात्र भारतातील चलन वाढ नियंत्रणाखाली आणली आहे. सध्या चलनवाढीचा वार्षिक दर ५% दरम्यान आहे. तसेच गुंतवणूकीचे स्थूल देशातर्गत उत्पादनाशी प्रमाण आर्थिक सुधारणानंतर वाढले आहे. १९८९-९० मध्ये ते २०% होते. आज ते २५% पर्यंत वाढले आहे. म्हणजेच स्थूल भांडवल निर्मितीचे प्रमाण वाढल्याचे दिसून येते. आर्थिक सुधारणानंतर ५ वर्षात (१९९१-९२ ते १९९६-९७) भारतातील औद्योगिक उत्पादन वाढीचा वार्षिक दर सरासरी ६.२% होता. हाच दर १९८५-८६ ते १९९०-९१ या ५ वर्षात ८.५% एवढा होता. याचा अर्थ आर्थिक सुधारणांच्या नंतरच्या पहिल्या ५ वर्षाच्या काळात औद्योगिक उत्पादन वाढीचा दर घटल्याचे दिसून येते. १९९५-९६ नंतर मात्र औद्योगिक उत्पादन वाढीचा दर ११.८% पर्यंत वाढल्याचे दिसून येते. आज हा दर ९% च्या दरम्यान आहे. आर्थिक सुधारणामुळे भारताची विदेशी व्यवहार शेषाची समस्या सुटावी अशी अपेक्षा होती. ही अपेक्षा फलद्रुप झाली आहे. कारण, आयातमूल्य व निर्यात मूल्य यांचे स्थूल राष्ट्रीय उत्पादनाचे असणारे प्रमाण आर्थिक सुधारणा पूर्वी १२.४ % होते. ते नंतर १७.६% पर्यंत वाढले. म्हणजे आर्थिक सुधारणा नंतर विदेशी व्यवहार रोषाची समस्या सोडविण्यात यश आले भारताच्या विदेशी गंगाजळीत अनिवासी भारतीयांच्या ठेवीचे प्रमाण जास्त आहे.

आर्थिक सुधारणांची भारतातील सामाजिक स्थीती अभ्यासने गरजेचे आहे. आर्थिक सुधारणांतर्गत संरचनात्मक समायोजन कार्यक्रमाचा आघात दारिद्र्यावर होतो. याचा अर्थ आर्थिक सुधारणा सुरू केल्यास देशातील दारिद्र्य वाढते. भारतात बेकारीचे प्रमाण जास्त असल्याने खाजगीकरणातून आणि उद्योगांच्या पुर्नरचनेतून बेकारीत वाढ होत आहे. देशात उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण याद्वारे भांडवलशाही यंत्रणेचा प्रभाव वाढतो. अशा वेळी दारिद्र्य निर्मूलनाचा कार्यक्रम आर्थिक सुधारणांबरोबर सुरू ठेवणे आवश्यक असते. सरकारचा सामाजिक सेवांवरील खर्च कमी झाल्यास दारिद्र्य आणि विषमतः वाढण्याचा धोका असतो. भारताच्या सामाजिक सेवा वरील खर्चाचे स्थूल देशांतर्गत उत्पादनाशी प्रमाण १९९०-९१ ते १९९५-९६ या काळात ०.४% इतके कमी झाल्यामुळे दारिद्र्य आणि विषमतः यात वाढ होईल दक्षिण कोरिया, मलेशिया, थायलंड या राष्ट्रांचा आर्थिक सुधारणा काळात हाच अनुभव आहे. म्हणून देशात बेकारी, दारिद्र्य, विषमतः वाढणार नाही हे पाहीले पाहीजे. तसेच सामाजिक सेवावरील सरकारचा खर्च वाढविला पाहिजे. भारताने चीनचे उदाहरण डोळयासमोर ठेऊन आर्थिक सुधारणा कार्यक्रमाची अंमलबजावणी करताना आर्थिक विकासाची सामाजिक बांधिलकी अबाधित ठेवली पाहिजे. तरच भविष्य काळात आर्थिक सुधारणा कार्यक्रम भारताला लाभदायक ठरतील.

## ब) भारताचा विदेशी व्यापार

### १.८ जागतिकीकरणाच्या काळातील भारताच्या विदेशी व्यापाराची रचना आणि दिशा

भारतीय अर्थव्यवस्थेत व्यापाराचे स्थान अतिशय महत्त्वाचे आहे. अगदी इतिहासकाळापासून भारताचे विविध देशांबरोबर व्यापारविषयक संबंध आहेत. स्वातंत्र्यापूर्वी ब्रिटिश राजवटीत इंग्लंडच्या नेतृत्वाखाली राष्ट्रकुल संकुलाद्वारे भारताचा विदेशी व्यापार कार्यरत होता. १९५० नंतर भारताने आंतरराष्ट्रीय व्यापारात आपला स्वतंत्र ठसा निर्माण केलेला आहे. १९९१ नंतर जागतिकीकरणाच्या

काळात भारताच्या विदेशी व्यापारात खूप मोठे बदल झाले आहेत. विदेशी व्यापाराच्या आयात-निर्यात रचनेमध्ये आणि दिशेमध्ये खूप बदल झाले आहेत. विदेशी व्यापाराची आयात-निर्यात रचना आणि दिशा यांचा अभ्यास करणे आवश्यक ठरते.

**१.८.१ व्यापाराची रचना :**

''देशातून विविध वस्तू आणि सेवा यांची जी आयात आणि निर्यात केली जाते त्यांचे प्रमाण किंवा संख्या म्हणजे विदेशी व्यापाराची रचना होय.''

यामध्ये एका वर्षात किती वस्तू-सेवा आयात केल्या जातात त्याची सविस्तर माहिती म्हणजे आयातरचना होय, तसेच आपल्या देशातून इतर देशांना ज्या विविध वस्तू-सेवांची निर्यात केली जाते त्याची सविस्तर माहिती म्हणजे निर्यातरचना होय.

**व्यापाराची दिशा :**

''आपल्या देशाचा व्यापार जगातील कोणकोणत्या देशांबरोबर किंवा राष्ट्रांच्या समुहाबरोबर आहे याची सविस्तर माहिती म्हणजे व्यापाराची दिशा होय.

**आयातरचना :**

भारतामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या वस्तूंची आयात केली जाते. अन्नधान्य, डाळी, खाद्यपदार्थ, रसायने, यंत्रसामग्री, लोहपोलाद, शुध्द आणि अशुध्द धातू व खनिजे, भांडवली वस्तू, घरगुती वापराची उपकरणे, कपडे, क्रिडासाहित्य, रत्ने, वाहने, फळे वगैरे वस्तूंची आयात केली जाते.

**आयात व्यापाराची रचनाः**

१९८०-८१ ते २०१०-११ या दरम्यान भारतात जी आयात झाली त्याचा तपशील पुढील तक्त्याद्वारे स्पष्ट करता येतो.

(आकडे कोटी रु. मध्ये)

| वर्ष | आयातमूल्य | विदेशी व्यापारातील प्रमाण % |
|---|---|---|
| १९८०-८१ | १२५२४ | ६५.११ |
| १९९०-९१ | ४३१९३ | ५७.२४ |
| २०००-०१ | २३०८७३ | ५३.१४ |
| २०१०-११ | १६८३४६७ | ५९.५६ |

संदर्भ : इकॉनॉमिक सर्व्हे ऑफ इंडिया.

१९९१ नंतर देशात पेट्रोलियम पदार्थ, तेल यांच्या आयातीचे प्रमाण जास्त आहे. लोह आणि अलोह खनिजे, रसायने यांचेही आयातीमध्ये मोठे प्रमाण आहे. विद्युत उपकरणे, यंत्रसामुग्री यांच्या आयातीत मोठी वाढ झाली आहे. जागतिकीकरणाच्या कालावधीत आयात-निर्यात रचनेचा विचार करता असे दिसून येते की साधारणपणे ५५ ते ६० टक्के हिस्सा आयातमूल्याचा आहे.

**निर्यात रचनाः**

भारतातून अन्नधान्य, फळे, भाजीपाला, फुले, इतर शेतीमाल तसेच शेतीसलग्न व्यवसायातील उत्पादने, तयार कपडे, अन्नपदार्थ, मासे, तंबाखू, चामडी वस्तू, सुती वस्तू, अभियांत्रिकी वस्तू, वाहने, यंत्राचे सुटे भाग यासारख्या वस्तूंची निर्यात केली जाते. प्रमुख वस्तूगटांची निर्यातरचना पुढील तक्त्यामधून समजून येते.

(आकडे कोटी रूपयेमध्ये)

| अनं | घटक | १९८०–८१ | १९९०–९१ | २०००–०१ | २०१०–११ |
|---|---|---|---|---|---|
| १ | शेती–शेती संलग्न वस्तू | २०५७ | ६३१७ | २८५८२ | ११३११६ |
| २ | धातू–खनिजे | ४१३ | १४९७ | ४१३९ | ४६१५२ |
| ३ | तयार वस्तू | ३७४७ | २३७३६ | १६०७२३ | ७७४२४ |
| ४ | पेट्रोलियम वस्तू | २८ | ९४८ | ८८२२ | १९२२८२ |
| ५ | इतर वस्तू | ४६५ | – | – | ३९६९२ |

संदर्भ : इकॉनॉमिक सर्व्हे ऑफ इंडिया.

निर्यातरचनेमध्ये मोठे बदल झाले आहेत. १९८०–८१ मध्ये शेती–शेतीसंलग्न उत्पादनाची निर्यात ३० टक्के होती ती २०१०–११ मध्ये ९.८ टक्के झाली. पेट्रोलियम पदार्थ आणि तयार वस्तूंच्या निर्यातीत वाढ झाली आहे. जागतिकीकरणाच्या काळात शेतीजन्य मालाच्या निर्यातीचे प्रमाण १८ टक्के राहिले, तयार वस्तूंचे प्रमाण ७० टक्के आढळते. उर्वरीत १२ टक्के हिस्सा उर्वरित वस्तूंच्या गटाचा आहे.

जागतिकरणाच्या काळात प्रमुख वस्तूंचा निर्यातीमधील हिस्सा :-

| | घटक | निर्यातीमधील हिस्सा (%) |
|---|---|---|
| १ | कॉफी | ०.५३ |
| २ | चहा | १.४७ |
| ३ | फळे- भाजीपाला | १.८६ |
| ४ | तंबाखू | १.७९ |
| ५ | लोखंड | १.९५ |
| ६ | काजूगर | ०.८६ |
| ७ | अभियांत्रिकी वस्तू | १४.३६ |
| ८ | चामडी वस्तू | ४.५८ |

| | | |
|---|---|---|
| ९ | हस्तकला वस्तू | १७.७८ |
| १० | रसायने | ११.८९ |
| ११ | तयार कपडे | ९.७५ |
| १२ | सुती वस्तू-कपडे | ५.४६ |

संदर्भ : इकॉनॉमिक सर्व्हे ऑन इंडिया

प्रमुख निर्यात वस्तूंमध्ये हस्तोद्योगातील वस्तू, अभियांत्रिकी वस्तू, रसायने, चामडी वस्तू, तयार कपडे, सुती कापड यांचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून येते. जागतिकीकरणाच्या काळात विविध प्रकारच्या छोट्या-मोठ्या उद्योग व्यवसायांना संधी निर्माण झाल्या त्यामुळे विविध प्रकारचे उद्योग आणि व्यवसाय सुरू झाले, अभियांत्रिकी उद्योगाचा विकास झाला. या उद्योगातून छोटी मोठी यंत्रे, उपकरणे, घरगुती वापराच्या वस्तू, वाहने, विद्युत उपकरणे, विविध यंत्रांचे सुटे भाग यांची निर्यात वाढत राहिली. हस्तकला उद्योगांना शहरी, निमशहरी भागात संधी निर्माण झाली. या हस्तकला उद्योगातून शोभेच्या वस्तू, खेळणी, घरगुती वापराच्या वस्तू, अलंकार, इतर वस्तूंची निर्यात झाली. चामडी वस्तूंच्या निर्यातीत जागतिकीकरणाने अधिक चालना दिली. चामड्यापासून तयार होणाऱ्या विविध प्रकारच्या बॅग्ज, चप्पल व इतर वहाने, पट्टे व इतर साहित्य या वस्तूंची निर्यात वाढली. सुती कापड आणि तयार कपडे यांना मोठी जागतिक बाजारपेठ मिळाली. सर्व प्रकारची तयार कपडे आणि विशेषतः लहान मुलांची तयार कपडे यांची निर्यात वाढत राहिली. युरोपसह आफ्रिका, अशियाई देश याठिकाणी तयार कपड्यांची निर्यात अग्रक्रमाने होत राहिली.

आयात आणि निर्यात रचनेत बदल झाल्याचे आपणास आढळून आले. अर्थात जागतिकीकरणाच्या काळात या आयात-निर्यात मूल्यांमध्ये वाढ झाली असून आयात मूल्याचे प्रमाण निर्यात मूल्यापेक्षा जास्त असल्याने दिसून येते. यासंदर्भात पुढील तक्त्याद्वारे स्पष्टीकरण देता येते.

| **वर्ष** | **आयातप्रमाण** | **निर्यातप्रमाण** | **एकूण** |
|---|---|---|---|
| १९८०-८१ | ६५.११ | ३४.८९ | १०० |
| १९९०-९१ | ५७.२४ | ४२.७६ | १०० |
| २०००-०१ | ५३.१४ | ४६.८६ | १०० |
| २०१०-११ | ५९.५६ | ४०.४४ | १०० |

१९८०-८१ ते २०१०-११ यादरम्यान आयातमूल्य हे निर्यात मूल्यापेक्षा जास्त आहे. सर्वसाधारनपणे आयातप्रमाण ५८.७६ टक्के आणि निर्यात प्रमाण ४१.२३ टक्के यादरम्यान असल्याचे दिसून येते. भांडवली वस्तू, यंत्रे, विज्ञान-तंत्रज्ञान संशोधनसाहित्य, उपभोग्य वस्तू, वाहने, सौदंर्य प्रसाधने यासारख्या विविध वस्तूंची आयात वाढल्यामुळे आयातमूल्याचे प्रमाण जास्त आढळते.

जागतिकीकरणाच्या काळात भारताची जी आयात-निर्यात रचना आढळते त्याची सर्वसाधारण वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आढळतात.

१) आयातीचा हिस्सा जास्त आहे. त्याचे सरासरी प्रमाण ५९% आहे.

२) निर्यातीचा हिस्सा आयातीच्या तुलनेत कमी (४२%) आहे.

३) आयातीमध्ये पेट्रोलियम पदार्थ, इंधन यांचे प्रमाण जास्त आहे.

४) यंत्रसामग्री, उपकरणे यांच्या आयातीत वाढ झाली.

५) निर्यातीमध्ये हस्तोद्योगाचा वाटा मोठा आहे.

६) अभियांत्रिकी वस्तू, तयार कपडे-सुती कपडे यांच्या निर्यातीत मोठी वाढ झाली.

७) रसायने आणि तत्सम वस्तूंची निर्यात वाढली.

८) चहा, फळे, भाजीपाला, तंबाखू, काजूगर, तांदूळ या शेतीजन्य मालाच्या निर्यातीत वाढ झाली.

९) २००० नंतर भारतातून तयार वस्तूंची निर्यात ७०% यादरम्यान आढळते, पेट्रोलियम पदार्थ १०% तर शेती व शेतीसलग्न क्षेत्राचा हिस्सा ११.५% यादरम्यान आहे.

जागतिकीकरणाच्या काळात भारताच्या आयात आणि निर्यात व्यापाराची रचना खूप मोठ्या प्रमाणात बदलली आहे. भारत हा केवळ कृषीजन्य मालाची निर्यात करणारा देश राहिला नसून तयार वस्तू, अभियांत्रिकी वस्तू यांची निर्यात करणारा देश बनलेला आहे.

**१.८.२ जागतिकीकरणाच्या कालखंडातील भारताच्या विदेशी व्यापाराची दिशा** (Direction of India's foreign trade in globalization period)

''आपल्या देशाचा व्यापार जगातील कोणकोणत्या देशांबरोबर किंवा राष्ट्रांच्या समुहाबरोबर आहे याची सविस्तर माहिती म्हणजे व्यापाराची दिशा होय.''

इतिहासात अगदी पूर्वीपासून भारताचा व्यापार युरोपियन देशांबरोबर असल्याच्या नोंदी आहेत. त्याचबरोबर चीन आणि इतर आशियाई देशांबरोबर भारताचा व्यापार पूर्वीपासून असल्याचे दिसून येते. ब्रिटिश राजवटीपासून भारताचा व्यापार युरोपमध्ये इंग्लडबरोबर जास्त असल्याचे दिसून येते. भारताचा व्यापार हा युरोपप्रमाणेच अमेरिका खंडातील देश त्यामध्ये संयुक्त संस्थाने, कॅनडा यांच्याशी आहे. दक्षिण अमेरिकन देशांबरोबरही व्यापार होता. आफ्रिका खंडातील विकसनसिल देश आणि शेजारील आशियाई देश तसेच आखाती देश यांच्याबरोबरचा व्यापार वाढत गेला. जगातील सर्व प्रमुख देश आणि व्यापारसमुह असणाऱ्या देशांचे गट यांच्याशी आयात आणि निर्यात असणारा भारत हा एक महत्वाचा देश आहे.

भारताची विदेशी व्यापाराची दिशा कशाप्रकारची आहे हे समजण्यासाठी विविध देशांचे विभाजन प्रमुख चार गटांत करण्यात आलेले आहे.

१) **विकसित देश** : या गटामध्ये जगातील प्रमुख विकसित देशांचा समावेश होतो. युरोपिय युनियनमधील सर्व देश (इंग्लड, जर्मनी, इटली, फ्रान्स व इतर) अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, जपान, इत्यादि.

२) **तेलउत्पादक आणि निर्यात करणारे देश** : यामध्ये इराण, इंडोनशिया, सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिरात, कुवेत इत्यादि.

३) **पूर्व युरोपिय देश** : यामध्ये रशिया, क्रोऐशिया, बोस्निया, हर्जेगोव्हिनिया, अल्बेरिया, पोलंड, हंगेरी यांचा समावेश होतो.

४) **विकसनशिल देश** : यामध्ये चीन, हाँगकाँग, दक्षिण कोरिया, मलेशिया, सिंगापूर, सार्कसमुहातील देश, आफ्रिका आणि दक्षिण अमेरिका खंडातील देश व इतर सर्व देशांचा समावेश होतो.

जागतिकीकरणाच्या काळात भारताच्या विदेशी व्यापाराच्या दिशेमध्ये कशाप्रकारे बदल झाला आहे याचे स्वष्टीकरण पुढील तक्त्याच्या सहाय्याने करता येते.

(कोटी रुपये)

| वर्ष | विकसितदेश | | तेलउत्पादक देश | | पूर्व युरोप | | विकसनशिल देश | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | आयात | निर्यात | आयात | निर्यात | आयात | निर्यात | आयात | निर्यात |
| १९९०–९१ | २४७१२ (५७.२२) | १७४२८ (५३.५४) | ७०४० (१६.३०) | १८३१ (५.६२) | ३३७७ (७.८२) | ५८१९ (१७.८७) | ८०५७ (१८.६६) | ७४७५ (२२.९६) |
| १९९५–९६ | ६४२५४ (५३.३८) | ५९२२३ (५५.६८) | २५५७० (२०.८४) | १०२९९ (९.६८) | ५५९८ (४.५६) | ४०९२ (३.८५) | २७२४५ (२२.२१) | ३२७३८ (३०.७८) |
| २०००–०१ | ९२०९० (५७.८३) | १०७२३८ (५२.६८) | १२२८३ (७.७१) | २२२२३ (१०.९१) | ३८८४ (२.४४) | ४९६४ (२.४३) | ५०९६६ (३२.००) | ६९१४६ (३३.९६) |
| २००५–०६ | २२९३२२ (४९.४६) | २०२९३५ (४४.५९) | ४९४५८ (१०.६६) | ६७४८२ (१४.८२) | १६७९६ (३.६२) | ८७६७ (१.९२) | १६७७५४ (३६.१९) | १७५९२७ (३८.६५) |
| २०१०–११ | ५०४६१८ (३३.५४) | ३७०३३५ (३६.०४) | ३८३८१५ (२५.५२) | २२८७८४ (२२.३६) | १६६५२ (१.१०) | ७८६४ (०.७६) | ५९८४३८ (३८.८०) | ४१९४०३ (४०.८२) |

संदर्भ : इकॉनॉमिक सर्व्हे ऑफ इंडिया

१९९०–९१ ते २०१०–११ या दरम्यान विकसित देशांबरोबरचा आयातव्यापार ४९ टक्के, तर विसनशिल राष्ट्रांबरोबर २९ टक्के यादरम्यान राहिला. याच दरम्यान निर्यात व्यापार यादोन गटाबरोबर अनुक्रमे ५० टक्के आणि ३४ टक्के राहिला. तेलउत्पादन देश आणि पूर्व युरोपिय देश यांच्याबरोबर व्यापार संथगतीने वाढला. या गटांबरोबर आयात निर्यात व्यापार १२.७२ टक्के व ४.८२ टक्के आणि १९.३९ टक्के व २.९१ टक्के इतका आढळून येतो. १९९० नंतर भारताचा विदेशी व्यापार हा अमेरिका, इंग्लड, जर्मनी, फ्रॉन्स, इटली, जपान या विकसित देशाबरोबर आणि चीन, सिंगापूर, इंडोनेशिया, सार्क गटातील देश या विकसनशिल देशांबरोबर वाढल्याचे दिसून येते. जागतिकीकरणाच्या काळात विविध देशांबरोबर भारताचा व्यापार वाढलेला आहे.

विदेशी व्यापाराचा व्यापारतोल आणि व्यवहारतोल या दोन संकल्पना महत्वाच्या आहेत. एका वर्षाच्या कालावधीत एखाद्या देशात या वस्तूंची जी आयात आणि निर्यात होते त्याचा हिशोब असतो. व्यवहारतोलामध्ये एका वर्षात आयात निर्यात होणाऱ्या वस्तूच सेवा यांच्या आयात निर्यातीचा हिशोब असतो. किंडल्बर्जर यांच्या मते, ''एखाद्या देशाने इतर देशांबरोबर एका वर्षात केलेल्या आर्थिक व्यवहारांची व्यवस्थित मांडणी किंवा हिशोब म्हणजे व्यवहारतोल होय.

व्यवहारतोलामध्ये चालू खाते आणि भांडवली खाते अशी दोन खाती असतात. एका वर्षातील येणी आणि देणी यांची मांडणी यामध्ये असते, त्यामुळे व्यवहारतोलात येणे बाजू आणि देणे बाजू अशा दोन्ही बाजू असतात. व्यवहारतोल हा अनुकूल किंवा प्रतिकूल असतो. एका वर्षात देशात येणे रक्कम जास्त आणि देणे रक्कम कमी असेल तर व्यवहारतोल अनुकूल असतो. जेंव्हा निर्यातमूल्य आयात मूल्यापेक्षा जास्त असते तेंव्हा व्यवहारतोल अनुकूल असतो. याउलट ज्यावेळी देणेरक्कम जास्त आणि येणे रक्कम कमी असते त्यावेळी व्यवहारतोल प्रतिकूल असतो. जेंव्हा आयातमूल्य जास्त आणि निर्यातमूल्य कमी असते त्यावेळी व्यवहारतोल प्रतिकूल असतो. एखाद्या देशाचा व्यवहारतोल व्यापारात वाढ होऊनसुद्धा सतत प्रतिकूल राहत असेल तर त्याला व्यवहारतोलाची समस्या किंवा पेचप्रसंग म्हणतात. १९९०-९१ नंतर भारतात जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरू झाली त्यानंतर आयात-निर्यात रचनेमध्ये मोठे बदल झाले. विदेशी व्यापाराचा विस्तार, रचना आणि दिशा यामध्ये बदल झाले. आयात आणि निर्यातमूल्य वाढले परंतु व्यवहारतोल मात्र अनुकूल बनू शकला नाही. सातत्याने व्यापारी तूट जास्त राहिली किंबहुना ती वाढतच गेली. व्यापारातील तूट कमी कशाप्रकारे करायची हा प्रश्न कायमच उभा राहिला या परिस्थितीला आकडेवारीवरून या पेचप्रसंगाची आपणास कल्पना येते. याचे स्पष्टीकरण पुढील तक्त्याद्वारे स्पष्ट करता येते.

(आकडे कोटी ₹ मध्ये)

| अन | वर्ष | व्यापार तूट | निव्वळ अप्रत्यक्ष तूट | व्यवहारतोल | व्यापारतोलाची निव्वळ अप्रत्यक्ष तूटीचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | १९८०-८१ | -३५९६७ | ४३१० | -१६५७ | ७२.२ |
| २ | १९९०-९१ | -१६९३४ | -४३३ | -१७३६६ | १.५५ |
| ३ | १९९५-९६ | -१६३२५ | ५४४९ | -१०८७६ | ३३.३७ |
| ४ | २०००-०१ | -५६७३७ | ४५१३९ | -११५९८ | ७९.५५ |
| ५ | २००५-०६ | -२२९६६४ | १८५९२७ | -४३७३७ | ८०.९५ |
| ६ | २०१०-११ | -५९५६०० | ३८५५०० | -२१०१०० | ६४.७२ |

संदर्भः इकॉनॉमिक सर्व्हे ऑफ इंडिया.

जागतिकीकरणाच्या काळात व्यापारातील तूट १८ पटीने वाढली तर व्यवहारतोलातील तूट ९ पटीनी वाढली. घटकांपासून मिळणाऱ्या उत्पन्नामध्ये वाढ झाली तरच व्यवहारतोलातील तूट कमी होऊ शकेल. परदेशी प्रवाशी, पर्यटक भारताकडे आकर्षित करणे आणि सेवाक्षेत्रापासून निर्यातमूल्य जास्तीत जास्त मिळविणे यावरती भर देण्याचा प्रयत्न केला जात आहे. सर्वसाधारणपणे पुढील उपाययोजना करून हो पेचप्रसंग टाळण्याचा प्रयत्न करता येतो.

१) परदेशी पर्यटकांना आकर्षित करणे.

२) आंतरराष्ट्रीय विमान प्रवाशांना भारतीय विमान कंपन्यांकडे आकर्षित करण्यासाठी विमान सेवा दर्जेदार उपलब्ध करून देणे.

३) देशांतर्गत वाहतुक सोयी परदेशी प्रवाशांना उपलब्ध करणे.

४) भारतीय शिक्षणाकडे विदेशी विद्यार्थ्यांना आकर्षित करणे.

५) पंचतारांकित हॉस्टेलच्या सुविधा वाढविणे.

६) विदेशी गुंतवणूक वाढीला पोषक वातावरण निर्माण करणे.

## १.९ सारांश (Summary) :

राष्ट्रीय आर्थिक व्यवहारातील सरकारचा सहभाग कमी करणे म्हणजे खाजगीकरणहोय. खाजगीकरण विवधि प्रकारे केले जाते. प्रगत राष्ट्रांना सार्वजनिक क्षेत्रात उद्योगांच्या खाजगीकरणाचा आलेला उत्साहवर्धक अनुभव लक्षात घेऊन अनेक अल्पविकसित व विकसनशील राष्ट्रांनी सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांच्या खाजगीकरणाचा मार्ग स्वीकारला. अर्थव्यवस्थ्येच्या विविध क्षेत्रांची कामगिरी सुधारण्यासाठी खाजगीकणाचा मार्ग भारताने स्वीकारला आहे. आर्थिक उदारीकरण म्हणजे आयात तसेच उत्पादक गुंतवणुकीवरील अनिष्ट निर्बंध, नियंत्रणे आणि परवाने रद्द करणे होय. नव्या उदारीकरणाच्या धोरणाने औद्योगिक प्रगतीचा सरासरी वार्षिक वेग जास्त राहील.

जागतिकीकरण म्हणजे देशाच्या राजकीय सीमेबाहेर आर्थिक व्यवहारांचा विस्तार करणे होय. यावरून विविध राष्ट्रांच्या अर्थव्यवस्थांचे परस्परावलंबन स्पष्ट होते. भारताने १९९१-९२ पासून आर्थिक सुधारणा कार्यक्रम राबविण्यात सुरवात केली. आर्थिक सुधारणामुळे भारतीय अर्थव्यवस्था प्रगतीच्या मार्गावर आहे. नजीकच्या भविष्यकाळात आर्थिक प्रगतीच्या वेग वाढण्याची शक्यता आहे. आर्थिक सुधारणानंतर विदेशी व्यवहार शेषाची समस्या सोडविण्यात यश आले. भारताच्या विदेशी गंगाजळीत अनिवासी भारतीयांच्या ठेवीचे प्रमाण जास्त आहे. आर्थिक सुधारणा कार्यक्रमाची अंमलबंजावणी करताना आर्थिक विकासाची सामाजिक बांधिलकी अबाधित ठेवली पाहिजे तरच भविष्यकाळात आर्थिक सुधारणा कार्यक्रम भारताला लाभदायक ठरतील.

भारतासारख्या विकसनशील राष्ट्रामध्ये विदेशी व्यापाराला महत्त्वाचे स्थान आहे. विदेशी व्यापारामुळे विकासाला चालना मिळते. नवीन ज्ञान आणि अनुभवाचा फायदा होतो. भारताचा विदेशी व्यापार वाढला आहे.

## १.१० पारिभाषिक शब्दांचा अर्थः

- **खाजगीकरण** : राष्ट्रीय आर्थिक व्यवहारातील सरकारचा सहभाग कमी करणे म्हणजे खाजगीकरण होय.
- **उदारीकरण** : आर्थिक उदारीकरण म्हणजे आयात आणि उत्पादन गुंतवणुकीवरील अनिष्ट निर्बंध नियंत्रणे रद्द करणे होय.
- **जागतिकीकरण** : जागतिकीकरण म्हणजे देशाच्या राजकीय सीमेबाहेर आर्थिक व्यवहारांचा विस्तार करणे होय.
- **विदेशी व्यापार** : एका राष्ट्राने इतर राष्ट्रांबरोबर केलेली वस्तूंची देवाण-घेवाण (व्यापार) होय.

## १.११ स्वयंबध्ययनासाठी प्रश्नः

**अ) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

१) भारताने आर्थिक सुधारणा कार्यक्रम... मध्ये सुरू केले.

२) १९९३ मध्ये.... यांच्या अध्यक्षतेखाली निर्गुंतवणूकी बाबत व्युहरचना आयोग नेमला.

३) भारत सरकारने १९८६ मध्ये..... उद्योगांना मक्तेदारी नियंत्रण कायद्यातून परवाना मुक्त केले.

४) जागतिकीकरणामुळे भारताच्या आर्थिक विकासाचा वेग....

५) विदेशी व्यापार हे आर्थिक विकासाचे ..... आहे.

**उत्तरे**: १)१९९१ २) सी.रंगराजन ३) २३ ४) वाढला ५) यंत्र

**ब) चूक की बरोबर ते लिहा.**

१) खाजगीकरणामुळे कामगारांची कार्यक्षमता वाढते.

२) उदारीकरणामुळे उद्योगावरील अनेक बंधने शिथील होतात.

३) जागतिकीकरणामुळे आर्थिक विकासाला चालना मिळते.

४) भारताच्या विदेशी व्यापारातील तूट कमी झाली आहे.

**उत्तरे**: १) बरोबर २) बरोबर ३) बरोबर ४) चूक

## १.१२ सरावासाठी प्रश्नः

१) भारतातील खाजगीकरणाचे वर्णन करा.

२) उदारीकरणाचे परिणाम स्पष्ट करा.

३) जागतिकीकरणाचा भारताला कितपत फायदा झाला आहे ?

४) टीपा लिहा.

१. खाजगीकरण

२. उदारीकरण

३. जागतिकीकरण

## १.१३ अधिक वाचनासाठी पुस्तके:

१) Framcis Charunilam : Business Environment Himalaya Publishing House, Bombay.

२) Datt R. and Sunderum KPM : Indian Economy

३) Agarwal A. N. : Indian Economy

४) Datt Ruddar : Economic Reforms in India

५) डॉ. दत्तात्रय ग. चौगुले : व्यावसायिक पर्यावरण

६) प्रा. भोसले व प्रा. काटे : जागतिक अर्थव्यवस्था

७) अर्थसंवाद : विविध अंक

❑❑❑

## सत्र ६ : घटक २

# आर्थिक नियोजन आणि सेवा क्षेत्र

# (Economic Planning and Service Sector)

**अनुक्रमणिका :**


२.१ उद्दिष्टे

२.२ प्रास्ताविक

२.३ आर्थिक नियोजनाची उद्दिष्ट्ये

२.४ १२ वी पंचवार्षिक योजना

२.५ १२ व्या योजनेची संसाधने व संसाधनांचे वाटप

२.६ भारतीय सेवा क्षेत्र

  २.६.१ सेवा क्षेत्राचे महत्त्व

  २.६.२ भारतातील सेवा क्षेत्राची प्रगती

२.७ सारांश

२.८ स्वयंम् अध्ययनासाठी प्रश्न

२.९ सरावासाठी प्रश्न

२.१० अधिक वाचनासाठी पुस्तके


## २.१ उद्दिष्ट्ये

- भारतातील आर्थिक नियोजनाचा अभ्यास करणे
- आर्थिक नियोजनाची पार्श्वभूमी समजून घेणे.
- पंचवार्षिक योजनांचे स्वरूप अभ्यासणे.
- १२ व्या पंचवार्षिक योजनेचा सविस्तर अभ्यास करणे.
- भारतातील सेवाक्षेत्राचा सविस्तर अभ्यास करणे.
- अर्थव्यवस्थेत सेवाक्षेत्राची प्रगती अभ्यासणे.
- अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्राचे महत्त्व अभ्यासणे.

## २.२ प्रास्ताविक

आपल्या दैनंदिन व्यवहारात नियोजन हा शब्द आपण अनेक कामांसाठी अगदी सहजपणे वापरत असतो. अर्थात, आर्थिक नियोजन या संकल्पनेला वेगळे महत्व आहे. व्यक्तीच्या आणि देशाच्या विकासामध्ये नियोजनाला अनन्यःसाधारण महत्व आहे.

आर्थिक नियोजनाची सुरूवात रशियामध्ये झाली. ''देशात कोणत्या वस्तूंचे किती प्रमाणात, कोठे आणि कसे उत्पादन करायचे यासंदर्भात देशातील मध्यवर्ती सत्तेने घेतलेले निर्णय म्हणजे आर्थिक नियोजन होय.''

भारतात आर्थिक नियोजनाची प्राथमिक सुरूवात १९३४ साली झाली. १९३४ मध्ये सर विश्वेसरय्या यांनी ''Planned Economy for India'' हा ग्रंथ लिहीला. त्यामध्ये भारतात पुढील दहा वर्षांसाठी नियोजन कसे असावे यासंदर्भात त्यांनी आपले मत मांडले होते. सिंचन, रस्ते, दारिद्र्य निर्मूलन, उद्योग या सर्व क्षेत्रावर ७०० कोटी रूपये खर्च करावेत याचे नियोजन विश्वेसरया यांनी सुचविले होते. १९३८ साली काँग्रेस पक्षाचे हरिपूर येथे अधिवेशन भरलेले होते. त्यामध्ये या पुस्तकावर चर्चा झाली आणि पंडित नेहरूंच्या अध्यक्षतेसाठी समिती नेमण्यात आली. १९४४ मध्ये खाजगी पातळीवर नियोजनाचे प्रयत्न झाले. मुंबई योजना, गांधी योजना आणि जनता योजना या तीन योजना सुरू झाल्या होत्या.

स्वातंत्र्यानंतर खऱ्या अर्थाने नियोजनाला प्रारंभ झाला. १५ मार्च, १९५० रोजी भारतीय नियोजन मंडळाची स्थापना झाली. २८ मार्च १९५० रोजी या मंडळाची पहिली बैठक झाली. १ एप्रिल १९५१ पासून भारताची पहिली पंचवार्षिक योजना सुरू झाली. देशात पंचवार्षिक योजनांचा आराखडा आणि मसूदा तयार करण्याचे काम हे नियोजन मंडळ करते. योजनांची अंमलबजावणी करण्याचे काम मध्यवर्ती सरकार करते. डिसेंबर २०१४ मध्ये नियोजन मंडळाचे अस्तित्व संपुष्टात आले आणि त्याची जागा निती आयोगाने (NITI) घेतली.

१९५० पासून नियोजनाची विविध उद्दिष्ट्ये समोर ठेऊन नियोजनाची अंमलबजावनी करण्यात आली. १९५१ पासून देशात ११ पंचवार्षिक योजना पूर्ण झाल्या असून २०१२ ते २०१७ अशी १२ वी पंचवार्षिक योजना सुरू आहे. या सर्व पंचवार्षिक योजनांमध्ये आर्थिक विकासासाठीची विविध उदिष्ट्ये होती, त्यानांच भारतातील आर्थिक नियोजनाची उद्दिष्ट्ये म्हणतात.

## २.३ आर्थिक नियोजनाची उद्दिष्ट्ये

### १) आर्थिक विकास साध्य करणेः

भारताच्या पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून सर्वच पंचवार्षिक योजनांमध्ये हे उद्दिष्ट महत्वपूर्ण ठरले आहे. स्वांतत्र्यापूर्वी भारत अविकसित देश होता, स्वांतत्र्यानंतर विकासाची प्रक्रिया सुरू झाली आणि देश विकसनसिल झाला. १९५१ पासून देशात विकासाचे अनेक प्रकल्प सुरू झाले. मुख्य नद्यांवर धरणांची बांधणी करणे, कालवे तयार करणे, रस्ते, महामार्ग बांधणे, रेल्वेमार्ग तयार करणे, इंधन, वीज-उर्जा प्रकल्प सुरू करणे. समुद्र किनाऱ्यांवर बंदरांची बांधणी करणे या कामांच्या माध्यमातून देशात विकास साध्य करण्याचा प्रयत्न केला जातो. देशात स्थूल उत्पादनात वाढ करणे,

निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न, दरडोई उत्पन्न वाढविणे याअनुषंगाने नियोजनाची अंमलबजावणी केली जाते. थोडक्यात आर्थिक विकासासाठी आर्थिक नियोजनाद्वारे प्रयत्न केले जातात.

**२) स्वावलंबन प्राप्त करणे:**

देशाचा आर्थिक विकास साध्य करण्याबरोबरच देश सर्वच बाबतीत स्वंयपूर्ण करण्याचा प्रयत्न केला जातो त्याला स्वावलंबन म्हणतात. नियोजनाचे हे महत्वाचे उद्दिष्ठ आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर भारत हे एक सक्षम, भक्कम आणि स्वंयपूर्ण राष्ट्र असले पाहिजे यादृष्टिने प्रयत्न केले जातात. देशांतर्गत पातळीवर सर्व गरजा पूर्ण करणे, अंतर्गत उत्पादनक्षमता वाढविणे, परकिय मदत कमी घेणे, शेती आणि उद्योगक्षेत्रात उत्पादनक्षमता वाढविणे या घटकांवर भर दिला जातो. स्वावलंबनासाठी राष्ट्रीय उत्पादनाच्या २० ते २५ टक्के हिस्सा पुनर्गुंतवणूकीसाठी वापरण्याचा प्रयत्न केला जातो. आज अन्नधान्य, औषधे, औद्योगिक वस्तू, घरगुती वापराच्या वस्तू, वाहने, सायकली वगैरेच्या उत्पादनामध्ये भारत स्वयंपूर्ण आहे.

**३) रोजगारनिर्मिती करणे:**

भारताची लोकसंख्या जास्त असल्यामुळे आणि विकासदर कमी राहिल्यामुळे बेकारी आढळते. पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून प्रत्येक योजनेत रोजगार वाढविणे हे उद्दिष्ट राबविण्यात आले. शेती, उद्योग, व्यापार, वाहतूक दळणवळण, इतर सेवाव्यवसाय या क्षेत्रांमधून रोजगार निर्माण करण्यावर भर दिला जातो. देशात दारिद्र्य आणि बेकारी निर्मुलनासाठी विविध प्रकारचे रोजगारनिर्मितीचे कार्यक्रम राबविले जातात. जवाहर रोजगार योजना, ट्रायसेम योजना, एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम, रोजगार हमी योजना, पंतप्रधान ग्रामसडक योजना यासारख्या योजनांद्वारे रोजगार निर्मितीवर भर दिला जातो.

**४) दारिद्र्य व विषमता कमी करणे:**

स्वांतत्र्यावेळी भारतात ६४ टक्के दारिद्र्य होते. प्रत्येक पंचवार्षिक योजनेत दारिद्र्यनिर्मुलनासाठी प्रयत्न करण्यात आले. विविध क्षेत्रात विकासाची प्रक्रिया सुरू करण्यात आल्यामुळे लोकांना रोजगार मिळू शकला, स्वंयरोजगाराला प्राधान्य देण्यात आले त्यामुळे रोजगार निर्माण झाले. कृषी आणि ग्रामीण विकासाच्या प्रयत्नांमुळे ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात काम उपलब्ध झाले, यामुळे कांही प्रमाणात दारिद्र्य कमी होण्यास मदत झाली. थोडक्यात आर्थिक नियोजन राबविताना देशातील दारिद्र्य कमी करण्याचे उद्दिष्ट नेहमीच डोळ्यासमोर ठेवण्यात आले आहे.

दारिद्र्याबरोबर देशातील उत्पन्न आणि संपत्तीमधील विषमता कमी करण्याचा प्रयत्न करण्यात आला. स्वांतत्र्यपूर्व काळापासून आजपर्यंत देशात आर्थिक विषमता आढळते. गरीबांची गरीबी पूर्णपणे हटलेली नाही आणि श्रीमंतांची श्रीमंती कमी झाली नाही. यामधील दरी कमी करण्याचे आणि विषमता कमी करण्याचा प्रयत्न आजपर्यंतच्या सर्व योजनांमध्ये करण्यात आला. आर्थिक विषमता कमी करण्याबरोबरच सामाजिक विषमता कमी करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. सामाजिक मागासवर्ग, दलित, आदिवासी, महिला यांच्यासाठी प्रत्येक योजनेत विशेष कार्यक्रम राबविण्यात आले.

### ५) नैसर्गिक साधनांचा वापर पर्याप्तपणे करणे:

देशामध्ये विविधस्वरूपाची नैसर्गिक साधनसंपत्ती खूप मोठ्या प्रमाणात आहे. प्रमुख नद्या आणि त्यांची खोरी, जमीन, जंगले, खाणी, खनिजे, पर्जन्यमान, सूर्यप्रकाश हवा, समुद्र, दऱ्या, पर्वत, उर्जासाधने अशी वैविध्यपूर्व नैसर्गिक साधनसंपत्ती आहे. आर्थिक विकासासाठी या सर्व साधनांचा योग्य पध्दतीने वापर करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले.

### ६) श्रमशक्तीचा पर्याप्त वापर करणे:

देशातील नैसर्गिक साधनांच्या योग्य वापराप्रमाणेच उपलब्ध श्रमशक्तीचा वापर करण्याचा प्रयत्न योजनांमध्ये करण्यात आले. नागरिकांना आवश्यक त्याप्रकारचे शिक्षण आणि प्रशिक्षण देण्यात येते. पारंपारिक शिक्षणाबरोबर तंत्रशिक्षण, संधोधन, वैद्यकिय शिक्षण, अवकाश तंत्रज्ञान, माहिती तंत्रज्ञान या घटकांच्यासाठी शिक्षणावर भर देण्यात आला आणि त्यामाध्यमातून श्रमशक्तीचा आणि पर्यायाने मानवी साधनसंपत्तीचा पर्याप्त वापर करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न होत आहे.

### ७) सामुदायिक गरजांची पूर्तता करणे:

देशातील नागरिकांना मूलभूत सोयी सुविधा पुरविण्याचे काम सरकारला करावे लागते. पिण्याचे पाणी, प्राथमिक-माध्यमिक शिक्षण, रस्ते, दळणवळणाच्या सुविधा, आरोग्यसेवा, ग्रामीण सुविधा, पोलिसयंत्रणा, न्यायदान यासह इतर सेवांचा समावेश सामुहिक गरजां या संकल्पनेत होतो. आर्थिक नियोजनाच्या माध्यमातून या सर्व गरजांची पूर्तता करण्याचे उद्दिष्ट बाळगण्यात आलेले आहे.

### ८) सामाजिक कल्याण साध्य करणे:

समाजातील दुर्बल आणि मागासवर्गासाठी तसेच महिला व बालकांच्या कल्याणासाठी सरकारमार्फत नेहमीच तरतुदी करण्यात येतात. समाजातील या घटकांचे आर्थिक आणि सामाजिक स्थान वाढविणे म्हणजेच सामाजिक कल्याण होय. महिला व बालकल्याण कार्यक्रम, ग्रामीण भागात आरोग्यसेवा भक्कम करणे. शेतमजूर व कामगार कल्याण कार्यक्रम, झोपडपट्टी विकासयोजना, बेघरांना घरे बांधून देणे, आदिवासींना मुख्य प्रवाहात आणने यामाध्यमातून सामाजिक कल्याण साध्य केले जाते. अशाप्रकारचे सामाजिक कल्याण साध्य करणे हे आपल्या आर्थिक नियोजनाचे नेहमीच मुख्य उद्दिष्ट राहिलेले आहे.

### ९) संरक्षण सिद्धता निर्माण करणे:

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून देशाची संरक्षणयंत्रणा अधिक भक्कम करण्यावर नियोजनात भर देण्यात आला. १९६२ चे चीनयुध्द आणि १९६५ चे पाकविरूद्धचे युध्द झाल्यानंतर आपली संरक्षणयंत्रणा भक्कम असली पाहिजे याची जाणीव झाली. त्यानंतर प्रत्येक योजनेत संरक्षणखर्चाची तरतूद अगदी अग्रक्रमाने करण्यात आली. नव्वदीच्या दशकापासून वाढता दहशतवाद, घुसखोरी याला प्रतिबंध करण्यासाठी संरक्षणधोरणाचा विस्तार करण्यात आला. थोडक्यात, पाकिस्तान आणि चीन या शेजारी राष्ट्रांबरोबर नेहमीच अस्थिर आणि अनिश्चित संबध राहिले, त्यांचा धोका नेहमी जाणवत राहिल्यामुळे नियोजनात संरक्षण सिद्धता प्राप्त करणे हे महत्वपूर्ण उद्दिष्ट राहिले आहे.

**१०) विज्ञान-तंत्रज्ञान व संशोधनाचा विकास करणे:**

कोणत्याही देशाचा आर्थिक विकास हा शिक्षण संशोधन विज्ञान-तंत्रज्ञान यांच्यावर अवलंबून असतो. स्वांतत्र्यानंतर भारताला याची जाणीव झाली. १९८० पर्यंत शेती, उद्योग, पायाभूत उद्योग व सेवा यांच्यावर भर देण्यात आला. त्यानंतर विज्ञान तंत्रज्ञानावर भर देण्याचा प्रयत्न झाला. १९९०-९५ नंतर माहिती-तंत्रज्ञानाचे जाळे देशभर विस्तारण्याचा प्रयत्न झाला. देशात अनेक संशोधन संस्था, माहिती-तंत्रज्ञान संख्या यशस्वीपणे काम करीत आहेत. अवकाश तंत्रज्ञान क्षेत्रात तर भारताने स्वंतत्र ठसा उमठविलेला आहे. भारताची मंगळ मोहिम यशस्वी झाली हे आजपर्यंत केलेल्या विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्राने केलेल्या प्रयत्नांचे यश आहे.

**११) लोकसंख्यानियंत्रण:**

भारताची लोकसंख्या जास्त आहे, जगात लोकसंख्येबाबत भारताचा दुसरा क्रमांक आहे. अर्थात नियोजन काळात लोकसंख्या नियंत्रित ठेवण्याचा नेहमीच प्रयत्न झाला. कुटूंबनियोजन आणि कुटूंबकल्याण कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी झाली. भारत हा लोकसंख्येचे नियंत्रण लोकशाही पध्दतीने करणारा जगातील प्रभावशाली देश आहे.

**समारोप:**

स्वातंत्र्यादरम्यान अविकसित समजल्या जाणाऱ्या भारताने आर्थिक नियोजनाच्या माध्यमातून आर्थिक विकासाचा भक्कम मार्ग तयार केला आहे. शेती, उद्योग, दळणवळण, संशोधन, संरक्षण, अवकाशतंत्रज्ञान, ग्रामीण विकास, माहिती तंत्रज्ञान यासह सर्वच क्षेत्रांमध्ये आज आपण जी प्रगती पाहत आहोत त्याच्या मागे आर्थिक नियोजनाचे पाठबळ होते असेच म्हणावे लागते. वरील सर्व उद्दिष्टांचा पाठपुरावा सर्वच पंचवार्षिक योजनांमध्ये करण्याचा प्रयत्न झाल्याचे आपणास आढळून येते.

## २.४ बारावी पंचवार्षिक योजना (२०१२-१७)

बाराव्या पंचवार्षिक योजनेचा कालावधी १ एप्रिल २०१२ ते ३१ मार्च २०१७ असा आहे. सर्वसमावेशक वेगवान आणि निरंतर वृध्दी हे या योजनेचे मुख्य उद्दिष्ट आहे.

**उद्दिष्ट्ये:**

**१) आर्थिक विकासाचा दर:**

बाराव्या योजनेत आर्थिक विकासाचा वार्षिक दर ८ टक्के निश्चित करण्यात आला आहे. यापैकी कृषी क्षेत्राच्या विकासाचा दर ४ टक्के तर तयार वस्तू उत्पादनवाढीचा आणि औद्योगिक विकासाचा दर प्रतिवर्षी १० टक्के निश्चित करण्यात आला आहे. प्रत्येक राज्याच्या आर्थिक विकासदर अकराव्या योजनेपेक्षा जास्त असावा अशी अपेक्षा आहे. धान्य उत्पादनात किमान दोन टक्के अपेक्षा आहे मात्र फळे, भाजीपाला, मासे, दूध व दूग्धजन्य उत्पादन यांच्या वाढीचा दरमात्र ५ टक्क्यापेक्षा जास्त अपेक्षिलेला आहे. पाणलोट क्षेत्राचा विकास आणि विस्तार करणे, सिंचनात आधुनिकता निर्माण करण्यासाठी प्रबोधन करणे, शेतीला वीजपुरवठा करणे, एकात्मिक जल

आयोगाच्या माध्यमातून सिंचनाचा विस्तार करणे. युरोपिय युनियनने तयार केलेल्या वॉटरफ्रेमवर्क लॉ ॲन्ड पब्लिक ट्रस्ट ड्रॉक्ट्रिन या तत्वाचा वापर करणे.

औद्योगिक विकासाचा दर १० ते १२ टक्के यादरम्यान वाढविण्याचे उद्‌दिष्ट आहे. औद्योगिक क्षेत्रातून ३० ते ४० लाख रोजगार निर्माण करण्याचेही उद्‌दिष्ट आहे. तंत्रज्ञान विस्तार संशोधनावर भर, परकिय गुंतवणूकीस प्रोत्साहन ही उद्‌दिष्टे आहेत.

**२) दारिद्र्य व बेरोजगारी:**

दारिद्र्याचे प्रमाण १० टक्क्यांनी कमी करणे आणि ५० लाख रोजगार निर्माण करण्याचे उद्‌दिष्ट आहे. प्रामुख्याने ग्रामीण भागातील दारिद्र्याचे प्रमाण कमी करण्यावर अधिक भर देण्याचे उद्‌दिष्ट आहे. कौशल्याच्या साधनसंपत्तीचा विस्तार करून स्वंयरोजगाराला प्राधान्य देण्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले.

**३) शिक्षण:**

१२ व्या योजनेत कौशल्यावर आधारित शिक्षण आणि संशोधन यावर भर देण्यात आला आहे. योजनाकाळात शाळांची संख्या वाढविण्यावर आणि पटसंख्या वाढविण्यावर अधिक लक्ष देण्यात आले माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांच्या गळतीवर नियंत्रण आणण्यासाठी राज्यांनी पुढाकार घ्यावा अशी अपेक्षा करण्यात आली. शिक्षणामधील लिंगभेद आणि सामाजिक भेद करण्याचेही उद्‌दिष्ट आहे.

**४) आरोग्य:**

आरोग्यसेवेची गुणवत्ता वाढविणे, स्वच्छ पाणी पुरवठा करणे, प्रसूतीकाळात सोयी-सुविधा अग्रक्रमाने उपलब्ध करून देणे, बालकसेवा आणि लसीकरण करणे, वैद्यकिय कर्मचाऱ्यांची कमतरता पूर्ण करणे, जन्मदर दरहजारी २५ पर्यंत खाली आणने, निव्वळ प्रजननदर २.१ पर्यंत ठेवणे कुपोषनाचे उच्चाटन करणे आरोग्य विषयक उद्‌दिष्ट्ये आहेत. योजनाकाळात आरोग्यसेवांवर २.५ टक्के खर्च अपेक्षित आहे.

**५) पायाभूत सुविधा आणि ग्रामीण विकास:**

पायाभूत क्षेत्रात स्थूल देशांतर्गत उत्पादनाच्या ९ टक्के गुंतवणूकीचे उद्‌दिष्ट आहे. सिंचन क्षेत्र ९० दशलक्ष हेक्टर वरून १०३ दशलक्ष हेक्टरपर्यंत वाढविण्याचे ध्येय आहे. सर्व खेड्यांना योजनेअखेर वीजपुरवठा करण्याचेही प्रयत्न आहेत. निर्मल ग्रामयोजना सक्षम करणे आणि किमान ५० टक्के ग्रामीण जनतेला पिण्याचे शुध्द पाणी देण्याचे उद्‌दिष्ट आहे. ग्रामीण जनतेला बँकिंग सेवा पुरविणे विविध प्रकारची अनुदाने थेट नागरिकांच्या खात्यामध्ये जमा करण्याची बँकिंग व्यवस्था करणे. योजनेअखेर एक दशलक्ष हेक्टर वनीकरण करणे.

**६) उर्जाक्षेत्र:**

योजनाकाळात १ लाख मेगावॅट उर्जानिर्मिती करण्याचे उद्‌दिष्ट आहे. अणुउर्जाकार्यक्रम चालू ठेवणे आणि त्यातील सुरक्षिततेवर अधिक लक्ष केंद्रित करणे. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू उत्पादन यावर भर देणे, सौरउर्जेचा वापर वाढविणे आणि उर्जेची गरज पूर्ण करणे याला प्राधान्य देण्यात आले.

### ७) वाहतुक क्षेत्रः

राष्ट्रीय महामार्गांच्या विस्तारीकरणावर भर देणे, राज्य आणि राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा वाढविणे, ईस्ट अॅन्ड वेस्र्टन कॉरिडॉट प्रकल्प पूर्ण करणे, रेल्वेची मालवाहतूक क्षमता विस्तारणे, रेल्वे भाड्यासंदर्भात सुनिश्चित नियोजन करणे, रस्ते आणि रेल्वेमार्ग बंदरांशी जोडणे आवश्यकतेनुसार बीओटी तत्वानुसार रस्तेवाहतुकीची कामे पूर्ण करणे ही उद्दिष्ट्ये निश्चित करण्यात आली आहेत.

## २.५ बाराव्या योजनेची संसाधने आणि संसाधनाचे वाटप

बाराव्या योजनेवर केंद्र आणि राज्यांकडून १,२३,७५६ कोटी रूपयांचा खर्च नियोजित आहे यापैकी केंद्राकडून ५९,०७२ कोटी तर राज्यांकडून ५७,२५८ कोटी खर्च नियाजित आहे. बाराव्या योजनेत प्रमुख क्षेत्रांसाठी खर्चाची नियोजित म्हणजेच संसाधनांचे वाटप खालीलप्रमाणे आहे.

(कोटी रुपये)

| अन | घटक | खर्च | प्रमाण % |
|---|---|---|---|
| १ | शेती आणि जलसंपदा | २,८४,०३० | ७.९६ |
| २ | ग्रामीण विकास पंचायतराज्य | ६,७३,०३४ | १८.८६ |
| ३ | वाहतुक-उर्जा | ४,७४,७३६ | १२.५७ |
| ४ | शिक्षण | ४,५३,७२८ | १२.७१ |
| ५ | आरोग्य बालकल्याण | ४,०८,५२१ | ११.४५ |
| ६ | नागरी विकास | १,६४,०७८ | ४.६० |
| ७ | इतर | १,३६,५०० | ३१.८४ |
| | **एकूण** | **३५,६८,६२६** | **१००** |

संदर्भः भारतीय नियोजन मंडळ

## २.६ भारतातील सेवा क्षेत्रः महत्व आणि प्रगती

अर्थव्यवस्थेत तीन प्रमुख क्षेत्रे असतात. प्राथमिक क्षेत्र, द्वितीय क्षेत्र आणि तृतीय क्षेत्र असे त्यांचे विभाजन असते. प्राथमिक क्षेत्रात शेती आणि शेती संरक्षण व्यवसाय असतात. द्वितीय क्षेत्रात सर्वप्रकारच्या उद्योगांचा समावेश असतो, तर तृतीय क्षेत्रात सर्वप्रकारच्या सेवा समाविष्ठ असतात. भारतीय अर्थव्यवस्थेत स्थूल राष्ट्रीय उत्पादनात प्राथमिक क्षेत्राचा हिस्सा जास्त होता. अर्थात उद्योगक्षेत्राचा आणि इतर सेवा व्यवसायांचा विकास आणि विस्तार होत राहिल्यामुळे द्वितीय आणि तृतीय क्षेत्रांचा राष्ट्रीय उत्पादनातील हिस्सा वाढत राहिला. १९९१ नंतर भारतात उदारीकरण आणि खाजगीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. अनेक उद्योग-व्यवसायांमध्ये देशी-विदेशी कंपन्या उत्पादने करू लागल्या. या नवीन विकास प्रक्रियेतून अनेक प्रकारच्या छोट्या-मोठ्या उद्योग व्यवसायांना चालना

मिळाली. यातूनच अनेक प्रकारच्या सेवाव्यवसायांना गती मिळाली. प्रामुख्याने नागरी भागात तसेच ग्रामीण भागात अनेक प्रकारच्या सेवा व्यवसायांना चालना मिळाली.

सेवा क्षेत्रामध्ये प्रामुख्याने पुढील सेवांचा समावेश होतो - व्यापार, बांधकाम, दळणवळण, सामाजिक आणि वैयक्तिक सेवा, साठवणूक, वाहतुक, विमा, बँकिग, वित्त, व्यवसायसेवा, स्थावर मालमत्ता व्यवहार, हॉटेल्स, रेस्टॉरंट, पर्यटन, आरोग्य, वैद्यकिय सेवा, क्रिडा-मनोरंजन वगैरे. या सर्व सेवांचा सेवाक्षेत्र या संकल्पनेत समावेश होतो. भारत हा सेवाक्षेत्रात अग्रगण्य असणारा जगातील पंधराव्या क्रंमाकाचा देश आहे. देशातील एकूण श्रमशक्तीपैकी २३ टक्के रोजगार सेवा क्षेत्रातून निर्माण झालेल्या आहे.

**२.६.१ सेवा क्षेत्राचे महत्वः**

भारतीय अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्राचे महत्व वाढलेले आहे राष्ट्रीय उत्पादन, रोजगार निर्मिती, राहणीमानाचा दर्जा, उपभोगाचे प्रमाण, कार्यक्षमता, मानवविकास यासारख्या विविध घटकांच्या अनुषंगाने विचार करता सेवा क्षेत्राचे महत्व वाढलेले आहे. पुढील मुद्यांच्या सहाय्याने सेवा क्षेत्राचे महत्व कसे वाढलेले आहे ते समजून येते.

**१) राष्ट्रीय उत्पन्नात वाढता हिस्साः**

भारताच्या दरडोई उत्पन्नात प्राथमिक क्षेत्राचा हिस्सा जास्त होता. १९८० पर्यंत या क्षेत्राचा हिस्सा माफक म्हणजे ३० टक्क्यांपर्यंत होता. १९९० नंतर खाजगीकरणाची प्रक्रिया सुरू झाली आणि विविध प्रकारच्या सेवा व्यवसायांना चालना मिळाली. गेल्या २०-२५ वर्षांत विविध सेवांचा विस्तार झाल्यामुळे त्यांचा राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा वाढत गेला. १९५०-५१ मध्ये सेवा क्षेत्राचा हिस्सा ३० टक्के होता. १९९०-९१ मध्ये ४०.३% १९९९-०० मध्ये ४५.७ आणि २०१०-११ मध्ये ५३.७% अशाप्रकारे राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा वाढत गेला.

**२) रोजगार क्षमता वाढलीः**

सेवा क्षेत्राने देशात मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या. देशातील एकूण श्रमशक्तीपैकी २३% रोजगार सेवा क्षेत्रात उपलब्ध आहे. ग्रामीण भागात शेतीतून सेवाक्षेत्राकडे होणारे स्थंलातर वाढलेले आहे. वाहतुक संस्था, बांधकाम व्यवसाय, मोबाईल, इंटरनेट व इतर दळणवळण संस्था, विमा आणि बँकिग क्षेत्र, वाहनविक्री-दुरूस्ती, संशोधन संस्था, आरोग्य सेवा संस्था, कॉल सेंटर्स, शिक्षणसंस्था यासारख्या विविध सेवा संस्थामध्ये रोजगार निर्माण झालेला आहेत. थोडक्यात बदलत्या आर्थिक पर्यावरणात जागतिकीकरणाच्या प्रवाहात भारतात सेवा क्षेत्राने रोजगार निर्माण करण्याचे कार्य केलेले आहे त्यामुळे सेवा क्षेत्र महत्वाचे ठरले आहे.

**३) ग्रामीण क्षेत्रात वाढता प्रभावः**

भारतीय अर्थव्यवस्थेत ग्रामीण भागात शेती आणि शेती संलग्न व्यवसाय यांचाच प्रभाव होता. ग्रामीण भागात आता विविध प्रकारच्या सेवा व्यवसायांची संख्या वाढली. टेलिफोन, मोबाईल, इंटरनेट, कुरियरसेवा, खाजगी आरोग्य सेवा यांचे प्रमाण ग्रामीण भागात वाढत आहे. दूरदर्शनबरोबरच खाजगी चॅनेल्स, केबलसेवा आणि डी. टू. एच सेवा ग्रामीण आणि शहरी भागात वाढले आहेत.

वाहनविक्री केंद्रे, मॉल्स, हॉटेल्स, रेस्टॉरंट्स यांची ग्रामीण भागातील वाढणारी संख्या लक्षणिय स्वरूपाची आहे. थोडक्यात, भारतीय अर्थव्यवस्थेत ग्रामीण भागात आता सेवाक्षेत्राने चांगलाच प्रभाव निर्माण केलेला आहे.

**४) विदेशी चलनात वाढ:**

सेवा क्षेत्राच्या विस्तारात विदेशी व्यापारातील वाढ तसेच देशांतर्गत व्यापारातील वाढती उलाढाल या बाबी महत्वाच्या आहे. विदेशी व्यापाराची दिशा आणि रचना बदलली. विविध देशांना भारतातून वस्तूंची आणि सेवांची निर्यात होऊ लागली. उपग्रह सेवा भारताकडून दिली जात आहे अमेरिका, युरोपियन देश, भारतीय अवकाश स्थानकांचा वापर करत आहेत. उपग्रह सेवांचा वापर करत आहेत. अशाच प्रकारच्या विविध सेवा भारताकडून पुरविल्या जात आहेत. यामुळे मिळणाऱ्या विदेशी चलनामध्ये सेवाव्यवसायांचा हिस्सा मोठा आहे.

**५) माहिती–तंत्रज्ञान उद्योगांचा वाढता विस्तार:**

सेवा व्यवसायांमध्ये माहिती तंत्रज्ञान क्षेत्र महत्वाचे आहे. उदारीकरणाच्या प्रक्रियेत १९९८ नंतर माहिती तंत्रज्ञानाचा खूप वेगाने विस्तार झाला. अर्थव्यवस्थेच्या सर्व क्षेत्रांमध्ये, उद्योगांमध्ये माहिती तंत्रज्ञानाचा वापर वाढला आहे. रेडिओ, दूरदर्शन, इंटरनेट, वृत्तपत्रे, कंप्युटर्स, इंटरनेट, मोबाईल्स यांच्या वापरात मोठी वाढ निर्माण झाली आहे. सॉफ्टवेअर निर्यात क्षेत्रात भारताची एकप्रकारची मक्तेदारी निर्माण झाली आहे. अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या भारतातून आऊटसोर्सिंग करून घेत आहेत. २००५–०६ नंतर सेवा क्षेत्रातील आय. टी. सॉफ्टवेअर सेवा व्यवसायातील निर्यात प्रतिवर्षी सर्वसाधारणपणे दीड लाख कोटी रूपये यादरम्यान आहे. देशांतर्गत पातळीवर माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील विविध कंपन्यांकडून सरकारला मोठ्या प्रमाणात महसूल मिळाला. १९९३–९४ मध्ये ६,५०० कोटी रुपये महसूल मिळाला होता, २००९–१० मध्ये ३,४५,७६१ को. रु. एवढा मोठ्या प्रमाणात वाढला.

**६) सेवा अर्थव्यवस्थेचा उदय झाला:**

१९९१ नंतर भारतात आर्थिक सुधारणा कार्यक्रमाची अंमलबजावणी झाली. त्यापूर्वी कृषीक्षेत्राचा आणि पर्यायाने प्राथमिक व्यवसायांचा प्रभाव होता. खाजगीकरण आणि जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत भारतात विविध उद्योग–व्यवसायांना चालना मिळाली. माहिती तंत्रज्ञान, सॉफ्टवेअर, इंटरनेट, कंप्युटर सेवा, टेलिकम्युनिकेशन, कुरियर, वाहतूक–रस्ते, विमान खाजगी वाहतुक सेवा, हॉटेल्स, पर्यटन, संशोधन या व्यवसायांना खूप संधी निर्माण झाली. टेलिकम्युनिलकेशन आणि सॉफ्टवेअर क्षेत्राने मोठी प्रगती केली. या सेवांशी निगडित असणारे सहाय्यक व्यवसाय सुरू झाले. शहरी, निमशहरी आणि ग्रामीण भागापर्यंत वेगवेगळ्या सेवा व्यवसायांचा विस्तार झाला. प्राथमिक क्षेत्राचा विकास समाधानकारक झाल्यानंतर द्वितीय क्षेत्राचा म्हणजे उद्योगांचा विकास होतो आणि नंतर सेवा क्षेत्र वाढत जाते. भारतामध्ये मात्र सेवाक्षेत्राने मोठी उडी घेत एक प्रभावशाली क्षेत्र म्हणून अर्थव्यवस्थेत आपले स्थान भक्कम केल्याचे दिसून येते.

### ७) विमा आणि बँकिंग क्षेत्राचा विस्तारः

१९९१ नंतर सेवा व्यवसाय क्षेत्रातील विमा आणि बँकिग क्षेत्रातील बदल खूप नेत्रदिपक स्वरूपाचे आहेत. माहिती तंत्रज्ञानाचा, इंटरनेटचा सर्वाधिक वापर करून बँकिग क्षेत्राने आपला चेहरा बदलला आहे. सरकारी बँकांप्रमाणेच खाजगी बँकाचा विस्तार झाला खाजगी बँका ग्रामीण भागापर्यंत पोहचल्या. सर्वच क्षेत्रांना या बँकामार्फत कर्ज पुरवठा होऊ लागला. वाहने-घरे खरेदीसाठी सर्वच बँकांचा आकर्षक कर्ज योजना सुरू झाल्या. नेटबँकिग, ए. टी. एम सेवा यांची प्रगती झाली. नागरी सहकारी बँका सुध्दा ए. टी. एम सेवा देऊ लागल्या. सरकारच्या नियंत्रणाखाली असणाऱ्या स्वायत्त विमाकंपन्या बरोबर खाजगी विमा कंपन्या बाजारात आल्या. त्यांच्याही व्यवसायात मोठी वाढ झाली. थोडक्यात सेवा क्षेत्रात वित्तीय, बँकिंग विमा व्यवसायातून विकासात मोठी संधी निर्माण झाली.

### २.६.२ भारतातील सेवा क्षेत्राची प्रगती

भारतीय अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्राचे महत्व वाढलेले आहे. १९९० पूर्वी प्राथमिक क्षेत्राचा प्रभाव होता, त्यानंतर खाजगीकरण आणि उदारीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. विविध प्रकारच्या सेवा व्यवसायांनी अर्थव्यवस्थेत आपला प्रभाव निर्याण केला. वाहतुक, बांधकाम, स्थावरमत्तेचे व्यवहार, व्यापार, विमा, बँकिग, वित्तसेवा, इंटरनेट, मोबाईल सेवा, इतर, शिक्षण-संशोधन, हॉटेल्स, पर्यटन, यासारख्या अनेक प्रकारच्या सेवा व्यवसायांची संख्या वाढली.

रस्ते वाहतुक, रेल्वे आणि विमान वाहतुक, दळणवळण सेवा यामध्ये मोठी वाढ झाली आहे. साधारणपणे योजना खर्चातील १८ टक्के हिस्सा वाहतुक दळणवळण क्षेत्रावर केला जात आहे. रेल्वेमार्गांची संख्या वाढली ६४,४००,००० किमी लांबीचे रेल्वेमार्ग उपलब्ध आहेत. राष्ट्रीय महामार्गांचे विस्तारीकरण रूंदीकरण झाले आहे. त्यामध्ये दर्जात्मक सुधारणा झाली आहे. देशात एकूण रस्त्यांपैकी ५० टक्के रस्ते पक्क्या स्वरूपाचे आहेत. याबरोबरच सागरी वाहतुकसेवा आणि विमानसेवा यांच्यामध्येही वाढ झाली आहे. देशात ४० लाख किमी रस्त्यांचे जाळे विणले आहे. ७५,००० किमी लांबीचे राष्ट्रीय महामार्ग आहेत देशात ६५ टक्के मालवाहतुक आणि ८५ टक्के प्रवाशी वाहतुक रस्त्यांद्वारे होते. देशात जलवाहतुकीमध्ये समुद्रामार्गी होणारी वाहतुक जास्त आहे. देशात एकूण १२ मोठी आणि सुमारे २०० लहान बंदरे आहेत.

पोस्ट, दूरध्वनी, रेडिओ, दूरदर्शन या दळणवळण सेवांमध्येही मोठी वाढ झालेली आहे. २०१० मध्ये देशात १,५४,९३० पोस्ट कार्यालये होती. सरासरीने २१.२० चौ. किमी मध्ये ७५०० लोकांना पोस्ट कार्यालय उपलब्ध आहे. देशात २०१० पर्यंत मोबाईलचा वापर वाढला असून सुमारे ८९३.८६ दशलक्ष मोबाईल वापरात आहेत. दूरध्वनीची घनता ७७ टक्क्यांपर्यंत वाढली आहे. व्यापारी बँका आणि वित्तीय संस्था यांचा विस्तार मोठ्या प्रमाणात झाला. ग्रामीण भागापर्यंत सरकारी आणि खाजगी बँकानी आपल्या शाखांचा विस्तार केला.

१९५० नंतर देशाच्या स्थूल राष्ट्रीय उत्पादनामध्ये सेवा क्षेत्राचा असणारा हिस्सा तसेच सेवा क्षेत्रातील उपक्षेत्रांचा हिस्सा आणि रोजगार निर्मितीमध्ये सेवा क्षेत्राचा हिस्सा यांचे विवेचन पुढील दोन तक्त्यांवरून करता येते.

(%)

| घटक | १९८०-९० चे दशक | | १९९०-२००० | | २०००-२०१० | |
|---|---|---|---|---|---|---|
| | सेवा उप क्षेत्रात वाटा | जी.डी.पी मधील वाटा | सेवा उपक्षेत्रातील वाटा | जी.डी.पी मधील वाटा | सेवा उपक्षेत्र वाटा | जी.डी.पी मधील वाटा |
| १) सामान्य प्रशासन, संरक्षण व इतर | ३३.१२ | १३.४ | ३०.१३ | १३.९ | २६.१ | १४ |
| २) वित्त, विमा, स्थावर मालमत्तेचे व्यवहार, व्यवसाय | २२ | ८.५ | २६.२ | १२ | २७.३ | १४.७ |
| ३) व्यापार, हॉटेल्स रेस्टॉरंट | २९.५ | १०.८ | २८.५ | १३ | २९.४ | १५.८ |
| ४) वाहतुक, साठवणूक दळणवळण इतर | १५.३ | ६.४ | १५ | ६.९ | १७.३ | ९.३ |

१९८०-९० दशकापासून २०००-१० या दशकामध्ये सेवा क्षेत्रातील विविध उपक्षेत्रांचा हिस्सा वाढत गेल्याचे दिसून येते. वित्त, विमा, स्थावर मालमत्तेचे व्यवहार, व्यापार, हॉटेल, विविध व्यवसाय यांचा सेवा क्षेत्रास सुमारे ३० ते ३५ टक्के हिस्सा आढळतो. रोजगार निर्मितीमध्ये सेवा क्षेत्राने मोठे योगदान दिले आहे. १९९९-०० पासून सेवा क्षेत्राचा रोजगारात २० ते २५ टक्के इतका वाटा आहे.

**भारतातील क्षेत्रनिय रोजगार क्षमता**

| क्षेत्र | १९९९-०० | २००४-०५ | २००९-१० |
|---|---|---|---|
| प्राथमिक | ६१.७ | ५४.५ | ५३.२ |
| दुय्यम | १५.२ | १८.१ | २१.५ |
| तृतीय | २२.४ | २३.४ | २५.३ |

संदर्भः इकॉनॉमिक सर्व्हे ऑफ इंडिया.

Service seetor in India, 'Trends, Issues and forward', Arpita Makheree.

## २.७ सारांशः

१९९१ नंतर भारतात खाजगीकरण आणि उदारीकरणाचे पर्व सुरू झाले सेवा क्षेत्राने यामध्ये खूप मोठी प्रगती केली. रोजगारनिर्मिती, उत्पन्न, गुंतवणूक, यामध्ये सेवाक्षेत्राने अनुकूल बदल घडविले. राष्ट्रीय उत्पादनात सेवा क्षेत्राचा हिस्सा ५५ ते ६० टक्के यादरम्यान राहिला. वित्तीय व्यवहार, बँकिग, विमा, वाहतुक-दळणवळण, हॉटेल्स, पर्यटन, दूरसंचार यासह विविध सेवा व्यवसायांना मोठी चालना मिळाली. थोडक्यात भारतीय अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्राने मोठे योगदान दिले असून त्या क्षेत्राची प्रगती झाली आहे.

## २.८ स्वंय अध्ययनासाठी प्रश्न

### अ) रिकाम्या जागा भरा.

१) आर्थिक नियोजनाची सुरूवात ....... मध्ये झाली.

२) भारतीय नियोजन मंडळाची स्थापना ....... साली झाली.

३) भारतीय नियोजन मंडळाची जागा ...... ने घेतली आहे.

४) बाराव्या पंचवार्षिक योजनेचा कालावधी ...... आहे.

५) जागतिकीकरणाच्या काळात स्थूल देशांतर्गत उत्पादनामध्ये ...... क्षेत्राचा हिस्सा वाढला असून ...... क्षेत्राचा हिस्सा घटला आहे.

**उत्तरे :**

१) रशिया २) १९५० ३) निती आयोग ४) २०१२-२०१७ ५) सेवा, शेती.

### ब) चूक की बरोबर ते लिहा.

१) भारतात नियोजनाची सुरूवात ब्रिटिशांनी केली.

२) संरक्षण सिध्दता आणि स्वंयपूर्णतः ही भारताच्या नियोजनाची उद्‌दिष्ट्ये नाहीत.

३) पंचवार्षिक योजनेचा आराखडा तयार करण्याचे काम भारतीय नियोजन मंडळ करते.

४) जागतिकीकरणच्या काळात भारतात कृषी क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा कमी झाला.

५) बाराव्या योजनेअखेर देशातील किमान ५० टक्के ग्रामीण जनतेला पिण्याचे शुध्द पाणी उपलब्ध करून देण्याचे उद्‌दिष्ट आहे.

**उत्तरेः**

१) चूक २) चूक ३) बरोबर ४) बरोबर ५) बरोबर

## २.९ सरावासाठी प्रश्नः

१) भारताच्या आर्थिक नियोजनाची प्रमुख उद्‌दिष्ट्ये विशद करा.

२) भारतीय अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्राचे महत्व स्पष्ट करा.

३) भारतीय अर्थव्यवस्थेतील सेवा क्षेत्राच्या प्रगतीची चर्चा करा.

**टीपा लिहा.**

१) बारावी पंचवार्षिक योजना-उद्दिष्ट्ये

२) सेवा क्षेत्राची प्रगती

३) सेवा क्षेत्राचे महत्व

## २.१० अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके


१) Agrwal A. N. "Indian Economy", Vikas Publishing House, New Delhi.

२) Dutta and Sundaram KPM, "Indian Economy", S. Chand, New Delhi.

३) Mishara S. K. and Puri V. K., "Indian Economy", Himalaya Publishing House.

४) डॉ. स. श्री. मु. देसाई, डॉ. निर्मल भालेराव, ''भारतीय अर्थव्यवस्था,'' निराली प्रकाशन, पुणे.


❑❑❑

## सत्र ६ : घटक ३

# विदेशी भांडवल आणि बहुराष्ट्रीय कंपन्या

**(Foreign Capital and Multinational Corporations)**

**अनुक्रमणिका :**


३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय-विवेचन

- ३.२.१ आंतरराष्ट्रीय पर्यावरणाचा अर्थ
- ३.२.२ विदेशी भांडवलाचा अर्थ
- ३.२.३ विदेशी भांडवलाची गरज
- ३.२.४ विदेशी भांडवलासंबंधी भारताचे धोरण
- ३.२.५ बहुराष्ट्रीय महामंडळे अर्थ व व्याख्या
- ३.२.६ बहुराष्ट्रीय महामंडळाचे गुण
- ३.२.७ बहुराष्ट्रीय महामंडळाचे दोष

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द

३.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ सूची


## ३.० उद्दिष्टे:

- आंतरराष्ट्रीय पर्यावरणाचा अर्थ समजून घेणे
- विदेशी भांडवलाचा अर्थ पाहणे.
- विदेशी भांडवलाची गरज अभ्यासणे.
- विदेशी भांडवलासंबंधी भारताचे स्वातंत्र्यपूर्व काळातील धोरण अभ्यासणे
- भारताच्या स्वातंत्र्योत्तर काळातील विदेशी भांडवलासंबंधीच्या धोरणाचा आढावा घेणे.
- १९७७ च्या जनता सरकारच्या धोरणाचा आढावा घेणे

- विदेशी भांडवलासंबंधी सन १९९१ चे नवे धोरण अभ्यासणे.
- बहुराष्ट्रीय महामंडळाचा अर्थ समजून घेणे.
- बहुराष्ट्रीय महामंडळाचे गुण अभ्यासणे.
- बहुराष्ट्रीय महामंडळाचे दोष अभ्यासणे.

## ३.१ प्रास्ताविकः

कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासाच्या सुरवातीच्या काळात परकीय भांडवलास महत्त्वाचे स्थान असते. हे प्रगत देशांच्या आर्थिक विकासाच्या इतिहासावरून दिसून येते. कारण सुरवातीस इंग्लंडने हॉलंडक डून, अमेरिकेने यूरोप खंडातील देशाकडून व जपानने अमेरिकेकडून परकिय मदत घेतली आहे. अल्पविकसीत व विकसनशील देशात ही जलद गतीने वाढणारी लोकसंख्या, मंद अर्थिक विकास, अल्प दरडोई उत्पन्न व बचत यामुळे भांडवल उभारणीचाा दर कमी असतो. म्हणून या देशांना परकिय भांडवलाची मदत घ्यावीच लागते.दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर युद्धात नुकसान झालेल्या विकसीत देशांनी त्यांच्या अर्थ व्यवस्थांचे पुनरूज्जीवन करण्यासाठी तर नव्याने स्वतंत्र झालेल्या देशांनी आर्थिक विकासाच्या उद्देशाने व पंचवार्षिक योजनांचा खर्च भरून काढण्यासाठी परकीय भांडवल अत्यल्प केलेले होते. प्रा. रॅग्नर नर्क्सच्या मते, विकसनशील देशातील दारिद्रयाचे दृष्टचक्र भेदण्याचाा परदेशी भांडवल हा एक महत्त्वाचा मार्ग आहे. १९७१ नंतरचे खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाच्या धोरणामुळे व १९९५ च्या जागतिक व्यापार संघटनाच्या (W.T.O) स्थापनेमुळे परकिय भांडवलाचा प्रवाह विकसीत देशाकडून अल्पविकसित देशांकडे वाहू लागलेला आहे. भांडवल अधिक गतीशील झाले आहे. सध्याच्या चीन व भारताच्या जलद अर्थिक विकासात विदेशी गुंतवणुकीचाच वाटा मोठा आहे, हे नाकारता येणार नाही. विदेशी भांडवलामध्ये विदेशी सरकारकडून घेतलेले भांडवल, जागतिक बँक(I B R D) व आंतरराष्ट्रीय(I M F) नाणेविधी यासारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांकडून घेतलेली कर्जे, खाजगी विदेशी भांडवल, अनिवासी भारतीयांच्या ठेवी व बहु राष्ट्रीय कंपन्यांनी केलेली गुंतवणूक यांचा समावेश होतो.

## ३.२ विषय विवेचन :

### ३.२.१ आंतरराष्ट्रीय पर्यावरणाचा अर्थः

पर्यावरण म्हणजे सभोवतालची परिस्थिती होय. प्राणी वनस्पती मानव यांच्या विकासावर परिणाम करणारे बाह्य घटक म्हणजे पर्यावरण होय. सामान्यतः पर्यावरण हे जमीन, हवा, पाणी या नैसर्गिक घटकांशी निगडीत असते. हे झाले भौतिक व जैविक पर्यावरण, त्याचप्रमाणे सामाजिक व आर्थिक पर्यावरण होय. सामाजिक पर्यावरणामध्ये मनुष्य जीवन जगण्यासाठी भौतिक पर्यावरणातून वस्तू मिळवितो.या प्रक्रियेतूनच आर्थिक पर्यावरण निर्माण होते. आर्थिक पर्यावरणामध्ये व्यावसायिक पर्यावरणाचा समावेश होतो. तेव्हा आर्थिक पर्यावरण जेव्हा सर्व जगव्याप्त करते तेंव्हा त्यास जागतिक किंवा आंतरराष्ट्रीय पर्यावरण म्हणता येईल. आंतरराष्ट्रीय पर्यावरण म्हणजे आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र असेही म्हणता येईल. म्हणून याची व्याख्या पुढील प्रमाणे केली जाते.

''आंतरराष्ट्रीय पर्यावरणाचा (अर्थशास्त्राचा) संबंध त्या सर्व आर्थिक व्यवहारांशी आहे. जे देशाच्या सीमेबाहेर होतात.'' – सर रॉय हेरॉल्ड

उदारीकरण, जागतिकीकरण यामुळे आज जग अधकि जवळ आले आहे.त्यामुळे जागतिक पर्यावरण एक स्वतंत्र व व्यापक विषय बणला आहे. थोडक्यात, आंतरराष्ट्रीय व्यापार, आयात निर्यात विषयक धोरणे, आंतरराष्ट्रीय घेण्या देण्याचे व्यवहार, आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था, विदेशी विनियम, विदेशी भांडवल, विदेशी कर्जे, बहुराष्ट्रीय कंपन्या यांचा अभ्यास करणारी शाखा म्हणजे आंतरराष्ट्रीय पर्यावरण होय.

**३.२.२ विदेशी भांडवलाचा अर्थ :**

विदेशी भांडवल याचा अर्थ साधारणतः देशात गुंतवणुकीच्या उद्देशाने देशाच्या भौगोलिक सीमेबाहेरील देशातून येणारे भांडवल होय.

एखाद्या राष्ट्रातील गुंतवणुकीसाठी आंतरराष्ट्रीय संस्थांकडून किंवा इतर राष्ट्राकडून आणलेली साधनसामग्री म्हणजे विदेशी भांडवल होय.

एखादा देश दुसऱ्या देशातून ज्या भांडवली वस्तू, तंत्रज्ञान, परकीय कर्जे व मदत यांची आयात करतो.या सर्वांना उद्देशून परकीय भांडवल असे म्हणतात.

थोडक्यात विदेशी सरकार, खाजगी व्यक्ती व संस्था, आंतरराष्ट्रीय, नाणेनिधी, जागतिक बँक यासारख्या आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांकडून कर्जे, मदत अनुदान, देणगी इ. स्वरूपात केलेल्या गुंतवणुकीस ही विदेशी भांडवल संबांधले जाते.

यावरून विदेशी भांडवलाचे पुढील प्रकार आढळतात.

अ) खाजगी विदेशी गुंतवणूकः

१) प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक

२) अप्रत्यक्ष गुंतवणूक

ब) सार्वजनिक विदेशी भांडवल :

१) आंतर सरकारी कर्जे

२) विदेशी संयुक्त गुंतवणूक

क) आंतरराष्ट्रीय संस्थांकडील कर्जे :

ड) बर्हिगत व्यापारी कर्जे

इ) विदेशी मदत

ई) देणगी व अनुदाने

**३.२.३ विदेशी भांडवलाची गरज/ महत्त्व :**

कोणत्याही देशाला जलद आर्थिक विकासासाठी यंत्रसामग्री, तांत्रिक ज्ञान, यंत्राचे सुटे भाग दुर्मिळ कच्चा माल यासारख्या बाह्य साधन सामग्रीची गरज असते. विकसनशील राष्ट्रातील अल्प बचत दर भांडवल उभारणीचा अल्प दर, तांत्रिक मागासलेपणा, कामगारांची अल्प उत्पादकता, बेकारी व दारिद्रयाची समस्या या पार्श्वभूमीवर विदेशी भांडवल महत्वाची भूमिका पार पाडते. विदेशी भांडवलाची गरज किंवा आवश्यकते संदर्भात आर्थिक विकासाच्या दृष्टीने अनुकूल मुद्दे किंवा फायदे पुढील प्रमाणे सांगता येतील–

**१) देशांतर्गत साधनसामग्रीची वाढ करणे:**

विकसनशील देशात भांडवलाची कमतरता असते. देशांतर्गत भांडवल अपुरे असते. परंतु जलद अर्थिक विकासासाठी मोठ्या प्रमाणात भांडवलाची गरज असल्याने त्यात वाढ करणे आवश्यक ठरते. भारताने स्वातंत्र्यानंतर जलद आर्थिक विकासासाठी नियोजनाचा स्विकार केला.परंतु भांडवलांचा अभाव असल्यामुळे विकासाची साधने अपूरी पडू लागली. कारण लोकसंख्येतील जलद वाढ, दारिद्रय, अल्प दरडोई उत्पन्न यामुळे बचतीचे प्रमाण सुरवातीस फारच कमी होते. १९५०-५१ मध्ये भारतातील बचतीचा दर केवळ ६% इतकाच होता. तेंव्हा देशातील बचत व गुंतवणुकीतील फरक भरून काढण्यासाठी परकीय भांडवलाची गरज भासते.

**२) तांत्रिक ज्ञानाची आयात करणे किंवा तंत्रज्ञानातील फरक भरून काढणे:**

भारतासारख्या विकसनशील देशात भांडवलाच्या टंचाई बरोबरच आधुनिक तंत्रज्ञानाचा ही अभाव असतो. परकीय भांडवलाच्या आयातीबरोबरच तांत्रिक ज्ञान, दुर्मिळ उत्पादनाचे घटक, व्यवसाय व व्यावसायिक अनुभव, ज्ञान, व्यवस्थापन पद्धती, संयोजन कौशल्य व नवीन विचार येवून आर्थिक विकासाला मदत होत असते. भारताला रशिया, इंग्लंड जर्मनी, फ्रान्स, अमेरिका इत्यादी देशांनी तांत्रिक व व्यवस्थापकीय ज्ञान दिल्याने भारतात नैसर्गिक गॅस, तेल, इत्यादी उत्पादन शक्य झाले आहे. म्हणून भारतातील जुने व पारंपारिक तंत्रज्ञान व विकसित देशातील नवीन तंत्रज्ञान यातील फरक दूर करण्यासाठी परकीय भांडवलाच्या आयातीची गरज आहे.

**३) व्यवहार शेषाची समस्या सोडविणे:**

विकासाच्या सुरवातीच्या काळात विकसनशील देशांची आयात वेगाने वाढते. कारण औद्योगिकरणाचा पाया पक्का करून जलद विकासासाठी आधुनिक यंत्र सामग्री, औद्योगिक कच्चा माल, भांडवली वस्तू कच्चा माल व तंत्रज्ञान यांची आयात करावी लागते परंतु या आयातीचे मूल्य जास्त असते. या उलट या देशातून सुरवातीच्या काळात होणारी निर्यात शेती उत्पादने व कच्चा माल यासारख्या पारंपारिक वस्तूंचीच असते. या वस्तूंना जागतिक बाजारात कमी किंमत मिळते. यामुळे आयात मूल्य जास्त व निर्यात मूल्य कमी म्हणजे विदेशी व्यापारात तूट येते. म्हणून विदेशी व्यवहार शेषांची समस्या सोडविण्यसाठी विदेशी भांडवलाची गरज असते.

**४) पायाभूत सुविधांचा विकास:**

देशाच्या विकासाठी लोखंड व पोलाद, उत्पादन, वीज निर्मिती, मोठमोठी धरणे बांधणे, पाटबंधारे, रेल्वे, रस्ते व दळणवळण सोयींचा विकास यासारख्या पायाभूत सुविधांच्या मोठया क्षेत्रात गुंतवणूक करून त्यांचा विकास करण्यसाठी विदेशी भांडवलाची गरज असते. कारण भारतासारख्या विकसनशील देशांत भांडवलाचा अभाव असतो. भारतात गेल्या ५०/६० वर्षात आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था व विकसीत देशांचे शासन यांनी पायाभूत उद्योगांच्या विकासाठी मोठया प्रमाणात गुंतवणूक केल्याचे आढळते.

**५) भाववाढीचे नियंत्रण व किंमत स्थैर्य:**

देशाच्या जलद विकासासाठी व पायाभूत सुविधा वाढविणेसाठी तुटीचा अर्थभरणा, विदेशी कर्जे इत्यादी मार्गांनी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली जाते. परंतु मोठ्या प्रकल्पांचा फल पोषण काळ मोठा असतो. ताबडतोब उत्पादन होत नाही. त्यामुळे मागणी व पुरवठ्यात असमातोल निर्माण होऊन किंमत वाढ किंवा भाव वाढ घडून येते. विदेशी भांडवल हे अधिक नफा मिळवूण देणाऱ्या उपभोग्य वस्तू उत्पादनामध्येच

गुंतविले जाते. यामुळे परकीय भांडवल हे चलनवाढ विरोधी असते. उपभोग्य वस्तू व अन्नधान्य टंचाईच्या काळात परकीय भांडवलाच्या साहाय्याने त्यांची आयात करून भाववाढ नियंत्रित करणे शक्य होते.

**६) प्रारंभिक धोका स्विकारणे :**

विकसनशील देशात धाडसी संयोजम, नवप्रवर्तक, अनुभव, उपक्रमशीलता व साहसी खाजगी उद्योजकांचा अभाव असतो. त्यामुळे विविध उद्योगात पुरेशी गुंतवणूक होत नाही. व औद्योगिक विकास घडून येत नाही. त्यामुळे विपुल नैसर्गिक साधने उदा. नैसर्गिक वायू, गॅस,खनिज संपत्ती इ. वापराविना पडून राहतात. तेंव्हा प्रारंभिक काळातील गुंतवणुकीतील धोके अनुभवाने विदेशी भांडवलदारांनी स्वीकारणे व देशात उपक्रमशीलता निर्माण केले की त्यांचे अनुकरण करणारा कारखानदार वर्ग देशात निर्माण होतो व देशाच्या विकासास उत्तेजने मिळते.

**७) आर्थिक विकासाची गती वाढविणेः**

विकसनशील देशात बचत क्षमता असते, पण ती देशात आर्थिक विकासाने वेग घेतल्यानंतरच पुढे येते. म्हणून सुरवातीस आर्थिक विकासास गती देण्याचे कार्य विदेशी भांडवलाने करणे गरजेचे असते. थोडक्यात प्रथमतःआर्थिक विकासाची गती वाढविण्यासाठी विकसनशील देशांना विदेशी भांडवलाची गरज असते.

**८) रोजगारात वाढ करणेः**

विकसनशील देशात जलद गतीने वाढणारी लोकसंख्या, अमर्याद श्रमपुरवठा, मागासलेली शेती, मंद औद्योगिक विकास यामुळे बेकारीची समस्या गंभीर असते. शिक्षणाच्या विकासाबरोबर बेरोजगारांची संख्या वाढत असते. तेंव्हा या बेरोजगारांना रोजगार संधी उपलब्ध करून देण्यासाठी देशात मोठ्या प्रमाणात औद्योगिक विकास व सेवांक्षेत्रांचा विकास घडवून आणण्यासाठी विदेशी भांडवल उपयुक्त ठरते. देशातील दारिद्र्य व बेकारी दूर करावयाची झाल्यास विदेशी भांडवल घेऊन देशांतर्गत उद्योगाचा विकास केल्यास रोजगार संधीत वाढ घडवून आणता येते.

**९) नैसर्गिक साधनामग्रीचा विकास व पर्याप्त वापरः**

भारतासारख्या अनेक विकसनशील देशांत पाणी, खनीज संपत्ती यासारखी नैसर्गिक साधन संपत्ती विपूल असते. परंतु संशोधन करून ती साधन संपत्ती भूगर्भातून शोधून काढणे, तिचा पर्याप्त वापर करणे, तीचा विकास करणे भांडवलाच्या अभावामुळे शक्य होत नाही. म्हणून अशा साधन संपत्तीचा शोध घेणे, तिचा विकास करणे व त्या संपत्तीचा पर्याप्त वापर करून देशांचा विकास साधन्यासाठी परकीय भांडवलाची गरज आहे.

**१०) मूलभूत व अवजड उद्योगांचा विकासः**

लोखंड व पोलाद, इंजिनियरिंग, विमान, रेल्वे, रस्ते, जहाज बांधणी इत्यांदी मूलभूत व अवजड उद्योगांची उभारणी व त्यांचा विकास करणे साठी प्रचंड गुंतवणूक करणे आवश्यक असते.त्याशिवाय देशाचा आर्थिक विकास शक्य नसतो.म्हणून अशा उद्योगांचा विकास करण्यासाठी विदेशी भांडवलाची गरज असते.

**११)** देशांतर्गत बचतीला उत्तेजन देणेः

**१२)** गरीबीचे दृष्टचक्र भेदणे व ग्रामीण विकासः

**१३)** जागतिकीकरणाच्या रेटयासाठी स्पर्धात्मकता विकसित करणे

**१४)** महापूर,भूकंप, दुष्काळ, चक्रीवादळे यासारख्या नैसर्गिक आपत्तीच्या काळात मदत मिळविणे.

**१५)** राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई उत्पन्नात वाढ घडवून आणणे इत्यादी उद्देशांनी परकीय भांडवलाची गरज असते. परंतु १) राजकीय विरोध, २) राष्ट्रीयीकरणाची भिती, ३) दहशतवाद व यादवी युद्धे, ४) सरकारच्या जाचक अटी व दफ्तर दिरंगाई, ५) नफ्याचा कमी दर, ६) प्रचाराचा अभाव, ७) भविष्यकालीन अनिश्चितता, ८) अन्य प्रतिकूल परिस्थिती यामुळे परकीय भांडवलाच्या आयातीत अडथळे निर्माण होतात.

### ३.२.४ विदेशी भांडवलासंबंधी भारताचे धोरणः

अल्पविकसित व विकसनशील देशांना आर्थिक विकासासाठी विदेशी भांडवल कसे आवश्यक असते याचे विवेचन पाठीमागे केलेले आहेच.भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर विकासासाठी परकीय भांडवल आयात भरण्याचा विचार झाला. परंतु सुरवातीस विदेशी भांडवलाविषयी भारताचा दृष्टीकोण भितीचा व संशयाचा होता. विदेशी भांडवलाचे आगमन हे विविध घटकांवर अवलंबून असते. परंतु त्यापैकी महत्त्वाचा घटक म्हणजे सरकारचे विदेशी भांडवलासंबंधीचे धोरण हा आहे. भारत सरकारचे विदेशी भांडवला संबंधी धोरण परिस्थितीनुसार व गरजेनुसार बदलत गेल्याचे दिसत असून प्रामुख्याने ते दोन परस्पर विरोधी मतातून तयार झालेले आहे. उदा.

१) देशांतर्गत बचत व भांडवल उभारणीचा दर कमी असल्याने विदेशी भांडवल देशात येऊ देण्याची गरज आहे.

२) परंतु परकीय भांडवलातून विदेशी राजकारणाचा हस्तक्षेप होण्याचा व पारतंत्र्याचा धोका असतो. म्हणून विदेशी भांडवला बाबत धोरण काटेकोर व नियंत्रित असावे या दोन दृष्टीकोणावर आधारित भारत सरकारच्या विदेशी भांडवलासंबंधीच्या धोरणाचा आढावा घ्यावयाचा झाल्यास तो पुढील प्रमाणे प्रमुख दोन टप्प्यात घेता येईल.

**अ) नियंत्रित धोरणाचा पहिला टप्पा (१९४८ते १९९०)**

**१) १९४८ चे धोरणः**

१९४८ च्या औद्योगिक धोरणानुसार विदेशी भांडवलाबाबतचे धोरण शासंक व अस्पष्ट असेच होते. कारण स्वातंत्र्य पूर्व काळात ब्रिटिश व्यापाराच्या उद्येशाने भारतात आले. परंतु हळूहळू व्यापरातून आर्थिक व राजकीय सत्ता काबीज केली व यामुळेच भारत १५० वर्षे पारतंत्र्यात राहिला. हा अनुभव विचारात घेवून १९४८ च्या धोरणाने विदेशी भांडवलावर राष्ट्रहिताच्या दृष्टीने अनेक बंधने घालण्यात आली. त्यामुळे विदेशी भांडवलदार नाराज झाले.म्हणून पंतप्रधान नेहरू यांनी १९४९ मध्ये विदेशी भांडवलदारांना पुढील आश्वासने दिली-

१) भारतीय भांडवल व विदेशी भांडवल यात कोणताही भेदभाव केला जाणार नाही.

२) भारतीय उद्योजकांप्रमाणे विदेशी उद्योजकांनाही नफा मिळविण्याची समान संधी दिली जाईल.

३) समाजवादी समाज रचनेच्या उद्देशाने जर एखाद्या विदेशी उद्योगाचे राष्ट्रीयकरण केले तर त्यांना योग्य नुकसान भरपाई देण्याची हमी देण्यात आली.

**२) १९५६ चे धोरणः**

१९४८ च्या विदेशी भांडवलाच्या अस्पष्ट धोरणामुळे परकीय भांडवल फारसे आयात झाले नाही. म्हणून १९५६ च्या औद्योगिक धोरणामध्ये स्पष्ट भूमिका स्विकारूण विदेशी भांडवल व्यक्तिगत करण्यासाठी खालील तरतूदी केल्या-

१) निवडक उत्पादन क्षेत्रामध्ये ५०% पेक्षा कमी गुंतवणूक करण्यास विदेशी भांडवलदारांना परवानगी राहील.

२) अनिवासी भारतीय भारतात गुंतवणूक करत असतील तर त्यांना कर विषयक व अन्य सवलती दिल्या जातील.

**३)** १९७२ मध्ये मात्र विदेशी भांडवलाबाबत उदार धोरण स्विकारण्यात आले. निर्यात व्यापारात उत्तेजन देण्यासाठी १००% निर्यात करण्याच्या अटीवर विदेशी कंपन्यांना भारतात भागीदारीत उद्योग सुरू करण्यास परवानगी देण्यात आली.

**४) १९७७ चे जनता सरकारचे धोरणः**

१९७७ मध्ये अधिकाऱ्यांवर आलेल्या जनता सरकारने मात्र विदेशी भांडवलाबाबत नकारात्मक धोरण स्विकारले .डाव्या विचारसरणीच्या या सरकारचा भांडवलशाहीस विरोध होता. त्यामुळे या धोरणानुसार-

१) जेथे भारतीय कौशल्य व भांडवल उपलब्ध आहे त्याक्षेत्रात विदेशी कंपन्यांना परवानगी दिली जाणार नाही.

२) कोका-कोला कंपनीला तिच्या भारतातील कारभाराचा घाशा गुंडाळण्यास सांगण्यात आले.

३) फेराच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार आंतरराष्ट्रीय व्यावसायिक यंत्रणेला (IBM ) तिचे शेअर्स ४०% कमी करण्यास सांगण्यात आले.

४) तंबाखू, साबण, मद्यनिर्मिती अशा अग्रक्रम नसलेल्या क्षेत्रात गुंतवणूक करण्यास परवानगी राहील.

५) भारतात अत्याधुनिक तंत्रज्ञान आणण्याच्या अटीवर हिंदुस्थान लिव्हरला ५१% पर्यंत भागभांडवल वाढविण्यास परवानगी दिली.

वरील सर्व धोरणांचा एकत्रित विचार करता १९९० पर्यंत भारताचे विदेशी भांडवलाबाबतचे धोरण नियंत्रणात्मक च होते असे दिसून येते.

**ब) विदेशी भांडवलाबाबतचे १९९१ चे नवे व खुले धोरणः**

जनता सरकारचा पराभव करून १९८० मध्ये श्रीमती इंदिरा गांधी पुन्हा पंतप्रधान झाल्यानंतर विदेशी भांडवलास अधिक प्राधान्य दिले जावू लागले. तसेच १९८४ मध्ये राजीव गांधी पंतप्रधान झाल्यानंतरही अप्रत्यपक्षपणे विदेशी भांडवलाबाबत खुले धोरण स्विकारलेले होते. यातूनच शेवटी जुलै १९९१ मध्ये भारत सरकारने जे नवे आर्थिक धोरण स्विकारले त्यानुसार भारतीय उद्योगांचे आधुनिकीकरण करणे, नवीन तंत्रज्ञान आत्मसात करणे व जलद औद्योगिक विकास साधने यासाठी खाजगीकरण उदारीकरण व जागतिकीकरण या नवीन आर्थिक सुधारणा कार्यक्रमातंर्गत देशात विदेशी खाजगी गुंतवणूक, अनिवासी भारतीयांच्या ठेवी आकर्षित व्हाव्यात म्हणून खालील उपाय योजना भारतात आल्या. म्हणजेच १९९१ च्या नव्या व खुल्या धोरणातील प्रमुख तरतुदी पुढील प्रमाणे आहेत.

**उपाय योजना/ तरतूदी :**

विदेशी भांडवलाचा ओघ भारतात सातत्याने चालू राहावा म्हणून भारत सरकारने १९९१ च्या औद्योगिक धोरणाने विदेशी गुंतवणुकीसाठी उदारीकरणाच्या धोरणाचा अवलंब करून पुढील महत्त्वाच्या उपाय योजना जाहीर केल्या.

**१) अग्रक्रम उद्योगात प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीस ताबडतोब मान्यताः**

सन १९९१ मध्ये भारत सरकारने उच्च तंत्रज्ञान व मोठी भांडवली गुंतवणूक आवश्यक असणाऱ्या अग्रक्रम उद्योगांची यादी तयार करून अशा उद्योगांमध्ये विदेशी गुंतवणूकदारांना ५१% पर्यंत प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक करण्यास त्वरीत परवानगी देण्यात आली. १९९६ पर्यंत ४८३ उद्योगांत ५१ % पर्यंत तीन उद्योगात ५०% पर्यंत आणि ९ उद्योगात ७४% पर्यंत प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीस मान्यता दिली. यामध्ये भांडवली वस्तू व धातू उद्योग, अन्य प्रक्रिया करमणूकीशी संबंधित इलेक्ट्रानिक्स उद्योग, सेवा क्षेत्र इ. उद्योगांचा समावेश होतो.

**२) सेवा क्षेत्रात विदेशी गुंतवणूकीस मान्यताः**

सन १९९१ पूर्वी सेवा क्षेत्रातील उद्योगात विदेशी गुंतवणुकीस सरकार मान्यता देत नव्हते. पण परकीय चलनाच्या प्राप्तीसाठी विदेशी व्यापारी कंपन्या पर्यटन व्यवसाय संस्था व हॉटेल व्यवसायामध्ये ५१% पर्यंत गुंतवणूक करण्यास परवानगी देण्यात आली आहे.

**३) विदेशी गुंतवणूक वाढ मंडळाची स्थापनाः**

१९९२-९३ मध्ये विदेशी गुंतवणूक वाढ मंडळ (Foreign Investment Promotion Board) स्थापन केले आहे. तसेच निवडक क्षेत्रात मोठ्या विदेशी उद्योगांना व प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीला उत्तेजन देण्यासाठी विशेष अधिकार मंडळाची स्थापना करून बोलणी करण्याचा अधिकार देण्यात आला आहे. की ज्यायोगे विदेशी गुंतवणूक आकर्षित होईलच व त्याचबरोबर उच्च तंत्रज्ञान व विदेशी बाजारपेठा काबीज करता येतील.

**४) वीजनिर्मिती आयात १००% विदेशी गुंतवणूकीस परवानगीः**

भारतात वीज उपभोगाच्या मानाने वीज उत्पादन कमी आहे. तेव्हा विजेच्या टंचाईची समस्या मोठी आहे. म्हणून सरकारने या धोरणानुसार विद्युत निर्मितीच्या क्षेत्रात १००% विदेशी गुंतवणूक करण्याची परवानगी दिलेली आहे. तसेच वीज निर्मिती क्षेत्रातून मिळणारा नफा १००% स्वतःच्या चलनात ठेवण्याचे विदेशी गुंतवणूकदारांना स्वातंत्र्य दिले व अन्य प्राकरच्या सवलतीही दिल्या.

**५) अनिवासी भारतीयांना १००% पर्यंत गुंतवणुकीस मान्यताः**

अनिवासी भारतीय आणि त्यांच्या मालकीच्या कंपन्यांना उच्च अग्रक्रम उद्योगात १००% पर्यंत गुंतवणूक करण्यास परवानगी देण्यात आली. यामध्ये पायाभूत क्षेत्रातील उद्योग, निर्यात गृहे, व्यापारी गृहे, तारांकित व्यापारी गृहे, दवाखाने, आजारी उद्योग,हॉटेल्स यांचा समावेश होता. विदेशी भांडवल भारतात यावे म्हणून अनिवासी भारतीयांना भारतात घर मालमत्ता संपादन करणे तसेच वरील उद्योगात गुंतवलेले भांडवल व त्या उद्योगांतून मिळविलेले उत्पन्न परदेशात नेण्यास स्वातंत्र्य देणे यासारख्या सवलती देण्यात आलेल्या होत्या.

**६) सरकारी परवान्याची गरज नाहीः**

विदेशी तंत्रज्ञान भाडयाने घेणे, देशी विकसीत तंत्रज्ञानाची चाचणी घेऊन परदेशी मदतीच्या प्रत्येक दाव्यासाठी सरकारची मान्यता घ्यावी लागत असे. त्यामुळे अशी मदत घेण्यास विलंब लागत असे म्हणून यापुढे अशा कारणासाठी सरकारी परवानगीची गरज भासणार नाही.

**७)  भारतीय भांडवल बाजारात गुंतवणूकीस मान्यताः**

विदेशी भांडवलाचा प्रवाह देशामध्ये आकर्षित करण्यासाठी इतर राष्ट्रातील प्रसिद्ध विदेशी गुंतवणूक संस्थांना भारतीयय भांडवल बाजारात गुंतवणूक करण्यास परवानगी देण्यात आली. १९९६ पासून अनिवासी भारतीय व त्यांच्या  मालकीच्या कंपण्यांना व्यापारी,बँका, सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील वित्तीय संस्थांच्या परस्परनिधीद्वारा भारतीय चलन बाजारात परदेशी न नेण्याच्या अटीवर निधीची गुंतवणूक करण्यास परवानगी राहील.

**८)  विदेशी गुंतवणूकदारांना अपगुंतवणूकीस परवानगीः**

विदेशी गुंतवणूकदारांनी समजा भारतीय कंपन्यांच्या समभागात गुंतवणूक केली असेल परंतु ही गुंतवणूक त्यांना जेंव्हा फारदेशीर वाटणार नाही तेंव्हा ते समभाग भारतीय भांडवल बाजारात विकून मिळालेला पैसा विदेशी चलनामध्ये  मायदेशी नेण्यास १९९२ पासून परवानगी दिलेली आहे . यामुळे भारतीय भांडवल बाजाराजील विश्वासार्हता वाढेल व अधिक विदेशी गुंतवणूक भारतात होईल म्हणून ही तरतूद करण्यात आली.

**९)  फेराचे (FERA) उदारीकरणः**

भारतातील विदेशी मालकीच्या औद्योगिक कंपण्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी पूर्वी विदेशी विनिमय नियंत्रण कायदा (FERA) करण्यात आलेला होता. यामुळे परकीय भांडवल भारतात मुक्तपणे आयात होत नव्हते. म्हणून या कायद्यातील जाचक अटी रद्द करून फेराचे उदारीकरण करण्यात आले ९ जानेवारी १९९३ च्या कायद्याने ४०% पेक्षा जास्त विदेशी समभाग कंपन्या व भारतीचांच्या पूर्ण मालकीच्या कंपन्या यांना एकाच पातळीवर आणले. त्यासाठी फेराचे फेमात (विदेशी विनिमय व्यवस्थापन कायदा-FEMA) रूपांतर करण्यात आले.

**१०)  विदेशी कंपन्यांना त्यांचे व्यापारी चिन्ह(ट्रेड मार्क) वापरण्यास परवानगीः**

सन १९९२ च्या आदेशानुसार आत्मविश्वासने विदेशी कंपन्यांनी भारतात यावे व विदेशी भांडवलाची गरज पूर्ण करावी म्हणून भारतात व्यवसाय करणाऱ्या विदेशी खाजगी कंपन्यांना स्वतःचे मूळ नाव व व्यापारी चिन्ह (ट्रेड मार्क) वापरण्याची परवानगी देण्यात आली. उदा. हिंदुस्थान लिव्हर कंपनीचा हिरव्या पानाचा ट्रेडमार्क.

**११)  ग्लोबल डिपॉझिटरी रिसीट योजनाः**

ग्लोबल डिपॉझिटरी रिसीट योजने द्वारा (GDR - Global Despository Receipt) विदेशी गुंतवणूकदार भारतीय कंपन्यात कोणत्याही मुदतीने गुंतवणूक करू शकतील व या पावत्या कोणत्याही विदेशी स्टॉक एक्स्जेंमधील यादीत समाविष्ठ करता येतील व कोणत्याही परिवर्तनीय विदेश चलनात देता येतील.

**१२)  विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांना गुंतवणूकीस परवानगी :**

पेन्शन फंड, म्यच्युअल फंड, मालमत्ता व्यवस्थापन कंपनी, गुंतवणूक ट्रस्ट यामध्ये प्रसिध्द विदेशी संख्यात्मक गुंतवणूकदारांना गुंतवणूक करण्यास भारत सरकारने परवानगी दिली. मात्र भारतीय भांडवळ बाजारात गुतवणूक करतांना त्यांनी से.बी. कडे नोंदणी करण्याची व फेरा कायद्यानुसार रिझर्व्ह बँकेची परवानगी घेण्याची अट घालण्यात आली.

**१३) प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीबाबत १९९७ ची मार्गदर्शक तत्वे :**

भारतातील पायाभूत उद्योग, निर्यात उद्योग, रोजगार संभाव्यता ग्रामीण उद्योग, शेती पूरक व शेती साहाय्यक उद्योग, हॉस्पिटल व औषध निर्माण उद्योग. या सारख्या क्षेत्रात विदेशी गुंतवणूक आकर्षित व्हावी म्हणून भारत सरकारने १९९७ मध्ये प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीबाबत काही मार्गदर्शक तत्वे जाहीर केली व त्यानुसार -

१) बँकिंग क्षेत्रात - प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकदार एकूण समभागाच्या २०% व अनिवासी भारतीय ४०% गुंतवणूक करू शकतील.

२) बिगर बँकिंग कंपन्यात एकूण समभागाच्या ५१%.

३) वीज, रस्ते, बंदरे व पर्यटन क्षेत्रात १००%.

४) दळण-वळण क्षेत्रात ४९%.

५) विमान वाहतूक ४०%.

६) लघु उद्योग २४%

७) औषध निर्माण उद्योग ५१%

८) पेट्रोलियम उद्योग १००%

९) खनिज उद्योगात ५०% इतक्या गुंतवणूकीस मान्यता देण्यात आली.

**१४) बहुविधीय गुंतवणूक हमी एजंट करारावर सही :**

१९९२ मध्ये भारताने बहुविधीय गुंतवणूक हमी एजंट करारावर सही करून विदेशी गुंतवणूकदारांचे संरक्षण करण्यावर भर देण्यात आला.

**१५)** १००% गुंतवणूक करता स्थापन होणाऱ्या विदेसी कंपन्यांना काही नवीन मार्गदर्शक तत्वे करून ती पाळण्याचे बंधन घालण्यात आले.

### ३.२.५ बहुराष्ट्रीय महामंडळे/कंपन्या (Multinational Corporations)

अलीकडील जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरणाच्या धोरणामुळे जगातील अनेक देशात प्रचंड बहुराष्ट्रीय कंपन्या निर्माण होत आहेत. पूर्वीही काही देशांत हडसन्स बे कंपनी, दि रॉयल आफ्रिकन कंपनी, दि इस्ट इंडिया कंपनी अशा काही कंपन्या कार्यरत होत्या व या बहुराष्ट्रीय कंपन्यामुळेच जगात वसाहतवादाचा उदय झाला होता. आज वसाहतवादाचा अस्त झालेला असला तरी आज आपल्या दैनंदिन जीवनात बहुराष्ट्रीय कंपन्यांचे महत्त्व फारच वाढले आहे. त्यामुळे त्यांच्या व्याख्या व फायदे, तोटे अभ्यासणे आवश्यक ठरले आहे.

**अर्थ व व्याख्या :**

विदेशी भांडवलाच्या आगमनाचे सर्वसाधारणपणे सरकारी विदेशी भांडवलाचे मार्ग व खाजगी विदेशी भांडवलाचे मार्ग असे दोन मार्ग आहेत. यापैकी खाजगी विदेशी भांडवलाच्या मार्गापैकी बहुराष्ट्रीय कंपन्या हा एक आज प्रमुख मार्ग आहे. जिचे मुख्य कार्यालय एका देशात असते, आणि इतर अनेक देशात विविध व्यावसायिक कारभार चालू असतो. या बहुराष्ट्रीय महामंडळांना अनेक वेळा ट्रान्सनॅशनल महामंडळे (Transnational Corporations) असे म्हटले जाते. यांचा कारभार शाखांच्या माध्यमांतून चालतो. ही

महामंडळे अनेक प्रकारच्या वस्तू व सेवांचे उत्पादन करून नफा मिळवित असतात. २००१ च्या जागतिक अहवालानुसार जगात ६३००० बहुराष्ट्रीय कंपन्या असून त्यांच्या विदेशातील संलग्न शाखा ८,२२,००० इतक्या आहेत. आज भारतामध्येही हिंदुस्थान लिव्हर, बाटा, कोलगेट, पॉमीलिव्ह, पेप्सी, कोका-कोला यासारख्या मोठ्या कंपन्याबरोबरच कपडे व आंघोळीचा साबण, टूथ पेस्ट, ब्लेडस्, सौंदर्य प्रशाधने, बिस्कीटे, चहा, कॉफी, शीत पेये, आईस्क्रीम, खाद्यतेल, तूप, विद्यूत उपकरणे, पादत्राणे, मिठ, शांपू अशा विविध जीवनावश्यक वस्तू उत्पादनात अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या कार्यरत आहेत.

बहुराष्ट्रीय कंपनी म्हणजे आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रचंड उद्योग किंवा व्यवसाय होय. पुढील काही महत्त्वाच्या व्याख्यावरून या महामंडळांचा अर्थ स्पष्ट होतो.

**१) संयुक्त राष्ट्रसंघ :** ''जो उद्योग आपल्या देशाव्यतिरिक्त इतर अनेक देशात उत्पादन व सेवा वितरित करीत असतो त्यास बहुराष्ट्रीय कंपनी असे म्हणतात.''

**२) प्रा. कोजिया :** ''बहुराष्ट्रीय कंपनी म्हणजे एक मोठा अल्पजनाधिकार (Oligopoly) स्वरूपाचा उद्योग समुह होय. या उद्योगसमुहाचे जाळे सर्व जगभर पसरलेले असते. अनेक राष्ट्रामध्ये कारखाने सुरू करून तेथेच उत्पादन व विक्री करून नफा मिळविला जातो. परंतु आर्थिक सत्ता मात्र ज्या देशात मुख्य कार्यालय असते तेथे केंद्रीत झालेली असते.

**३) आंतरराष्ट्रीय मजूर संघटना :** ''बहुराष्ट्रीय महामंडळाचे महत्त्वाचे लक्षण म्हणजे त्यांचे मुख्य व्यवस्थापकीय कार्यालय एका देशात असते आणि नंतर अनेक देशांत त्यांच्या व्यवसायाचा कारभार चालविला जात असतो.''

थोडक्यात असे म्हणता येईल की बहुराष्ट्रीय कंपनी म्हणजे जिचे मुख्य कार्यालय एका राष्ट्रात असते, पण उत्पादन, वितरण व निर्यात व्यापार अनेक देशात केला जातो. अनेक देशांत त्यांच्या शाखा काम करीत असतात. वरील सर्व व्याख्यावरून या महामंडळाची काही प्रमुख लक्षणे पुढील प्रमाणे सांगता येतात.

१) बहुराष्ट्रीय कंपनी म्हणजे एक आंतरराष्ट्रीय पातळीवरील मोठा उद्योग किंवा व्यवसाय होय.

२) या कंपनीचा जागतिक प्रभाव असून आकारमान प्रचंड असते.

३) बहुराष्ट्रीय कंपनीची कार्यपध्दती व स्वरूप अल्पजनाधिकारासारखे असते.

४) मोठा आकार व उत्पादनात विविधता यामुळे यांचे आर्थिक प्राबल्य किंवा महासत्ता असते.

५) वस्तू व सेवांचे उत्पादन, वितरण करण्याबरोबरच आयात-निर्यात व्यापार ही करतात.

६) भांडवलाबरोबर तंत्रज्ञान, विशेष सेवा व अन्य साधनसामग्रीचे हस्तांतरण ही करतात.

### ३.२.६ बहुराष्ट्रीय महामंडळाचे फायदे/गुण (Merits of Multinational Corporations)

अल्पविकसित व विकसनशील देशात ही महामंडळे अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडत असल्याने त्यांची आज गरज आहे. चीन व भारत व यासारख्या विकसनशील देशांचा सध्याचा जलद विकासात यांचा वाटा मोठा आहे. शिवाय पुढील प्रमाणे यांचे फायदे मिळत असल्याने आज त्यांचे समर्थन केले जाते.

**१) तंत्रज्ञान विकास :**

बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या आगमनाबरोबरच विदेशी तंत्रज्ञान कोणताही खर्च न करता विकसनशील देशांत स्थालांत्तर होत असते. ज्यामुळे आपल्या देशातील उपलब्ध साधन संपत्तीचा पर्याप्त वापर करण्याचे प्रशिक्षण मिळते व देशांचा जलद विकास होण्यास मदत होते.

**२) आधुनिक कौशल्यात वाढ :**

विकसनशील देशांत मुळातच कमतरता असणाऱ्या उपक्रमशीलता, संघटनात्मक क्षमता, संयोजकता व्यवस्थापकीय कौशल्ये यासारखे आधुनिक कौशल्य यांचा लाभ बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या आगमनाने विकसनशील देशांना होतो. या आधुनिक कौशल्याच्या वाढीमुळे जलद विकासास मदत होते.

**३) दर्जेदार उत्पादन :**

बहुराष्ट्रीय कंपन्याकडे आधुनिक तंत्रज्ञान व व्यवस्थापकीय कौशल्य उपलब्ध असते. आधुनिक उत्पादन पध्दती असते व उच्च वेतनमानावर प्रशिक्षित कामगार नेमलेले असतात. त्यामुळे दर्जेदार उत्पादन होते. त्याचे अनुकरण भारतीय उद्योग करतात. त्यामुळे उत्पादनाचा दर्जा सुधारतो किंवा स्पर्धेत टिकून राहण्यासाठी दर्जा सुधारावा लागतो.

**४) बाजारपेठांचा विस्तार :**

बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या शाखा अनेक देशात असतात त्यांचा आयात-निर्यात व्यापार मोठा व अनेक देशांसी असतो. विदेशी बाजाराचा अनुभव असतो यामुळे बाजार पेठांचा विस्तार होतो. परिणामत: विकसनशील देशांच्या वस्तू व सेवांना विदेशी बाजारपेठांचा लाभ होतो व परकिय चलनाची प्राप्ती होते.

**५) गुंतवणूकीत वाढ :**

विकसनशील देशात बचतीचा दर अत्यंत कमी असतो. त्यामुळे भांडवल गुंतवणूक ही कमी असल्याने विकासाचा वेग मंद असतो. परंतु बहुराष्ट्रीय कंपन्या आर्थिक दृष्ट्या सबळ असतात. त्यामुळे त्या विकसनशील देशात मोठ्या प्रमाणात प्रत्यक्ष गुंतवणूक करू शकतात. विशेषत: मूलभूत सुविधातील गुंतवणूकीमुळे विकसनशील देशांचा आर्थिक विकासाचा वेग वाढतो. थोडक्यात त्या स्वस्त व मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करू शकतात.

**६) औद्योगिक मदत :**

अल्पविकसीत व विकसनशील देशात विद्यूतनिर्मिती, वाहतूक व दळण-वळण साधने, बंदरे, सिंचन सोई इत्यादी पायाभूत सुविधांचा विकास करून औद्योगिकरणाचा पाया घालण्यासाठी प्रचंड भांडवल गुंतवणूकीची गरज असते. विकसनशील देश भांडवलाच्या अभावामुळे अशा दीर्घकालीन प्रकल्पात गुंतवणूक पुरेशी करू शकत नाहीत. परंतु, बहुराष्ट्रीय कंपन्या अशा सुविधांच्या विकासासाठी भांडवल गुंतवू शकतात. त्यामुळे त्या देशांचे औद्योगिकरण होऊन विकासाचा वेग वाढतो.

**७) मानवी व नैसर्गिक संसाधनांचा विकास :**

विकसनशील व अविकसित देशातील मानवी व नैसर्गिक संसाधनांचा विकास व पर्याप्त वापर करण्यासाठी या कंपन्या मोठ्या प्रमाणात उत्पादनाचे कार्य आणि भांडवली गुंतवणूक करतात. त्यामुळे या देशातील वाढत्या लोकसंख्येला रोजगार पुरवितात, त्यांची उत्पनाची पातळी उंचावते, दारिद्रय व बेकारीचे प्रमाण कमी होऊन राहणीमान उंचावण्यास मदत होते.

**८) सामाजिक व मानसिक परिवर्तन :**

बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या आगमनाने विकसित राष्ट्रांतील औद्योगिक संस्कृती येते. तसेच व्यापारातील अनुभव, आधुनिक तंत्रज्ञान व मूल्ये यांचा वापर करतात. तेथील लोकांचे आधुनिक विचार, उपभोगाच्या

सवयी येतात. त्यामुळे आर्थिक विकासासाठी आवश्यक असणारे सामाजिक व मानसिक परिवर्तन घडते. वैचारिक क्रांती होते. अर्थव्यवस्थेचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर एकत्रीकरण घडून येते.

**९) आंतरराष्ट्रीय एकात्मता :**

बहुराष्ट्रीय कंपन्या जकात शुल्क कमी करणे, आयातीवरील निर्बंध कमी करणे, गुंतवणूकीस चालना देणे, सेवा क्षेत्र मुक्त करणे, चलन परिवर्तनशील करणे यामार्गाने आंतरराष्ट्रीय एकात्मता निर्माण करतात.

**१०) संशोधन व विकासाचा लाभ :**

संशोधन व विकास यात बहुराष्ट्रीय कंपन्यांची भूमिका महत्त्वाची असते. विकसनशील देश भांडवलाच्या अभावामुळे संशोधन कार्य हाती घेऊ शकत नाहीत. पण बहुराष्ट्रीय कंपन्या मोठ्या प्रमाणात भांडवली गुंतवणूक संशोधन कार्यासाठी करून नव्या तंत्राचा, साधनांचा शोध लावतात व संशोधनाचा लाभ विकसनशील देशांना होऊन त्यांचा विकास होतो.

**११) रोजगार वाढीला प्रेरणा :**

बहुराष्ट्रीय कंपन्या उत्पादन प्रक्रिया विस्तृत करतात. विविध प्रकारचे सुटे भाग आयात करून किंवा देशात तयार करून ते जुळविण्याचे कार्य विविद उद्योगांमध्ये चालते. त्यामुळे रोजगार निर्मितीस चालना मिळते.

**१२) मक्तेदारीचे नियंत्रण व मुक्त धोरण :**

विकसनशील देशांतील नियंत्रणे दूर करून मुक्त धारण स्वीकारण्यास संबंधित देशांना भाग पाडतात. विकसनशील देशात काही उद्योगात ठराविक उद्योगपतींची अधिसत्ता किंवा मक्तेदारी असते. परंतु बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या आगमनाने देशांतर्गत बाजारपेठेत देशांतर्गत मक्तेदारांना स्पर्धा निर्माण होते. त्यामुळे त्यांची मक्तेदारी संपुष्टात येते व याचा लाभ इतर उद्योगांना होतो.

थोडक्यात बहुराष्ट्रीय कंपन्या ह्या मुक्त व्यापार प्रवाह, तांत्रिक ज्ञानावर भर व गुंतवणूकीतील अडथळे दूर करणे यासारखी धोरणे राबवितात. त्यामुळे देशांत अनेक नवे करार होऊन विदेशी व्यापार वाढतो व विकासास गती मिळते.

**३.२.७ बहुराष्ट्रीय महामंडळाचे दोष/तोटे :**

देशात जेव्हा बहुराष्ट्रीय कंपन्यांचे आगमन होते त्या देशाच्या अर्थव्यवस्थेवर होणारे प्रतिकूल परिणाम अनेक असतात म्हणजेच या कंपन्यांचे अवगुण/दोष किंवा तोटे पुढील प्रमाणे सांगता येतील.

**१) ठराविक उत्पादन क्षेत्रामध्येच गुंतवणूक :**

बहुराष्ट्रीय कंपन्या या खाजगी कंपन्या असल्याने सामाजिक कल्याणापेक्षा नफा मिळविणे हाच प्रमुख उद्देश असतो. यामुळे देशात कोणत्या उत्पादन क्षेत्रात गुंतवणूक करणे गरजेचे आहे यापेक्षा अधिक नफा मिळवून देणाऱ्या टी.व्ही. रेफ्रिजरेटरस, वॉशिंग मशिन, टूथपेस्ट, सौंदर्य प्रसाधने यासारख्या उपभोग्य व चैनीच्या उत्पादनातच अधिक गुंतवणूक केली जाते. त्या तुलनेने पायाभूत उद्योगांत गुंतरणूक केली जात नाही.

## २) परावलंबित्वात वाढ :

बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या बरोबर जरी आधुनिक तंत्रज्ञान व व्यवस्थापकीय कौशल्य येत असले तरी ते विकसनशील देशातील स्थानिक तंत्रज्ञानाशी व वातावरणाशी जुळणारे नसते. शिवाय देशी तंत्रज्ञानाशी घातक स्पर्धा वाढून देशी तंत्रज्ञानाचा ऱ्हासच होतो. विदेशी लोकांच्या उपभोगाच्या स्पर्धा आपल्या देशातील लोकांना लागतात. त्यामुळे आयातीत वाढ होते व विदेशी व्यापार तुटीचा बनतो व यातूनच आर्थिक परावलंबन वाढत जाते.

## ३) देशाच्या संपत्तीची लूट :

बहुराष्ट्रीय कंपन्यामुळे विकसनशील देशाची दुहेरी लूट होण्याची शक्यता असते. आपल्या देशातील साधन संपत्ती व कच्चामाल अल्प किंमतीस खरेदी करून त्यावर प्रक्रिया करून उत्पादित माल आपल्याच देशात अधिक किंमतीला विकून नफा मिळविला जातो. हा नफा, लाभांश, व्याज, मानधन, सल्ला विषयक फी इत्यादी संदर्भातील जी देणी द्यावी लागतात त्यातून पैसा बाहेर जातो. थोडक्यात बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या माध्यमाने देशातील पैसा वरील प्रमाणे विविध मार्गाने विदेशात वर्षानुवर्षे जाऊन देशाच्या संपत्तीची लूट होत राहते.

## ४) राजकिय हस्तक्षेप व पारतंत्र्याचा धोका:

बहुराष्ट्रीय कंपन्यांची आर्थिक सत्ता व तांत्रिक सामर्थ्य फार मोठे असते. त्यामुळे निर्णय प्रक्रिया, व्यापार व आर्थिक व्यवहारातून प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या राजकिय हस्तक्षेप वाढून पारतंत्र्याचा धोका निर्माण होतो. उदा. ब्रिटनच्या इस्ट इंडिया कंपनीच्या माध्यमातूनच भारत पारतंत्र्यात लोटला होता. बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या आर्थिक पाठबळामुळेच देशाची स्वायतत्ता व सार्वभौमत्व संकटात येते. यामुळेच भारतात बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या कार्यावर वेळोवेळी बंधने घातलेली आहेत.

## ५) देशांतर्गत बाजारावर नियंत्रण :

बहुराष्ट्रीय कंपन्यांकडे भांडवल मोठ्या प्रमाणात उपलब्ध असते, त्यामुळे वित्तिय बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करून संबंधित देशातील उद्योग व कंपन्या ताब्यात घेण्याचा प्रयत्न करतात. आपले कार्यक्षेत्र विस्तारतात. थोडक्यात त्या देशातील उत्पादन व बाजारावर आपले वर्चस्व निर्माण करून देशांतर्गत बाजारावर नियंत्रण आणतात. त्याचे दुष्परिणाम त्या देशातील नागरिकांना भोगावे लागतात.

## ६) आधुनिक तंत्रज्ञान देण्यास नकार :

विकसनशील देशातील आधुनिक तंत्रज्ञान व स्वयंव्यवस्थापकीय कौशल्याचा अभाव दूर करणे हा बहुराष्ट्रीय कंपन्यांचे आगमन होऊ देण्याचा मुख्य उद्देश असतो. परंतु बऱ्याच वेळा या कंपन्या आधुनिक तंत्रज्ञान देण्यात नकार देतात. उदा. कोका-कोला कंपनीस सन १९७७ मध्ये भारतातून गाशा गुंडाळण्यास सांगण्यात आले होते, कारण ही कंपनी शीतपेय बनविण्याचे गुप्त सूत्र उघड करण्यास व त्यातील तंत्रज्ञानाची माहिती देण्यास तयार नव्हती. तसेच या कंपनीने भारतात जो नफा मिळविला होता तो येथे गुंतवण्यास तयार नव्हती.

## ७) वेतनात तफावत व सामाजिक आर्थिक विषमता :

बहुराष्ट्रीय कंपन्या ह्या आर्थिक दृष्ट्या सफल असल्याने आपल्या कर्मचाऱ्यांना व अधिकाऱ्यांना अधिक वेतन व भत्ते देतात. त्या तुलनेने भारतासारखे विकसनशील देश स्वत:च्या उद्योगातील कामगारांना

कमी वेतन व भत्ते देतात. त्यामुळे वेतनदरात तफावत निर्माण होऊन सामाजिक असंतोष व आर्थिक विषमता निर्माण होते. त्याचे अनेक अनिष्ठ परिणाम त्या देशाला भोगावे लागतात.

**८) अनिष्ठ आग्रह व जाचक अटी :**

उद्योगातील १००% भागधारक हे विदेशीच असावेत. संबंधित देशातील सरकार वा व्यक्ती भागधारक असू नयेत असे अनिष्ठ आग्रह धरले जातात. तसेच बहुराष्ट्रीय कंपनी ज्या देशाची आहे तेथूनच भांडवली वस्तूंची आयात करावी तसेच विकसनशील देशांत बहुराष्ट्रीय कंपनीने उत्पादित केलेल्या मालापैकी काही माल अल्प किंमतीस त्यांच्या मातृभूमीला पाठविला पाहिजे. यासारख्या जाचक अटी लादून त्या देशांचे शोषण केले जाते.

**९) आर्थिक रचनेत बिघाड व नवसाम्राज्यवादाचा उदय :**

संबंधित देशाची नवनिर्माण क्षमता दाबून टाकणे, देशहित विरोधी धोरणांचा अवलंब करणे. अल्पजनाधिकार व्यवहार वाढविणे, देशास गरज नसलेल्या वस्तूंचे उत्पादन करणे व तंत्रज्ञान पुरविणे, लोकांना चैनीच्या उपभोगाच्या सवयी लावणे या मार्गांनी अर्थिक रचनेत बिघाड निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या माध्यमातून होणारी विदेशी गुंतवणूक ही नवसाम्राज्यवाद निर्माण करणारी असते असे काही तज्ज्ञांचे मत आहे.

**१०) स्थानिक कर्तृत्वाकडे दुर्लक्ष :**

स्थानिक लोकांकडे असलेले उच्च तंत्रज्ञान व कौशल्ये वाढणार नाहीत याची दक्षता घेणे, स्थानिक कर्तृत्वान लोकांना उच्च ज्ञान व प्रशिक्षण देण्याचे नाकारणे व्यावसायिक शिक्षण न देणे या मार्गांनी स्थानिक कर्तृत्वाकडे दुर्लक्ष करून विकसनशील देशातील लोकांना जाणीवपूर्वक सुधारू दिले जात नाही.

**११) जुन्या यंत्रसामग्रीची व तंत्रज्ञानाची आयात :**

बऱ्याच वेळेला बहुराष्ट्रीय कंपन्या आपल्या देशात कालबाह्य व जुनी यंत्रसामग्री व साधने, निरूपयोगी व स्थानिक परिस्थितीशी न जुळणारे तंत्रज्ञान आणतात यामुळे सदोष गुंतवणूक होण्याचा धोका असतो. भांडवल प्रधान उत्पादन तंत्राचा स्वीकार करणे, त्यामुळे रोजगार संधी न वाढणे यासारखे दोष निर्माण होऊन लोकांच्या मनात या तंत्रज्ञानाबद्दल असंतोष निर्माण होतो.

**१२) इतर दोष :**

वरील प्रमुख दोषाबरोबरच या बहुराष्ट्रीय कंपन्यांचे अनेक दोष असतात. उदा.

१. देशात अस्तित्वात असलेल्या उद्योगांचे खच्चीकरण करणे.

२. सार्वजनिक क्षेत्रातील मक्तेदारी ऐवजी खाजगी मक्तेदारी निर्माण करणे.

३. पारदर्शक नसलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करणे.

४. संबंधित उद्योगातील कामगारांचे शोषण करणे, त्यांना कामावरून कमी करणे.

५. परदेशात कालबाह्य ठरलेली औषधे, वाहने, वस्तू विकसनशील देशात विकणे.

६. यजमान देशातील लोकांना उच्च तंत्रज्ञान व व्यावसायिक गुपिते न देणे.

७. जाहिरातीवर मोठ्या प्रमाणावर खर्च करून लोकांना अनावश्यक व चैनीच्या वस्तूंच्या उपभोगाची सवय लावणे. वस्तूंच्या किंमती वाढवून उपभोक्त्यांवर अनावश्यक बोजा टाकणे इत्यादि अनेक दोषही या महामंडळात आढळून येतात.

## ३.३ सारांश :

१. कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासाच्या प्राथमिक अवस्थेत परकिय भांडवलास महत्त्व असते. जागतिकीकरणाच्या धोरणामुळे आज परकिय भांडवलाचा प्रवाह विकसीत देशाकडून विकसनशील देशाकडे वाहू लागलेला आहे.

२. आंतरराष्ट्रीय पर्यावरणाचा संबंध त्या सर्व आर्थिक व्यवहारांशी आहे - की जे व्यवहार देशाच्या सीमेबाहेर होतात. आंतरराष्ट्रीय व्यापार, विदेशी भांडवल, विदेशी कर्जे बहुराष्ट्रीय कंपन्या यांचा अभ्यास करणारी शाखा म्हणजे आंतरराष्ट्रीय पर्यावरण होय.

३. साधारणत: आपल्या देशात गुंतवणुकीच्या उद्देशाने देशाच्या भौगोलिक सीमे बाहेरील देशातून येणारे भांडवल म्हणजे विदेशी भांडवल होय.

४. खाजगी विदेशी गुंतवणूक, सार्वजनिक विदेशी गुंतवणूक व कर्जे, आंतरराष्ट्रीय संस्थाकडून कर्जे, बर्हिगत व्यापारी कर्जे, विदेशी मदत, देणग्या व अनुदाने असे अनेक विदेशी भांडवलाचे प्रकार आहेत.

५. देशाचा जलद आर्थिक विकास साधणे, देशांतर्गत साधन सामग्रीत वाढ करणे, तंत्रज्ञानातील फरक भरून काढणे, व्यवहारशेषाची समस्या सोडविणे, पायाभूत सुविधांचा विकास, भाववाढीचे नियंत्रण, प्रारंभिक धोका स्वीकारणे, विकासाची गती वाढविणे, रोजगार संधीत वाढ करणे, नैसर्गिक साधन संपत्तीचा पर्याप्त वापर, मूलभूत व अवजड उद्योगांचा विकास. बेकारी व दारिद्र्याचे निमूर्लन इत्यांदि उद्देशांनी परकीय भांडवलाची गरज असते.

६. राजकिय विरोध, राष्ट्रीयकरणाची भिती, दहशतवाद व यादवी युध्दे, सरकारच्या जाचक अटी, अल्प नफा, भविष्याकालीन अनिश्चितता व सामाजिक प्रतिकूल परिस्थिती यामुळे परकीय भांडवलाच्या आगमनात अडथळे निर्माण होतात.

७. देशांतर्गत बचत व भांडवल उभारणीचा दर कमी असल्याने विदेशी भांडवल देशात येऊ देण्याची गरज आहे. परंतु विदेशी भांडवलातून राजकिय हस्तक्षेप वाढण्याचा व पारतंत्र्याचा धोका असतो म्हणून त्यावर नियंत्रण असते. अशा दोन परस्पर विरोधी सत्तावर विदेशी भांडवलसंबंधी भारत सरकारचे धोरण बनलेले आहे.

८. १९४८ ते १९९० या काळात विदेशी भांडवल संबंधी भारताचे धोरण नियंत्रित होते. तर १९९१ नंतर ते खुले व उदार बनल्याचे दिसून येते. १९७७ च्या जनता सरकारचे विदेशी भांडवलाबाबत नकारात्मक धोरण होते.

९. अग्रक्रम उद्योगात प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीस ताबडतोब मान्यता, अनिवासी भारतीयांना गुंतवणूकीस अधिक प्राधान्य, भांडवल बाजारात गुंतवणूक, विदेशी गुंतवणूकदारांना अल्पगुंतवणूकीस पवानगी, फेराचे उदारीकरण, विदेशी कंपन्यांना त्याचे व्यापारी चिन्ह वापरण्यास परवानगी अशा प्रमुख तरतूदी १९९१ च्या नव्या धोरणात करण्यात आल्या होत्या.

१०. आज विकसनशील देशांच्या दैनंदिन जीवनात बहुराष्ट्रीय कंपन्यांचे महत्त्व वाढलेले आहे. खाजगी विदेशी भांडवलाचा एक प्रमुख मार्ग म्हणजे बहुराष्ट्रीय कंपनी होय. यास बहुराष्ट्रीय महामंडळे किंवा ट्रान्सनॅशनल महामंडळे असेही म्हणतात. बहुराष्ट्रीय महामंडळे म्हणजे जिचे मुख्य कार्यालय एका राष्ट्रात असते आणि इतर अनेक देशांत त्यांच्या व्यवसायाचा कारभार चालविला जात असतो.

११. जागतिक पातळीवरील मोठा उद्योग, प्रचंड आकारमान, जागतिक आर्थिक प्रभाव, अल्पजनाधिकारी स्वरूप, आर्थिक महासत्ता, निर्यात व्यापार ही बहुराष्ट्रीय महामंडळाची प्रमुख लक्षणे होत.

१२. तंत्रज्ञान विकास, आधुनिक कौशल्यात वाढ, दर्जेदार उत्पादन, या बाजारपेठांचा विस्तार जलद औद्योगिकरण, संसाधनांचा विकास सामाजिक परिवर्तन, संशोधन, रोजगार वाढीस प्रेरणा, मुक्त धोरण हे बहुराष्ट्रीय कंपनीचे प्रमुख गुण आहेत.

१३. परावलंबित्व, देशांची संपत्तीची लूट, पारतंत्राचा धोका, आधुनिक तंत्रज्ञानास नकार, वेतनात तफावत, जाचक अटी, अनिष्ठ आग्रह, नवसाम्राज्यवाद किंवा आर्थिक साम्राज्यवाद यासारखे बहुराष्ट्रीय कंपन्यांचे दोष आढळतात.

## ३.४ पारिभाषिक शब्द :

- **W.T.O.** : World Trade Organization जागतिक व्यापार संघटन
- **आंतरराष्ट्रीय पर्यावरण** : देशाच्या सीमेबाहेर होणारे आर्थिक व्यवहारासंबंधी व इतर घटक
- **विदेशी भांडवल** : देशाच्या भौगोलिक सीमेबाहेरून येणारे भांडवल.
- **फेरा** (FERA) : Foreign Exchange Regulation Act विदेशी विनिमय नियंत्रण कायदा.
- **फेमा** (FEMA) : Foreign Exchange Management Act विदेशी विनिमय व्यवस्थापन कायगा
- **ट्रेड मार्क** (Trade Mark) : व्यापारी चिन्ह
- **ग्लोबल डिपॉझिटरी रिसीट :** (G.D.R.) Global Depository Receipty जागतिक ठेव (गुंतवणूक) पावत्या.
- **ट्रान्सनॅशनल महामंडळे** (Transnational Corporations): बहुराष्ट्रीय महामंडळे/ कंपन्या मुख्य कार्यालय एका देशात आणि व्यावसायिक कारभार जगभर असणारी कंपनी किंवा महामंडळ.
- **अल्पजनाधिकार** (Oligopoly) : ज्या बाजारात विक्रेत्यांची संख्या कमी (५, ७, १०, १५) असते. त्यास अल्पाधिकार किंवा अल्पजनाधिकार असे म्हणतात.
- **नवसाम्राज्यवाद** : वसाहतवाद नव्हे तर आर्थिक साम्राज्यवाद.

## ३.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :

### अ) खालील विधाने चूक की बरोबर ते लिहा.

१. विदेशी सरकारकडून घेतलेली कर्जे म्हणजे विदेशी भांडवल होय.

२. व्यवहार शेषाची समस्या सोडविण्यासाठी विदेशी भांडवल मदतनीस ठरत नाही.

३. राष्ट्रीयीकरणाच्या भितीमुळे परकिय भांडवलाच्या आयातीत अडथळे निर्माण होतात.

४. १९९१ पूर्वी भारताचे विदेशी भांडवलासंबंधी धोरण खुले होते.

५. ट्रान्सनॅशनल महामंडळे म्हणजेच बहुराष्ट्रीय कंपनी होय.

६. १९९१ च्या धोरणात विदेशी गुंतवणूकदाराला अपगुंतवणूकीस पवानगी दिलेली आहे.

७. भारतातील विदेशी मालकीच्या औद्योगिक कंपन्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी 'फेमा' हा कायदा होता.

८. हिंदूस्थान लिव्हर ही एक बहुराष्ट्रीय कंपनी आहे.

९. बहुराष्ट्रीय कंपनी म्हणजे एक मोठा अल्पजनाधिकार होय.

१०. बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या माध्यमातून होणारी गुंतवणूक म्हणजे वसाहतवाद होय.

**उत्तरे :** १) बरोबर २) चूक ३) बरोबर ४) चूक

५) बरोबर ६) बरोबर ७) चूक ८) बरोबर

९) बरोबर १०) चूक

**ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

१. प्रा. रँग्नर नर्क्सच्या मते विसकनशील देशातील दारिद्र्याचे दुष्टचक्र भेदण्याचा ........... हा एक प्रमुख मार्ग होय.

२. १९५०-५१ मध्ये भारतातील बचतीचा दर केवळ.......% इतकाच होता.

३. भारताचे विदेशी व्यवसायासंबंधी धोरण हे दोन ........ मतातून तयार झालेले आहे.

४. १९४८ च्या औद्योगिक धोरणानुसार विदेशी भांडवलबाबतचे धोरण थोडेसे ........ असेच होते.

५. जनता सरकारने ........ या बहुराष्ट्रीय कंपनीला तिचा भारतातील कारभाराचा गाशा गुंडळण्यास सांगितले.

६. १९९१ च्या नव्या धोरणानुसार वीज निर्मिती क्षेत्रात .......% इतकी विदेशी गुंतवणुकीस परवानगी दिलेली आहे.

७. हिंदुस्थान लिव्हर कंपनीचा ट्रेड मार्क ............ चा आहे.

८. ............. या बहुराष्ट्रीय कंपनीमुळे वसाहतवादाचा उदय झाला.

९. बहुराष्ट्रीय कंपन्यांचा कारभार ................ नसतो.

१०. बहुराष्ट्रीय कंपनी म्हणजे एक ............. उद्योग होय.

**उत्तरे :** १) विदेशी भांडवल २) ६% ३) परस्पर विरोधी ४) अस्पष्ट व शासंक

५) कोका-कोला ६) १००% ७) हिरव्या पानाचा ८) दि ईस्ट इंडिया कंपनी

९) पारदर्शक १०) आंतरराष्ट्रीय

## ३.६ सरावासाठी प्रश्न :

**अ) दीर्घोतरी प्रश्न**

१. विदेशी भांडवल म्हणजे काय ? विकसनशील देशांना विदेशी भांडवली गरज का भासतो ?

२. विदेशी भांडवलासंबंधी भारत सरकारच्या धोरणाचा आढावा घ्या.

३. विदेशी भांडवलबाबतचे भारत सरकारचे धोरण स्पष्ट करा.

४. १९९१ च्या भारताच्या विदेशी भांडवलाच्या धोरणातील प्रमुख तरतूदींचे वर्णन करा.

५. विदेशी गुंतवणुकीसंबंधी सन १९९१ च्या धोरणाचा आढावा घ्या.

६. बहुराष्ट्रीय कंपनी म्हणजे काय ? बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या गुणांची चर्चा करा.

७. बहुराष्ट्रीय कंपन्यांचे गुणदोष स्पष्ट करा.

**ब) टीपा लिहा.**

१. विदेशी भांडवल

२. विदेशी भांडवलाची गरज.

३. आंतरराष्ट्रीय पर्यावरण.

४. १९९० पूर्वीचे विदेशी भांडवलाबाबत भारताचे धोरण.

५. विदेशी भांडवलाबाबत भारताचे १९९१ चे धोरण.

६. बहुराष्ट्रीय कंपन्या.

७. बहुराष्ट्रीय कंपन्यांचे फायदे/गुण.

८. बहुराष्ट्रीय कंपन्यांचे दोष/अवगुण.

## ३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ :


१. भोसले के.एम. काटे के.बी. (सप्टेंबर २०००). 'जागतिक अर्थव्यवस्था', फडके प्रकाशन, कोल्हापूर.

२. कामंदे पाटील गंगाधर वि. (१५ ऑगष्ठ २००७). 'आंतर राष्ट्रीय व्यापार सिध्दांत व धोरण' चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक-१३.

३. भोसले के. एम. काटे के.बी. (सप्टेंबर २००५). 'व्यावसायिक पर्यावरण', फडके प्रकाशन, कोल्हापूर.

४. चौगुले डी.जी. (जुलै २००५) 'व्यावसायिक पर्यावरण' अजब पब्लिकेशन्स, कोल्हापूर.

५. झामरे जी.एन. (जून २००५). 'भारतीय अर्थव्यवस्था विकास व पर्यावरणात्मक अर्थशास्त्र' पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.

६. Patil, J.F. Deshmukh P.K., Kakade, V.B., Waungade R.A. (July 2005). 'Business Environment', Phadake Prakashan, Kolhapur.

७. Cherunilam Francis (2001). 'Business Environment', Himalaya Publishing House, Mumbai.

८. Adhikary - 'Economic Environment of Business', Sultan Chand and Sons.


❑❑❑

## सत्र ६ : घटक ४

# आंतरराष्ट्रीय संस्था

## आंतरराष्ट्रीय नाणेनिधी

**(International Monetary Fund (I.M.F.))**

**अनुक्रमणिका :**


४.० उद्दिष्टे

४.१.१ प्रास्ताविक

४.१.२ विषय विवेचन

४.१.३ भांडवल

४.१.४ व्यवस्थापन

४.१.५ नाणेनिधीची उद्दिष्टे

४.१.६ नाणेनिधीचे कार्य

४.१.७ आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या कार्याचे मूल्यमापन यश

४.१.८ अपयश

४.१.९ पारिभाषिक शब्द

४.१.१० सारांश

४.१.११ स्वंय अध्ययन प्रश्न व उत्तरे

४.१.१२ सरावासाठी स्वाध्याय


### ४.० उद्दिष्टे :

- दुसऱ्या महायुध्दाच्या काळातील आंतरराष्ट्रीय व्यापारामधील तूट निर्माण होण्याची स्थिती स्पष्ट करता येते.
- महायुध्दाच्या काळात पैशाचा पुरवठा पुरेसा उपलब्ध झाला नाही. त्यामुळे असमान व्यापार विकास झाला होता ते सांगता येते.
- आंतरराष्ट्रीय व्यापारातील समस्या सोडविण्यासाठी वित्त संस्था स्थापन करण्याची गरज वाटली हे समजते.
- आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ घडवून आणण्यासाठी आर्थिक मदत व सहकार्य प्रेरणा देणारे ठरते ते सांगता येते.
- जागतिक पातळीवर नविन योजना सुरू केल्याने विकासाची धोरणे सफल झाली. तांत्रिक सुधारणा होत गेली. याबाबतची माहिती स्पष्ट होते.

### ४.१.१ प्रास्ताविक :

आर्थिक विकास ही दीर्घकालीन चालणारी प्रक्रिया आहे. तेंव्हा त्यास भांडवलाची गरज भासते. त्यासाठी विकसित राष्ट्रांकडून असे भांडवल विकसनशील राष्ट्रांना पुरविले जाते. मात्र त्यामध्ये अपूर्णता निर्माण होते. म्हणून आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक या वित्त संस्था व्यापक मानवी कल्याणाच्या हेतूने, अप्रगत राष्ट्रांना विकासासाठी आर्थिक मदत देण्याचे कार्य करतात. विविध राष्ट्रातील आंतरराष्ट्रीय चलन विषयक समस्या सोडविण्याच्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे कार्य महत्त्वाचे ठरते.

### ४.१.२ आंतरराष्ट्रीय नाणेनिधी I.M.F. विषय विवेचन

पहिल्या महायुध्दानंतर देशा-देशांत तीव्र स्पर्धा सुरू झाली. निर्यात वाढविणे व आयात कमी करणे असा प्रयत्न होऊ लागला. तेंव्हा कांही चलनाचे अवमूल्यन करण्यात आले.

परत दुसऱ्या महायुध्दात अनेक राष्ट्रांची आर्थिक हानी झाली. त्यातून मार्ग काढण्यासाठी अमेरिकेतील ब्रेटनवुडस येथे जगातील ४४ राष्ट्रांच्या प्रतिनिधिंची बैठक घेण्यात आली. ती १ जुलै १९४४ ते २२ जुलै १९४४ कालावधीत आयोजित करण्यात आली. तेंव्हा चर्चा करण्यात येऊन आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँक या वित्त संस्था स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी या संस्थेची स्थापना २७ डिसेंबर १९४५ रोजी झाली. तेंव्हा ४० देश सदस्य होते. नंतर सदस्य राष्ट्रांची संख्या वाढून सद्या या संस्थेची १८४ राष्ट्रे सभासद आहेत.

### ४.१.३ भांडवल :

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे वर्गणी रूपाने भांडवल जमा केले जाते. राष्ट्रांच्या ठरवून दिलेल्या हिश्यापैकी २५% भाग सोन्यात अगर अमेरिकन डॉलर मध्ये द्यावा व ७५% भाग स्वदेशी चलनामध्ये द्यावा लागतो. सुरूवातीस १९४५ मध्ये जमा भांडवल ८.८ अब्ज डॉलर मध्ये जमा झाले. २००४ मध्ये २१२ अब्ज एस्.डी.आर्. जमा झाले.

### ४.१.४ व्यवस्थापन :

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या व्यवस्थापनासाठी संचालक मंडळ निवडले जाते. सभासद राष्ट्रांच्या भांडवली कोटा प्रमाणात, सभासद राष्ट्रातून त्यांची निवड केली जाते. त्यांची मुदत ५ वर्षाची असते. व्यवस्थापक मंडळ, मार्गदर्शन व आर्थिक सहकार्य देण्याबाबतचा निर्णय घेते.

### ४.१.५ नाणेनिधीची उद्दिष्टे :

१. आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढविणे.

२. हुंडणावळ दराचे स्थैर्य राखणे.

३. आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ करणे.

४. मागास राष्ट्राना गुंतवणूकीस प्रोत्साहन देणे.

५. व्यापारवृध्दीसाठी विनिमय नियंत्रण दूर करणे.

६. संतुष्टीत विकासासाठी अर्थ साहय्य.

७. ताळेबंदातील असमतोल कमी करणे.

८. जागतिक शांतता ठेवणे.

९. भांडवली स्थलांत्तरे रोखणे.

१०. सभासद राष्ट्रात विश्वास निर्माण करणे.

**४.१.६ आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे कार्य**

**१) विनिमय दर ठरविणे :** सभासद राष्ट्रांना आपल्या चलनाचे मूल्य सोन्यात किंवा अमेरिकन डॉलरच्या संदर्भात किती राहील हे जाहीर करावे लागते. त्यानुसार चलन मूल्य पाहून विनिमय दर ठरविला जातो. तो स्थिर ठेवण्याचा प्रयत्न केला जातो.

**२) अल्पकालीन आर्थिक मदत :** एखाद्या सभासद राष्ट्रात आर्थिक व्यवहारात असमतोल निर्माण झाल्यास तो दूर करण्यासाठी आर्थिक मदत दिली जाते.

**३) दुर्मिळ चलनाचे वाटप :** नाणेनिधीकडे अनेक देशांचे चलन असते. ज्या वेळी एखाद्या देशाच्या चलनास इतर देशाकडून मोठी मागणी वाढते, तेंव्हा ती पूर्ण करणे शक्य नसते. तेंव्हा नाणेनिधी अशा दुर्मिळ चलनाचे विविध राष्ट्रात वाटप करते.

**४) विनिमय नियंत्रणे दूर करणे :** युध्दकाळात राष्ट्रवाद स्वावलंबन इ. हेतूने अनेक राष्ट्रांनी परकीय व्यापारावर विनिमय नियंत्रणे घातली होती, त्यासाठी नाणेनिधी कडून अशी विनिमय नियंत्रणे दूर करण्यात आली.

**५) तांत्रिक मदत व सल्ला :** सदस्य राष्ट्रांना आर्थिक मदती बरोबरच तांत्रिक मदत दिली जाते. नाणेनिधीकडील तज्ज्ञ सभासद राष्ट्रांना गरजेनुसार सल्ला व सेवा उपलब्ध करून देतात.

**६) चलन सांभाळणे :** विविध राष्ट्रांने दिलेली चलने सांभाळून त्यावर व्याज दिली जाते.

**७) तेल विषयक सुविधा :** जागतिक स्तरावर १९७३ नंतर खनिज तेलाच्या किमती वाढल्या व त्यामुळे तेल आयातीचा खर्च वाढला. त्यामुळे अनेक राष्ट्रांच्या व्यापार तोलात तूट वाढली. त्यासाठी नाणेनिधीने तेल सुविधा निर्माण करून तेल आयात करणाऱ्या देशांना अर्थसाहय्य दिले.

**८) नैसर्गिक आपत्तीत मदत :** दुष्काळ, भूकंप, महापूर या सारख्या नैसर्गिक आपत्तीत तोंड देण्यासाठी तातडीची सुविधा उपलब्ध करून दिली जीते. याचा अनेक सभासद राष्ट्रांनी लाभ घेतला आहे.

**९) भरपाई युक्त वित्तीय सुविधा :** प्राथमिक वस्तुंचे उत्पादन करणाऱ्या राष्ट्रांना त्या वस्तुंच्या निर्यातीमध्ये किमतींच्या अनिश्चिततेला तोंड द्यावे लागते. म्हणून १९६३ पासून नाणेनिधीने प्रतिकूल वित्तीय सुविधा निर्माण करून दिली. त्यामुळे ताळेबंदातील तूट भरून काढण्यास मदत झाली. साधारणपणे राष्ट्राच्या कोट्याच्या २५% एवढे परकीय चलन उपलब्ध केले जाते.

**१०) विस्तारित निधी सुविधा :** नाणेनिधीने १९७४ पासून विस्तारित निधी सुविधा सुरू केली आहे. या योजने अंतर्गत सभासद राष्ट्राला त्यांच्या कोट्याच्या १४०% पर्यंत परकीय चलन खरेदी करता येते.

**११) भाव स्थिरक साठा वित्त व्यवस्था :** सुविधा प्राथमिक वस्तुंच्या किमती स्थिर राहाव्यात म्हणून चलन निधीने भाव स्थिरक साठा, वित्त व्यवस्था सुविधा निर्माण केल्या आहेत. गरजेनुसार सहभागी राष्ट्रांना नाणेनिधीकडून मदत दिली जाते. कोट्याच्या ४५% भाग आर्थिक मदत म्हणून परकीय चलनात दिला जातो.

**१२) जमानजी कर्ज सुविधा :** आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून सदस्य राष्ट्राला त्यांची कसलीही चौकशी न करता एका निश्चित कालावधीसाठी ठराविक रक्कमेपर्यंत कर्ज दिले जाते.

### ४.१.७ आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या कार्याचे मूल्यमापन :

मिळालेले यश

१) **सदस्य राष्ट्रांच्या संख्येत वाढ :** केवळ ४० सदस्य राष्ट्रावर ही वित्त संस्था स्थापन झाली. पण नंतर सदस्य राष्ट्रांची संख्या वाढत जाऊन आता १८४ इतकी झाली आहे.

२) **विनिमय दरात स्थैर्य :** आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या नियंत्रण धोरणामुळे विनिमय दरातील स्थिरता ठेवण्यामध्ये यश मिळाले आहे.

३) **आंतरराष्ट्रीय व्यापाराला चालना :** व्यापारावरील निर्बंध कमी करून बहुमुखी व्यापार अस्तित्त्वात आल्याने व परकीय व्यापारातील अडचणी नाणेनिधी दूर करीत असल्याने आंतरराष्ट्रीय व्यापार वाढला.

४) **योग्य मार्गदर्शन :** आंतरराष्ट्रीय चलनविषयक समस्या सोडविण्यासाठी अनेक राष्ट्रांचे सल्ला मसलत करून त्यांना योग्य मार्गदर्शन देण्याचे कार्य नाणेनिधीने केले आहे. तसेच विविध बाबींचे शिक्षण व प्रशिक्षण दिले जाते.

५) **व्यवहार तोल सुधारण्यास साह्य :** सभासद राष्ट्रांच्या व्यवहार तोलातील असमतोल दूर करून तूट भरून काढण्यासाठी नाणेनिधीने आर्थिक साह्य केले आहे.

६) **आंतरराष्ट्रीय रोखतेत वाढ :** सवलतीच्या दरात कर्ज वाटप केले जाते व विकसनशील राष्ट्रांना अर्थसाह्य देण्याचे कार्य केले जाते, त्यामुळे अनेक राष्ट्रांच्या आंतरराष्ट्रीय रोखतेत वाढ झाली. ७० अब्ज डॉलरची वाढ झाली.

७) **विकसनशील राष्ट्रांना मदत :** विकसनशील राष्ट्रांच्या आर्थिक प्रगतीसाठी नाणेनिधीने अनेक प्रकारची मदत केली आहे.

### ४.१.८ आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे अपयश :

१) **अपुरी मदत :** नाणेनिधीकडून सदस्य राष्ट्रांना अल्प व अपुरी मदत दिली जाते. अप्रगत राष्ट्रांना कमी कोटा असल्याने कमी मदत मिळते.

२) **अपुरे भांडवल :** या संस्थेचा एकूण व्याप विचारात घेता कर्ज व इतर मदत देताना जमा असलेले भांडवल अपुरे पडते.

३) **श्रीमंत राष्ट्रांचे दडपण :** अमेरिकेच्या दबावामुळे डॉलर हे दुर्मिळ चलन आहे असे नाणेनिधी जाहीर करू शकत नव्हती. तेंव्हा श्रीमंत राष्ट्रांचे दडपण जास्त होते.

४) **भाववाढ नियंत्रणात अपयश :** जागतिक पातळीवरील भाववाढीला आळा घालण्यास नाणेनिधीला अपयश आले.

५) **कर्जावरील अटी :** बहुसंख्य वेळा कर्ज देताना त्यावर विविध अटी घातल्या जातात. अमेरिकेचा हस्तक्षेप वाढत आहे. त्यामुळे अप्रगत राष्ट्रांची गळचेपी होते.

६) **खुल्या व्यापारात अपयश :** नाणेनिधीस खुल्या व्यापाराचे धोरण सफलता पूर्वक राबविता आले नाही. अनेक प्रगत राष्ट्रांनी व्यवहारातील तूट, बेरोजगारी इ. कारणामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारावर अनेक निर्बंध व नियंत्रणे घातली आहेत. अनेक जकाती आकारल्या आहेत. त्या दूर करता आल्या नाहीत.

### ४.१.९ पारिभाषिक शब्द :

- **विकसनशील** : पुरेशी आर्थिक, औद्योगिक प्रगती झाली नाही अशी स्थिती.
- **अवमूल्यन** : विशिष्ट देशातील चलनाचे बाह्य मूल्य, इतर देशाच्याबाबतीत चलन मूल्य कमी करणे.
- **ब्रेटनवुडस्** : अमेरिकेतील एका शहराचे नांव.
- **हुंडणावळ दर** : दोन देशातील चलनाचे मूल्य पाहून निश्चित केलेला विनिमय दर.
- **ताळेबंद** : आर्थिक हिशेब-जमा-खर्च
- **दुर्मिळ चलन :** मागणीच्या मानाने ज्यांचा पुरवठा कमी आहे, असे चलन.
- **आपत्ती** : संकट

### ४.१.१० सारांश :

नाणेनिधी विनिमय दर ठरविते व स्थिर ठेवते. आंतरराष्ट्रीय व्यापाराला चालना देते. परकीय चलनाची गरज पूर्ण होते. व्यापारातील चलनीय तूट दूर केली जाते. भाववाढीस आळा घालता येतो. अप्रगत राष्ट्रांच्या समस्या कमी करण्यासाठी मार्गदर्शन सल्ला, साहय्य प्राप्त होते.

### ४.१.११ स्वयं-अध्ययन प्रश्न :

**अ) रिकाम्या जागा भरा.**

१. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची स्थापना ........... मध्ये झाली.

२. विनिमय दर ठरविल्यानंतर ......% बदल करण्याची परवानगी सदस्य राष्ट्रांना असते.

३. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने प्रतिपूरक वित्तिय सुविधा .......... पासून सुरू केली.

४. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून आर्थिक मदतीबरोबर ............ मदत दिली जाते.

५. आंतरराष्ट्रीय पातळीवर १९७३ पासून ......... तेलाच्या किंमती वाढत गेल्या.

६. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची सद्याची सभासद संख्या ....... राष्ट्रे इतकी आहे.

**ब) प्रश्नांची उत्तरे :**

१. २७ डिसेंबर १९४५

२. १०%

३. १९६३

४. तांत्रिक

५. खनिज

६. १८४ राष्ट्रे

**४.१.१२ सरावासाठी स्वाध्याय :**

१) आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची उद्दिष्टे व कामगिरीचा आढावा घ्या ?

२) आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या कार्याचे मूल्यमापन करा ?

३) टीप लिहा : आंतरराष्ट्रीय नाणेनिधी.

## जागतिक बँक (I.B.R.D.)

**अनुक्रमणिका**


४.२.० उद्दिष्टे

४.२.१ प्रास्ताविक

४.२.२ विषय विवेचन/जागतिक बँकेचे उद्देश

४.२.३ जागतिक बँकेची कार्य पध्दती

४.२.४ जागतिक बँकेचे यश

४.२.५ जागतिक बँकेचे अपयश

४.२.६ सारांश

४.२.७ स्वयं अध्ययन प्रश्न व उत्तरे

४.२.८ पारिभाषिक शब्द

४.२.९ सरावासाठी स्वाध्याय


**४.२.० उद्दिष्टे**

- दुसऱ्या महायुध्दात अनेक राष्ट्रांची औद्योगिक हानी झाली. त्यासाठी जागतिक स्तरावर आर्थिक मदत देणे गरजेचे झाले. त्याबाबतचे स्पष्टीकरण करता येते.
- उद्योगांची पुनर्उभारणी करणे, त्यासाठी आर्थिक साहाय्य जागतिक बँकेने दिले, त्याचे विवेचन करता येईल.
- अप्रगत राष्ट्रांच्या आर्थिक विकासाला प्रेरणा देण्याचे कार्य जाकतिक बँकेकडून झाले. त्याबाबतचे स्पष्टीकरण करता येईल.

**४.२.१ प्रास्ताविक :**

दुसऱ्या महायुध्दात अनेक राष्ट्रांची आर्थिक व औद्योगिक हानी झाली. तेंव्हा परत युध्द वाढू नये व चलन विषयक व भांडवली व्यवहार सुरळीतपणे चालावेत व उध्वस्त झालेल्या उद्योगांची परत उभारणी करता यावी त्यासाठी त्यांना पुरेसे अर्थ साहाय्य मिळावे म्हणून आर्थिक मदत देणारी वित्त संस्था स्थापन व्हावी,

असे विचार पुढे आले. तेंव्हा अमेरिकेचे त्यावेळचे राष्ट्राध्यक्ष फ्रँक्लीन रूझव्हेल्ट यांनी पुढाकार घेतला व वित्त संस्था स्थापन व्हावी म्हणून ब्रेटनवूडस् येथे जुलै १९४४ मध्ये आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली. चर्चा होऊन आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँक या दोन वित्त संस्था स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार या बँकेचे प्रत्यक्ष कार्य जून १९४६ मध्ये सुरू झाले. सद्या बँकेचे १८४ देश सभासद आहेत.

**४.२.२ विषय विवेचन**

**जागतिक बँकेचे उद्देश**

१) **पुनर्रचनेसाठी मदत :** दुसऱ्या महायुध्दात अनेक राष्ट्रांच्या अर्थव्यवस्था, बेचिराख झाल्या होत्या. त्यामध्ये इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, जपान या देशांची प्रचंड हानी झाली होती. त्यांच्या पुनर्रचनेसाठी दिर्घ मुदतीच्या भांडवलाचा पुरवठा करून विकास साधणे.

२) **गुंतवणूकीस प्रोत्साहन :** सभासद राष्ट्रातील खाजगी गुंतवणूक दाराना प्रोत्साहन देणे. त्यासाठी त्यांना आवश्यक ती हमी देणे, सरकारला अर्थ साहाय्य देऊन मागासलेल्या देशात भांडवल गुंतवणूकीला प्रवृत्त करणे.

३) **विकसनशील देशांना मदत :** नविन स्वतंत्र झालेल्या मागासलेल्या राष्ट्रांच्या उत्पादनात व साधन सामग्रीत वाढ होण्यासाठी मदत करणे हे महत्त्वाचे उद्दिष्ट होते.

४) **आंतरराष्ट्रीय व्यापार वाढविणे :** आंतरराष्ट्रीय गुंतवणूकीला चालना दिल्यास, आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ घडवून आणता येईल म्हणून अर्थ साहाय्य देण्याचे धोरण स्विकारणे.

५) **मागासलेल्या राष्ट्रांना मदत :** आशिया व आफ्रिका खंडात अनेक राष्ट्रे मागासलेली आहेत. त्यांचा मागासलेपणा कमी करण्यासाठी व राष्ट्रांच्या उत्पादनात वाढ घडवून आणण्यासाठी त्यांना भांडवली साहाय्य देणे.

६) **विकासातील असमतोल दूर करणे :** विविध राष्ट्रांच्या विकासात असमतोल असल्याने आंतरराष्ट्रीय व्यापारात अडथळे निर्माण होतात व दुर्मिळ चलनाची टंचाई वाटते. त्यासाठी आर्थिक साहाय्य देणे व विकासातील असमतोल दूर करणे.

७) **आंतरराष्ट्रीय सहकार्य :** देशा-देशातील वैरभाव कमी करणे व आंतरराष्ट्रीय सहकार्य प्रस्थापित करून बंधुभाव निर्माण करण्याचे धोरण जागतिक बँकेने स्विकारले.

**४.२.३ जागतिक बँकेची कार्यपध्दती :**

१) **हानी झालेल्या देशांची उभारणी :** दुसऱ्या महायुध्दात युरोपियन देश व जपान या राष्ट्रामधील उद्योगांची हानी झालेली होती. त्यांची पुनर्रचना करण्यासाठी अर्थ साहाय्य करणे आवश्यक आहे. त्यासाठी जागतिक बँकेने त्यांना आर्थिक मदत दिली.

२) **वाढती कर्जे :** जागतिक बँकेने खाजगी गुंतवणूक दाराना हमी देऊन सभासद राष्ट्राला कर्जपुरवठा केला व त्याचा योग्य वापर व्हावा याकडे लक्ष दिले. पुनर्रचना कार्यासाठी ५०० द.ल. डॉलरची मदत दिली. पाणी पुरवठा रस्ते विकास, साखर उद्योग व इंजिनियरिंग उद्योगासाठी ४१५ द.ल. डॉलरची कर्जे दिली. १९८० पर्यंत लघु उद्योगांना ३.५ अब्ज डॉलरची कर्जे दिली. सन २००० मध्ये ३०० प्रकल्पांना ९८ अब्ज डॉलरपेक्षा अधिक कर्जे दिली.

४) **तांत्रिक सल्ला व सेवा :** विकसनशील देशांना विविध प्रकारच्या आर्थिक, तांत्रिक व सल्लागाराच्या सेवा उपलब्ध करून देते. प्रकल्पांना कार्यक्षम बनविण्यासाठी तांत्रिक मदत देते. त्यामुळे आर्थिक विकासाला चालना मिळते.

५) **नियोजन यंत्रणा उभारणे :** विकसनशील देशांना त्यांची नियोजन यंत्रणा उभारण्यासाठी जागतिक बँकेचे तंज्ञ, मार्गदर्शन करतात. जागतिक बँकेने १९५५ मध्ये आर्थिक विकास संस्था स्थापन करून त्याद्वारा विकसनशील देशातील अधिकाऱ्यांना, आर्थिक, विकासाच्या तंत्राचे प्रशिक्षण देण्याचे कार्य केले जाते.

६) **लोकसंख्या विषयक समस्या सोडविणे :** जागतिक बँकेने सभासद राष्ट्रांना मार्गदर्शन देण्यासाठी सन १९६८-६९ मध्ये एक स्वतंत्र विभाग सुरू केला. लोकसंख्या वाढीची समस्या सोडविण्यासाठी, कुटुंब नियोजन विषयक दिर्घकालीन कार्यक्रम, आखण्यास मदत दिली. पर्यटन सुविधा वाढवून विदेशी चलन मिळविण्यासाठी, आर्थिक मदत देण्याचे कार्य केले जाते.

७) **तंटे सोडविणे :** अनेक राष्ट्रात निर्माण होणारे तंटे सोडविण्याचे कार्य केले जाते. १९६६ मध्ये तंटे सोडविण्यासाठी 'आंतरराष्ट्रीय केंद्र' नावाची यंत्रणा निर्माण करण्यात आली. सुल्झ कालवा बाबतचा निर्माण झालेला तणाव कमी केला.

८) **सामाजिक व आर्थिक संशोधन प्रकल्प :** जागतिक बँक आपल्या एकूण खर्चापैकी ३% रक्कम सामाजिक व आर्थिक संशोधन प्रकल्पासाठी शिल्लक ठेवते त्याचा वापर करून १९८५ पर्यंत १६५ संशोधन प्रकल्प पूर्ण केले आहेत.

९) **कर्ज सापळ्यातून मुक्तता :** जगातील अनेक सभासद राष्ट्रांना, कर्जाच्या सापळ्यातून बाहेर पाडण्यासाठी आर्थिक मदत दिली आहे. प्रामुख्याने ब्राझील, अर्जेंटिना, चिली या देशांना त्यांची कर्ज भागविण्यासाठी आर्थिक मदत दिली आहे. तसेच इतर अनेक राष्ट्रांना कर्जातून मुक्त करण्याचे कार्य जागतिक बँकेने केले आहे.

### ४.२.४ जागतिक बँकेचे यश :

१) **पुनर्रचना कर्जावर भर :** दुसऱ्या महायुध्दात बेचिराख झालेल्या युरोपियन देश व जपान यांना फार मोठी कर्जे देण्यात आली. त्यातून आर्थिक पुनर्रचना करता आली.

२) **विकसनशील देशांना मदत :** सभासद राष्ट्रातील विकसनशील राष्ट्रांना मोठ्या प्रमाणात मदत दिली. त्यांना दिर्घकालीन कर्जाची सोय करण्यात आली.

३) **पायाभूत सुविधांची उपलब्धता :** प्रगत व अप्रगत देशांच्या पायाभूत सुविधासाठी जागतिक बँकेने मोठ्या प्रमाणात कर्ज सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. पाणी पुरवठा, विद्युत पुरवठा, दूरसंचार, रस्ते इ. क्षेत्रात मोठ्या प्रमाणात असा कर्ज पुरवठा दिला जातो. १९७५ पर्यंत जागतिक बँकेने २९ अब्ज डॉलर्सची कर्ज दिली आहेत.

४) **शेती-क्षेत्रासाठी कर्जपुरवठा :** जागतिक बँकेने शेती क्षेत्रासाठी धरणे व पाटबंधारे प्रकल्प उभारण्यास प्रचंड कर्जपुरवठा केला आहे. शेतमाल विक्री, संकरित बियाणांचा कार्यक्रम, भुसुधारणा, शेती संबंधी शिक्षण इ. उपक्रमांना मदत केली आहे.

५) **सामाजिक गरजांकडे लक्ष :** जागतिक बँकेने १९६३ पासून सामाजिक गरजाकडे लक्ष देण्यास सुरूवात केली त्या मध्ये अपुरा व निकस आहार, प्रदूषण राष्ट्रीय उत्पन्नाची वाटणी इ. प्रश्नाबाबत उपाय

योजना करण्यासाठी, आर्थिक साहाय्य देण्यात आले. अलिकडे नागरी पाणी पुरवठा, सांडपाण्याच्या निचऱ्याची व्यवस्था पर्यटन इ. कारणासाठी आर्थिक मदत दिली जाते.

६) **लघु उद्योगांना साहाय्य :** विकसनशील राष्ट्रात लघु उद्योगांच्या क्षेत्रात श्रम प्रधान उद्योग वाढविण्यासाठी जागतिक बँकेने आर्थिक मदत दिली आहे. सन १९७५ अखेर ४४ देशातील ६८ वित्त महामंडळाना ३ अब्ज डॉलर्स कर्ज दिले आहे. त्यातून अनेक लघु उद्योगांना कर्ज पुरवठा दिला जातो. त्यामुळे लघु उद्योगांच्या विकासाला मदत मिळाली.

७) **कर्जाची समान प्रादेशिक विभागणी :** या बँकेने जगातील सर्व राष्ट्रांना समान कर्जे देण्याचे तत्त्व पाळले आहे. एकूण कर्ज पुरवठ्यापैकी २५% आशिया व मध्यपूर्वेकडील देश, ३०% पश्चिम गोलर्धातील राष्ट्रे, २०% युरोप खंडातील राष्ट्रे, १३% आफ्रिकेतील देशांना आर्थिक मदत देण्यात आली.

८) **विविध प्रकारच्या सेवा :** जागतिक बँकेने विविध राष्ट्रांना तांत्रिक, आर्थिक व सल्लागार सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यामुळे आर्थिक विकासाला चालना मिळाली.

९) **कमी व्याजदर :** जागतिक बँक कर्जावर कमी व्याज आकारते. कर्जावर दरसाल ८.५% व्याज दर आकारला जातो. कांही कर्जे अप्रगत राष्ट्रांना सवलतीच्या व्याज दराने दिली जातात. त्यावर ४.५% व्याज दर असतो.

### ४.२.५ जागतिक बँकेचे अपयश :

१) **अपुरे भांडवल :** जागतिक बँकेने युध्दात हानी झालेल्या राष्ट्रांना भरपूर मदत दिली. मात्र मागासलेल्या राष्ट्रांची संख्या जास्त आहे. त्यांना आर्थिक मदत देण्यासाठी जादा भांडवलाची गरज आहे. मात्र त्या प्रमाणात पुरेसे भांडवल बँकेकडे नाही. त्यामुळे अर्थ पुरवठा कमी पडतो.

२) **अविकसित राष्ट्राकडे दुर्लक्ष :** जागतिक बँकेने बऱ्याच अविकसित राष्ट्राकडे दुर्लक्ष केले आहे. आफ्रिका व आशिया खंडातील मागासलेल्या राष्ट्रांना अल्प मदत दिली.

३) **विविध अडचणी :** जागतिक बँकेचे कर्ज मिळविण्यासाठी अनेक टप्यातून जावे जगते. कर्ज वापरावर बंधने घातली जातात. हस्तक्षेप वाढतो. त्यामुळे अडचणी निर्माण होतात.

४) **अमेरिकेचा वाढता प्रभाव :** जागतिक बँकेस अमेरिकेने जादा निधी दिला असल्याने, त्यावर अमेरिकेचा वाढता प्रभाव निर्माण झाला.

५) **अयोग्य वागणूक :** गरीब, मागासलेल्या राष्ट्रांना अयोग्य वागणूक दिली जाते. विकास प्रकल्पास अनेक अटी घातल्या जातात.

६) **राजकीय गटांचा अड्डा :** जागतिक बँकेवर श्रीमंत राष्ट्रांचा प्रभाव अधिक आहे. त्यामुळे श्रीमंत देशाच्या राजकीय गटाचा अड्डा बनला आहे. अप्रगत देशांना विशेष महत्त्व दिले जात नाही.

### ४.२.६ सारांश :

१. जागतिक स्तरावरील युध्दकालीन झालेली औद्योगिक हानी भरून काढण्यासाठी मदत दिली.

२. उद्योगांची परत उभारणी करण्यास साहाय्य.

३. पायाभूत सुविधा निर्माण करण्यास अर्थ साहाय्य दिले.

४. मागासलेल्या राष्ट्रांना उद्योग उभारणीस भांडवली मदत.

### ४.२.७ स्वयं-अध्ययन प्रश्न व उत्तरे :

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. जागतिक बँकेची स्थापना करण्यासाठी अमेरिकेतील कोणत्या राष्ट्राध्याक्षाने पुढाकार घेतला ?

२. जागतिक बँकेचे कार्य कधी सुरू झाले ?

३. पुनर्रचना कर्जे अधिक कोणास दिली ?

४. सामाजिक गरजाकडे जागतिक बँकेने केंव्हा पासून लक्ष दिले ?

५. कर्जाच्या सापळ्यातून बाहेर पडण्यासाठी जागतिक बँकेने कोणत्या राष्ट्रांना अधिक मदत दिली आहे ?

उत्तरे : १) फ्रँक्लीन डी. रूझव्हेल्ट

२) जून १९४६

३) युरोपियन देश व जपान.

४) १९६३ पासून

५. ब्राझील, अर्जेंटिना, चिली.

### ४.२.८ पारिभाषिक शब्द :

- **वित्त संस्था** : चलनाचा पुरवठा करणारी संख्या.
- **प्रशिक्षण** : तांत्रिक स्वरूपाची माहिती व ज्ञान देणे.
- **उपक्रम** : विकासाच्या दृष्टीने हाती घेतलेले कार्य.
- **अप्रगत** : ज्या राष्ट्रांची स्थिती, मागासलेली आहे असे देश.
- **प्रादेशिक** : विशिष्ट नैसर्गिक भू-प्रदेश.

### ४.२.९ सरावासाठी स्वाध्याय :

१. जागतिक बँकेची उद्दिष्टे सांगून कार्ये विशद करा.

२. जागतिक बँकेच्या कामगिरीचे परिक्षण करा.

३. टीप लिहा : जागतिक बँक

## जागतिक व्यापार संघटना W.T.O. (World Trade Organziation)

**अनुक्रमणिका**


४.३.० उद्दिष्टे

४.३.१ प्रास्ताविक

४.३.२ विषय विवेचन जागतिक व्यापार संघटनेची उद्दिष्टे

४.३.३ जागतिक व्यापार संघटनेतील प्रमुख तरतुदी

४.३.४ जागतिक व्यापार संघटनेच्या कार्याचे मूल्यमापन

४.३.५ जागतिक व्यापार संघटनेचे अपयश

४.३.६ सारांश

४.३.७ स्वयं-अध्ययन प्रश्न व उत्तरे

४.३.८ पारिभाषिक शब्द

४.३.९ सरावासाठी स्वाध्याय


**४.३.० उद्दिष्टे :**

- जागतिक व्यापाराचा विस्तार करणे बाबातचे कार्य स्पष्ट होते.
- लाभकारक जागतिक व्यापारी व्यवस्था प्रस्थापित करण्याचा धोरणात्मक प्रयत्न स्पष्ट करता येतो.
- विविध देशातील भेदभाव करणारी व्यापारी पध्दत नष्ट करण्यासाठी स्विकारलेले धोरण सांगता येते.
- आर्थिक उदारीकरणासाठी शेती, उद्योग, सेवा इ. वरील जकाती कमी करणे या बाबतचे कार्य स्पष्ट होते.
- आंतरराष्ट्रीय संस्थामध्ये सहकार्य वाढविणे या बाबत स्विकारलेले धोरण स्पष्ट करता येईल.

**४.३.१ प्रास्ताविक :**

दुसऱ्या महायुध्दानंतर आंतरराष्ट्रीय सहकार्य संपुष्टात आले व परकीय व्यापार घटत गेला. आर्थिक व्यवहारात अडचणी वाढत गेल्या. तेंव्हा त्यातून मार्ग काढण्यासाठी, १९४७ मध्ये हॅवना येथे जागतिक परिषद घेण्यात आली. त्यात २३ राष्ट्रांनी एकत्रित येऊन जकात व व्यापाराबाबत सर्व सामान्य करार करण्यात आला. त्यास गॅट म्हणतात. भारत हा संस्थात्मक सदस्य देश आहे. गॅटच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार सदस्य राष्ट्रांचा व्यापार चालत गेला. १९८५ नंतर मतभेद वाढले. त्यातून डंकेल प्रस्ताव तयार झाला. त्यास बराच विरोध झाला. १९९३ मधील उरूग्वे येथील मसुद्याला अंतिम रूप देण्यात आले. १९९४ मध्ये भारतासह जगातील एकूण १९४ देशांनी त्या मसुद्यावर मान्यता दर्शक सह्या केल्या व जानेवारी १९९५ मध्ये जागतिक व्यापार संघटनेची (W.T.O.) स्थापना झाली.

**विषय विवेचन :**

**४.३.२ जागतिक व्यापार संघटनेची उद्दिष्टे :**

१. देशा-देशात रोजगार संधी वाढविणे.

२. जगातील सर्व देशांतील लोकांचे व्यक्तिगत उत्पन्न वाढविणे.

३. उपलब्ध साधन सामग्रीचा पर्याप्त वापर करणे.

४. जागतिक व्यापाराचा विस्तार घडवून आणणे.

५. सर्व राष्ट्रांना जागतिक व्यापाराचा लाभ मिळेल अशी व्यवस्था निर्माण करणे.

६. मुक्त व्यापार व्यवस्था निर्माण करण्यासाठी व्यापारातील अडथळे दूर करणे.

७. आर्थिक उदारीकरणाचे धोरण स्विकारणे, उद्योग व सेवा वरील जकाती कमी करणे.

८. उत्पादन पातळीत वाढ घडवून आणणे.

९. सभासद राष्ट्रांच्या विकासात गती देणे.

१०. आंतरराष्ट्रीय संस्थामध्ये, आर्थिक सहकार्य वाढीस लावणे व मुक्त व्यापार वाढविणे.

**४.३.३जागतिक व्यापार संघटनेतील प्रमुख तरतूदी :**

**१) शेमालाचा व्यापार :** नजीकच्या काळात १० वर्षात जकातीत घट करणे. अविकसित राष्ट्रांना व्यवहार तोल समतोला साहाय्य देणे. शेतमाल व्यापारात वाढ करणे. निर्यातीसाठी दिल्या जाणाऱ्या अर्थ साहाय्यात सहा वर्षात कपात करणे. गरीबांना सवलतीच्या दरात अन्नधान्य उपलब्ध करून द्यावे.

**२) सुती कापड व तयार कपडे :** सुती कापड व तयार कपडे यांचा व्यापार वाढविणे असी तरतूद डंकेल प्रस्तावात होती. त्यासाठी कापड आयाती वरील निर्बंध कमी करण्याचे धोरण स्विकारले. बिगर जकात धोरणातून त्यांचा व्यापार वाढविणे.

**३) सेवांचा समावेश :** करारात विविध सेवांचा समावेश केला. विमा, बँकींग, वाहतूक, टेलीकम्युनिकेशन, हवाई वाहतूक, जहाज वाहतूक, करमणूक इ. समावेश करण्यात आला. त्या सेवा विषयक व्यापारात भेदाभेद न करणे व बाजारपेठ सर्वांसाठी खुली करणे.

**४) बुध्दिसंपदा मालमत्तेचे रक्षण करणे :** या मध्ये ९ प्रकारची बुध्दिसंपदा आहे. पेटंटचा अधिकार संशोधन कार्यात २० वर्षे राहील. त्यास संरक्षण मिळावे.

**५) व्यापाराशी संबंधित गुंतवणूक उपाय :** सदस्य राष्ट्रातील भांडवल गुंतवणूकीसंबंधी जे निर्णय घेतले जातात त्यांचा आंतरराष्ट्रीय व्यापारावर प्रतिकूल परिणाम होऊ नये व व्यापारात अडथळे निर्माण होऊ नयेत, म्हणून कांही उपाय सुचविले आहेत. त्यासाठी जागतिक व्यापारात वृध्दी घडवून आणली. गुंतवणूक दाराना सवलती देण्यात आल्या. व्यापाराशी संबंधित गुंतवणूकीसाठी सर्व निर्बंध ५ वर्षात उठविण्यात आले.

**६) तक्रार निवारण :** जागतिक व्यापार संघटनेने विवाद निवारण मंडळाची स्थापना केली आहे. त्यामुळे बहुस्तरीय व्यापार प्रणालीस संरक्षण राहील.

७) **अर्थसाहाय्य (Subsidies) :** निर्यातीसाठी कोणतेही अर्थ साहाय्य देता येणार नाही. विविध सवलती आठ-दहा वर्षात टप्या टप्याने कमी करून शेवटी संपुष्टात आणणे. निर्यात अर्थसाहाय्य देताना सभासद देशांच्या व्यापाराला हानी पोहोचणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे.

८) **अवपुंजन विरोधी उपाय :** अवपुंजन म्हणजे एखाद्या देशाची बाजारपेठ काबिज करण्याच्या हेतूने, वस्तू कमी किमतीला विकणे होय. आंतरराष्ट्रीय व्यापारात अवपुंजनाचा स्विकार करतील, त्यांच्या विरोधात कायदेशीर कारवाई करता येईल.

**४.३.४ जागतिक व्यापार संघटनेच्या कार्याचे मूल्यमापन : यश /फयादे**

१) **वस्तुतील व्यापारात उदारीकरण :** जागतिक व्यापार संघटनेमुळे अनेक औद्योगिक व विकसनशील देशांनी आपल्या बाजारपेठा मुक्त करण्याचे धोरण स्विकारले. त्यासाठी आयातीवर जकाती कमी करण्यात आल्या. त्यामुळे जागतिक व्यापाराचा विस्तार झाला.

२) **नविन क्षेत्रांना मार्गदर्शन :** या करारामुळे प्रथमच सेवेतील आंतरराष्ट्रीय व्यापार बौध्दिक गुंतवणूक मालमत्ता अधिकार, तसेच व्यापार संबंधित गुंतवणूक उपाय या विषयी नियम तयार करण्यात आले.

३) **औद्योगिक उत्पादने :** औद्योगिक उत्पादनावरील आयात भार, जकाती कमी करण्याचे मान्य केले. सुती कापड वाहतुकीची साधने, रबर, कातडी, चप्पल, प्रवास साधने, इ. जकाती कमी केल्याने व्यापार वाढला व औद्योगिक उत्पादने वाढत गेली.

४) **कृषी उत्पादने :** कृषी उत्पादनावरील चालू जकाती बंधने कमी करण्याचे धोरण स्विकारले. त्यामुळे कृषी उत्पादनाचा व्यापार वाढला.

५) **कापड उद्योग :** सूत व कपडे या वरील आयात कोट्यावरील द्विस्तरीय बोलणी १० वर्षात बंद केली जातील. त्यामुळे व्यापार वाढण्यास मदत झाली.

६) **बौध्दिक स्वामित्त्वाचे अधिकार :** बौध्दिक स्वामित्त्व अधिकाराशी संबंधित व्यापाराचा या करारात अंतर्भाव करण्यात आला. त्यामुळे पेटंट, ट्रेडमार्क, कॉपी राईट या बौध्दिक स्वामित्त्वाचे रक्षण करणे शक्य झाले.

७) **औद्योगिक अर्थ साहाय्य :** कराराने औद्योगिक अर्थ साहाय्य नियमात महत्त्वाचे बदल केले. निर्यात अर्थ-साहाय्यास प्रतिबंध करण्यात आला. विकसनशील देशांना अंमलबजावणीसाठी अधिक कालावधी देण्यात आला.

८) **बळकट नियम :** करारात वस्तू मूल्य घट, औद्योगिक अर्थसाहाय्य यांचा समावेश करण्यात आला. त्यामुळे आंतरराष्ट्रीय क्षेत्रात नियम बळकट झाले.

९) **डंपिंग विरोधी उपाय :** डंकेल प्रस्तावात डंपिंग विरोधी कार्य पध्दती अधिक पारदर्शक करण्यात आली व नविन नियम सुरू करण्यात आले.

१०) **विकसनशील देशावरील परिणाम :** व्यापाराच्या उदारीकरणाच्या धोरणामुळे बहुसंख्य विकसनशील देशांना अधिक लाभ झाला. सुती कापडाची निर्यात ८०% पेक्षा अधिक वाढली आहे. शेती उत्पादने निर्मित निर्यातदार देशांना उदारी करणाने फायदा झाला आहे. उदा. अर्जेंटिना, ब्राझील, कॅनडा, चिली, कोलंबिया, हंगेरी, इंडोनेशिया, मलेशिया, फिलीपाईन्स, थायलंड इ. देश ब्राझील, क्युबा हे उत्पादक

देश, चीन, केनिया, मेक्सिको द. आफ्रिका या बळकट शेतीक्षेत्र असणाऱ्या विकसनशील देशानाही लाभ झाला आहे.

### ४.३.५ जागतिक व्यापार संघटनेचे अपयश/तोटे

**१) सेवेतील व्यापारात तोटा :** बँकींग, विमा, टेलिक्म्युनिकेशन इ. सेवांच्या बाबतीत प्रगत देशांशी तुलना करता विकसनशील देशांना कमी लाभ होतो व प्रगत राष्ट्रांना अधिक लाभ होतो.

**२) व्यापाराशी संबंधित वादाचे विषय :** पर्यावरणाचे संरक्षण स्वस्त मजुर पुरवठा, मानवी हक्क या सारख्या वादाच्या विषयांशी विकसनशील देशांच्या व्यापाराशी संबंध जोडला जातो. त्यामुळे त्या देशाच्या निर्यातीवर, बंधने लादली जातात.

**३) शेती साहाय्यासाठी अपुरी तरतूद :** या करारात लहान शेतकरी व शेतमजूर यांच्याकडे फारसे लक्ष दिले नाही. मात्र त्यांना अधिक अर्थसाहाय्याची गरज असते. त्यामुळे अपुरी मदत मिळाली.

**४) जीवितांचा पेटंट अयोग्य :** सर्व जीवीत प्रकाराविषयी वनस्पती व सूक्ष्म जैविक यांच्या समावेशासह संबंधित हक्काची तरतूद अयोग्य वाटते.

**५) असमान स्पर्धा :** मोठी स्पर्धाशक्ती असलेल्या विकसित देशांशी, नेहमी विकसनशील देशांना स्पर्धा करावी लागते. बहुराष्ट्रीय कंपन्याच्या कारभारावर कोणतेही नियंत्रण नसते. प्रगत राष्ट्राकडे जैविध पेटंट विषयी सामर्थ्यशाली शक्ती असते. त्यांच्याशी स्पर्धा करणे, विकसनशील देशांना शक्य होत नाही.

**६) बहुमताचा अनावश्यक आग्रह :** प्रगत देशांच्या सामर्थ्यवान आर्थिक परिस्थितीने व सौदाशक्तीने अनेक लहान विकसनशील देशांना बहुमतासाठी भाग पाडण्यास दबाव आणला जातो.

**७) मंत्रिमंडळ पातळीवरील बैठकीत अनावश्यक कालावधी :** जागतिक व्यापार संघटनेच्या करारानुसार मंत्रिमंडळ परिषद किमान २ वर्षातून एकदा घेण्याची तरतूद आहे. त्यामुळे प्रगत देशांना आपल्या इच्छेप्रमाणे बदल घडवून आणण्यास संधी मिळते.

### ४.३.६ सारांश :

१. आंतरराष्ट्रीय व्यापार बंधन मुक्त कसा झाला याचे विवेचन समजते.

२. व्यापारावरील जकाती, बंधने कमी होऊन देशा-देशात सहकार्य वाढले याची जाणीव होते.

३. व्यापारासाठी विविध मार्गाने प्रेरणा मिळून, उत्पादन प्रक्रिया अधिक होते. याचे स्पष्टीकरण होते.

४. संशोधन निर्मितीस चालना व पेटंटचे विशिष्ट राष्ट्रास लाभ प्राप्त झाले. त्यामुळे उत्पादने वाढण्यास मदत होते. यांचे स्पष्टीकरण मिळते.

### ४.३.७ स्वयं-अध्ययन प्रश्न व उत्तरे :

**अ) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. जकात व व्यापाराचा करार करण्यासाठी सर्वप्रथम कोणत्या ठिकाणी जागतिक परिषद घेण्यात आले.

२. जागतिक व्यापार संघटनेची स्थापना कधी झाली.

३. जकातीचे दर कमी झाल्याने कोणते उत्पादन वाढले ?

४. कोणत्या कंपन्यांच्या कारभारावर नियंत्रण नसते.

५. उदारीकरणाने कोणत्या उत्पादित मालाची निर्यात करणाऱ्या निर्यातदार देशांचा फायदा झाला आहे?

**उत्तरे :** १. हॅवना

२. जानेवारी १९९५

३. औद्योगिक

४. बहुराष्ट्रीय कंपन्या

५. शेती उत्पादने निर्मित

**४.३.८ पारिभाषिक शब्द :**

- **उदारीकरण** : आयात व उत्पादन गुंतवणूकीवरील अनिष्ट निर्बंध, नियंत्रणे मोडीत काढणे.
- **गॅट** : जकात व व्यापाराबाबत सर्व सामान्य करार.
- **पेटंट :** संशोधन वापर करून नविन पध्दतीच्या उत्पादनाच्या विक्री व निर्मिती करण्या बाबत सर्वधिकार प्राप्त होणे.
- **प्रतिकूल :** आर्थिक व्यवहारात तूट निर्माण होणारी स्थिती.
- **अवपुंजन :** एखाद्या देशाची बाजारपेठ काबिज करण्याच्या हेतूने वस्तू कमी किमतीला विकणे होय.

**४.३.९ सरावासाठी स्वाध्याय :**

१. जागतिक व्यापार संघटनेची उद्दिष्टे कोणती ? ती सफल झाली काय ?

२. जागतिक व्यापार संघटनेच्या कामकाजाचा आढावा घ्या ?

३. जागतिक व्यापार संघटनेच्या तरतुदी सांगून कार्याचे मूल्यामापन करा ?

४. टीप लिहा : जागतिक व्यापार संघटना.

## सार्क SAARC (South Asian Association For Regional Co-operation)

### प्रादेशिक सहकार्याकरिता दक्षिण आशियाई संघटना

**अनुक्रमणिका**

४.४.० उद्दिष्टे

४.४.१ प्रास्ताविक

४.४.२ विषय विवेचन

विभागीय सहकार्याची आवश्यकता/उद्दिष्टे

४.४.३ सार्कची कार्यवाही

४.४.४ सारांश

४.४.५ स्वयं-अध्ययन प्रश्न व उत्तरे

४.४.६ पारिभाषिक शब्द

४.४.७ सरावासाठी स्वाध्याय

**४.४.० उद्दिष्टे :**

- समान उद्दिष्टांच्या प्राप्तीसाठी कांही राष्ट्रांनी एकत्रित येऊन सार्क हे संघटन स्थापन केले याचे स्पष्टीकरण देता येते.
- व्यापार वृध्दी, शांतता व सुरक्षितता यासाठी सार्कचा कसा उपयोग होतो ते सांगता येईल.
- उद्योगांची वृध्दी सफल करण्यासाठी तांत्रिक सहकार्य कसे उपयुक्त ठरते याचे विवेचन देता येईल.
- विविध देशांच्या प्रश्नाबाबत समंजसपणा वाढवून त्यांच्यात सहकार्य वाढविणे गरजेचे आहे हे स्पष्ट करता येईल.
- प्रगतीसाठी विभागीय सहकार्याची गरज भासते, त्यासाठी त्यांचे संघटन करून विविध समस्या दूर करता येतात. या बाबतचे स्पष्टीकरण करता येते.

**४.४.१ प्रास्ताविक :**

दक्षिण आशिया मधील राष्ट्रात अनेक उग्र प्रश्न निर्माण झाले होते. प्रगतीसाठी विविध राष्ट्रात विभागीय सहकार्याची गरज निर्माण झाली. तेंव्हा दक्षिण आशियातील भारत. पाकिस्तान, बांगला देश, श्रीलंका, नेपाळ, भूतान व मालदीव या ७ राष्ट्रांनी एकत्रित येऊन विभागीय सहकार्यासाठी दक्षिण आशियाई संघटना म्हणजे सार्कची डिसेंबर १९८५ मध्ये स्थापना केली. या संघटनेस युनोने मान्यता दिली आहे. दक्षिण आशियाई राष्ट्रांची परिस्थिती अनेक बाबतीत सारखीच असल्याने त्यांच्यात क्षेत्रिय सहकार्य निर्माण होण्याची गरज होती. सर्व देश प्राथमिक उत्पादन करणारे व प्रमुख व्यवसाय शेती असणारे आहेत. त्या राष्ट्रात लोकसंख्या वाढीचा प्रश्न, बेकारी, दारिद्र्य, चलन वाढ, प्रादेशिक विष्मता इ. समस्या आहेत. त्यासाठी एकमेकांच्या सहकार्यातून अडचणी सोडविण्यासाठी त्यांची संघटना निर्माण झाली.

### ४.४.२ विषय विवेचन :

दक्षिण आशियाई राष्ट्रात लोकसंख्या अधिक प्रमाणात राहते. मात्र भू-क्षेत्र कमी आहे. संरक्षण खर्चात वाढ झालेले आहे. लोकांत प्रचंड दारिद्र्य आढळते. साक्षरतेचे प्रमाण कमी आहे. आंतरराष्ट्रीय व्यापारात तूट अधिक आढळते. परकीय कर्जाचे प्रमाण अधिक आहे. तेंव्हा त्यांच्या समस्या, सहकार्याने कमी करण्यासाठी त्यांची संघटना तयार करण्यात आली.

**विभागीय सहकार्याची आवश्यकता :**

**प्रमुख कारणे :**

१) **वेगवान आर्थिक विकास :** या विभागातील नागरिकांना विकास प्रक्रियेचा लाभ व्हावा व लोकांचे दरडोई उत्पन्न, साक्षरता प्रमाण व राहणीमान इ. मध्ये सुधारणा व्हावी. शेती, उद्योग, सेवा, व्यवसायाची प्रगती घडून यावी यासाठी विभागीय सहकार्याची गरज वाढली होती.

२) **समस्यांचे निराकरण :** सहभागी राष्ट्रात भांडवलाचे दुर्मिक्ष आहे. ही समस्या सोडविण्यासाठी परस्पर सहकार्याची गरज भासते. वाहतूक दळण-वळण पर्यटन या क्षेत्रात विभागीय सहकार्य शक्य आहे.

३) **व्यापारवृध्दी :** सार्क संघटनेतील सर्व देश, विकासाच्या प्राथमिक अवस्थेत आहेत. ते एकत्र आल्यास त्यांच्यातील आपापसातील व्यापारात वाढ घडून येणार नाही.

४) **तांत्रिक सहकार्य :** सर्व राष्ट्रात तांत्रिक ज्ञानामध्ये असमानता आहे. ही तफावत दूर करण्यासाठी प्रादेशिक सहकार्याची गरज भासते.

५) **औद्योगिकीकरणासाठी :** सभासद देशांतील औद्योगिक सहकार्य वाढविणे गरजेचे होते. सभासद राष्ट्रांनी आपापसातील व्यापारी निर्बंध दूर केल्यास, तेथील उद्योगांची वृध्दी घडून येते व विशेषीकरण होऊन श्रमशक्तीचा पर्याप्त वापर करता येतो. त्यासाठी विभागीय सहकार्याची गरज.

६) **भेदाभेद दूर करणे :** गरीब-श्रीमंत, प्रगत-अप्रगत असा भेदा भेद केल्याने प्रगतीवर प्रतिकूल परिणाम होतो. म्हणून त्यांच्या मध्ये सहकार्य निर्माण झाल्यास आयात निर्यात व्यापार वाढतो. त्यासाठी विभागीय सहकार्याची गरज भासते.

७) **आंतरराष्ट्रीय बाजारात योग्य व्यवहार वाढविणे :** या प्रादेशिक विभागातील राष्ट्रात कांही समान वस्तूंचे उत्पादन होते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात अयोग्य स्पर्धा सुरू होऊन तोटा होतो. उदा. ज्यूटसाठी भारत, बांगलादेश, चहाच्या निर्यातीत भारत, श्रीलंका यांच्याच स्पर्धा निर्माण होते. मात्र सार्कच्या माध्यमाने हे देश एकत्रित आले तर त्यांच्या मधील स्पर्धा कमी होईल व चांगले आर्थिक व्यवहार वाढीस लागतील त्यासाठी प्रादेशिक सहकार्याची गरज भासते.

**सार्कची उद्दिष्टे :**

१. सभासद राष्ट्रात विभागीय सहकार्याला चालना देणे.

२. दक्षिण आशियाई देशातील लोकांचे कल्याण साधणे व राहणीमान दर्जात सुधारणा घडवून आणणे.

३. लोकांच्या दरडोई उत्पन्नात वाढ घडवून आणणे.

४. आंतरराष्ट्रीय व प्रादेशिक स्तरावर इतर समान उद्दिष्टे असणाऱ्या संस्थाशी सहकार्य प्रस्थापित करणे.

५. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, तांत्रिक, क्षेत्रात परस्परांना मदतीसाठी कार्यक्षम व्यवस्था निर्माण करणे.

६. एकमेकांच्या प्रश्नाबाबत विश्वास, समंजसपणा व सहकार्य वाढविणे.

### ४.४.३ सार्कची कार्यवाही :

सार्क संघटन कार्यातून ७ सदस्य राष्ट्रातील लोकांचे कल्याण साधण्यावर भर दिला जातो. पुढील कार्यवाही करण्यात आली.

१. पहिली शिखर परिषद १९८५ मध्ये ढाका येथे भरली. त्यात दक्षिण आशियाई लोकांचे कल्याण साधण्याचा प्रयत्न झाला. लोकांचे राहणीमान उंचावण्याबाबत निर्णय घेण्यात आला.

२. दुसरी शिखर परिषद १९८६ मध्ये बंगलोर येथे घेण्यात आली. सार्कच्या कामकाजात स्त्रियांचा सहभाग वाढविण्यावर भर दिला.

३. सार्कची तिसरी परिषद १९८७ मध्ये काठमांडू येथे झाली. माहितीच्या देवाण-घेवाणीच्या कार्यक्रमाची घोषणा करण्यात आली.

४. सार्कची चौथी परिषद १९८८ मध्ये इस्लामाबाद येथे झाली. लोकांचा जीवनमानाचा दर्जा उंचावणे, निवास शिक्षण या लोकांच्या मूलभूत गरजा पूर्ण करणे, याकडे लक्ष दिले.

५. पाचवी परिषद १९९० मध्ये माले येते झाली. या परिषदेच लहान मुलींच्या समस्यांना प्राधान्य देण्यात आले.

६. सार्कची सहावी परिषद १९९१ मध्ये कोलंबो येथे भरली. त्यामध्ये दारिद्रय निवारण्याच्या प्रयत्नास प्राधान्य देण्यात आले.

७. सातवी परिषद ढाका येथे भरविण्यात आली. दक्षिण आशिया व्यापार सवलती करार करण्यात आले. त्यामुळे संघटनेतील देशांतर्गत व्यापार वाढीस चालना मिळाली.

८. सार्कची आठवी परिषद दिल्ली येथे भरली. साफ्टाचे रूपांतर सार्कमध्ये केले. देशांच्या एकत्रीकरणावर भर दिला.

९. सार्कची नववी परिषद १९९७ मध्ये मालदीव मधील माले येथे भरविण्यात आली. मागील परिषदेतील निर्णयांची कार्यक्षम अंमलबजावणी करण्याचे ठरले.

१०. सार्कची दहावी परिषद १९९८ मध्ये कोलंबो येथे घेण्यात आली. जकात सवलतीचे विस्तारीकरण यावर भर देण्यात आला.

११. सार्कच्या अकराव्या परिषदेत (१९९९ मध्ये) सदस्य राष्ट्रातील लोकांचे जीवनमान उंचावण्यावर भर दिला.

१२. सार्कची १२ वी परिषद जानेवारी २००४ मध्ये इस्लामाबाद येथे झाली. दहशतवाद विरोधी मतप्रदर्शन, मुक्त व्यापार व सार्कचा जाहीरनामा यावर एकमत झाले.

### ४.४.४ सारांश :

१. सार्कमधील इतर सदस्य देशापेक्षा भारत आर्थिक विकासाच्या क्षेत्रात आघाडीवर असल्याचे दिसून येते.

२. देशांचा समान विकास साधणे त्यासाठी एकमेकांचे सहकार्य मिळविणे हे धोरण स्विकारले आहे.

३. सार्कमुळे एकत्रित संघटन केल्याने शेती ग्रामीण विकास आरोग्य, तंत्रज्ञान, खेळ इ. मध्ये लाभ मिळतात.

४. परस्परांचे सहकार्य मिळवून व्यापार वाढीस चालना दिली जाते.

५. दारिद्रय निवारण्याच्या धोरणास प्राधान्य दिले आहे.

### ४.४.५ स्वयं-अध्ययन प्रश्न व उत्तरे :

**अ) चूक की बरोबर ते सांगा.**

१. सार्कमध्ये दक्षिण आशियातील सात राष्ट्रे सहभागी आहेत.

२. सार्कच्या सहभागी राष्ट्रात भांडवल पुरवठा विपुल होता.

३. सार्क संघटनेतील सर्व देश विकासाच्या प्राथमिक अवस्थेत आहेत.

४. सार्कची आठवी परिषद दिल्ली येथे भरली होती.

५. सार्कची सर्व राष्ट्रात तांत्रिक ज्ञानात समानता आहे.

**उत्तरे :** १. बरोबर २. चूक ३. बरोबर ४. बरोबर ५. चूक

### ४.४.६ पारिभाषिक शब्द :

- **व्यापारवृध्दी :** व्यापारात वाढ होणे.
- **औद्योगिकरण** : एका विशिष्ट ठिकाणी उद्योगांचे मोठ्या प्रमाणात उभारणी करण्याचे धोरण.
- **पर्याप्त** : जास्ती जास्त कार्यक्षम वापर व लाभधारक स्थिती.
- **दुर्मिक्ष** : टंचाई
- **विशेषीकरण :** विशिष्ट वस्तूंचे लाभकारक उत्पादन अधिक करणे.

### ४.४.७ सरावासाठी स्वाध्याय :

१. सार्कची आवश्यकता का भासते.

२. सार्कची उद्दिष्टे व कार्यवाही स्पष्ट करा.

३. सार्क परिषदांमधील महत्त्वाचे निर्णय कोणकोणते स्पष्टीकरण द्या.

४. टीप लिहा : सार्क

**अधिक वाचनासाठी पुस्तके :**


१. मिश्रा व पुरी : इंडियन इकॉनॉमी, मुंबई, हिमालया पब्लिकेशन.

२. अग्रवाल ए.एन्. : इंडियन इकॉनॉमी.

३. डॉ. रविंद्र दोशी, आर्थिक विकास व नियोजन.

४. प्रा. के. एम्. भोसले, के.बी. काटे, व्यावसायकि पर्यावरण.


❑❑❑